म. ग्रं. सं. ठाणें
विषय वधक
सं. क्र. ९३

REFBK-0000170

# पहिल्या भागाची प्रस्तावना व सूचना.

मनुष्य प्राण्यास रोगासारखा दुसरा घातक असा बलाढ्य शत्रु कोणताच नाहीं. तो केव्हां आक्रमणावर झडप घालील हें कळूंही देत नाहीं. अशा वेळीं अर्थात्‌च दुसऱ्यावर ह्मणजे वैद्यावर अथवा डाक्टरावर अवलंबून असावें लागतें. परंतु प्रसंगविशेषीं वैद्य अथवा डाक्टर मिळाला नाहीं, असे प्रसंग खेडेगांवांतून रहाणाऱ्या लोकांस वारंवार येतातच. तर अशा प्रसंगीं जीविताची हानि किंवा खराबी होण्याचा संभव विशेष असतो. तो टाळतां यावा या हेतूनें ज्याचा त्यासच आपला वैद्य होतां येईल, अशा प्रकारच्या विषयानें पूर्ण भरलेला असा हा ग्रंथ तयार केलेला आहे. यांत बहुधा नेहमीं होणारे व ध्यानांत न येणारे, परंतु विचार केला असतां सहज कळणारे अशा प्रकारच्या रोगांची उत्पत्ति कशी होते, त्याला कारणें काय असतात, रोगपरिज्ञान कसें करून घ्यावें, त्यावर इंग्रजी अथवा एतद्देशीय औषधांची योजना कशा प्रमाणानें करावी, तीं औषधें कशा रीतीनें बनवावीं, पथ्यपाण्याचा विचार कसा ठेवावा, इत्यादि सर्व कांहीं प्रकार व्यवस्थेशीर वर्णन केले आहेत. शिवाय शेवटीं आरोग्यरक्षणासाठीं फारच उत्कृष्ठ व सहज पाळतां येतील असे नियमही यांत सांगितले

आहेत. हा ग्रंथ रोगनिर्णयाचा असल्यामुळें मोठ्याच विस्ताराचा आहे व याकरितां याचे भाग केले आहेत. असें करण्यानें वेळ व खर्च यांचाहीं बातबेत राहून; श्रीमंतांपासून तों गरीबांपर्यंत प्रत्येकास हा ग्रंथ संग्रहीं ठेवतां येईल. यांतील लेख इंग्रजी व एतद्देशीय चांगल्या चांगल्या उत्तम नांवाजलेल्या अशा ग्रंथांच्या आधारानें लिहिला आहे. या ग्रंथांतील विषय यथाक्रम घेतले नाहींत, ह्मणजे शिरोरोग वर्णन करितांना त्यासंबंधीं सर्वच रोग येथें न घेतां साधारण प्रकारची बुद्धि जितकें ग्रहण करूं शकेल, तें मान पाहून साधारण त्याचें वर्णन केलें आहे.

या ग्रंथांत आपल्यापैकीं, व विशेषतः इंग्रज लोकांच्या ग्रंथांच्या संबंधानें बहुतेक लेख लिहिले गेले आहेत. यांत जे औषधोपचार लिहिले आहेत ते सर्व उपयुक्त असेच योजिले आहेत. रोगनिर्णयप्रसंगीं विशेष लांबलचक प्रस्तावना न लिहितां बेताचा लेख लिहिला आहे.

ग्रंथरचनेंत प्रथम रोगाचें नांव, त्याची व्याख्या, नंतर त्याची परीक्षा, त्याचीं कारणें, पुढें त्यावर औषधोपचार, पथ्यविचार, आणि शेवटीं थोडेंफार त्या रोगाचें महत्व इत्यादि गोष्टींचा क्रमेंकरून विचार केला आहे.

कोठें कोठें 'कारण दूर करावें' असें लिहिलें आहे, त्याचा अर्थ असा कीं, ज्या कारणानें रोग उत्पन्न झाला तें कारण तात्काळ दूर करावें, ह्मणजे जाग्रणापासून जर एखादा रोग झाला आहे, तर प्रथम जाग्रण करणें टाकून देऊन नंतर औषधोपचार चालू ठेवावा.

ह्या ग्रंथांत सांगितलेल्या औषधांचीं प्रमाणें बहुतेक प्रौढ वयाचींच आहेत. तरी कित्येक ठिकाणीं व विशेषेंकरून लहान मुलांना होणाऱ्या रोगांत त्यांच्या वयमानाप्रमाणेंच औषधांचीं प्रमाणें सांगितलीं आहेत.

पुस्तकांत ठिकठिकाणीं यादी नंबर घातले आहेत, ते शेवटीं क्रमशः राखिले आहेत. तिकडे विशेष लक्ष ठेवावें.

५८ व्या पृष्ठांत सान्टोनीन हें औषध तीन चार दिवस सतत घ्यावें ह्मणून सांगितलें आहे, परंतु त्यापासून कधीं कधीं रेच होऊं लागतात, लघवी पिंवळी होते आणि आसपासचे पदार्थ हिरवट पिंवळ्या रंगाचे दिसूं लागतात, तेव्हां तें घेण्याचें बंद करावें व एरंडेलाचा जुलाब घ्यावा.

५७ व्या पृष्ठांत खुरासनी ओंवा असें लिहिलें गेलें आहे, त्याबद्दल किरमानी ओंवा घ्यावा.

१८, १४९ इ० पानांत **पोट्याश आयओडाईड** हें औषध घ्यावें ह्मणून सांगितलें आहे, परंतु हें औषध कित्येक प्रकृतीला अगदीं थोड्या प्रमाणानें दिलें असतांही सोसत नाहीं. ह्मणजे त्यापासून त्यांना पडसें येतें, डोळे, तोंड हीं सुजतात, घसा खवखवतो, अंगावर पुरळ उठतो, इ० प्रकार होतात; तेव्हां तें औषध बंद करावें; आणि २ तोळे लवंगा घेऊन त्यांत १६ तोळे पाणी घालून चतुर्थांश काढा उरला ह्मणजे तो गाळून सकाळ संध्याकाळ घ्यावा, ह्मणजे एक दोन दिवसांनीं सर्व बाधा मोडते.

रेचक आणि वमन हीं औषधें अनशनपोटीं किंवा जेवण झाल्यानंतर चार तासांनीं घ्यावीं. काढे बहुतकरून सकाळीं

आणि संध्याकाळींच घ्यावे. कित्येक ठिकाणीं काढ्यांतील औषधांचें प्रमाण सांगितलें नाहीं त्या ठिकाणीं तीं सम-भाग घ्यावीं.

**काढा:**—काढ्यांतील सर्व औषधें मिळून दर वेळेस चार तोळे घेऊन त्यांत ६४ तोळे पाणी घालावें आणि मंदाग्नीवर मडक्यांत शिजवावा. काढा अष्टमांश उरला ह्मणजे कोंबट आहे तोंच गाळून घ्यावा. तितका सोसत नसल्यास त्यांतला अर्धाच घ्यावा; लहान मुलांना तो पाव तोळ्यापासून १ तोळ्यापर्यंत पाजावा.

हा ग्रंथ तयार करण्याचा मानस मी माझ्या पुष्कळ प्रिय मित्रांस कळविला होता, त्यामुळें वेळोवेळीं त्यांनीं मला उप सूचना केल्या, व कित्येक ठिकाणीं तर स्वतः येऊन श्रमही घेतले, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें, आणि इतोत्तर पुढील लेख लिहितांना ते मला अशीच मदत करि-तील अशी मी आशा करीत आहें.

ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका.

## भाग १ ला.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| हिंवताप. ... ... ... ... ... | १ |
| क्विनाईन घेण्याची रीति. ... ... ... ... | ५ |
| पित्तज्वर. ... ... ... ... ... | ७ |
| जीर्णज्वर. ... ... ... ... ... | ९ |
| प्लिहा. ... ... ... ... ... ... | १२ |
| प्लिहावृद्धि. ... ... ... ... ... | १३ |
| पोटशूळ. ... ... ... ... ... | १५ |
| नागशूळ. ... ... ... ... ... | १७ |
| उम्हासे आणि वांत्या. ... ... ... ... | १९ |
| रक्तवांति. ... ... ... ... ... | २१ |
| कावीळ. ... ... ... ... ... | २३ |
| गोंवर. ... ... ... ... ... | २७ |
| डोळे येणें. ... ... ... ... ... | ३० |
| खुपऱ्या. ... ... ... ... ... | ३३ |
| रातांधळें ... ... ... ... ... | ३४ |
| दंतांविषयीं. ... ... ... ... ... | ३६ |
| दंतोद्भवन. ... ... ... ... ... | ३९ |
| दंतशूल. ... ... ... ... ... | ४१ |
| क्षोभजशूल. ... ... ... ... ... | ४२ |
| हिरडीचें पिकणें. ... ... ... ... | ४६ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| नारू. ... ... ... ... ... | ४७ |
| जंत. ... ... ... ... ... | ५४ |
| दोऱ्यासारखे जंत. ... ... ... ... | ५४ |
| गोल जंत. ... ... ... ... ... | ५७ |
| चपटे जंत. ... ... ... ... ... | ५९ |
| जंतापासून अनेक गौण विकार उत्पन्न होतात ते. ... | ६१ |
| कर्णरोग. ... ... ... ... | ६४—६९ |
| कंडूरोग. ... ... ... ... ... | ६९ |
| पडसें. ... ... ... ... ... | ७२ |
| गालगंड. ... ... ... ... ... | ७४ |
| गंडमाला. ... ... ... ... ... | ७६ |
| खरूज. .... ... ... ... ... | ८१ |
| गळवें. ... ... ... ... ... | ८३ |
| चामखीळ. ... ... ... ... ... | ८६ |
| चेंचरणें अथवा ठेंचणें. ... ... ... ... | ८८ |
| टेंगूळ. ... ... ... ... ... | ९० |
| सांधा लचकणें.... ... ... ... ... | ९० |
| चामडीचें झाजरणें. ... ... ... ... | ९१ |
| नासिक रक्तस्राव. ... ... ... ... | ९२ |
| दग्धविकार. ... ... ... ... ... | ९४ |
| सामान्य उष्णतेचीं कार्यें.... ... ... ... | ९९ |
| धडकी. ... ... ... ... ... | १०० |
| दाह. ... ... ... ... ... | १०४ |
| वातरक्त. ... ... ... ... ... | १०८ |
| जलप्रवासासंबंधीं बाधा. ... ... ... ... | ११३ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| क्षुधानाश. | ११५ |
| हगवण. | ११६ |
| संग्रहणी. | १२० |
| उचकी. | १२३ |
| मुळव्याध. | १२५ |
| उपदंश [ गरमी ]. | १३२ |
| चट्टे. | १४१—१५४ |
| बद. | १५५ |
| वीर्यस्राव. | १५७ |
| नपुंसकत्व. | १६२ |
| औषधांच्या यादी. | १६५—१८९ |
| आरोग्यरक्षणासंबंधानें सूचना. | १९० |


## भाग २ रा.


| | |
|---|---|
| मस्तकशूल. | १९७ |
| घसा दुखणें. | २०३ |
| खोकला. | २०६ |
| फुप्फुसवेष्टनत्वग्दाह. | २०९ |
| कफोत्पादक खोकला. | २१२ |
| श्वासनलिकेचा दाह. | २१३ |
| विलंबी श्वासनलिकादाह. | २१७ |
| फुप्फुसदाह. | २१९ |
| कफक्षय. | २२३ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| दमा... ... ... ... ... ... | २३१ |
| डांग्या खोकला. ... ... ... ... | २३५ |
| मूत्रपिंडरोग. ... ... ... ... ... | २३८ |
| आशुकारी मूत्रपिंडरोग. ... ... ... ... | २४२ |
| विलंबी मूत्रपिंडरोग. ... ... ... ... | २४६ |
| मूत्रपिंडशूल. ... ... ... ... ... | २४८ |
| मधुमेह. ... ... ... ... ... | २५० |
| जलमेह किंवा बहुमूत्ररोग... ... ... ... | २५५ |
| रक्तमूत्र. ... ... ... ... ... | २५६ |
| धातुपरसमिश्रित मूत्र. ... ... ... ... | २५९ |
| मूत्राश्मरी. (मुतखडा) ... ... ... ... | २६० |
| मूत्राशयगत अश्मरी. ... ... ... ... | २६३ |
| मूत्राशयदाह. ... ... ... ... ... | २६६ |
| प्रमेह (परमा).... ... ... ... ... | २६९ |
| स्त्रीप्रमेह. ... ... ... ... ... | २७७ |
| प्रमेहासंबंधीं भेदक विचार. ... ... ... | २७९ |
| आमवात. ... ... ... ... ... | २८९ |
| जुनाट संधिवायु... ... ... ... ... | २९४ |
| स्नायुमय आमवात. ... ... ... ... | २९५ |
| उपदंशापासून होणारा संधिवायु. ... ... ... | २९६ |
| पादाग्ररोग. ... ... ... ... ... | २९६ |
| गुडघी. ... ... ... ... ... | ३०३ |
| जठरविकार. ... ... ... ... ... | ३०६ |
| तीव्र जठरदाह.... ... ... ... ... | ३०७ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| विलंबी जठरदाह. (आम्लपित्त) | ३१५ |
| जठरव्रण. | ३१८ |
| जठरकर्कट किंवा जठराचे दुष्ट ग्रंथि. | ३२१ |
| अग्निमांद्य. | ३२३ |
| अजीर्ण अथवा मोडशी. | ३३७ |
| विषूचिका (पटकी). | ३३८ |
| मसूरिका. (देवी) | ३४७ |
| कांजिण्या. | ३५९ |
| अग्निरोहिणी ( काळपुळी ) | ३६० |
| अग्निविसर्प किंवा आग्या धावरें. | ३६२ |
| विसर्पिणी अथवा पैण. | ३६[illegible] |
| इसब. | ३६७ |
| गजकर्ण. | ३६९ |
| खवडे. | ३७१ |
| सिध्म ( शिबें ). | ३७३ |
| तारुण्यपीटिका (मुमें.) | ३७४ |
| घट्टे. | ३७६ |
| आंजुरली (रांजणवाडी). | ३७७ |
| डोळयांतील सारा व फुलें | ३७९ |
| सांतोत्पन्न शीतवातज्वर—इन्फ्ल्युएंझा. | ३८० |
| औषधांच्या यादी. | ३८४–३९१ |
| आरोग्यरक्षणासंबंधानें सूचना. | ३९२ |

# या ग्रंथांत आलेल्या एतद्देशीय औषधांची शुद्धि व विशेष सूचना.

**पाऱ्याची शुद्धिः**—हळद व घेरोसा एकत्र करून त्यांत तीन घटिकांपर्यंत पारा खलावा, आणि फडक्यानें गाळून घ्यावा,—अथवा पाऱ्यांत त्रिटकर घालून खलावा, ह्मणजे तो शुद्ध होतो.

**गंधकशोधनः**—गंधक बारीक करून त्यांत समभाग तूप घालून कढईंत ऊन करावा, पातळ झाला ह्मणजे मिश्रणाइतक्या गाईचे दुधांत ओतावा, ह्मणजे तो शुद्ध होतो.

**हिंगूळशोधनः**—हिंगूळ मेंढीचे दुधांत किंवा लिंबाचे रसांत खलावा, सुकला ह्मणजे पुन्हा रस किंवा दूध घालून खलावा. याप्रमाणें सात वेळ केल्यानें तो शुद्ध होतो.

**मनशीळशोधनः**—मनशीळ बारीक करून, बारीक दुहेरी फडक्यांत पुरचुंडी बांधून ती शेळीचे मुतांत तीन दिवस शिजवावी, ह्मणजे ती शुद्ध होते.

**सोमलाची शुद्धिः**—सोमलाचे बारीक बारीक तुकडे करून फडक्याचे पुरचुंडींत बांधून ती लोंबत ठेवून तांदुळज्याच्या रसांत एक प्रहर शिजवावे ह्मणजे सोमल शुद्ध होतो.

**बचनागाची शुद्धिः**—बचनागाचे बारीक तुकडे करून फडक्यांत बांधून गोमूत्रांत सात दिवस भिजत ठेवावे, अथवा गाईचे दुधांत एक प्रहर शिजवावे ह्मणजे तो शुद्ध होतो.

**कुचल्याचे बियांची शुद्धि:**—बियांस थोडेसें तूप लावून निखाऱ्यांवर किंचित् भाजाव्या, ह्मणजे त्या शुद्ध होतात.

**धोतऱ्याचे बियांची शुद्धि:**—बिया चार प्रहर गोमूत्रांत भिजत घालून नंतर गोमूत्रामध्येंच एक प्रहर शिजवाव्या ह्मणजे शुद्ध होतात.

**अफूची शुद्धि:**—अफू आल्याच्या रसांत भिजवून सुकवावी. याप्रमाणें २१ वेळ करावें, ह्मणजे ती शुद्ध होते.


**भांगेची शुद्धि:**—भांग कढईंत किंचित् चुरचुरित होईपर्यंत भाजून फडक्यांत घालून स्वच्छ पाणी निघे तोंपर्यंत पाण्यानें धुवावी ह्मणजे ती शुद्ध होते.

---

## औषधें तयार करणारांस सूचना.

औषधें प्रमाणानें घेतां यावीं ह्मणून वजनें, मापें वगैरे ग्रंथांत सांगितलेलीं असतात तीं जाणणें अवश्य आहे, ह्मणून **ब्रिटिश फार्मा कोपिया** नामक ग्रंथांत हल्लीं जीं वजनें आणि मापें सांगितलीं आहेत त्यांचीं कोष्टकें खालीं दाखविलीं आहेत. ह्या कोष्टकांत वजनांचीं व मापांचीं चिन्हें हीं त्यांच्या समोर मांडलीं आहेत.

घनपदार्थ मोजण्याकरितां तराजू व वजनें (स्केल वेट्स) हीं लागतात. तराजूचीं पारडीं पितळेचीं किंवा कांचेचीं असून त्याची दांडी लोखंडी किंवा पितळेची असते. वजनें बहुतेक पितळेचींच असतात. ग्रेनवेट्स हीं पितळेचे पातळ, चापट, चौकोनी तुकडे असतात, आणि त्यावर अमुक ग्रेन्स


हें टिंबांनीं किंवा अक्षरांनीं दर्शविलेलें असतें. जसें पांच ग्रेन  

बाकीचीं वजनें वाटोळीं असून त्यांवर त्यांचें चिन्ह आणि चिन्हापुढें अमुक वजन हें रोमन किंवा इंग्रजी आंकड्यांनीं दर्शविलें असतें. जसें दोन ड्राम.




## घनपदार्थ मोजण्याच्या वजनाचीं कोष्टकें.

औषधी क्रियेमध्यें उपयोगी पडणाऱ्या वजनांना इंग्रजींत **ॲपॉथीकरिज वेट्स** असें ह्मणतात. त्यांचेंच कोष्टक खालीं दिलें आहे.

| | | |
|---|---|---|
| १ ग्रेन = | |  |
| २० ग्रेन = | १ स्क्रुपल् |  |
| ३ स्क्रुपल् = | १ ड्राम |  |
| ८ ड्राम = | १ औंस |  |

१२ औंस = १ पौंड. 1 lb.

## ॲपॉथीकरिज वेद्सबरोबर असणारीं व्यवहारांतील वजनें.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ ग्रेन | = | सुमारें | अर्धी | गुंज. |
| २ ग्रेन | = | ,, | १ | गुंज. |
| १५ ग्रेन | = | ,, | १ | मासा. |
| ३ ड्राम | = | ,, | १ | तोळा. |
| १ औंस | = | ,, | २॥ | तोळे. |
| १ पौंड (रत्तल) | = | ,, | ४० | तोळे. |


ग्रेनाचें वजन बांधणें असल्यास एक पावलीभार वजनाची तार घेऊन तिचे तीन भाग बरोबर करावे. नंतर पुन्हां तीन तीन भाग करावे, ह्मणजे प्रत्येक तुकडा पांच पांच ग्रेनांचा होईल. नंतर त्या एकाचे पांच तुकडे केले ह्मणजे १ ग्रेन वजन सिद्ध झालें.

## द्रव पदार्थ मोजण्याचीं मापें.

द्रव पदार्थ मोजण्याकरितां कांचेचीं पात्रें केलेलीं असतात, त्यांस मेझर ग्लासेस असें ह्मणतात. त्यांवर लहान मोठ्या आडव्या रेघा मांडलेल्या असतात. व अमुक रेघेपर्यंत अमुक मिनिम, ड्राम किंवा औंस झाले असें त्या त्या रेघेपुढें त्यांच्या चिन्हांनीं दर्शविलेलें असतें.

### द्रवपदार्थ मापण्याचें कोष्टक.


| | | | चिन्ह. |
|---|---|---|---|
| १ मिनिम | = | १ | *m* |
| ६० मिनिम | = | १ फ्लुईड ड्राम | ʒ |
| ८ फ्लुईड ड्राम | = | १ फ्लुईड औंस. | *u* |
| २० औंस | = | १ पैंट | *o* |
| ८ पैंट | = | १ ग्यालन. | *c* |



ड्राम.
८ ,,
६ ,,
४ ,,
२ ,,
१ ,,

## ह्याच्या ऐवजीं व्यवहारांतील पात्रें.

१ मिनिम=सुमारें २ थेंब.
१ ड्राम=१ टीस्पून (चहाचा चमचा) Hft.3
२ ड्राम=१ डेझर्ट स्पून (मध्यम चमचा).
४ ड्राम=१ टेबल स्पून (मोठा चमचा).
१ औंस=१ लिकर ग्लास.
१॥ औंस=वाईन ग्लास.
६ औंस=१ टी कप (चहाचा प्याला).
१६ औंस=१ टमलर (मोठा ग्लास.)
२४ औंस=१ क्वार्टबाट्ल (ब्रयांडीची मोठी बाटली).



*m*
मिनिम्स.
६० ,,
५० ,,
४० ,,
३० ,,
२० ,,
१० ,,

इंग्रजी वैद्य चिकित्सालेख (प्रिस्क्रिप्शन) लिहितांना वजनांच्या आणि मापांच्या चिन्हांपुढें अमुक वजन किंवा अमुक माप हें रोमन आंकड्यांत लिहितात. ह्मणून रोमन आंकड्यांची माहिती असणें आवश्य आहे.

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रोमन आंकडेः**— | i | ii | iii | iv | v | vi | vii | viii | ix |

| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| x | xi | xii | xiii | xiv | xv | xvi | xvii | xviii | xix | xx. |

हा एकवीसपासून एकूणचाळीसपर्यंत क्रमानें चालून

४० चा मात्र $\overset{\circ}{\text{XL}}$ असा फिरतो. पुन्हा वरच्याप्रमाणेंच आंकडे चढवावे. पुढें फिरणारे $\overset{\circ}{\text{L}}$ $\overset{\circ}{\text{LIX}}$ $\overset{\circ}{\text{LX}}$ हे मात्र आहेत. कोणतेही वजन अर्धे दाखविणें झाल्यास त्याचे चिन्हापुढें डबल "एस्"(SS) घालण्याची वहिवाट आहे. जसें




औषधें तोलून घेतल्यानंतर त्यांचें मेलन करण्याकरितां दुसऱ्या कित्येक वस्तूंची जरूर असते. जसें गोळ्या व मलमें घोटण्याकरितां लवचिक पोलादी सुऱ्या (स्पाच्यूला), औषधें कुटण्या व घोटण्याकरितां दगडी, लोखंडी, गारेचा किंवा कांचेचा खलबत्ता (मॉरटर आणि पिस्टल), गोळ्या व मलमें तयार करण्याकरितां दगडी अथवा गारेची पाटी (स्ल्याप.), औषधें ओतण्याकरितां कांचेची किंवा प्यूटर नांवाच्या धातूची गळती (फनेल), आणि औषधें ढवळण्याकरितां एक कांचेच्या दांडा (ग्लास रॉड) असें सामान लागतें.

इंग्रजी औषधें केमिस्ट व ड्रजिस्ट ह्मणजे इंग्रजी औषधें आणि रसायनें तयार करून विकणारे गांधी यांजकडे विकत मिळतात. मराठी औषधें एकाद्या चांगल्या वैद्याजवळून घ्यावीं. रानांतील वनस्पतींचीं औषधें चांगल्या माहितगाराकडून आणवावीं. गांध्याच्या दुकानांतील औषधें चांगलीं ताजीं पाहून घ्यावीं. कुजकीं, जुनीं अशीं घेतल्यास त्यापासून गुण न येतां उलट नुकसान होण्याचा संभव असतो.

## औषधें तयार करतेवेळेस अवश्य ध्यानांत ठेवण्यासारख्या सूचना.

औषधें तयार करतेवेळीं औषधांची यादी (प्रिस्क्रिप्शन) औषधें तयार करणारानें आपल्या नजरेपुढें ठेवावी. यादींतील औषधांचें प्रमाण वयाच्या मानाशीं नेमस्त आहे कीं नाहीं हें पहावें. औषधाचें प्रमाण कमजास्त करणें झाल्यास एखाद्या सुज्ञ वैद्याचें त्याविषयीं मत घ्यावें. औषध तयार करण्यापूर्वीं तराजू, वजनें, मापें वगैरे स्वच्छ आणि बरोबर आहेत कीं नाहीं हें पहावें. औषधें अदमासानें घेऊं नयेत, बरोबर वजन करूनच घ्यावीं.

प्रत्येक औषध वजन करण्यापूर्वीं तें, तेंच औषध आहे अशाबद्दलची खात्री करून घ्यावी. विषारी औषधावर "विष" असें मोठ्या अक्षरांनीं लिहावें. औषध तयार करून झाल्यानंतर रोग्याला किंवा त्याच्या तैनातींत असलेल्या मनुष्यास अमुक औषध घ्यावयाचें व अमुक चोळावयाचें वगैरे एकंदर माहिती द्यावी. औषध तयार झाल्यानंतर तें बरोबर मिश्र झालें आहे कीं नाहीं हें पहावें. कित्येक औषधें पाण्याबरोबर मिश्र होत नाहींत, तळीं बसतात, तेव्हां तीं नीट हालवावयास सांगावीं. औषधें नीट झांकून बंदोबस्तांत ठेवावीं. मुलांलेकरांच्या हातीं लागण्यासारखीं तीं ठेवूं नयेत, कारण त्यापासून मोठे भयंकर परिणाम होतात.

## वयमानानें औषधाचें प्रमाण न्यूनाधिक करण्याचा प्रकार.

तरुण मनुष्यास, बालक आणि वृद्ध यांपेक्षां तीव्र औषधांचें जास्ती प्रमाण सोसतें. लेंकरास जाणत्या मनुष्यापेक्षां औषधाचें प्रमाण फार कमी असावें, आणि अफू व इतर मादक औषधें व ज़माल गोट्यासारखीं तीव्र रेचकें हीं प्राय: देऊं नयेत. तसेंच स्त्रियांसही पुरुषापेक्षां औषधाचें प्रमाण कमी द्यावें. गरोदर अवस्थेंत तीव्र रेचकें व उष्ण औषधें योजूं नयेत.

प्रौढ मनुष्यास ज्या औषधाचें प्रमाण १ किंवा ६० ग्रेन देणें योग्य आहे, तेव्हां एका वर्षाच्यास—— १/१२ ,, ५ ग्रेन.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दोन ,, | —— | १/८ ,, | ८ | ,, |
| ३ —,, | —— | १/६ ,, | १० | ,, |
| ४ —,, | —— | १/४ ,, | १५ | ,, |
| ७ —,, | —— | १/३ ,, | २० | ,, |
| १४—,, | —— | १/२ ,, | ३० | ,, |
| २०—,, | —— | २/३ ,, | ४० | ,, |
| २१पासून५० ,, | —— | १ ,, | ६० | ग्रेन. |

ह्या वयाच्या पुढें उतरतें प्रमाण योजावें.

अफिणीचीं औषधें ४ महिन्यांच्या आंतील लेंकरांस देऊं नयेत. तदनंतर देणें झाल्यास फार जपलें पाहिजे. पाऱ्याचीं औषधें बाल्यावस्थेंत वर सांगितल्या प्रमाणापेक्षां कांहीं अधिक दिलीं तरी चालतात.

# दुसऱ्या भागाची प्रस्तावना.

अलीकडे बऱ्याच लोकांचें लक्ष विद्यावृद्धीकडे लागलें आहे. व तिच्या वृद्ध्यर्थ निरनिराळ्या लोकांचें भिन्न भिन्न प्रयत्न रुचिवैचित्र्यानुरूप चाललेच आहेत. त्यांतच, ग्रंथांचें प्रसिद्धीकरण हेंही लोकहितपर आहे, असें मानण्यांत येऊन, त्यांचा प्रसार सर्वत्र बराच होत चालला आहे, ही गोष्ट अत्यंत संतोषकारक आहे. परंतु त्यांत दिलगिरी मानण्यासारखें एवढेंच आहे कीं, एकंदर ग्रंथांचें मान पाहतां मनोरंजनादि पुस्तकांपेक्षां शास्त्रीय ग्रंथांची संख्या कमी आणि त्यांतून वैद्यकासारख्या अतिमहत्वाच्या व उपयुक्त विषयावर झालेल्या पुस्तकांची संख्या तर फारच संकुचित आहे. असें असून, जीं पुस्तकें या विषयावर झालीं आहेत, त्यांत कांहीं केवळ संस्कृत ग्रंथांच्या व कांहीं इंग्रजी ग्रंथांच्या भाषांतरासारखींच झालीं आहेत. पैकीं कोठच्यांत कांहीं तर कोठच्यांत आणखी कांहीं अडचणी रहातात; मग त्या किंमतीच्या संबंधानें ह्मणा किंवा रोगनिवारणासंबंधानें ह्मणा–रहातातच. एकंदरींत सामान्य महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्यांस सुलभ व सर्वव्यापक माहितीनें परिपूर्ण भरलेले वैद्यकासंबंधानें ग्रंथ फारच थोडे सांपडतील. माझ्या समजुतीनें तर आपणामध्यें ही मोठीच उणीव आहे. ती यथाशक्ति काढून टाकण्याचें माझे मनांत फार दिवसांपासून घोळत होतें; पण हें काम किती मेहनतीचें, शोधकतेचें व दीर्घ कालाचें आहे, याची कल्पना विद्वान लोकांना सहजच होईल. तेव्हां एकंदर गोष्टींचा विचार

कारितां समग्र ग्रंथ भागरूपानेंच प्रसिद्ध करावा असें वाटून व लोकसेवेचा पहिलाच प्रयत्न लोकांस कितपत रुचतो याचें अनुमान काढण्यासाठीं या पुस्तकाचा पहिला भाग, मी पांच वर्षांपूर्वींच प्रसिद्ध केला आहे. त्यांत ईश्वरकृपेनें बरेंच यश आलें. पुस्तकें बहुतेक खपत आलीं आहेत; त्यावरून पाहतां हा प्रयत्न लोकांस बराच आवडला असें मानण्यास मला बराच आधार आहे. पण याविषयीं विद्वान लोकांचा तसाच सरकारचा अभिप्राय काय आहे, हें समजून घेण्याविषयीं आमच्या वाचकांची उत्कंठा तशीच राहिली असेल, तर—ज्यापेक्षां आमच्या 'दक्षिणा प्राईज कमेटी' नांवाच्या संस्थेस विद्वान लोकांचें व सरकारचेंही अंग आहे, त्यापेक्षां तीस हा ग्रंथ पसंत पडून, त्याबद्दल त्यास बक्षीसही मिळालें आहे, हें निर्दिष्ट केल्यावर बहुधा सर्व प्रश्नांचा निवाडा सहजच होईल.

या भागांतील रोगांचें वर्णन, रोगचिकित्सा करण्याची रीति, रोगांचीं लक्षणें, त्यांवरील उपचार व पथ्यापथ्याचा हीं सर्व पहिल्या भागांतील धर्तीवर ठेविलीं आहेत. या भागांतील विषय, पहिल्या भागांतील विषयांपेक्षां पुष्कळ गहन असल्यामुळें त्यांचें पूर्ण ज्ञान, केवळ हें पुस्तक वाचून प्राप्त होईल असें मी लिहूं शकत नाहीं. तथापि माझी अशी खात्री आहे कीं, रोगांचें वर्णन, त्यांचीं कारणें, आरोग्यरक्षणाचे नियम वगैरे गोष्टींचें जरी थोडेबहुत ज्ञान प्राप्त झालें, तरी त्यापासून पुष्कळ रोग आपणास टाळतां येण्यासारखे आहेत, व इतका जरी फायदा या पुस्तकापासून झाला, तरी माझ्या प्रयत्नाचें साफल्य झालें, असें मी समजेन.

या भागांत विषयप्रतिपादनांत बरेच ठिकाणीं केवळ पुनरावृत्ति होऊन पुस्तक वाढूं नये ह्मणून ह्याच्या पहिल्या भागावर हवाला टाकावा लागला आहे. पहिला भाग ज्यांजवळ आहे, त्यांना यासंबंधानें मुळींच अडचण पडणार नाहीं; परंतु ज्यांजवळ तो नसेल त्यांनीं त्या पुस्तकाबद्दल लवकर जर मागण्या केल्या, तर कांहीं थोड्या लोकांस तरी तो सध्यां मिळूं शकेल. कारण, त्याच्या प्रती आमचे जवळ थोड्याच राहिल्या आहेत.

ह्या दोन भागांत सांगितलेल्या रोगांशिवाय आणखी कांहीं महत्वाचे रोग राहिले आहेत, ते तिसऱ्या भागांत छापून हें हातीं घेतलेलें कार्य संपविण्याचा माझा विचार आहे. व पहिल्या भागास जसा लोकाश्रय मिळाला तसाच जर प्रस्तुत भागास आश्रय मिळाला, तर तिसरा भाग छापून प्रसिद्ध होण्यास फार अवधि लागणार नाहीं, अशी उमेद आहे.

ग्रंथकर्ता.

# विनंती.

माझे वडील ति. कै. विनायक रामचंद्र जोग यांनीं केलेल्या सदर पुस्तकाचे दोन्ही भाग अल्प काळांत संपून गेले व तेव्हांपासून लोकांची मागणी सारखी होऊं लागली; ह्मणून सदर दोन्ही भाग एकत्र करून जसेच्या तसे छापून प्रसिद्ध केले आहेत. त्यास सुज्ञजनांकडून योग्य आश्रय मिळेल अशी आशा आहे.

# शुश्रूषा.

रोग्याची निजावयाची जागा ओलसर, किंवा स्वयंपाकाचे अथवा गुरांचे गोठ्यानजीक, किंवा गटारें, मोऱ्या आणि शौचकूप, ह्यांच्या लगत असूं नये. कारण तेथील हवा फार दूषित असते, ती श्वासोच्छ्वासाबरोबर रोग्याचे रक्तांत मिळाल्यानें फार भयंकर परिणाम होतात. ह्मणून आजारी मनुष्यास स्वच्छ, मोकळ्या आणि उजेडाचे खोलींत निजवावें. रोग्याचें आंथरूण खाटेवर किंवा उंचस्थानीं ठेवावें. त्या खोलींत स्वच्छ हवेचा प्रवाह मोकळेपणीं खेळण्याकरितां दरवाजे खिडक्या वगैरे उघडीं ठेवावीं. अतिशय हवा आणि उजेड हीं बहुधा रोग्यास सोसत नाहींत, तेव्हां त्यांचा झोंक केवळ रोग्याच्या अंगावरून न जाऊं देतां फक्त आजूबाजूनें जाण्यायेण्याकरितां मार्ग खुले ठेवावे.

मनुष्यें निरोगी असतां त्यांच्या घरांतून पुष्कळ स्वच्छ हवा असणें जर हितावह आहे तर तीं आजारी असतां त्यांच्या खोल्यांतील हवा निरंतर खेळती ठेवणें हें फारच अगत्याचें आहे.

सर्व प्रकारच्या तापांच्या अंगीं असा गुण आहे कीं, त्यांच्या योगानें रक्तांत विषयुक्त वाफा उत्पन्न होतात. आणि त्या जर स्वच्छ हवेच्या योगानें बाहेर घालविल्या नाहींत तर त्या शरीरांतून नाहींशा होत नाहींत. विषयुक्त वाफांच्या योगानें आजारी मनुष्याचीं प्राणेंद्रियें कोंडून जातात व तीं स्वच्छ हवा पुष्कळ मिळाल्याशिवाय मोकळीं होत नाहींत. आजारी मनुष्याच्या अंगांतून निघणाऱ्या वाफा स्वच्छ हवेशीं

मिश्र होतांच त्यांची विषारी शक्ति नाहींशी होते. सांथ उत्पन्न करणाऱ्या रोगाच्या विषयुक्त वाफा कोंडलेल्या खोलींत जमतांच जर बाहेर जाऊं न दिल्या तर जे त्यांचा श्वासोश्वास घेतात त्यांस तावडतोब प्रायः तोच रोग होतो. या करितां ज्या खोलींत आजारी मनुष्य असेल त्या खोलींत स्वच्छ हवा नेहमीं खेळती ठेवली पाहिजे. अतिशय भयंकर तापानें आजारी झालेला मनुष्य ज्या खोलींत असेल त्या खोलीचे दरवाजे, खिडक्या उघड्या न ठेवल्या आणि आजारी मनुष्यानें सोडलेला उश्वास स्वच्छ हवेंतून सहा हातांचे अंतरावर गेल्यापूर्वीं कोणीं घेतला तर त्याला तशाच प्रकारचा रोग होण्याचा संभव आहे.

गैरसोईमुळें दूषित हवेंतच रहाण्याचा प्रसंग असला तर पुढील दुर्गंधिनाशक (डिस्इन फेक्टंट) औषधांच्या योगानें तेथील हवा शुद्ध करावी.

दुर्गंधीनाशक औषधें—**कॅर्बालिकआसिड, परम्यांगनेट आफ् पोट्याश, क्लोरीनेटेड लाईम (ब्लीचिंग पौडर)**, ऊद, ओव्याचा काढा इ०.

रोग्याच्या खोलीची जमीन साफ धुऊन चुन्यानें किंवा शणांत क्यारबालिक आसिड मिश्र करून त्यानें सारवावी. भिंती खरवडून साफ धुवाव्या आणि त्यांस चुन्याचा हात द्यावा. मोऱ्या, गटारें आणि शौचकूप ह्यांजवर ब्लीचिंग पौडर किंवा एक ग्यालन पाण्यांत तीन औंस कॅर्बालिक आसिड अथवा १ पौंड क्लोराईड आफ् लाईम मिश्र करून तें पाणी किंवा कांडीस फ्लुईड वारंवार टाकावें.

कॅर्बोलिक आसिडाचे पाण्यांत भिजविलेले कापडाचे तुकडे जागोजागीं टांगून ठेवावे. रोग्याचे मलमूत्रानें बिघडलेली जागा व पात्रें वर सांगितलेल्या दुर्गंधिनाशक औषधांच्या पाण्यानें धुऊन साफ ठेवावीं.

रोग्याच्या अंगावरील चिरगुटें स्वच्छ असावीं व तीं बिघडलीं असतां त्वरित बदलावीं. रोग्याच्या खोलीशीं गडबड अगदीं होऊं देऊं नये. रोग्याला पथ्यपाणी वेळचेवेळीं द्यावें, व तें साधें आणि पचनीय असावें. औषधेंही वेळच्या वेळीं द्यावीं. सुज्ञ वैद्याच्या सम्मतीखेरीज तऱ्हेवाईक लोकोपचार चालू करूं नयेत. रोग्याच्या तब्बेतींत फेरफार होतील ते त्वरित वैद्यास कळवावे. ह्या कामासाठीं रोग्याची शुश्रूषा ठेवणारा मनुष्य हुशार, चलाख, मेहनती, विचारवंत, रोग्याला धीर देणारा, स्वभावानें गरीब, गोड बोलणारा आणि दयाळू असा असला पाहिजे. भ्याड, देवभोळा आणि वहिमी असा मुळींच उपयोगी नाहीं.

रोग्याची शुश्रूषा ठेवणारा मनुष्य असा असावा कीं, त्यास कोणत्याही प्रकारचें व्यसन असूं नये. त्याचीं वस्त्रें शुभ्र, स्वच्छ आणि साधीं असावीं. तो मध्यम वयस्क असून शरीरानें सदृढ असावा. त्यास जाग्रणाचा अभ्यास असावा. शिवाय त्यास लिहितां वाचतां यावें; ह्मणजे सांगितलेल्या गोष्टींचें स्मरण राहण्यासारखें नसल्यास, तो त्या गोष्टी टिपून ठेवील. व त्यास रोग्याची एकंदर दिनचर्या व रात्रिचर्या लिहून ठेवितां येईल; व पथ्यपाण्यापासून व औषधापासून होणारे फेरफारही लिहून ठेवितां येतील.

रोग्याची शुश्रूषा ठेवण्यास पुरुषापेक्षां स्त्री असलेली अधिक चांगली. कारण, रोग्याचे शुश्रूषेस लागणारे अवश्य गुण तिचे अंगीं स्वभावतःच असतात. आणि रोगशुश्रूषा करणें, हें साधारणपणें लहान मुलाची जोगवण करण्यासारखेंच आहे. तेव्हां रोग्याची शुश्रूषा ठेवणें हें स्त्रियांस अगदीं सोपें जाणार आहे. परंतु मज्जाकंदाचे कित्येक वायुगत विकारांत ह्मणजे उन्मादासारख्या विकारांत, पुरुषरोग्यास स्त्री किंवा स्त्री रोग्यास पुरुष शुश्रूषेकरितां असणें उपयोगी नाहीं. कारण, त्यापासून रोगाची तीव्रता वाढण्याचा संभव असतो. स्वतःची स्त्री किंवा पुरुष तर त्या प्रसंगीं मुळींच उपयोगाची नाहीं.

रोग्याच्या शुश्रूषेची जबाबदारी एकाकडे सोंपविलेली असणें बरें; नाहींतर रोग्यास औषधपाणी देण्यांत आणि वैद्यास रोग्याची हकीकत सांगण्यांत मोठा घोंटाळा आणि चुक्या होतात.

शुश्रूषा ठेवणारे मनुष्यानें वैद्याचे सांगीप्रमाणें रोग्याचें काम वेळचे वेळीं केलें पाहिजे. त्यानें रोग्याबद्दलची खरी हकीकतच वैद्यास सांगावी. वैद्याची सल्लामसलत घेणें किंवा त्यास रोग्याची हकीकत कळविणें हें त्यानें रोग्याच्या समक्ष करूं नये. कारण रोगी आपल्या दुखण्याविषयीं फार आतुर झालेला असतो, व आपले रोगाविषयीं लोकमत काय आहे, हें ऐकण्यास तो फार सावध असतो.

शुश्रूषा ठेवणाऱ्या मनुष्यानें रोग्याची श्रद्धा आपणावर बसेल असें केलें पाहिजे, नाहीं तर रोगी त्याचें ऐकत नाहीं. आणि असें झाल्यास औषधपाणी वगैरेची व्यवस्था वैद्याकडून रोग्यास सांगवावी. शुश्रूषा ठेवणाऱ्या मनुष्याचे हालचाली-

पासून किंवा त्याच्या बोलण्यानें रोग्यास त्रास होऊं नये.—रोग्याची चाकरी करणें ती अगदीं सौम्य आणि नाजुकपणानें केली पाहिजे. धसमुसळेपणा अगदीं उपयोगाचा नाहीं. तेणेंकरून रोग्यास त्रास होतो, रोगी चिडतो, व त्याचा रोग वाढतो. रोग्याच्या खोलींत एखाद्या सुज्ञ मनुष्याखेरीज कोणास येऊं देऊं नये. आणि शुश्रूषा ठेवणाऱ्या मनुष्याशिवाय रोग्यापाशीं कोणी बोलूं नये. वायफळ प्रश्न करण्यानें रोग्यास कंटाळा येतो. रोग्याला भेटण्यास जी मंडळी येते, त्यांपैकीं कित्येक असे असतात कीं, त्यांस औषधांच्या गुणधर्मांचें कांहींएक ज्ञान नसून रोगाचेंही ज्ञान नसतें; व ते कांहीं तरी उपाय करण्यास सांगतात.—"अमक्यानें असाच रोग हं हं ह्मणतां चार दिवसांत बरा केला," "अमक्यानें अमुक घेतलें व तो बरा झाला." अशा लोकांच्या नादीं कधींच लागूं नये. कारण, प्रत्येक व्यक्तीचें प्रकृतिमान भिन्न असतें. तेव्हां एखाद्या कुशल वैद्याचे संमतीखेरीज कांहीं तरी उपाय करीत बसणें बरोबर नाहीं. कुशल आणि अनुभवी वैद्याचाच सल्ला घ्यावा. कायमचा वैद्य एकच असावा. मधून मधून जरूर वाटल्यास दुसरा एखादा वैद्य, आपल्या वैद्याच्या संमतीनें मत घेण्यास बोलवावा. परंतु वारंवार वैद्य बदलण्याचे भरीस पडूं नये; त्यापासून अनहित होतें.

रोग्यास दुःख होईल अशा गोष्टी किंवा प्रापंचिक भानगडी त्याचे पुढें काढूं नयेत. ज्या गोष्टींचा परिणाम चांगला होतो, अशा सांगण्यास हरकत नाहीं.

रोग्याची खोली वगैरे घाणेरडी ठेविली असल्यास, वैद्य तेथें फार वेळ बसूं शकत नाहीं, त्यामुळें रोगाचीही नीटशी परीक्षा होत नाहीं.

शिवाय घाणीपासून रोग्यास अपाय होण्याचा संभव असतो, ह्मणून रोग्याची एकंदर व्यवस्था स्वच्छ आणि नियमित ठेवण्याकडे अवश्य लक्ष पुरवावें. रोग्याचें मलमूत्र, वांती, पू वगैरे मळ ज्या ठिकाणीं पडतील ती जागा लगेच स्वच्छ करून ते मळ लांब बाहेर नेऊन टाकावे, नाहींतर घाण हवेशीं मिश्र होऊन, तेथील हवा श्वासोच्छ्वास करण्यास नालायक होते.

मल, मूत्र, कफ इत्यादि वैद्यास दाखवावयाचीं असल्यास, मूत्र स्वच्छशा पांढऱ्या बाटलींत झांकून ठेवावें; मळ, मातीच्या परळांत झांकून ठेवावा. आणि कफ एखाद्या रुंदशा कांचेच्या पेल्यांत अथवा परळांत थुंकून ठेवावा. परंतु करटींत किंवा मडक्यांत राखाडी भरून त्यांत टाकूं नये. स्पर्शसंचारी व सांसर्गिक रोगांत मलमूत्राची कशी काय व्यवस्था लावायाची, तें जेथल्या तेथें क्रमवार सांगितलें आहे. खाण्यापिण्याकरितां व मलमूत्र सांचवण्याकरितां ज्या भांड्यांचा किंवा चिरगुटांचा उपयोग केला असेल, तीं तत्काल धुऊन स्वच्छ करावीं.

रोग्यास स्नान घालणें ह्मणजे आपल्या लोकांस मोठी भीति पडते. त्यांस असें वाटतें कीं, स्नान घातल्यानें रोग्यास वायु होईल, व रोग वाढेल. परंतु ही त्यांची चुकी आहे. शक्तिपात करणाऱ्या भयंकर रोगांखेरीज साधारण रोगांत नित्यशः स्नान घालावें. उष्णोदकानें किंवा पाण्यांत पाण्याच्या $\frac{१}{५०}$ भाग मीठ घालून त्या पाण्यानें स्नान घालावें. ज्वरावस्थेंत शिरका अथवा आंब ( व्हीनिगर ) उष्ण पाण्यांत टाकून त्यानें स्नान घालावें. आपले लोक कडू लिंबांचा अथवा निरगुडीचा पाला पाण्यांत उकळून त्या पाण्याचें स्नान रोग्यास घालतात; तेंही उत्तम आहे. मात्र वाऱ्याचा बंदोबस्त ठेवावा. सर्वांग-

स्नान करण्यास भीति वाटत असल्यास मोठासा स्पंज अथवा धाबळीचा तुकडा, कोमट पाण्यांत बुडवून, त्यानें शरीराचा थोडथोडा भाग धुऊन काढावा. व लगेच ऊबदार कपड्यानें अंग कोरडें करून सर्वांग स्वच्छ वस्त्रानें आच्छादावें. पायांत पायमोजे घालवावे. आरोग्यस्थितींत जर स्नानापासून हुशारी वाटते, तर आजारीपणांत फारच चांगलें वाटेल व झोंपही येईल. स्नानाप्रमाणेंच रोग्याचे केंस त्यास इजा न करितां विंचरून साफ ठेवावें. नाहींतर घाणीनें त्यांच्या जटा वळून उवा वगैरे पडतात व शेवटीं केंस कापून काढण्याची पाळी येते.

प्रत्येक घरांत आजारी मनुष्यासाठीं एखादी सोईवार खोली राखून ठेवणें अत्यावश्यक आहे. मात्र ही खोली मोठी व प्रशस्त म्हणजे सरासरी ३००० घनफुटीची असली पाहिजे ती तळमजल्यावर असल्यापेक्षां माडीवर असणें उत्तम आहे. तींत मोकळी हवा आणि उजेड येण्याजाण्याकरितां मोठालीं दारें आणि खिडक्या समोरासमोर असाव्यात. उजेडापासुन डोळ्यांस त्रास होऊं लागल्यास तेथें हिरव्या अथवा निळया रंगाचे पडदे लावावे. खोलींत एक मोरी असावी, परंतु तींत घाण करूं नये.

खोली साफसूफ ठेविली नाहीं किंवा तींत हवा आणि उजेड यांचा प्रवेश होऊं दिला नाहीं, तर तेथें बुरशीसारखे अनेक जिवजंतु उत्पन्न होतात, घाण जमते, जागा दमट होते आणि तेथें एक प्रकारची उबट घाण येऊं लागते. प्रकाशहीन जाग्यांत जे लोक राहतात, ते निस्तेज व क्षीण दिसतात व ते अनेक रोगांस पात्र असतात. तर अशा स्थळीं

रोग्यास ठेवल्यास त्याची काय दशा होईल याचा विचार वाचकच करतील.

रोग्याच्या खोलींत फक्त त्यास जरूर लागणाऱ्या वस्तूच ठेवाव्या—ह्मणजे सामान ठेवण्याकरितां एकादें लहानसें कपाट किंवा फडताळ, तें नसेल तर एक पेटी, शिवाय एक मेज किंवा घडवंची, दोन खुर्च्या, दोन तस्तें किंवा पिकदाण्या, चिनई मातीचें किंवा मातीचें परळ, खोबरेल किंवा एरंडेलाचा दिवा, हा दिवा अशा ठिकाणीं ठेवावा कीं त्याचे उजेडापासून रोग्यास त्रास होणार नाहीं. दिव्याची वात बेताचीच असूं द्यावी, नाहींतर त्यापासून अतिशय धूर होऊन त्रास होतो. हातानें हिंडवितां येण्यासारखा एक मेणबत्तीचा दिवा, हातरुमाल, साबू, पाण्याचें भांडें, तांब्या, पंचपात्री, औषधें प्यावयाचे ग्लास, चमचे, खिशांतील घड्याळ, लेदरक्लॉथ अथवा मेणकापड आणि दोन खाटा, त्या लोखंडी असल्यास उत्तम, त्या जमिनीपासून फूट दीडफूट उंच असाव्यात, यापेक्षां जास्त उंच असणें उपयोगी नाहीं. दोन खाटा नसल्या तर लवंडण्यासारखी खुर्ची (ईझीचेअर) अथवा कोच असावें, ह्मणजे आंथरूण वगैरे स्वच्छ करितांना रोग्यास थोडा वेळ तेथें ठेवितां येतें आणि ह्या स्थलांतरापासून रोग्यास पालट वाटून कांहींसें बरें वाटतें. खाटेसभोंवतीं पडदा असणें उपयोगीं नाहीं, कारण त्यापासून, रोग सांसर्गिक असल्यास संसर्ग पडद्यास चिकटून रहातो. परंतु मच्छर वगैरेचा त्रास असल्यास पडदा अवश्य असावा. बिछान्यावरील गाद्या व उशा ह्या काथ्याच्या अथवा केंसाच्या असाव्यात, परंतु त्या तेलकट, घामट आणि ढेकणांनीं भरलेल्या असूं नयेत.

खोलींत रमणीय आणि बोधपर चित्रें, व तऱ्हतऱ्हेच्या पुष्पांचे गुच्छ रोग्याच्या नजरेसमोर ठेवले असल्यास क्षणभर तिकडे पाहण्यानें रोग्याचा वेळ जातो. इतक्यांपैकीं जितकें अनुकूळ करण्यासारखें करितां येईल तितकें करावें.

रोग्याची कोठडी दररोज सकाळीं व संध्याकाळीं चहाचे पाण्यानें शिंपून ( पानासुद्धां ) केर न उडूं देतां झाडून काढावी, ह्मणजे खोलींतील घाण सर्व नाहींशी होते. रोग्यास जेव्हां खाऊं घालावयाचें असेल, तेव्हां त्याच्या भुकेच्या कलाप्रमाणेंच बेताचें अन्न त्याच्या खोलींत न्यावें. त्यास कंटाळा येईपर्यंत खाऊं घालूं नये. ज्या पदार्थांचा रोग्यास वीट व ओकारी येते, ते पदार्थ त्याचेसमोर आणूं नयेत. त्यापासून त्यास त्रास व अपाय होतो. रोग्याचें अन्न ताजें, स्वच्छ आणि चांगलें शिजविलेलें असावें.

भाज्यांत तेल, तिखट फार घालतां कामा नये. तेणेंकरून रोग्याच्या अशक्त कोठ्यास ते पदार्थ अपचनीय होतात. पथ्याकरितां सर्वांत उत्तम पदार्थ ह्मटला ह्मणजे दूध होय. नूतन जन्मलेल्या बालकापासून तों वयोवृद्ध व मरणोन्मुख झालेल्या प्राण्यास यासारखें दुसरें खाद्य नाहीं. दूध हें कोठ्याचे पाचनशक्तीप्रमाणें नुसतेंच जलमिश्रित अथवा धान्य किंवा धान्याचें सत्व मिश्र करून कढवून द्यावें लागतें. परंतु अडाणी लोक त्यासंबंधानें विनाकारण कांक्षा घेतात. त्यांस असें वाटतें कीं, दुखणाइतानें दूध खाल्ह्यानें कफ होतो, वात वाढतो आणि ज्वर भडकतो. परंतु ही त्यांची कल्पना निराधार आहे. गाईचें दूध तर आजाऱ्यास फारच उत्तम व हितकर आहे ह्यांत काडीमात्र संशय नाहीं.

रोग्यास पाणी घ्यावयाचें तें पहिल्या भागांत नारु–प्रकरणांत सांगितलेल्या रीतीनें शुद्ध केलेलें असावें. शोष फार असल्यास वारंवार चमचा चमचा पाणी देण्यास हरकत नाहीं; नुसतें पाणी पिण्याचा कंटाळा असल्यास भाताच्या अथवा जोंधळ्याच्या लाह्यांचें पाणी ह्मणजे अधणाच्या पाण्यांत लाह्या टाकून कढविलेलें पाणी गाळून तें घ्यावें, किंवा गव्हाची अथवा जोंधळ्याची भाकरी भाजून, ती ऊन आहे तोंच पाण्यांत बुडवून तें पाणी आजाऱ्यास द्यावें. हें सर्व गुणावह आहे.

रोगी आपल्या हातानें अन्न खाण्यास असमर्थ असल्यास तें त्यास चमच्यानें किंवा बोंडल्यानें भरवावें. त्यास जे पदार्थ खाण्याची इच्छा होईल ते वैद्यास विचारून त्याच्या साह्यानें खाऊं घालावे. रोग्याचीं औषधें नीट जपून ठेवावीं. तीं मुलांबाळांच्या हातीं लागतील अशीं ठेवूं नयेत. तीं वेळच्या वेळींच शुश्रूषा ठेवणारे मनुष्यानें रोग्यास पाजावीं, किंवा चोळावयाचीं असल्यास बेतानें चोळावीं. शुश्रूषा ठेवणाऱ्या मनुष्यानें पिण्याच्या व बाह्योपचारांत आणण्याच्या औषधांची वेळोवेळीं चौकशी केली पाहिजे. नाहींतर बाह्योपचाराचें औषध पिण्यांत किंवा पिण्याचें बाह्योपचारांत येऊन अपाय होईल. रोगी दुखणाईत असतां सवड असल्यास महिना पंधरा दिवसांनीं त्याची खोली बदलावी, ह्मणजे रोग्याच्या प्रकृतींत थोडासा फरक होऊन त्यास हुषारी वाटते. दुखण्यांतून उठल्यावर रोग्यास कोणतेच व्यवसाय फारसे करूं देऊं नयेत. कारण त्याची शक्ति बरीच क्षीण झालेली असते, त्यामुळें कित्येकांस हिंडूं फिरूं लागतां घेऱ्या येऊं लागतात. अन्न, पाणी, हवा

आणि व्यायाम यांचा त्यास उपयोग बेताबातानेंच करूं दिला पाहिजे. डाळिंबें, द्राक्षें, संत्रीं, नारिंगें, अंजीर वगैरे पक्क आणि मिष्ट अशीं फळें बेताबेतानें खाण्यास हरकत नाहीं. तरी तीं वैद्याचे संमतीशिवाय खाऊं नयेत. ह्या वेळीं दुखणें परत न उलटूं देण्याविषयीं जपलें पाहिजे. रोग्यास वैद्याचा सल्ला घेऊन हवा बदलण्याकरितां न्यावें, तेणेंकरून हवापाणी व स्थलरचना ह्यांत बदल दृष्टीस पडतो, आणि दुखण्याची राहिलेली कसर निघून जाऊन रोगी ताजातवाना होतो, त्याचे तोंडावर तजेला येतो, व तो आपल्या धंद्यास लागण्यास समर्थ होतो.

विलायतेंत शुश्रूषा ठेवणाऱ्या बाया असतात, त्यांस नर्सिस असें ह्मणतात. त्या शुश्रूषेच्या कामांत मोठ्या प्रवीण असतात. त्यांस रोग्याच्या शुश्रूषेसंबंधानें योग्य शिक्षण मिळालेलें असतें. ह्या बहुतकरून मध्यवयस्क असतात, आणि वर सांगितलेले शुश्रूषा ठेवणाऱ्या मनुष्याच्या अंगीं असणारे गुण त्यांच्या अंगीं पूर्ण बिंबलेले असतात. विलायतेंत जेव्हां कोणास ह्या नर्सीस्‌ची गरज लागते, तेव्हां त्यांच्या मुख्य अधिकारिणीस रोग्याची हकीकत लिहून कळवितात, ह्मणजे ती अधिकारीण त्या रोग्याच्या व्यवस्थेसंबंधानें जिला चांगली माहिती असते अशा नर्सची नेमणूक करून तिला त्याजकडे पाठविते. तिच्या मेहनतीबद्दल तिला प्रत्येक दिवशीं चांगलें वेतन मिळतें. अशा तऱ्हेची व्यवस्था आपल्या देशांत मुळींच नाहीं. त्यामुळें आपल्याकडील रोग्यांची शुश्रूषा बरोबर होण्यास अडचण पडते. आपल्या बायकांना शिक्षण देतात, त्यांत हा एक विषय घातला असतां बरें होईल.

आपल्या देशांत प्रत्येक जातींत पुष्कळ विधवा आहेत आणि उद्योगहीन असे पुरुषही आहेत. त्यांनीं जर हें काम पत्करलें तर त्यांस परमार्थ होऊन रोग्याचीही चांगली सोय होईल. शारदासदनासारख्या ठिकाणीं जर रोगशुश्रूषा शिकविण्याचा वर्ग काढला आणि विधवा व त्यांचे पालक यांनीं हें काम मोठें परोपकाराचें आहे असें जाणून जर त्यास उत्तेजन दिलें, तर रोगग्रस्त जनांवर त्यांचे महत् उपकार होतील; आणि रिकामपणामुळें आळस व दुराचार ह्यांकडे त्यांची प्रवृत्ति न होतां त्यांच्या आयुष्याचा व्यय सन्मार्गीं लागला असें होईल.

युरोपियन लोकांत नन्स नांवाच्या स्त्रिया असतात त्या ईश्वरभक्त असून त्यांपैकीं कित्येक रोगग्रस्त, अनाथ लोकांची सेवा फुकट करितात. आपल्या देशांतील संतिणी, मुरळ्या, भावणी, ह्या जर वरील नन्सचा कित्ता उचलतील, तर तें त्यांस सर्वांत मोठें श्रेयस्कर होईल.

एकंदरींत रोग्याची शुश्रूषा उत्तम ठेवल्यानें रोग्याची प्रकृति सुधरावयाची असल्यास त्वरित सुधारते; आणि रोग्यास दुखण्याचा त्रासही पुष्कळ अंशीं कमी वाटतो.

तील मळाचा, सगर्भगर्भाशयाचा किंवा पोटांतील एखाद्या अवाळूचा दाब पडल्यानें, अथवा त्यांत कृमि शिरल्यानें, किंवा पित्तवाहिन्यांचें संकोचन झाल्यानें, त्यांतून पित्त आंतड्यांत उतरण्यास प्रतिबंध होतो, त्यामुळें पित्ताचें रक्तांत शोषण होऊन कावीळ उत्पन्न होते. तसेंच अतिचिंता, मद्यपान, फार दिवसांचें अजीर्ण, ह्यांपासूनही कावीळ उत्पन्न होते.

**उपचार:**—काळीज मोठें झालेलें असलें आणि उजवे बाजूच्या फांसळ्यांच्या कडांखालीं दाबलें असतां वेदना होत असल्या तर तेथें वरचेवर पोटिस बांधावें, (यादी नं. १०) किंवा जळवा लावून रक्त काढावें तीव्र रेचकें देऊन काळजा-ची क्रिया मोकळेपणीं होऊं द्यावी. क्यालोमेल १० ग्रेन, जालपपावडर ३० ग्रेन, अशीं मधांत एकत्र करून चाटावीं. काविळीचें कारण सांपडलें नाहीं तर पुढील औषधें कांहीं दिवस पर्यंत चालू ठेवावीं ह्मणजे कावीळ नाहींशी होते. एक्स्ट्राक्ट टऱ्याकसिकम् ५ ग्रेन, आमोनियाक्लोराईड (नव-सागर) १० ग्रेन, आसिड नैट्रो-हैड्रोक्लोरिक् डिल्यूट १० मिनिम्स, इनफ्यूजन चिराटा १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ द्यावें. किंवा सलफेट आफ् सोडा २० ग्रेन, पोट्याश नैट्रस २० ग्रेन, अमोनियाक्लोराईड १० ग्रेन, सकस टऱ्याकसिकम् २० मिनिम्स, पाणी १ औंस असें द्यावें. किंवा बालसमकोपेबा २० मिनिम्स, टिंकचर ऑफ् हेनबेन २० मिनिम्स, सलफेट ऑफ् पोट्याश २० ग्रेन, पेपरमिंठाचें पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ द्यावें व एक दोन दिवसांनीं ब्ल्यूपिल २॥ ग्रेन, एक्स्ट्राक्ट ऑफ् हैयोसियामस २॥ ग्रेन, पोडाफिलिन अर्धा ग्रेन, पिल—

न्हियायकंपाऊंड २॥ ग्रेन, ह्यांच्या दोन गोळ्या करून रात्रीं निजतांना पाण्याच्या घोंटाबरोबर घ्याव्या. परंतु वरील औषधांपासून जुलाब होत असतील तर हें क्स्यूपिलचें औषध देऊं नये, हें ध्यानांत ठेवावें. उलटी होत असल्यास आसिड हैड्रोक्लोरिकडिल्यूट १० मि०, पोट्याश क्लोरस १० ग्रे०, साखरेचा पाक १ ड्राम, पाणी १ औंस असें मिश्रण तीन तीन तासांनीं द्यावें. किंवा सोडा १० ग्रेन, पाणी १ औंस, असें वारंवार द्यावें.

**मराठी वैद्यकांतील उपाय:**—हरडा, बेहडा, आंवळकाठी, काडेकिराईत, कडूनिंब, कटूकी, गुळवेल, दारूहळद, हीं सर्व अर्ध तोळाप्रमाणें घेऊन, त्यांत शेरभर पाणी घालून काढा करावा. काढा पावशेर उरला ह्मणजे गाळून त्यांत अर्ध तोळा मध मिळवून घ्यावा. किंवा हळद, दारूहळद, हरडा, बेहडा, आंवळकाठी, कटूकी ह्या सर्वांचें चूर्ण करून, अर्ध तोळा चूर्ण मधांत कालवून दिवसांतून दोन वेळ द्यावें. किंवा कटूकी ।· तोळा, साखर १ तोळा, असें कोमट पाण्याबरोबर द्यावें. कडू दोडक्याची पूड हुंगावयास द्यावी. किंवा हरीतकी, वेखंड, आंवळकाठी व सोनगेरू, यांचें चूर्ण करून तें हुंगावयास द्यावें. किंवा एरंडाचा रस व पिंपळीचें चूर्ण हुंगावयास द्यावें, ह्मणजे कावीळीचा नाश होतो. कित्येक लोक काविळीकरितां मनगटावर डाग घेतात, त्यानेंही कावीळ नाहींशी होते.

---

# गोंवर.

RUBEOLA (MEASLES).

हा एक स्पर्शसंचारी रोग आहे. ह्याच्या संसर्गाचा परिणाम फार लवकर होतो; व तो संसर्ग गोंवर निघूं लागतांक्षणींच होतो. ह्याचें विष गोंवर आलेल्या रोग्याच्या श्वासाबरोबर बाहेर पडतें; व हवेशीं मिश्रण पावून श्वासोच्छ्वासाच्या द्वारें दुसऱ्या मनुष्यांच्या शरीरांत शिरतें. कधीं कधीं लहान मुलांना गोंवर आलेल्या मनुष्याच्या बिछान्यावर किंवा फक्त त्या खोलींत निजविल्यानेंही हा रोग होतो.

ह्याची सांथ थंडीच्या दिवसांत येण्याचा फार संभव असतो. बहुतकरून लहान मुलांना हा रोग होतो. तरी मोठ्या मनुष्यांस हा होत नाहीं असें नाहीं.

**लक्षणें:**—१० पासून १९ दिवसपर्यंत गोंवर संबंधीं विष शरिरांत गुप्त रहातें. नंतर थंडी लागून ताप येण्याला आरंभ होतो. तापांत शरिराचें* उष्णमान सुमारें १०१–१०२ व कधीं कधीं १०४ पर्यंतही वाढतें. नाडी जलद चालते व ती हातास कठीण लागते. वारंवार शिंका येतात, घशाची व नाकाची आंतली त्वचा लाल होते व त्यांतून एकसारखें पाणी वहात असतें. कधीं कधीं नाकांतून रक्तस्रावही होतो. डोळे लालसर व पाण्यानें भरलेले असतात. उजेडाकडे पहावत नाहीं. खोकला कोरडा व कधीं कधीं एकसारखा, अवाज घोगरा, किंवा अगदीं बसल्यासारखा इत्यादि चिन्हें असतात. बहुतकरून शौचास साफ होत नसतें. परंतु गोंवर मावळ-

---

* पृष्ठ २ पहा.

ण्याच्या सुमारास कधीं कधीं हगवण लागते. ज्वराच्या तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशीं गोंवराचा पुरळ उठण्यास आरंभ होतो. तो प्रथम कपाळ, तोंड, मान, छाती, यांवर होऊन शेवटीं हातापायांवर पसरतो. पुरळ, पिसवा डसल्याप्रमाणें लालभडक रंगाचा व अर्धचंद्राकृति मंडळाप्रमाणें पसरलेला असतो. पांच पासून आठ दिवसांच्या आंत हीं मंडळें कोमेजूं लागतात. आणि दोन किंवा तीन दिवसांचे आंतच वरचा कोंडा निघून जाऊन अगदीं नाहींशीं होतात.

**भीतिः**—गोंवराचा उगम हळूहळू होत जाणें व तो होत असतां एकाएकी मावळणें, तसेंच पडशाचा जोर ज्यास्त वाढून गळ्यास सूज, फुप्फुसाच्या नळ्यांचा दाह (ब्रांकायटीस) फुप्फुसदाह [निमोनिया] हे विकार मध्येंच उत्पन्न होणें, हीं सर्व भयसूचक चिन्हें आहेत. अशा प्रकारांत मनुष्य वांचणें बहुतकरून कठीण असतें.

**ओळखः**—ह्या रोगाच्या पूर्वज्वरांत पडसें असतें, त्यावरून हा इतर वैस्फोटिक (ज्या ज्वरांत अंगावर पुरळ उठतात तो) ज्वर नव्हे असें समजावें. देवींत उगवण झाली म्हणजे जसा ताप कमी होतो तसा ह्यांत होत नाहीं व तापाच्या तीव्रतेशीं उगवणाचें प्रमाण कांहीं नसतें.

**उपचारः**—हा रोग बहुतकरून लहानपणींच होतो; ह्मणून औषधोपचारही त्या मानानेंच योजण्यासारखा दिला आहे.

रोग्यास ऊबदार पांघरूण असावें, रोग्याच्या खोलींत शेगडी वगैरे ठेवावी, व थंड वारा त्याच्या अंगावर येऊं देऊं नये. ताप असतो तेव्हां पुढील औषधें द्यावीं.

## तीनपासून सात वर्षांच्या वयाच्यास.

लायकर अमोनिया असीटेटीस.... ....३ ड्राम.
स्पिरिट ऑफ् नाईट्रिक इथर... ....१ ,,
क्यांफर वाटर.... .... .... .... ....२ औंस.
सिरप टोलू.... .... .... .... ....२ ड्राम.

खोकला असतो तेव्हां इपीक्याक वाईन १ ड्राम मिळवावी.

खोकला फारच त्रासदायक असल्यास टिंकचर क्यांफर को०, एक ड्राम मिळवावें. या औषधाचे सहा भाग करून प्रत्येक वेळ एक भाग, या रीतीनें दिवसांतून ३ च वेळ घ्यावें, व छातीवर अळशीचें पोटीस, किंवा राई ( मोहरी ) वाटून त्याची पट्टी पांचपासून दहा मिनिटेंपर्यंत ठेवावी. घशाला सूज असून व तो बसलेला असतो तेव्हां त्याला पाण्याच्या वाफेनें ( ऊन पाण्यांत फडकें पिळून त्यानीं ) शेक करावा. शौचास वारंवार होत असल्यास पलव्हिस क्रेटा को० दोनपासून चार ग्रेनप्रमाणें दिवसांतून तीन किंवा चार वेळ पाण्याबरोबर द्यावें. **शौचास साफ होत नसल्यास एरंडेल तेल एक किंवा दोन लहान चमचे भरून साखरेच्या पाकाबरोबर द्यावें** उगवण एकाएकीं मावळूं लागून वर जांभळा रंग येऊं लागतो, तेव्हां मुलाला गरम पाण्यांत राईची पूड टाकून त्यांत ५–१० मिनिटें बसवावें. व जेम्स फीवर पावडर एक किंवा दोन ग्रेन प्रमाणानें साखरेच्या पाकाबरोबर दिवसांतून दोन वेळ चाटवावें.

वैद्य लोक औषधें देतात तीं:—गोवर्धन नामक औषध सुमारें एक गुंजपर्यंत दुधांत उगाळून तें पाजतात, ह्मणजे

उगवण लवकर चांगली होते. शिवाय पुढील काढा १।२ दिवसांआड द्यावा.

| | | |
|---|---|---|
| जेष्टीमध | .... ।· | तोळा. |
| गुलाबकळी.... | ,, | ,, |
| सोनामुखी .... | ,, | ,, |
| हरडेदळ .... | ,, | ,, |
| वाळा .... | ,, | ,, |
| नागरमोथे .... | ,, | ,, |
| पाणी .... | २० | ,, |

हीं औषधें उकळून काढा चवथाई बाकी राहिला ह्मणजे गाळून खडीसाखर घालून घ-मचा चमचा दिवसांतून ३—४ वेळां पाजावा. रेच फार होऊं लागल्यास सोनामुखी घालूं नये.

**अन्नः**—हलकें व पातळ असें द्यावें. [ आरारुटची पेज, तांदुळांची पेज, वगैरे ]

**सूचनाः**—लेंकरूं गोंवरांतून निखालस बरें झाल्यावरही त्यास बरेच दिवस ह्मणजे सरासरी एक महिनापर्यंत तरी जपावें लागतें. त्यास थंड हवेवर अगर वाऱ्यावर हिंडवूं नये व अंगांत सदोदित फल्याणीनचें कुडतें ठेवावें; व पायांत लोंकरीचे पायमोजे असूं द्यावे. नाहींतर फिरून खोकला व सरदी होण्याची भीति असते.

---

# डोळे येणें.

## CATARRHAL OPHTHALMIA.

हा विकार बहुधा थंड वायु डोळ्यांस लागल्यानें किंवा डोळ्यांस कांहीं इजा पोंचल्यानें, केर अथवा दुसरा कांहीं क्षोभक पदार्थ डोळ्यांत शिरल्यानें होतो. व हवेंत फेरफार झाल्यानेंही होतो. तेव्हां ह्याची बहुशः सांथच येत असते. एकसारखें वाचीत असल्यानें, किंवा फार वेळ बारकाईनें

कोणतीही वस्तु पहात असल्यानें, फार वेळ धुरांत काम करीत असल्यानें किंवा आलेल्या डोळ्यांची लस चांगल्या डोळ्यास लागल्यानेंही डोळे येतात. हा रोग मुलांस वारंवार होतो.

**लक्षणें:**—डोळे आले ह्मणजे पापण्या ताठून लाल होतात, किंचित् सुजतात व जड होतात, डोळे उघडून पाहिलें असतां डोळ्यांतील सफेत भाग आरक्त झालेला असतो, त्यांतून एकसारखें पाणी गळतें व विकार वृद्धिंगत झाला ह्मणजे पूमिश्रित लस वाहूं लागते. प्रथमत: डोळ्यांत आग होते व त्यांत रेती शिरल्याप्रमाणें ते खुपूं लागतात. अशा रोग्यांस उजेडाकडे पाहवत नाहीं. कधीं कधीं डोकें दुखतें, परंतु कानशिलांत किंवा डोळ्यांसभोंवतीं वेदना होत नाहींत. बहुधा ह्या विकारांबरोबर पडसेंही आलेलें असतें.

**उपचार:**—अशा रोग्यांनीं उन्हांत जाऊं नये, एरंडेल तेलाचा जुलाब घ्यावा. ( यादी नं. ७ ) किंवा ऱ्हुबार्ब पावडर पाव तोळा, सुंठीचें चूर्ण ५ गुंजा, कार्बोनेट ऑफ्म्यागनिशिया पाव तोळा, हीं एकत्र करून गुलकंदांत किंवा साखरेच्या पाकाबरोबर चाटावें; ह्मणजे दोन तीन जुलाब साफ होऊन रोगाचा जोर कमी होतो. नैट्रेट—ऑफ्सिल्व्हर २ ग्रेन, अर्कोदक १ औंस, ( Destilled water ) हीं एकत्र करून तो द्रव एका **निळसर** स्वच्छ बाटलींत भरून ठेवावा; त्याचे सकाळ संध्याकाळ २ थेंब प्रमाणें डोळ्यांत सोडावे. आणि अफूचीं बोंडें नग १६, फटकी ।· तोळा, कात ।· तोळा, पाणी पांच शेर, ह्यांचा काढा करून तो ऊन आहे तोंच वस्त्राच्या पिळ्यानें दिवसांतून तास दोन तास डोळे शेकावे. डोळ्यांचा व्यापार बंद ठेवावा, त्रिफळ्याच्या काढ्यानें,

अथवा फटकी अर्धा तोळा, रसकापूर [ क्लोराईड ऑफ् मर्क्युरी ] ९ गुंजा, व २ शेर पाणी, हें मिश्रण किंचित् ऊन करून, त्यानें डोळा वारंवार धुवावा. रोग तीव्र असल्यास कानशिलावर किंवा डोळ्याजवळच नाकावर ४–९ जळवा लावून रक्त काढावें. चार आठ दिवसांनीं एरंडेल तेलाचा जुलाब द्यावा, व नेहमीं पोटांत घेण्याकरितां केमिकल फूड, चहाचा लहान चमचा भरून सकाळ संध्याकाळ घोटभर पाण्यांत टाकून द्यावें. जेष्ठमद, गुळवेल, त्रिफळा, दारुहळद, हीं तोळा तोळा घेऊन त्यांचा शेरभर पाण्यांत काढा करून पावशेर शेष राखावा; आणि त्यांत २ तोळे मध मिळवून त्याचे ६ सहा भाग करावे, व दिवसांतून तीन वेळप्रमाणें, २ दिवसांत घ्यावें. स्त्रीच्या दुधाचे थेंब डोळ्यांत सोडावे. ( निघंट रत्नाकार ). पाडळीच्या पाल्याचा रस एखाद्या उथळशा भांड्यांत सांकवून त्याची वडी झाली ह्मणजे ती डोळ्यांवर ठेवावी. जागरणें करूं नयेत. दूध, गव्हांची पोळी वगैरे पौष्टिक पदार्थ खावे. तिखट आंबट पदार्थ खाऊं नयेत. डोळ्यांवर तुरटी, अफीण, व रक्तचंदन हीं एकत्र उगाळून त्यांचा लेप करावा, किंवा शुगरलेड अर्धा तोळा, पाणी १॥ शेर हीं एकत्र करून त्याच्या घड्या डोळ्यांवर ठेवाव्या.

हा विकार मंदावस्था पावला ह्मणजे कानशिलावर फोड आणणारें प्लास्तर ( ब्लिस्टरिंगटीशू पेपर सुमारें १ रुपाया एवढ्या आकाराचें ) मारावें; व स्वच्छ हवेवर रहावयास जावें.

## खुपऱ्या.

GRANULAR CONJUNCTIVA.

खुपऱ्या बहुतकरून नाजूक अथवा गंडमाळाजनक (स्क्राफ्युलस) प्रकृतीच्या मनुष्यास होतात. पूर्वी एकत्र्यार डोळे आलेले असले ह्मणजेही खुपऱ्या होतात. तसेंच संकुचित, पाणथळ, व अस्वच्छ ठिकाणीं पुष्कळ लोकांचा समुदाय असून, ज्यांना धुराशीं फार वेळ बसावें लागतें, त्यांना खुपऱ्या होतात.

**लक्षणें**:—पापण्या उरपतून (उलटून) पाहिलें असतां, पापण्यांचे आंतील अंगीं दाहजन्यस्राव जमून तें अंग लाल, खरबरीत, व अंकूरमय झालेलें दिसतें हें खरबरीत झालेलें पापणीचें अंग डोळयाच्या बुबुळावर वारंवार घांसलें गेल्यामुळें तेथें सारा जमतो, व कधीं कधीं डोळ्याच्या बुबुळांत अनेक वाहिन्या उत्पन्न होऊन, तें लाल कापडाच्या तुकड्यासारखें दिसतें. डोळयांत खूप उद्धवते. खुपऱ्या आलेल्या मनुष्याच्यानें उजेडाकडेस पाहवत नाहीं. डोळ्यांतून पाणी वहात असतें, आणि बहुशः रात्रीं डोळे चिकटतात. पहिल्यानें दृष्टि थोडीशी मंद होते, परंतु कांहीं काळानें फारच कमी दिसूं लागतें.

**उपचार**:—अशा वेळीं साधारण उपाय ह्मटला तर, चांगले हवेवर रहावयास जावें. आहार पौष्टिक (दूध, गहूं इ.) घ्यावा. पोटांत घेण्याकरितां "केमीकलफूड" लहानसा चमचा भरून सकाळ संध्याकाळ घोटभर पाण्यांत घ्यावयास द्यावें. किंवा "लोहभस्म" ४ गुंजा प्रमाणानें, सकाळ संध्याकाळ तूप साखर व त्रिफळा यांत मिसळून द्यावें. शौचास साफ

होत नसल्यास एरंडेल तेलाचा जुलाब द्यावा. (यादी नं. ७) पापणी वर करून, तीवर शुगरलेडची किंवा आक्साईड–ऑफ् झिंकची भुकणी चोळावी. ह्यांनीं विकार कमी न होईल तर पुढें तीन तीन दिवसांचे अंतरानें ल्युनर कॉस्टिक किंवा मोरचूताचा खडा दोन चार वेळ अंकुरांवर फिरवून लगेच गोडे तेलाचे थेंब वर सोडावे. नंतर दोन तीन तासांनीं अफूच्या बोंडाचे काढ्यानें डोळ्यांस शेकावें. डोळ्यावर, पाव-तोळा शुगरलेड, आणि पावशेर साधें किंवा गुलाबपाणी हीं एकत्र करून त्यांत भिजविलेल्या कापडाच्या घड्या ठेवाव्या. अंकूर मोठाले असल्यास त्यांवर शस्त्रानें चिरी कराव्या. किंवा कात्रीनें कापून टाकण्यासारखें असल्यास कातरून टाकावे. आणि रक्तस्राव थंड पाण्याच्या पट्टीनें बंद करावा. [ ही क्रिया कठीण आहे. ] कानशिलावर ब्लिस्टरें मारून तीं कांहीं दिवसपर्यंत वहात ठेवावीं. डोळ्यांचा व्यापार अगदीं बंद करावा. खेड्यापाड्यांतील लोक खुपऱ्यावर वांगीचीं फुलें किंवा पारिजातकाचीं पानें चोळतात. खुपऱ्या बऱ्या होण्यास बरेच दिवस लागतात.

---

## रातांधळें.

### NIGHT-BLINDNESS.

या विकारांत रोग्यांस दिवसास चांगलें दिसत असून रात्रीस दिसत नाहींसें होतें. हा विकार उष्णदेशांत ज्यास्त आढळतो व कधीं कधीं या विकाराची सांत येते. हा विकार जन्मत:च असतो, व कधीं कधीं एकाच कुटुंबांतील बरेच मनुष्यांस असतो.

विकाराच्या आरंभीं रोग्यांस रात्रीस कमी दिसूं लागतें, आणि कांहीं दिवसांनीं अगदींच दिसत नाहींसें होतें. डोळ्यांतील बाहुल्यांचें चलन दिवसास स्वाभाविक असतें, परंतु रात्रीस बाहुली प्रसृत झाली असते, व डोळ्यांपुढें प्रकाश आणिला असतां चलन मंद रीतीनें घडते. विकारास फार दिवस झाले ह्मणजे बाहुल्या रात्रीस संकुचित होतात.

**कारणें:**—अतिश्रम केल्यानें, प्रखर उन्हांत फिरल्यानें, किंवा पक्वाशय आणि काळीज ह्यांस कांहीं विकार होऊन, त्यांचा व्यापार बरोबर न घडल्यानें हा विकार ( रातांधळें ) होतो, असें मानलें आहे. तसेंच स्कर्व्ही [ नाविक रक्तपित्त ] ह्या विकारापासूनही हा विकार उद्भवतो. चांदण्यांत उघडें निजल्यानें हा विकार होतो, असें सामान्य लोकांचें मत आहे.

**परिणाम:**—हा विकार बहुधा पंधरा दिवसांपासून सहा महिन्यांच्या आंत बरा होतो. उपचार न झाल्यास कधीं कधीं दिवसासही कमी दिसूं लागतें. व कधीं कधीं अगदीं दृष्टी जाते.

**उपचार:**—विकार सजन्म किंवा कुटुंबीक असल्यास उपचार बिलकुल चालत नाहीं. परंतु इतर कारणांपासून असतो, तेव्हां तीं कारणें शोधून दूर करावीं. उन्हांत फिरूं नये, अति श्रम करूं नयेत. काळजाचा व्यापार बरोबर घडण्याकरितां दोन तीन दिवसानें पांच ग्रेन ब्ल्यूपील, रात्रीं निजतेवेळीं घेऊन सकाळीं सेडलीस पावडर घ्यावी. ह्मणजे शौच्यास साफ होऊन **पक्वाशय** आणि **काळीज** ह्यांचा व्यापार सुरळीत चालू होतो. (स्कर्व्ही विकार असल्यास तो दूर करावा.) लैकर स्ट्रिकनिया १० थेंब, पाणी १ औंस

होत नसल्यास एरंडेल तेलाचा जुलाब द्यावा. (यादी नं. ७) पापणी वर करून, तीवर शुगरलेडची किंवा आक्साईड-ऑफ् झिंकची भुकणी चोळावी. ह्यांनीं विकार कमी न होईल तर पुढें तीन तीन दिवसांचे अंतरानें ल्युनर कॉस्टिक किंवा मोरचूताचा खडा दोन चार वेळ अंकुरांवर फिरवून लगेच गोडे तेलाचे थेंब वर सोडावे. नंतर दोन तीन तासांनीं अफूच्या बोंडाचे काढ्यानें डोळ्यांस शेकावें. डोळ्यावर, पाव-तोळा शुगरलेड, आणि पावशेर साधें किंवा गुलाबपाणी हीं एकत्र करून त्यांत भिजविलेल्या कापडाच्या घड्या ठेवाव्या. अंकूर मोठाले असल्यास त्यांवर शस्त्रानें चिरी कराव्या. किंवा कात्रीनें कापून टाकण्यासारखें असल्यास कातरून टाकावे. आणि रक्तस्राव थंड पाण्याच्या पट्टीनें बंद करावा. [ ही क्रिया कठीण आहे. ] कानशिलावर ब्लिस्टरें मारून तीं कांहीं दिवसपर्यंत वहात ठेवावीं. डोळ्यांचा व्यापार अगदीं बंद करावा. खेड्यापाड्यांतील लोक खुपऱ्यावर वांगीचीं फुलें किंवा पारिजातकाचीं पानें चोळतात. खुपऱ्या बऱ्या होण्यास बरेच दिवस लागतात.

---

## रातांधळें.

### NIGHT-BLINDNESS.

या विकारांत रोग्यांस दिवसास चांगलें दिसत असून रात्रीस दिसत नाहींसें होतें. हा विकार उष्णदेशांत ज्यास्त आढळतो व कधीं कधीं या विकाराची सांत येते. हा विकार जन्मतःच असतो, व कधीं कधीं एकाच कुटुंबांतील बरेच मनुष्यांस असतो.

विकाराच्या आरंभीं रोग्यांस रात्रीस कमी दिसूं लागतें, आणि कांहीं दिवसांनीं अगदींच दिसत नाहींसें होतें. डोळ्यांतील बाहुल्यांचें चलन दिवसास स्वाभाविक असतें, परंतु रात्रीस बाहुली प्रसृत झाली असते, व डोळ्यांपुढें प्रकाश आणिला असतां चलन मंद रीतीनें घडते. विकारास फार दिवस झाले ह्मणजे बाहुल्या रात्रीस संकुचित होतात.

**कारणें:**—अतिश्रम केल्यानें, प्रखर उन्हांत फिरल्यानें, किंवा पक्काशय आणि काळीज ह्यांस कांहीं विकार होऊन, त्यांचा व्यापार बरोबर न घडल्यानें हा विकार (रातांधळें) होतो, असें मानलें आहे. तसेंच स्कर्व्ही [ नाविक रक्तपित्त ] ह्या विकारापासूनही हा विकार उद्भवतो. चांदण्यांत उघडें निजल्यानें हा विकार होतो, असें सामान्य लोकांचें मत आहे.

**परिणाम:**—हा विकार बहुधा पंधरा दिवसांपासून सहा महिन्यांच्या आंत बरा होतो. उपचार न झाल्यास कधीं कधीं दिवसासही कमी दिसूं लागतें. व कधीं कधीं अगदीं दृष्टी जाते.

**उपचार:**—विकार सजन्म किंवा कुटुंबीक असल्यास उपचार बिलकुल चालत नाहीं. परंतु इतर कारणांपासून असतो, तेव्हां तीं कारणें शोधून दूर करावीं. उन्हांत फिरूं नये, अति श्रम करूं नयेत. काळजाचा व्यापार बरोबर घडण्याकरितां दोन तीन दिवसानें पांच ग्रेन ब्ल्यूपील, रात्रीं निजतेवेळीं घेऊन सकाळीं सेडलीस पावडर घ्यावी. ह्मणजे शौच्यास साफ होऊन **पक्काशय** आणि **काळीज** ह्यांचा व्यापार सुरळीत चालू होतो. (स्कर्व्ही विकार असल्यास तो दूर करावा.) लैकर स्ट्रिकनिया १० थेंब, पाणी १ औंस

हीं एकत्र करून दिवसांतून दोन वेळ प्यावें. किंवा कायनीडाय सलफस ६ ग्रेन, आसिड सलफ्युरिक डिल्युट ६ थेंब, पोट्याश क्लोरस ॥ ड्राम, सरबत (साखरेचा पाक) ॥ औंस, पाणी ३ औंस हीं एकत्र करून त्याचे ३ भाग करावे, व दिवसांतून तीन वेळ प्यावे. किंवा कॉडलिव्हर आईल १ ड्राम, लैकर पोट्याश १० थेंब, पेपरमीटचें पाणी १ औंस, ह्याप्रमाणें सकाळ संध्याकाळ दोन वेळ तयार करून प्यावें. सल्फेट ऑफ झिंक अर्धा ड्राम, व पाणी ८ औंस ह्यांच्या मिश्रणानें डोळा धुवावा डोळ्यावर हिरव्या रंगाचा पडदा बांधावा. फार प्रकाशाकडे पाहूं नये. इतकें करूनही विकार कमी न होईल तर कानसुलावर पुनः पुनः ब्लिस्टरें मारावीं.

जाईच्या पानांचा रस, हळद आणि रसांजन हीं मधांत उगाळून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. किंवा रसांजन, मनशीळ, देवदार हीं जाईच्या पाल्याच्या रसांत खलून त्यांत मध घालून अंजन करावें. तें नेत्रांत गेलें ह्मणजे रातांधळ्याचा नाश करितें. (नि० र०)

---

## दंताविषयीं.

TEETH.

तोंडांत अन्नाचे घनभाग छिन्नविच्छिन्न होऊन रगडले जावेत ह्मणून ईश्वरानें बहुतकरून सर्व प्राण्यांस दांत दिले आहेत. त्यांच्या योगानें अन्नाचें चांगलें चर्वण होऊन, तें सहज गिळण्यासारखें व पचनाला योग्य होतें.

**दांतांची रसायनिक घटनाः**—दांतांत २८ भाग प्राणिज, व ७२ भाग खनिज द्रव्यें असतात. खनिज

द्रव्यांपैकीं **फॉस्फेट ऑफ लाइम, फॉस्फेट ऑफ म्याग्नीशिया, कारबोनेट ऑफ लाइम, फ्लोराईड ऑफ क्यालशियम,** व दुसरे आणखी क्षार मिळून झालेली असते. मनुष्यांच्या दांतांचे दोन भाग असतात. एक अस्थींचा भाग असतो, त्यासच दांत असें ह्मणतात; आणि तो थेट अस्थींसारखाच असतो. व दुसरा दांतांचे वरती गुळगुळीत, पातळ आणि चकचकीत जें कवच असतें त्यास दांतांचें लुकण असें म्हणतात. दांतांचें मूळ, दाभाडांत घट्ट बसलेलें असतें. दांतांच्या मध्यें नळीसारखी पोकळी असते, ती मूळापर्यंत असते. तिच्यामध्यें रक्तवाहिनी आणि ज्ञानतंतु असतात, व त्यांच्याच योगानें दांतांची उत्पत्ति व पोषण होतें.

मनुष्यजातीच्या प्राण्यांत दांतांच्या दोन रांगा असतात, पैकीं १ली अथवा जिला दुधाचे दांत असें ह्मणतात ती. दुधाचे दांत २० असतात व ते १८ पासून २४ महिनेपर्यंत येत असतात ते पुढें लिहिल्याप्रमाणें:—

**दुधाचे दांत खालीं लिहिल्यावेळीं येतात.**

मधले छेदक..............५ पासून ७ महिनेपर्यंत.

बाजूचे छेदक............६ पासून ९ महिनेपर्यंत.

पहिल्या दाढा............८ पासून १५ महिनेपर्यंत.

शूळदंत...................१५ पासून १८ महिनेपर्यंत.

दुसऱ्या दाढा..........१८ पासून २४ महिनेपर्यंत.

ह्याप्रमाणें दांत येण्याचा वेळानुक्रम आहे. परंतु कधीं कधीं मुलें जन्मतःच त्यांस दांत असतात व कधीं कधीं दोन वर्षेपर्यंतही दांत येत नाहींत. डाक्तर अशबर्नर ह्यांनीं एक मूल २ वर्षांचें झाल्यावर त्यास दुधाचे दांत आले, व एकास

७ वर्षांनंतर आले असें लिहिलें आहे. व दुसरें फारच चमत्कारिक उदाहरण आहे. त्यांत एका मनुष्यास म्हातारपणापर्यंत दांत आलेच नाहींत. कांहीं दिवसांमागें माझी माझ्या वर्गापैकीं एका हास्पिटल असिस्टंटची गांठ पडली होती, त्या वेळीं त्यानें असें सांगितलें कीं, वडवान शहरीं एका ६० वर्षांच्या म्हाताऱ्यास नुकतेच दांत आले आहेत.

वरचे दांत येण्यापूर्वी खालचे दांत येतात.

## पक्के दांत येण्याच्या कालाचें कोष्टक.

| वर्ष. | छेदक दंत. | | सुळे दंत. | व्यग्र दंत. | | दाढा. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मधचे. | बाजूचे. | | पुढचे. | मागील. | पुढच्या. | मध्य. | मागल्या. |
| ७ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० |
| ८ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० |
| ११ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० |
| १२–१२॥ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० |
| १२॥–१४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० |
| १८—२५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |

**इन्सायझर्स:**—छेदकदंत–पुढचे चार दांत, जे समोर दिसतात ते. वरचे चार दांत, खालच्या जाभाडांतील चोहोंपेक्षां मोठे असतात. ह्यांच्या योगानें आपण पदार्थ तोडतों. त्यांचीं अग्रें फार तीक्ष्ण असतात.

**कनाईनः**—शूलदंत—हे प्रत्येक छेदक दंतांच्या जोडी-च्या पाठीमागें एक एक असे प्रत्येक दाभाडांत दोन दोन मिळून चार असतात.

**बायकस्पीडः**—(व्यग्रदंत.) हे प्रत्येक दाभाडांतील शूळदं-तांच्या पाठीमागें दोन दोन असतात.

**मोलर्सः**—दाढा, ह्या व्यग्रदंतांच्या पाठीमागें तीन तीन अशा प्रत्येक दाभाडांत ६ मिळून १२ असतात. ह्यांचे योगानें आपण पदार्थांचें चर्वण करून अगदीं बारीक करून टाकितों.

---

## दंतोद्भवन.

दांत येतेवेळेस मूल चांगलें सशक्त, व सदृढ असलें तर कांहींच विकार दृष्टीस पडत नाहींत. परंतु बहुतकरून दांत येण्याच्या पूर्वी, पुढील लक्षणें होतात. हिरडी सुजते व ऊन होते, तोंड लाल होतें, मूल तोंडांत वारंवार बोटें घालतें, व फार रडखोर होतें, राहून राहून रडूं लागतें, रात्रीं बरोबर निजत नाहीं व खात नाहींसें होतें. वांती व ढाळ होऊं लागतात; मूल फार अशक्त असलें तर आंग तापतें; तोंड कोरडें पडतें, व जिभेवर फोड उठतात, त्यामुळें स्तनपान करीत नाहीं. वारंवार डोळे फिरवितें. ह्यापेक्षां मज्जातंतु व फुफ्फुसास रोग झाले ह्मणजे तीव्र लक्षणें होतात. हातापायांस आचके येतात, मूत्र होत नाहीं, व तोंड उतून येतें. हिरड्या कठीण असल्यामुळें दांत वर येण्यास प्रतिबंध होतो. कधीं कधीं हीं लक्षणें जास्ती तीव्र होत जाऊन मुलांच्या जिवास धोका बसतो. कधीं कधीं येणाऱ्या दांतांवरील हिरडीचा भाग सुजून

हीं एकत्र करून दिवसांतून दोन वेळ प्यावें. किंवा कायनीडाय सलफस ६ ग्रेन, आसिड सलफ्युरिक डिल्युट ६ थेंब, पोत्याश क्लोरस ॥ ड्राम, सरबत (साखरेचा पाक) ॥ औंस, पाणी ३ औंस हीं एकत्र करून त्याचे ३ भाग करावे, व दिवसांतून तीन वेळ प्यावे. किंवा कॉडलिव्हर आईल १ ड्राम, लैकर पोत्याश १० थेंब, पेपरमीटचें पाणी १ औंस, ह्याप्रमाणें सकाळ संध्याकाळ दोन वेळ तयार करून प्यावें. सल्फेट ऑफ झिंक अर्धा ड्राम, व पाणी ८ औंस ह्यांच्या मिश्रणानें डोळा धुवावा. डोळ्यावर हिरव्या रंगाचा पडदा बांधावा. फार प्रकाशाकडे पाहूं नये. इतकें करूनही विकार कमी न होईल तर कानसुलावर पुनः पुनः ब्लिस्टरें मारावीं.

जाईच्या पानांचा रस, हळद आणि रसांजन हीं मधांत उगाळून त्याचें डोळ्यांत अंजन करावें. किंवा रसांजन, मनशीळ, देवदार हीं जाईच्या पाल्याच्या रसांत खलून त्यांत मध घालून अंजन करावें. तें नेत्रांत गेलें ह्मणजे रातांधळ्याचा नाश करितें. (नि० र०)

---

## दंताविषयीं.

### TEETH.

तोंडांत अन्नाचे घनभाग छिन्नविच्छिन्न होऊन रगडले जावेत ह्मणून ईश्वरानें बहुतकरून सर्व प्राण्यांस दांत दिले आहेत. त्यांच्या योगानें अन्नाचें चांगलें चर्वण होऊन, तें सहज गिळण्यासारखें व पचनाला योग्य होतें.

**दांतांची रसायनिक घटना:**—दांतांत २८ भाग प्राणिज, व ७२ भाग खनिज द्रव्यें असतात. खनिज

द्रव्यांपैकीं **फॉस्फेट ऑफ लाइम, फॉस्फेट ऑफ म्यागनीशिया, कारबोनेट ऑफ लाइम, फ्लोराईड ऑफ क्यालशियम,** व दुसरे आणखी क्षार मिळून झालेली असते. मनुष्यांच्या दांतांचे दोन भाग असतात. एक अस्थींचा भाग असतो, त्यासच दांत असें ह्मणतात; आणि तो थेट अस्थींसारखाच असतो. व दुसरा दांतांचे वरती गुळ्गुळीत, पातळ आणि चकचकीत जें कवच असतें त्यास दांतांचें लुकण असें म्हणतात. दांतांचें मूळ, दाभाडांत घट्ट बसलेलें असतें. दांतांच्या मध्यें नळीसारखी पोकळी असते, ती मूळापर्यंत असते. तिच्यामध्यें रक्तवाहिनी आणि ज्ञानतंतु असतात, व त्यांच्याच योगानें दांतांची उत्पत्ति व पोषण होतें.

मनुष्यजातीच्या प्राण्यांत दांतांच्या दोन रांगा असतात, पैकीं १ली अथवा जिला दुधाचे दांत असें ह्मणतात ती. दुधाचे दांत २० असतात व ते १८ पासून २४ महिनेपर्यंत येत असतात ते पुढें लिहिल्याप्रमाणें:—

**दुधाचे दांत खालीं लिहिल्यावेळीं येतात.**

मधले छेदक..............५ पासून ७ महिनेपर्यंत.
बाजूचे छेदक.............६ पासून ९ महिनेपर्यंत.
पहिल्या दाढा.............८ पासून १५ महिनेपर्यंत.
शूळदंत...................१५ पासून १८ महिनेपर्यंत.
दुसऱ्या दाढा............१८ पासून २४ महिनेपर्यंत.

ह्याप्रमाणें दांत येण्याचा वेळानुक्रम आहे. परंतु कधीं कधीं मुलें जन्मतःच त्यांस दांत असतात व कधीं कधीं दोन वर्षेपर्यंतही दांत येत नाहींत. डाक्तर अशबर्नर ह्यांनीं एक मूल २ वर्षांचें झाल्यावर त्यास दुधाचे दांत आले, व एकास

७ वर्षांनंतर आले असें लिहिलें आहे. व दुसरें फारच चमत्कारिक उदाहरण आहे. त्यांत एका मनुष्यास म्हातारपणापर्यंत दांत आलेच नाहींत. कांहीं दिवसांमागें माझी माझ्या वर्गापैकीं एका हास्पिटल असिस्टंटची गांठ पडली होती, त्या वेळीं त्यानें असें सांगितलें कीं, वडवान शहरीं एका ६० वर्षांच्या म्हाताऱ्यास नुकतेच दांत आले आहेत.

वरचे दांत येण्यापूर्वी खालचे दांत येतात.

## पक्के दांत येण्याच्या कालाचें कोष्टक.

| वर्ष. | छेदक दंत. | | सुळे दांत. | व्यग्र दंत. | | दाढा. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मधचे. | बाजूचे. | | पुढचे. | मागचे. | पुढच्या. | मध्य. | मागच्या. |
| ७ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० |
| ८ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० |
| ११ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० |
| १२–१२॥ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० |
| १२॥–१४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० |
| १८—२५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |

**इन्सायझर्स**:—छेदकदंत–पुढचे चार दांत, जे समोर दिसतात ते. वरचे चार दांत, खालच्या जाभाडांतील चोहोंपेक्षां मोठे असतात. ह्यांच्या योगानें आपण पदार्थ तोडतों. त्यांचीं अग्रें फार तीक्ष्ण असतात.

**कनाईनः**—शूलदंत—हे प्रत्येक छेदक दंतांच्या जोडी-च्या पाठीमागें एक एक असे प्रत्येक दाभाडांत दोन दोन मिळून चार असतात.

**बायकस्पीडः**—(व्यग्रदंत.) हे प्रत्येक दाभाडांतील शूळदं-तांच्या पाठीमागें दोन दोन असतात.

**मोलर्सः**—दाढा, ह्या व्यग्रदंतांच्या पाठीमागें तीन तीन अशा प्रत्येक दाभाडांत ६ मिळून १२ असतात. ह्यांचे योगानें आपण पदार्थांचें चर्वण करून अगदीं बारीक करून टाकितों.

---

## दंतोद्भवन.

दांत येतेवेळेस मूल चांगलें सशक्त, व सदृढ असलें तर कांहींच विकार दृष्टीस पडत नाहींत. परंतु बहुतकरून दांत येण्याच्या पूर्वी, पुढील लक्षणें होतात. हिरडी सुजते व ऊन होते, तोंड लाल होतें, मूल तोंडांत वारंवार बोटें घालतें, व फार रडखोर होतें, राहून राहून रडूं लागतें, रात्रीं बरोबर निजत नाहीं व खात नाहींसें होतें. वांती व ढाळ होऊं लागतात; मूल फार अशक्त असलें तर आंग तापतें; तोंड कोरडें पडतें, व जिभेवर फोड उठतात, त्यामुळें स्तनपान करीत नाहीं. वारंवार डोळे फिरवितें. ह्यापेक्षां मज्जातंतु व फुप्फुसास रोग झाले ह्मणजे तीव्र लक्षणें होतात. हातापायांस आचके येतात, मूत्र होत नाहीं, व तोंड उतून येतें. हिरड्या कठीण असल्यामुळें दांत वर येण्यास प्रतिबंध होतो. कधीं कधीं हीं लक्षणें जास्ती तीव्र होत जाऊन मुलांच्या जिवास धोका बसतो. कधीं कधीं येणाऱ्या दांतांवरील हिरडीचा भाग सुजून

पिकतो, व तेथें क्षत पडतें. दंतोद्भवन होतांना कधीं कधीं त्वचेवर निरनिराळ्या प्रकारचा पुरळ उठतो. हा आल्यानें रक्त साफ होतें. दांत येतांना ज्वर वगैरे फार नसल्यास औषध देण्याची फारशी जरुरी पडत नाहीं. थोडीशी लाळ गळणें व शौचास पातळ होणें ह्यापासून प्रकृति साफ होते. ह्याकरितां दांत येतांना शौचास होत नसल्यास चहाचे दोन चमचेभर येरंडेल तेल पिण्यास द्यावें; अगर सुरवारी हिर्डा ५–१० गुंजा पाण्यांत उगाळून त्यांत खडीसाखर घालून तो किंचित् ऊन करून दिवसांतून ३–४ वेळां शौचास साफ होईपर्यंत द्यावा. बहुतकरून दंतोद्भवनाचे वेळीं वांती व ढाळ हीं लक्षणें असावयाचींच. परंतु तीं अतिशय असल्यास बंद करावीं लागतात. वांतीसाठीं चुन्याची निवळ (लायकरक्यालसिस) (या. नं. ९) ५ किंवा १० थेंब दुधांत मिश्र करून वारंवार द्यावी. जुलाब कमी करण्याकरितां **पल्व्हिस क्रेटा आरोम्याटिक १२ ग्रेन, पल्व्हिस डोव्हराय ६ ग्रेन, कार्बोनेट आफ् सोडा ६ ग्रेन,** हीं सर्व एकत्र करून त्याच्या ६ पुड्या कराव्या, आणि दिवसांतून २ किंवा ३ पुड्या, आईचे अगर गायीचे दुधांत पाजाव्या. परंतु प्रकृतीस फार त्रास झाल्यास, मुलांच्या रोगाची चिकित्सा फार लक्षपूर्वक करावी. कारण, मुलांचे पोटांत जंत झाल्यास हींच लक्षणें होतात. तोंडांत बोटें घालून हिरडीची स्थिति तपासावी. हिरडी फार ऊन, कठीण, लाल व सुजलेली असली तर ती शस्त्रानें चिरावी. मुलास फार तहान लागली असल्यास पाणी द्यावें. जिभेवर खरे किंवा हिरडीला क्षत पडलें तर एक अथवा दोन ग्रेन **पोटास क्लोरोस** थोड्याशा मधाब्रो-

वर दिवसांतून ३ वेळां द्यावें; व क्षतावर **टाकणखाराची** लाही मधांत कालवून लावावी.

पक्के दांत:—नेहमींचे दांत येण्याचे संधीस बहुतकरून कांहींच विकार होत नाहीं; परंतु कधीं कधीं वर सांगितल्या लक्षणांपैकीं कांहीं होतात. त्याशिवाय, **गालफे, अपस्मार, खंजवायु, डोळे येणें** वगैरे विकार उत्पन्न होतात. त्यांची चिकित्सा त्या त्या रोगांच्या संबंधानें सांगितली जाईल.

---

## दंतशूल.

हा दोन प्रकारचा आहे. ( १ ) ज्ञाततंतुगतशूल, व ( २ ) क्षोभजशूल.

**ज्ञाततंतुगतशूल:**—दांतांत राहून राहून शूल उत्पन्न होतो, आणि तो अमुकच स्थानीं होतो, हें ज्याचें त्यास कळत नाहीं.

**कारणें:**—दांत मोडला असतां, त्यास '* केरीज' नामक विकार झाला असतां, दांतांच्या वेष्टणाचा क्षोभ झाला असतां, किंवा कोणत्याही प्रकारें, दांतांचे मज्जातंतूंचा क्षोभ झाला असतां, हा शूल उत्पन्न होतो.

**उपचार:**—त्याचें कारण शोधून प्रथम तें दूर करावें. रोगी बर्फ, किंवा कोणताही आंबट व थंड पदार्थ खात असल्यास ते खाण्याची मनाई करावी. रेचक द्यावें. कांहीं दिवस पोटांत घेण्याकरितां **किनाइनसलफस** ३ ग्रेन, **पोट्याशक्लोरस** १० ग्रेन, पाणी १ औंस ह्यांचें मिश्रण करून तें दिवसांतून ३ वेळां घेत असावें आणि पुढील औषधें दांतांस

---

* दांतांच्या कणांचा नाश होणें.

चोळावीं. १ भार कापूर, ॥ भार कात, । फटकी, व १ भार मायफळ ह्यांची वस्त्रगाळ पूड करून ती दांतांस चोळावी. वेदना फारच होत असल्यास थोडीशी अफू आणि कापूर कोलनवाटरांत किंवा नुसते पाण्यांत मिळवून त्यांत कापूस भिजवून तो दांतांवर लावावा. नाहींतर, **टिंक्चर ओपाय, स्पिरिट ऑफ् क्यांफर, क्रियजोट, क्लोरोफॉर्म** यांपैकीं कोणतेंहीं औषध घेऊन त्यांत कापूस भिजवून लावावा. १ भार कापूर, । लवंग, । जायपत्रीं, व २ भार चॉक (खडू) ह्यांची वस्त्रगाळ भुकी करून ती दांतांस लावावी.

हा विकार उत्पन्न होऊं नये ह्मणून प्रत्येक मनुष्यानें कोणताही पदार्थ खाल्ल्यानंतर **कारबोनेट ऑफ् सोड्या**च्या पाण्यानें अगर नुसत्या ऊन पाण्यानें तरी गुळण्या कराव्या.

---

## दुसरा प्रकार--क्षोभजशूल.

हा विकार दंतविकारापासून असतो. दांतांस केरीज नामक विकारानें छिद्रें पडतात. तंबाकू, पानसुपारी वगैरे खाण्याची अति संवय असून, किंवा मांसमय पदार्थ खाण्यांत येऊन ते बराबर साफ न झाल्याकारणानें, रात्रभर दांतांत तसेच अटकून राहून, त्यांपासून एक आंबट द्रव उत्पन्न होतो, आणि त्याच्या क्षोभामुळें दांतांवरील चकचकीत भागाचा नाश होऊन दांतांत खाची व छिद्रें पडतात. तसेंच प्रकृतिविकारामुळें किंवा दांतांचा **एनामेल** भाग (लुकण) अपूर्ण असल्यामुळें दांतांच्या कणांचा नाश होऊन दांतांस लहान लहान खांचा पडतात. हा विकार गरोदरअवस्था,

कित्येक दुर्घट रोग, आणि पाऱ्याचें अतिसेवन यांपासूनही उद्भवतो. याबरोबर बहुधा अग्निमांद्यविकार (डिस्पेप्शिआ) असतो. कांहीं दिवसांनीं खांचा, दांतांच्या पोंकळीपर्यंत जाऊन छिद्र पडतें. आणि त्यांत अन्न वगैरे पदार्थ शिरून ते दांतांच्या मज्जातंतूस लागून शूल उत्पन्न करितात.

**उपचारः**— कारबोनेट ऑफ सोडा, पाण्यांत मिळवून त्याच्या किंवा मायफळांच्या काढ्याच्या गुळण्या कराव्या. वेदना फार होत असल्यास त्यांतच थोडासा कापराचा भुगा टाकावा. हिरडी सुजली असल्यास ती चिरावी. **क्लोरोफॉर्म, लॉडेनम्, क्रियाजोट,** किंवा हिंगाचें पाणी, लवंगांचें तेल, पेपरमिंटाचें तेल, पेनकिलर, कापूर किंवा त्याचा अर्क, ह्यांत कापूस भिजवून दांतांच्या खांचेंत बसवावा, आणि लाळ वाहूं लागली तर ती थुंकून टाकावी. खांच उथळ असल्यास कुजलेला भाग कानसून काढावा. खांच खोल असल्यास तींत सोन्याच्या वर्खाची गोळी करून बसवावी, किंवा दंतपोकळींतल्या मज्जेला **क्लोराईड ऑफ झिंक** लावून ती जाळून टाकावी आणि छिद्रांत **गटापर्च्याचा** तुकडा **स्पिरीट**मध्यें ऊन करून तो चिकट गोळी करण्यासारखा बनला ह्मणजे त्याची गोळी करून ती खांचेंत बसवावी.

वरील उपचारांनीं शूल कमी न झाल्यास दांत उपटून काढावा. दांत काढल्यावर थोडासा रक्तस्राव होतो; तो फटकीचें पाणी कांहीं वेळ तोंडांत धरून ठेवल्यानें बहुशः बंद होतो. नच झाल्यास रक्त पुसून काढून, फटकीची किंवा मायफळाची पूड त्या ठिकाणीं दाबावी. किंवा **नाईट्रेट ऑफ सिल्व्हर** त्या ठिकाणीं चोळावें. इतक्यानेंही रक्तस्राव बंद न

होईल तर, त्यांचेंत नरमशा कपड्याची चिंधी भरावी. आणि वरचे दांत, खालचे दांतांशीं जुळवून, ते जुळलेलेच रहाण्या-करितां हनवटी व डोकें यांस घट्ट पट्टा बांधावा.

**लाळेंतील क्षारादि पदार्थ** दांतांवर सांचून, त्यांच्या त्यांजवर घलप्या धरतात. हा मल सांचूं दिला असतां हिरड्यांचें शोषण होत जाऊन दांतही लवकरच कुजूं लागतात, व त्यांस किंचित् धक्का लागला असतां त्यांतून रक्त वाहूं लागतें. तर असें होऊं नये ह्मणून, दंत स्वच्छ ठेवावे. दररोज २ वेळां घासावे व त्यांजवर मळ जमला असल्यास तो खरवडून काढावा. व १ भार **टांकणखार, २ फटकी, ३ स्पिरीट ऑफ क्याम्फर, ४ टिंक्चर ऑफ-मर्‍ह, ६ टिंक्चर ऑफ रेटनी** व पाणी ३२ भार हीं एकत्र करून त्याच्या वारंवार गुळण्या कराव्या.

**ढिले झालेले दांतः**—वर सांगितलेले विकारांनीं किंवा पाऱ्याच्या औषधांनीं, अथवा **स्कर्व्ही** नामक विकारांत जेव्हां हिरड्या अगदीं जांबळवट होऊन रक्तहीन होतात, तेव्हां दांत ढिले झाले असतांही उपटून काढूं नयेत. औषधोपचार करावा. **स्कर्व्ही** ( नाविक रक्तपित्त ) विकार झाला असल्यास, त्या विकारांत सांगितलेले उपचार सुरू करावे. पाऱ्यामुळें दांत ढिले झाले असल्यास, बाभळीच्या सालीचा काढा करून, त्यानें गुळण्या कराव्या. व १ भार **कापूर**, ·।· **फटकी**, ·॥· **कात**, ३ **चाक** (खडू), २ **सिंकोनाबार्क** व **जायपत्री** अर्धाभार ह्यांची वस्त्रगाळ पूड करून, ती दांतांस लावावी व पोटांत **टिंक्चर सिंकोना** १ ड्राम, **पोट्याश**

क्लोरल १५ ग्रेन, पाणी ३ औंस, यांचे ३ भाग करून, दिवसांतून तीन वेळां प्यावे.

धक्का लागून दांत हालत असल्यास, ते रेशमी दोऱ्यानें किंवा रुप्याच्या तारेनें शेजारच्या दांतांशीं घट्ट बांधून ठेवावे, म्हणजे आपोआप कांहीं दिवसांनीं ते घट्ट होतात.

**पक्क्या दांतांची पंक्तिः**—कधीं कधीं वांकडी असते. त्यामुळें पुढचे छेदक वगैरे दांत पुढें येतात. ते दररोज थोडथोडे दाबावे म्हणजे ते मागें जातात. न गेल्यास हस्तिदंती पट्टयांनीं किंवा इंडिया रबराच्या लवचिक पट्टयांनीं दाबून रांगेंत आणीत जावें. हा उपचार बाल्यावस्थेंत करूं नये. कारण, वय वाढत चाललें म्हणजे दांत आपोआप ओळीला येतात. कधीं कधीं दांत फार दाट आलेले असतात; तेणेंकरून ते एकमेकांवर चढून वांकडे होतात. तेव्हां तेथील एखादी दाढ उपटून काढावी म्हणजे दुसऱ्या दांतांस जागा होते.

## दांत स्वच्छ राखून, तोंडांत सुगंध उत्पन्न करणारीं अनेक जातींचीं दांतवणें. ( टूथ पावडर्स. )

( १. )

| | | |
|---|---|---|
| कापूर............... | २ | तोळे. |
| खडू ( चॉक )........ | ४ | ,, |
| कोळसा .... .... .... | ४ | ,, |
| गुलाबी अत्तर........ | ४ | थेंब |

प्रथम वस्त्रगाळ पुडी करून, नंतर अत्तराचे थेंब टाकून खूप घोटावें.

( २. )

| | | |
|---|---|---|
| मस्तकी ........... | १ | भाग. |
| कापूर ........... | १ | ,, |
| जायपत्री ........ | १ | ,, |
| खडू ........... | ४ | ,, |

सर्वांची वस्त्रगाळ पूड करावी. पूड तयार झाल्यावर स्वच्छ बाटलींत बंद करून ठेवावी.

## दांतांना मजबुती आणणारीं दांतवणें.

| (१.) | | (२.) | |
|---|---|---|---|
| सिंकोना बार्कची भुकी.... | १ तोळा. | तुरटी........ | ।· तोळा. |
| खडू .................... | ४ ,, | मायफळ.... | १ ,, |
| हिराबोळ ................ | १ ,, | कात........ | ·॥· ,, |
| लवंग.................... | ।· ,, | खडू ........ | ४ ,, |
| सर्वांची वस्त्रगाळ पूड करावी. | | कापूर........ | ·॥· ,, |
| | | सर्वांची वस्त्रगाळ पूड करावी. | |

दांतवण फार बारीक असल्याशिवाय दांतांस चोळूं नये, व चोळतांना जोरानें चोळूं नये. ( दंतधावन पहा. )

---

## हिरडीचें पिकणें.

GUM BOIL.

दंतक्षोभापासून किंवा उष्ण पदार्थांचें सेवन केल्यानें अथवा अतितर जागरणानें हिरडी सुजते, कढत होते, ठणकूं लागते व पुढें एक दोन दिवसांनीं पुवळणास येते.

**उपचारः**—प्रथम जुलाब घ्यावा. ( यादी नं. ११ ). हिरडी मिठानें दाबावी. त्या बाजूचा गाल, ऊन पाण्यानें अथवा अफूचे बोंडाच्या काढ्यानें शेकावा. वारंवार ऊन पाण्याच्या गुळण्या कराव्या. **लॉडेनम** व **क्लोरोफॉर्म**, हीं एकत्र करून, त्यांत कापूस भिजवून हिरडीवर लावावा. कुजलेल्या दांतांच्या क्षोभापासून हिरडी पिकली असल्यास, दांत उपटून काढवावा. हिरडी पिकून नरम लागूं लागली म्हणजे ती चिरवावी. ( या दोन्ही क्रिया कठीण आहेत. ) नंतर ऊन्ह ऊन्ह त्रिफ-

ळ्याचे काढ्याच्या गुळण्या कराव्या म्हणजे ठणका कमी होऊन, हिरडी साफ बसून जाते.

---

# नारू.

GUINEA WORM:

**वर्णन**:—नारू (गुजराथी लोक यास 'वाळो' ह्मणतात.) हा एक गोलकृमींपैकीं, दुधासारखा पांढरवट रंगाचा असतो. ह्याची लांबी सुमारें सहा इंचांपासून तों पुष्कळ फुटींपर्यंत असते. जाडी एक दशांशपासून एक पंधरांश इंच इतकी असते. ह्याचें अंग गोल असून, मागल्या पुढल्या टोंकांकडेस सूक्ष्म छिद्राप्रमाणें असतें. आणि गुदद्वाराचें छिद्र मागल्या टोंकाकडे नसतां बाजूस असते. स्त्रीजातीच्या कृमीचें अंग वांकडें असतें. हा प्राणी, आपल्या पूर्वस्थितींत फारच सूक्ष्म असतो, तेव्हां तो फक्त सूक्ष्मदर्शक यंत्राच्या योगानें पहाण्यांत येतो.

हा प्राणी, ऊष्णकटिबंधांतील देशांत—म्हणजे आफ्रिका आणि एशिया, यांच्या दलदलींच्या प्रांतांतून व नद्या, तळीं व ओढ्यांतून वगैरे ठिकाणीं आढळतो. मुंबई इलाख्यांतील, पेण, पनवेल, अलीबाग, भिवंडी व कित्येक नदीकिनाऱ्याचे खेड्यांतील लोकांस हा झालेला पाहण्यांत येतो. पुनः हा केवळ मनुष्यजातीचे प्राण्यांतच पाहण्यांत येतो, असें नाहीं; तर कधीं कधीं कुत्रीं, घोडे, ह्यांतही पाहण्यांत येतो. हा बहुतकरून अधःशाखेंत ( पायांत ) होतो. क्वचित् पोट, पाठ, हात,

मान, कुल्ले, वृषण, मांड्या वगैरे ठिकाणींही आढळतो. † **अरियोलर** त्वचा, हें ह्याचें वृद्धिस्थान होय.

हा शरीरांत शिरल्यापासून पुष्कळ महिनेपर्यंत कांहींएक उपद्रव केल्याशिवाय राहतो. परंतु सात आठ महिन्यांच्या सुमारास तो ज्या भागांत असतो, तेथें दाह उत्पन्न करून पुवळणास येतो, त्या वेळेस तो भाग सुजतो. ताप येतो, डोकें दुखतें, उह्मासे येतात व फारच अशक्तता येते, हीं लक्षणें असतात. ज्या भागांत तो असतो, तेथें तो दोरीप्रमाणें हातासही लागतो. बहुतकरून ज्या ठिकाणीं तो बाहेर पडावयाचा असतो, तेथें एक लहानसा काळा डाग पडतो; तेथें फुटून त्यांतून तो आपलें डोकें बाहेर काढितो.

**उपचारः**—डोकें बाहेर आलें असल्यास, तें चिमट्यांत धरून हळूच बाहेर ओढावें. डोकें बाहेर निघालें नसलें तर, जेथें तो दोरीप्रमाणें हातास लागतो, तेथें शाखेच्या समांतर रेषेंत सुमारें पावपासून अर्ध इंचपर्यंत छेद करून, त्यांतून चिमट्यानें हळूच बाहेर काढावा; आणि एका बारीक व गुळगुळीत काठीच्या तुकड्यास गुंडाळावा. त्याला वाळूं देऊं नये. गुंडाळलेल्या काडीवर दुधांत किंवा पाण्यांत गव्हाचें पीठ शिजवून ( पोटीस ) ऊन असतांना दुखऱ्या जाग्यावर बांधावें. असें केल्यानें नारू ओला राहून तो मरत नाहीं. हा क्रम कित्येक दिवसपर्यंत चालू ठेवावा; म्हणजे नारू मुळापासून पडतो. ओढतांना हा कधीं कधीं तुटतो, व तेथें बऱ्याच

---

† 'अरियोलर' किंवा 'संयोगी त्वचा' ही कातड्याच्या खालीं असून सर्व शरीर आच्छादिते. आणि हिच्या योगानें स्नायु, मज्जातंतु, वसा, व रक्तवाहिन्या, हे सर्व भाग आवळले जातात.

वेदना व दाह उत्पन्न होतात. ह्मणून नारवाचें तोंड बाहेर पडतांक्षणींच तें चांगलें रक्षण करावें. तो मरूं नये ह्मणून त्यावर आग होण्यासारखे पदार्थ लावूं नयेत. खोबरेल किंवा तूप लावून वर फडकें बांधावें, म्हणजे नारू आंत मरत नाहीं. हिंगाचा अर्क प्रत्येक वेळेस साठ थेंब प्रमाणानें, दिवसांतून तीन वेळां पाण्याबरोबर घ्यावा, म्हणजे कांहींएक अपाय न होतां, नारवाचा समूळ नाश होतो, असें डा० हार्टन यांचेंही मत आहे. कोणी नवसागराची पूड सुमारें अर्धे तोळा, भातांत किंवा खिचडींत तुपासह खावयास देतात, तेणेंकरूनही तो नाहींसा होतो. तसेंच आणखी अनुभवावरून, व मित्रांनीं सांगितलेले अनेक उपाय, अपकार करण्यासारखे नसल्यावरून, जरूरीच्या वेळेस, एक न सांपडला तर दुसरा असे योजण्यांत यावे, ह्मणून त्या सर्वांचा येथें समावेश केला आहे.—

( १ ) बारा ग्रेन हिंग विस्तवावर भाजून, दिवसांतून तीन वेळां खावयास द्यावा.

( २ ) हिंग व रिठ्यांतील मगज ऊन करून नारूवर बांधावा.

( ३ ) लसूण, साबण, हिंग, हीं समभाग एकत्र करून वर बांधावीं.

( ४ ) वेदना फार होत असल्यास चंदन घांसून, त्यांत कापूर व थोडीशी अफू मिळवून, त्याचा लेप त्यावर करावा.

( ५ ) साबण व शिकेकाई समभाग घेऊन पाण्यांत वाटून, नागवेलीच्या पानावर मलमाप्रमाणें पसरून, त्याची पट्टी

नारूवर बांधावी. असा क्रम कित्येक दिवसपर्यंत चालविला ह्मणजे नारू अगदीं जळून जातो.

(६) दोन तोळे पापडखार गुळांत मिळवून, तो सकाळच्याच प्रहरीं पोटांत ध्यावा, आणि दिवसभर अन्नपाण्याशिवाय रहावें, व रात्रीस फक्त दहींभात खावा, ह्मणजे दुसरे दिवशींच नारू नाहींसा होतो.

( ७ ) क्लोरोफार्म नामक औषध नारूवर लावावें, ह्मणजेही तो जळून जातो.

मागें सांगितलेल्या प्रदेशांत रहाणाऱ्या लोकांस ध्यानांत ठेवण्यासारख्या सूचना.—

एतद्देशीय लोकांस दलदलीच्या जाग्यांतून उघडें फिरण्याचें अगत्य असल्यामुळें त्यांच्या पायांच्या सच्छिद्रत्वचेंतून ह्या प्राण्याला प्रवेश करण्यास चांगली संधि सांपडते, ह्मणून अशा ठिकाणीं फिरणाऱ्या व रहिवाशी लोकांनीं आपले पाय सदोदित आच्छादित ठेवावे. स्नानादिविधि झाल्यास, अंग त्वरित कोरडें करावें व आच्छादून ठेवावें. ज्यांना ज्यांना नारू होतो, त्यांनीं आपल्या अंगांतून निघालेला नारू खोल पुरावा, किंवा जाळावा, भलतें ठिकाणीं टाकूं नये. याप्रमाणेंच नारवास बांधलेलीं, पट्या, पोटिसें, फडकीं, वगैरेंची व्यवस्था करावी. तेणेंकरून नारवाचीं पोरें मरून जाऊन, कालांतरानें नारवाचें बीज समूळ नाहींसें होण्याचा संभव आहे.

चैत्रवैशाखाच्या सुमारास खेड्यापाड्याच्या रहिवाशांत पाण्याची मोठी मारामारच असते. कोठें तरी लहानसहान पाण्याचीं डबकीं असतात, व त्यांतील पाणी स्वच्छ केल्याशि-

वाय सर्व लोक पिण्याच्या व इतर कामीं वापरतात. कित्येकांचें ह्मणणें आहे कीं, नारू हा प्राणी अन्नोदकाबरोबर शरिरांत नेला जातो, तथापि त्वचेच्या द्वारें जाण्याचा विशेष संभव आहे. कारण अन्य देशांतील लोकांनीं नारू होतात अशा ठिकाणीं पुष्कळ दिवसपर्यंत राहून तेथील अन्न अगर पाणी बिलकूल घेतलें नसतां त्यांना नारू झाल्याचीं उदाहरणें आहेत. ह्मणून पाणी वापरायाचें तें देखील पहिल्यानें साफ करून नंतर वापरावें.

पाणी, खालीं लिहिलेल्या रीतीनें साफ करावें. ही रीत फार उत्तम, सुलभ व सर्वांस अनुकूल अशी आहे.—

पाणी आणून कांहींवेळपर्यंत स्थिर राहील अशा ठिकाणीं ठेवावें. ह्मणजे सर्व गाळ तळीं बसतो व निवळ पाणी वर राहतें. तें दुसऱ्या भांड्यांत ओतून घ्यावें; किंवा मोठ्याशा भांड्यांत पाणी ऊन करावें व हलवावें ह्मणजे त्यांतील खडू, लोह, आणि प्राणिज व उद्भिज पदार्थ हे निराळे होऊन तळीं बसतात. नंतर असें करावें कीं, एका मडक्याच्या तळास दोन चार लहान लहान भोकें सुईनें किंवा दाभणानें पाडावीं, आणि मडक्यांत एक टीचभर वाळूचा थर घालावा. ही वाळू नदींतून किंवा ओढ्यांतून आणून पुष्कळ वेळ धुतल्यावर ती एका भांड्यांत घालून खूप तापवावी; ह्मणजे ती परिशोधिनींत घालण्याच्या उपयोगी पडते. या वाळवेच्या थरावर एक बारीक कोळशांचा ( प्राणिज कोळसा मिळाला तर चांगलेंच. ) थर अजमासें आठ बोटें जाड असा घालावा. त्यावर पुन्हां वाळूचा थर अजमासें चार बोटें जाडीचा घालावा आणि त्यावर वरचें पाणी घालावें. गाडगें—वाळू, कोळसे वगैरे जि-

नसांनीं भरलें तर पाणी रहाण्यास जागा नसते, सबब या गाडग्याच्या वरल्या बाजूस दुसरें एक रिकामें गाडगें टांगावें. त्यांत पाणी घालून त्याचे थेंब खालच्या गाडग्यांत हळूहळू पडण्याजोगें करावें. तिसरें एक गाडगें दुसऱ्या गाडग्याच्या खालीं ठेवावें ह्मणजे त्यांत शुद्ध केलेलें पाणी* साठविण्यास व त्यांतून लागेल तसें काढून घेण्यास ठीक पडतें. या व्यवस्थेंत पुष्कळ फेरफार करितां येतात. ते असे.—वाळवेच्या ऐवजीं कोणी बारीक खडे घालतात; किंवा तीन चार गाडगीं घेऊन एकांत खडे, एकांत कोळसे, व एकांत वाळू घालून त्यांतून पाणी झिरपूं देतात. कोणत्याही प्रकारची व्यवस्था केली, तरी चिंता नाहीं. त्यापासून पाण्यांतील परिमाणु व जंत्वादि पदार्थ, वाळवेच्या व कोळशांच्या मधून पाणी येत असतांना त्या वाळवेंत किंवा कोळशांत अडकून रहावेत, अशी तजवीज झाली ह्मणजे पुरे आहे. यांत कोळसे घालण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांच्या योगानें पाण्यांतील वायुरूपी दुष्ट पदार्थ आकर्षिले जातात. या मडक्यांतील वाळू अजमासें महिनाभर उपयोगिली असतां, तींत पाण्यांतील कण पुष्कळ साठून ती निरुपयोगी होते. तसें होऊं नये ह्मणून कोळसे व वाळू दर महिन्यास एक वेळ चांगली लाल होईतों तापवावी; ह्मणजे त्यांतील कसर जळून जाते आणि ती वाळू व कोळसे पुनः उपयोग करण्यास योग्य होतात. विलायतेंत तयार केलेलें फिल्टर, (परिशोधिनी) मुंबई, पुणें, वगैरे शहरांत विकत मिळतें; तें कोळशाचें, मातीचें किंवा धोंड्याचें

* हा प्रकार आगगाडींतून प्रवास करितांना कित्येक स्टेशनांवर पाहण्यांत येतो.

केलेलें असतें. या फिल्टरांपैकीं कोळशापासून केलेलें मात्र उत्तम असतें.

पाणी कढविल्यानें त्यांतील अणुरूप दुष्ट विषारी प्राणी असतात, ते उष्णतेच्या योगानें मरतात, व वायुरूपी विषारी पदार्थ, वाफेबरोबर निघून जातात. म्हणून अस्वच्छ पाणी, चांगलें तापवून, तें निवाल्यावर प्यालें असतां बाधत नाहीं.

कोणत्याही प्राण्याची किंवा वनस्पतीची घाण नाहीं, असें पाणी गढूळ असलें तरी पिण्यास हरकत नाहीं. अशा पाण्यास इतर पाण्यापेक्षां विशेष गोडी असतें. व त्यांतून कांहीं मातीचा अंश जरी पोटांत गेला तरी तो बाधत नाहीं. गढूळ पाणी स्वच्छ करणें झाल्यास त्यांत तुरटीची पूड घालावी, किंवा बदामाचें बीं उगाळून घातल्यानें त्यांतील चुना व व माती तळीं बसून तें पाणी स्वच्छ होतें. पण अशा रीतीनें स्वच्छ केलेल्या पाण्यांत सूक्ष्मरूपी जंतु नसतात, असें नाहीं. असें पाणी स्वच्छ केल्यानें, तें दिसण्यांत मात्र शुद्ध दिसतें.

देशावर–वांई, सातारा, कोल्हापूर, वगैरे ठिकाणीं, पाणी स्वच्छ करण्याकरितां "निवळी"चें बीं बारीक वाटून, तें किंचित् ओलें करून पाणी सांठवण्याच्या भांड्याला आंतले बाजूनें लावून ठेवतात; ह्मणजे पाणी स्वच्छ होतें. सुमारें ३० मण पाणी शुद्ध करण्यास २० गुंजा भुकी पुरी होते.

# जंत.

## INTESTINAL WORMS.

## ( आंतड्यांत राहणारे कृमि. )

जंत हा नारूच्या जातीचा एक प्राणी आहे. हा आंतड्यांत असतो व त्यांतीलच अन्नरस खाऊन निर्वाह करितो. त्यांत नर आणि मादी असे दोन प्रकार आहेत. जंतांचीं अंडीं मलाबरोबर बाहेर पडतात. तीं खाण्याच्या व पिण्याच्या पदार्थांत शिरून पुनः मनुष्याच्या पोटांत जातात. यांचा उपद्रव लहान मुलांपासून तों मोठ्या मनुष्यापर्यंत सारखाच होतो. मुलांना तर जंतांची विकृति वारंवार होतेच. मनुष्य जातीचे पाण्यांतून नेहमीं आढळणाऱ्या जंतांच्या मुख्य तीन जाती आहेत; त्या येणेंप्रमाणें:—

(१) दोऱ्यासारखे जंत, (२) गोलजंत व (३) चपटे किंवा फितीसारखे जंत.

---

# दोऱ्यासारखे जंत.

## THREAD WORM.

ह्याचे दोन प्रकार आहेत. पहिला सुमारें पाव इंच लांबीचा आणि दुसरा दीड इंच लांबीचा. हे दोन्हीही केवळ दोऱ्याप्रमाणें असतात. व ते मोठ्या आंतड्यांत आणि गुदाजवळील आंतड्याच्या भागांत असतात. हे बहुतकरून घाणेरड्या व अशक्त प्रकृतीच्या लहान मुलांना होतात. ते झाले ह्मणजे पोटांत कुरतुडल्यासारख्या किंवा चावल्यासारख्या वेदना होऊं लागतात. त्यांची संख्या अतिशय असल्यामुळें

नाकाला व गुदाला कंडू सुटते. हें लक्षण विशेषेंकरून लहान मुलांत पाहण्यांत येतें. त्यांना जंत झाले ह्मणजे तीं हे भाग नेहमीं खाजवीत असतात. वारंवार पाणी प्यावयास मागतात. शौचास पुष्कळ वेळां होतें, किंवा बिलकुल: होत नाहीं. शौच तांबूस पांढऱ्या रंगाचें असतें, आणि त्यांत जंतांच्या लोंढीच्या लोंढी पडतात. त्या फक्त उजेडांत बारकाईनें पाहिलें असतां दृष्टीस पडतात. पण शौच होऊन बराच वेळ गेल्यावर तें पाहूं गेलें असतां त्यांत कांहींच दिसत नाहीं. कारण तितक्या अवकाशांत ते प्राणी मरण पावतात. कधीं कधीं वांती होते; व पोट फुगून ढोलासारखें होतें. मूल उपडें निजतें व झोंपेंत दांत चावतें, व दचकून उठतें किंवा किंकाळ्या फोडतें. कित्येक प्रसंगीं ह्या लक्षणां-बरोबर थोडाबहुत तापही असतो.

**उपचारः**—जंत झाले ह्मणजे ते काढून टाकिले पा-हिजेत ह्मणून, दोन ड्राम सार्धे किंवा विलायती मीठ, ( सल-फेट ऑफ् म्यागनीशिया ) दोन औंस माफक ऊन पाण्यांत मिश्र करून, त्याचा बस्ती (एनीमा या. नं. ८) सांजसकाळ गुदांत मारावा. किंवा इन्फ्यूजन क्वाशिया १० औंस, टिंक्चर फेराय (लोहअर्क) अर्धा ड्राम, असें एकत्र करून त्याच्या पिचकाऱ्या माराव्या. ह्मणजे जंतांच्या लोंढीच्या लोंढी कोस-ळून पडतात. पिचकारी मारतांच ती बाहेर निघतेशी वाट-ल्यास फडक्याची गुडदी करून ती गुदाशीं दाबून ठेवावी; ह्मणजे पिचकारीचें कार्य बरोबर होतें. पिचकारी मारण्यास धैर्य होत नसलें, तर वय [ ५–६ वर्षांच्या वयास ] पाहून २ पासून ४ ग्रेनपर्यंत क्यालोमेल आणि ५ ग्रेन ज्यालप हीं

एकत्र करून तीं साखरेच्या पाकांत किंवा मधांत चाटवावीं. शौच्यास फारच होत असल्यास डाळिंबाची साल किंवा मुळ्या १ तोळा, पाणी १६ तोळे, अशीं एके ठिकाणीं उकडून काढा ८ तोळे बाकी राहिला ह्मणजे तो गाळून, दिवसांतून थोडा थोडा तीन चार वेळ प्यावयास द्यावा. तेणेंकरून शौच्यास जाण्याचें बंद होऊन कृमिही पडतात. किंवा किरमानी ओंवा १ तोळा, वायवरणा १ तोळा, साखर ३ तोळे, हीं एकत्र वाटून मोठ्या वयाच्या मनुष्यास, दोनपासून तीन ड्रामपर्यंत आणि लहान मुलास ( सहा वर्षांच्या आंतील ) पांचपासून सहा ग्रेन इतकें दिवसांतून तीन चार वेळ खावयास द्यावें. अलीकडे बऱ्याच दिवसांपासून एक औषध निघालें आहे, त्यांत कृमिघ्नत्वाचा जबरदस्त गुण असून, रेचकाचाही धर्म आहे. हें औषध "सान्टोनिन" होय. ह्याचा उपयोग हल्लीं लोक फार करूं लागले आहेत. ह्या औषधाचे साखरेशीं केलेले मोदक विकत मिळतात व लहान मुलें ते आवडीनें खातात. नाडीजंतूंत ह्या औषधाचा उपयोग करितात, तरी तें घेण्याचा क्रम गोलकृमीच्या चिकित्सेंत सांगितला आहे. गरुडनिंबाची पांढरी साल अजमासें ३ तोळे घेऊन, बारीक वाटावी व ती पूड घोंटभर थंड पाण्यांत पाव तास भिजत टाकावी. भिजल्यानंतर पूड टाकून देऊन पाणी गाळून घ्यावें. नंतर तें पाणी तसेंच किंवा ताकाशीं प्यावें. ह्या औषधानें सान्टोनिनप्रमाणेंच जंत पडतात.

सागरगोटे, वावडिंग, सुंठ मिरी, पिंपळी, डाळिंबाची साल, बेलफळ, नागरमोथे हीं सर्व एकेक तोळा आणि ~~खुरासनी~~

किरमानी

ओंवा अर्धा तोळा, अशीं अर्धा शेर पाण्यांत उकळून काढा पावशेर बाकी राहिला ह्मणजे गाळून तो १ औंसप्रमाणें सकाळ संध्याकाळ पाजावा, ह्मणजे कृमींचा नाश होईल, किंवा फरसपापडा ( २-४ वर्षांचे मुलास ) पावपासून अर्धा मासापर्यंत पाण्यांत उगाळून पाजावा, ह्मणजेही जंतांचा नाश होतो.

वर सांगितलेले उपाय बहुतकरून सर्व प्रकारचे जंतूंवर उपयोगी पडतात.

---

## गोल जंत.

### ROUND WORM.

ह्या जातीचे जंत गोल असून फिकट पिवळ्या रंगाचे असतात. त्यांची लांबी सुमारें अर्ध्या फुटापासून तों एक फुटापर्यंत असते. हे लहान आंतड्यांत असतात. आपल्या लोकांत हे फार पाहण्यांत येतात.

**लक्षणें:**—पोटांत मुरड्यासारखी किंवा चावल्यासारखी वेदना होते. व ती विशेषेंकरून बेंबीजवळ होते. अस्वस्थता, पोट फुगलेलें, भूक अगदीं लागत नाहीं, किंवा अतिशय खायखाय सुटते, श्वासाला गंध सुटतो, जिव्हा मलानें लिप्त आणि लालभडक असते, लघवीच्या द्वाराला खाज सुटते, उह्मासे येतात, किंवा वांती सुरू होते, तोंडाला वारंवार पाणी सुटतें, शौच्यास साफ होत नाहीं किंवा जुलाब होत असतात. एखादे वेळीं हा प्रकार क्रमाक्रमानें होऊं लागतो; ह्मणजे कांहीं वेळपर्यंत ढाळ व्हावे नंतर पोट फुगावें, आणि बिलकुल

शौच्य होऊं नये याप्रमाणें होतें; तहान फार लागते, ग्लानि येते, लहान मुलें झोंपेंत दांत चावतात, ओरडतात किंवा दचकून उठतात.

**उपचारः**—केटिंग्स अंथलमेंटीक बॉन नामक सान्टोनिन औषधाचे तयार केलेले मोदक, बाजारांत इंग्रजी औषधें विकणारांच्या दुकानीं मिळतात, ते वयाच्या मानानें सुमारें एक चतुर्थांशपासून तों सबंद मोदकापर्यंत ( २ पासून ६ वर्षांच्या वयास ) खावयाला द्यावे, व दुसऱ्या दिवशीं २–४ चहाचे चमचे भरून एरंडेल पाजावें, ह्मणजे जंत पडतात. ढाळ होत आहेत तर सान्टोनिन २–४ ग्रेन आणि साखर १० ग्रेन एकत्र करून तें सतत तीनचार दिवस द्यावें. उलटी आणि जुलाब हीं दोन्ही होत असल्यास बिसमथसबनैट्रस १० ग्रेन, सोडा-बायकार्बोनस १० ग्रेन, सांन्टोनिन ३ ग्रेन, लैकरमारफिया ६ थेंब, गोंदाचें पाणी २ ड्राम, पेपरमिठाचें पाणी १ औंस, हीं एकत्र करून ह्यांतील १ लहान चमचा भरून, दिवसांतून तीन चार वेळ पाजावें, किंवा ४९ पृष्टांत सांगितलेला काढा द्यावा. (२ वर्षांच्या वयाकरितां) रोग्याला पेजेसारखें हलकें अन्न देत असावें. पेजेची उलटी होऊं लागली तर, तींत ५।१० थेंब चुन्याची निवळ किंवा बर्फाचा तुकडा टाकून पाजावी. शौच्यास साफ होत नसल्यास सोडा–बायकार्बोनस १२ ग्रेन, र्‍हुबार्बपावडर १२ ग्रेन, सांटोनिन ३ ग्रेन, क्यालोमेल ३ ग्रेन, सुंठीची भुकणी ६ ग्रेन, हीं सर्व एकत्र करून त्याच्या चार पुड्या कराव्या व दिवसांतून दोन पुड्या साखरेच्या पाकाबरोबर मिळवून सकाळ संध्याकाळ देत असावें. किंवा सान्टोनिन ६ ग्रेन, एरंडेल १

औंस, साखरेचा पाक अर्धा औंस, पेपरमिठाचें पाणी १ औंस अशीं एकत्र मिसळून त्यांतील २ लहान चमचे भरून प्रत्येक तासातासानें शौच्यास साफ पातळ होईपर्यंत द्यावें. जंत पडल्यावर साधारण पौष्टिक आणि रोचक औषधें द्यावीं. जसें इन्फ्यूजनक्काशिया, औंस, टिंक्चर ऑफ आयर्न [ लोहार्क ] ९ थेंब एकत्र करून ते दिवसांतून ३ वेळ प्रमाणें कांहीं दिवस चालू ठेवावें. किंवा किराइताचा फांट ( यादी नं. १२ ) द्यावा. आपल्या देशांत जंतांवर दुसरें एक औषध देतात तें "कुयल्याचा तूस". त्याचे गुण बहुतेक सान्टोनिनच्या जवळ जवळ आहेत. हें पांच वर्षांच्या वयास शक्ति पाहून गुंज इतकें अर्धे गुंज गुळांत मिळवून खावयास देतात, व दुसरे दिवशीं जरूर असल्यास २ चहाचे चमचे भरून एरंडेल पाजतात.

कुयल्याचा तूस किंवा त्यावरील बारीक लव, हीं काढतेवेळेस फार जपून काढिलीं पाहिजेत. कारण त्यांना इतकी जबर खाज असते कीं, त्यांचा स्पर्श होतांच अतिशय खाज सुटून मनुष्य थैथै नाचूं लागतो.

---

## चपटे जंत.

### TAPE WORM.

हे जंत फितीसारखे चापट आणि लांब असतात. हे बहुतकरून युरोपियन, पारशी आणि खिश्चियन या जातींत पाहण्यांत येतात. हे लहान आंतड्यांत असतात. क्वचित् मोठ्या आंतड्यांत किंवा पक्वाशयांत शिरतात. ह्यांची संख्या एक व कधीं कधीं दोन, अशी असते. यांची लांबी पांच पासून १५ वार, आणि जाडी एक अष्टमांश इंच असते.

शौच्य होऊं नये याप्रमाणें होतें; तहान फार लागते, ग्लानि येते, लहान मुलें झोंपेंत दांत चावतात, ओरडतात किंवा दचकून उठतात.

**उपचारः**--केटिंग्स अंथलमेंटीक बॉन नामक सान्टोनिन औषधाचे तयार केलेले मोदक, बाजारांत इंग्रजी औषधें विकणारांच्या दुकानीं मिळतात, ते वयाच्या मानानें सुमारें एक चतुर्थांशपासून तों सबंद मोदकापर्यंत ( २ पासून ६ वर्षांच्या वयास ) खावयाला द्यावे, व दुसऱ्या दिवशीं २-४ चहाचे चमचे भरून एरंडेल पाजावें, ह्मणजे जंत पडतात. ढाळ होत आहेत तर सान्टोनिन २-४ ग्रेन आणि साखर १० ग्रेन एकत्र करून तें सतत तीनचार दिवस द्यावें. उलटी आणि जुलाब हीं दोन्ही होत असल्यास बिसमथसबनैट्रस १० ग्रेन, सोडा-बायकार्बोनस १० ग्रेन, सांन्टोनिन ३ ग्रेन, लैकरमारफिया ६ थेंब, गोंदाचें पाणी २ ड्राम, पेपरमिंठाचें पाणी १ औंस, हीं एकत्र करून ह्यांतील १ लहान चमचा भरून, दिवसांतून तीन चार वेळ पाजावें, किंवा ४५ पृष्टांत सांगितलेला काढा द्यावा. (२ वर्षांच्या वयाकरितां) रोग्याला पेजेसारखें हलकें अन्न देत असावें. पेजेची उलटी होऊं लागली तर, तींत ५।१० थेंब चुन्याची निवळ किंवा बर्फाचा तुकडा टाकून पाजावी. शौच्यास साफ होत नसल्यास सोडा-बायकार्बोनस १२ ग्रेन, ऱ्हुबार्बपावडर १२ ग्रेन, सांटोनिन ३ ग्रेन, क्यालोमेल ३ ग्रेन, सुंठीची भुकणी ६ ग्रेन, हीं सर्व एकत्र करून त्याच्या चार पुड्या कराव्या व दिवसांतून दोन पुड्या साखरेच्या पाकाबरोबर मिळवून सकाळ संध्याकाळ देत असावें. किंवा सान्टोनिन ६ ग्रेन, एरंडेल १

औंस, साखरेचा पाक अर्धा औंस, पेपरमिंटाचें पाणी १ औंस अशीं एकत्र मिसळून त्यांतील २ लहान चमचे भरून प्रत्येक तासातासानें शौच्यास साफ पातळ होईपर्यंत द्यावें. जंत पडल्यावर साधारण पौष्टिक आणि रोचक औषधें द्यावीं. जसें इन्फ्यूजनक्काशिया, औंस, टिंक्चर ऑफ आयर्न [ लोहार्क ] ९ थेंब एकत्र करून ते दिवसांतून ३ वेळ प्रमाणें कांहीं दिवस चालू ठेवावें. किंवा किराइताचा फांट (यादी नं. १२) द्यावा. आपल्या देशांत जंतांवर दुसरें एक औषध देतात तें "कुयल्याचा तूस". त्याचे गुण बहुतेक सान्टोनिनच्या जवळ जवळ आहेत. हें पांच वर्षांच्या वयास शक्ति पाहून गुंज इतकें अर्धे गुंज गुळांत मिळवून खाण्यास देतात, व दुसरे दिवशीं जरूर असल्यास २ चहाचे चमचे भरून एरंडेल पाजतात.

कुयल्याचा तूस किंवा त्यावरील बारीक लव, हीं काढतेवेळेस फार जपून काढिलीं पाहिजेत. कारण त्यांना इतकी जबर खाज असते कीं, त्यांचा स्पर्श होतांच अतिशय खाज सुटून मनुष्य थैथै नाचूं लागतो.

---

## चपटे जंत.

### TAPE WORM.

हे जंत फितीसारखे चापट आणि लांब असतात. हे बहुतकरून युरोपियन, पारशी आणि ख्रिश्चियन या जातींत पाहण्यांत येतात. हे लहान आंतड्यांत असतात. क्वचित् मोठ्या आंतड्यांत किंवा पक्काशयांत शिरतात. ह्यांची संख्या एक व कधीं कधीं दोन, अशी असते. यांची लांबी पांच पासून १५ वार, आणि जाडी एक अष्टमांश इंच असते.

**लक्षणें:**—बहुतेक गोल जंतांप्रमाणेंच असतात.

**उपचार:**—रोग्याला सर्व दिवसभर दूध, दुधाची कांजी, किंवा मांसाहारी असेल तर त्यास नुसत्या मांसरसावर ठेवावें. नंतर संध्याकाळीं एरंडेल तेलाचा जुलाब द्यावा. (यादी नं ७). आणि दुसरें दिवशीं सकाळीं चांगला जुलाब, झाल्यावर (बहुतकरून होतोच) लिक्वीड एकस्ट्राक्ट ऑफ् मेलफर्न १ ड्राम, टिंक्चर कमीला १ ड्राम, साखरेचें सरबत अर्धा औंस, दालचिनीचें पाणी १ औंस, असें एकत्र करून प्यावयास द्यावें. हा क्रम आठवड्यांतून दोन तीन वेळ करावा; व शौच्य साफ होत नसेल तर, एरंडेल तेल देत जावें; ह्मणजे हटकून फायदा होतो. नाहींतर टरपेन-टाईन तेल तीन ड्राम, टिंक्चर-हायओसीयामस अर्धा ड्राम, गोंदाचें पाणी (म्युसिलेज) १ औंस, पाणी १ औंस, एकत्र करून प्यावयास द्यावें. आणि चार तासांनीं एरंडेल तेलाचा जुलाब द्यावा. ह्याप्रमाणें तीन चार दिवस केल्यानें चापट जंत मुळापासून नाहींसा होतो. किंवा कमीलाचें चूर्ण २।३ ड्राम मधांत कालवून तें चाटवावें; ह्मणजे शौच्यही साफ होऊन जंत पडतो. नच पडला तर आणखी एक आठवड्यानें पुन्हां द्यावें. एवढ्यानेंही काम झालें नाहीं तर, वर सांगितलेले दुसरे उपाय योजावे. किंवा वावडिंगाचें चूर्ण १।२ तोळे दह्यांत कालवून खावयास द्यावें, व दिवसभर रोग्यास उपाशीं ठेवावें; ह्मणजे जंत पडतात.

हे अन्योपजीवी, ( एकंदर जंत जाती ) इतके उत्पन्न होतात कीं, त्यापासून फार पीडा होते इतकेंच नाहीं, परंतु

ते मोठ्या भयंकर आणि असंभाव्य रोगाचें स्वरूप घेऊन येतात, तेणेंकरून चिकित्सक मोठ्या घोंटाळ्यांत पडतात.

## जंतांपासून जे अनेक गौणविकार उत्पन्न होतात ते:-

लहान मुलांत आंकडी, (कन्व्हल्शन्स) फेंपरें अथवा कोणी त्याला घुरें ह्मणतात, शिवाय कधीं कधीं पंगुत्वही येतें. प्रौढा पोटशूळ, मस्तकशूळ, मनोग्लानि, अपचन, स्नायूची दृष्टिमांद्य आणि स्त्रियांत या दोहोंपैकीं लक्षणें होऊन न्माद (हिस्टीरिकल फिट्स) रक्तप्रदर. हीं ह्याबरोबर कृमीचीं दुसरीं लक्षणें असलीं, आ औषधें दिलीं ह्मणजे हे विकार आपोआप यावरून संशय फिटतो.

जंतोत्पत्तीचें मुख्य कारण, कच्चें अ अधेवट वलेलें मांस खाण्यांत येणें हेंच होय. आपल्या देशांत ना जंत, (Thread-worm) मुख्यत्वेंकरून युरोपियन, पारशी, मुसलमान आणि जे हिंदु मांस भक्षण करितात, त्यांत आढळतात. जे मांस खात नाहींत, त्यांत आढळले तर फारच ळा आढळतात. ख्रिश्चियन लोकांत तर हे फारच साधारण आहेत ह्मट चालेल. विशेषतः आफ्रिकेसारख्या ज्या देशांत कच्चें तात आहे तेथें नाडीजंत अनि साधारण आहे खाण्यां

मेंढा आदिकरून चें मांस आणि मुख्यत डुकराचें मांस, शिजविल्याशिवाय किंवा अर्धे कच्चें खे

आल्यानें, त्याबरोबर जंतांचीं अंडीं मनुष्यांच्या आंतड्यांत जातात; तेथें गेल्यावर त्यांचा पूर्ण आविर्भाव होऊन जंत बनतात. जात्या डुकर हा प्राणी किती गलिच्छ आहे, हें सर्वांस माहीत असेलच. त्याला नर्क, पुष्कळ दिवसांचें सांठलेलें घाणेरडें पाणी, उकिरड्यावरील सडलेल्या वस्तू मोठ्या भक्तीनें आवडतात; व तेथें तो आपला सर्व काळ घालविण्यास फार खुषी असतो. अशा ठिकाणांतून जंतांचीं ससत्व ह्या प्राण्याच्या द्वारें मनुष्याच्या शरीरांत नेलीं जातात. ...ल्या खाण्याच्या कच्च्या (न शिजविलेल्या) भाजी-...फळावळींतूनही तीं जातात.—पेरू, खजूर, मुळे, ...; कांदे, कोथिंबीर, वाळकें, कांकडी, दोडके, ...दार्थ जमिनीसरसे असतात. त्या जमिनींत ...ड्यास, किंवा घाण पाणी त्या ठिकाणीं ... खतांतील किंवा पाण्यांतील जंतांचीं ...असल्यास ...त्यांस चिकटतात. जंतादि जे नीच ..., भाज्यांस व फ... अंडीं कित्येक महिनेपर्यंत न ...गांतले प्राणी आहेत त्यांचीं ...लीं राहूं शकतात. व ...नासतां मातींत वगैरे मिसळून सुकल... ह्मणजे, पा-पावसाळ्यांत पाण्याच्यायोगानें माती धुतली वगैरेंत ...ण्याच्या प्रवाहाबरोबर तीं तळीं, ओढे, विहिरी ... जातात. जंतांचीं अंडीं मनुष्याच्या ...त गेल्याशिवाय त्यांचीं पोरें होऊन वाढीस ... ...ळ्यांतून काढून ...ल्या भाज्या बाजारांत ... ...यापूर्वी, त्या ...वाळूं नयेत व त्यांस माती ...लेली असते ती जावी या हेतूनें पाण्यांत बुडून काढण्याची माळी ...ची चाल आहे. ह्या भाज्या किंवा फळें, उत्तम पाण्यांत

धुऊन काढल्यास फार चांगलें; परंतु माळी लोकांची अशी एक दुष्ट चाल आहे कीं, भाजी धुण्यास कसलें पाणी असावें ह्याचा ते मुळींच विचार करीत नाहींत. गांवाच्या शेजारीं कितीही घाणेऱ्या पाण्याचें डबकें असलें तरी त्यांत ते भाज्या धुतात. मुंबईंत गटारांतील पाणी, भाज्या धुण्याचे कामीं घेतांना नेहमीं पाहण्यांत येतें. अशा धुण्यानें भाज्यांतील घाण न जातां पाण्यांतील अधिक घाण त्यांस लागते. अशा प्रकारें जंतांचीं अंडीं आपल्या पोटांत जातात. जंतांचीं अंडीं खाण्याच्या पदार्थांत येण्याचा आणखी एक प्रकार आहे, तो असा कीं, हवेमध्यें जे अनेक प्रकारचे कण सदोदित तरंगतात, त्यामध्यें वाळलेल्या मळाचे परमाणूंत वाळलेल्या जंतांचीं अंडींही तरंगत असतात; तीं हवेंतून अन्नपाण्यांत मिसळतात. दुकानांतून प्रत्येक खाण्याचा जिन्नस (गूळ, तूप, साखर, खजूर, मिठाई, तेल, इत्यादि) उघडा असतो, त्यांवर हवेंतील जंतांचीं अंडीं कचऱ्याबरोबर येऊन चिकटतात.

कित्येकांची समजूत अशी आहे कीं, मनुष्यांच्या कंबरेसभोंवतीं जंतांचा एक दोर आहे, जंतांस गोड पदार्थांची आवड फार असल्यामुळें ते गोड खाणारास उपद्रव करितात, जंत पाडवूं नयेत, पाडविल्यास कमरेची बळकटी कमी होते; हा सर्व समज खोटा आहे. गूळ, साखरेवर तर लोकांचा मोठाच आळ आहे. परंतु स्वच्छ झांकलेली साखर किंवा गुळ खाल्ल्यापासून कधींही जंत होणार नाहींत. लहान मुलांना गोड पदार्थ खाण्याची फार चटक असते. दुकानांतले गोड पदार्थ उघडे आणि मलीन असले तरी तीं ते खातात. ह्मणून त्यांना जंतांचा उपद्रव वारंवार होतो. मुलांना जंत

होण्याचें आणखी एक कारण आहे तें असें कीं, तीं लहान असतां त्यांना अंगावरचें दूध पुरें पडत नाहीं; ह्मणून त्यांना गाईचें, बकरीचें किंवा गाढवीचें दूध पाजावें लागतें. दूध काढतेवेळेस या जनावरांचे सड वगैरे भाग कदाचित् अस्वच्छ असल्यामुळें दुधांत जंतांचीं अंडीं मिसळलीं जाऊन तें दूध पिण्यांत आल्यानें जंत उत्पन्न होतात.

## कर्णरोग.

## DISEASES OF THE EAR.

### कानांतील मळ.

### EAR WAX.

फार दिवस कानांतील मळ न काढल्यास त्याचा एक लांब व कठीण गोळा किंवा लहान लहान गोळ्या होतात. त्यामुळें कांहींसें कमी ऐकूं येतें व कानांत दडे बसतात.

**उपचारः**—तेल किंवा ग्लिसरीनचे थेंब कानांत सोडावे, आणि मळ नरम झाला ह्मणजे तो हळूच कानकोरण्यानें किंवा ऊन पाण्याची अथवा साबूचे पाण्याची पिचकारी मारून बाहेर काढावा.

### कर्णार्श अथवा कानांतील मस.

हे दोन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारचा मस कर्ण-नळाच्या मध्यभागीं उत्पन्न होतो. यास देंठ असतो. यापासून स्राव होत नाहीं व वेदनाही होत नाहीं. यापासून रोगी कांहींसा बहिरा होतो. दुसऱ्या प्रकारचे मस वाटाण्याएवढे किंवा त्याहून मोठे व कुसुंबी रंगाचे असतात. हे कर्णनळाच्या

मूलस्थानीं उत्पन्न होतात. त्यापासून पू वाहतो. कधीं कधीं हे वाढत जाऊन कर्णछिद्राच्याही बाहेर येतात.

**उपचार:**—ह्या मसावर तुरटीचें पाणी किंवा ल्यूनरकास्टीक चोळावें ह्मणजे ते झरून जातात. कास्टीक झोंबूं लागल्यास थोडे तेलाचे थेंब सोडावे. अशा रीतीनें ते जात नसले तर चिमट्यानें धरून पिळवटून काढावे. आणि उपटून काढल्यानंतर त्याजागीं थोडेंसें ल्यूनरकास्टीक लावावें ह्मणजे रक्तस्राव बंद होऊन त्यांची वाढ खुंटते.

---

## कर्णशूल.

EAR—ACHE

कान दुखूं लागतो तो बहुधा किडलेल्या दांतांच्या क्षोभापासून किंवा थंड हवा अथवा पाणी कानांत गेल्यानें, किंवा कानांत काड्या, कानकोरणीं बोंचल्यानें दुखूं लागतो.

हा विकार मज्जातंतुगत असतो, तेव्हां कानांत एकाएकीं वेदना होऊं लागतात व त्या राहून राहून कमजास्त होतात, व रात्रीं तर फारच तीव्र होतात. ही स्थिति अशीच राहूं दिल्यानें तीन चार दिवसांनीं कानांत थोडासा दाहही उद्भवतो. ज्या बाजूचा कान दुखत असतो त्या बाजूचें मस्तकही दुखूं लागतें. झोंप येत नाहीं व त्याबरोबर थोडा बहुत आंगांत तापही असतो. आणि शौचास साफ होत नाहीं.

**उपचार:**—दांत कुजला असल्यास उपटून काढावा किंवा दंतप्रकरणांत सांगितलेले उपाय करावे. टिंक्चर बेलाडोना चमच्यांत किंचित् ऊन करून त्याचे दोन तीन

थेंब घडोघडीं कानांत सोडावे आणि वर कापसाचा बोळा बसवावा. कानास शेक द्यावा, वारा लागूं देऊं नये व ऊन पाण्याच्या पिचकाऱ्या कानांत माराव्या. शेवग्याचीं फुलें एक तोळा, गोडें तेल दोन तोळे, हीं एकत्र उकळून गाळून ठेवावीं. नंतर जरुरीच्यावेळीं किंचित् ऊन करून त्याचे थेंब कानांत सोडावे. ह्या तेलाचे योगानें कानांत पू वाहणेंही बंद होतें. किंवा कांसाळवाच्या देंठांचा रस ऊन करून त्याचे, कोलनवाटर ऊन करून त्याचे, लसूण सोलून त्याच्या एक-दोन पांकळ्या गोडे तेलांत ऊन करून त्याचे किंवा हिंगणाचें पाणी ऊन करून त्याचे अथवा रुईचें पिकें पान घेऊन, त्याला तुपाचा हात लावून अग्नीवर तापवावें, व तें पिळून त्याच्या सुखोष्ण रसाचे, थेंब कानांत घालावे ह्मणजे कान दुखणें बंद होईल. वेदना कानाबाहेर पसरल्या असल्यास कानासभोंवतीं लिनिमेंटआयओडीन लावावें किंवा बिम्बा सारवावा. ह्या उपायांनीं वेदना कमी न होतील तर कानासभोंवतीं १ इंच रुंदीचें ब्लिस्टर मारावें. रात्रीं झोंप येत नसल्यास पोट्याश ब्रोमाईड १५ ग्रेन, हैड्रेट क्लोरल २० ग्रेन, सरबत अर्धा औंस, पाणी १ औंस असें मिश्रण करून तें निजतेवेळीं घ्यावें. शौचास साफ होत नसल्यास जुलाब घ्यावा. (यादी नं. ११). आंबट थंड पदार्थ खाण्याचे बंद करावे ह्मणजे कसाही शूळ असला तरी तो एक दोन दिवसांत अगदीं बंद होतो.

# कर्णस्राव.

## OTORRHŒA.

या विकारांत कानांतून दुर्गंधयुक्त पू वहातो. हा विकार कर्णनळाच्या दाहापासून, किंवा कर्णास्थिविकारापासून उद्भवतो. तसेंच कित्येक लोक कानांतील मळ काढावा ह्मणून त्यांत काड्या, कानकोरणी वगैरे अणीदार वस्तू घालून कानांत जखमा करितात. त्यांपासून कानांतून पू वाहूं लागतो. हा विकार गंडमालाजनक प्रकृतीच्या मुलांस बहुधा आपोआप होतो. त्यावेळीं त्या मुलांचे मानेवरील गांठींही सुजलेल्या असतात. मूल मोठें होऊं लागलें ह्मणजे प्रकृति सुधारून पूस्राव कधीं कधीं आपोआप बंद होतो.

**उपचारः**—कान दररोज एक दोन वेळां (पू वाहण्याचे मानानें) ऊन पाण्यानें, किंवा साबूचे पाण्यानें, किंवा त्रिफळ्याचे काढ्यानें, किंवा जस्ताचें फूल पाव तोळा, ऊन पाणी पावशेर, अशीं एकत्र करून त्या मिश्रणाच्या पिचकाऱ्यांनीं साफ धुवावा. नंतर मलमलीच्या कपड्याची वात करून तिनें कान कोरडा करावा. (पिचकारी मारणें ती हळू बेतानें मारली पाहिजे, नाहींतर कानाचे पडद्याला इजा होईल.) नंतर त्यांत तुरटीची लाही करून तिची भुकणी सोडावी, किंवा शेवग्याच्या फुलांचें तेल सोडावें किंवा ग्लिसरीन १ ड्राम, टॅनिक आसीड १० ग्रेन, आक्साईड ऑफ झिंक १० ग्रेन, आणि लाडेनमचे ३० थेंब अशीं एकत्र करून त्याचे सकाळ संध्याकाळ दोन दोन थेंब सोडावे. किंवा समुद्रफेनाचें चूर्ण कानांत घालावें ह्मणजे पूस्राव बंद होतो.

विकार गंडमालाजनक असल्यास गंडमालेचे उपचार करावे; आणि वर सांगितल्याप्रमाणें कान साफ करून त्यांत औषधें घालीत असावें. त्यानें पू वाहणें बंद न होईल तर काना पाठीमागें १ इंच रुंदीचें ब्लिस्टर मारावें ह्मणजे पू वाहणें बंद होईल.

---

## कानांत जीवजंतु अथवा दुसऱ्या कांहीं वस्तू जातात त्याविषयीं.

कधीं कधीं डांस (मच्छर), माशा, मुंग्या, वगैरे प्राणी साहजिक कानांत जातात. त्यामुळें कानांत भुळभुळाट सुरू होतो व अगदीं चैन पडेनासें होतें. तेव्हां त्यास कोलनवाटर, लॉडेनम किंवा किंचित् तेल ऊन करून त्याचे दोन तीन थेंब कानांत सोडावे; नंतर पिचकाऱ्या माराव्या, ह्मणजे पाण्याचे ओघाबरोबर तीं सर्व बाहेर पडतात. मुलें खेळतांना गुंज, धान्याचे दाणे, पेनसलीचे तुकडे, मणि, वगैरे पदार्थ कानांत शिरवितात. हे पदार्थ फार वेळ कानांत राहिले असतां तेथें दाह उत्पन्न होतो, व कान ठणकूं लागतो, ह्मणून ते लवकर बाहेर काढिले पाहिजेत. पदार्थ बाहेर काढण्यापूर्वी तो खचीत कानांत आहे हें कर्णदर्शक (ईअरस्कोप) यंत्रानें पहावें, नंतर तो काढण्याचा प्रयत्न करावा. पदार्थ पुढेंच असल्यास तो हळूच चिमट्यांत धरून बाहेर काढावा, किंवा ऊन पाण्याची पिचकारी मारावी, ह्मणजे पाण्याचे ओघाबरोबर तो पदार्थ बाहेर पडतो; किंवा ज्या बाजूचे कानांत पदार्थ शिरला आहे ती बाजू खालीं करून तिच्या विरुद्ध बाजूचें कानशील थापटावें ह्मणजे

पदार्थ बाहेर पडतो. किंवा स्कूप ह्मणजे कानकोरण्याच्या आकृतीचें एक शस्त्र अहे. परंतु तें कान कोरण्यापेक्षां लांब व सरळ असून ह्याचा खोलगट भाग किंचित् लांबट व रुंद असतो, तो हळूच त्या पदार्थामागें दडवून त्यानें तो पदार्थ ओढून घ्यावा. पदार्थ न निघेल तर तो तसाच राहूं द्यावा. ह्मणजे कांहीं दिवसांनीं तो धान्य असल्यास ओला-व्यानें फुगून सडतो, आणि त्याचे तुकडे होऊन पि-चकारीचे पाण्याबरोबर किंवा त्या ठिकाणीं पू होऊन त्या-बरोबर बाहेर पडतात. इतर पदार्थही त्या ठिकाणीं पू उत्पन्न करून त्याबरोबर वाहून येतात. न आले तर ऊन पाण्याच्या पिचकाऱ्या माराव्या ह्मणजे त्याबरोबर खचित वाहून येतात. कान ठणकत असल्यास अफूच्या बोंडाच्या काढ्यांनीं शेकावा. किंवा त्यावर पिकवणें ( पोटीस ) बांधावें. पू वाहत अस-ल्यास कर्णपूस्रावांत सांगितलेले उपाय योजावे.

## कंडू रोग.

URTICARIA.

हा रोग तर ह्याचे नांवावरूनच ओळखावयासारखा आहे. तथापि गांधील माशा चावल्याप्रमाणें किंवा अंगास कुहिली लागल्यानें जशी अंगास अतिशय खाज सुटून गांधी उठ-तात, तद्वत् ह्या रोगांत अंगास आतिशय खाज सुटून गांधी उठतात. ह्या गांधी किंचित् उंच असून कधीं कधीं आसपा-सच्या भागापेक्षां लाल किंवा फिकट असतात, आणि त्यांत खाज व मिरमीर ही फार असते. ह्याबरोबर कधीं कधीं बराच ज्वर असतो. जेव्हां हा विकार तीव्र असतो, तेव्हां हृदय

विकार गंडमालाजनक असल्यास गंडमालेचे उपचार करावे; आणि वर सांगितल्याप्रमाणें कान साफ करून त्यांत औषधें घालीत असावें. त्यानें पू वाहणें बंद न होईल तर काना पाठीमागें १ इंच रुंदीचें ब्लिस्टर मारावें ह्मणजे पू वाहणें बंद होईल.

---

## कानांत जीवजंतु अथवा दुसऱ्या कांहीं वस्तू जातात त्याविषयीं.

कधीं कधीं डांस (मच्छर), माशा, मुंग्या, वगैरे प्राणी साहजिक कानांत जातात. त्यामुळें कानांत भुळभुळाट सुरू होतो व अगदीं चैन पडेनासें होतें. तेव्हां त्यास कोलनवाटर, लॉडेनम किंवा किंचित् तेल ऊन करून त्याचे दोन तीन थेंब कानांत सोडावे; नंतर पिचकाऱ्या माराव्या, ह्मणजे पाण्याचे ओघाबरोबर तीं सर्व बाहेर पडतात. मुलें खेळतांना गुंज, धान्याचे दाणे, पेनसलीचे तुकडे, मणि, वगैरे पदार्थ कानांत शिरवितात. हे पदार्थ फार वेळ कानांत राहिले असतां तेथें दाह उत्पन्न होतो, व कान ठणकूं लागतो, ह्मणून ते लवकर बाहेर काढिले पाहिजेत. पदार्थ बाहेर काढण्यापूर्वी तो खचीत कानांत आहे हें कर्णदर्शक (ईअरस्कोप) यंत्रानें पहावें, नंतर तो काढण्याचा प्रयत्न करावा. पदार्थ पुढेंच असल्यास तो हळूच चिमट्यांत धरून बाहेर काढावा, किंवा ऊन पाण्याची पिचकारी मारावी, ह्मणजे पाण्याने ओघाबरोबर तो पदार्थ बाहेर पडतो; किंवा ज्या बाजूचे कानांत पदार्थ शिरला आहे ती बाजू खालीं करून तिच्या विरुद्ध बाजूचें कानशील थापटावें ह्मणजे

पदार्थ बाहेर पडतो. किंवा स्कूप ह्मणजे कानकोरण्याच्या आकृतीचें एक शस्त्र आहे. परंतु तें कान कोरण्यापेक्षां लांब व सरळ असून ह्याचा खोलगट भाग किंचित् लांबट व रुंद असतो, तो हळूच त्या पदार्थामागें दडवून त्यानें तो पदार्थ ओढून घ्यावा. पदार्थ न निघेल तर तो तसाच राहूं द्यावा. ह्मणजे कांहीं दिवसांनीं तो धान्य असल्यास ओलाव्यानें फुगून सडतो, आणि त्याचे तुकडे होऊन पिचकारीचे पाण्याबरोबर किंवा त्या ठिकाणीं पू होऊन त्याबरोबर बाहेर पडतात. इतर पदार्थही त्या ठिकाणीं पू उत्पन्न करून त्याबरोबर वाहून येतात. न आले तर ऊन पाण्याच्या पिचकाऱ्या माराव्या ह्मणजे त्याबरोबर खचित वाहून येतात. कान ठणकत असल्यास अफूच्या बोंडाच्या काढ्यांनीं शेकावा. किंवा त्यावर पिकवणें ( पोटीस ) बांधावें. पू वाहत असल्यास कर्णपूस्रावांत सांगितलेले उपाय योजावे.

## कंडू रोग.

### URTICARIA.

हा रोग तर ह्याचे नांवावरूनच ओळखावयासारखा आहे. तथापि गांधील माशा चावल्याप्रमाणें किंवा अंगास कुहिली लागल्यानें जशी अंगास अतिशय खाज सुटून गांधी उठतात, तद्वत् ह्या रोगांत अंगास अतिशय खाज सुटून गांधी उठतात. ह्या गांधी किंचित् उंच असून कधीं कधीं आसपासच्या भागापेक्षां लाल किंवा फिकट असतात, आणि त्यांत खाज व मिरमीर ही फार असते. ह्याबरोबर कधीं कधीं बराच ज्वर असतो. जेव्हां हा विकार तीव्र असतो, तेव्हां हृदय

तोडून टाकल्याप्रमाणें क्लेशकारक भास होत असतो. ह्या रोगाचीं पूर्वरूप चिन्हें ह्मटलीं ह्मणजे अरुचि, मळमळ, ओकारी, आंग गळणें, जड होणें, डोळ्याला लाली, शौच्यास साफ नसणें, इ०. ह्याला उदर्द किंवा शीतपित्त असें ह्मणतात. लोकप्रचारांत ह्यालाच पित्त उठलें असें ह्मणतात. हा रोग बहुतकरून दोनतीन दिवसांचाच पाहुणा असतो. परंतु ह्याचा एक विलंबी प्रकार आहे, तो पुष्कळ महिनेपर्यंत जात येत असतो. कधीं कधीं कंडू रोग अगदीं क्षणिक ह्मणजे दोन चार तासांतच नाहींसा होतो.

**कारणें**:—हा रोग नेहमीं जठरविकारापासून होतो, आणि त्याचा संबंध बहुतकरून कित्येक भक्ष्य पदार्थांशीं असतो. जसें शेल-फिश, न[illegible]चे मासे, अपक्क फळें, भाज्या, काकडी इ०. तसेंच कित्येक औषधांच्या सेवनानें हा रोग होतो. जसें टरपेन्टाइन, कोपेबा, बेलाडोना, हायओसियामस, ब्रोमाइड, व आयओडाईड ऑफ् पोट्याशियम इ०. हा रोग वातग्रस्त मनुष्यास होतो; त्याप्रमाणेंच लहान मुलांना दांत येतेवेळीं हा होत असतो.

**उपचार**:—सौम्य प्रकारांत औषधाची कांहींच गरज लागत नाहीं. कारण हा रोग थोड्या तासांनीं आपोआप नाहींसा होतो. जर खाज फार होत असली तर थोडें शुगर-लेड अथवा सैनाईड ऑफ् पोट्याशियम, पाण्यांत मिश्र करून अंगास लावावें, किंवा गोडे तेलांत सैंधव मिश्र करून तें आंगास लावावें, किंवा कोकमसालाचें पाणी अंगास लावावें. किंवा सरका ( खाटी आंब-व्हिनिगर ) १ भाग, पाणी १० भाग हीं एकत्र करून अंगास लावावीं ह्मणजे कंडू व मिर-

मीर हीं दोन्हीं शांत होतात. विकार अजीर्णामुळें असला तर उलटीचीं औषधें द्यावीं. २० ग्रेन इपिक्याकुहाना पावडर, किंवा २० ग्रेन सल्फेट ऑफ् झिंक, अर्धा किंवा १ तोळा मीठ ऊन पाण्यांत मिश्र करून घ्यावें. व उलटी होई-तोंपर्यंत आणखी ऊन पाणी प्यावें, किंवा कडू पडवळ, कडू-निंब, व अडुळसा यांचा काढा करून तो प्यावा, ह्मणजे साफ उलटी होते. नंतर एखादा जुलाब घ्यावा; जसें गुलाब-कळी, मनुका, धने, हरडा, बेहडा, आंवळकठी, सोनामुखी ह्यांचा काढा करून तो सकाळ संध्याकाळ थोडीशी साखर मिळवून प्यावा. किंवा सेडलीझपावडर घ्यावी. ताप फार [illegible] तर लैकर अमोनिया आसिटेटिस २ ड्राम, स्पिरिट-[illegible]ांफर नाईट्रोसी २० थेंब, म्याग्निशिआसलफस २ ड्राम, क[illegible] पाणी १ औंस, हें मिश्रण दर तीन तासांनीं शौचास द[illegible] तीन वेळां साफ होईतोंपर्यंत घेत असावें. नंतर बंद करून दुसरे दिवशीं पुन्हां चालू करावें. अपक्व फळें व वाईट अन्न खाऊं नये. रोग बरा होईतोंपर्यंत हलकें अन्न द्यावें, ह्मणजे दुधाची पेज पिऊन असावें. लोंकरीचे कपडे घालूं नये. विलंबी प्रकार फारच हट्टी असतो; ह्मणजे तो लवकर जात नाहीं, आणि त्यापासून त्रासही फार होत असतो. तेव्हां पथ्य चांगलें जपून करावें व वर सांगितलेले काढे व औषधें मधून मधून घेत असावीं. एवढ्यानें रोग बरा होत नसेल तर पाण्याचा बफारा आणि गंधकोदक* स्नान हीं करावीं, व

* थोडा वेळपर्यंत ऊन पाण्यांत गंधक टाकून स्नान करावें किंवा ह्या देशांत वजेश्वरी, राजापूर, महाड भोर वगैरे ठिकाणीं जीं उन्हा-ळीं आहेत त्यांत स्नान केलें असतांही गंधकोदक स्नान होतें.

पोटांत लैकर आर्सेनिकेलीस पांच थेंब, किराइताचा काढा दीड औंस ह्याप्रमाणें दिवसांतून तीन वेळ करून प्यावें, ह्मणजे रोग बरा होतो.

---

## पडसें.

### CATARRH OR COMMON COLD.

पडसें आलें ह्मणजे नाकांतील अंतःत्वचा आणि श्वासमार्ग ह्या ठिकाणीं थोडासा दाह उत्पन्न होतो.

पडसें हा रोग फारच साधारण आहे व तो सर्वत्रांना
कारणः—
त्याचा सं... तर थोडेंबहुत पडसें नेहमींच असतें.
लहान मुलांना
जसें

लक्षणेंः—पडसें झालें असतां शिंका येतात, डोळ्यांतून व नाकांतून पाणी गळतें, मधून मधून थंडीच्या शिरशिऱ्या येतात आणि आंग तापतें. कधीं कधीं नाक कोंदल्यासारखें होऊन श्वासोच्छ्वास बरोबर चालत नाहीं, घशांत खवखवतें, वारंवार खोकला येतो, क्षुधा लागत नाही, डोकें दुखतें, आणि हात पाय व कंबर, हीं गळाहल्यासारखीं होऊन थोडींबहुत ठणकत असतात.

इतकी सर्दी झाली ह्मणजे लहान बालकांना आंकडी येतात, त्यावेळीं तीं स्तनपान करीत नाहींशीं होतात.

**कारणेंः**—हवेंत एकाएकीं फेरबदल झाला असतां, दमट आणि ओलसर जाग्यांत राहिल्यानें, वाऱ्यावर उघडें फिरल्यानें, भिजकीं वस्त्रें पांघरल्यानें आणि आपलें आंग स्वच्छ न ठेवल्यानें पडसें येतें. ग्रामांतर केल्यानेंही कधीं कधीं पडसें येतें.

**उपचारः**—पडसें होणाऱ्या कारणांपासून दूर रहावें. नाक कोंदलें असल्यास तपकीर ओढावी, अमोनिया हुंगावा, किंवा ड्राम दोन ड्रामपर्यंत ईथर हुंगावें. ऊन ऊन चहा प्यावा, किंवा जवांचा काढा करून तो प्यावा. रात्रीं निजतांना १० ग्रेन डोव्हर्स पावडर पाण्यांत मिळवून प्यावी. (वर्षाचे मुलास एक चतुर्थांश किंवा एक अष्टमांश ग्रेन द्यावी.) किंवा जेमसिस पावडर २ ग्रेन, डोव्हर्स पावडर ५ ग्रेन, असें एकत्र करून, तें दिवसांतून २ वेळ मधांतून घ्यावें. किंवा टिंक्चर आकोनाईट १ थेंब, सरबत अर्धा ड्राम, पाणी अर्धा औंस, असें कलाखा कलाखांनीं प्यावें. अंग तापतें व खोकला असतो तेव्हां, टिंक्चर क्यांफर कंपाऊंड १५ थेंब, स्पिरिट ऑफ् नाईट्रिक ईथर २० थेंब, लैकर आमोनिया असिटेटीस २ ड्राम, आग्झीमेल—सिली १ ड्राम, सिरपटोलू १ ड्राम, कापराचें पाणी १ औंस, (यादी नं. १४) असें मिश्रण, तीन तीन तासांनीं प्यावें. किंवा कार्बोनेट ऑफ् आमोनिया ५ ग्रेन, ईथर क्लोरिक १० थेंब, टिंक्चर क्यांफर कंपाऊंड २० थेंब, डिकॉक्टम सिंकोना [सिंकोनाचा काढा.] १ औंस, असें दिवसांतून ३–४ वेळ प्यावें. शौचास साफ होण्याकरितां जुलाब द्यावा. [यादी नंबर ३.] ताप नसतो तेव्हां ५–१० ग्रेन क्विनाईन साखरेच्या पाकांत द्यावें. गुळ, जेष्टीमध, रिंगणी, अडुळसा, धने, सुंठ, हीं सर्व तोळाप्रमाणें घेऊन त्यांत अर्धा शेर पाणी घालून मंदाग्नीवर काढा होऊं द्यावा. सरासरी पावशेर काढा उरला ह्मणजे तो गाळून दिवसांतून २–४ वेळां प्यावा. किंवा सुंठ, दालचिनी, लवंगा, गवती चहा, ह्यांचा काढा

करून त्यांत खडीसाखर घालून प्यावा. केशर व अफू पाण्यांत खलून, ती कपाळावर आणि नाकावर लावावी. ऊन पाण्यांत मोहरीची [राई] पूड मिसळून त्यांत क्षणभर पाय बुडवावे, नंतर उर्णावस्त्र पांघरून निजावें, छाती शेकावी, ह्मणजे एकादा भयंकर रोग जडण्याचा अटकाव होऊन दोन तीन दिवसांत पडशाचा निकाल होतो. कधीं कधीं पडसें आपोआप बरें होतें.

पथ्यः—आंबट पदार्थ खाऊं नयेत, ऊन पाणी प्यावें, आंगांत उबदार वस्त्रें ठेवावीं, कानटोपी घालावी, लोकरीचा गळपट्टा बांधावा, आणि थंड पाण्याशीं बिलकूल संबंध ठेवूं नये.

---

## गालफे—गालगंड.

### MUMPS.

ह्मणजे पराटिड* नामक ग्लांडचा दाह. हा विकार फार करून लहान मुलांना होतो. ह्याची सांथ येते किंवा सांसर्गिक रीतीनें ह्याचा फैलाव होतो. तो असा कीं, ज्या मनुष्याला हा रोग होतो त्याचे ताटांतील उष्टें अन्न खाल्ल्यानें किंवा तो प्यालेल्या भांड्यांतील पाणी अथवा तें भांडें साफ केल्याशिवाय वापरावयास घेतल्यानें हा रोग होण्याचा संभव असतो; थंड किंवा सर्द हवेंत फिरल्यानें किंवा त्या ठिकाणीं रहात असल्यानेंही हा रोग उत्पन्न होतो. बहुतकरून १४—१९ वर्षांच्या आंतच हा रोग होतो.

---

* ही ग्लांड ( गांठ—पिंड ) इतर लालोत्पादक पिंडापेक्षां मोठी असून ती कानाच्या खालच्या बाजूस असते. तिचें मुख तोंडांत वरचे जाभाडांतील दुसऱ्या दाढेसमोर असतें.

**लक्षणें:**—मान, जाभाड आणि मुख्यत्वेंकरून कानाजवळील लहान गांठी सुजतात व त्यांत वेदना होऊं लागतात. त्यामुळें अन्न किंवा पाणी उतरतेवेळेस फार अडचण पडते. ताप येतो, डोकें दुखतें, जिव्हेवर पांढरवट पिंवळ्या रंगाचा सारा जमतो, मलशुद्धि साफ होत नाहीं, उह्मासे येतात आणि क्षुधानाश होतो; कधीं अधीं असें होतें कीं, गालगंडाची सूज एकाएकीं नाहींशी होऊन, तिचें स्थलांतर होतें; ह्मणजे पुरुषाच्या अंडांत किंवा स्त्रियांच्या स्तनांत सूज उतरते. गालगंड एकेबाजूस असतें, किंवा दोन्ही बाजूस होतें. हीं बहुतकरून पू झाल्याशिवाय बरीं होतात.

**उपचार:**—अशा रोग्याला थंड हवेंतून कोरड्या हवेवर न्यावें. गांठींत वेदना फार होत असतात, ह्मणून अफूच्या बोंडांचा काढा करून त्यानें गरम शेक करावा. नंतर त्याजवर फल्याणीन बांधून ठेवावी; आणि पोटांत एक हलकासा जुलाब घ्यावा. ( यादी नं. ११ ). सूज फार जोराची आहे तर, तेथें आयओडीनपेंट पिसानें किंवा काडीला कापूस गुंडाळून तिनें दिवसांतून १ वेळ लावावें, किंवा पांचपासून सहा जळवा लावाव्या. आणि नंतर वर सांगितलेला शेक करावा. मॅग्नीशिया सलफस २ ड्राम, लैकर अमोनिया असिटेटीस ६ ड्राम, स्पिरिट ऑफ् नाईट्रीक इथर अर्धा ड्राम, कापराचें पाणी तीन औंस, एकत्र करून, त्याचे ६ भाग करावे, आणि दिवसांतून तीन किंवा चार वेळ एखादें शौच साफ होईपर्यंत घ्यावें; किंवा टिंक्चर बेलाडोना ९ थेंब, व १ औंस पाणी ह्याप्रमाणें मिश्रण करून तें दिवसांतून ३ वेळ घ्यावें.

सूज कमी झाली ह्मणजे क्यांफर लिनीमेंट (यादी नं. १३) चोळावें. लोहकीट १ महिना मातीच्या भांड्यांत गोमूत्र घालून त्यांत ठेवावा, नंतर त्याला *गजपूट देऊन तयार केला ह्मणजे अर्धे वाल प्रमाणें ( सरासरी १ मासपर्यंत ) मधाशीं भक्षणार्थ द्यावा. ह्मणजे गालगंड विकाराचा नाश होतो.

गालगंडावर पळसाचें मूळ, तांदुळांच्या धुणाशीं वांटून त्याचा कानाशीं लेप द्यावा; तो हितकारक व गालगंड नाशक आहे.

शिरिस, शेवग्याचें बीं, तागाचें बीं, मुळयाचें बीं, सातू, जवस हीं आंबट ताकांत वांटून लेप करावा; ह्मणजे गालगंड. ग्रंथी, गंडमाला, हे रोग शांत होतात अथवा नाश पावतात (नि.र.)

आपले लोक ह्याजवर, चुना व गूळ एकत्र कालवून लावतात. किंवा धोतऱ्याचा पाला वांटून त्यांत चुना मिळवून तो वर बांधतात.

**पथ्य:**—रोग्याच्यानें पेजेशिवाय दुसरें कांहींच खाववत नसेल तर दुधांत तयार केलेली साबू तांदुळांची पेज द्यावी. आंबट, थंड, खाऊं नये.

---

## गंडमाला-पंडूरोग.

SOROFULA.

**स्क्राफयुला:**—ही एक रक्ताची विशेष बिघडलेली स्थिति आहे. ह्या रोगांत गळ्यासभोंवतीं गांठीं येतात. त्या गळ्याचे एकेच बाजूस किंवा दोन्ही बाजूंस एकदांच येतात. बहुधा ह्या गांठी ओळीनेंच दोन तीन किंवा चार अशा असतात, ह्या-

---

* लोहभस्मकृति पहा.

णूनच त्यांना **गंडमाला** असें ह्मटलें आहे. ह्या गांठी प्रथम लहान बोराएवढ्या असतात, परंतु पुढें हळूहळू मोठ्या होत जातात. ह्या गांठी कठीण असून लवकर पुवळणास येत नाहींत. कधीं कधीं कांख आणि जांग ह्या ठिकाणींही ह्या येतात.

**गंडमालाजनकप्रकृतिः**—ही दोन प्रकारची आहे. व त्या दोन्ही प्रकृतींतील चिन्हें बाल्यावस्थेंत स्पष्ट पाहण्यांत येतात.

**पहिलीः**—ह्या प्रकृतींतील मुलांचा रंग गोरा, मुखचर्या सुंदर, केंस भोरे, डोळे घारे, पापण्यांचे केंस लांब, डोळ्यांच्या बाहुल्या मोठ्या असून भिंवयाही मोठ्या असतात. ओंठ (मुख्यत्वेंकरून वरचा) जाड, दंतपंक्ति मोत्यांसारखी चकचकीत, शरीरबांधा बहुशः चांगला असतो. आणि त्वचेखालीं मेदाचा (चर्बीचा) संचय बराच जमल्यानें अवयवही गोंडस दिसतात. ह्या प्रकृतींतील मुलांची बुद्धि चंचल असून धारणाशक्तिही चांगली असते.

**दुसरीः**—ह्या प्रकृतींतलि मुलांचा वर्ण काळसर, पोटाचा डेरा पुढें आलेला, कपाळ पुढें आलेलें आणि वेडेवांकडें, बोटें फुगीर व बोथट आणि बुद्धि मंद व जड अशी असते.

ह्या दोन्ही प्रकारांत क्षुधा मंद, जिभेवर पिंवळट सारा आलेला, व तोंडांतून आंबट व ओषट असा वास येत असतो. शौचास साफ होत नाहीं आणि हवेंत किंचित् फेरफार झाल्यानें, किंवा थोडेबहुत श्रम झाल्यानें, तब्यत बिघडते, ह्मणजे ताप भरतो आणि हातपाय अगदीं गळल्यासारखे होतात.

**कारणें:**—गंडमालाजनकस्थिति उद्भवणारीं कारणें अनेक आहेत. ही स्थिति बहुश: वंशपरंपरेनें असते. (ह्मणजे आई-बापांची मुलांस ह्याप्रमाणें), किंवा वाईट अन्न खाणें, अन्न पोटभर न मिळणें, वाईट हवेंत राहणें, हवेंत वारंवार फेरफार होणें, ह्यांपासून गंडमालाजनकस्थिति उद्भवते. अशक्तपणा-पासूनही ही स्थिति उद्भवते. गर्मीच्या रोगानें शरीरप्रकृति बिघडल्यामुळें, किंवा स्त्रीपुरुषांची विषम प्रकृति असल्यामुळें, संततीसही हा रोग होतो. ह्यांकरितां लग्न करण्यापूर्वी मुलगा व मुलगी ह्यांचा संबंध समप्रकृति पाहून करावा. ज्या स्त्रीस हा विकार असेल, तिनें गर्भधारण झाल्यापासून फार पथ्यानें वागलें ह्मणजे तिला होणारे संततीस बहुतकरून हा रोग जडणार नाहीं.

गंडमाळेचे रोगी उष्ण देशांतून थंड देशांत गेले ह्मणजे त्यांचा तो रोग बळावतो. ज्यांची जन्मत:च गंडमालाजनक-प्रकृति असते, त्यांना पुढें क्षय, रिकेट नामक अस्थिविकार वगैरे रोग होण्याचा संभव असतो.

**उपचार:**—औषधोपचारापेक्षां हवा, पाणी, अन्न, वस्त्र, ह्यांकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. रोग्यानें नेहमीं लोंकरीचे कपडे वापरावे. आणि थंडीचे दिवसांत तर ते अवश्य वापरावे. कारण त्याचे एकादे अंतरअवयवांत रक्तसंचय होण्याची भीति असते. गळ्याभोंवतीं लोंकरीचा गळपट्टा गुंडाळावा. समुद्रकिनारीं फिरावयास व सोय असल्यास राहवयास जावें किंवा जलप्रवास करावा. राहण्याचें ठिकाण स्वच्छ ठेवावें; मानसिक श्रम फार करूं नयेत. समुद्रस्नान दररोज केलें असतां फार हितावह होतें. स्नान केल्यावर लागलेच

कोरड्या वस्त्रानें अंग पुसावें, आणि अंगास ऊब आल्यासारखी वाटल्यास गुण समजावा. स्नानानंतर थंडी वाजूं लागली, किंवा डोकें दुखूं लागलें तर समुद्रस्नान वर्ज करावें. समुद्रस्नान करण्याची गैरसोय असली तर स्नानाचे वेळीं पाण्यांत मीठ मिळवून त्या पाण्यानें स्नान करावें. अन्न थोडें परंतु पौष्टिक व पचनीय असें खावें. जसें:—दूध, तूप, गव्हांची पोळी इ० चालत असल्यास मांस, मांसरस, आणि जरूर वाटल्यास मद्यही उपयोगांत आणावें. शौचास साफ होत नसल्यास एरंडेल तेलाचा जुलाब घ्यावा (यादी नंबर ७). किंवा म्याग्निशिया कार्बोनस २० ग्रेन, ऱ्हुबार्ब पौडर १० ग्रेन, हैड्रार्जिराय कंक्रीटा ५ ग्रेन, सुंठीचें चूर्ण १० ग्रेन, ह्यांची एकत्र पूड करून मधांत चाटावी. दिवसांतून २–३ पुड्या चाटल्या ह्मणजे शौचास साफ होऊन क्षुधाही चांगली लागते. (वर्ष दोन वर्षांचे मुलास १ पुडीचा ६ वा भाग दिला ह्मणजे पुरतो.) गंडमाळेच्या रोगावर लोह, आयोडिन व कॉडलिव्हरआईल हीं प्रसिद्ध औषधें आहेत. रोगी शक्तिहीन झाला असल्यास लोह फार हितावह होतो. व आयोडिन हें गंडमाळेंतील विकृत द्रव्याचें शोषण करतें, ह्मणून इंग्रजी वैद्य या दोन्ही औषधांचें मिश्रण करून रोग्यास देतात.

क्विनैनसलफस् १२ ग्रेन, आयोडाईड ऑफ आयर्न १२ ग्रेन, एक्स्ट्राक्ट जेन्शन १२ ग्रेन हीं सर्व एकत्र घोंटून ६ गोळ्या कराव्या आणि प्रत्येक जेवणानंतर एक एक गोळी पाण्याचे घोंटाबरोबर घ्यावी. कॉडलिव्हर आईल हें औषध पौष्टिक आहे. ह्मणून रोग्याची प्रकृति सुधारण्यास तें फार उपयोगी पडतें. कॉडलिव्हरआईलबद्दल ताजें खोबरेल तेल

योजलें असतां चालेल, असें कित्येक इंग्रजी वैद्यांचें मत आहे. अर्धे तोळा कॉडलिव्हरआईल दुधांत किंवा नुसतेंच दिवसांतून दोन वेळां प्रत्येक जेवणानंतर द्यावें. लहान मुलांना चहाचा अर्धा चमचा सकाळ संध्याकाळ पाजावा. कॉडलिव्हर आईल पुढें सांगितल्याप्रमाणें तयार करून द्यावें; ह्मणजे पिण्यास बरें पडतें.---कॉडलिव्हरआईल ४ ड्राम, गोंदाची भुकणी अर्धा तोळा, साखर १ तोळा, दालचिनीचे तेलाचा १ थेंब, सिरप फेरी आयोडाईडचे २० थेंब, पाणी ३ औंस, हीं सर्व एकत्र घोंटून एका शिशांत भरून ठेवावें. मग प्रत्येक जेवणानंतर त्यांतील निम्में औषध प्यावें. लहान मुलांना तर अशा रीतीनें तयार केलेलें औषध पाजण्यास व पिण्यास फार सुलभ पडतें. कॉडलिव्हर आईलपासून वांती होऊं लागली तर तें लागलेंच बंद करावें, आणि पिण्याचे ऐवजीं अंगास चोळावें.

गंडमाळेवर **लिनिमेंट आयोडीन** पिसानें किंवा काडीला कापूस गुंडाळून त्यानें दिवसांतून एकच वेळ लावावें; किंवा शेंदराच्या मलमाची पट्टी करून लावावी. (यादी नं. १६) किंवा पाऱ्याच्या मलमाची पट्टी लावावी. (१ ड्राम रेडआयओडाईड ऑफ् मर्क्युरी आणि ८ भाग साधें मलम) ह्मणजे गांठी बसून जातात; किंवा फुटतात. पांढऱ्या गोकर्णीचें मूळ, कडू वृंदावनीचें मूळ, आणि वेखंड हीं तिन्ही गोमूत्रांत उगाळून, त्याचा ह्या गांठींवर लेप करावा, किंवा बचनागाचा लिंबाचे रसाशीं लेप करावा; ह्मणजे गंडमाळा नाश पावते. वरील उपाय करीत असतां गंडमाळ सुजून ठणकूं लागली तर लगेच तिजवर पिकवणें बांधावीं; ह्मणजे ठणका कमी होऊन गंडमाळ फुटते. नंतर आणखी दोन

दिवस पिकवणें बांधून पुढें जखम भरून आणणाऱ्या मलमाच्या पट्या लावाव्या. ( यादी नं० १७ ). दररोज जखम ऊन पाण्यानें साफ करून, त्यावर आयओडोफार्म नामक औषध थोडें थोडें सोडावें, नंतर मलमाची पट्टी लावावी, ह्मणजे जखम लवकर भरून येते व गंडमाळेचा अगदीं नाश होतो.

---

## खरूज.

ITCH OR SCABIES.

हा रोग सर्व देशांत असून हिंदुस्थानांत तर फारच पाहण्यांत येतो. खरजेच्या प्रथम बारीक बारीक किंवा दाणेदार पुटकळ्या आंगावर येतात. त्यांस खाज सुटते, आणि खाजवलें असतां, फोड उठतात. कधीं कधीं ही खाज इतकी सुटते कीं, खाजवून खाजवून आंगाचीं सालडीं निघतात. नंतर त्या पुटकळ्या एक दोन दिवसांनीं पुवळणास येऊन फुटतात व त्यांतून पूमिश्रित लस वाहाते. ही लस स्पर्शसंचारी आहे. ह्मणजे ती दुसरे मनुष्याचे आंगास लागली असतां त्यासही खरूज होते. ह्मणून खरूज झालेल्या मनुष्यापासून इतरांनीं दूर असावें, आणि त्याचे आंगास किंवा त्याच्या कोणत्याही वापरते वस्तूस स्पर्श करूं नये. ह्या खरजेला 'ओली खरूज' असें ह्मणतात. परंतु जेव्हां पू किंवा लस बिलकूल असत नाहीं, तेव्हां तीस 'कोरडी खरूज' असें ह्मणतात. खरूज, ही पाय, बोटांचे बेचकांतून, मनगटावर, कमरेवर, मांड्यांचे आंतले बाजूस, आणि कुल्हे, ह्या ठिकाणीं होते, व कधीं कधीं तोंड खेरीजकरून

सर्व शरीरभर होते. यावेळीं थोडाफार तापही येतो, त्याला खरजेचा कडमोड आला आहे असें ह्मणतात.

**कारणें:**—शरीर स्वच्छ न ठेवल्यानें, मलीन वस्त्रें वापरल्यानें व स्पर्शसंसर्गानेंही खरूज उत्पन्न होते. कित्येकांची समजूत अशी आहे कीं, रक्त बिघडल्यानें खरूज होते; पण असें नाहीं. कारण, खरूज हा एक कातडीचा विकार आहे. ह्मणजे कातडींत एक प्रकारचे सूक्ष्म कीटक उत्पन्न होऊन, त्यांच्या चळवळीनें कंडू सुटून खरूज उद्भवते. ही बहुश: थंडीचे दिवसांत होते.

**उपचार:**—दररोज ऊन पाण्यानें, क्यारबॉलीक किंवा सलफरसोप अंगास लावून, अथवा हंडाभर ऊन पाण्यांत एक औंस सलफ्युरेटेड पोट्याश किंवा गंधक मिश्र करून त्यानें स्नान करावें. स्वच्छ वस्त्रें पांघरावीं; तिखट पदार्थ, दारू, जाग्रण, हीं सर्व वर्ज करावीं. एरंडेलाचा जुलाब (यादी नंबर ७ पहा) द्यावा. किंवा आंवळ्यागंधक १ ड्राम, क्रीम ऑफ् टारटर १ ड्राम, हीं एकत्र करून, मधांत किंवा गुलकंदांत मिळवून द्यावें. नाहींतर नुसता आंवळ्यागंधक अर्धा तोळा, केळांत द्यावा. किंवा सलफेट ऑफ् म्याग्नीशिया २ ड्राम, साखर १ तोळा, सोनामुखीचा काढा २ औंस, हीं एकत्र करून, त्याचे ३ भाग करून ते दिवसांतून तीन वेळां घ्यावे. खरजेवर, गंधक १ ड्राम, हैड्रार्जीरायअमोनिया क्लोराईड अर्धा ड्राम, क्रीयजोट १० थेंब, साधें मलम १ औंस, (यादी नंबर १८) हीं मिश्र करून लावावीं. किंवा दोन तोळे गंधक, कापूर अर्धा तोळा, मोरचूत पाव तोळा, साधें मलम २ औंस, हीं एकत्र करून खूप खलून खरजेवर लावावीं. किंवा शिकाय

पोंकळी मांसांकुरांनीं भरून जाते. गळूं फोडण्यास जवळ शस्त्र नसलें किंवा रोगी शस्त्रांनीं फोडण्यास मनाई करीत असला, किंवा तें फोडण्यास धैर्य होत नसलें तर पोट्यासा-फ्यूजा २ गुंजा, कळीचा चुना २ गुंजा, हीं एकत्र खलून स्पिरीट ऑफ वाईनमध्यें भिजवून हिरकूटाचे काडीनें जेथें अतिशय पिंवळट दिसेल तेथें त्याचा एवढा (o) टिबका द्यावा, ह्मणजे दहापांच मिनिटांत तेथील चामडी जळून जाऊन गळूं फुटतें. गळवांवर काळ्या मलमाची (यादी नं. १६) पट्टी लावली असतां तें बसून जातें अथवा फुटतें, आणि पुढें त्याच पट्टीनें भरून येतें. गळूं उद्भवतांक्षणींच स्पिरिट ऑफ् क्यांफरची घडी लावावी, किंवा अफू पाण्यांत कालवून तिचा वारंवार लेप करावा, ह्मणजे गळूं बसतें. डा० **जीआर्जीस** लिहितात कीं, बोऱ्यासिक आसीड ४ भाग, बेन्झॉईक आसीड अर्धा भाग, व्हासलीन २० भाग हीं एकत्र घोंटून गळवावर लावावीं; ह्मणजे त्यांतील वेदना त्वरित नाहींशा होऊन ३–४ दिवसांत गळूं साफ नाहींसें होतें. गळूं लहानसरच असलें तर फक्त चंदन उगाळून लावल्यानें बरें होतें. गळवें वारंवार होऊं लागलीं तर रोग्यानें शुद्ध हवेवर रहावयास जावें, उघड्या हवेंत व्यायाम करावा, अहार नियमित व हलका करीत जावा आणि पोटांत विलायती मीठ ( सल्फेट ऑफ म्यागनिशिआ ) ३ ड्राम, टिंक्चर हायओसियामस १ ड्राम, लिकरसोडी क्लोरेटीस १ ड्राम, सरबत अर्धा औंस, पाणी १ औंस, असें मिश्रण तयार करून त्याचे तीन भाग करावे, व दिवसांतून तीन वेळ प्यावयास द्यावे. किंवा मंजिष्ट, गुळवेल,

किराईत, जेष्टीमध, सालस हीं सर्व तोळा तोळा आणि त्रिफळ दोन तोळे, यांचा शेरभर पाणी घालून काढा करावा, आणि पावशेर शेष राहिला ह्मणजे गाळून त्यांत २ तोळे मध मिळवून त्याचे ६ भाग करावे, व दिवसांतून तीनच भाग घ्यावे. प्रकृति अशक्त असली तर लोहभस्म पांच पांच गुंजा प्रमाणें सकाळ संध्याकाळ मधांतून घ्यावें. दूध घ्यावें, सारसापरीलाचा काढा [ यादी नं. ६ ] घ्यावा. किंवा किनीन्सलफस ६ ग्रेन, आसीड सल्फ्युरिक डिल्यूट ६ थेंब, पोट्याशक्लोरस १२ ग्रेन, सरबत अर्धा औंस, पाणी ३ औंस हीं एकत्र करून त्याचे तीन भाग करावे, व दिवसांतून ३ वेळ घ्यावे. कॉडलिव्हर ऑईल दिवसांतून दोन वेळ सुमारें चहाचे एक किंवा दोन चमचे भरून अर्धापावशेर दुधांत मिसळून घ्यावयास द्यावें, ह्मणजे प्रकृति सुधारून गळवें होण्याचें बंद होतें.

---

## चामखीळ–मस.

WARTS.

**मसः**—हे रक्तरहित किंवा काळसर रक्तानें भरलेले ग्रंथी होत. ह्यांत कातडीचे अंकुर लांब होऊन त्यावरचें कातडें जाड व कठीण झालेलें असतें. हे चापट, कठीण किंवा लांबट असतात. त्यांपैकीं कित्येकांना देंठ असतात ते चेपले असतां दुखत नाहींत.

**कारणें:**—शरीर घामट आणि अस्वच्छ ठेवल्यानें किंवा गरमीच्या आजारानें चामखीळ उत्पन्न होतात.

**उपचारः**—काळसर रक्तानें भरलेला चामखीळ बहुतकरून ओंठ किंवा गालाच्या आंतल्या बाजूस असतो. तो

कापून काढूं नये. त्यास घोड्याच्या केंसानें किंवा मजबूत पण बारीक रेशमी दोऱ्यानें दररोज थोडथोडें आंवळीत जावें, ह्मणजे रक्तस्राव न होतां चामखीळ खुडून जातो. इतर चामखीळ बांधण्यासारखे असल्यास बांधावे, कापावे, किंवा त्यासभोंवतीं गोड्या तेलानें अगर पाण्यानें भिजविलेली कापडाची घडी पसरून नंतर त्याजवर हिरकुटाचे काडीला थोडासा कापूस गुंडाळून तिनें नाइट्रीक, आसिटीक किंवा क्रोमिक आसिडाचा द्रव लावावा. ( क्रोमिक आसिड १ भाग, पाणी १०० भाग, ) किंवा ल्यूनर कॉस्टीक चोळावें. आल्याचा तुकडा आणि कळीचा चुना हीं चोळावीं. किंवा पारा १ ड्राम, सोमल ९ ग्रेन, गंधक एक ड्राम, साधें मलम चार ड्राम ( यादी नं. १८ ) अशीं एकत्र करून तें लावावें; ह्मणजे चामखीळ झडून जातात. कोणी कोणी चामखिळावर चुना आणि पापडखार पाण्यांत मिळवून लावतात, परंतु त्याची आग होत असते. चामखीळ कापल्यानंतर बहुधा थोडेंसें रक्त येतें, तें सोल्युशन ऑफ् परक्लोराईड ऑफ् आयर्न, ल्यूनर कॉस्टीक, मोरचुताचा खडा, किंवा फटकीची भुकणी लावल्यानें बंद होतें.

**गर्भाच्या आजारांत** परम्याच्या अथवा चट्टयांच्या स्रावापासून चामखीळ उत्पन्न होतात; ते जांघेच्या आंतल्या बाजूनें, गुदासभोंवतीं, शिश्नावर किंवा लघवी बाहेर पडण्याच्या ठिकाणापाशीं होतात; त्यांस लिंगार्श असें ह्मणतात. हें लिंगार्श एकावरएक उगवून कोंबड्याच्या शेंडीसारखे लालभडक व रक्तभरित असतात. ह्यांस जर तसेंच राहूं दिलें, तर त्यांचा आकार व संख्या वाढते. ह्यामुळें शिश्नाच्या लाल व नाजूक

भागा (मणि) वरील कातडें ताणतें, तें मागें ओढलें जात नाहीं व शिश्न गांठळलेलें दिसतें. कधीं कधीं तें कातडें इतकें ताणतें कीं, त्यांत जखम होऊन त्याला छिद्र पडतें, आणि त्यांतून हे लिंगार्श बाहेर पडतात. कधीं कधीं हे चड्डयाच्या मावेवरही उगवतात.

**उपचारः**—चामखिळांस साबूच्या पाण्यानें धुऊन, त्यांजवर ३० थेंब लिकर झीन्सी क्लोराईड व १ औंस पाणी ह्यांच्या द्रवांत लिंट भिजवून लावावें. ह्यानें न गेले तर त्यांचा उपचार वर सांगितलेल्या इतर चामखिळांप्रमाणें करावा. आणि जर ह्यांची संख्या अतिशयित होऊन शिश्न गांठळलें, तर उत्तमशा शस्त्रवैद्याकरवीं त्यांचा बंदोबस्त करावा.

---

## चेंचरणें अथवा ठेंचणें.

### CONTUSION OR BRUISE.

शरीराचे भाग चेंचरणें अथवा ठेंचळणें ह्मणजे कातडीचा छेद झाल्याशिवाय कातडी किंवा तिच्या खालच्या त्वचा ह्यांस दुखापत होणें. हा प्रकार शरीराचा एखादा भाग दोनपदार्थांमध्यें दाबला गेल्यानें किंवा त्याजवर जबर तडाका बसल्यानें उत्पन्न होतो. भाग चेंगरतो त्या ठिकाणीं तो सुजतो व वेदना होऊं लागतात; कधीं कधीं त्यापासून मनुष्यास धडकी उत्पन्न होते. चेंचलेला भाग, त्यांतील केशतुल्य वाहिन्या फुटल्यामुळें काळा निळा होतो. परंतु कांहीं वेळानें जेव्हां त्या भागांतील रक्ताचें शोषण होऊं लागतें, तेव्हां त्याचा काळा वर्ण बदलून अनुक्रमानें जांभळा, हिरवा आणि शेवटीं

पिंवळा असा होतो. हे प्रकार काळ्या कातड्यांत चांगले पाहण्यांत येत नाहींत. अशावेळीं लवकर इलाज केला पाहिजे; न केला तर तेथें पू होऊन मनुष्यास मोठी इजा होते.

**उपायः**—चेंचलेल्या भागावर, त्यांतील सांकलेलें रक्त फांकण्याकरितां थंड पाण्याच्या घड्या ठेवाव्या, व आणखी थंड पाणी वरचेवर सोडीत असावें. किंवा दोन पैसेभार नवसागर अथवा एक पैसाभार शुगरलेड, एक बाटलीभर (ब्रांडीची बाटली) ऊन पाण्यांत विरघळवून त्या पाण्यांत भिजविलेल्या कापडाच्या घड्या चेंगरलेल्या भागावर ठेवाव्या, ह्मणजे दुःखाचें शमन होऊन सूजही ओसरते. टिंक्चर आरनिकाचा लेप करावा; अथवा फटकी, अफू, हळद, बिब्बा, गुग्गुळ, एलीयाबोळ यांचा पाण्यांत उगाळून लेप करावा, ह्मणजे दुःखाचें शमन होऊन सूज ओसरेल. चेंचरल्या ठिकाणीं कितीही रक्त सांचलें असलें तथापि छेद करूं नये. परंतु तो भाग दाहयुक्त झाला असतां जळवा लावाव्या (मनुष्याचे शक्तीच्या मानानें). पू झाला असतां छेद करून पू वाहूं द्यावा.

कधीं कधीं हे भाग इतके ठेंचलेले असतात कीं, ते बहुधा कुजण्याचे पंथास येतात, तेव्हां त्यांजवर पिकवणें (पोलटीस) बांधावीं ह्मणजे पूयजनकक्रिया वृद्धिगत होऊन कुजलेलें मांस लवकर गळून जातें. तें गळून गेल्यावर तेथें जखम भरणाऱ्या मलमाच्या पट्या लावाव्या (यादी नं. १७). चेंचरलेला भाग लोंबत ठेवूं नये, उंच करून ठेवावा व हालचाल होऊं देऊं नये.

## टेंगूळ.

कपाळास किंवा डोक्यास एखादा जोराचा तडाका किंवा टक्कर लागली असतां तेथें कातडी न फाटतां ती जागा सुजून उंच होते त्यास टेंगूळ असें ह्मणतात.

**उपायः**—त्यावर थंड पाण्याची घडी ठेवावी आणि वरचेवर थंड पाणी सोडीत असावें. किंवा हळद, बिब्बा, फटकी, गुग्गुळ हीं पाण्यांत उगाळून किंचित् ऊन करून त्याचा लेप करावा ह्मणजे सुमारें १–२ दिवसांत टेंगूळ साफ बसून जातें.

---

## सांधा लचकणें.

SPRAINS.

चालतांना पाऊल चुकून किंवा दंगामस्तीनें कधीं कधीं आपल्या हातापायाचे संधी लचकतात. संधी लचकला ह्मणजे सांध्यांत वेदना होऊं लागतात, व तो सुजतो आणि त्याचे चलनवलनादि व्यापार बंद पडतात.

**उपायः**—सांधा लचकला ह्मणजे लागलेच त्यास सोसवेल तितक्या ऊन पाण्यांत धरावें. सांधा ऊन पाण्यांत धरण्यासारखा नसल्यास अफूच्या बोंडाच्या काढ्यांनीं तास दोन तास शेकावा किंवा नारळाच्या चवामध्यें थोडीशी हळदीची भुकणी घालून तो गरम करावा आणि सोसवेल तितका ऊनऊन लचकलेल्या सांध्यावर बांधून ठेवावा. असें दिवसांतून ४–५ वेळ करावें. यास नारळाचा पेंड असें ह्मणतात. संधीवर टिंक्चर आरनिका लावावें. किंवा ठेंचणें अथवा चेंचरणें या

प्रकारांत सांगितलेला लेप संधीवर लावावा. सांधा साधारण लचकला असल्यास टरपेन्टाईन व गोडें तेल एकत्र करून दु:ख बंद होईतोंपर्यंत वेळोवेळ चोळून शेकावें व संधि फ्ल्यानलनें गुंडाळून ठेवावा; हालूं देऊं नये. सांध्याला सूज आली, व आग होऊं लागली तर ती नाहींशी होण्याकरितां त्याजवर थंड पाण्याच्या किंवा एक पैसाभार शुगरलेड, बाटलीभर २४ औंस पाण्यांत विरघळवून त्या पाण्यांत भिजविलेल्या कापडाच्या घडया सांध्यावर ठेवाव्या व त्या वरचेवर ओल्या कराव्या, वाळूं देऊं नयेत. सीतोपचार सहन न होईल तर नवसागर १ तोळा, अफू १ मासा, स्पिरिट ऑफ् वाईन १ औंस, पाणी दोनशेर, हीं ऊन करून त्यांत भिजविलेली कापडाची घडी सांध्यावर लावावी. इतक्याही प्रकारें सांध्यांतील सूज किंवा वेदना कमी न होतील तर त्यावर ब्लिस्टरें मारावीं (यादी नं. २२). किंवा लैकर अमोनिया २ ड्राम, गोडें तेल १ औंस, अशीं एकत्र करून तें सांध्यावर चोळावें आणि चिकट पट्ट्या (स्टिकिंग प्लास्टर) किंवा कापडाचे पट्टे (ब्यांडेज) यांनीं संधीवर दाब करावा. दाहाचें शमन झाल्यावर संधिव्यापार चालू न होईल तर संधीवर कांहीं वेळपर्यंत दररोज थंड पाण्याची धार धरावी. आणि संधि साफ बरा होईतोंपर्यंत त्याचें चलनवलन अगदीं बंद ठेवावें.

---

## चामडीचें झाजरणें.

कोणत्याही प्रकारें चामडी झाजरली असतां प्रथम झाजरल्या भागावर असलेला धूळ, कचरा, रेती वगैरे ऊन पाण्यानें साफ धुवून काढावीं. नंतर स्पिरिट ऑफ् वाईन,

१ भाग, पाणी ५ भाग; किंवा टिंक्चर आरनीका १ ड्राम, पाणी ६ औंस अशीं एकत्र करून त्यांत भिजविलेली मलमलीची घडी त्या ठिकाणीं लावावी, किंवा लिंटाचा अथवा आईलसिल्कचा तुकडा त्यावर बांधून ठेवावा, किंवा साध्या मलमाची (यादी नं. १८) पट्टी लावावी, किंवा **कोर्टप्लास्टर** लावावें ह्मणजे वेदना कमी होऊन ती जागा सुकून जाते. बरेंच झाजरून जखम पडली आसल्यास व त्यांत वेदनाही फार होत असल्यास त्यावर पोटीस बांधावें आणि नंतर साध्या मलमाची पट्टी लावावी ह्मणजे झाजरणें बरें होतें.

---

## नासिक रक्तस्राव अथवा घोळणा फुटणें.

EPISTAXIS.

**कारणें**—नाकावर तडाखा बसल्यानें, किंवा मनुष्य अति पुष्ट असल्यामुळें मेंदूंत रक्तसंचय होऊन नाकांतून रक्तस्राव होतो. कधीं कधीं स्त्रियांचा मासिक ऋतुस्राव बंद होऊन तो नाकांतून होऊं लागतो. नासिक रक्तस्राव कधीं कधीं हृदयद्रावकारापासून, स्कर्व्हीं, (वातरक्त) किंवा पर्प्यूरा या शारीरिक विकारांपासून उद्भवतो. तसेंच शक्तिपात करणाऱ्या रोगाच्या वर्धमान अवस्थेंत, आणि विशेषेंकरून दुष्ट जातींच्या ज्वरांत नासिक रक्तस्राव फारच पहाण्यांत येतो.

**उपचारः**—मनुष्य पुष्ट असून त्याचे अंगांत रक्त विपुल असल्यास त्याला ह्या स्रावापासून अनहित न होतां उलटा फायदा होतो. तथापि रक्तस्राव फारच होत आहे किंवा मनुष्य फार अशक्त अथवा वृद्ध आहे आणि त्याचे अंगांत रक्ताधिक्य नाहीं, तर रक्तस्राव तावडतोब बंद करणें जरूर आहे. ना-

कावर थंड पाण्याची घडी ठेवावी. दोन्ही हात डोक्याकडे वर न्यावे. रक्तस्राव फारच होत असल्यास, कपाळावर आणि मानेवर बर्फ लावावें, किंवा थंड लोखंड ह्मणजे मोठीशी किल्ली वगैरे एकाएकींच कपाळावर किंवा मानेवर लावावी. अथवा व्हिनिगर (शिरका) आणि पाणी एकत्र करून त्यांत भिजविलेली घडी नाकावर व कपाळावर ठेवावी. डाळिंबाच्या सालीची, तुरटीची, मायफळाची, किंवा हिराकसाची पूड करून ती नाकांत ओढावी; किंवा सलफेट ऑफ् झिंक २० ग्रेन, तुरटी १ ड्राम, पाणी २ औंस, ह्या मिश्रणाची किंवा हरडे, मायफळ, बेहडे, कात, तुरटी, हीं सर्व एक एक तोळा आणि पाणी—अर्धा शेर ह्यांचा काढा करून त्याच्या पिचकाऱ्या नाकांत माराव्या, किंवा बर्फाचे पाण्याच्या पिचकाऱ्या माराव्या. बर्फ आणि लेमोनेड (यादी नंबर २९) थोडें थोडें प्यावयास द्यावें. ह्यांनींही रक्तस्राव बंद न होईल तर, लहानशी लिंटाची किंवा मलमलीच्या कापडाची चिंधी घेऊन ती पाण्यांत भिजवावी. नंतर काताचे, तुरटीचे किंवा मायफळाचे भुकटींत ती घोळवून नाकांत भरावी, किंवा टिंक्चर ऑफ् आयर्नमध्यें भिजवून भरावी ह्मणजे रक्तस्राव बंद होतो. नाकांत सांकळलेलें रक्त असलें तर तें काढून टाकूं नये, कारण त्याचा फुटलेले वाहिनीवर दाब पडून ती बुजून जाते व रक्तस्राव बंद होतो. मनुष्य सशक्त असून त्याला वारंवार रक्तस्राव होण्याची संवय झाली तर आठ पंधरा दिवसांनीं जुलाब घ्यावा (यादी नं० ११), रोज उघड्या हवेंत व्यायाम करावा आणि साधा व हलका आहार ठेवावा.

---

# दग्ध विकार.

## भाजणें व पोळणें.

### BURNS AND SCALDS.

भाजणें व पोळणें—ह्या प्रकारचे अपघात इतके वारंवार आणि अकस्मात् घडून येतात कीं, त्यांची संख्या व संभव याचें अनुमान कोणाही मनुष्यास त्याच्या साऱ्या जन्मांतही झालें नसेल. असो. ते कधीं मोठे भयंकर आणि घातकही होतात, तेव्हां त्यांचे उपाय प्रत्येक मनुष्याला माहित असणें फार अगत्याचें आहे.

**भाजणें**—हा प्रकार अतिशय उष्ण पदार्थ किंवा प्रत्यक्ष विस्तव अंगास लागल्यापासून उत्पन्न होतो. **पोळणें** हा प्रकार वरल्याप्रमाणेंच आहे, परंतु प्रवाही कढत पदार्थ किंवा वाफ अंगास लागल्यापासून उत्पन्न होतो.

ह्या विकाराचे तीन प्रकार आहेत, परंतु कोणी ह्याचे सहा प्रकार करितात, ते असे कीं, **पहिल्या** प्रकारांत अंग भाजून लाल होतें, **दुसऱ्यांत** सिरम नामक द्रवानें भरलेले फोड उठतात, **तिसऱ्यांत** त्वचेचा वरचा पडदा मात्र जळला जातो, **चवथ्यांत** कातडी व तिच्या खालच्या दुसऱ्या त्वचा जळल्या जातात, **पांचव्यांत** स्नायु, धमन्या व शिरा हीं जळून जळका भाग काळा पडतो व **सहाव्यांत** अस्थींसहित भाग जळला जातो.

जळण्यापासून मनुष्याला सार्वदेहिक विकार होतो; मोठ्या माणसापेक्षां तो लहान मुलांत जास्त तीव्र असतो. अंगाचा पुष्कळ भाग व डोकें किंवा छाती हीं जळलीं असतां प्राणां-

तिक सार्वदेहिक विकार उत्पन्न होतो. सार्वदेहिक विकाराच्या तीन अवस्था आहेत.

**१ ली अवस्था**—भाजलें अथवा पोळलें असतां तावडतोब ग्लानि येते व अंतरिंद्रियांत रक्त गोठतें. ही अवस्था दहनाच्या तीव्रतेप्रमाणें असते. कधीं कधीं ती २५ तासांपेक्षां जास्त वेळ राहते. फार वेळ राहिल्यानें भयंकर परिणाम होतो. ह्या स्थितींत रोग्यास कधीं कधीं हुडहुडी भरते, अंग गार होतें व नाडी क्षीण होते. ह्या स्थितींत वेदना न होणें व थंडी फार वेळ राहणें हीं वाईट लक्षणें समजावीं. ह्या स्थितींत मेंदूंत रक्तसंचय होऊन रोगी मरण्याची भीति असते.

**२ री अवस्था**—ह्या अवस्थेंत ग्लानि नाहींशीं होऊन कांहींशी हुशारी वाटते आणि दाह उत्पन्न होतो. ही स्थीति फारकरून ८ दिवस असते. अंग उष्ण होतें व कधीं कधीं ज्वरही भरतो. ह्या स्थितींत पोट व छाती ह्यांतिल अवयवांत दाह उत्पन्न होतो. १० दिवसांच्या सुमारास *डयुओडीनम् (आंतड्याचा भाग) मध्यें व्रण पडतात व ते चेपल्यानें दुखतात त्यावरून व्रण पडले आहेत असें समजतें. ह्या व्रणांपासून वारंवार रक्तमिश्रित मल होतो, आणि वांती होते. हे व्रण क्वचित् बरे होतात, कधीं कधीं ते पेरीटोनियम नामक पडद्यापर्यंत (पोटांतील इंद्रियास आच्छादणारा पडदा) पोचून त्यांत दाह उत्पन्न करितात. क्वचित् धमन्यांत शिरून रक्तस्राव होतो आणि मनुष्य मरतो.

---

* ह्मणजे शिंपीचे थोडें खालीं उजवे बाजूस.

**३ री पूयभवन आणि क्षय**—ह्या स्थितींत जळलेला भाग गळून पडतो, नंतर राहिलेल्या जखमेपासून पुवाचा स्राव चालू होतो, तेणेंकरून जीर्णज्वर (हाडी ताप) येऊं लागतो व फार अशक्तता येते. ह्या विकारानें क्षीणता आणि उरांतील अवयवांत दाह उत्पन्न होऊन बहुतकरून एक आठवड्याच्या आंतच मृत्यु येतो. आणखी ह्या विकारांत वर सांगितलेल्या तिन्ही अवस्थेंतील विकारांखेरीज, धनुर्वात आणि विसर्प (एरी सेपेलस) हे दोन विकार उत्पन्न होतात.

इतक्याही विकारांतून पार पडलें आणि जळलेला भाग जर मान, तोंड, कोपर, कांखा, जंघा, पाय इ० ठिकाणांनजिक असला, तर त्या ठिकाणीं व्रणभवनक्रिया चालू होऊन तो भाग चिकटून व्यंग उत्पन्न होण्याची मोठी भीति असते.

**उपचार**—आगींत सांपडलेला मनुष्य जळण्यापूर्वीच धुरानें गुदमरून मरण पावतो. बोटें वगैरे ठिकाणीं कांहीं थोडेंसेंच भाजलें असतां ते भाग मिठाच्या किंवा साध्या पाण्यांत बुडवून ठेवावे ह्मणजे आग होणार नाहीं व फोडही येणार नाहींत. याहीपेक्षां अधिक भाजलें असल्यास खोबऱ्याचें, गोडें किंवा आलिव्ह तेल आणि चुन्याची निवळ (यादी नं. ९) हीं दोन्ही समभाग एकत्र करून त्यांत कापसाच्या घड्या भिजवून जळलेल्या भागावर लावाव्या, किंवा कापूस ह्या मिश्रणांत भिजवून वर पिळावा आणि पसरून ठेवावा. (ह्या मिश्रणास इंग्रजींत लिनीमेंट क्यालसिस असें ह्मणतात.) नंतर त्याजवर वारा लागूं नये ह्मणून कापूस अथवा गरम कपडा गुंडाळावा. ही कापसाची घडी पू

होईपर्यंत तशीच ठेवावी, व त्याजवर वारंवार वरील मिश्रण सोडीत असावें.

कोणी कोणी हें औषध नसल्यास पोळल्यावर गोडें किंवा खोबरेल तेल, मध किंवा शाई- ह्यांत फडकें भिजवून वर लावितात, तेंही उपयुक्त असतें. बायकॉर्बोनेट आफ्—सोडा जळलेल्या भागावर सोडावा आणि त्याजवर कापडाची पा· ण्यांत भिजविलेली पट्टी लावावी. यव जाळून त्याचें भस्म करून त्याचा तिळाचे तेलांत लेप करावा. किंवा त्रिफळा, झांकण ठेवून खापरांत जाळावा, आणि त्याची राख व रेश- माची राख तेलांत मिळवून लावावी ह्मणजे अग्निव्रण शीघ्र नाश पावतात. पू वाहूं लागला ह्मणजे क्यारबोलीक ॲसीड १ भाग, शुगरलेड २ भाग, आणि साधें मलम (यादी नं. १८) किंवा वर सांगितलेलें लिनिमेंट क्यालसिस २० भाग हीं एकत्र करून त्याच्या पट्टया लावाव्या. मांस सडलें असल्यास तें कातून टाकावें, व पोटिसें बांधावीं. शाखा आर- पार जळली असल्यास उत्तम शस्त्रवैद्याकडून कापून काढावी. दहनापासून जे व्रण पडतात ते लवकर बरे होत नाहींत; जळल्यापासून उत्पन्न झालेल्या जखमेंतील अंकुर मोठे व सपाटीपेक्षां उंच वाढलेले असतात तेव्हां त्यांजवर कॉस्टीक (नाईट्रेट ऑफ सिल्व्हर) किंवा मोरचुताचा खडा एक दोन दिवसांनीं लावावा, आणि नंतर त्याजवर कापडाची घडी बांधावी. व्रण बरे होत असतात तेव्हां व्यंग न होण्याविषयीं जपावें लागतें. पायाच्या ठिकाणीं व्रण असल्यास पाय नेहमीं सरळ ठेवावा, हात वांकलेलाच ठेवावा, इतकें करूनही मावेच्या

अकुंचनानें व्यंग उत्पन्न झालें, तर उत्तम शस्त्रवैद्याकडून माव कापून काढावी.

**अंतरउपचार**—प्रथमअवस्थेंत रोगी थंड पडला किंवा त्याचें अंग कांपूं लागलें तर गरम पाण्यांनीं भरलेल्या बाटल्या, ऊन केलेल्या विटा अथवा कौलें यांनीं साधेल तेथें शेक करावा. उबदार कपडा अंगावर घालावा, ब्रांडी आणि पाणी एकत्र करून द्यावें, किंवा आल्याचा रस आणि खडीसाखर हीं एकत्र करून चाटावीं. अंगावर वारा येऊं देऊं नये. वेदना होत असल्यास एक चतुर्थांश ग्रेनपासून १ ग्रेनपर्यंत अफू द्यावी. दुसऱ्या अवस्थेंत ज्वर असतो तेव्हां पुढें लिहिलेलें औषध योजावें.

| | | |
|---|---|---|
| लायकर आमोनिया आसिटेटिस | .... | १ औंस. |
| स्पिरिट ऑफ् नाइट्रीक ईथर | .... | ३ ड्राम. |
| पोठ्याश नाईट्रस .... .... | .... | १ ड्राम. |
| कापराचें पाणी .... .... | .... | ६ औंस. |

हीं एकत्र करून त्याचे ६ भाग करावे व दरएक भाग प्रत्येक तीन तीन तासांनीं प्यावयास द्यावा किंवा फक्त पोठ्याश नाइट्रस (सूर्यखार) २ ड्राम, कापराचें पाणी ६ औंस हीं एकत्र करून वरल्याप्रमाणें द्यावें. दुसरे कांहीं विकार होतात तेव्हां त्यांचे उपचार त्या त्या रोगांत सांगितल्याप्रमाणें करावे.

**पथ्यः**—दूध, साबूदाण्यांची किंवा आरारूटची पेज, साधारण वाफलेलीं अंडीं, मांसरस (सूप) असें शक्ति राखणारें व पचनीय अन्न खावें. ऊन पाणी थंड झाल्यावर प्यावें.

**सूचनाः**—मोठाल्या वस्तींतून जेथें घरांची फार दाटी झाली असते, व जेथें मनुष्यांची अगदीं खीच होऊन गेली असते, तेथें किंवा जेथें कापूस, गवत किंवा त्यासारखेच दुसरे जलद पेट घेणारे पदार्थ सांठविलेले असतात, अशा ठिकाणीं आग लागली असतां हा प्रसंग घडून येण्याचा विशेष संभव असतो.

अलीकडेस केरोसीन किंवा राकऑईल नामक तेलानें तर हा प्रकार फारच स्वस्त करून सोडला आहे.

चुलीजवळ किंवा कोठेंही विस्तवाजवळ बसणें झाल्यास फार सावधगिरीनें बसावें. अस्ताव्यस्त चिरगुटें अंगावर घेऊं नयेत. स्वयंपाक करीत असतां लहान लेंकरास जवळ येऊं देऊं नये. कढत पदार्थ उचलीत असतां घाई करूं नये व ते हातांतून निसटतील अशा रीतीनें कधींच धरूं नयेत. अंगावरील कापडास आग लागली असतां धांवूं नये, व उभेंही राहूं नये; लागलीच जमिनीवर लोळण घ्यावें, किंवा जें कांहीं ( सत्रंजी घोंगडी वगैरे ) सांपडेल तें अंगाभोंवतीं घट्ट गुंडाळून घ्यावें, ह्मणजे वाऱ्याचा बंदोबस्त होऊन जास्त पेटणें बंद पडतें. पाणी सांपडल्यास तें अंगावर ओतून घ्यावें, ह्मणजे चिरगुटांचें जास्त पेटणें बंद होतें.

---

## सामान्य उष्णतेचीं कार्यें.

कधीं कधीं असें घडतें कीं, दूध, चहा, कॉफी, पाणी, वगैरे पिण्याचे पदार्थ कढत असतां आपण गैरसावधगिरीनें पितों, पण भाजण्याचा चटका लागतांच स्वभावतः आपण

तें लगेच थुंकून टाकतों. तरी तितक्यांतच ओंठ, तोंड, जीभ व घशाचा कांहीं भाग हीं भाजतात.

यावेळीं बर्फ चोखावें, दुधावरची थंड साय तोंडांत धरावी, काताच्या पाण्याच्या गुळण्या कराव्या, तोंड आल्यासारखें झाल्यास टांकणखाराची लाही मधांत मिळवून ती लावावी, किंवा फणसांबे पाण्यांत उगाळून ते लावावे, तिखट व कठीण पदार्थ खाऊं नयेत व पेजेसारखें हलकें अन्न खावें.

उन्हाळ्याच्या दिवसांत कधीं कधीं कडक ऊन असतां वाळवंटांतून अगर तापलेल्या जमिनीवरून अनवाणी चालण्याचा प्रसंग येतो, तेव्हां पाय भाजतात, तळपायांस फोड येतात, डोळ्यांची व मस्तकाची आग होते, वगैरे बरेच अपकार होतात.

त्यावेळीं मेंदीचीं ताजीं पानें पाण्यांत वाटून त्यांत थोडीशी खाटी ह्मणजे हरबऱ्यांवरील आंब (विनीगर) किंवा लिंबाचा रस मिळवून त्याचा तळपायास लेप करावा. खसखस पाण्यांत वाटून तिचें दूध व विनीगर एकत्र करून तें तळपायांस चोळावें व मस्तकासही थोडेसें चोळावें, ह्मणजे त्या ठिकाणच्या दाहाचें शमन होतें.

---

## धडकी.

### SHOCK.

**कारणें:**—शरीरावर कांहींसा मोठ्यानें आघात झाला असतां, किंवा शरीरास दुखापत झाली असतां, किंवा भयंकर ध्वनि अथवा आपल्यासंबंधानें दुष्परिणामी गोष्ट ऐकण्यांत आली असतां, व कधीं कधीं रक्तस्राव पाहिल्यानेंही धडकी उत्पन्न

होते. मनुष्याची प्रकृति आणि गुदरणाऱ्या प्रसंगाचा कमजास्त भयंकरपणा याप्रमाणें कमजास्त धडकी भरते. भितऱ्या मनुष्यास अल्प आघातापासून किंवा वर सांगितलेल्या कोणत्याही कारणानें जबर धडकी भरते, पण धीट मनुष्यास ती कमी भरते. तसेंच दुखापतीपासून फार वेदना होत असल्यास धडकी जोराची असते, किंवा ज्या अवयवांस इजा होते त्याच्या महत्वाप्रमाणें धडकी कमजास्त भरते.

**लक्षणें:**—कोणत्याही प्रकारें धडकी उत्पन्न झाली असतां रक्ताभिसरण, श्वासोछ्वास, ज्ञेयशक्ति व बुद्धि यांत फेरफार होतात. धडकी उत्पन्न होतांच मनुष्यास मूर्च्छा येते, घाम सुटतो, अंग गार होतें, कांपरी भरते, तोंड फिकें होतें, जीव व्याकूळ होऊन नाडी बारीक, क्षीण व अनियमित होते व श्वासोछ्वास मंद किंवा राहून राहून घडतो. कधीं कधीं मळमळतें व वांति होते. [वांति होणें हें चांगलें लक्षण समजावें.] नंतर शरीरव्यापार पूर्वीप्रमाणेंच घडूं लागतात दुखापत फार जबर असल्यास किंवा मर्मस्थानीं झाली असल्यास धडकी फार जोराची भरते, मनुष्य बेशुद्ध होतो. मलविसर्जनद्वारें शिथिल होतात. ह्या स्थितींत कधीं कधीं मरणही प्राप्त होतें, किंवा २४ तासांच्या सुमारास तो हळू हळू शुद्धीवरही येऊं लागतो, व हुशारी येते. ह्या स्थितीस प्रतिक्रिया असें ह्मणतात. ही प्रतिक्रिया कधीं कधीं जास्त, होऊन ताप भरतो, नाडी जलद, पूर्ण व रक्तानें भरलेली अशी वाहते व तोंड सुकतें, आणि शौचास साफ होत नाहीं हीं लक्षणें असतात.

**उपचार:**—धडकी अल्प असल्यास मनुष्यास उघड्या हवेवर आणावें, मानेला अगर छातीला चिरगूट गुंडाळलेलें असल्यास तें सैल करावें, तोंडावर थंड पाणी शिंपडावें, खिडक्या व दारें बंद असल्यास उघडावीं. नाकाशीं आमोनिया (यादी नं. २३) किंवा कांदा ठेंचून तो धरावा. थोडा आल्याचा रस व खडीसाखर किंवा तुळशीचा रस आणि मध हीं मिश्रण करून प्यावयास द्यावीं. गरम चहा किंवा कॉफी किंवा ब्रांडी आणि पाणी चमच्यानें थोडें थोडें पाजावें, ह्मणजे मनुष्य सावध होतो. एखादी जबर दुखापत होऊन धडकी बसली असल्यास स्वस्थ निजवून ठेवावें. दुखापत झालेला भाग क्लेश न होतील अशा स्थितींत ठेवावा, व वर सांगितलेले उपचार शुद्धीवर येईपर्यंत करावेत. अंग गार पडलें असल्यास ऊन पाण्याच्या बाटल्यांनीं किंवा विटा, कवलें, उष्ण करून त्यांनीं शेकावें व अंगावर उबेचीं वस्त्रें घालावीं. वेदना फार होत असल्यास १ ग्रेन अफीण पाण्यांत मिश्र करून ती पाजावी. किंवा लॉडेनम (अफिणीचा अर्क) १९ थेंब, व १ औंस पाणी असें मिश्र करून तें पाजावें. कोणतेंही औषध पिण्यास असमर्थता असल्यास तें बळजबरी करून पाजूं नये. कारण, बेशुद्धि असल्यामुळें तें श्वासोछ्वासाच्य नळींत जाण्याचा संभव असतो. अशा वेळेस फक्त नाकास अमोनिया लावावा, आणि अर्धा औंस ब्रांडी व १ औंस दूध एकत्र करून त्याचा बस्ती [ यादी नं० ८ ] गुदांत मारावा. अशा वेळीं शस्त्रवैद्य शस्त्रोपचार करीत नाहींत. कारण, धडकीचा जोर जास्त होऊन बहुधा मनुष्य मरण पावतो. कधीं कधीं चेंचरलेल्या शाखेच्या योगानें धडकी

जास्त होत जाते, तेव्हां थोडी बेशुद्धि करून शस्त्रवैद्य शस्त्रोपचार करितात, तेणेंकरून ती कमी होते. कधीं कधीं आघातापासून मनुष्य अर्धवट बेशुद्ध होऊन बडबड करूं लागतो, गातो, ओरडतो, व मारावयास धांवतो. ह्या स्थितीस **आघातजन्यप्रलाप** असें ह्मणतात. ह्या प्रकारांत डोकें तापतें, नाडी जलद व भरलेली वाहते, तहान लागते व मनुष्य अस्वस्थ होतो.

**उपचारः**—मस्तकावर बर्फ ठेवावें, किंवा डोक्याला ३—४ जळवा लावाव्या. वयाच्या मानानें सुमारें वीस वर्षांच्या वयास क्यालोमेल १० ग्रेन आणि ज्यालप पौडर १० ग्रेन, एकत्र करून तें मधांत चाटवावें, आणि पेज पाजावी.

आघातजन्य प्रलापांत कधीं कधीं क्षोभाचीं चिन्हें दृष्टीस पडतात. ह्या प्रकारांत मनुष्य तोंडांतल्या तोंडांत बडबड करितो, नाडी जलद व क्षीण असते, डोळ्याची बाहुली मोठी होते, अंग थंड पडतें, मुख फिकट किंवा चिंतातुर दिसतें, मनुष्य हातपाय इकडे तिकडे नाचवितो आणि जिव्हेवर पांढरा तवंग आलेला असतो. हा प्रकार बहुतकरून अशक्त मनुष्यांत आढळतो; बहुतेक उदाहरणांत ह्या प्रकारानें रोग्याचा वाईट परिणाम लवकरच होतो.

**उपचारः**—ह्या वेळेस अफू विशेष उपयोगाची आहे, ह्मणून झोंप येईतोंपर्यंत वयाच्या मानाप्रमाणें सुमारें वीस वर्षांच्या मनुष्यास ·॥· ग्रेन अफू २ किंवा ३ तासांनीं देत असावी. अशक्तता फार असली आणि रोग्याला दारू पिण्याची संवय असली तर अफू अर्धा ग्रेन व ब्रांडी अर्धा औंस, अशीं मिश्र करून प्यावयास द्यावीं. झोंप आल्यावर अफूचें प्रमाण कमी करावें, किंवा ती बंद करावी. दुसरे

दिवशीं रेचक द्यावें ( यादी नं० ३ ), ह्मणजे क्षोभाचीं कारणें लवकर दूर होतात.

**पथ्य:**—दूध, साबूची किंवा गव्हांच्या रव्याची पेज, मांसरस असे पदार्थ द्यावे.

## दाह.

INFLAMMATION.

दाहाचा संबंध बहुतेक रोगांशीं असल्याकारणानें त्याची माहिती प्रत्येकास असणें जरूर आहे.

**दाह:**—शरीराच्या कोणत्याही भागांत दाह झाला असतां तो दाहयुक्त भाग सुजतो, लाल होतो, त्यांत वेदना होऊं लागतात, तो उष्ण होतो व त्याच्या व्यापारांत आणि* पोषणांत फेरफार होतात.

वरील सर्व चिन्हें, दाह शरीराच्या बाहेरील भागांत झाला असतां स्पष्ट नजरेस पडतात. ह्याखेरीज दाहाचें अस्तित्व ठरविण्याचें आणखी एक साधन आहे. अंगाच्या उष्णमानाची वृद्धि ह्मणजे ज्वर, हें दाहाचें सार्वदेहिक लक्षण होय. हा ज्वर प्रकृतीच्या मानानें आणि ज्या भागांत दाह झाला असेल त्याच्या महत्वाप्रमाणें जास्त किंवा कमी तीव्र असतो. अंतरइंद्रियांतील दाह, स्थाईक ज्वर आणि त्या ठिकाणीं वेदना होऊं लागतात त्यावरून ओळखावा.

**दाहाचीं कारणें:**—दाह अनेक कारणांपासून उत्पन्न होतो.–दूषित हवा, रक्ताच्या स्थितींत पालट, अति मद्यपान,

* दाहयुक्त भागाचें पोषण कमी होतें, त्यामुळें तो भाग क्षीण होतो, किंवा मृदु होतो.

शरीरांत कांहीं पदार्थ शिरले असतां, शरीरावर आघात झाला असतां, क्षोभकद्रव्यें शरीरास लागलीं असतां, सर्द जागेंत निजलें असतां, किंवा शरीराच्या एखाद्या भागाचा व्यापार नित्य जास्त घडल्यानें, तसेंच शरीराच्या मलापासून विकृत पदार्थ उत्पन्न होऊन ते शरीरांत राहिले असतां दाह उत्पन्न करितात—" मुतखडा " ह्यापासून मूत्रमार्ग आणि मूत्राशय हीं दाहयुक्त होतात, हें एक याचें उदाहरण होय.

## दाहाचे प्रकार.

१ तीव्र अथवा शीघ्र दाह, २ विलंबी—जुना दाह, ३ सौम्य दाह, हे दाहाचे मुख्य प्रकार आहेत.

## दाहाचे परिणाम.

१ दाहचिन्हें नाहींशीं होऊन त्या भागाचे व्यापार पूर्ववत् होऊं लागणें, २ दाहाचें स्थलांतर होणें ह्मणजे दाह एके ठिकाणांतून नाहींसा होऊन दुसऱ्या ठिकाणीं उद्भवणें, ३ दाहयुक्त भागांत पू होऊन तेथें क्षत पडणें व ४ दाहयुक्त भाग सडणें.

**उपचारः**—शरीरावर आघात होऊन आघातस्थानीं पदार्थ शिरला असल्यास तो काढून टाकावा व त्या ठिकाणीं थंड पाण्याची घडी ठेवावी. तो भाग स्थिर ठेवावा, लोंबकळत ठेवूं नये, उंच करून ठेवावा, नाहींतर त्या ठिकाणीं रक्तसंचय होऊन सूज जास्त वाढते. निजून असावें आणि पेज किंवा मांसरस यांवांचून दुसरें कांहीं खाऊं नये.

रक्तदोषापासून दाह उत्पन्न झाला असल्यास यकृत व आंतडीं ह्यांच्या क्रिया वृद्धिंगत कराव्या व रेचक औषध द्यावें.

पांच ग्रेन क्यालोमेल, आणि पांच ग्रेन कांपाउंड एक्स्ट्राक्ट ऑफ् कालसिंथ ह्यांची गोळी करून द्यावी, आणि तीन तासांनीं सेडलीस पावडर द्यावी (यादी नं. २० ). किंवा म्याग्निशियाचा जुलाब द्यावा ( यादी नं. ११ ). ताप भरला असल्यास घाम आणणारें औषध (यादी नं. ४ ) द्यावें. किंवा व्हैयनम् अंटीमोनियेलीस २० मिनिम्स, लैकर अमोनिया आसिटेटीस २ ड्राम, क्यांफर वाटर १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ द्यावें. शौच साफ होण्यासाठीं ह्या मिश्रणांतन एक किंवा दोन ड्राम म्यागनिशिया सलफस मिळवावा.

दाहयुक्त भागांत कठीणपणा बराच असल्यास त्या ठिकाणीं काळ्या मलमाची पट्टी लावावी (यादी नं. १६ ). [illegible]क्षां फांसण्या टाकून किंवा जळवा लावून रक्त काढावें.

जळवा दाहयुक्त भागाच्या बाजूस लावाव्या. वृषण व पापण्या ह्यांजवर जळवा लावूं नयेत, तसेंच शिरेवरही जळवा लावूं नयेत. जळवा सुटल्यावर त्या ठिकाणीं उष्ण पाण्याचा शेक करून कांहीं जास्त रक्त वाहूं द्यावें. कधीं कधीं जळवा लावलेल्या स्थानापासून रक्त वाहणें बंद होत नाहीं, तेव्हां तें दाबानें किंवा तुरटीची पूड, अथवा हळदीची भुकणी, किंवा मायफळाची भुकणी किंवा ल्यूनर कास्टिक (काडीखार) लावून बंद करावें.

अशक्त मनुष्यास दाह उत्पन्न झाला असल्यास रेचकें, रक्त काढणें, हीं बहुधा योजूं नयेत. दाहयुक्त भागांत लाली फार असल्यास त्यावर शुगरलेडच्या पाण्याची ( यादी नं. २१ ) किंवा कोलनवाटर आणि पाणी अथवा व्हिनीगर आणि पाणी ह्यांत भिजविलेली कापडाची घडी रात्रंदिवस भिजलेली ठे-

वावी; परंतु कमी असून ठणका फार होत आहे तर अफि-णीच्या बोंडाचा काढा करून त्याचा त्या ठिकाणीं शेक करावा. किंवा आळशीचीं अथवा गव्हांचीं पोटिसें बांधावीं. ( यादी नं. १० ). ह्मणजे दाहायुक्त भागाचा ताठपणा मोडून वेदना कमी होतात व पू होण्यास मदत होते. पू झाला ह्मणजे त्या ठिकाणीं छेद करून पू काढावा. नंतर आणखी एक दोन दिवस पोलटिसें बांधून सर्व पुवाचा निकाल झाला ह्मणजे जखम भरणाऱ्या मलमाच्या पट्टया लावाव्या ( यादी नं. १७ ). ह्यावेळीं क्षीणता आली असल्यास ब्रांडी मिक्श्चर ( यादी नं. १ ) द्यावें किंवा बायकार्बोनेट ऑफ् अमोनिया तीन ग्रेन, टिंक्चर सिंकोना को० ३० थेंब, स्पिरीट अमो-निया अरोम्याटिक २० थेंब, डिकाक्टं सिंकोना १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ द्यावें.

दाह जुना अथवा फार दिवसांचा झाल्यावर त्या ठिकाणीं ब्लिस्टर ( यादी नं. २२ ) मारावें. किंवा कॉस्टीक पोट्याश आणि चुना पाण्यांत गंधाप्रमाणें घोंटून त्याचे कसल्या तरी काडीनें दाहयुक्त भागावर इंच दीडइंचाच्या अंतरानें लहान लहान टिपके द्यावे, ह्मणजे १० मिनिटांनीं तेवढीच जागा जळून जाते. जळलेल्या ठिकाणीं आग होत असते त्यावर नुसत्या पाण्याची किंवा व्हिनीगर आणि पाणी ह्यांत भिज-विलेल्या फडक्याची घडी ठेवावी. पुढें एक दोन दिवसांनीं गव्हांचें किंवा अळशीचें पोलटीस सुरू करावें ह्मणजे डांब वाहूं लागतात. हे डांब दाहयुक्त भागांतील सूज व वेदना नाहींशा होईपर्यंत वहात ठेवले पाहिजेत. डांब वहात रहाण्या-करितां त्यांवर लोण्याची किंवा सब्हीन आइंटमेंटच्या पट्टया ला-

वाव्या. पुढें दाहाचें शमन होऊन दाहयुक्त भाग पूर्वस्थिती-वर आल्यानंतर नुसत्या तेलाच्या किंवा जखम भरून आण-णाऱ्या मलमाच्या पट्या लावाव्या ह्मणजे जखमा भरून जातात.

---

## वातरक्त किंवा नात्रिकरक्तपित्त.

SCURVY.

**वातरक्त** ह्मणजे पोषणव्यापार आणि रक्त ह्यांच्या स्थितीचा पालट. हा पालट अपूर्ण आणि असत्व आहारानें उत्पन्न होतो. **डा० ग्यारड** लिहितात कीं, या विकारांत रक्त दूषित झालेलें असतें, व त्यांतील पोट्याश क्षार कमी झालेले असतात. मुख्यत्वेंकरून हा विकार खलाशी, यात्रे-करू, कोळी, बंदिवान, मिठागरांत काम करणारे अशा सर्व लोकांत फार पहाण्यांत येतो. आलीकडे ह्याचे प्रतिबंधक उपाय योजण्यांत आल्यामुळें त्याचें प्राबल्य बरेंच कमी झालें आहे; तथापि हा रोग हिंदुस्थानांतील बहुतेक गरीब जातींच्या लोकांत बराच पहाण्यांत येतो.

**कारणें:**—वातरक्ताच्या कारणांविषयीं फार विचार आहे, तथापि वर सांगितलेल्या लोकांनीं त्यांनीं पत्करलेल्या उद्यो-गामुळें ह्मणा किंवा त्यांच्या गरीबीमुळें ह्मणा त्यांस शुद्ध हवा, ताजीं फळें, ताज्या भाज्या, दूध, लिंबें वगैरे पदार्थ मिळणें अशक्य असतें आणि त्यामुळें हा रोग त्यांस होतो.

कुजट किंवा मिठांत पुष्कळ दिवस पुरून ठेविलेलें मांस, बाधक पाणी, शिळ्या आणि साधारण कुजलेल्या भाज्या

किंवा फळें, हीं खाण्यांत आल्यानें, तसेंच अशुद्ध हवा, उतार-वय, अतिश्रम आणि ज्या कोणत्याही गोष्टींनीं क्षीणता उत्पन्न होते, तीं सर्व ह्या रोगाच्या उत्पत्तीस अनुकूल कारणें होतात.

**लक्षणें:**—ह्या विकाराला हळू हळू प्रारंभ होतो, आणि जसजसा हा रोग वाढत जातो तसतशीं त्याचीं लक्षणेंही भयंकर होत जातात. ह्या रोगाचें मुख्य लक्षण ह्मटलें ह्मणजे हिरड्या फुगणें व स्पंजासारख्या विसविशीत होणें. कधीं कधीं त्या इतक्या फुगतात कीं, दांतांचा बहुतेक भाग त्यांत अगदीं गढून जातो, त्यांचा रंग बदलतो, ह्मणजे त्या निळसर जाभ-ळ्या रंगाच्या होतात आणि त्यांस किंचित् धक्का लागल्यानें त्यांतून रक्त वाहूं लागतें. भयंकर प्रकारांत हिरड्या सडूं लागतात व तेथील मांसाचे तुकडे गळून पडूं लागतात. त्यामुळें त्यांतून एकसारखें थोडें थोडें रक्त वहात असतें. आणि दांत व जाभाडा यांचीं हाडें उघडीं पडतात, यामुळें अन्नचर्वणास मोठी अडचण होते, दांत ढिले होतात, पडूं लागतात किंवा दाभाडाच्या अस्थींचा बहुधा जीवन्नाश ( निक्रोसिस विकार ) होतो, आणि तोंडास दुर्गंधी येऊं लागते. मुखचर्येंत पालट होतात. तोंड फिकट, मळकट व सुजीर होतें. पापण्यांच्या आंतील त्वचा आणि ओंठ हीं निस्तेज ह्मणजे पांढरवट झालेलीं असतात. नाडी मंद, मृदु व सहज दबण्याजोगी [ निर्बल ] अशी असते. क्वचित् ज्वर असतो, क्षुधा मंद, परंतु अन्न चावण्याचें किंचित् सामर्थ्य आलें ह्मणजे ती पुन्हां प्रदीप्त होऊं लागते. पाय सुजून वेदनायुक्त होतात. विशेषतः जांघेच्या मागल्या स्नायूंत असें फार होतें. पायांस सूज येऊन ते मोठे होतात. नंतर लवकरच शारीर

व मानसिक शक्ति क्षीण होते. ह्मणजे ज्या कामांत विशेष विचार लागतो अशा कामाकडे मन लाववत नाहीं; किंचित् व्यायामानें ऊर धडधडूं लागतो, श्वासोच्छ्वास जलद व कोंडल्यासारखा होतो, मूर्छा येते, अंगावर रंगीबेरंगी आरक्त ठिपके आणि मोठमोठालीं चकांदळें उठतात. नाक, तोंड, आंतडीं व मूत्राशय यांपासून रक्तस्राव होऊं लागतो, आणि मनुष्य इतका कांहीं क्षीण होतो कीं, त्यास अल्प चलनवलनानेंही मरण्याची भीति असते. अशा रोग्याचें अंग किंचित् घांसटलें किंवा त्याचे आंगावर एखादें लहानसें क्षत असलें तर लागलींच त्यास मोठें विक्राळ स्वरूप प्राप्त होतें. तें असें कीं, प्रथम क्षताची सपाटी काळसर असते, आणि तीवर रक्त सांकळून काळी जाड व क्षतास बद्धक अशी खपली धरते. ती काढली असतां त्यांतून पुष्कळ रक्त वाहतें. क्षतांत तीव्र वेदना होत असतात, व त्याचे कांठ वांकडे तिकडे आणि सुजलेले असतात. ह्या वेळेच्या पूर्वीं कांहीं दिवस शरीरांतील हाड मोडलें असून तें संयोग पावत असतांही त्यांतील संयोगी द्रव्याचें शोषण झाल्यामुळें पुन्हां तें हालूं लागतें. हा रोग शरीरामध्यें विशेष जोराचा असून जर दुर्दैवानें त्याच वेळीं, विशेष ग्लानि, आमातिसार अथवा अति रक्तस्राव किंवा एखाद्या अंतरिंद्रियांत दाह उत्पन्न होऊं लागला, तर हा रोग असाध्य आहे असें समजावें.

**उपचारः**—ह्या रोगांत पथ्य हेंच मुख्य औषध होय, ह्मणून पथ्याचा बेत योग्य राखल्यानें वातरक्ताचा प्रतिबंध होतो. जहाजावरील खलाशी लोकांस ताज्या भाज्या मिळत नसल्यामुळें त्यांस लिंबाचा रस किंवा दूध हीं दिलीं असतां

वरींच उपयोगीं पडतात. आहार पुरता व पोषक दिल्यानें तसेंच स्वच्छता आणि हवेचा संचार ह्यांकडे लक्ष दिल्यानें बराच उपयोग होतो. जलप्रवासी लोकांस झालेला वातरक्त-विकार बहुधा लवकरच बरा होतो. त्यांस ताजीं फळें, जेव-णाबरोबर खाव्या लिंबांचा रस, संत्रें, नारिंगें, पपनस, डाळिंब आणि ताज्या भाज्या—बटाटे, कोबी, शलगम, मुळे, दुधी-भोपळे, भेंड्या, माठ, तांदुळजा, इत्यादि उत्कृष्ट आहेत. शिजविलेल्या भाज्यांपेक्षां हिरव्यांच्या आंगीं अधिक वातरक्तघ्न गुण असतात, अशी युरोपियन लोकांची समजूत आहे. दुधाच्या अंगींही वातरक्तघ्न गुण आहेत, ह्मणून शेर अच्छेर किंवा पचेल तितकें दूध प्यावें. प्रकृति अशक्त झालेली असते, ह्मणून प्रत्येक जेवणाच्या वेळेस औंस दीड औंस शेरी वाईन प्यावयास द्यावी. पुढें चावण्याची शक्ति आली ह्मणजे खपत असल्यास थोडें थोडें ताजें शिजविलेलें मांसही खावयास द्यावें. हिरड्यांत वेदना होत असून तोंडांत क्षतें पडलीं असलीं आणि रक्तही वाहत असलें, तर फटकीची पूड १ तोळा, अफू ५ ग्रेन, मध २ तोळे, कापराचें पाणी १ पैंट ( सरासरी ब्रांडीची बाटली भरून ) हीं सर्व एकत्र करून त्याच्या दिव-सांतून १०—१५ वेळ गुळण्या कराव्या. किंवा टिंक्चर आफ् मऱ्ह १॥ औंस, आसीड टानीक २ ड्राम, पाणी १ पैंट, हीं एकत्र करून त्याच्या गुळण्या कराव्या. नाहींतर बाभळीची साल, हिरडे, बेहडे ह्यांचा बाटलीभर काढा करून त्यांत २ ड्राम क्लॉरेट आफ् पोट्याश मिळवून त्याच्या गुळण्या कराव्या. दुर्गंधी येत असल्यास कॉंडीस फ्लुइड २ ड्राम, पाणी १ पैंट हीं एकत्र करून त्याच्या वारंवार

गुळण्या कराव्या. मलशुद्धि होत नसल्यास ऊन्ह पाण्याचा बस्ती मारावा [ यादी नं. ८ ]. भूक व शक्ति सुधारण्याकरितां लिंबाचा रस १ औंस, साखर २ तोळे, क्लॉरेट आफ् पोट्याश १ ड्राम, ( वेदनेमुळें झोंप येत नसल्यास त्यांतच १ ड्राम टिंक्चर ऑफ ओपीयम मिळवावें ) **डिकॉक्शन सिंकोना ६** औंस, हीं सर्व एकत्र करून त्याचे ६ भाग करावे आणि दिवसांतून तीन वेळ याप्रमाणें दोन दिवस पुरवावें. हें मिश्रण बरेंच दिवस चालू ठेवावें. नंतर टिंक्चर आफ् आयर्न १ ड्राम, क्किनाईन सल्फस १२ ग्रेन, आसीड साइट्रीक १॥ ड्राम, क्लोरेट ऑफ पोट्याश १ ड्राम, पाणी ६ औंस, हीं एकत्र करून वर सांगिल्याप्रमाणेंच घ्यावें, ह्मणजे क्षुधा व शक्ति वाढून रक्त सुधारतें. पायांवर व्रण पडलेले असतात, त्यांवर पिकवणें बांधावीं किंवा क्रियाझोटचें मलम लावावें. त्याची कृतिः—

| | |
|---|---|
| क्रियाझोट ... .... ... | १ ड्राम |
| साधें मलम .... .... .... | १ औंस व त्यांतच |
| आफू .... .... .... .... | ५ ग्रेन |

अशीं मिश्र करून लावावीं. किंवा

| | |
|---|---|
| हिराकस .... .... .... | १ तोळा |
| अफू .... .... .... | ॥ मासा |
| पाणी .... .... .... | १६ औंस |

ह्या मिश्रणांत भिजविलेली कापडाची घडी व्रणावर वारंवार भिजवून ठेवावी ह्मणजे व्रण भरून येतात.

**सूचना**—तीव्र प्रकारांत मूर्छेनें मृत्यु येण्याचा संभव असतो, ह्मणून वातरक्तग्रस्त रोग्यानें पूर्ण लक्षांत ठेवावें कीं, कितीही क्षुल्लक जोराचें काम असलें तरी तें त्यानें करूं नये.

---

## गलबत लागतें त्याविषयीं

किंवा

## जलप्रवाससंबंधीं बाधा.

SEA SICKNESS.

कित्येक लोकांना जलप्रवास फार बाधतो, ह्मणजे ते गलबतांत, नावेंत, किंवा आगबोटींत बसून परगांवीं जाऊं लागले ह्मणजे, त्यांचे पोटांत ढवळून उलट्या होऊं लागतात, मस्तक दुखतें, भोंवळ येऊं लागते, आणि बिलकूल चैन पडत नाहींसें होऊन ते अगदीं सुस्त पडून असतात. त्यांना खाणें पिणें देखील बिलकूल आवडत नाहींसें होतें. ही स्थिति गलबतांत बसल्यापासून तों जमिनीवर उतरल्यावरही चार आठ दिवस तशीच असते.

हिंदुस्थानांतील बहुतेक फेरी आगबोटींतून अशी कांहीं गैरव्यवस्था पहाण्यांत आली आहे कीं, स्त्रीपुरुषांना बसण्याकरितां एकच जागा असून तीही फार गलिच्छ असते. कित्येक उतारू वांती वगैरे होऊं लागल्यास तेथेंच ह्मणजे आपल्या उशापाशीं, अंथरुणावर व कधीं कधीं शेजारचे मनुष्याचे अंगावरही ओकतात, त्यामुळें व गलबतांत सांचलेलें मलीन पाणी ज्याला लोक "घमत" असें ह्मणतात त्या योगानें गलबतावर एक प्रकारचा दुर्गंध सुटलेला असतो,

तेणेंकरून ज्यांना गलबत लागत नाहीं अशा मनुष्यांनाही एखादे वेळीं गलबत लागूं लागतें.

कित्येक मनुष्यांना बैलगाडी, आगीची गाडी, झोंपाळा वगैरे लागतात, ह्मणजे त्यांना त्यांत बसल्यानें गलबत लागण्यासारखेच विकार होऊं लागतात, असेंही कित्येकांच्या पाहण्यांत आलें असेल. पित्तप्रकृति मनुष्यांस आणि विशेषेंकरून स्त्रियांस गलबत फारच लागतें.

**उपचारः**—जलपर्यटण करण्यापूर्वी एखादा हलकासा जुलाब घ्यावा (यादी नं. ११). किंवा वांतीचें औषध (यादी नं. २) घ्यावें, ह्मणजे गलबत फारसें लागत नाहीं. गलबत गतींत असतां स्वस्थ पडून असावें, व मधून मधून थोडी थोडी तयार केलेली काफी किंवा बर्फानें थंड केलेलें दूध अथवा लाह्यांचें पीठ आणि दूध अशीं घ्यावीं. आणि गलबत वर खालीं होत असतें त्याबरोबर अनुक्रमानें श्वास बाहेर सोडावा व आंत घ्यावा, ह्मणजे शरीरांतील अवयव स्थिर होऊन गलबत लागत नाहीं. कित्येक लोक आपल्याला गलबत लागूं नये ह्मणून बरोबर आंवळ्याच्या वड्या* नेतात, तेणेंकरून उलट्या वगैरे होत नाहींत, व तोंडास चांगली रुचि राहते.

**लेमोनेड** घ्यावें (यादी नं. २९), अथवा १० ग्रेन **हायड्रेट क्लोरल** आणि १ औंस ब्रांडी हीं एकत्र करून घ्यावीं; किंवा **हायड्रेट क्लोरल** २० ग्रेन, **च्यांपेन** किंवा

* आंवळ्याच्या वड्या तयार करण्याची कृतिः—आंवळे उकडून त्यांतील बिया काढून टाकाव्या, व त्यांत थोडेंसें मीठ व जिरें मिळवून बारीक वाटावें, नंतर त्याच्या वड्या करून उन्हांत सुकवाव्या.

व्हिस्की अर्धा औंस, अशीं एकत्र करून त्यांत थोडें बर्फ टाकून प्यावें, ह्यानें बरें न वाटल्यास असेंच आणखी तीन तासांनीं एक वेळ करून प्यावें ह्मणजे स्वस्थ झोंप लागते, व निजून उठल्यावर गलबत लागत नाहीं. स्पिरिट अमोनिया अरोम्याटीक १० थेंब, इथरसल्फ्युरिक १० थेंब, हीं बत्ताशांत किंवा साखरेंत मिळवून खावीं, अथवा लिंबांचा रस, आल्याचा रस, आणि खडीसाखर हीं एकत्र करून तें थोडें थोडें चाटावें ह्मणजे गलबत लागत नाहीं.

---

## क्षुधानाश.

### LOSS OF APPETITE.

**क्षुधानाशः**—ह्मणजे भुकेचा मोड किंवा ती अगदीं नाहींशी होणें.

**कारणेंः**—अति मद्यपान, अवेळीं भोजन, उष्ण आणि अतितर पौष्टिक पदार्थ सतत खाल्ल्यानें, कढत कढत चहा पुष्कळ वेळां प्याल्यानें, चिंताग्रस्त झाल्यानें, आळशी बसून राहिल्यानें, कित्येक रोगांच्या संबंधानें, आणि रहाण्याचे ठिकाणची हवा, पाणी वगैरे वाईट असल्यानें, क्षुधेचा नाश होतो.

**उपचारः**—कारणें दूर करावीं, आणि जठराग्नीची शक्ति वाढविण्याकरितां सिंकोना बार्क १ तोळा, क्यासकरीला बार्क १ तोळा, हीं दोन्ही औषधें साधारण कुटून १॥ शेर पाण्यांत शेरभर बाकी राहीतोंपर्यंत उकळावीं, नंतर गाळून त्यांत टिंक्चर सिंकोना २ औंस, आसीड नैट्रीक-डिल्यूट १॥ ड्राम हीं सर्व एकत्र मिसळून १ औंसप्रमाणें दिवसांतून तीन चार वेळ प्यावें. किंवा आसीड नैट्रोम्युरीयाटिक-डिल्यूट

१० थेंब, टिंक्चर जेन्शियन ३० थेंब, टिं० न्यूसिस व्हामिका १० थेंब, इनफ्यूजन काशिया १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां प्यावें. किंवा कोलंब काचरी २ तोळे, बडीशेप २ तोळे, बाळहर्तकी २ तोळे, सैंधव २ तोळे, संचळ २ तो०, दालचिनी १ तो०, लवंग १ तो०, सुंठ १ तो०, वेलची १ तो०, पिंपळी १ तो०, मिरें १ तो०, कुचला पाव तोळा, ह्या सर्वांची वस्त्रगाळ पूड करून ती सकाळसंध्याकाळ पाव तोळाप्रमाणें पाण्यांत घ्यावी ह्मणजे क्षुधा प्रदीप्त होते.

---

## अतिसार–हगवण.

DIARRHŒA.

हा रोग पुष्कळ कारणांपासून उत्पन्न होतो. दूषित पाणी, अति आहार, वाईट आणि अपचनीय अन्न, (मिठाई, डाळ, गहूं, मक्याचीं कणसें, कोद्रू, हरिक इ०) रेचक औषधांचा अतियोग, क्षोभकविषें, (पारा, सोमल इ०) तसेंच कडक दारू पिण्यांत आल्यानें, अति श्रम झाल्यानें, चिंता किंवा एकाएकीं मनाला धक्का पोंचल्यानें अतिसार उत्पन्न होतो. दाट वस्तींत राहिल्यानें, गटारें मोऱ्या वगैरेंतून निघालेल्या वायूनें हा रोग उत्पन्न होतो. अति उष्ण किंवा थंड हवा, ओलावा आणि बराच वेळ थंड पाण्यांत राहणें ह्या सर्व प्रकारांनीं अतिसाराचा रोग उत्पन्न होतो. शरीराला पुष्कळ घाम येत असतांना त्यावर वारा घेतल्यानेंही हा रोग होतो. भिजक्या व दलदलीच्या जमिनीपासून उत्पन्न होणाऱ्या वायू-

च्या (मलेरियस पायझन) योगानेंही हा रोग होतो असें पुष्कळ वैद्यांचें मत आहे.

अतिसार हा कित्येक रोगांच्या प्रारंभाचें किंवा शेवटचें चिन्ह होय. जसें—**पटकी**, सन्निपात ज्वर, कफक्षय **संग्रहणी**, **कृमिरोग** (जंत) पित्ताधिक्यानें आणि लहान मुलांना दांत येण्याचे वेळीं हगवण लागते.

**लक्षणें:**—पाण्यासारखे पातळ, तांबूस, किंवा पिंवळट पांढऱ्या रंगाचे ढाळ होतात, कधीं कधीं त्यांत अपचनीय अन्नाचे तुकडे किंवा फेंसाळलेला मळ असतो, जिव्हा मलानें लिप्त किंवा लाल भडक असते, तृषा लागते, पोटांत मुरडल्या-सारख्या किंवा टोंचल्यासारख्या वेदना होत असतात, गुरगुरतें, शौचाचे वेळीं कुंथावें लागतें, आणि मलाशयाच्या खालच्या भागीं जळजळ होऊन शौचास होतें. ह्याबरोबर कधीं कधीं वांतीही सुरू असते आणि दुसरीं सर्व पटकीसारखीं चिन्हें उद्भवतात, परंतु मूत्रविसर्जन बंद पडत नाहीं. आणि पट-कीसारखा घातक परिणाम क्वचित्च घडतो. त्यावरून हा रोग पटकीपासून वेगळा ओळखावा.

**परिणाम:**—अतिसार फार दिवस चालू राहिल्यानें तो जुना होतो. शेवटीं रोगी क्षीण होत जाऊन मरतो, किंवा त्याचा परिणाम संग्रहणींत होतो.

**उपचार:**—कारण शोधून तें दूर करावें. ढाळ पुष्कळ नसून थोडेच वेळ होत आहेत तर ते बहुधा आंतड्यांतील क्षोभ नाहींसा होतांच आपोआप बंद होतात. कांहीं क्षोभा-पासून हगवण सुरू असल्यास एरंडेलाचा जुलाब (यादी नं. ७) किंवा सेडलीस पावडर [यादी नं. २०] किंवा ऱ्हुबार्ब

टिंक्चर १–२ ड्राम द्यावें. ह्या सर्वांबरोबर टिंक्चर ऑफ् ओपियमचे [अफूचा अर्क] ५ थेंब मिश्र करून दिले असतां चांगला फायदा होतो. एवढ्यानें ढाळ बंद न होतील तर पल्व्हीसक्रेटा अरोम्याटीकम्‌ओपि १० ग्रेन, बिस्मथकार्बोंनस १० ग्रेन असें घोटभर पाण्यांत मिश्र करून दिवसांतून ३–४ वेळां द्यावें, किंवा असिडग्यालिक ५ ग्रेन, असिडसल्फ्युरिक डिल्यूट १० थेंब, टिं. ऑफ् ओपियम् १० थेंब, गोंदाचें पाणी ॥ औंस, पाणी १ औंस असें दिवसांतून ३–४ वेळ द्यावें. किंवा क्लोरोडाईनचे दहा दहा थेंब घोटभर पाण्याशीं मिश्र करून ढाळ बंद होईतोंपर्यंत वारंवार द्यावें. किंवा ब्रांडी [१–२ ड्राम] आणि पाणी वारंवार द्यावें. किंवा डोव्हर्सपावडर १० ग्रेन, ब्रिस्मथकार्बोंनस् १० ग्रेन असें दिवसांतून ३–४ वेळां द्यावें. पोटावर पोटिसें बांधावीं, किंवा तें कापडाच्या पोतंड्यांनीं शेकावें.

विलंबी प्रकारांत पिलप्लंबायकम्‌ओपि ३–४ ग्रेन दिवसांतून तीन वेळ द्यावी, किंवा आसिडहैड्रोक्लोरिक डिल्यूट १० थेंब, टिं. ओपी १० थेंब, पेपसीन १० ग्रेन, बडीशेपाचा काढा २ औंस, असें दिवसांतून ३–४ वेळ द्यावें. पोटा भोंवतालीं लोंकरीचा पट्टा गुंडाळावा, आणि स्वच्छ व कोरड्या हवेवर रहावयास जावें.

हगवण ही जेव्हां एखाद्या रोगाचें चिन्ह असते तेव्हां ती त्या रोगाचे उपचार केले असतां बहुशः बरी होते.

## मराठी वैद्यांचीं औषधें.

इंद्रजव, नागरमोथे, धायटीचीं फुलें, लोध्र, बेलफळ, सुंठ, अजमोदा, पहाडमूळ, सांवरीचा चीक, हीं सर्व समप्रमाणानें

घेऊन त्यांची वस्त्रगाळ पूड करावी आणि त्यांतील १ तोळा पूड दिवसांतून दोन तीन वेळां थोडा गूळ आणि ताक ह्यांशीं मिश्र करून घ्यावी. २ तोळे कुड्याची साल, १ तो० बाळ-वेल, १ तो० अतिवीष, १ तो० आंब्याची कोय, १ तो० नागरमोथे, १ तो० लोध्र, १ तो० धायटीचीं फुलें, १ तो० डाळिंबाची साल, १ तो० पहाडमूळ, यांत १ शेर पाणी घालून पावशेर काढा वगळावा, नंतर गाळून त्यांत मध व सावरींचा चीक घालून सकाळ संध्याकाळ घ्यावा.

निंबसाल, धने, कडू पडवळ, सुंठ, किराईत, बेलफळ, काळावाळा, नागरमोथे, हरडेदळ, बेहडेदळ, कुड्याची साल, हीं सर्व तोळा तोळा प्रमाणानें घेऊन त्यांचा वरीलप्रमाणें काढा करून घ्यावा.

अतिवीष, हरीतकी, कुड्याची साल, डाळिंबाची साल, दाल-चिनी, धने, वाळा, नागरमोथे, सांवरीचा चीक, बडीशेप, किर-मानी ओवा, धायटीचीं फुलें, सुंठ, मिरे, पिंपळी, कापूर, जाय-फळ, अफू, भांगेची पत्ती, हीं सर्व समप्रमाणानें घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें, ह्यापैकीं १–२ मासे चूर्ण पाण्याबरोबर दिवसांतून दोन तीन वेळां घ्यावें. हें चूर्ण १ वर्षाचे मुलास फार जपून द्यावें. फारतर ।।–१ गुंज इतकेंच. शौचाचें मान कमी झालें किंवा गुंगी आली असतां तें एकदम बंद करावें.

हे सर्व उपाय अतिसारावर फार प्रशस्त आहेत. ह्या उपा-यांनीं अतिसार बंद होतो इतकेंच नाहीं, परंतु संग्रहणीही बंद होते व क्षुधा प्रदीप्त होते.

**पथ्यः**—दूधभात, तूपभात, साबूंची किंवा आरारूटची पेज आणि लहान मुलांना थोडें दूध आणि चुन्याची निवळ ( ५–१० थेंब ) असें मिश्र करून द्यावें.

---

# संग्रहणी.

DYSENTERY.

हा रोग थोडाबहुत सर्व जगभर पसरला आहे. आणि आपल्या हिंदुस्थान देशांत तर ह्याचें प्राबल्य फार आहे. संग्रहणी हा रोग सांसर्गिक आहे, अशी पुष्कळांची खात्री झाली आहे. हा रोग कधीं कधीं एखाद दुसऱ्यासच होतो, किंवा एकदांच हजारों लोकांस होतो. आणि कांहीं प्रसंगीं जेथें मनुष्यांची दाट वस्ती आहे अशा स्थळांतून ह्मणजे आरमारांतील, सैन्यांतील, व तुरुंगांतील लोकांतून उत्पन्न होऊन पुष्कळ मनुष्यें मरतात.

**कारणें**:—अतिसाराचीं जीं कारणें तींच ह्या रोगाचीं कारणें होत. संग्रहणीचे कालमानेंकरून दोन प्रकार केले आहेत—१ शीघ्र, व २ विलंबी ( जुनी ).

**लक्षणें**:—पोटांत मुरडा होऊन वारंवार शौचास होतें, व शौचांत रक्त व आंव पडते. पोट चेपलें ( बहुतकरून पोटाचे खालीं डावे बाजूस ) असतां दुखतें, कधीं कधीं पोटाला फुगवटी धरिते, उमासे येतात, आणि वांत्या व मूत्रकृच्छ्र ( तिडका लागून मूत्र होणें, ) हीं लक्षणें असतात. संध्याकाळचे वेळीं किंचित् ज्वर भरतो, मलाशयाच्या खालच्या भागीं आग व जडत्वाचा भास होतो, पोटांत आग होत असते, तृषा लागते, नाडी जलद व क्षीण होते, क्षुधानाश

होतो, हात पाय गळाठल्यासारखे होतात आणि तोंड ओढलेलें व डोळे खोल गेलेले असतात. वारंवार शौचास जाण्याची इच्छा होते, परंतु शौचास गेलें असतां फक्त मुरडा होऊन दहापांच थेंब रक्त किंवा आंवच पडते. नंतर कांहीं वेळपर्यंत सुख वाटतें. पुढें जसजसा रोग वाढत जातो तसतसा मळ अधिकाधिक पातळ होतो. त्यांत काळसर पातळपणा असून सांकळलेल्या रक्ताचे गोळे पडतात. किंवा सडलेल्या त्वचेचे चिंध्यासारखे पापुद्रे पडतात. यापेक्षांही वर्धमान अवस्था झाली ह्मणजे पाण्यासारखा स्राव होऊं लागतो, व त्याला कांहीं विलक्षण प्रकारची दुर्गंधि येते. ह्यावेळीं मळाचा रंग तांबडा, कच्चें मांस धुतलेल्या पाण्यासारखा असतो. असें झालें ह्मणजे सार्वदेहिक लक्षणें फारच तीव्र होऊन ज्वराचा जोर ज्यास्त होतो. आंग एकसारखें कढत व कोरडें असतें, नाडी जलद असते, किंवा आंगाला घाम येऊन नाडी क्षीण होते व सहज दाबली जाते, पोट फुगलेलें व टमटमीत होतें, जीभ कोरडी आणि धूसर होते, रोगी बडबडूं लागतो, उचकी लागते, आणि क्षीण होऊन बहुधा मृत्युच होतो.

ह्या रोगाचें कालमान १०–२९ दिवसपर्यंत असतें. तीव्र प्रकारांत कधीं कधीं दोनतीन दिवसांतच शेवट होतो. शौचास फार वेळ जावें लागत नसून मुरडा व मलाशयाजवळ वेदनाही कमी होतात. शौचांत मलाचा अंश वाढतो, आणि रक्त व आंव हीं कमी होतात. ह्याबरोबर ज्वर वगैरे चिन्हें असल्यास तींही नाहींशीं होतात, हेंच या रोगाचें साध्य लक्षण समजावें.

**उपचारः**—कारण दूर करावें, स्वस्थ पडावें. प्रथमतः एरंडेल तेल ४ ड्राम, टिं० आफ् ओपियम १० थेंब, गोंदाचें पाणी ·॥· औंस, पेपरमिठाचें पाणी १ औंस, असें द्यावें. आणि १–२ झाडे झाले ह्मणजे पल्व्हिस एपिक्याक २४ ग्रेन, अफू ४ ग्रेन, एक्स्ट्रक्ट जेनशियन ४ ग्रेन, ह्यांच्या आठ गोळ्या करून एकेक गोळी दर दोन दोन तासांनीं आंवरक्त बंद होईतोंपर्यंत पाण्याच्या घोंटांबरोबर घ्याव्या. वांत्या होऊं लागल्या तर ह्या गोळ्या बंद कराव्या. बर्फ चोखावें, पोटाचे शिपीवर राईचें प्लास्टर मारावें, लिंबाचें सरबत थोडथोडें प्यावें. आणि बिस्मथसबनैट्रस १० ग्रेन, असिड ग्यालिक १० ग्रेन, डोव्हर्स पावडर ५ ग्रेन, सरबत २ ड्राम, गोंदाचें पाणी ·॥· औंस, शुद्ध पाणी १ औंस, सोडाबायकार्बोनस १० ग्रेन, असें दिवसांतून तीनच वेळां घ्यावें. किंवा पल्व्हीसकायनो-कंपाउंड १० ग्रेन, कानाची भुकणी ५ ग्रेन, बिसमथसबनैट्रस १० ग्रेन, डोव्हर्स पावडर ५ ग्रेन, असें दिवसांतून ३–४ वेळ घ्यावें. **विलंबी प्रकारांत** आसिडग्यालिक १६ ग्रेन, अफू २ ग्रेन, एक्स्ट्राक्ट जेनशियन ६ ग्रेन, ह्याच्या चार गोळ्या करून एक एक गोळी दर तीन किंवा चार तासांनीं घ्यावी. किंवा पिलप्लंबायकमओपियम ३ ग्रेन, वरल्याप्रमाणेंच घ्यावें, किंवा सलफेट ऑफ् कॉपर (मोरचूत) ·॥· ग्रेन, अफू ·॥· ग्रेन ह्यांची गोळी करून वरल्याप्रमाणेंच घ्यावी. किंवा लैकरफेरायपरनैट्रेटीस १० थेंब, इनफ्यूजन क्काशिया १ औंस, असें मिश्रण दिवसांतून दोन वेळां घ्यावें आणि रात्रीं निजतांना व सकाळीं उजाडल्यावर १० ग्रेन डोव्हर्स पावडर घ्यावी.

## मराठी वैद्याचीं औषधें.

**पांढऱ्या आंवेवरः**—सुंठ, हिंग, खसखस, बडीशेप, शंखजिरे, इसपगोल हीं समभाग घेऊन ह्यांची वस्त्रगाळ पूड करून, सुमारें अर्ध तोळा पूड, साखर आणि मलई यांत मिश्र करून दिवसांतून दोन तीन वेळां खावी.

**तांबड्या आंवेवरः**—२ तो० डाळिंबाची साल, १ तो० कात, १ तो. मायफळ, १ तो. बेलफळ, १ तो. धायटीचीं फुलें, १ तो. बडीशेप, १ तो. धने, १ तो. वाळा, २ तो. बाळहर्तकी, १ तो. खसखस, ·।· तो. अफू, ·॥· तो. कापूर, ह्या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांतलें २ मासे चूर्ण साखर आणि मलई ह्यांत मिश्र करून खावें. किंवा अतिसारांत सांगितलेले बहुतेक काढे व चूर्णें ह्यांचाही संग्रहणींत उपयोग होतो.

वर्धमान अवस्थेंत मळाला दुर्गंधी येत असते; ती हवेंत पसरूं नये ह्मणून झाडा झाल्याबरोबर दुर्गंधिनाशक औषधांचा शुश्रूषेंत सांगितल्याप्रमाणें उपयोग करून दुर्गंधीचा नाश करावा. स्वच्छ कोरड्या हवेवर रहावयास जावें. स्वच्छ वस्त्रें वापरावीं. अन्न हलकें असावें. दूधभात, तूपभात खावा. येणेंकरून या रोगाचा त्वरित नाश होतो.

---

## उचकी.

HICCOUGH.

**कारणें:**—उपास केल्यानें, अति तिखट पदार्थ खाल्ल्यानें, तंबाखू खाल्ल्यानें किंवा ओढल्यानें, तोंडांत अम्लता उत्पन्न झाल्यानें, व कधीं कधीं पानसुपारी खात असतां उचकी उ-

त्पन्न होते. उचकी ही अतिसार, संग्रहणी व भयंकर ज्वर वगैरे कित्येक रोगांच्या अंतकाळचें लक्षण होय.

वर सांगितलेल्या कारणांपैकीं एखाद्या कारणानें पोट व छाती ह्या दोन विवरांना, विभागणारा डायफ्रम नामक एक पडदा असतो, त्याला मिळणाऱ्या मज्जातंतूंचा क्षोभ होऊन ह्या पडद्याला वांब येऊं लागतात, आणि उचकी उत्पन्न होते.

**उपचारः**—तंबाखू, पानसुपारी वगैरे पदार्थ खाल्ल्यापासून जी उचकी उत्पन्न होते, ती बहुधा थोडी साखर आणि थंड पाणी प्याल्यानें, किंवा ऊन ऊन चहा प्याल्यानें ताबडतोब बंद होते, किंवा नाक बंद करून थोडें थोडें पाणी प्याल्यानेंही बंद होते. हे सर्व इलाज करून जर उचकी बंद होत नाहीं व अन्य कारणांपासून आहे तर पुढील उपाय योजावे.—ईथर क्लोरिक २० थेंब, स्पिरिट अमोनिया अरोम्याटिक १० थेंब, लॉडेनम १० थेंब, मध १ चमचा भरून आणि कापराचें पाणी १ औंस, हें मिश्रण दोन दोन कलाकांनीं प्यावें. पोटाच्या शिंपीवर राईचें प्ल्यास्टर मारावें, किंवा इथर क्लोरिकमध्यें लिंट किंवा कापडाची घडी भिजवून तें शिंपीवर कांहीं वेळ ठेवावें. कधीं कधीं उचकी चार पांच दिवस सतत राहते, तेणेंकरून झोंप येत नाहीं, आणि त्याबरोबर थोडाबहुत तापही असतो, तेव्हां प्रथम **क्यालोमेल** १९ ग्रेन, **सोडा बाय कार्बोनस** २० ग्रेन हीं मधांत चाटावीं. म्हणजे एखादी उलटी किंवा जुलाब होऊन उचकी बंद होते. रात्रीं झोंप येत नसली तर मोठ्या मनुष्यानें २० पासून ३० ग्रेन **क्लोरल हैड्रेट**, सरबत अर्धा औंस, पेपरमिंठाचें पाणी अर्धा औंस हीं एकत्र करून प्यावें. शिंपी-

घ्या प्रदेशीं क्लिस्टर (यादी नं. २२) मारावें. आणि पोटांत टिंक्चर व्हलेरियन २ ड्राम, टिं. असा फोटिडा २ ड्राम, टिं. झिंजीबर २ ड्राम, स्पिरिट अमोनिया अरोम्याटिक २ ड्राम, स्पि. क्लोरोफार्म २ ड्राम, पोट्याश ब्रोमाईड २ ड्राम, पाणी ६ औंस, हीं एकत्र करून त्याचे सहा भाग करावे आणि प्रत्येक दोन किंवा तीन तासांनीं एक एक भाग उचकी बंद पडेपर्यंत घ्यावा. किंवा भाजलेला हिंग २ गुंजा, सुंठीचें चूर्ण ६ गुंजा, हीं मधांत मिळवून चाटावीं. किंवा २ तोळे रेणुकाबीज व २ तोळे पिंपळी, या दोन औषधांचा काढा करून त्यांत भाजलेला हिंग मिळवून प्याल्याबरोबर उचकी बंद होते ( शार्ङ्गधर ). किंवा ओवा, सुंठ, पिंपळी, जिरें, पुदीना, हिंग यांचा काढा करून तो गाळून त्यांत गूळ घालून पोटांत घ्यावा. लहान मुलांना उचकी उत्पन्न झाली असतां त्यांना **प्रिपेअर्डचाक** १२ ग्रेन आणि १२ ग्रेन **व्हुबार्ब** हीं मधाबरोबर चाटवावीं. व पोटाच्या शिंपीवर **सोपलिनिमेंट** आणि **लाडेनम** हीं एकत्र करून चोळावीं. नाहींतर मोराच्या पिसांची राख १२ ग्रेन, पिंपळीची भुकी ६ ग्रेन, मध सुमारें चमचाभर हीं सर्व एकत्र करून दोन दोन तासांनीं थोडें थोडें खावें, ह्मणजे उचकी बंद होते.

---

## मुळव्याध—अर्श.

PILES.

मलाशयाच्या खालच्या भागाच्या शिरांमध्यें रक्तसंचय होऊन ज्या गांठी उद्भवतात त्यांस मुळव्याध ह्मणतात.

**मुळव्याधीचीं कारणें:**—अठरा किंवा वीस वर्षांच्या वयांत हा रोग वारंवार पाहण्यांत येतो. या वयापापासून मध्य वयापर्यंत मुळव्याधविकार बहुधा होत नाहीं. यापुढें जसजसें वय होत जातें तसतसा हा विकार जास्त आढळतो. मिष्टान्न सेवन करून मेहनत न करणाऱ्या मनुष्यास बहुधा हा विकार होतो. यकृताच्या कार्यांत मंदत्व आल्यानेंही हा रोग उत्पन्न होतो. तसेंच ज्यांच्या अंगांत विपुल रक्त आहे, असे लोकही ह्या रोगाला पात्र असतात. हिंवाळ्यांत ह्या विकाराचा जोर असतो. ज्या मनुष्यास मलशुद्धि साफ होत नाहीं त्यास त्याच्या मलाशयाच्या खालच्या भागाच्या शिरेवर मळाचा दाब पडून त्यांतून रक्ताभिसरण होण्यास प्रतिबंध होतो, त्यामुळें मोड उत्पन्न होतात. गरोदर स्त्रियांमध्येंही कधीं कधीं गर्भाशयाचा ह्या शिरेवर दाब पडून मोड उत्पन्न होतात.

मुळव्याधीचे मोड दोन प्रकारचे असतात—१ गुदद्वाराचे आंतले बाजूस असणारे किंवा रक्तस्रावी आणि २ गुदद्वाराचे बाहेरील बाजूस असणारे किंवा रक्तस्रावरहित.

१ रक्तस्रावी मोड गुदद्वाराचे आंतले बाजूस इंच दीड इंच वर असल्यामुळें नजरेस पडत नाहींत. परंतु शौचाचे वेळीं कुंथल्यानें ते कधीं कधीं बाहेर पडतात तेव्हां मात्र दृष्टीस पडतात. हे पाहणें झाल्यास गुददर्शक यंत्र ( एनल-स्पेक्युलम ) गुदद्वारांत शिरवून पाहिलें असतां दृष्टीस पडतात.

**चिन्हें:**—पहिल्या प्रकारचे मोडांपासून वारंवार त्रास होतो, आणि कधींकधीं अतिशय रक्तस्राव होऊन मृत्यूचीच पाळी येते. रक्तस्रावी मोडापासून गुदांत वेदना होतात, आणि त्या ठिकाणीं परकी पदार्थ असल्याचा भास होतो. मलशुद्धि

साफ होत नाहीं ह्मणून शौचाचे वेळीं कुंथावें लागतें. कुंथल्यानें मोड बाहेर पडतात, आणि त्यांवर गुदाचे स्नायूंचा दाब पडून अतिशय वेदना होतात. ह्यामुळें कधीं कधीं गुदभ्रंश [ गुद बाहेर येणें ] होतो. शौचानंतर उभें राहिलें किंवा चालूं लागलें तर फारच वेदना होऊं लागतात. वेदनेमुळें शौचास जाण्याची भीति वाटते, तथापि शौचाची शंका वारंवार होते. त्यांतून थोडे थोडे रक्ताचे थेंब पडतात, किंवा [illegible]दीं धार लागते. एखादे वेळेस १० तोळ्यांवर रक्त जातें. अति रक्तस्राव झाल्यामुळें कमरेंत वेदना होऊं लागतात, व त्या मांड्यांकडे पसरत जातात. मूत्राशयाचा क्षोभ होऊन वारंवार थोडें थोडें लघवीस होतें, रोगी हळू हळू क्षीण होतो, फिक्कट पडतो, मस्तक दुखूं लागतें, छाती धडधडते आणि मूर्छा येते. कधीं कधीं मुळव्याधींतील रक्तस्राव नियमित काळानें ह्मणजे महिना दोन महिन्यांनीं होतो, तो थोडा झाल्यास रोग्याला सुख होतें. कधीं कधीं स्त्रियांचा विटाळ बंद होऊन त्याबद्दल हे मोड उत्पन्न होतात, आणि त्यांपासून रक्तस्राव होऊं लागतो. धष्टपुष्ट मनुष्याच्या मोडापासून रक्तस्राव होणें हें हितावह आहे. कारण तो न झाल्यानें एखाद्या अंतर अवयवांत रक्तसंचय होण्याची भीति असते.

**रक्तस्रावरहित मोडः**—हे गुदद्वाराचे बाहेरचे बाजूस असून जाड व कठीण असतात. ते कांहींसें चामखिळीसारखेच असतात. बाहेरील मोडापासून फारशी इजा होत नाहीं. परंतु कधीं कधीं गुदाशीं आग होते, किंवा खुपल्याप्रमाणें वेदना होऊं लागतात. मोड मोठे वाढले असल्यास किंवा ते दाहयुक्त झाले असल्यास गुदांत तीव्र वेदना होतात

व ठणका लागतो. तेणेंकरून गुदाभोंवतालचा सर्व भाग ठणकूं लागल्यासारखा वाटतो. रोगी उभा राहिला किंवा चालूं लागला असतां वेदना जास्त होतात. पुढें कांहीं दिवसांनीं ह्या मोडांत पू होऊन ते फुटतात आणि रोगी बरा होतो. मोड फुटल्यावर त्या ठिकाणीं पडलेला व्रण भरून आणण्याविषयीं जपलें पाहिजे, नाहींतर तेथें नासूर ( भगंदर ) पडण्याचा संभव असतो.

**उपचारः**—पथ्यानें राहिलें असतां या विकाराचा जोर होत नाहीं. नित्य मिष्टान्न खाऊं नये, तिखट पदार्थ व मद्य वर्ज करावें. थंड, ओलसर व कठीण बैठकीवर बसून कामधंदे चालविणें आणि जागरण हींही सर्व वर्ज करावीं. कोठा साफ राखावा. कोष्टशुद्धीसाठीं सोनामुखीची पूड १० ग्रेन, क्रीम आफ् टार्टर १ ड्राम, गंधकाचें फूल १ ड्राम, अशीं मधांत मिश्र करून चाटावीं. किंवा कोंबट अथवा थंड पाण्याचा "बस्ती" ( यादी नं. ८ ) मारावा ह्मणजे शौचास साफ होतें. यकृतांतील अभिसरण यथास्थित चालण्याकरितां ब्लूपील ५ ग्रेन, इपिक्या कुआन्हा पौडर २ ग्रेन, पोडाफिलीन अर्धा ग्रेन, एकस्त्राक्ट टऱ्याक्सिकं ५ ग्रेन, ह्यांची गोळी करून एक दोन दिवसांनीं रात्रीं निजतेवेळीं घ्यावी—ह्मणजे मलशुद्धि होऊन यकृताची क्रिया बरोबर होऊं लागते. गुदांत आग व वेदना होत असल्या तर कापूर ५ ग्रेन, शुगरलेड ५ ग्रेन, अफू २ ग्रेन, कोकंबीचें तेल १० ग्रेन, आणि थोडे गोडे तेलाचे थेंब, अशीं एकत्र घोटून त्याच्या दोन लांबट गोळ्या करून सकाळ संध्याकाळ एक एक गोळी गुदांत शिरवावी. आग व वेदना होऊन गुदांतून कांहीं रक्तमिश्रित चिकट

पदार्थांचा स्राव होत असल्यास मायफळाची भुकणी अर्धा ड्राम, अफू १६ ग्रेन, साधें मलम अर्धा औंस ( यादी नं. १८ ) असें एकत्र घोंटून तें बोटानें त्या ठिकाणीं दिवसांतून एक दोन वेळां लावावें. रक्तस्राव फार होत आहे तर बर्फ चिंचोळें करून गुदांत शिरवावें किंवा सलफेट आफ् आयर्न २ ग्रेन, पाणी १ औंस ह्याच्या पिचकाऱ्या गुदांत माराव्या. किंवा त्रिफळ्याच्या काढ्यांत [ यादी नं. २४ ] थोडी फटकीची पूड टाकून त्याच्या पिचकाऱ्या गुदांत माराव्या, किंवा फक्त गार पाण्याची पिचकारी मारावी, ह्मणजे रक्तस्राव बंद होतो. ह्याझलीन हें एक नवीन औषध आहे. ह्याचे १०—२० थेंब १ औंस पाण्यांत मिश्र करून प्यावे आणि गुदांत पिचकाऱ्याही ह्याच औषधाचे पाण्याच्या माराव्या, ह्मणजे रक्तस्राव बंद होतो. किंवा लिक्विड एक्स्ट्रॅक्ट आफ् अरगट अर्धा ड्राम, आणि पाणी १ औंस असें दर तीन तासांनीं घ्यावें, ह्मणजेही रक्तस्राव बंद होतो.

मोड दाहयुक्त झाले असल्यास रोग्यास निजवून ठेवावें. गुदाभोंवतीं जळवा लावाव्या, तें ऊष्ण पाण्यानें शेकावें, किंवा रोग्याला ऊष्ण पाण्यांत बसवावें. एरंडेलाचा जुलाब [ यादी नं० ७ ] घेऊन मलशुद्धि करावी. मलशुद्धीनंतर थंड पाण्याचा बस्ती गुदांत मारावा, ह्मणजे सुख वाटतें. पेजेसारखें हलकें अन्न खावें.

वरील सर्व उपायांनीं आराम होत नाहीं, आणि मोड मोठे झाले असून त्यांपासून फार त्रास होत आहे, किंवा अतिशय रक्तस्राव होत आहे, तर हुशार शस्त्रवैद्याकरवीं शस्त्रोपचार करवावा.

बाहेरील मोड मोठे होऊन त्यांपासून त्रास होऊं लागला ह्मणजे प्रथम त्यांत दाह वगैरे झाला असल्यास त्यावर गव्हांचें किंवा अळशीचें पोटीस (यादी नं० १०) बांधावें, किंवा शुगरलेडचें पाणी पांच औंस, [यादी नं० २१] एक्स्ट्राक्ट बेलाडोना पांच ग्रेन, अशीं एकत्र करून त्यांत भिजविलेली कापडाची किंवा कापसाची घडी सतत त्यावर ठेवावी. जुलाब घ्यावा (यादी नं० ७) ह्मणजे दहाचें शमन होतें. नंतर ते मोड एका चिमट्यांत मुळाबरोबर धरून कापून किंवा कात्रून काढावे, आणि लागलेच त्या ठिकाणीं ल्यूनरकास्टीक (काडीखार) लावावें किंवा लैकरफेरायमध्यें लहानशी चिंधी भिजवून ती त्या ठिकाणीं दाबून धरावी, किंवा तुरटीची पूड दाबावी, ह्मणजे रक्त वहाणें बंद होऊन मोडाचा समूळ नाश होईल. मोड कापल्यानंतर तेथें दुःसह वेदना होऊं लागतात, त्याकरितां अर्धापासून एक ग्रेन अफूची गोळी करून घ्यावी ह्मणजे वेदनेचें शमन होतें.

## एतद्देशीय वैद्यक ग्रंथांतले कित्येक उपाय.

बोदार लोण्यांत घोंटून तें मोडांस लावावें ह्मणजे त्यांतून रक्त वाहणें बंद होऊन आगही कमी होते.

दुधीच्या* पाल्याचा रस १ तोळा, खडीसाखर १ तोळा,

---

* दुधीचा पाला हा सरासरी माक्याच्याच पाल्यासारखा, परंतु किंचित् फिक्कट हिरव्या रंगाचा असतो. ह्याचीं पानें माक्याच्या पानांएवढीं मोठीं होत नाहींत. ह्याचे सदोदित वेलच रहातात. वेल तोडला असतां त्यांतून दुधासारखा पांढरा चीक बाहेर पडतो. वेलाचें अंग किंचित् लालसर उदी रंगाचें असतें. ह्यालाही माक्याप्रमाणें फूल येतें. हें झाड आपल्या देशांत बहुतेक ठिकाणीं नजरेस पडतें. घराच्या आजूबाजूस हीं झाडें आपोआप उगवतात.

साजूक तूप १ तोळा, अशीं एकत्र करून सतत दोन चार दिवस घ्यावें, ह्मणजे आग व रक्त बंद होतें.

नागकेशर १ तोळा, बाळहर्तकी २ तोळे, मोठी वेलची १ तोळा ह्या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांपैकीं ·॥· तोळा चूर्ण, अर्ध तोळा तूप आणि पावतोळा साखर ह्यांशीं मिश्र करून घ्यावें. ह्मणजे शौचास साफ होऊन रक्त पडणें बंद होतें.

खाजऱ्या सुरणाच्या काचऱ्या करून साखरेबरोबर खाव्या. करंजाची साल ताकांत उगाळून घ्यावी.

वाळा, नागकेशर, कमळाचे देठ, पित्तपापडा, शतावरी, कुडा, अतिविष, नागरमोथे यांचा काढा करून प्यालें असतां रक्तार्शाचा नाश होतो.

लाजाळू, कोष्ट, केळें, लोध्र, तीळ, चंदन, हे पदार्थ शेळीच्या दुधांत वाटून प्याले असतां गुदद्वारांतून वहाणारें रक्त बंद होईल.

बिबवे, तीळ, हरीतकी, गूळ हे पदार्थ समभाग घेऊन अर्धातोळापर्यंत भक्षिले असतां अर्शरोगाचा नाश होतो.

सुरण १६ भाग, चित्रक ८ भाग, भुइतरवड २ भाग, मिरी १ भाग, ह्या सर्वांचें चूर्ण करून त्याच्या गुळांत गोळ्या करून घेतल्या असतां अर्शरोगाचा नाश होतो.

सैंधव, संचळ, आणि चित्रकमूळ, हे तीन पदार्थ उगाळून याचे तीन लेप केले असतां अर्शरोग नाश पावतो.

मोरचूत चांगलें भाजून निंबाचे रसांत उगाळून त्यांत लोणी मिसळून त्याचा लेप केला असतां अर्शरोग नाश पावतो.

शवग्याचे मुळाचे रसांत सोमल उगाळून त्याचा एक लेप केला असतां अर्शरोग त्वरित नाश पावतो.

निवडुंगाच्या आणि करंजाच्या रसांत हरताळ उगाळून त्याचा लेप केला असतां अर्शरोग नाश पावतो.

नराचे केंस, सापाची कात, वावडिंग, रुईचें मूळ, शमीचीं पानें, शिंगाचे मोड, व हिंग ह्यांच्या धुरीनें अर्शरोग नाश पावतो.

मांजराचें कातडें, गुग्गुळ, मोहरी, निंबाचीं पानें, शिंगांचे मोड, भूर्जपत्र यांचा धूर दिला असतां अर्श नाश पावतो.

नराचे केंस, गंधक, उंदराचें कातडें, यांचें चूर्ण शेळीचे मूत्रांत वाटून गोळ्या करून त्यांचा धूर दिला असतां अर्शाचा नाश होतो.

हत्तीचें कातडें व गुग्गळ यांच्या धुरानें अर्शाचा निःसंशय नाश होतो.

---

# उपदंश.

SYPHILIS.

## गर्मी व तिचे अनिष्ट परिणाम.

प्रथमतः या रोगावर औषधादिक सांगण्यापेक्षां त्यापासून होणाऱ्या परिणामांविषयींच थोडेंसें विषयांतर करून बोलावेंसें वाटतें. कारण कीं, हा रोग बरा होण्याची योग्य सोय माहीत असली ह्मणजे तो न होण्याविषयीं मनुष्यास कांहींच काळजी वाटणार नाहीं, आणि सहसा लोकांची दुराचाराकडेच प्रवृत्ति होण्याचा संभव जास्त आहे. असो.

श्रीमंत असो अथवा दरिद्री असो, पण आपण रोगी असावें असें कोणालाच वाटत नाहीं. परंतु रोग उत्पन्न होणें हें ईश्वरी क्षोभाचें दर्शक आहे. मनुष्याचे वागणुकीच्या निष्काळजीनें रोग उत्पन्न होतात ही तर गोष्ट खरीच, पण असे सर्वच ज्ञाते कोठें आहेत कीं, ज्यांना हरएक वस्तूंचे गुणदोष समजून व आपल्या शरीराचें आणि ऋतूंचें मान समजून त्यांस आपलें वर्तन रोगप्रतिबंधक ठेवतां येईल? असा मनुष्य फारच विरळा. मोठमोठे धन्वंतरी वैद्य, व या कामांत ज्यांचा हातखंडा आहे असे नामांकित डाक्टर जरी असले, तरी देखील रोगांनीं त्यांस सोडलें नाहीं. तस्मात् साधारण इतर लोकांची कथा काय? यामुळें हें केवळ ईश्वरी क्षोभाचेंच दर्शक आहे असें ह्मणावें लागतें. हें जरी खरें आहे, तरी कित्येक रोग उत्पन्न [redacted]

[illegible]

मनस्वी दुर्गंधी चालते, घशांतून क्षते पडतात, व घशाची सूज (कुकदाह) हा रोग उत्पन्न होऊन शेवटीं अल्पकाळां-तच शरीराचा नाश होऊन जातो. अंगावर भगें पडतात, अनेक प्रकारचे पुरळ उठतात, वृषण सुजतें व सडतें, मस्त-काच्या हाडांस विलक्षण विकार होऊन अपस्मार (फेंफरें) हा रोग उत्पन्न होतो, पंगुत्व येतें. एकंदर शरीराच्या बहुतेक भागांवर या विषानें वाईट परिणाम उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. हें विष अंगांत भरलें कीं, पुढें तें यावांचून दुसऱ्याही अनेक रोगांस उत्पन्न करितें. या विषाचा प्रवेश शरीरांत होऊन चुकल्यावर तें कसल्याही उपायानें समूळ ह्मणून निघतच नाहीं. कारण तें रक्ताशीं भिनून जाऊन रक्ताचें विलक्षण रूपांतर होऊन तें जन्मजूग तसेंच रहातें, व प्रकृति

समजून उमजूनही जर मनुष्य आपण होऊन आपल्यावर संकट ओढवून घेईल तर त्याची केवढी बरे तारीफ करावी! तेव्हां या रोगापासून ज्या यातना व जे हाल होतात ते अशा मग्रूर मनुष्यास फार फार योग्य शिक्षा आहे यांत संशय नाहीं.

यापासून काय काय घोर परिणाम होतात ते ऐकिले असतां खरोखर अंगावर रोमांचच येतात. कारण गर्मी हा रोग एकप्रकारचें विष मानलें आहे, तें एकदां शरीरांत भिनलें ह्मणजे त्यापासून अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होतात. कधीं कधीं जांघेंत विद्रधि होऊन व्रण पडतात, शिश्न गळून पडतें, संधिवात होतो, डोळे जातात, नाक सडतें, ओंठावर चट्टे पडून मुख विद्रूप होतें. टाळू सडून आंतून भोंकें पडून त्या भोकां[illegible] व [illegible] तोंडांत उतरतात, ह्मणून तोंडास

समजून गेल्यामुळें बहुधा प्रत्येक मनुष्य सावध असतोच. अशा रोगांपैकींच हा प्रस्तुतचा एक रोग आहे. याचीं कारणें जरी पूर्णपणें अद्याप कोणाला कळलीं नाहींत, तरी विशेषतः अतिसंगापासून हा रोग उत्पन्न होतो अशी पुष्कळांची खात्री होऊन गेली आहे. यामुळें अतिसंग वर्ज केला असतां हा रोग होण्याचा संभव कमी आहे. परंतु मनुष्य प्राण्याला साऱ्या जगांत कायती परम प्रीतीची व खऱ्या सौख्यानें भरलेली वस्तु एक 'सुरतक्रीडा' च वाटून गेली आहे. त्यामुळें तिच्या बुडाशीं हा काळसर्प आहे, हें ठाऊक असतांही मनुष्य त्याची गणना न करितां केवळ पतंगा— प्रमाणेंच या सुरताग्नीवर झेंप घालून जन्माचा व्यर्थ होऊन जातो. जी गोष्ट समजत नाहीं तिचा पर्याय वेगळा, पण

अगदीं नाजूक होऊन थोडा कांहीं क्षोभकपणा प्राप्त झाला कीं, लागलेच वर सांगितल्या रीतीनें त्याचे परिणाम होऊं लागतात. अशा मनुष्यास संतति होत नाहीं. त्याच्याच रेतापासून अथवा तशा प्रकारचे स्त्रीस अन्य ह्मणजे या रोगानें रहित अशाचे रेतापासून गर्भ राहिला असला, तर बहुतकरून तो पूर्ण होतच नाहीं, कांहीं तरी निमित्तानें गळून पडतो. कदाचित् पूर्ण होऊन मूल जन्मलें तर त्याच्या अंगावर उपदंशजन्यरोग ह्मणजे खवंदें, चकदळें, व्रण, इत्यादि विकार उठतात, येणेंकरून त्याची प्रकृति रोगग्रस्त व क्षीण होऊन अल्पकाळांत तें मरण पावतें. तसें न झाल्यास, गंडमाळा, कफक्षय, वेड व याच प्रकारचे दुसरेही रोग निरंतर होतात. आणि त्याच्याही संततीस अशाच प्रकारच्या रोगांची परंपरा चालते. यावरून [illegible] प्रकारचा रोगी केवळ क्षणिक सुखाच्या लोभानें आपणास व आपल्या कित्येक पिढ्यांस केवढ्या दुःखांत टाकण्यास कारण होतो तें पहा.

असल्या प्रकारचा महा दुर्धर रोग दुसरा कोणताच नाहीं, कां तर जो रोग एका मनुष्यास त्याच्या अनेक पिढ्यांपर्यंत त्रास दिल्यावांचून सोडीत नाहीं, तेव्हां त्याची बरोबरी प्रत्यक्ष कालकूट विष अथवा इंद्रवज्र यांच्यानेंही करवणार नाहीं! खरोखर हा एक परमेश्वरानें फारच महान्योद्धा निर्माण केला आहे. मनुष्यप्राणि हा बुद्धिवैभवानें श्रेष्ठ खरा! एक वेळ तो सिंह व्याघ्रादि क्रूर प्राण्यांसही आपल्या आटोक्यांत आणील, परंतु या रोगापुढें त्याची बुद्धि कुंठितच होऊन जाते.

हा दुर्धर रोग सन १४९४ या वर्षी इटाली देशांतील नेपल्स शहरीं उत्पन्न झाला असें युरोपियन वैद्यांनीं अनुमान

केलें आहे. परंतु त्यापूर्वी हा रोग त्यांच्या आढळांत आला नाहीं एवढेंच खरें; कारण हा रोग जर अतिसंगापासून उद्भवत आहे, तर १४९४ पासूनच लोक अतिसंग झाले हें ह्मणणें अंमळसें अपोक्त वाटतें. आमचें मत तर असें आहे कीं, बहुधा सर्व देशांत सर्व स्थळीं फक्त प्राचीन काळापासूनच अथवा सर्व इतर रोगांप्रमाणेंच याच्याही उत्पत्तीची वेळ मानावी हें प्रशस्त. आपल्या देशांतून जे कांहीं यावनी व संस्कृत भाषेंत या विषयावर ग्रंथ झाले आहेत, त्यांचा काळ वरील काळापेक्षां कांहींसा प्राचीन असून त्यांमध्येंही या रोगाचे प्रतिबंधक उपाय सांगितले आहेत. अर्थात् हा रोग १४९४ सालापूर्वी युरोपांतील वैद्यांच्या निदर्शनासच आला नाहीं एवढें खरें. एरव्हीं हा रोग उत्पन्न होऊन त्याचें कारण काय व त्यास काय ह्मणावें व त्यावर औषधाची योजना कशी करावी, हें त्यांना समजलें नसल्यामुळें त्यांचें ह्मणणें गृहित मानतां येईल. असो.

हा रोग बहुधा स्पर्शसंचारी आहे, आणि त्याची गति इतकी कांहीं विलक्षण व त्वरित आहे कीं, अशा रोगाच्या मनुष्याच्या केवळ वस्त्राच्याही स्पर्शानें तो दुसऱ्यास प्राप्त होतो. ह्मणजे त्यानें अंग पुसून टाकलेलें वस्त्र, नेसतें वस्त्र, बिछाना, यांच्याही स्पर्शापासून हा रोग इतरांस उत्पन्न होतो. तसेंच तो ज्या भांड्यांतून पाणी प्याला असेल तें भांडें तसेंच दुसऱ्यानें पाणी पिण्यास घेतलें तरी देखील हाच प्रकार होतो. फार तर काय, पण उपदंशिक रोगाच्या मनुष्यानें कोणाचें केवळ चुंबन केल्यापासून देखील क्वचित् प्रसंगीं हा रोग उत्पन्न झाला आहे! मग अशा पुरुषाशीं,

स्त्रीनें व स्त्रीशीं पुरुषानें संग केला असतां हा रोग उत्पन्न होतो ह्यांत विशेष नवल नाहीं.

या रोगाच्या उत्पत्तीविषयीं अनेक लोकांचे अनेक अभिप्राय आहेत, आणि ते बहुतकरून अतिसंगाच्याच तात्पर्यानें एकमेकांशीं तंतोतंत उद्भवतात.

अतिसंगापासून दोन सांसर्गिक विषें उत्पन्न होतात. त्यापासून होणाऱ्या परिणामास सामान्यतः गर्मी ही संज्ञा आहे. पण या शब्दांत प्रमेह (परमा) व गर्मी [चट्टे] ह्या दोन जातीच्या रोगांचा अंतर्भाव होतो. सूक्ष्मविचारी वैद्यांनीं असें मत दिलें आहे कीं, एकाच स्त्रीशीं अनेक पुरुषांच संग झाल्यानें पुरुषांचें रेत योनीच्या अंतर्त्वचेंत जमून त्यापासून क्षोभ उत्पन्न होऊन प्रथमतः लस वाहूं लागते, नंतर ती स्पर्श संसर्गानें एकाची दुसऱ्यास, दुसऱ्याची तिसऱ्यास लागत जात जात आज हा तिचा असा सर्वत्र प्रचार होऊन गेला आहे.

ही लस ज्यास लागते त्याच्या जननेंद्रियावर चट्टे पडतात. ज्यामध्यें ह्या विषाचा उद्भव मुळींच नाहीं अशा केवळ क्षोभापासूनही विशेष संगानें इंद्रियावर चट्टे पडतात, परंतु त्यापासून वर सांगितलेले शारीरिक विकार उत्पन्न होत नाहींत. क्वचित् प्रसंगीं बद मात्र होतें, परंतु तें लवकरच पुवळणास येऊन फुटतें. याला इंग्रजी भाषेंत व्हिनिरियलसोर ह्मणजे क्षोभक चट्टा अशा अर्थाचें नांव योजलें आहे. परंतु हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, हा उपदंशिक विकारापासून फार

भिन्न आहे. उपदंशिक रोग्याच्या लसेचा स्पर्श पिछा* त्वचेस झाल्यानें अथवा ती लस शरीरांत टोंचून शिरविल्यानें, आणि लाळ, स्त्रियांचें दूध, असे जे रक्तवियोजित पदार्थ त्यांच्याही स्पर्शानें हा रोग प्राप्त होतो. आतां जर एका उपदंशिक रोग्याच्या चट्ट्याची लस दुसऱ्या ठिकाणीं त्याचेच अंगांत शिरविली, तर त्यास विशेष विकार कांहींच होत नाहीं. कारण त्याचे सर्व शरीरभर मुळींच हें विष माजलेलें असतें. परंतु अशाप्रकारें हा रोग वाढतो.

विशेषतः हा रोग सांसर्गिक असल्यामुळें याचा फैलाव फार होऊन गेला. मूळ उत्पन्न होतो त्यावेळीं फक्त तो त्या द्रियावरच असतो, व पुढें सर्व शरीरभर पसरतो.

या रोगानें पृथ्वीवरील बहुतेक ठिकाणें धरलीं आहेत. विदेशी लोकांचें परस्पर अधिक संघट्टण विशेष होऊं लागल्यानें व लढाया वगैरेच्या कारणानें वेश्यागमन व्यापार विशेष वाढला. तसेंच दुष्काळामुळेंही मनुष्यांची शरीरप्रकृति असावी तशी न राहूनही हा रोग वाढून गेला. कारण स्त्रीपुरुषांची प्रकृति विशेष क्षीण व कांहीं दाहकारक अन्यरोग त्यांचे ठायीं असतां, आणि एकाच स्त्रीशीं साधारण थोड्या

---

* ही त्वचा मृदु मखमालीसारखी गुलाबी रंगाची आणि पुष्कळ रक्तवाहिन्यांनीं युक्त अशी असते. ज्या मार्गांच्या योगानें शरीरांतल्या आंतील भागाचा बाहेरील भागाशीं संयोग होतो, ते मार्ग ह्या त्वचेनें आच्छादिले असतात. जसा पाचनसंबंधीं मार्ग, हा तोंडापासून गुदापर्यंत पोंचतो तसेंच श्वासोश्वाससंबंधीं मार्ग, प्रजोत्पत्ति व मूत्रोत्पत्तिसंबंधीं मार्ग, ह्यांमधून शरीरांत अन्नरसादिक द्रव्यें घेतलीं जातात व बाहेरही पडतात.

अवकाशांत पुष्कळ पुरुषांचा व्यवहार होऊन तिचें इंद्रिय अस्वच्छ असतां वारंवार आणखी हाच व्यापार सुरु असतां, हा रोग मुळच्या विकृतीवांचून आपोआप उत्पन्न होतो. यावरून अनियमित मैथुन हेंही या रोगास उत्पन्न करण्यास कारण होतें. ही गोष्ट लोकसंख्या, लढाई वगैरेच्या कारणानें एकाएकीं वाढल्यानें त्या त्या स्थळीं विशेष होण्याचा संभव आहे.

हल्लींचा काळ कांहीं चमत्कारिक आहे. या वेळीं एका देशांतून दुसऱ्या देशांत जाण्याचीं सोइस्कर साधनें असल्यामुळें, व्यापाराच्या योगानें परस्परांचें दळणवळण फार होऊं लागलें. तेणेंकरून सर्व देशभर या रोगाचा प्रवेश होऊन गेला आहे. आणि याला मुख्य कारण असें आहे कीं, ज्यास हा रोग उत्पन्न होतो, त्यास लज्जेमुळें ह्मणा अथवा अब्रूच्या भयास्तव सहसा ही गोष्ट परिस्फुट करितां येत नाहीं. व अर्थातूच त्यास योग्य वेळीं औषध न पोंचून तो नाशकारक होतो. कोणी कोणी जें औषध सांगतील तें विचार न करितां मुकाट्यानें घेतात. तेणेंकरून त्यांस दुसरेच भयंकर रोग उत्पन्न होतात. कित्येक गांवढळ लोक या रोगावर बहुधा पारा खावयास देतात. तेणेंकरून हा रोग बरा झाल्यासारखा वाटतो खरा, परंतु पुढें थोड्याच अवकाशांत पाऱ्याच्या योगानें दांत पडतात, जाभाडांचीं हाडें कुजतात, सांधे धरतात, आंगावर चकंदळें पडतात. मग हा बरा होण्याचा इलाज खुंटून जन्मभर त्या वैद्याच्या नांवानें खडे फोडावे लागतात.

आपले देशांतील लोकांची प्रकृति अशक्त, शरीरबांधा खुरट, त्या योगानें पहिल्या पंचविशींत त्यावर वृद्धापकाळाचा देखावा दिसूं लागतो. त्यांतूनही कांहीं एखादें विद्याभ्यासाचें

विशेष नाजूक श्रमाचें काम केलें तरी अगदीं कृशता जडते. आणि मग अशा अवस्थेंत त्यांचेकडून असे कांहीं अशुद्ध ठिकाणीं वाजवीपेक्षां फाजील मैथुनव्यापार घडल्यानें हा रोग जडतो.

या रोगाचा उत्तरोत्तर फैलाव कमी होऊन ऱ्हास होत जावा या उद्देशानें इंग्रज सरकारानेंही पुष्कळ खटपटी सुरू केल्या आहेत. याकरितां त्यानें मुंबई वगैरे मोठमोठ्या स्थळीं **लॉक इस्पितळें** स्थापन केलीं आहेत. त्या ठिकाणीं वारंवार वेश्यांची तपासणी करण्याची त्यांनीं योजना केली आहे. सरकारचा यांतील वास्तविक हेतु इतकाच दिसतो कीं, सैन्यांतील व आरमारांतील, व इतर खलाशी प्रवाशांस अशा शहरांतून अति गलिच्छ स्त्रियांच्या संगानें ह्या रोगाची प्राप्ति न व्हावी. यावरून कदाचित् ते अशा लोकांस मदत करितात असें मानणें व्यर्थ आहे. परंतु एक प्रकारची ही अशा स्त्रियांची विटंबनाच आहे. त्या योगानें कितीएकींनीं हे व्यापार सोडून दिले आहेत. ह्मणून हा प्रकार या रोगाच्या ऱ्हासासच कालेंकरून कारण होण्याचा संभव आहे.

येथपर्यंत हा लेख जो लिहिला आहे तो केवळ हे रोग उत्पन्न होण्यास कारण जो वेश्यागमनप्रेमा त्याकडे जगाची ओढ नसावी इतक्याच अर्थाचा आहे; परंतु ही गोष्ट एकवेळ होऊन गेल्यावर काय करावें तें आतां पुढील लेखांत वेगळ्या रीतीनें सांगितलें आहे.

# गरमी.

## SYPHILIS.

गरमी [ उपदंश ] हिची उत्पत्ति, इतिहास आणि परिणाम ह्याविषयींचें वर्णन वर झालेंच. आतां गरमीच्या निरनिराळ्या अवस्था व त्या प्रत्येक अवस्थेंत होणाऱ्या विकारांचें वर्णन आणि उपचार ह्यांविषयीं विचार केला आहे.

गरमीच्या ३ अवस्था केल्या आहेत; १ प्रथमावस्था किंवा स्थानिक उपदंश, २ द्वितीय अवस्था किंवा सार्वदेहिक उपदंश आणि ३ तृतीय अवस्था, ह्यांत उपदंशज़ विषाचें सर्व शरीरभर शोषण होऊन हा विकार हाडें, अंडकोश, वगैरे ठिकाणीं शिरतो.

गरमीची प्रथमावस्था किंवा स्थानिक उपदंश ह्मणजे "चट्टे" chancre हे अस्वच्छ आणि अनियमित संभोगापासून स्त्रीपुरुषांचे जननेंद्रियावर ( शिश्न, योनी, ) व गर्भाशयावर उत्पन्न होतात.

चट्टे दोन प्रकारांनीं उद्भवतात. १ कातडी झाजरली असतां किंवा तिजवर भेग पडली असतां त्या ठिकाणीं उपदंशिक विष लागून तेथें व्रण ( चट्टा ) होतो. २ किंवा विष अखंड कातडीस लागून तेथें त्याचें शोषण घडतें, नंतर त्या ठिकाणीं पुटकुळी उठून ती फुटते तोच उपदंशिक व्रण ( चट्टा ) होय. हे व्रण बहुधा विषस्पर्शानंतर ५–६ दिवसांनीं उद्भवतात.

**चट्ट्यांचे प्रकारः**—साधा अथवा मृदु चट्टा, कठीण चट्टा, चरणारा चट्टा, सडणारा अथवा मांसनाशक चट्टा, असे ४ प्रकार आहेत.

**मृदु चट्टा:—**( Soft chancre ) हा वेश्यागमनानंतर दुसरे किंवा तिसरे दिवशीं शिश्नाचे मखमलीसारख्या भागावर, किंवा त्याचे खालचे अंगास जो तंगबंदासारखा भाग ज्याला लोक "शिवण" असें ह्मणतात, त्या ठिकाणीं उत्पन्न होतो. प्रथम त्या ठिकाणीं पुटकुळीच असते, परंतु ती लौकरच फुटून तिचा चट्टा होतो. हा चट्टा वाटोळा असतो, व त्याची सपाटी धुरकट असून त्यांतून पू वहात असतो. हा चेपून पाहिला असतां ह्याचे अंगीं कठीणपणा बिलकूल नसतो, ह्मणूनच ह्याला मृदुचट्टा असें ह्मटलें आहे. हा चट्टा इतर प्रकारच्या चट्टयांपेक्षां विशेष स्पर्शसंचारी आहे. मृदुचट्टा बहुधा एकच असतो, परंतु कधीं कधीं अनेक असतात, त्यामुळें शिश्न सुजतें व त्यावरची कातडी मागें सरकत नाहीं. ह्या चट्टयापासून शारीरिक विकार होत नाहीं, बदें मात्र होतात, परंतु तीं लौकरच पुवळणास येऊन फुटतात आणि रोगी बरा होतो.

**उपचार:**—मृदुचट्टा कधीं कधीं लोकांच्या पहाण्यांत न येतां आपोआप बरा होतो. ह्यांत शारीरिक विकार होण्याची बिलकूल भिति नसल्यामुळें पोटांत औषध घेण्याची फारशी फारशी जरूर नसते.

पुटकुळी किंवा चट्टा नजरेस पडतांच त्याजवर **नैट्रेट आफ् सिलव्हर** ( काडीखार ) किंवा **मोरचूत** लावावा. व याहीपेक्षां उत्तम पाहिजे तर **नैट्रीक आसीड** [ शंखद्राव-आगपाणी ] लावावें. हें एकदां लावल्यानें चट्टयांचा विशेष गुण नष्ट होतो. जरी ह्या आसीडाची क्रिया फार तीव्र आहे, तरी तें नैट्रेट आफ् सिलव्हरपेक्षां जास्ती वेदना करीत

नाहीं. हें आसीड कांचेच्या दांड्यानें ( ग्लासरॉड ) किंवा बारीकशा काडीला थोडासा कापूस गुंडाळून तिनें फक्त तेवढ्याच ठिकाणीं जपून लावावें. ( चट्टा दाहयुक्त असला, किंवा तो मूत्र नळाच्या तोंडीं असला तर हीं मांसनाशक द्रव्यें लाऊं नयेत.) नंतर त्यावर पाण्याची धार धरावी ह्मणजे चट्ट्यावर जास्त आसीड लागलें असल्यास तें धुतलें जातें. मग त्या चट्ट्यावर गव्हांचें पोलटीस यादी नं. १० अथवा थंड पाण्याची पट्टी लावावी ह्मणजे चट्ट्यांत होत असलेल्या वेदना व आग हीं नाहींशीं होतात. नंतर चट्टा भरून येण्याकरितां त्यावर शंखजिरे, कापूर, हिरादखण, कात, ह्यांची वस्त्रगाळ पूड करून ती बसवावी, किंवा आयओडोफॉर्म नामक औषध सोडावें अथवा त्याचें मलम करून लावावें. ( आयओडो फॉर्म १ भाग, साधें मलम ८ भाग ). रसकापूर, पांढरा कात, मुडदारशिंग, शंखजिरे, मायफळ, आणि सुपारीचा कोळसा हीं औषधें बारीक करून तुपांत खलून लावावीं. किंवा मोचरस, बोरीच्या सालीचें चूर्ण, शंखजिरे, चिकणसुपारीची राख हीं औषधें एकत्र खलून तें चूर्ण चट्ट्यांवर घालून दडपून बसवावें ह्मणजे चट्टे बरे होतात. उपदंशिक व्रण त्रिफळ्याच्या काढ्यानें धुवावे [ यादी नं. २४ ]. त्रिफळा कढईत जाळून त्याची राख मधांत कालवून लेप करावा, तेणेंकरून शिश्नांत उपदंशसंबंधीं जे व्रण होतात, ते लवकर भरून येतात. मालकांगणीचें मूळ माक्याच्या रसांत उगाळून तें चट्ट्यावर लावावें ह्मणजे ते बरे होतात. किंवा **क्यालोमेल** १० ग्रेन, साधें मलम २ ड्राम, असें मिश्र करून तें लावावें. शिश्न सुजलें असल्यास त्यावर शुगरलेडच्या पाण्यांत [ यादी

नं. २१ ] भिजविलेली कापडाची घडी गुंडाळावी व ती वरचेवर त्या पाण्यांत भिजवावी. शिश्नांत ठणका होत असल्यास त्यावर वारंवार पोलटिसें बांधावीं. त्यावेळेस रोग्यानें पडून असावें आणि शिश्न एकाद्या चिंधीनें आपले पोटाकडेस सांवरून धरावें, ह्मणजे तें लोंबकळून जास्त सुजण्याचें बंद पडेल. शिश्न सुजलें असतां चट्टे कातडीखालीं झांकले जातात, त्यांस ब्ल्याक वॉश (यादी नंबर. १९) मध्यें भिजविलेला लिंटाचा अथवा कापसाचा बोळा लावावा; ब्ल्याक वॉशच्या पिचकाऱ्या माराव्या. पुढें सूज कमी झाली, आणि शिश्नावरची कातडी मागें सरकूं लागली ह्मणजे चट्टे चांगले दिसूं लागतील, त्यांस वर सांगितलेल्या भुकण्या आणि मलमें लावून सुकवावें.

---

## कठीण चट्टा.

HARD CHANCRE.

हा चट्टा बोटाला कठीण लागून त्याचे परिणामही कठीण असतात. हा विषस्पर्शानंतर १५ दिवसांनीं उद्भवतो. तो बहुधा जननेंद्रियावरच असतो. क्वचित् अन्य ठिकाणीं होतो, त्यावेळीं त्याचें कारण निराळें असतें. ह्या चट्ट्यापासून पाण्यासारखी लस वहात असते, परंतु ह्यांत वेदना होत नसतात. कधीं कधीं ह्यावर खपली धरते व चट्टा बरा झाला असावा असें वाटतें. तथापि त्या ठिकाणचें काठिण्य नाहींसें होत नाहीं. पुढें कांहीं दिवसानीं त्या ठिकाणीं पुन्हा दाह उत्पन्न होऊन पू व लस वाहूं लागते. ह्या चट्ट्याचें बूड व कांठ प्रारंभापासून कठीण व जाड झालेले असतात. ह्यापासून शारीरिक विकार उत्पन्न होतात, वंक्षणाचे प्रदेशीं ( जांघेच्या

वरचे बाजूस) शोषक वाहिनींचे पिंड मोठे होतात ह्मणजे बदें होतात. हें बद कठीण असून सावकाश वाढणारें व वेदनारहित असें असतें आणि बहुधा ह्यांत पू होत नाहीं.

**उपचार:**—चट्ट्यावर एकसारखी **ब्ल्याक वॉश** (यादी नं १९) मध्यें भिजविलेली कापडाची घडी ठेवावी. किंवा ब्ल्याक वॉशाच्या तळीं जो काळा साका बसलेला असतो तो काढून चट्ट्यावर लावावा. अथवा हिंगुळ, शंखजिरें, कापूर, कात या सर्वांची वस्त्रगाळ पूड करून ती लावावी, किंवा **रेड अक्सॉइड ऑफ मरक्यूरी** २० ग्रेन, साधें मलम २ ड्राम (यादी नं १८) हीं एकत्र घोटून त्याची पट्टी चट्ट्यावर लावावी. किंवा **आयओडोफॉर्म** अथवा क्यालोमेल हीं चट्ट्यावर लावावीं. चट्ट्यांत आग होत असल्यास शुगरलेडचे पाण्यांत (यादी नं. २१) थोडें लाडेनम् [अफूचा अर्क] मिळवून त्यांत भिजविलेली कापडाची घडी त्यावर ठेवावी. कापराची पूड करून ती त्यावर लावावी, ह्मणजे आग त्वरित बंद पडते. वरील उपायांनींच चट्टा सुकून जातो, तथापि त्या ठिकाणचें काठिण्य आणि विष हीं नाहींशीं होत नाहींत. तें नाहींसें करण्याकरितां पोटांत औषध घ्यावें लागतें व तें न घेतल्यास गर्मीदेवी आपलें भयंकर स्वरूप थोडक्याच दिवसांत प्रकट करिते. गर्मीवर पारा हें मोठें मुजरत औषध आहे. तथापि शरीरीं स्कर्व्ही (नाविकरक्तपित्त) विकार असला किंवा मनुष्य अशक्त असला, ज्वर येत असला, किंवा पुष्कळ वेळां गर्मीचा उपद्रव झाला असून पाऱ्याचीं औषधें बरेच वेळ घेतलीं असल्यास आणि गंडमालाजनक प्रकृति असली तर, तसेंच कांहीं स्थानिक इंद्रियरोग,

कफक्षय, पाणथरी, हृदयाचे विकार, मूत्रपिंडरोग इत्यादि अवस्थेंत पारा उपयोगी नाहीं. कितीएकांस प्रकृतिवैलक्षण्यामुळें पारा बिलकूल सोसत नाहीं. परंतु सशक्त प्रकृतीच्या मनुष्यास कठीण चट्टा असल्यास पारा फार उपयोगाचा आहे. पाऱ्याच्या योगानेंच ह्याचा कठीणपणा मोडून तो बरा होतो व द्वितीय उपदंश विकार उत्पन्न होत नाहीं.

**पारा देण्याची रीतिः**—पोटांत, अंगावर चोळून आणि वाफारा अशा तीन रीतीनें पारा देतात. प्राथमिक उपदंशांत पारा पोटांत देणें आहे व रोग्याच्या शरीरावर त्याचें नेमस्त कार्य घडावें असें आहे, तर ब्ल्यू पील किंवा प्लमर्स पील (हे पाऱ्याचे कल्प होत.) पांच ग्रेनप्रमाणें दिवसांतून दोन वेळ द्यावें. हीं दोन औषधें एतद्देशीय वैद्य पारा, रसकापूर वगैरे वापरतात त्यांपेक्षां फारच चांगलीं व निर्भय आहेत. प्रकृति क्षुब्ध असल्यास प्लमर्सपील फार उपयोगी पडतें. कित्येक प्रसंगीं अंतडीं क्षुब्ध असतात, तेव्हां पारा दिला असतां त्यानें पोटांत मुरडा होऊन ढाळ होऊं लागतात. तेव्हां त्यांतच थोडी अफू पावपासून अर्धा ग्रेनपर्यंत मिळवावी. किंवा **ब्लयूऑइंटमेंट** ह्मणजे पाऱ्याचें मलम १ ड्राम घेऊन मांड्यांच्या आंतल्या बाजूस अथवा कांखेंत वीस पंचवीस पळेंपावेतों सकाळीं व संध्याकाळीं चर्माच्या पोतंडीनें चोळावें. पाऱ्याचा वाफारा बहुधा द्वितीय उपदंशांत देतात, ह्मणून तो देण्याची रीति त्या प्रकरणांत सांगितली आहे पारा चट्ट्यावर खपली येईपर्यंत चालू ठेवूं नये. परंतु चट्टा निरोगी व सांकुर स्थितींत येऊन त्याचा विशेष गुण नष्ट होईपर्यंत द्यावा. कांहींसें तोंड आल्याशिवाय हें कार्य चट्ट्यावर क्वचित्

घडतें. हिरड्या फुगून दुखणें, लाल होणें, तोंडांतून अतिशय लाळ गळणें, तांबें तोंडात धरल्यासारखा भास होणें, ह्यास तोंड येणें असें ह्मणतात. फारच तोंड येईइतका पारा देऊं नये. चट्टयाचा कठीणपणा नाहींसा होतांच पारा बंद करावा.

## गांवठी वैद्यांचा पारा देण्याचा प्रकार.

लवंग १, मिरी १, अक्कलकारा १, वावडिंग १, रुमा-मस्तकी १, ओंवा ४, जुना गूळ ४, पारा १, बिबवे सुमारें ३९, पारा व बिबवे एकत्र कुटून मळून त्यांत पारा मिळून गेला ह्मणजे गूळ घालून पुन्हा मळावें, नंतर राहिलेल्या औ-षधांची वस्त्रगाळ पूड करून ह्यांत मिळवावी, ह्या सर्वांचा चांगला खल झाल्यावर सुमारें पांच मासे वजनाच्या गोळ्या वळाव्या व एकच गोळी सकाळचे प्रहरीं खावी. हें औषध सात दिवस घ्यावें. पथ्य—दूधभात, वरकड वर्ज्य.

रसकापूर १, मोरचूत २, बाळहरीतकी ३, ह्या सर्वांची वस्त्रगाळ पूड करून सुमारें ५० लिंबांच्या रसाची भावना* द्यावी. खल चांगला होऊं द्यावा आणि अदमासें तुरीएवढ्या गोळ्या कराव्या. दररोज सांजसकाळ बर्फीच्या तुकड्यांत १ गोळी घ्यावी. पथ्य गव्हांची पोळी, तूप, साखर वरकड वर्ज्य. ह्याप्रमाणें सात दिवस क्रम चालवावा.

याप्रमाणें पारा देणें झाल्यानंतर त्याचा अंश शरीरांतून नाहींसा करण्याकारितां वैद्य जें औषध देतात तें:—

---

* ज्या रसाची भावना देणें असेल त्यांत तें औषध खलून उन्हांत सुकवावें. ह्या कृतीला पूट देणें असेंही ह्मणतात.

खैराची साल............२ तोळे.
जांभळीची साल........२ ''
पाणी.....................१ शेर.

यांचा काढा पावशेरपर्यंत आटला ह्मणजे गाळून त्यांत पाषाणभेदाची भुकणी १ मासा मिसळावी, नंतर तो काढा सकाळ संध्याकाळ दोन वेळ करावा. याप्रमाणें एक दोन सप्तकें क्रम चालविला ह्मणजे पारा वगैरे धातूरूप पदार्थ जे दीर्घकालपर्यंत शरीरांत राहतात ते ह्या औषधाचे योगानें विरघळून मूत्रद्वारें उत्सर्जित होतात.

## पाऱ्याचीं औषधें घेत असतां अवश्य ध्यानांत ठेवण्यासारखे नियम.

पारा देण्यापूर्वीं रेचक औषध द्यावें (यादी नं. ११). स्वस्थ असावें, व्यायाम करूं नये, लोकरीचे कपडे आंगावर घालावे, पावसांत व ओलसर जागेंत फिरूं नये, आहार नेमस्त व अनुत्तेजक असावा, तूपभात, साबूतांदुळाची पेज, गव्हाची पोळी, तूप, साखर इ० खावें. आंबट, थंड व तेलकट पदार्थ, मच्छमांस, दारू इ० वर्ज्य करावें.

## जास्त पारा पोटांत गेल्याचा परिणाम.

१—तोंड येतें, अतिशय लालस्राव होतो, जीभ आणि लालोत्पादक पिंड सुजतात, ताप येतो, सर्व तोंड सुजून तोंडाला घाण येते, हिरड्या फुगून तांबड्या होतात, आणि त्यांस किंचित् कांहीं लागलें असतां त्यांतून रक्त वाहतें. जिभेवर आणि गालाचे आंतले बाजूस क्षतें पडतात, दांत ढिले होतात, व कधीं कधीं खालच्या जाभाडाचें हाड कुजतें. दि-

वसभर तोंडांतून लाळ व कफ मिळून दहापांच शेर स्राव वहातो, घशाचा दाह होतो, त्यामुळें गिळते वेळेस घसा दुखतो आणि खाकरतांना घशांतून रक्त पडतें.

**उपचारः**—पाऱ्याचें औषध बंद करावें, जुलाब घ्यावा (यादी नं. ११) व ज्वरासाठीं यादी नं. ४ चें औषध घ्यावें. गळा शेकावा. २ ड्राम तुरटी आणि २० औंस पाणी अशीं एकत्र करून त्याच्या, अथवा बाभळीच्या सालीचा काढा करून त्याच्या गुळण्या कराव्या ह्मणजे लाळ बंद पडते. २ ड्राम **क्लोरेट आफ् पोट्याश** किंवा **बोऱ्याक्स,** (टंकणखार) २० औंस पाण्यांत मिश्र करून त्याच्या गुळण्या कराव्या, किंवा २ ड्राम **टॉनिक आसिड,** अर्धा ड्राम, **हैड्रोक्लोरिक आसिड** आणि २० औंस पाणी अशीं एकत्र करून त्याच्या गुळण्या कराव्या ह्मणजे तोंडांतील क्षतें बरीं होतात. तोंडास घाण येऊं लागली असतां २ ड्राम **कॉंडीसफ्लुईड** आणि २० औंस पाणी अशीं एकत्र **करून** त्याच्या गुळण्या कराव्या. मधून मधून जुलाब घ्यावा [ यादी नं. ११ ]. क्षीणता उत्पन्न झाली असल्यास पौष्टिक व उत्तेजक औषध घ्यावें (यादी नं. १). ताप वगैरे चिन्हांचें शमन झाल्यावर **सारसापरीला** घ्यावा, किंवा **पोट्याश आयओडाईड** पांच ग्रेन, **पोट्याश क्लोरस** १० ग्रेन, **डिकॉक्टं सिंकोना** एक औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ घ्यावें; ह्मणजे पारा व दुसरे धातुरूप पदार्थ जे दीर्घकालपर्यंत शरीरांत रहातात ते **पोट्याश आयओडाईड**च्यायोगानें विरघळून मूत्रद्वारें उत्सर्जित होतात.

**पथ्यः**—दूधभात, साबू तांदुळांची पेज, साधा मांसरस, (सूप) असें खावें आणि हवा पालटावी.

२ कधीं कधीं अतिशय रेच होतात, आणि त्यांत पित्त पडतें, मुरडा होतो, आणि आंवरक्त पडूं लागतें. **उपचारः**—पारा बंद करावा. ६ ग्रेन डोव्हर्स पावडर, १० ग्रेन पल-व्हीस क्रेटा अरोम्याटिक, आणि २० ग्रेन बडीशोपेचें चूर्ण असें एकत्र करून दिवसांतून ३ वेळ घ्यावें.

३ कित्येक प्रकारचे त्वग्रोग उत्पन्न होतात, आंगावर पुरळ उठतो. **उपचारः**—यादी नं. ४ च्या औषधांत २ ड्राम **म्याग्निशिआ**, आणि १० ग्रेन **पोट्याशिनैट्रस** असें मिश्र करून दिवसांतून दोन तीन वेळां घ्यावें; पुढें **सारसापरीला** चालू करावा.

४ **पारदजन्य क्षुब्धावस्थाः**—ह्यांत रक्त निःसत्व होतें. व हृदय आणि मेंदू ह्यांचें पोषण होत नाहीं. **लक्षणेंः**—उदासीनता येते, दम लागतो, वारंवार उसासा, व छाती थडधडते, झोंपेचा मोड होतो, नेहमीं दम कोंडल्यासारखा, आणि अल्पायासानें मूर्छा येते. **उपचारः**—उत्तेजक व पौष्टिक औषधें घ्यावीं, (यादी नं० १). किंवा डिकाक्टं सिंकोना १ औंस, स्पिरीट अमोनिया अरोम्याटीक् २० मि०, क्लोरेट आफ् पोट्याश १० ग्रेन, टिंक्चर डिजिलेटीस ५ मि०, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ घ्यावें. पुढें सारसापरीला घ्यावा.

**पथ्यः**—वरल्याप्रमाणेंच करावें.

## पाऱ्याशिवाय गर्मीचे उपचार.

जुलाब घेऊन मलशुद्धि करावी [यादी नं. ११]. आणि पटोलादि काढा—ह्मणजे पटोळ (पडवळ), कडूनिंबाचीसाल,

हरडा, बेहडा, अवळकठी, खैराची साल, किराईत, बिबळा [असाणा] हीं सर्व एक एक तोळा, आणि गुळवेल तीन तोळे, ह्या सर्वांचे चार विभाग करून त्यांतील १ भाग दररोज शेरभर पाण्यांत पावशेर बाकी राही तोंपर्यंत उकळावा. नंतर गाळून त्यांत पावतोळा गुगुळ मिळवून सकाळ संध्याकाळ ह्याप्रमाणें तीन सप्तकेंपर्यंत घ्यावा. ताप येत असल्यास घाम आणणारें औषध [यादी नं० ४] दिवसांतून तीनचार वेळ घ्यावें. त्यांत १०—२० ग्रेन पोट्याशनैट्रस (सोरा) मिळवावा. अशक्तपणा दूर करण्यास पौष्टिक औषधें घ्यावीं. डिकाक्ट सिंकोना १ औंस, आसिड नैट्रिक डिल्यूट १० मिनिम्स, असें मिश्रण दिवसांतून दोन तीन वेळ घ्यावें. किंवा काडलिव्हर आईल १—२ ड्राम प्रत्येक जेवणानंतर दुधांत किंवा साखरेच्या पाकांत मिश्र करून घ्यावें. किंवा इस्टन्सासिरप घ्यावें, किंवा सुवर्णवसंत घ्यावा. वेदना व क्षुब्धता शांत करण्यास अर्धापासून एक ग्रेन अफू खावी. गर्मीचें विष नाहींसें करण्यास **सारसापरिला** आणि पोट्याश **आयओडाईड** घ्यावें. चट्ट्याचे बाह्योपचार मागें सांगितल्याप्रमाणें करावे.

---

## चरणारा चट्टा.

PHAGEDŒNIC CHANCRE.

हा बहुतकरून गलिच्छपणा व कंगाली पदरीं असल्यामुळें अन्न व वस्त्र वगैरे बरोबर मिळत नाहीं, तेणेंकरून शरीरांत असावें तितकें रक्त नसतें व असलें तरी तें निःसत्व असतें, अशा वेळीं वेश्येच्या संगानें होतो. ह्या च-

त्याची गति मंद परंतु एकसारखी चरणारी असते. हा वर वरच पसरतो. ह्याचे कांठ वांकडे तिकडे असतात. आणि ह्यापासून झोंबणारा व रक्तमिश्रित असा स्राव होत असतो. हा बहुतकरून शिश्नमण्यावर किंवा शिश्नमण्याचे खालचे अंगीं जो तंगबंद (सेवनी) असतो त्यावर अथवा मूत्रद्वाराजवळ होतो. **मिस्तर वालेस** ह्यानें ह्या जातीच्या चट्ट्याचे तीन प्रकार केले आहेत. जळमटरहित चरणारा चट्टा, पांढऱ्या जळमटानें आच्छादित चट्टा, आणि तिसरा काळ्या जळमटांनीं आच्छादित चट्टा.

**उपचारः**—चट्ट्यांत वेदना होत असल्यास त्यावर आसिड टॅनिक १८ ग्रेन, टिंक्चर ओपाय (अफूचा अर्क) अर्धा औंस, आसिड कार्बोलिक २० ग्रेन, शुगरलेडचें पाणी (यादी नं. २१) १०. औंस, ह्या मिश्रणांत भिजविलेली कापडाची घडी रात्रंदिवस ठेवावी. किंवा अफू १० ग्रेन, कापूर २० ग्रेन, पाणी १० औंस अशीं एकत्र करून त्याची घडी ठेवावी. वेदना होत नसल्यास चट्टा **नैट्रीक आसिड** लावून जाळून टाकावा. (पृष्ठ ११६ पहा.) नंतर त्यावर अफूच्या पाण्याच्या घड्या किंवा गव्हाचें अथवा अळशीचें पोटलीस बांधावें. जळमटें निघून गेल्यावर त्यावर **आयओडोफार्म**चें मलम [आयओडोफार्म १ भाग, साधें मलम आठ भाग] लावावें. किंवा कापूर, हिरादखाण, राळ, घापण, ह्या सर्वांची वस्त्रगाळ पूड करून ती साध्या मलमांत (यादी नं० १८) मिसळून त्याची पट्टी करून लावावी. चट्टा दाहयुक्त असल्यास स्वस्थ पडून रहावें. मध्यम पौष्टिक अन्न खावें. दुधाची पेज, गव्हांचे पदार्थ, अंडीं, मांसरस (soup) वाईन इ०. वेदना

फार होत असल्यास १–२ ग्रेन अफू दिवसांतून एक दोन वेळ खावी. कधीं कधीं रेचक द्यावें ( यादी नं० ११ ). क्षीणता असल्यास पौष्टिक व उत्तेजक औषधें द्यावीं. डिकाक्टं सिंकोना १ औंस, अमोनिया कार्बोनस ३ ग्रेन, असें दिवसांतून तीन वेळ द्यावें, इस्टन्ससिरप द्यावें, किंवा किनाईन डी सलफस १२ ग्रेन, रिडयूस्डआयर्न १२ ग्रेन, एक्स्त्राक्ट जनशियन १२ ग्रेन, किंवा पुरे होईइतकें ह्यांच्या ६ गोळ्या करून सकाळ संध्याकाळ एक एक गोळी द्यावी. विष नाहींसें करण्याकरितां **पोट्याश आयओडाईड** ४ ग्रेन, टिंक्चर आफ् ग्वायेकं २० मिनिम्स, डिकॉक्टं सारसा कंपाऊंड १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ द्यावें, ह्मणजे चरणारा चट्टा बरा होतो. किंवा **मंजिष्ठादि काढा** ह्मणजे–मंजिष्ठ, गुळवेल, कोष्ट, वेखंड, दारूहळद, पटोल, देवदार, माका, हिरडा, बेहडा, कुटकी, आवळकठी, वेखंड, कडूनिंब, इंद्रजव, किराईत, बावच्या, अतिविष, वाळा, बाहव्याचे शेंगेंतला मगज हीं सर्व औषधें तोळा तोळा घेऊन त्याच्या चार पुड्या कराव्या. दररोज एक पुडी सुमारें ६४ तोळे पाण्यांत उकळून काढा ८ तोळे शिल्लक राहिला ह्मणजे गाळून त्यांत मध २ गुंजा, पिंपळीचें चूर्ण आणि पावतोळा गुग्गुळ अशीं मिश्र करून दिवसांतून दोन वेळ प्यावा. ह्याच्या योगानें सर्व प्रकारची उपदंशिक बाधा नाहींशी होते.

## सडणारा अथवा मांसनाशक चट्टा.

SLOUGHING CHANCRE.

ह्यांत प्रथमतः शिश्नमणि व त्यावरील कातडी हीं सुजतात, लाल होतात, व कठीण होतात. नंतर एके ठिकाणीं काळा डाग पडून तो त्वरित पसरतो, व मांस कुजून गळूं लागतें. कधीं कधीं मण्यावरील चामडी एकेच बाजूस कुजून तेथें छिद्र पडतें, व त्यांतून मणि बाहेर पडतो. कधीं कधीं शिश्नाचा कांहीं भागही गळून जातो. ह्या वेळेस बहुतकरून शिश्नाच्या वरच्या धमनींतून रक्तस्राव होत असतो.

उपचारः—मण्यावरील कातडीचा रंग बदलून ती निळसर जांभळ्या रंगाची होत आहे तर लगेच ती कांपून काढावी. रक्तस्रावासाठीं त्या ठिकाणीं थंड पाण्याची घडी सतत ठेवावी. कातडी कापून टाकल्यावर त्या ठिकाणीं चट्टा असल्यास तो नैट्रिक आसिडानें जाळून टाकावा. नंतर त्यावर अफूच्या पाण्याची घडी ठेवावी. शिश्नांत कुजण्याची क्रिया सुरू असल्यास त्यावर कोळशाचें पोल्टीस बांधावें (यादी नं. १०). सडलेले भाग गळून पडल्यावर त्याठिकाणीं जखम भरून आणणाऱ्या मलमाच्या पट्टया लावाव्या (यादी नं. १७). किंवा चरणाऱ्या चट्टयांत सांगितलेलीं मलमें लावावीं. किंवा रेड आयओडाईड आफ् मरक्यूरी १० ग्रेन, साधें मलम २ ड्राम, ह्याच्या पट्टया लावाव्या. पोटांत औषधें घ्यावयाचीं तीं चरणाऱ्या चट्टयांत सांगितल्याप्रमाणेंच घ्यावीं ह्मणजे हा चट्टा बरा होतो.

# बद.

BUBOE.

**बदः**—मांडीच्या वरच्या बाजूस जांघेंत जी गांठ उत्पन्न होते त्यास 'बद' अथवा 'वळ' असें ह्मणतात. बदें दोन प्रकारांनीं उत्पन्न होतात—१ गर्मीचें विष शरीरांत शोषण झाल्यानें, आणि दुसरीं क्षोभापासून ह्मणजे फार चालल्यानें किंवा पायांत आघातादिक झाल्यानें; शेवटीं सांगितलेल्या कारणापासून जी गांठ उत्पन्न होते त्यास 'वळ' असें ह्मणतात.

गर्मीचे विषापासून उत्पन्न होणाऱ्या बदांचे दोन प्रकार आहेत. शीघ्र व विलंबी. शिश्नावर मृदु चट्टा असतां जें बद होतें तें शीघ्र बद. हें लवकरच पुवळणास येऊन फुटतें. विलंबी बद कठिण चट्ट्यापासून उत्पन्न होतें. हीं बहुधा दोन असतात. हीं हळूहळू वाढतात व उपचार केले नाहींत तर तशींच राहतात. यापासून गर्मीचे दुसरे अनेक विकार उत्पन्न होतात.

**उपचारः**—स्वस्थ निजून असावें, हिंडूं फिरूं नये. कारण गांठीचा जोर जास्त होतो. अन्न साधें व हलकें असावें. स्नान, आणि आंबट व थंड पदार्थ खाणें हीं सर्व बंद करावीं. बद जिरविण्याकरितां १२–२४ जळवा लावाव्या. नंतर उष्ण पाण्याचा शेक करावा. बदावर कापडाची घडी ठेवून त्यावरून पट्टा बांधावा. जुलाब घ्यावा (यादी नं. ११). ताप येत असल्यास (यादी नं. ४) चें औषध घ्यावें. बदावर **लिनिमेंट आफ् आयओडीन** लावावें, किंवा काळ्या

मलमाच्या पट्टया लावाव्या (यादी नं १६ ). ह्मणजे बदें जिरून जातात. बद दाहयुक्त झालें असल्यास त्यावर तीन तीन तासांनीं पोलटिसें बांधून पिकवावें. त्यांत पू झाला ह्मणजे जेथें चामडी अगदीं बिलबिलीत झाली असेल त्याठिकाणीं पोट्याश कास्टीका किंवा नैट्रेट आफ् सिल्व्हर (काडीखार) ० फक्त इतक्या जागीं चोळावें ह्मणजे तेथील चामडी जळून जाऊन बद फुटतें. नंतर त्याठिकाणीं पुन्हा पोलटिसें बांधावीं. पुवाचा निकाल झाल्यावर व्रण भरण्याकरितां **आयओडोफार्मचें** मलम (आयओडोफार्म १ भाग साधें मलम ८ भाग) लावावें किंवा जखम भरून आणणाऱ्या मलमाच्या पट्टया लावाव्या ( यादी नं० १७ ). बद विलंबी असलें ह्मणजे कठीण चट्टयाच्या चिकित्सेंत सांगितल्याप्रमाणें पारा वगैरे औषधें प्रकृतीच्या मानाप्रमाणें घ्यावीं. व बदावर **मर्क्युरियल प्लास्टर** किंवा १–२ दिवसांआड **लिनिमेंट आफ् आयओडीन** (आयओडीनपेंट) लावावें ह्मणजे बदें जिरतात. पू झाला ह्मणजे पारा व पाऱ्याच्या पट्टया बंद कराव्या, पोलटिसें बांधावीं. बद पिकलें ह्मणजे शस्त्रवैद्याकडून किंवा शीघ्र बदांत सांगितलेले औषधांनीं फोडावें. नंतर तेथें जो व्रण पडतो त्यावर कठीण चट्टयांत सांगितलेल्या भुकण्या व मलमें लावावीं ह्मणजे व्रण भरून येतात.

**गांवठी वैद्यांचे उपायः—**प्रथम जळवा लाऊन रक्त काढतात. नंतर त्यावर लिंबाचा पाला थोडक्या पाण्यांत कुटून त्यांत हळद व तूप घालून उष्ण करून बांधतात. चुना व बिबवा एकत्र कुटून त्याची पट्टी वर बसवितात. अथवा अंड्यांतला बलक, शेंदूर व रेवाचिनीचा शिरा हीं एकत्र

वेळेवर जेवावें, आहार पौष्टिक ठेवावा, कांदे लसणाची भाजी नेहमीं खावी, व्यायाम करावा. नित्यशः आठ तास झोंप घ्यावी, व लघुशंका केल्याशिवाय निजूं नये. निजते वेळीं थंड पाण्याचा बस्ती गुदांत मारावा. चांगले हवेंत रहावयास जावें व सोईस पडेल तर पर्यटन करावें. **ग्याल्व्हनीक ब्याटरी** कंबरेस व शिश्नास लावावी, शिश्नाचे बुंधाशीं किंवा खालचे अंगास एक चौरस इंचाचें ब्लिस्टर मारावें ( यादी नं. २२ ). हा रोग बरा होण्यास बराच काळ लागतो.

शौचास साफ होत नसल्यास त्रिफळ्याचा किंवा एरंडेल तेलाचा जुलाब घ्यावा ( यादी नं. ७ ). पुढें टिंकचूरी फेरायपर क्लोराईड १० थेंब, लिकर स्ट्रिक्निया ५ थेंब, आसीड फॉसफारीक डील्यूट १० थेंब, पाणी १ औंस, असें एकत्र करून दिवसांतून तीन वेळ घ्यावें, किंवा टिंक्चर क्यानाबीस इंडीका १० थेंब, लिकर स्ट्रिक्निया ५ थेंब, सरबत एक चहाचा चमचा भरून व पाणी १ औंस [ सरासरी एक घोंट ] हीं एकत्र करून दिवसांतून तीन वेळ घ्यावें. अगर टिंक्चर फेराय १० थेंब, टिंक्चर क्यांथारडीस ५ थेंब, इनफ्यूजन क्काशीआ १ औंस हीं एकत्र करून दिवसांतून तीन वेळ घ्यावीं. किंवा फेराय रेडिक्टाय ३६ ग्रेन, एक्स्ट्रयाक्ट ऑफ नक्सव्हामीका २ ग्रेन, एक्स्ट्राक्ट ऑफ क्यानाबीस इंडीका ४ ग्रेन, किनाईन सलफस १२ ग्रेन, एक्स्ट्राक्ट ऑफ जनशन १२ ग्रेन हीं एकत्र घोंटून त्याच्या १२ गोळ्या कराव्या व त्या सकाळीं दुपारीं व संध्याकाळीं ह्याप्रमाणें ४ दिवस पुरवाव्या. लघवीचे वेळीं आग होत असल्यास कापूर ६ ग्रेन, एक्स्ट्रयाक्ट ऑफ क्यानाबीस इन्डिका ६ ग्रेन,

क्विनाइन सल्फस १२ ग्रेन, फेरायरिडक्टाय २४ ग्रेन, एक्स्ट्र्याक्ट नक्सव्हामीका २ ग्रेन, एक्स्ट्र्याक्ट जनशन १२ ग्रेन हीं एकत्र करून त्याच्या गोळ्या करून त्या दिवसांतून तीन वेळप्रमाणें चार दिवस पुरवाव्या.

**धातुपौष्टिक एतद्देशीय औषधें:**—सफेत मुसळी, काळी मुसळी, मुंदेरी, मोठे गोखरू, मोंगली बेदाणा, एकरो, हीं सर्व समभाग घेऊन त्यांतील १ तोळा, इतकें अच्छेर त्यांत पावशेर शेष राहीपर्यंत उकळावें, नंतर गाळून त्यांत दोन गुंजा जायफळाची भुकणी टाकून तें घ्यावें. किंवा सुवर्णमाक्षिक, लोहभस्म, पारद, शिलाजित, हरीतकी, वावडींग, धोतऱ्याचें बीज, भांग, जायपत्री, यांचे चूर्णास सात दिवस वेगळ्या वेगळ्या असाणा, व गोखरू यांच्या अर्काच्या भावना [पृष्ट १४७ पहा] द्याव्या. हें चूर्ण सात दिवस घ्यावें. दर वेळेस २ गुंजांप्रमाणें मध व तूप ह्यांत मिश्र करून दिवसांतून दोन वेळां घ्यावें व वर पावशेर गाईचें दूध घ्यावें, व गव्हांचा रवा तुपांत भाजून साखर व मध घालून खावा. २१ दिवसपर्यंत स्त्रीसंग करूं नये. ह्मणजे मनुष्य बळकट होऊन धातूची वृद्धि होते. सफेत मुसळी ७, काळी मुसळी ७, शतावरी ९, गोखरू ४, बळबीज २, तेजबळ १, अक्कलकारा १, मदनमस्त १, कमरकस १, वेलची २, पिंपळी १, पिंपळमूळ १, जायपत्री १, लवंग १, सुंठ १, कस्तुरी ·॥· अंबर ·॥, केशर ९, बदामाचा मगज ६, दुधीचा मगज* ६, तरबुजाचा मगज ६ भाग, ह्यांपैकीं मगज, कस्तुरी, अंबर इतकीं खेरीजकरून बाकी सर्व औषधांची वस्त्रगाळ पू-

---

* बियांतील गीर.

करावी. नंतर तीन शेर साखर व तीन शेर दूध घेऊन त्याचा खवा करावा; व दीड शेर गाईचे तुपांत सर्व मगज तळून, तें वस्त्रगाळ चूर्ण, खवा [illegible] उन्हउन्हीत आहेत [illegible] गाणें सर्व सारखीं मिश्र पाव- [illegible]वर एका मोठ्या परातीला तूप लावून तें सर्व औषध परातभर थापटावें. नंतर त्यावर कस्तुरी, अंबर व सोन्याचा वर्ख चिकटवून त्याच्या वडया पाडाव्या. ह्याला पौष्टिक पाक असें ह्मणतात. हा पाक दररोज तोळा तोळा प्रमाणें महिना दोन महिने पावशेर अच्छेर किंवा शेर (पचेल इतक्या) दुधाबरोबर खावा, ह्मणजे वीर्यवृद्धि होऊन मनुष्य पुष्ट होतो.

सफेत मुसळी १, गुळवेलीचें सत्व १, [illegible]बीज [illegible] गोखरू १, सांवरीचा कंद १, साकर १, आवळकठी १, ह्या औषधांचें चूर्ण करून तें तोळा तोळाप्रमाणें गाईच्या दुधांत १ तोळा तूप टाकून घेतलें असतां धातूची वृद्धि होऊन कामोद्दीपन होतें.

भुईकोहळ्याचें चूर्ण नित्यशः तोळा तोळा घेऊन तूप व दूध ह्याबरोबर सेवन करावें ह्मणजे धातूची वृद्धि होते. गाईच्या तापविलेल्या दुधांत गाईचें तूप व साखर घालून घेत जावें. हा उपाय फारच पुष्टिकारक होय.

अस्वली मूळ, तीळ, उडीद, सराटे, चिकणा (मुद्राबीज), कवचबीज, तालीमखाना ह्यांचें चूर्ण तोळाप्रमाणें सकाळ संध्याकाळ दूध व खडीसाखरेबरोबर घ्यावें ह्मणजे धातुपुष्टि होते.

खसखशीचीं बोंडें ओलीं अथवा वाळलेलीं १ तोळा, सोललेली सुंठ १ तोळा ह्यांचा षोडशांश काढा करून त्यांत

गूळ घालून प्यावा. हें धातुस्तंभक आहे. उतारा पाहिजे असल्यास लिंबू खावें.

कस्तुरी १, केशर १ जायफळ १, लवंग १, अफू १, भांगेचें बूट १, सुंठ १. [illegible] पुरवा[illegible] यांची वस्त्रगाळ पूड करून वालप्रमाणें सकाळीं संध्याकाळ मधाबरोबर [illegible] व त्यावर धारोष्ण दूध प्यावें. हे वीर्यस्तंभक असून मोठें कामोद्दीपक आहे.

**भेदकविचारः**—वीर्यस्रावासारखा स्राव प्रास्टेट* पिंडा- असें ह्मटलें आहे. पासूनही होत असतो. त्याला प्रास्टेटेरिया [illegible] यंत्रानें पाहिला वीर्यस्रावामध्यें जो स्राव डोकीं मोठीं व लंबाकार पुच्छ असे असतां त्यांत [illegible] चलनशील प्राणी दिसतात. ते **प्रास्टेटेरिया** रोगामध्यें जो चिकट पिच्छा स्राव होतो त्यांत नसतात, त्यावरून ओळखावा. हाच ह्या उभय रोगांत भेद समाजावा.

---

## नपूंसकत्व.

### IMPOTENCY.

**नपूंसकत्व** ह्मणजे स्त्रीगमनास असमर्थ होणें. नपूंसकत्व अनेक कारणांपासून उत्पन्न होतें. जननेंद्रियाचा अभाव किंवा अपूर्णपणा, वृषण नसणें किंवा त्यास कांहीं दुष्ट विकार होऊन याच्या वियोजक क्रिया [ **रेतविसर्जन** ] बंद पडणें, हीं दोन नपूंसकत्वाचीं जबर कारणें होत. ह्यांत मर्दाई

---

* ह्या पिंड मूत्राशयाच्या मानेशीं किंवा शिश्नाचे बुंधाशीं असतो.

प्राप्त होणें अशक्य होय. वीर्याचा अपूर्ण कालीं क्षय झाल्यानें निरोगी व धष्टपुष्ट अशा मनुष्यास नपूंसकत्व प्राप्त होतें. कधीं कधीं बळकट व स्नायुबलाविषयीं प्रख्यात असे जे पेलवान व कसरती यांस ही दशा प्राप्त होते. रक्तजमूर्च्छा ( आपाप्लेक्सी ) ह्या रोगाच्या झटक्यानंतरही नपूंसकत्व येतें, तसेंच डोकें व पाठीचा कणा ह्यांजवर तडाका बसल्यानें नपूंसकत्व प्राप्त होतें व तें बहुतकरून नेहमीं राहतें; तरी क्वचित् दूरही होतें.

**उपचार**:—हा प्रकार नूतनच असल्यास ज्यालप पावडर वीस ग्रेन, क्यालोमेल ६ ग्रेन, हीं मधांत मिश्र करून चाटवावीं. ह्याप्रमाणें आठवड्यांतून दोन तीन वेळां रेचक द्यावें, व पुढें कस्तुरी ६ ग्रेन, गांज्या १२ ग्रेन, लोहभस्म २४ ग्रेन, कुचल्याची भुकणी ६ ग्रेन, हीं काकवींत किंवा मधांत घोटून त्याच्या बारा गोळ्या वळाव्या, व दिवसांतून दोन गोळ्या पावशेर. [illegible] प्रत्येक वेळीं एक ह्याप्रमाणें खाव्या. किंवा फॉसफाईड आफ् झिंक ३ ग्रेन, क्विनाईन १२ ग्रेन, फेरायरिडक्टाय [ लोह ] २४ ग्रेन, एक्स्ट्र्याक्ट नक्सव्हामिका ४ ग्रेन, ह्यांच्या एक्स्ट्र्याक्ट जनशनमध्यें १२ गोळ्या करून वरल्याप्रमाणेंच घ्याव्या. किंवा वीर्यस्त्रावप्रकरणांत सांगितलेला पाक खावा. आहार पाचक व पौष्टिक ठेवावा. पांच पांच मिनिटें **ग्यालव्हानिक ब्याटरी**—[ विजेचें यंत्र ] कंबरेवर व शिश्नावर लावावें.

कधीं कधीं दुष्टज्वर, संग्रहणी इ० रोग बरे झाल्यानंतर जरी शरीरबल व शक्ति हीं सुधारलीं तरी जननेंद्रियें अशक्त रहतात, तेव्हां वर सांगितलेले औषधोपचार करावे, आहार

पौष्टिक व मसालेदार असावा, कोंबडीचीं अंडीं, कालवें वगैरे खावयास सांगावीं, आणि चांगलीशी शक्ति येईपर्यंत स्त्रीसंग बंद ठेवावा.

मधुमेह ( मूत्रशर्करादि रोग ), ब्राईटचा मूत्रपिंड रोग, अकझालिक आसिड डायथिसिस नामक एक विशेष देह प्रकृति असते तींत, अजीर्णाचे कांहीं प्रकारांत, व कित्येक रचनाविकारी मंदरोग ह्यांत मैथुनशक्ति कमी होते; कधीं कधीं तिचा पूर्ण ऱ्हास होतो. भित्रेपणा, देवभोळेपणा, अप्रबुद्धि व पापभीरुत्व इत्यादि धर्म ज्यांच्या ठायीं आहेत असे लोक षंढ नसतात. त्यांना विषयाची आवड नसल्यानें केवळ मानसिक अविचारानें नपूंसक बनून राहतात; व ते तरुण असतांही प्रथम स्त्रीसंगाचे वेळीं त्यांचें शिश्नोत्थान होत नाहीं, तेव्हां त्यांस आपण नपूंसक आहोंत असें वाटतें. अशांस धीर द्यावा. ही अवस्था प्रथमसंगाच्या वेळेस बहुतांस होतें, असें त्यास समजवावें. दौ[illegible] खावा, वीर्यस्रावांत सांगितलेलीं पुष्टाईचीं औषधें द्यावीं, त्यांचा स्वभाव बदलण्याची तजवीज करावी, कधीं कधीं किंचित् अम्मल (भांग वगैरे) द्यावा.

कित्येक लोक आपल्या लघवीबरोबर धातु ( रेत ) जातें, ह्मणून आपण रतिसुखाला अयोग्य आहोंत, व आपलें जननेंद्रिय ( शिश्न ) अपूर्ण किंवा अशक्त आहे असा संशय उत्पन्न होऊन वारंवार वैद्याकडेस आपली लघवी तपासण्याकरितां जातात. इतकेंच नाहीं परंतु घराकडेसही नित्य लघवी ग्लासांत धरून त्यावर विरळ जळमटें ( म्युकस ) किंवा दुसरा कांहीं क्षोभज पदार्थ जे मूत्राशयांत कांहीं क्षोभामुळें उत्पन्न होऊन लघवीबरोबर बाहेर पडतात [ क्षार ] व कांहीं

वेळानें लघवींत तरंगूं लागतात किंवा तळीं बसतात, त्यास ते धातु असें समजून विनाकारण त्याची काळजी वहात असतात. अशा लोकांचीं समजूत पाडणें फार कठीण असतें. त्यांना धीर द्यावा व तुमचा रोग चार आठ दिवसांत बरा होईल ह्मणून सांगावें. मूत्राशयाच्या क्षोभाचीं कारणें शोधून तीं दूर करावीं. पाचक व पौष्टिक आहार द्यावा. मधुर, तिखट पदार्थ, मद्य, जाग्रणें हीं बंद करावीं, आणि जठराची पाचकशक्ति वाढविण्याकरितां व लघवी साफ होण्याकरितां टिंक्चर नक्स व्हामिका १ ड्राम, आसिड नाइट्रीक डिल्यूट १ ड्राम, इन्फ्यूजन चिराटा ( यादी नं. १२ ) सहा औंस ह्यांचे सहा भाग करून दिवसांतून तीन वेळां ह्याप्रमाणें प्यावयास द्यावे. व तुमचे लघवींत कांहीं नाहीं, ती निर्दोष आहे, बहुतेकांची अशीच असते, असें नीट समजावून सांगावें, नाहीं तर हवा बदलावी ह्मणजे तब्यत ताळ्यावर येईल, असें सांगून त्यांचें समाधान करावें.

# औषधांच्या यादी.

पूर्वोक्त रोगचिकित्सेंत यादी नंबर अमुकचें औषध द्यावें असा वारंवार उल्लेख आला आहे, त्या यादी खालीं लिहिल्याप्रमाणें:—हीं औषधें तयार करते वेळेस ग्रंथारंभीं औषध तयार करणारांस ज्या सूचना केल्या आहेत, त्याप्रमाणें वजनें, मापें, कृति व स्वच्छता यांजकडे पूर्ण लक्ष देऊन तीं तयार करावीं.

## ब्रांडीमिक्श्चर.

### यादी नंबर १.

कोंबडीच्या एका अंडयांतील पिंवळा बील, साखर एक तोळा, उंची ब्रांडी एक औंस, दालचिनीची पूड दहा ग्रेन, किंवा एसेन्स आफ् सिनामनचे पांच थेंब, व पाणी औंस तीन. प्रथम पिंवळा बील आणि साखर एकत्र घोटून नंतर दालचिनी, ब्रांडी व पाणी ही अनुक्रमानें मिसळावीं.

**योजना:**—हें पौष्टिक आहे ह्मणून शरीर फार अशक्त झाल्यामुळें रुधिराभिसरण फार निर्बल होतें, तेव्हां त्याला उत्तेजन येण्यासाठीं देतात. अशक्त प्रकृतींत जेथें जडान्न सोसत नाहीं, तेथें हें मिश्रण फारच प्रशस्त आहे.

**प्रमाण:**—मोठया मनुष्याला एक दोन औंसपर्यंत नुसतेंच किंवा दुधांत मिश्र करून द्यावें.

---

## मद्य—ब्रांडी.

BRANDY.

हा प्रवाही पदार्थ कित्येक वनस्पतीचीं फळें, फुलें, आणि अंगरस ह्यांपासून तयार होतो. आपल्या देशांत ताड, माड, खजुरी [ शिंदी ] मोहडा इ० वनस्पतींपासून हा तयार होतो. अन्य ठिकाणीं हा यव, माल्ट, हॉप्स वगैरेपासून तयार करतात.

**उपयोग:**—ब्रांडी ही थोडया प्रमाणानें घेतली असतां क्षुधा व पाचनशक्ति हीं वाढतात, यास्तव अशक्त व नाजुक मनुष्यांनीं तिचा जरूर उपयोग करावा. त्यापासून हित होतें. शरीर फार अशक्त झाल्यामुळें रुधिराभिसरण फार निर्बळ होतें,

तेव्हां त्याला उत्तेजन येण्यासाठीं हिचा उपयोग करावा. बाह्योपचारांत फार दिवस अंथरुणावर पडून राहिल्यानें अंगास जीं खटें पडतात, त्यावर आणि स्तनाग्राला ज्या भेगी वगैरे पडतात त्यावर ही पाण्यांत मिश्र करून लाविली असतां तीं बरीं होतात.

**प्रमाणः**—ही मोठ्या मनुष्यास २ ड्रामपासून १ औंसपर्यंत सोडावाटरांत किंवा नुस्त्या पाण्याशीं मिश्र करून द्यावी. एक वर्षाचे मुलांस पांचपासून दहा थेंब इतकी दुधांत किंवा साखरेच्या पाकांत मिश्र करून पाजावी.

वर सांगितलेल्या प्रमाणापेक्षां जास्त प्रमाण घेतलें असतां फार वाईट परिणाम ( माद, मूर्च्छा, आणि मृत्यु ) होत जातात. ही एक मादक विष होय, हिची संवय होऊं देऊं नये.

---

## उलटीचीं औषधें.

### यादी नंबर २.

इपिकाक्युआन्हा, रुई, सलफेट आफ् झिंक, मोहरी, कारल्याचा रस, अडुळसा इ० पैकीं व मनार्थ जीं प्रशस्थ व ज्यांचा वारंवार उपयोग होतो, त्यांचाच येथें विचार केला आहे.

**इपिकाक्युआन्हा**—( अ ) ह्या वनस्पतीचा गंध उग्र, रुचि कडू, व सुगंधी आणि किंचित् तिखट अशी असते.

**योजनाः**—इपिकाक्युआन्हा हें १६–३० ग्रेनपर्यंत दिलें असतां वमक कार्य करितें व अल्पप्रमाणानें दिलें असतां उह्मासे येतात. हें दाहजन्य अजीर्णांशामध्यें पक्काशय रिता करण्यासाठीं देतात. ह्याच्या योगानें कफसंचय दूर

होतो. अन्नमार्गावर ह्याची क्रिया घडत असल्यामुळें हें अतिसार व संग्रहणी ह्या रोगांत मळ पूर्वस्थितीवर आणण्याकरितां ह्याचा उपयोग होतो. पडसें आदिकरून सर्दीच्या रोगावर ते बंद करण्याकरितां हें अफूशीं मिळवून देतात. जसें–डोव्हर्स पावडर ५–१० ग्रेन. इपिकाक्युआन्हा हें विषम ज्वराच्या वेगाची तीव्रता कमी करण्यासाठीं वेग येण्याच्या पूर्वी देतात. कित्येक मनुष्यांना इपिकाक्युआन्हा अगदीं सोसत नाहीं, त्याच्या वासानेंच त्यांना शिंका, उन्हासे, खोकला, आणि एकप्रकारचा श्वास उत्पन्न होतो.

**प्रमाणः**—कफादिकांवर पावपासून २ ग्रेनपर्यंत घ्यावें.

**वमनार्थ घेण्याचा प्रकारः**—इपिकाक्युआन्हाचे १५ पासून ३० ग्रेन चूर्ण सुमारें पाव शेर कोंवट पाण्यांत मिश्र करून प्यावें. नंतर उलटी होईतोंपर्यंत आणखी कोंवट पाणी प्यावें, ह्मणजे सडकून एक दोन उलट्या होतात. एक वर्षाचे आंतील मुलास दोन किंवा तीन ग्रेन इतकें दिलें असतां उलट्या होऊं लागतात.

**रुईः**—(व) हें झाड सर्व हिंदुस्थानांत उगवतें. हें बहुतेकांचे पहाण्यांतलें आहे. ह्याचे गुण इपिकाक्युआन्हा सारखेच आहेत.

**योजनाः**—रुईच्या मुळाच्या सालीचें चूर्ण ६० ग्रेन–१२० ग्रेन पर्यंत दिलें असतां, वमक होऊन थोडें रेचक ही होतें. वमन होतेवेळीं उन्हासे फार येतात. हें ३० ग्रेन प्रमाणानें घेतलें असतां उन्हासे येऊन बळकट स्वेदक कार्य होतें. एक वर्षाचे आंतील मुलास ५ पासून ८ ग्रेन इतकें प्रमाण द्यावें.

**झिंक सल्फस:—**(क) ह्याचे लहान मोठे रेषामय पांढरे स्फटिक असतात. व ते सल्फेट आफ् म्यागनिशिया (विलायती मीठ) सारखे दिसतात.

सल्फेट आफ् झिंक हें मदकारी विषारांत, कफक्षयांत, आणि अजीर्णविकारांत अशक्तता न येऊं देतां जलद वमन होण्याकरितां १०–३० ग्रेनपर्यंत देतात. (लहान मुलास हें उपयोगी नाहीं.)

**मोहरी:—(राई)** [ड] मोहरीचे दोन प्रकार आहेत, काळी व पांढरी. मोहरी आपल्या देशांत चहूंकडे उत्पन्न होते.

हिची रुचि तिखट असून खातेवेळीं ही नाकांतून झणझणत मस्तकांत गेल्याप्रमाणें होते.

**योजना:—**मोहरीचें पीठ फार उत्तेजक आहे. ही वाजवीपेक्षां फाजील घेतली असतां उलट्या होतात, ह्मणून मदकारी विषारावर [अफू, धोत्रा इ०] ती वमनार्थ योजितात. अल्पप्रमाणानें ही तिखटाप्रमाणेंच पाचनशक्तीस साह्य होते, ह्मणून स्वयंपाकांत हिचा नेहमीं उपयोग करितात. शिवाय हिच्या योगानें खाण्याच्या थंड व आंबट पदार्थांचा अपकारक गुण नाहींसा होतो. मोहरीचें पीठ किंवा मोहऱ्या ऊन पाण्यांत बारीक वांटून ज्या ठिकाणीं ज्ञानतंतुगत वेदना [वायूचें दुखणें] किंवा पेटके येत असतील त्या ठिकाणीं ती कागदाच्या किंवा कापडाच्या तुकड्यावर पसरून लावली असतां वेदना व पेटके नाहींसे होतात. ह्यास मोहरीचें प्लास्टर ह्मणतात. हें मोहरीचें प्लास्टर सोसत नाहींसें झाल्यावर काढून टाकावें.

**प्रमाणः**—वमनार्थ एक चहाचा चमचाभर किंवा मोठा चमचाभर (तोळा दीड तोळा इतकी) घेऊन पाण्यांत कालवून पाजावें. लहान मुलांस देऊं नये. जरुरीच्यावेळीं वर सांगितलेल्या उलटीच्या औषधांपैकीं जें सांपडेल तें योजावें.— **रसादिकांचें प्रमाण**—मोठ्या मनुष्यास २ ड्रामपासून ४ ड्रामपर्यंत. वर्षाचे आंतील मुलास २० पासून ४० थेंब इतकें उलटी होईतोंपर्यंत द्यावें.

वरील औषधांनीं उलट्या फार होऊं लागल्या तर त्या उल्हासे आणि वांत्या ह्या प्रकरणांत सांगितलेल्या उपायांनीं बंद कराव्या.

---

## जालप.

### यादी नं. २.

हें औषध इंग्रजी औषधें विकणाराचे दुकानीं मिळतें.

(जालपा नांवाच्या वनस्पतीची भुकणी)

कांपौंड पौडर आफ् जालप तयार करण्याची कृति—

| | |
|---|---|
| पावडर जालप | २० ग्रेन. |
| आसिड टार्ट्रेट ऑफ् पोट्याश | ३६ ग्रेन. |
| सुंठीचें चूर्ण | ४ ग्रेन. |

हीं वेगवेगळीं चूर्णें घेऊन मग एकत्र करावीं.

**प्रमाणः**—मोठ्या मनुष्यानें ३० ग्रेनपासून ६० ग्रेनपर्यंत घ्यावें व एक वर्षाचे आंतील मुलास १—२ ग्रेन द्यावें. हें औषध मधांत किंवा चहांत मिश्र करून घ्यावें. दोन तीन जुलाब झाल्यावर तूपभात जेवावा.

---

## डायफोरेटिक् मिक्श्चर.

### यादी नं. ४.

(घाम आणणारें औषध.)

**कृतिः**—लैकर अमोनिया आसिटेटिस.........२ ड्राम.

स्पिरिट–इथरीस–नैट्रोसाय.....................२० मिनिम्स.

कापराचें पाणी..........................................१ औंस.

**प्रमाणः**—मोठ्या मनुष्यास १ औंस, व वर्षाचे मुलास १ ड्राम द्यावें.

---

## बर्फाचा औषधी उपयोग.

### यादी नं. ५.

थंड देशांत बर्फ पुष्कळ उत्पन्न होतें. आपल्या देशांत तें हिमालय पर्वतावर पुष्कळ ठिकाणीं सांपडतें; कृत्रिम रीतीनेंही बर्फ तयार करितां येतें. आपल्या लोकांत बर्फ खाल्लें असतां तें पोटांत उष्णता उत्पन्न करितें असा समज आहे, परंतु तो समज अगदीं खोटा आहे. बर्फ थोड्या प्रमाणानें खाल्लें असतां जठररस वाढतो, पण तेणेंकरून पचन व्यापारांत बिघाड होतो. परंतु बऱ्याच प्रमाणानें खाल्लें असतां जठररस कमी होतो.

बर्फाचे अंगीं अनेक गुण आहेत. हें दाहशामक असून तृषा शांत करितें, रक्तस्राव बंद करितें आणि शरीराच्या कोणत्याही भागावर बर्फ फार वेळपर्यंत ठेवलें असतां त्या भागाचे ज्ञेयशक्तीचा नाश करितें. वांति बंद करितें.

कित्येक ज्वरांतील बडबडी, मस्तकशूळ, तसेंच मद्य-प्राशनानें गुंग झालेल्या मनुष्याच्या कपाळावर बर्फानें भरलेली इंडिया रबरची केलेली (आईसब्याग) पिशवी ठेवितात. एकाएकीं उतरलेला अंतरगळ किंवा ज्याला कित्येक लोक सारंगांठ (स्ट्रांग्युलेटेड हर्नीया) असें ह्मणतात तो, वर (पोटांत) चढविण्याकरितां ह्या पिशवींत बर्फ भरून ती त्याठिकाणीं तो वर चढेपर्यंत ठेवतात. ही पिशवी विलायती औषधें विकणारांच्या दुकानीं विकत घ्यावयाची ह्मटलें ह्मणजे ५—६ रुपये पडतात, त्याच्याऐवजीं आपलेकडील खाटिकांचे दुकानांत बोकडाचे पोटांतील अन्न सांठविण्याचे पिशवीचा (पक्वाशय) उपयोग करितां येतो. बर्फ पिशवींत भरण्यापूर्वीं त्यांतील हवा काढून टाकावी; बर्फ भरल्यानंतर तिचें तोंड बद करावें. रक्तस्रावाखेरीज बाह्योपचारांत, जेथें जेथें बर्फ लावावयाचें तेथें तेथें बर्फाचे लहानलहान तुकडे करून ते त्या इंडिया रबरच्यागमध्यें किंवा वर सांगितलेल्या फुग्यांत भरून नंतर लावावें.

अंतरिंद्रियांतील रक्तस्राव ह्मणजे रक्ताची वांति होत असते तेव्हां, किंवा घशांतून खाकरतांना रक्त पडतें तेव्हां बर्फ चोखण्यास देतात. उह्मासे आणि ज्वरांतील अतिरिक्त तृषा मोडण्याकरितां बर्फाचे लहान लहान तुकडे करून खावयास देतात. जेथून रक्त वहात असतें तेथें बर्फ लावण्यासारखें असल्यास तेथें लावावें, किंवा बर्फाचें पाणी पिचकारीनें त्या ठिकाणीं मारावें, ह्मणजे रक्तस्राव बहुतकरून बंद होतो. मूळव्याधींतील रक्तस्राव किंवा स्त्रिया बाळंत झाल्यावर त्यांच्या गर्भाशयांतून कधीं कधीं फारच रक्तस्राव होतो, तो बंद कर-

ण्याकरितां बर्फाचें पाणी पिचकारीनें आंत मारतात, किंवा बर्फ चिंचोळें करून आंत शिरवितात. मुळव्याधीस बर्फ लावल्यानें त्यांतील रक्त बंद होतें इतकेंच नाहीं, परंतु त्यांतील वेदना व सूज हीं कमी होतात. अगेरू ह्मणजे अशक्तपणामुळें शौचाच्या वेळेस किंचित् कुंथल्यानें जो गुदाचा भाग बाहेर येतो त्यास ह्मणतात, त्यावर बर्फ लावल्यानें तेंही आपल्या जागीं जातें. शरीराच्या कोणत्याही भागावर आइसव्याग (पिशवी) कांहीं वेळ लावून ठेवल्यावर एकाएकींच त्या भागावरचा थंडपणा नाहींसा करूं नये, तेथें थंड पाण्याची घडी कांहीं वेळपर्यंत ठेवावी ह्मणजे त्या भागाची प्राणीज उष्णता हळू हळू त्या भागास येऊन पोंचते व अपकार होत नाहीं. कधीं कधीं सामान्य शस्त्रक्रिया करण्याकरितां ह्मणजे ल्हान.. मढान. विद्रधि (फ्न्डुं-क्षांनीं मिळते. ही निखालस रबराची किंवा तिचा पंप पित-टोक-.असून त्याला एक रबराची नळी जोडलेली असते. मिश्रण, बर्फ़न शिरविण्याचें टोंक शिशाचें, हस्तिदंती, किंवा एक भाग, हीं एकत्र करून ओइसंनी दीड.-इंचापासून दोन ठिकाणीं लावतात, ह्मणजे त्या ठिकाणची ज्ञेयशक्ति जाते व रोग्यास कांहींएक न समजतां शस्त्रक्रिया करितात. घशांतील सूज व दाह हीं त्या ठिकाणीं बर्फ लावल्यानें कमी होतात, व त्यामुळें जी अतिशय लाळ वाहत असते तीही कमती होते. वर सांगितलेल्या सर्व ठिकाणीं जरी बर्फानें काम होतें असें ह्मटलें आहे तरी, त्या त्या रोगाचे विशेष उपचार पहात असावे, ह्मणजे अवश्य गुण येतो. पटकीच्या आजारांत जरी मनुष्य अगदीं थंडगार झालेला असतो, तरी

त्यास बर्फ खावयास देण्यास कांहीं हरकत घेऊं नये. त्यापासून त्याची तहान मोडेल. कित्येक वेळां तर पटकीचे रोगी फक्त बर्फासारखें थंडगार पाणी पिऊनच बरे झाले आहेत.

---

## सारसापरिलाचा काढा.

### DECOCTION SARSA.

### यादी नं० ६.

**कृतिः**—जमेका सारसापरिलाचे बारीक केलेले तुकडे २॥ औंस, आधणाचें पाणी १॥ पैंट, हीं दोन्ही एक तासपर्यंत एका भाड्यांत झांकून ठेवावीं. नंतर १० मिनिटेंपर्यंत कढवून गाळून काढा उपयोगार्थ घ्यावा.

**प्रमाणः**—२–४ औंसपर्यंत. १ वर्षाच्या मुलास तिच [illegible]

जेथें बर्फ लावावयाचें तेथें तेथें बर्फाचे लहानलहान तुकड करून ते त्या इंडिया रबरच्यागमध्यें किंवा वर सांगितलेल्या फुग्यांत भरून नंतर लावावें.

अंतरिंद्रियांतील रक्तस्राव ह्मणजे रक्ताची वांति होत असते तेव्हां, किंवा घशांतून खाकरतांना रक्त पडतें तेव्हां बर्फ चोखण्यास देतात. उह्मासे आणि ज्वरांतील अतिरिक्त तृषा मोडण्याकरितां बर्फाचे लहान लहान तुकडे करून खावयास देतात. जेथून रक्त वहात असतें तेथें बर्फ लावण्यासारखें असल्यास तेथें लावावें, किंवा बर्फाचें पाणी पिचकारीनें त्या ठिकाणीं मारावें, ह्मणजे रक्तस्राव बहुतकरून बंद होतो. मूळव्याधींतील रक्तस्राव किंवा स्त्रिया बाळंत झाल्यावर त्यांच्या गर्भाशयांतून कधीं कधीं फारच रक्तस्राव होतो, तो बंद कर-

पाणी १ औंस असें एकत्र करून घ्यावें आणि दोन जुलाब झाल्यावर तूपभात जेवावा. कित्येक लोक तें दुधांत किंवा आल्याचे रसांत घेतात.

---

## एनिमासिरींज.

### ENEMA SYRINGE.

### यादी नं० ८.

गुदांत औषधें सोडण्याची पिचनळी.

**बस्ती:**—जेव्हां पिचकारीचीं औषधें मलद्वारांत सोडतात तेव्हां त्यांना "बस्ति" ही संज्ञा देतात.

**एनिमासिरींज:**—ही इंग्रजी औषधें विकणारांचे दुकानीं मिळते. ही निखालस रबराची किंवा तिचा पंप पितळेचा असून त्याला एक रबराची नळी जोडलेली असते.

भरलेलें ... त शिरविण्याचें टोंक शिशाचें, हस्तिदंती, किंवा टाकण्याकरितां डा।४८९ ... ... त्यांनी दीड इंचापासून दोन

मिश्रण, बर्फ २ भाग, मीठ (स्वयंपाकांतील समुद्रमीठ) एक भाग, हीं एकत्र करून आईस ब्यागमध्यें भरून त्या ठिकाणीं लावतात, ह्मणजे त्या ठिकाणची ज्ञेयशक्ति जाते व रोग्यास कांहींएक न समजतां शस्त्रक्रिया करितात. घशांतील सूज व दाह हीं त्या ठिकाणीं बर्फ लावल्यानें कमी होतात, व त्यामुळें जी अतिशय लाळ वाहत असते तीही कमती होते. वर सांगितलेल्या सर्व ठिकाणीं जरी बर्फानें काम होतें असें ह्मटलें आहे तरी, त्या त्या रोगाचे विशेष उपचार पहात असावे, ह्मणजे अवश्य गुण येतो. पटकीच्या आजारांत जरी मनुष्य अगदीं थंडगार झालेला असतो, तरी

करीत असत. परंतु अलीकडे इंग्रजी वैद्यकाचा प्रसार झाल्यापासून एनीमासिरिंजचाच उपयोग लोक करूं लागले आहेत.

**बस्तीची योजनाः**—मुळव्याधींत जेव्हां गुदद्वारांतून रक्ताचे मोठाले लोट चालले असतात तेव्हां, अथवा अंतड्यातील मळ घट्ट होऊन रेचकादी औषधांचा कांहींच इलाज चालत नाहीं अशावेळीं, आणि अंतड्यात किंवा अगदीं गुदद्वाराजवळ जेव्हां कृमीची पेंडीच्यापेंडी अडकून राहिलेली [illegible]ा तेव्हां, अथवा रोगी जेव्हां औषध अगर अन्न खाण्यास असमर्थ असतो, अशा वेळेस त्या पिचनळीचा फार उपयोग होतो तसेंच आणखी कान, योनी, व मोठमोठीं पुवानें भरलेलीं गुमडीं (विद्रधी) हीं साफ करण्यास ह्याचा उपयोग होतो.

**बस्ती वापरण्याची रीतिः**—रेचकादि औषधांचा बस्ती सुमारें एक पैंट द्यावयाचा असतो. पौष्टिक औषधाचा बस्ती १ पासून २ औंसपर्यंत द्यावा. औषध एका[illegible]ालेगट भांड्यांत घेऊन बस्तीच्या नळीचें एक [illegible] त्यांत सोडावें, [illegible]कडच्या [illegible] नळीच्या टोकास गोडें तेल किं[illegible] तूप लावून [illegible]चनळी भरलीशी झाली ह्मणजे उताणे किंवा कुशीवर निजून तें गुदांत हळूच शिरवावें, आणि मग मधला फुगा किंवा पंप एक वेळ दाबावा, व सोडावा. ह्याप्रमाणें औषध संपेपर्यंत चालवावें. लहान मुलांस वरील बस्तीच्या ऐवजीं कांचेची पिचकारी सोईची असते. पिचकारी मारीत असतां औषध बाहेर पडूं लागलें तर तें गुडदी लावून बंद करावें.

# चुन्याची निवळी (लाइमवाटर).

## यादी नंबर ९.

**कृतिः**—कळीचा चुना १ तोळा, पाणी ३० औंस. चुना थोडक्याशा पाण्यांत विरवून तो एखाद्या बरणींत किंवा मजबूतशा शिशींत भरावा, नंतर बाकीचें पाणी घालून तें मिश्रण २–३ मिनिटेंपर्यंत खूप हालवून सुमारें तीन तास स्थिर झांकून ठेवावें, नंतर वरची निवळ हळूच दुसऱ्या एका कुपींत काढून बूच मारावा.

**प्रमाणः**—मोठ्या मनुष्यास २–४ ड्रामपर्यंत दुधांत मिश्र करून द्यावें. लहान मुलें वारंवार दूध ओकतात, तेव्हां त्यांस ह्या निवळीचे दोन तीन थेंब दुधांत मिश्र करून द्यावे ह्मणजे दूध पचूं लागतें.

---

# पोलटीस.

## यादी नंबर १०.

**पोल्टीसः**—हा एक शेकण्याचाच प्रकार आहे. त्याचा उद्देश दाहयुक्त चर्मादिक भागावर उष्णता व आर्द्रता लावायाचा असतो. पोलटिसें अनेक प्रकारचीं करितात. गव्हांच्या पिठाचें पोलटीस, अळशीच्या पिठाचें पोलटीस, कोळशाचें पोलटीस, नारळाच्या किसाचें पोलटीस, कांद्याचें पोलटीस, निगडीच्या पाल्याचें पोलटीस, धोत्र्याच्या पाल्याचें पोलटीस, पैकीं गव्हाचें आणि अळशीच्या पिठाचें पोलटीस ह्यांचा उपयोग फार होतो.

**पोलटीस तयार करण्याची कृतिः**—पोलटीस जेवढें मोठें करावयाचें असेल त्या मानानें एका भांड्यांत आधणाचें पाणी घेऊन तें निखाऱ्यांनीं तयार असलेल्या शेगडीवर ठेवावें. नंतर त्यांत थोडें थोडें पीठ चांगला चिकट लगदा होईतोंपर्यंत मिळवावें. नंतर तो लगदा ऊन आहे तोंच एका मऊशा कपड्यावर खूप जाड्या भाकरीसारखा पसरून त्याजवरून पुन्हा आणखी एक मऊ कपडयाचा पदर घ्यावा. नंतर तें पोलटीस ज्या भागाला शेक करणें असेल त्या ठिकाणीं लावावें. थंड झाल्यावर तव्यावर पुन्हा ऊन करून बांधावें. ह्याच्या योगानें सूज कमी होते, ठणका मोडतो, आणि पुवाचा निचरा होतो. कोळशाचें पोलटीस हें गव्हाच्या किंवा अळशीच्या पिठांत कोळशाची भुकणी मिळवून तयार करितात. तयार झाल्यावर आणखी थोडी भुकणी वर पेरून तें तसेंच क्षतावर बांधतात. ह्याच्या योगानें क्षतांतील दुर्गंधी नाहींशी होऊन ठणका, सूज हीं कमी होतात. पाल्याचीं पोलटिसें हीं वरल्याप्रमाणेंच किंवा नुस्ता पाला ठेंचून ऊन करून बांधतात.

## म्याग्नीशियासल्फस.

### यादी नंबर ११.

(विलायती मीठ किंवा जुलाबाचें मीठ.) हें शुद्ध साखरेसारखें दिसतें. परंतु ह्याची रुची खारट व कडघट अशी आहे. ह्यापासून जुलाब होतात.

**प्रमाणः**—मोठ्या मनुष्यास २ पासून ४ ड्रामपर्यंत आणि, एका वर्षाचे आंतील वयास ३ पासून ६ ग्रेन इतकें द्यावें.

## शुगरलेडचें पाणी.

LEAD LOTION.

### यादी नं. २१.

कृतिः—शुगरलेड १ ड्राम, पाणी २० औंस अशीं एकत्र मिसळावीं.

---

## विस्फोटजनक औषधें.

BLISTERS.

### यादी नं. २२.

जीं औषधें त्वचेस लावलीं असतां त्वचेंतील रक्तवाहिनींत दाह उत्पन्न करून त्यांतील रक्ताचें पाणी त्वचेखालीं पाझरून जे फोड उठतात त्यांस ब्लिस्टर्स असें ह्मणतात.

कंथारिडीस, मोहऱ्या, बिब्बा वगैरे पदार्थ सदरील जातीचे होत.

(अ) **कंथारिडीस प्लास्तरः**—हें क्यांथारिस व्हेसिकाटोरीया नामक फोड आणणाऱ्या माशा [ स्पानिशफ्लाय ] पासून तयार करितात.

कंथारिडीस प्लास्तर—हें कापडाच्या किंवा चामड्याच्या तुकड्यावर पसरून लावतात. किंवा **लैकरएपीसपास्टीकस** हा द्रव काडीला कापूस गुंडाळून तिनें पांच दहा मिनिटें ब्लिस्टर आणणें असेल त्या ठिकाणीं घांसतात. नंतर त्यावर कापसाची घडी ठेवून त्यावर पट्टा बांधितात. पट्टा ८ तासांनीं सोडला असतां त्याठिकाणीं फोड उठलेला असतो, तो सुईनें किंवा टांचणीचे अग्रानें फोडून त्यावर गोडे

तेलाची, साध्या मलमाची (यादी नं. १८) किंवा गाईचे तुपाची पट्टी दिवसांतून तीन चार वेळ लावावी ह्मणजे चार पांच दिवसांत ब्लिस्टर सुकून जातें. **ब्लिस्टरचा पिवळा कागद** (लिस्तरींग टिशू) हा लागेल तेवढा कापून लावावा. नंतर त्यावर कापसाची घडी ठेवून पट्टा बांधावा ह्मणजेही चांगला फोड उठतो. लहान मुलास ब्लिस्तरच्या योगानें ब्लिस्तरच्या प्रदेशाबाहेर सूज पसरते ह्याकरितां तीं मंद करावीं किंवा फार वेळ ठेऊं नयेत, कारण त्यांचें मान अधिक झालें असतां चर्म कुजून भयंकर परिणाम घडतात. ह्मणून फोड पुरतेपणीं उठण्यापूर्वींच ब्लिस्टर काढून घ्यावें. नंतर त्यावर पोटीस बांधावें; तेणेंकरून चर्मास फारशी इजा न होतां मूत्रकृच्छ्र वगैरे घडत नाहीं.

**सूचनाः**—मूत्रपिंडाचा दाह होत असतो त्यावेळीं आणि मूत्र होतांना आग, तिडका वगैरे होत असल्या तर कंथारिडीस् बाह्योपचारानें किंवा पोटांत त्याचें टिंक्चर वगैरे योजलें असतां तें शरीरांत शोषलें जाऊन दाह जास्त होतो हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ब्लिस्टर डोळयाच्या आसपास लाविलें असतां त्यांतील पाणी डोळयांत न येऊं देण्याविषयीं जपावें.

(ब) **मोहरीः**—हिच्याविषयीं मागेंच सांगितलें आहे, यादी नं. २ पहा. तीपासून मोठासा फोड उठत नाहीं, परंतु अनेक लहान लहान फुटकुळया मात्र उठतात.

(क) आपल्या लोकांचें ब्लिस्तर ह्मटलें ह्मणजे बिब्बा. ठेंच लागली असतां त्या ठिकाणीं बिब्बा घालतात. तसेंच मज्जातंतुगत शूल, उसण, हूक वगैरे प्रकारावर बिब्बा घालतात. बिब्बा ठेंचला असतां किंवा किंचित् उष्ण केला अ-

सतां त्यांतून त्याचें तेल बाहेर पडतें तें बारीकशा काडीनें त्या ठिकाणीं लावावें, नंतर पांच मिनिटांनीं त्यावर चुना लावावा ह्मणजे बिब्याचें नेमस्त कार्य घडतें. नाजूक प्रकृतीस आणि कित्येक लोकांस बिब्बा बिलकूल सोसत नाहीं. ह्मणजे त्यापासून पुष्कळ दाह उत्पन्न होऊन सूज येते, किंवा सर्वांगास खाज सुटून पुरळ येतो. हे विकार एखादें सौम्य रेचक औषध घेतल्यानें आपोआप मोडतात. दहीं खाणें हाही बिब्यावर उतारा आहे.

---

## हुंगावयास घेण्याचा अमोनिया.

AMMONIA CARBONAS.

### यादी नं. २३

ताज्या कार्बोनेट आफ् अमोनियाचे पारदर्शक रेषामय खडे असतात, ते कांहीं वेळ उघडे ठेविले असतां अपारदर्शक होऊन त्यांजवर पांढरा भुका जमतो, त्यास बायकार्बोनेट आफ् अमोनिया असें ह्मणतात. तात्कालिक उपयोगाकरितां अमोनिया तयार करितां येतो, तो असा कीं, नवसागराचे लहान लहान खडे घेऊन ते एका घट्टशा कांचेच्या बुचाच्या बाटलींत घालावे, व त्यांत थोडासा विरलेला चुना टाकावा, ह्मणजे कांहीं वेळानें ह्या मिश्रणास अमोनियाचा वास येऊं लागतो. कार्बोनेट आफ् अमोनिया हा केवळ बेशुद्धीच्या वेळेस हुंगण्याच्याच कामास येतो असें नाहीं. परंतु वारंवार ह्याचा उपयोग पोटांत मिश्रण करून देण्याच्या कामांत फार होतो. कधीं कधीं हा क्षार फार वेळ हुंगण्यांत आल्यानें नाक व श्वासनलिका ह्यांत दाह उत्पन्न करितो, ह्मणून तो हुंगतेवेळेस

फार जपून व थोडा वेळ हुंगावा. ह्याचा वास झणझणित, तिखट असल्यामुळें श्वासाबरोबर तो झणझणत मस्तकांत गेल्याप्रमाणें होऊन लगेच डोळ्यांतून पाणी काढतो.

हा पोटांत साखरेच्या पाकाबरोबर किंवा नुसत्या पाण्यांत २ पासून ५ ग्रेन पर्यंत विरघळून दिला असतां उत्तेजक, व कापराच्या पाण्यांत दिला असतां घाम आणणारा व कफाला बाहेर काढणारा आहे. तसेंच तो १५-३० ग्रेनपर्यंत दिला असतां उलटी होते. ह्याची रुचि कांहींशी तिखट व जिभेला चटका देणारी अशी आहे. हा पाण्यांत सहज विरघळतो. लहान मुलांना पावपासून अर्धा ग्रेन द्यावा.

---

## त्रिफळा.

### यादी नंबर २४.

हें औषध घरोघर माहित आहे. ह्यांत हिरडा, बेहडा आंवळकठी हीं तीन औषधें समप्रमाणानें असतात.

**योजनाः**—त्रिफळ्याची वस्त्रगाळ भुकणी करून ती मोठ्या मनुष्यास एक तोळाप्रमाणें पानाच्या विड्यांत किंवा मधांत मिसळून दिली असतां एक दोन वेळां शौचास साफ होतें. एक वर्षाचे मुलास एक मासा पूड मधांत कालवून दिली असतां मोकळें शौच होतें.

**त्रिफळ्याचा काढाः**—त्रिफळा तीन तोळे घेऊन शेरभर पाण्यांत पावशेर बाकी राही तोंपर्यंत उकळावा, नंतर तो गाळून जखमा धुण्याचे कामीं घ्यावा. डोळे आले असतां ते ह्या काढ्यानें शेकावे. घोट घोट काढा सकाळ संध्याकाळ घेतला

असतां शौचास साफ होऊन रक्तशुद्धि होते व लघवीही साफ होते.

## लिंबाचें पेय.

### LEMONADE.

### यादी नंबर २५.

**कृतिः**—ताज्या लिंबाचा रस १ औंस, स्वच्छ साखर अर्धा औंस व पाणी ३ औंस, असें एकत्र करून प्यावें.

## उसळणारें किंवा फेंस येणारें लेमोनेड.

**कृतिः**—सोडी बायकार्बोनस् ३० ग्रेन, पाणी ५ औंस, अशीं एकत्र विरघळवावीं आणि आसिड सैट्रिक ३० ग्रेन, किंवा लिंबाचा रस पाऊण औंस, साखरेचा पाक १ औंस किंवा स्वच्छ साखर २ ड्राम, व पाणी ४ औंस, अशीं विरघळून ते दोन्ही द्रव एकत्र करून प्यावें.

## पेपरमिंटाचें पाणी.

### AQUA MENTHÆ PIPERITÆ.

### यादी नं० २६.

**कृतिः**—पेपरमिंटचें तेल ८ थेंब, म्याग्नीशियाकार्बोनस २४ ग्रेन, पाणी २० औंस, हीं सर्व एका बाटलींत भरून खूप हलवावें. नंतर पांढऱ्या ब्लाटिंग पेपर (शाई टिपण्याचा कागद) मधून तें दुसऱ्या एका स्वच्छ बाटलींत गाळून घ्यावें.

**प्रमाणः**—मोठ्या मनुष्यास १ पासून २ औंस व १ वर्षाचे मुलास १ पासून २ ड्रामपर्यंत द्यावें.

---

## लोहभस्माविषयीं.

### यादी नं० २७.

**भस्म करण्याला उत्तम लोहः**—ज्या लोहाला हिराकस व आंवळकठी यांचा कल्क* लाविला असतां त्यांत रूप दिसतें, तो लोह भस्म करण्याला उत्तम असें जाणावें.

**लोहाचें शोधनः**—चौसष्ट तोळे त्रिफळा घेऊन त्यांत त्याचे आठपट पाणी घालावें व अष्टमांश काढा करावा, आणि २० तोळे लोहाचे पत्रे घेऊन तापवून सातवेळ त्या काढ्यांत बुडवावे ह्मणजे लोह निर्दोष होतो. नंतर पत्रे कानसून त्यांचा चुरा करावा. हा चूर लोहभस्म करण्यांत घ्यावा.

**लोहभस्मकृतिः**—गाईच्या दह्यांत शुद्ध केलेला लोहचूर घालून तें दहीं सुकून जाईपर्यंत तसेंच ठेवावें. नंतर धुऊन तें चूर्ण काढून घ्यावें, व त्रिफळ्याच्या काढ्यांत खलून गजपूट द्यावें. ह्याप्रमाणें तीन वेळ पुटें दिलीं असतां पाण्यावर तरणारें भस्म होईल.

**गजपूट देण्याची रीतिः**—मातीचीं दोन उथळ (साधारण पंतीच्या आकाराचीं) पात्रें घेऊन त्यांत खलून तयार झालेलें औषध भरावें, नंतर तीं पात्रें एकावर एक सारखीं बसतीं करून त्या दोहोंच्या संयोगस्थानावरून कापड गुंडाळावें व तीं पात्रें ढळणार नाहींत असें झालें ह्मणजे त्यांवर

---

* औषधें चटणीसारखीं बारीक वाटून त्यांचा लेप देणें.

मातीचें लेपण करावें. मग दोन घनफूट ओंडीचा एक खड्डा खणून तो जमिनीच्या सपाटीपासून सरासरी चार सहा अंगुळांपर्यंत गोवऱ्यांनीं भरीत आणावा, नंतर त्यावर तें माती लावलेलें पात्र ठेवून वर व सभोंवतीं अग्नि लावावा.

## लोहभस्माचें प्रमाण, गुण व अनुपानें.

लोहभस्म वाल किंवा अर्धवाल प्रमाण, वय आणि शक्ति यांच्या मानानें खालीं सांगितलेल्या व्याधीवर निरनिराळ्या अनुपानाबरोबर द्यावें. शूलावर हिंग आणि तूप ह्यांत, जीर्ण ज्वरावर मध व पिंपळींत, श्वासावर सुंठ मिरी, पिंपळी आणि मध ह्याबरोबर, थंडीवर मिऱ्यें व विड्याचीं पानें, पित्तावर साखरेशीं, कफावर पिंपळीशीं, मूत्रकृच्छ्रावर शिलाजिताशीं, अग्निमांद्यावर तांबुलाशीं, प्लिहा, कावीळ व पंडुरोगावर पुनर्नव्याच्या रसाशीं, पंचकासावर अडुळसा, पिंपळी, मनुका, मध ह्यांबरोबर, संधिरोगावर दालचिनी, वेलची, तमालपत्र यांजबरोबर, क्षीणता आणि बलवृद्धीवर पुनर्नवा आणि गाईचे दुधांत, मुळव्याधीवर माक्याचा रस, लोणी व खडीसाखर ह्यांत, संग्रहणीवर डाळिंबाचा रस, जायपत्री, व खडीसाखर यांजबरोबर आणि प्रमेहावर अर्धा तोळा त्रिफळ्यांत द्यावें. शिवाय लोहभस्म हे आयुष्य, बल आणि वीर्य यांस वाढविणारें व काम उत्पन्न करणारें असें आहे. अनुपानांत सांगितलेल्या रसांचें प्रमाण ·।।–१ तोळापर्यंत. चूर्णाचें प्रमाण अर्ध्या माशापासून १।। माशापर्यंत. साखर, तूप, लोणी हीं एक एक तोळा घ्यावीं.

# आरोग्यरक्षणासंबंधानें कांहीं सूचना.

आपल्या हिंदुस्थान देशाचा अधिकार इंग्रज सरकारचे हातीं आल्यापासून सार्वजनिक आरोग्याचें काम म्युनिसिपालिट्यांकडेस सोंपविलें आहे. परंतु प्रत्येक व्यक्तीची आरोग्यस्थिति राखणें हें ज्याचे त्याचेकडेसच असतें, कारण लोकांच्या खासगी संबंधांत सरकारानें कितपत हात घालावा ह्याविषयीं अद्यापि पुर्ता निर्बंध झाला नाहीं. सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठीं जे कायदे सरकारानें केले आहेत, ते म्युनिसिपालिटीच्या द्वारें लोकांत प्रसिद्ध होऊन अमलांत आले आहेत. बहुतकरून जेथें हजार दोन हजारांची वस्ती आहे तेथें म्युनिसिपालिटी झालीच आहे. म्युनिसिपालिट्या स्थापन झाल्या दिवसापासून अनेक तऱ्हेचे कायदे झाले आहेत व त्यांपासून पुष्कळ रोगही कमी झाले आहेत.

अलीकडेस सरकारचें व लोकांचें लक्ष विद्याज्ञानवृद्धीकडेस जितकें लागलें आहे तितकें आरोग्यरक्षणाकडे लागेल तर रोगमान कमी होऊन लोक खरोखर बलवान् होणार आहेत.

प्राचीनकालचे धूर्त व विद्वान् लोक आपल्या देशांतील लोकांचें शरीर निरोगी व धष्टपुष्ट रहावें ह्मणून कांहीं गोष्टी नित्य नियमांत बांधून त्या प्रतिदिवशीं करणें हें पुण्यकारक आहे असें ठरवून त्या धर्मरूपानें लोकाचरणास जोडीत असत. तेणेंकरून त्या प्रतिदिवशीं लोकांस आचराव्या लागत. परंतु आतां विदेशीय लोकांच्या सहवासानें तें आचरण सुटत आहे ही खेदाची गोष्ट आहे.

आपलें शरीर हें केवळ घड्याळासारखेंच यंत्र आहे. घड्याळ सुरळीतपणें चालण्याकरितां जशी त्यास वेळचेवेळीं किल्ली द्यावी लागते, साफसूफ ठेवावें लागतें, तसेंच शरीर निरोगी व बलवान् राखण्याकरितां त्यास वेळचेवेळीं बेताचें अन्न, पाणी, हवा, वस्त्रप्रावर्णे, व्यायाम, विसावा (झोंप) आणि शुचिर्भूतपणा ह्या सर्व गोष्टींकडे पूर्ण लक्ष पोंचविलें पाहिजे. ह्मण आहे कीं, "शिर सलामत तर पगड्या पंच्यायशी." मनुष्य सशक्त व निरोगी असल्यास त्याचे हातून देशहिताचें काहीं तरी कृत्य होण्याचा संभव असतो, परंतु रोगी आणि अशक्त मनुष्याच्या हातून कांहींच होणें नाहीं.

प्रत्येक मनुष्यानें कोणत्या प्रकारचें आचरण नित्य आचरिलें असतां त्यास आपलें शरीर निरोगी ठेवतां येईल त्याचा आतां विचार करूं.

**मलत्यागः**—प्रातःकाळीं उठून, घरापासून सुमारें पाव मैलावर बहिर्दिशेस जावें. मलमूत्रादिकांचें विसर्जन केलें असतां, जिवाला हुषारी वाटते, क्षुधा प्रदीप्त होते, पोटांतील फुगवटी व पोटाचा जडपणा, यांचा नाश होतो, आणि शक्ति व आयुष्य हीं वाढतात.

**मलमूत्राच्या अवरोधापासून होणारे परिणामः**—मलावरोध केला असतां, पोट जड व फुगलेलें, पोटांत शूल, व गुडगुड शब्द, ग्लानि, क्षुधानाश आणि तोंडास दुर्गंधी सुटते. **मूत्रवेगाचा निग्रह केला असतां**, ओटी व मूत्रमार्ग यांच्या ठायीं शूल, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात, मस्तकशूल, हीं लक्षणें होतात. याकरितां मलमूत्रादिकांचा अवरोध करूं नये. मलमूत्र स्वभावतः होत नसल्यास, कुंथून मलमूत्र करूं नये. मलावष्टंभ

फार झाला असला तर किंचित् रेचक घेऊन मलशुद्धि होईल असें करावें. परंतु नेहमीं रेचक घेण्याची संवय होऊं देऊं नये. कारण, त्यापासून पचन व शोषणक्रियांस फार प्रतिबंध होतो. त्याचप्रमाणें बस्तिकर्महीं (यादी नंबर ८) नेहमीं नसावें. बहुधा ज्यांना व्यायाम करण्याची संवय आहे, त्यांना मलमूत्रशुद्धि वगैरे चांगली होते. त्याचप्रमाणें भोजन करितांना, नियमित व शुद्ध पाणी पिणें, मध, कोंड्याची भाकरी, काळीं द्राक्षें, वाळलेले अंजीर, पालेभाज्या, तांदुळजा, माठ इत्यादि सौम्य रीतीनें मलशुद्धि करणारे पदार्थ खाल्ले असतांही मलशुद्धि होते.

(मूत्रावरोधः—मूत्रशलाका घालून दूर करावा.)

शौचादिकाचे गुणः—मलमूत्रादि मार्ग चांगले धुतले असतां त्या ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या क्षतादि रोगाचा प्रतिबंध होऊन स्वच्छता, व पवित्रता वाढते.

हस्तपादप्रक्षालनः—बहिर्दिशेहून जाऊन आल्यावर हात व पाय हे माती, राखाडी किंवा साबू लावून धुवावे ह्मणजे स्वच्छ होतात आणि मल व श्रम ह्यांचा नाश होतो.

मुखमार्जनः—दररोज प्रातःकाळीं तोंड धुण्याचा सांप्रदाय मुळींच नाहीं असें कोणत्याच लोकांत आढळत नाहीं. मुखप्रक्षालन केल्यापासून मुखावरील आणि मुखांतील त्वचा तसेंच दांत, जिव्हा आणि श्वासोच्छ्वास हीं सर्व स्वच्छ राहतात. या कृतीनें घाणेरडे विषयुक्त पदार्थ निघून जाऊन स्वच्छ केलेल्या भागांना आरोग्य प्राप्त होतें.

झोंपेंतून उठल्यावर तोंड कोरडें पडून कसें चिकट होतें हें सर्वांस ठाऊक असेलच. व अशा वेळीं तोंडांत कांहीं घातलें तर अरुचि किती असते त्याचा अनुभव सर्वांस आहे. अशावेळीं स्वच्छ पाण्यानें दोन तीन वेळां गुळणा करून टाकला तर सर्व जाड झालेली थुंकी वगैरे विषार निघून जाऊन रसोत्पत्तीस उत्तेजन येऊन अन्नपचनादि क्रियांस मदत मिळते व तोंडास दुर्गंधी कधीं सुटत नाहीं.

गुळणा थंड पाण्यानें केलेला बरा, परंतु तें पाणी अतिशय गार किंवा कढत असूं नये. कारण अशा पाण्यापासून तोंडाचे आंतले त्वचेस इजा होते.

**दंतशुद्धिः**—दांत पांढरे शुभ्र व स्वच्छ असले ह्मणजे मुखवटा फार सुंदर दिसतो. ते मजबूत असले ह्मणजे त्यापासून कठीण पदार्थ चावून खातां येतो इतकेंच नव्हे, तर त्या पासून पचनक्रियेसही सहाय्य मिळतें. दांत पडल्यावर ह्मणजे बहुतकरून ह्मातारपणीं मनुष्यास ह्या गोष्टीचा अनुभव येतो. दंतधावन योग्य रीतीनें केलें ह्मणजे दांत स्वच्छ होऊन त्यांस मजबुती येते.

दंतधावनांत मुख्यत्वें दंतवेष्टन किंवा हिरड्या व दंतावयव यांच्या सुरक्षितपणाकडेस लक्ष दिलें पाहिजे. दंतधावनाकरितां जें पाणी घ्यावयाचें त्यांत थोडी फटकीची पूड टाकून त्या पाण्यानें गुळणा करून टाकला असतां हिरड्यांस मजबुती येऊन, त्यांतून जर रक्त वाहत असलें तर तेंही बंद होतें. त्याखेरीज दुसऱ्या औषधी पुष्कळ आहेत परंतु फटकी किंवा जीस तुरटी असें ह्मणतात ती बाजारांत प्रत्येक गांध्याचे दुकानीं विकत मिळते, ह्मणून तिची येथें योजना

केली आहे. ही तुरटी हिरड्यांस मजबुती आणते इतकेंच नाहीं, पण तोंडांतील सर्व त्वचा निरोगी करिते. ही पूड पाण्यांत जास्त घातली तर दांतास आंब चढेल ह्मणून ती जास्त घालूं नये.

दंतधावन करतेवेळीं दांतांवरील त्वचेस इजा होऊं देऊं नये. पुष्कळ लोकांची समजूत अशी आहे कीं, कठीण व जाड पदार्थांनीं दांत घासले असतां ते चकचकीत होतात, व अशा समजुतीनेंच कित्येक लोक रेती, मीठ, चिखल, जाड राखुंडी. इत्यादींनीं दांत घासतात तर अशा प्रकारच्या दंतधावनानें दांतांवरील पातळ त्वचा झिजून जाऊन दंतनलिकांचीं अग्रें उघडीं पडतात, व तीं उघडीं पडल्यानें आंतील मज्जातंतूंस हवेचा किंवा खाण्याच्या पदार्थांचा स्पर्श झाला ह्मणजे अतिशय वेदना होऊं लागतात.

दांत न घासल्यापासून दांतांवर जी बुरशी चढते तिनें दंतकवच कुजून केव्हां केव्हां ते इतके झडून जातात कीं, त्यांचीं हिरड्यांतील मुळें मात्र रहातात. असें झाल्यामुळें जी वेदना व दुर्गंधी तोंडास सुटते ती सांगतां येत नाहीं. याचें कारण असें आहे कीं आपल्या घाणेरडेपणामुळें दांतावर कीटक उत्पन्न होऊन ते बुरशी तयार करितात, व त्यांत आपलीं घरटीं करून ते दांतांचा नाश करितात. पुढें या पासून निरनिराळ्या दंतरोगांस सुरवात होते. दांतांच्या फटींत अन्नादि पदार्थांचे कण अडकून राहिल्यानें असेच अपाय होतात. तर हें सर्व टाळण्याकरितां दांतव्रणाची फार जरुरी आहे.

दांतवण अशा प्रकारचें असावें कीं, ज्यापासून दांतांवरील त्वचा झिजून न जातां जमलेली बुरशी मात्र निघून जावी आणि दांतांवर असलेल्या कीटकांचा नाश होऊन दांत शुभ्र मौक्तिकासारखे दिसावे.

आपले लोक सैंधव, तेजबळ, बदामाच्या सालीची राख, तंबाकूची मशीरी, तपकीर आणि राखुंडी इत्यादिकांनीं दांत घासतात.

शुद्ध केलेला खडू ह्या कामीं चांगला. कीटक मरून जाऊन दंतांवर पुन्हा बुरशी न जमावी ह्मणून त्यांत कापूर घालावा. ह्याप्रमाणें कापूर व खडू ह्यांचें दांतवण करून त्यानें नित्य दंतशुद्धि केली असतां वृद्धापकाळपर्यंत दांत मजबूत व स्वच्छ रहातील. किंवा सुपारी भाजून तिच्या कोळशाची वस्त्रगाळ पूड करावी व त्यांत थोडा कापूर घालून त्याचें दांतवण करावें.

विकारयुक्त दांतांस दंतप्रकरणांत सांगितलेलीं दांतवणें लावून घासावें.

आपले लोक दंतधावनास निरनिराळ्या वनस्पतीचीं काष्टें घेतात. काष्टानें दांत घासण्याचा प्रकार **गुजराथ** देशांतील लोकांत फार आढळतो.

**दंतधावन काष्टः**—हें १२ अंगुळें लांब, मऊ व चिकण असें असावें. तें करांगुळीच्या अग्राइतकें बारीक व सरळ असून त्याला पेरें नसावीं. काष्टाचें एक टोंक चावून कुंच्यासारखें करावें आणि त्यानें हळू हळू एकेक दांत हिसका न देतां घासावा.

कित्येक लोक व विशेषेंकरून युरोपियन लोक जनावरांच्या केसांच्या कुंच्यानें दांत घांसतात, तेणेंकरून दांतांतील सर्व ठिकाणची बुरशी घालवितां येते. कारण त्याचे केंस दांतांचे सर्व फटींत शिरून त्यांमध्यें मळ अगदींच राहूं देत नाहींत. कुंचला मऊ केसाचा असावा; फार रांठ असूं नये, त्यापासून हिरड्यांस इजा होण्याचा संभव असतो.*

---

* आरोग्यरक्षणासंबंधीं बाकीचा लेख दुसरे भागांत दिला जाईल.

# वैद्यराज अथवा रोगनिवारण.

## भाग २ रा.

### मस्तकशूल (डोकें दुखणें).

HEADACHE or CEPHALALGIA.

मस्तकशूल हा कित्येक रोगांचें एक साधारण लक्षण आहे. परंतु कधीं कधीं तो इतका जबर असतो कीं, मस्तकशूल हाच एक स्वतःसिद्ध रोग बनतो.

**कारणें:**—मस्तकशूल अनेक कारणांपासून उत्पन्न होतो. रक्तक्षय, रक्ताधिक्य आणि रक्तदोष ह्या तिन्ही स्थितींत मस्तकशूल उत्पन्न होतो. मेंदूला किंवा मस्तकाचे कवटीला एखादा रोग झाला, अथवा त्यास कांहीं दुखापत झाली, तर मस्तकशूल उत्पन्न होतो. शिवाय सर्दी, ज्वरावस्था, मलावरोध, अजीर्ण, जाग्रण, गर्मीचे रोग, आमवात, मज्जातंतुगत विकार, अतिशय मानसिक श्रम, क्रोध, चिंता, अमली पदार्थ सेवन करणें, उन्हांत फिरणें, अतिमैथुन ह्यांपासून आणि कुजलेल्या दांतांच्या क्षोभामुळें मस्तकशूल उत्पन्न होतो. कित्येक नेत्रविकारांतही मस्तकशूल असतो. तसेंच मिष्टान्न खाऊन स्वस्थ बसून राहणाऱ्या लोकांस आणि नाजूक प्रकृतीच्या स्त्रियांस बहुतकरून थोडाबहुत मस्तकशूल नेहमीं असतो. गर्भाशयाचे कांहीं रोगांत आणि त्याच्या व्यापारांत न्यूनाधिक्य झाल्यानें मस्तकशूल उत्पन्न होतो.

**लक्षणें:**—बहुतकरून ज्या विकृतीशीं याचा संबंध असतो तिच्या इतर लक्षणांसहित डोकें दुखत असतें. कित्येक विकारांत सर्व मस्तकांत मंद, किंवा घाव घातल्याप्रमाणें वेदना होत असतात. ह्याबरोबर कधीं कधीं डोकें जड झाल्यासारखें होऊन सुस्ती येते, कानांत आवाज होतात, भोंवळ येते व झोंप येत नाहीं. तरी आमवात, अजीर्ण, उपदंश इत्यादि कारणांपासून उत्पन्न झालेला मस्तकशूल आणि अर्धशिशी या प्रत्येकाच्या लक्षणांत थोडाबहुत फरक असतो व शूल उत्पन्न होण्याच्या वेळाही निरनिराळ्या असतात.

**आमवातजन्य मस्तकशूल:**—हा ज्या मनुष्यास आमवाताची पीडा वारंवार होते त्याचे डोक्यास थंड हवा अथवा पाणी लागल्यानें उत्पन्न होत असतो. ह्यांत मस्तकांतील वेदना वरवर असते व ती हालचालीनें व स्पर्शानें वाढते. ती संध्याकाळीं फारच वाढते. ही वेदना बहुतकरून एका जाग्यावर कायम असत नाहीं. दुपारचे वेळीं किंवा शेकल्यानें क्वचित् कांहीं वेळ बंद होते.

**जठरव्यापाराच्या** अव्यवस्थेपासून जो मस्तकशूल उत्पन्न होतो त्यास कोणी कोणी पैत्तिक मस्तकशूल असें ह्मणतात. ह्यांत वेदना बरीच असते व कधीं कधीं तर ती अगदीं दुःसह असते. ही भिवयांत आणि कानाचे वरचे व समोरचे बाजूस अतिशय असते. ह्या प्रकारांत क्षुधा मंद किंवा अगदींच नाहींशी झालेली असते. जिभेवर पिंवळट पांढऱ्या रंगाचा तवंग जमलेला असतो. शौचास साफ होत नाहीं, तोंड कडवट होतें, उह्नासे येतात. डोळ्यांपुढें आंधेऱ्या

येतात किंवा काजवे चमकल्याप्रमाणें होतें. वांती होऊन थोडेंसें पित्त पडल्यावर डोक्यांतील वेदना कमी होतात.

**उपदंशिक मस्तकशूलः**—हा सार्वदेहिक उपदंश झालेल्या मनुष्यास होतो. ह्यांतील वेदना बहुतकरून मस्तकाचे कवटींत होत असतात. त्या थंड वेळीं अधिक होतात, चेपल्या दाबल्यानें वाढतात व कधीं कधीं त्यापासून निद्राभंग होतो.

कधींकधीं अर्धेंच डोकें दुखूं लागतें, तेव्हां त्याला **अर्धशिशी** असें ह्मणतात. इचें लक्षण ह्मटलें ह्मणजे कोणत्या तरी एके बाजूचे भिवईंत वेदना होऊं लागतात. त्यांस सूर्योदयाचे सुमारास सुरुवात होऊन मध्यान्हीच्या सुमारास त्या वाढत जातात. नंतर हळूहळू कमी होऊन सूर्यास्त झाल्यावर अगदीं नाहींशा होतात. कधीं कधीं जागें झाल्याबरोबर कपाळ दुखूं लागतें आणि ज्या बाजूचें डोकें दुखतें त्या बाजूचा डोळा किंचित् लालसर होऊन त्यांतून अश्रुस्राव होत असतो. डोळ्याची बाहुली किंचित् अकुंचित झालेली असते. रोग्यास चैन पडत नाहीं व जेवण सुद्धां नकोसें होतें. कधीं कधीं याबरोबर किंचित् ज्वर, अरुचि व मलावरोध हीं लक्षणें असतात. अर्धशिशीचें कारण अद्यापि निश्चित ठरलेलें नाहीं, तथापि कर्दमोत्थ विषापासून (ज्यास इंग्रजींत मलेरिया असें ह्मणतात) ती उत्पन्न होत असावी असें आंग्लवैद्यांचें मत आहे. मागें मस्तकशूलाचीं जीं कारणें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं कित्येकांपासून अर्धशिशी दुखूं लागते आणि स्त्रिया रजस्वला होण्याच्या सुमारास त्यांस अर्धशिशी उद्भवण्याचा संभव असतो.

उपचारः—वर मस्तकशूलाचीं जीं कारणें सांगितलीं आहेत, 'यांतून ज्या कारणानें मस्तकशूल उद्भवत असेल, तें शोधून तदनुरूप उपाय करावे, ह्मणजे ज्या विकाराशीं मस्तकशूलाचा संबंध असेल, ते विकार दूर करण्याचे उपचार योजावे. आमवातजन्य मस्तकशूल असल्यास आमवाताचे उपचार करावे, उपदंशिक मस्तकशूल असल्यास उपदंशाचे उपचार करावे ह्मणजे बहुधा मस्तकशूल शमतो. मस्तकशूलाचा जठराशीं संबंध असल्यास इपिक्याकुआन्हा, मोहरी अथवा मीठ ह्या तिहींपैकीं कोणतें तरी वमन द्यावें. (भाग पहिला १६७ पृ. पहा.) नंतर सोडा बायकारबोनस १० ग्रेन, ॲसिड सैट्रीक १० ग्रेन, म्याग्नीशिया सलफस् १ ड्राम, पेपरमिंट वाटर १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन चार वेळां प्यावें. किंवा सोडा बायकारबानेस १० ग्रेन, पावडर ऱ्हुबार्ब ५ ग्रेन, टिंक्चर कलंबा ३० मि., ॲसिड हैड्रोसियानिक डिल्यूट ३ मि. पेपरमिंटवाटर १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन चार वेळां प्यावें. किंवा निंबसाल, हळद, गुळवेल, किराईत, हरडा, बेहडा, आंवळकठी, अडुळसा हीं एक एक तोळा घेऊन त्याचे दोन विभाग करावे. प्रत्येक विभाग किंचित् ठेंचून ३२ तोळे पाण्यांत त्याचा अष्टमांश काढा करावा. काढा निवाल्यावर गाळून त्यापैकीं निम्मा सकाळीं व निम्मा संध्याकाळीं, थोडा गुळ घालून घ्यावा. ह्या उपायांनीं मस्तकांतील पीडा हलकी न झाली, तर पोट्याश ब्रोमाईड १० पासून १५ ग्रेन, साखरेचा पाक एक तोळा, पाणी दोन तोळे असें एकत्र करून दिवसांतून दोन तीन वेळां घ्यावें. मस्तकावर कोलनवाटर व पाणी अशीं सम

प्रमाणांनीं मिश्र करून त्या मिश्रणांत भिजवलेली घडी ठेवावी; किंवा एक्स्ट्रॅक्ट बेलाडोना, ग्लीसरीन नामक औषधांत अथवा पाण्यांत कालवून त्याचा मस्तकावर लेप द्यावा; किंवा वेदनाशामक तेल (यादी नं. २८) चोळावें; किंवा अफू, केशर, सुंठ हीं पाण्यांत उगाळून त्याचा लेप द्यावा, किंवा अफू, वेखंड, एळीया बोळ, कापूर हीं सर्व पाण्यांत उगाळून त्याचा मस्तकावर लेप द्यावा, किंवा मोहरीचा लेप द्यावा, किंवा मस्तकावर बर्फ ठेवावा, (भाग पहिला, यादी नं. ९ पहा); किंवा पहाडमूळ, कडू पडवळ, सुंठ, एरंडमूळ, शेवग्याची साल, तरवडाचें बीं, कोष्ठ, हीं सर्व औषधें कांजीमध्यें वाटून मस्तकास लेप करावा ह्मणजे सर्व प्रकारच्या मस्तकशूलाचा नाश होतो. त्रासापासून किंवा एखाद्या क्षुल्लक बाबतीमुळें उठलेला मस्तकशूल चहा अथवा कॉफी प्याल्यानें किंवा स्पिरिट अमोनिया ॲरोमॅटिक १० मि., स्पिरिट क्लोरोफॉर्म १० मि., टिंक्चर जेनशन कंपौंड १० मि. पेपरमिंट वॉटर १ औंस असें मिश्रण घेतल्यानें मस्तकशूल नाहींसा होतो. नाजूक आणि रक्तक्षीण प्रकृतीच्या मनुष्यांनीं लोहाच्या मात्रा घ्यावा, (भाग पहिला, यादी नं. २७). किंवा केमिकल फूड अथवा ईस्टन्स सिरप घ्यावें, ह्मणजे वारंवार मस्तकशूल उठण्याची जी संवय असते ती जाते.

**अर्धशिशीवरील उपचारः**—ही बहुतकरून एक आठवड्याचे आंत आपोआप बरी होते. तरी वेदना फार जबर असते ह्मणून रात्रीं निजतांना पोडोफिला रेसिनाय $\frac{1}{4}$ ग्रेन, पिल ऱ्हीयाय कंपौंड ५ ग्रेन, एक्स्ट्रॅक्ट हैओसियामस २ ग्रेन, यांच्या दोन गोळ्या करून याव्या आणि उजाडल्यावर सेड-

लीस पौडर द्यावी (यादी नंबर २० भा. प.). किंवा मॅग्नि-शिया सल्फस् ४ ड्राम, पेपरमिंट वॉटर १ औंस, गुलाबी सरबत अर्धा तोळा असें एकत्र करून प्यावें. कपाळ दुखत असतां रोग्यानें अंधार व शांत जागेंत बसावें आणि कपाळाची जी बाजू दुखत असेल ती चेपावी किंवा दाबून धरावी ह्मणजे बरें वाटतें. ओल्या फडक्यानें कपाळ बांधून ठेवलें असतांही कधीं कधीं फायदा होतो. कढत कढत चहा किंवा काफी प्याल्यानेंही बरें वाटतें. किंवा कापूर २ ड्राम, प्यावयाची दारू किंवा कोलनवॉटर १ औंस असें एकत्र करून तें चांगलें विरघळल्यावर मस्तकावर चोळावें, किंवा वेदनाशामक तेल दुखऱ्या बाजूवर चार पांच मिनिटेंपर्यंत चोळावें. एवढ्यानें बरें न वाटल्यास अँटिपायरीन किंवा क्रोटन क्लोरल ५ ग्रेनप्रमाणें दर तीन तासांनीं साखरेच्या पाकांत मिश्र करून वेदना शमेतोंपर्यंत द्यावें. अर्धशिशीचा उपद्रव बहुतकरून कर्दमोत्थ विषापासून असतो ह्मणून त्याजवर क्विनाईन दिलें असतां त्वरित फायदा होतो. ५ ग्रेन क्विनाईन दर तीन तासांनीं साखरेच्या पाकांतून किंवा मधांतून द्यावें. किंवा लिकर आरसिनीकेलीस ५ मि., किराइताचा फांट १ औंस (यादी नं. १२ भाग प.) असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. अशक्त प्रकृतीच्या रोग्यांनीं अर्धशिशीचा उपद्रव वारंवार होऊं लागल्यास लोह घ्यावा, किंवा इस्टन्स सिरप घ्यावें ह्मणजे त्यांस अर्धशिशीचा उपद्रव वारंवार होणार नाहीं. अर्धशिशीवर मराठी वैद्य अनेक उपाय करितात. अर्धी सुपारी उगाळून त्याचा लेप देतात, किंवा टाकळ्याचें बीं कांजींत वाटून त्याचा लेप

पिल्यांनीं गळा शेकावा. ऊन दूध व पाणी एकत्र करून त्याच्या किंवा नुसत्या ऊन पाण्याच्या गुळण्या कराव्या. किंवा टांकणखार, क्लोरेट ऑफ पोट्याश, तुरटी हीं एक एक तोळा घेऊन तीं ३२ तोळे पाण्यांत विरघळवून त्याच्या गुळण्या कराव्या. किंवा बाभळीची साल २ तोळे, पाणी १६ तोळे, ह्यांचा काढा करून त्यांत १ तोळा फटकी व १ तोळा कात विरघळवून त्याच्या गुळण्या कराव्या. क्षारमय मिश्रण घ्यावें ( यादी नं. २९ ); किंवा टिंक्चर अकोनाईट १ मि., पाणी १ औंस असें, अथवा व्हैनम आंटिमोनियेलीस १ मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दर तीन तीन तासांनीं घ्यावें. घशांत फोड आले असल्यास त्यांजवर नैट्रेट ऑफ सिल्व्हर १० ग्रेन, डिस्टील्ड वाटर किंवा पावसाचें पाणी १ औंस, असें मिश्रण करून त्या मिश्रणाचा कापसाचे बोळ्यानें घशाला लेप द्यावा. फोड फुटून वाहूं लागल्यावर क्लोरीनेटेड सोडा १ औंस, पाणी २० औंस या मिश्रणाच्या गुळण्या कराव्या; व पोटांत टिंक्चर सिंकोना १० मि., स्पिरिट अमोनिया अरोम्याटिक २० मि., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा धने, रक्तचंदन, पद्मकाष्ट, दारूहळद, गुळवेल, काळावाळा, नागरमोथा, निंबसाल, जेष्टीमध, मनुका, हीं तोळा तोळा घेऊन त्याच्या चार पुड्या कराव्या व दररोज एका पुडीचा ३२ तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करून गाळून सकाळ संध्याकाळ घ्यावा, ह्मणजे घशांतील सूज व क्षतें हीं सर्व नाहींशीं होतात.

**पथ्य:**—प्रवाही पदार्थ खावे, तांदुळांची किंवा थोडी तवकील घालून तयार केलेली दुधाची पेज, चालत अस-

त्यास मांसरस (soup) प्यावा. रोग्यानें स्वस्थ असावें, ऊब-दार खोलींत बसावें, फार बोलूं नये व ज्यांचा वारंवार घसा धरतो त्यांनीं दाढी राखावी ह्मणजे घसा धरण्याचा संभव कमी होतो.

---

## खोकला.

### COUGH.

खोकल्याचा उपद्रव कोणत्याही वयांत होऊं शकतो. तथापि बाल्यावस्थेंत आणि उत्तर वयांत तो वारंवार होतांना आढळतो. खोकला हा श्वासमार्ग आणि फुप्फुसें ह्यांत दाह उत्पन्न झाल्यानें उद्भवतो. किंवा त्याचे अनुषंगिक भाग, आणि मूत्रपिंड, प्लीहा, पक्वाशय वगैरे इंद्रियांत दाह अथवा क्षोभ उत्पन्न झाल्यानें त्यांचे परावर्तनानेंही तो उत्पन्न होतो.

लोकांस समजण्याकरितां येथें खोकल्याचे दोन प्रकार केले आहेत. १ साधा अथवा कोरडा, आणि २ श्वासनलिका व फुप्फुसें यांचे दाहापासून होणारा अथवा कफोत्पादक.

**कोरडा खोकला:**—हृद्विकारांत, मूत्रपिंडविकारांत आणि उरप्रदेश* व्यापक मज्जातंतूचा क्षोभ झाल्यानें किंवा पाचनव्या-

---

* उरप्रदेश:—ऊर हा डायफ्रम नामक पडद्याचे ( हा पडदा चिनाई पंख्यासारखा असून तो पोटाचे शिंपीपासून शेवटांला बर-गड्यांच्या दोन्ही बाजूंनीं पाठीमागें पाठीच्या कण्यापर्यंत एकसारखा लागत गेला आहे. श्वासोछ्वास करतेवेळी हा पडदा नेहमीं वर खालीं होत असतो. ) योगानें उदरापासून वेगळा केला आहे. उराचीं दोन अंगें आहेत. पुढचें आणि मागचें. उरप्रदेशास स्कं-धाशीं आरंभ होऊन स्तनाखालीं सुमारें तीन इंचपावेतों तो पोंचतो. याचा घेर फांसळ्या आणि त्यांचीं संयोगस्थानें यांनीं झाला आहे. पाठीकडे त्याची हद्द कंबरेच्या १ ल्या मणक्यापर्यंत आहे. व त्यांत

पाराची अव्यवस्था झाल्यानें हा उत्पन्न होतो. शिवाय घशांत क्षोभ उत्पन्न होणें, पडजीभ वाढणें, अथवा लांब होणें, फुप्फुसवेष्टन-

---

श्वासमार्ग, फुप्फुसें†, हृदय आणि अन्नमार्गाचा कांहीं भाग ह्यांचा समावेश होतो.

---

† फुप्फुसें ही श्वासोच्छ्वासासंबंधीं मुख्य इंद्रियें छातीच्या प्रत्येक बाजूच्या खाचेंत एक एक अशीं दोन असतात. उजव्या फुप्फुसाचे तीन विभाग आहेत आणि डाव्याचे दोन आहेत. प्रत्येक फुप्फुसास शेंडा, बूड, अशीं दोन अंगें आणि कांठ असतात. शेंडा शंक्काकार असून तो मानेच्या मुळापर्यंत येतो. बूड रुंद व गोलाकार असून तें डायफ्रमवर टेंकतें. फुप्फुसास प्लुरा नामक पातळ त्वचेचें आच्छादन असतें. फुप्फुसाचा रंग जन्मतःच फिक्कट गुलाबी असतो. परंतु प्रौढवयांत स्लेटीसारखा जांभळा होतो. आणि उत्तरवयांत काळसर होतो. फुप्फुसें हीं स्पंजासारख्या विरळ व हलक्या रचनेनें ह्मणजे मोहरीपेक्षांही सूक्ष्म अशा अनेक वातपेशी व त्यांस जोडलेल्या श्वासनलीच्या आंतील शाखा यांनीं झालेलीं आहेत. त्यांत नेहमीं हवा भरलेली असते. ह्मणून, उरप्रदेशीं बोटानें ठोकलें असतां नगाऱ्यासारखा पोकळ आवाज उत्पन्न होतो. जन्मतःच मुलानें श्वासोच्छ्वास केलेला नसल्यास त्याचें फुप्फुस घट्ट व अविस्तृत असतें. प्रौढांत दोन्ही फुप्फुसांचें वजन सुमारें ४२ औंस ( १५० तोळे ) आहे. उजवें फुप्फुस अधिक मोठें आहे. पुरुषांत फुप्फुसाचें वजन स्त्रियांपेक्षां अधिक आहे. श्वासोच्छ्वासाचे योगानें हवेंतील प्राणवायु ( आक्सिजन ) शरीरांत शोषला जातो. आणि शरीरांत चालू असलेल्या घडामोडीनें उत्पन्न होणारा कार्बानिक असिड नामक दुष्ट वायु शरीरांतून बाहेर सोडला जातो. ह्या फेरफाराच्या योगानें शरीरांत फिरत असलेल्या रक्ताची पुन्हां पुन्हां शुद्धि होते. श्वासोच्छ्वासाची क्रिया, हृदय, डायफ्रम व बरगड्यांस लागून असणाऱ्या स्नायूंच्या सहाय्यानें पूर्ण होते. प्रौढ वयांत अरोगास्थितींत श्वासोच्छ्वासाची क्रिया दर मिनिटांत १४ पासून १८ पर्यंत होते आणि बाल्यावस्थेंत २०–२५ होते. रोगांत त्याची क्रिया कमज्यास्त आणि अनियमित होते. श्वासोच्छ्वास पांच मिनिटेंपर्यंत बंद पडल्यानें मनुष्य मरतें.

त्वचेंत दाह उत्पन्न होणें, किंवा द्रव पाझरणें अथवा त्यांत वात किंवा पू जमणें, इत्यादि कारणांमुळें तो उत्पन्न होतो. गर्भाशयवृद्धीमुळेंही हा उत्पन्न होतो. तेलकट, आंबट, थंड वगैरे पदार्थ अतिशय खाण्यांत आल्यानेंही हा उद्भवतो. ह्यांत श्वासनलिका आणि फुप्फुसें ह्यांत कांहीं विकार होत नाहीं. ह्यांत ज्वरचिन्हें फार जबर नसतात. इंद्रियांचे ज्या बिघाडामुळें खोकला उद्भवला असेल त्याचे उपचार केल्यानें तो बहुशः आपोआप बरा होतो. खोकला फारच त्रासदायक असल्यास **लवंगादि गुटिका** ह्मणजे लवंगा, मिरें, बेहड्याची साल हीं सर्व समप्रमाणानें घेऊन त्याच्या दुप्पट कात घ्यावा; आणि सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांचा बाभळीचे सालीचे काढ्यांत तीन दिवस सारखा खल करावा. नंतर त्याच्या वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्या. यांस लवंगादि गुटिका असें ह्मणतात. प्रौढ वयाचे मनुष्यानें दर वेळेस दोन-गोळ्या खडीसाखरेबरोबर तोंडांत धरून ठेवाव्या. व लहान मुलास २ गोळ्या मधांत उगाळून वारंवार चाटवाव्या. किंवा सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, ज्येष्ठीमध, वेलची, नागकेशर, दालचिनी, व तमालपत्र हीं सर्व समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यापैकीं चार मासे चूर्ण मधांतून चाटवावें. किंवा बेहड्याची साल आणि ज्येष्ठीमध हीं तोंडांत धरवावीं, ह्मणजे खोकल्याचा ठसका बंद होतो. किंवा सिरप ऑफ धी हैपोफास्फेट ऑफ लाईम अथवा सिरप टोलुटेनम एक संधेची पळी अथवा लहान चमचा भरून द्यावें. परंतु जेव्हां हा खोकला फुप्फुसवेष्टनत्वचेंत दाह, रक्तद्रव, वात किंवा पू

झाल्यानें उत्पन्न होतो, तेव्हां त्याची चिकित्सा लक्षपूर्वक झाली पाहिजे. ह्मणून त्याविषयीं येथें थोडा विचार करणें जरूर आहे.

---

## फुप्फुसवेष्टनत्वग्दाह अथवा पंजरांतस्त्वग्दाह.

### PLEURISY.

उराचें आंतील अंग आणि फुप्फुसें ज्या त्वचेनें आच्छादिलीं आहेत, त्या त्वचेचा दाह. हा दाह व्यापक अथवा अंशवर्ती असतो. बहुतकरून हा उजव्या बाजूस होतो, तरी कधीं कधीं दोन्ही बाजूंस झालेला आढळतो. या दाहासंबंधानें जरी येथें विचार केला आहे, तरी त्याचें पूर्ण स्वरूप स्पष्टपणें वाचकांचे लक्षांत येण्यासारखें नाहीं. तथापि खालीं जीं त्याचीं गुणबोधक लक्षणें दिलीं आहेत, त्यांवरून तो पंजरांतस्त्वग्दाह आहे असें वाचकांच्या लक्षांत येईल.

**पंजरांतस्त्वग्दाहाचीं कारणें**:—शैत्य होणें, उरप्रदेश किंवा फुप्फुसें यांस दुखापत होणें, किंवा त्याच्या शेजारच्या इंद्रियांत दाह होणें, आणि ज्वरावस्था इत्यादि कारणांनीं हा दाह उत्पन्न होतो. हा दाह मूत्रपिंडविकार आणि हृद्विकार यांशीं बहुधा गौण असतो. कधीं कधीं तो फुप्फुसरोगासहित असतो.

**लक्षणें**:—प्रथमतः उरांत एकाएकीं भोंसकल्यासारख्या वेदना होऊं लागतात. नंतर ज्वर भरतो आणि कोरडा खोकला उत्पन्न होतो. वेदना श्वासोच्छ्वासानें आणि खोकल्यानें वाढतात. श्वासोच्छ्वास अपूर्ण आणि ऱ्हस्व असतो. नाडी जलद आणि सारंगीच्या तांतीसारखी टणक लागते. दाहाचे प्रारंभीं उर-

प्रदेशीं कान किंवा स्टेथास्कोप* नामक नळी लाविली असतां विकृत ठिकाणीं प्रत्येक श्वासोच्छ्वासाचे वेळीं घांसल्यासारखा किंवा चोळल्यासारखा एक अस्वभाविक आवाज ऐकूं येतो. आणि त्याठिकाणीं हाताचीं दोन बोटें ठेवून दुसऱ्या दोन बोटांनीं त्यावर ठोकलें असतां स्वास्थ्याप्रमाणें उर खणखणीत वाजतो. परंतु जसजसा रोग वाढत जातो, तसतसा ज्वर आणि वेदना हीं कांहीं अंशानें कमी होत जातात. परंतु क्षीणता अधिक वाढते, त्वचेंत द्रव पाझरतो, आणि दिवसानुदिवस त्याचें प्रमाण वाढत गेल्यानें उराची ती बाजू विस्तृत होते. शिवाय फुप्फुसें, हृदय, यकृत वगैरे इंद्रियांवर त्याचा दाब पडून श्वासोच्छ्वास अगदीं कष्टानें होऊं लागतो, घेऱ्या येतात, क्षुधा मंद होते, व रोगी अगदीं थकतो. ह्यावेळीं घेरीनें किंवा श्वासावरोधानें रोगी मरण्याची भीति असते. शिवाय उराच्या विकृत भागाची परीक्षा करून पाहिली असतां तो बदबदीत वाजतो आणि तेथें अजास्वर ह्मणजे बकऱ्याच्या बेंबटण्यासारखा ध्वनि ऐकूं येऊं लागतो.

**परिणामः**—साध्य प्रकारांत रोगी एका आठवड्यांतच बरा होतो, किंवा रोग कित्येक आठवडेपर्यंत लांबणीवर

---

* उरपरीक्षक नळी ( Stethoscope ) ही लांकडाची, हस्तिदंती, किंवा धातूची केलेली असते. ही सरासरी ६ पासून ९ इंच लांबीची असते. तिची दांडी पोकळ किंवा भरीव असते. तिचें कानास लावण्याचें शेवट सुमारें दोन इंच घेराचें असून उथळ असतें. आणि उरप्रदेशीं लावण्याचें शेवट सुमारें एक इंच घेराचें असून किंचित् खोलगट असतें. हिचे योगानें फुफ्फुसविकार, श्वासनलिकाविकार, हृद्विकार, इत्यादि विकारांचें ज्ञान होतें. शिवाय धमनीच्या आवाळूची परीक्षा करण्यास हीच उपयोगी पडते. ज्यांनी इंग्लिश वैद्यकाचा अभ्यास केला आहे त्या सर्वांजवळ ही असते.

पडतो. द्रवांश फार नसल्यास त्याचें शोषण होऊन श्वासोच्छ्वास स्वाथ्याप्रमाणें घडूं लागतो, आणि उरासही आपली पूर्वस्थिति प्राप्त होते, व खोकला, ज्वर आणि वेदना हींही नाहींशीं होतात. किंवा द्रवांशाचा पू होऊन उरोविद्रधी होतो, आणि असें झालें ह्मणजे नेहमीं घातक परिणाम होतो.

**उपचारः**—रोगी अशक्त असल्यास प्रारंभींच १२ पासून २४ जळवा वेदनायुक्त भागावर लावून रक्त काढावें. नाहींतर टरपेन्टाईनचा शेक (यादी नं० ३०) द्यावा. आणि क्यालोमेल ६ ग्रेन, अन्टीमनी टार्टरेटम १ ग्रेन, एकस्ट्राक्ट ऑफ ओपियम १ ग्रेन, एकस्ट्राक्ट ऑफ जेनशियन ६ ग्रेन हीं एकत्र घोंटून त्याच्या ६ गोळ्या कराव्या. आणि प्रत्येक चार तासांनीं एक गोळी पाण्याचे घोटाबरोबर द्यावी, किंवा आनंदभैरव रस अथवा रसशींदूर १–२ गुंजापर्यंत मधांतून द्यावा. रात्रीं झोंप येत नसल्यास $\frac{1}{4}$ पासून $\frac{1}{2}$ ग्रेन अफू द्यावी. शौचास साफ होत नसल्यास रेचक द्यावें (यादी नं० ३ भाग १.) द्रवसंचय झाला असल्यास त्या ठिकाणीं ब्लिस्टर (यादी नं० २२ भाग १.) मारावें. एका ब्लिस्टरानें काम न झाल्यास दुसरें, असें द्रवाचें शोषण होईतोंपर्यंत करावें. पोटांत पोट्याशियम ओडाईड ३ ग्रेन, टिंक्चर डिजीटेलीस ५ मि., टिंक्चर ऑफ स्कील २० मि., लिकर आमोनिया आसिटेटीस २ ड्राम, पाणी १ औंस, असें मिश्रण दर चार तासांनीं द्यावें. शक्ति क्षीण झाल्यास द्राक्षारिष्ट (यादी नं० ३१) द्यावें किंवा ब्रांडी मिकश्चर द्यावें (यादी नं० १ भा० ५०). ह्या उपायांनीं द्र-

वाचें शोषण न झाल्यास लगेच एखाद्या कुशल वैद्याचें मत घ्यावें. उरोवेध करून द्रव काढावा, ह्मणजे हित होतें.

**पथ्यः**—आंबट, थंड खाऊं नये, पेज वगैरे हलकें परंतु पौष्टिक अन्न खावें, स्वस्थ पडून असावें, उबदार चिरगुटें अंगांत घालावीं व वाऱ्यावर फिरूं नये.

## कफोत्पादक खोकला.

शैत्यापासून किंवा ताप, देवी, गोंवर, इत्यादि कारणांपासून श्वासनलीचा अथवा फुफ्फुसाचा दाह होऊन जो खोकला उत्पन्न होतो तो कफोत्पादक खोकला होय. आणि जेव्हां कफ होतो तेव्हां बहुशः लहान अथवा मोठ्या श्वासनलिकांचा दाह, फुप्फुसदाह किंवा कफक्षय झाल्याचा बोध होतो.

ह्या तिन्ही स्थितींचे परिणाम फार मोठे भयंकर असतात. कारण सांथीचे रोग खेरीजकरून इतर रोगांपासून मरणाऱ्या लोकसंख्येंत श्वासमार्गसंबंधीं रोगांनीं मेलेल्यांची संख्या ज्यास्त असते. ह्मणून त्या तिन्ही रोगांची संक्षेपांत लक्षांत येण्यासारख्या चिन्हांनीं व लक्षणांनीं येथें अनुक्रमानें माहिती दिली आहे. तरी अवश्य वेळीं एखाद्या कुशल वैद्याचें मत घेणें अत्यावश्यक आहे. श्वासनलिकेचे आणि फुप्फुसाचे रोग एकमेकांपासून वेगळे ओळखण्यास उरपरीक्षेचें ज्ञान झालें पाहिजे. परंतु त्यासंबंधानें येथें सविस्तर लिहूं लागल्यास ग्रंथाचा विस्तार बराच होणार आहे. यास्तव थोडक्यांत जेवढें समजण्यासारखें आहे तेवढेंच येथें सांगितलें आहे.

उरपरीक्षेचें ज्ञान होण्यास उराच्या सीमा समजल्या पाहिजेत. त्यासंबंधानें मागें २०६–२०७ पृष्ठांत टीप दिली आहे ती पहा. श्वासमार्गसंबंधीं रोगांत आणि हृदयविकारांत उराची स्वाभाविक स्थिति बदलून तो बहुतकरून विस्तृत किंवा संकोचित होतो, आणि त्याच्या हलनचलन व्यापारांतही फरक होतात. त्याजवर डाव्या हाताचीं दोन बोटें ठेवून उजव्या हाताच्या आंगठ्याजवळील दोन बोटांनीं ठोकलें असतां त्याच्या स्वाभाविक खणखणीतपणांत न्यूनाधिक्य झालेलें आढळतें. आणि उरास विकृत ठिकाणीं प्रत्यक्ष कान किंवा स्टेथास्कोप नामक नळी लावल्यानें स्वाभाविक स्थितींत घड्याळांतील लंबकाचे हलण्यानें टिकटिक असा जो ध्वनि होतो त्यासारखा ध्वनि उरांत होत असतो; त्याखेरीज कांहीं अंगांतून ध्वनि ऐकूं येतात, त्यांचा पुढें ठिकठिकाणीं विचार केला आहे. उरपरीक्षेच्या संबंधानें इतक्या गोष्टींचें ज्ञान झालें ह्मणजे हृदयविकार आणि श्वासोच्छ्वाससंबंधीं इंद्रियांच्या निरनिराळ्या रोगांचे भेदाभेद कळतात. तथापि अनभ्यस्त मनुष्यास हे भेदाभेद कळणें कठीण आहे. कारण कित्येक पढीक व अनुभविक वैद्यांस देखील कधीं कधीं त्या रोगांचें खात्रीलायक निदान करितां येत नाहीं.

---

## श्वासनलिकेचा दाह.

BRONCHITIS.

फुप्फुसांत शुद्ध हवा नेऊन सोडणाऱ्या व त्यांतील अशुद्ध हवा बाहेर आणणाऱ्या नळ्यांचा दाह. हा दाह फुप्फुसांतील मोठ्या आणि लहान नळ्यांत होतो. हा दोन्ही फुप्फुसांतील

नळ्यांत होतो, किंवा एकाच बाजूच्या फुप्फुसाच्या थोडक्याशा भागांत होतो. हा रोग बहुतकरून बाल्याव्यवस्थेंत किंवा उत्तरवयांत होतो.

**कारणें:**—शैत्य होणें, अथवा एकाएकीं हवेंत फेरबदल होणें, किंवा लोहकण, धुरळा वगैरे पदार्थ, श्वासनलिकेंत श्वासमार्गानें जाणें इत्यादि कारणांनीं श्वासनलिकेचा दाह उत्पन्न होतो. तसेंच ज्वरावस्था, गोंवर, देवी ह्यांपासूनही तो उद्भवतो. कफक्षयामध्यें तर हा दाह थोडाबहुत नेहमींच असतो.

ह्या दाहाचे मुख्य दोन प्रकार आहेत, तीव्र आणि विलंबी. श्वासनलिकेचा तीव्र दाह, हा प्रकार बहुतकरून लहान मुलांस होतो, आणि तो बारीक श्वासनलिकेंत होत असतो.

**लक्षणें:**—आरंभीं पडसें येतें, पुढें तें वाढून थोडासा ज्वर येतो, श्वासोच्छ्वास जलद चालतो, नाडीची गति वाढते, जिव्हा मलानें लिप्त झालेली असते, मूत्र आरक्त असतें आणि थोडें होतें, खोकला प्रथम कोरडा असतो, व नंतर कफ पडूं लागतो. तो गोंदाच्या पाण्याप्रमाणें चिकट व पारदर्शक असतो. कधीं कधीं रक्तमिश्रितही असतो. ऊर आंवळल्यासारखा किंवा चेपल्यासारखा होतो. उरप्रदेशीं कान किंवा स्टेथास्कोप नामक नळी लाविली असतां विकृत ठिकाणीं घोरसारखा किंवा घुरघुर असा आवाज ऐकूं येतो. कधीं कधीं याबरोबर "किंग" "चिंग" असा आवाज ऐकूं येतो. उराचे कोणतेही भागावर हाताचीं दोन बोटें ठेवून दुसऱ्या दोन बोटांनीं त्यावर ठोकिलें असतां ऊर खणखणीत वाजतो. फुप्फुसदाहांत ऊर असा वाजत नाहीं. जसजसा

रोग वाढत जातो तसतसा श्वासोच्छ्वास आणि खोकला हीं वाढत जातात. मुखचर्या चिंतातुर होते, ओंठ व गाल विवर्ण होतात आणि श्वासावरोध होऊन मृत्यु येतो. कधीं कधीं "कुर्र कुर्र" असा आवाज उरप्रदेशीं ऐकूं येऊं लागतो. असें झालें ह्मणजे फुप्फुसदाह झाला आहे असें समजावें.

साध्य उदाहरणांत सुमारें चौथ्या दिवसापासून १० दिवसांचे आंत ज्वर कमी होतो, श्वास कमी होतो व कफ दाट होतो. ह्या फेरफारानंतर खोकला कमी होऊन शेवटीं नाहींसा होतो आणि रोगी हळूहळू बरा होतो. किंवा विकार विलंबी स्थिति पावतो. जेव्हां दाह सूक्ष्म अथवा केशाकार श्वासनलिकेंत पसरला असतो, तेव्हां पहिल्यापासूनच लक्षणें तीव्र असतात. ह्मणजे राहून राहून फारच श्वास लागतो, खोकला निरंतर असतो, अस्वस्थता फार असते, रोगी सुस्त होतो व शेवटीं श्वासावरोध होऊन मृत्यु येतो. असें बहुतकरून लहान मुलांतच होतें.

**उपचारः**—ज्या कारणांपासून हा दाह उत्पन्न होतो तीं कारणें दूर करावीं. थंड व सर्द हवेंत जाऊं नये. ऊबदार चिरगुटें अंगांत घालावीं. दिवसांतून दोन वेळां टरपेन्टाईनचा शेक करावा (यादी नं० ३०) व पुढील औषधें पोटांत घेण्यास द्यावीं. पहिल्यानें इपिक्याकुआन्हाचें वमन द्यावें (यादी नं० २ भाग पहिला), नंतर ज्वर असल्यास लिकर आमोनिआ आसिटेटिस २ ड्राम, स्वीट स्पिरिट ऑफ नैटर २० मि., व्हैनं इपिक्याकुआन्हा १० मि., आक्सीमेल सिली ४ ड्राम, टिंक्चूर क्यामफर कंपाउन्ड ३० मि., कापराचें पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें.

(वर्षाचे आंतील मुलास ह्यापैकीं अर्धा टीस्पून पासून एक टीस्पून किंवा संध्येची पळी भरून द्यावें.) किंवा आन्टीमनी एट पोट्याशी टार्ट्रस १॥ ग्रेन, लिकर अमोनिआ आसिटेटिस २ औंस, सिरप टोल्यूटेनम २ औंस, पाणी २ औंस, हीं सर्व एकत्र करून त्यांपैकीं एक टेबल स्पूनफुल, संध्येच्या चार पळ्या भरून, दिवसांतून तीन वेळां द्यावें. (१ वर्षाचे आंतील मुलास ह्याच्या $\frac{1}{10}$ किंवा $\frac{1}{12}$ द्यावा.) किंवा आमोनिया कार्बोनस २ ग्रेन, टिंक्चर क्यांफर कंपाऊंड २० मि., स्पिरिट क्लोरोफार्म १० मि., डिकाक्शन ऑफ सेनीगा रूट १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा काकडशिंगी कायफल, पिंपळी, पोखरमूळ, हीं सर्व समभाग घेऊन त्याचें चूर्ण करून त्यापैकीं तीन मासे चूर्ण दिवसांतून तीन वेळां मधांत चाटावयास द्यावें. किंवा अडुळसा, धने, हळद, गुळवेल भारंगमूळ, रिंगणीमूळ, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, नागरमोथा हीं सर्व एक एक तोळा घेऊन ४ पुड्या कराव्या व दररोज एक पुडीचा ३२ तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करून त्यांत अर्धतोळा मध, अर्धमासा मिऱ्यांचें चूर्ण घालून घ्यावा. किंवा कटूफलादि काढा द्यावा. ह्मणजे कटूफळ, नागरमोथा, भारंगमूळ, धने, चिराईत, पित्तपापडा, वेखंड, हरीतकी, काकडशिंगी, देवदार, सुंठ हीं सर्व औषधें १॥ तोळाप्रमाणें घेऊन किंचित् ठेंचावीं, नंतर त्याच्या चार पुड्या करून दरवेळेस १ पुडी ३२ तोळे पाण्यांत उकळून काढा अष्टमांश शेष राहिला ह्मणजे गाळून घ्यावा. संध्याकाळीं पुन्हां घ्यावा. कित्येक वैद्य ह्यांत आनंदभैरवाची मात्रा २ गुंजा आणि १ मासा पिंपळीचें चूर्ण व अर्ध तोळा मध असें

मिश्र करून देतात. लहान मुलांस श्रृंग्यादि चूर्ण द्यावें. ह्मणजे काकडशिंग, अतिविष, पिंपळी, हीं तीन औषधें सम-प्रमाणानें घेऊन त्यांचें चूर्ण करून त्यापैकीं दोन गुंजा चूर्ण मधांतून दिवसांतून दोन तीन वेळां चाटावयास द्यावें.

---

## विलंबी श्वासनलिकादाह.

### CHRONIC BRONCHITIS.

हा विकार बहुतकरून वृद्ध मनुष्यांस होतो आणि तो सर्द देशांतील लोकांस हिंवाळ्यांत किंवा पावसाळ्यांत होतांना जितका आढळतो तितका उन्हाळ्यांत आणि उष्ण देशांतील लोकांस होतांना आढळत नाहीं. हा बहुतकरून तीव्र प्रकाराच्या परिणामीं होत असतो. किंवा शैत्यानें अथवा हवेच्या फेरफारानें हा उत्पन्न होतो. मागें तीव्र प्रकारांत सांगितलेले क्षोभक पदार्थ श्वासनलिकेंत गेल्यानेंही हा उत्पन्न होतो. कफक्षयाशीं ह्याचें नेहमीं साहचर्य असतें. आणि उपदंश, आमवात, पादाग्ररोग ह्या विकारांशींही बहुतकरून ह्याचा संबंध असतो.

**लक्षणें:**—ह्यांतील मुख्य लक्षण ह्मटलें ह्मणजे खोकला, ज्वर बहुशः नसतो, आणि असला तरी फारच थोडा असतो. नाडी क्षीण असते, कफ पडतो तो फेणयुक्त किंवा पूयसदृश असतो, श्वास लागतो, खोकून खोकून ऊर दुखतो व ठेंचल्यासारखा होतो, उरप्रदेशीं ठोकून पाहिलें असतां विकृत ठिकाणीं ऊर बदबदीत वाजतो. व त्या ठिकाणीं घोरण्यासारखा किंवा कुड कुड असा ध्वनी ऐकूं येतो. ही स्थिति फार दिवस राहिल्यानें रोगी कृश होतो, हगवण लागते, व

सर्व क्षयाचीं चिन्हें दिसूं लागतात, आणि रोगी दिवसानुदिवस क्षीण होत जाऊन शेवटीं मरतो. असा घातक परिणाम क्वचित् होतो. बहुतकरून रोगी बरा होतो. तरी त्यास पुन्हां पुन्हां विकार होण्याचा संभव असतो. जेव्हां सर्व श्वासनलिकेंत दाह पसरतो, तेव्हां श्वासनलिका जाड व विस्तृत होतात. आणि असें झालें ह्मणजे मात्र कफक्षयाप्रमाणें घातक परिणाम होतो किंवा वातफुफ्फुसविकार उद्भवतो, ह्मणजे फुफ्फुसाशयांत वायु भरतो.

**उपचारः**—अमोनिया कार्बोनस ३ ग्रेन, टिंक्चर सिल्ली १० मि., टिं. क्यांफर कंपाउन्ड २० मि., स्पिरिट क्लोरोफार्म २० मि., सिरप टोलूटेनम १ ड्राम, डिकॉकशन ऑफ सेनीगारूट १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळ घ्यावें. श्वास फार लागत असल्यास ह्यांतच ईथर सलफ्युरीस १० मि. मिळवून घ्यावें. कफ फार पडत असल्यास टिंक्चर बेनझाईन कंपाउन्ड २० मि., टिंक्चर क्यांफर कंपाउन्ड २० मि., सिरप टोलू १ ड्राम, क्यांफर वाटर १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. खोकल्यामुळें रात्रीं झोंप येत नसल्यास डोव्हर्स पौडर ५–१० ग्रेनपर्यंत थंड पाण्यांत मिश्र करून रात्रीं निजतांना घ्यावी. किंवा पिल सिल्ली कंपाउन्ड ४ ग्रेन, हैड्रोक्लोरेट ऑफ मारफिया ¹ ग्रेन, ह्याची गोळी करून घ्यावी. तीव्र श्वासनलिकादाह प्रकरणीं सांगितलेलीं सर्व चूर्णें व काढे घ्यावे. शक्ति क्षीण झाली असल्यास ब्रांडी मिक्श्चर ( यादी नं. १ भाग १ ) किंवा द्राक्षारिष्ट, माक्षिक भस्म २ गुंजा मिश्र करून द्यावें. किंवा कॉडलिव्हर आईल अर्ध तोळ्यापासून एक तोळ्यापर्यंत दु-

धांत मिश्र करून जेवण झाल्यानंतर घ्यावें. किंवा ग्रिमाल्ट सिरप घ्यावें. छातीला टरपेन्टाईनचा शेक द्यावा, किंवा विकृत ठिकाणीं लिनीमेन्ट आयोडीन लावावें किंवा ब्लिस्टर मारावें.

**पथ्यः**—साधें आणि पौष्टिक असें अन्न द्यावें. आंबट, थंड, तेलकट खाऊं नये. नुस्तें तिळाचें अथवा करडईचें तेल पाहिजे असल्यास खावें. परंतु तळलेले पदार्थ खाणें फारच वाईट. शिवाय तेलकट घाण घेणें हें अतिशय वाईट आहे. कारण त्यांत चरबीचें सावकाश दहन होत असतें व त्यापासून आक्रेलीन या नांवाचा वायु उत्पन्न होतो. हा विषारी आहे. तो श्वासमार्गांत गेल्यानें अपकार करतो. कुक्कुटमांसरस (Chicken soup) खाण्यास प्रत्यवाय नसल्यास तो खावा. अंगांत उबदार वस्त्रें घालावीं, उघड्या हवेंत व्यायाम करावा, सर्द जागेंत राहूं नये, शुद्ध, कोरड्या आणि मोकळ्या हवेवर हवा बदलण्यास जावें, परंतु वाऱ्यापासून सर्दी होऊं देऊं नये.

---

## फुप्फुसदाह.

### PNEUMONIA.

**कारणें:**—सर्द हवेंत वापर केल्यानें, आणि विषमज्वर, संततज्वर, सन्निपातज्वर, देवी, गोंवर इत्यादि प्रकारच्या ज्वरांत फुप्फुसदाह होण्याचा संभव असतो. शिवाय मूत्रपिंडरोग आणि हृदयाच्या मायत्रल नामक पडद्याचे रोग उत्पन्न झाले असतांही फुफ्फुसदाह उत्पन्न होण्याचा संभव असतो. उरप्रदेशीं आघात होऊन फुफ्फुसास जखम झाली असतां त्वरित फुप्फुसदाह उत्पन्न होतो.

मागें सांगितलेल्या पंजरांतस्त्वगद्दाह आणि श्वासनलिकादाह ह्यांशीं फुप्फुसदाहाचा बहुतकरून संबंध असतो. हा दाह एकाच बाजूच्या फुप्फुसांत होतो किंवा दोन्ही बाजूंच्या फुप्फुसांत होतो.

**लक्षणें:**—प्रथम थंडी भरून ताप येतो. त्यांत अंगाचें उष्णमान १०२–१०६ पर्यंत वाढतें. त्वचा कोरडी आणि कढत होते. नाडीची गति एका मिनिटांत १०० वर असते. कधीं कधीं ती १२०–१३० पर्यंत वाढते. जिव्हा पिवळट व पांढऱ्या मलानें लिप्त असते. क्षुधा मंद होते, तहान फार लागते, लघवीचें प्रमाण कमी होतें व ती लाल आणि किंचित् दाट असते. खोकला हा प्रथम कोरडा व त्रासदायक असतो. तो बोलल्यानें जास्त चावळतो. नंतर कफ पडूं लागतो व तो चिकट, जाड आणि लोखंडाच्या गंजाच्या रंगाचा असतो. हा कफ इतका चिकट, असतो कीं, ज्या पात्रांत तो टाकावा तें पात्र उपडें केल्यानेंही तो त्यांतून पडत नाहीं.

उराच्या विकृतभागीं वेदना होत असते, ती खोकल्यानें आणि श्वासोच्छ्वासानें वाढते. रोग्याच्यानें विकृत बाजूवर निजवत नाहीं. श्वासोच्छ्वास जलद, एका मिनिटांत ३०–४० किंवा त्याजपेक्षांही जास्त वेळां घडतो. रोग्यास रात्रीं बरोबर झोंप येत नाहीं व तो बडबड करितो. फुप्फुसदाहांत बडबड हें एक भयसूचक चिन्ह आहे. उरप्रदेशीं ठोकून पाहिलें असतां त्याच्या विकृतभागांतील खणखणीतपणा कमी झाला असतो. आणि कान किंवा स्टेथास्कोप लावून ऐकलें असतां "खरर, खरर" असा अथवा बिस्तवावर

मीठ टाकल्यानें जसा आवाज होतो, त्याप्रमाणें किंवा दोन बोटांत केंस चुरल्यानें उत्पन्न होणाऱ्या आवाजासारखा ध्वनि ऐकूं येतो.

**गतिः**—रोगी बरा व्हावयाचा असल्यास एक आठवड्याचे आंत दाहाचें शमन होऊं लागतें. घाम घेऊन ताप कमी होतो. नाडीची गति आणि श्वासोच्छ्वास हीं कमी होतात. कफस्राव सहजीं आणि पुष्कळ होतो. शिवाय त्याचें अपारदर्शकत्व जाऊन त्यास पारदर्शकत्व येतें आणि हळूहळू रोगी बरा होतो, किंवा तो कफक्षयी होतो. फुफ्फुसदाह निखालस बरा होण्यास निदान एक दोन महिने लागतात. रोगी तरुण आणि बळकट असल्यास घातक परिणाम बहुशः होत नाहीं.

रोग्याचा घातक परिणाम व्हावयाचा असल्यास दाहाचें मान वाढतें. शेवटीं क्षयज्वर येऊं लागतो. घाम फार सुटतो. घामानें अंग अगदीं चिकचिकीत होतें, नाडी अतिशय क्षीण होत जाते, जिव्हा होरपळल्यासारखी किंवा करडी तपकिरी रंगाची होते. खोकला वाढतो व कफही पुष्कळ पडूं लागतो. कफास दुर्गंधी येते आणि त्याचा रंग काळसर निळा असतो. मुखचर्या फिकट पडते, डोळे खोल जातात व शेवटीं रोगी क्षीणतेनें किंवा श्वासावरोधानें मृत्यु पावतो. विकार दोन्ही फुफ्फुसांत पसरला असल्यास घातक परिणाम फार त्वरित होतो.

**उपचारः**—रोगी बळकट असल्यास वेदनायुक्त भागावर १०—१२ जळवा लावाव्या, नंतर उरप्रदेशीं टरपेंटाईनचा शेक द्यावा ( यादी नं ३० ). अथवा आळशी आणि मोहरी ह्यांच्या पोटिसानें ऊर शेकावा. किंवा विकृत

ठिकाणीं ब्लिस्टर मारावें. शिवाय अमोनिया कार्बोनस ५ ग्रेन, लिकर अमोनिया आसिटेटीस २ ड्राम, व्हैनम इपिक्याक १० मि., पोट्याश नैट्रस १० ग्रे., क्यांफर वॉटर १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. रोगी अशक्त असल्यास जळवा वगैरे लावूं नये, फक्त शेकच करावा. ब्रांडी मिक्श्चर ( यादी नं. १ भा. प. ) द्यावें. किंवा द्राक्षारिष्ट ( यादी नं. ३१ ) द्यावें. किंवा २१६ पृष्ठांत सांगितलेला काढा द्यावा. दाहाचें शमन झाल्यावर ह्मणजे ताप, खोकला व उरप्रदेशीं होणारा "खरर खरर" ध्वनि कमी झाल्यावर पोट्याश आयोडाईड २ ग्रे., लिकर पोट्यासी १० मि., स्वीट स्पिरिटस ऑफ नैटर २० मि., इनफ्यूजन क्वाशिया १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. दुर्गंधयुक्त कफ पडूं लागल्यास एका अरुंद तोंडाच्या भांड्यांत आधणाचें पाणी घेऊन त्यांत १०—२० थेंब टरपेन्टाईन आणि ५ थेंब क्रियासोट अशीं घालून त्याची वाफ ओढण्यास द्यावी. आणि अमोनिया कार्बोनस ३ ग्रे., पोट्याश क्लोरस ५ ग्रे., इथर सलफ्युरिस १० मि., स्पिरिट क्लोरोफॉर्म १० मि., टिंक्चर डिजीटेलिस ५ मि., पाणी १ औंस असें मिश्रण दर तीन तासांनीं द्यावें. शिवाय ब्रांडी मिक्श्चर किंवा द्राक्षारिष्ट चालू ठेवावें. पुढें शक्ति सुधारण्याकरितां सुवर्णमालिनी वसंत ( यादी नं. ३२ ) किंवा मंडूर द्यावा. किंवा माल्टाईन काडलिव्हर आईल आणि ग्रिमाल्ट सिरप द्यावें.

**पथ्यः**—पौष्टिक आणि उत्तेजक आहार द्यावा. चालत असल्यास मांसरस, कोंबडीचीं अंडीं हेही पदार्थ द्यावे. अं-

गांत उबदार वस्त्रें घालावीं, रोग्यास सर्द जागेंत ठेवूं नये व ज्या कारणांनीं रोग बळावेल तीं सर्व दूर करावीं.

---

## कफक्षय.

### PHTHISIS PULMONALIS.

**कफक्षयः**—हा एक घातक रोग आहे, आणि तो बहुतकरून शीतकटिबंधांतील लोकांना होतो. तरी आपल्या देशांत जेथें हवा अतिशय घाणेरडी असते, तेथेंही याचें बरेंच प्राबल्य आहे.

**कारणें**:—हा रोग परंपरेनें ह्मणजे आईबापांपासून त्यांचे मुलांस अथवा आईपासून मुलीस, बापापासून मुलास, व केव्हां केव्हां आज्यापासून नातवास ह्याप्रमाणें होतो. किंवा स्त्रीपुरुषांचे प्रजननसंबंधीं व्यापार जननेंद्रियास पूर्णावस्था प्राप्त होण्यापूर्वींच घडूं लागल्यास, तें अल्पवयीं जोडपें आणि त्यांची संतति हीं क्षयरोगास पात्र होतात. नवराबायकोची प्रकृति विषम असल्यानेंही असाच परिणाम होतो. उपदंशग्रस्त लोकही ह्या रोगास पात्र होतात. जे लोक सतत अशुद्ध हवेंत राहतात, किंवा ज्यांची राहण्याची जागा सर्द आणि कोंदट असते किंवा जे मोकळ्या हवेंत बिलकुल व्यायाम करीत नाहींत, किंवा जे प्रमाणानें व गुणानें अयोग्य असें अन्न व पाणी वापरतात किंवा जे शरीर आणि वस्त्रप्रावर्ण यांच्या स्वच्छतेकडे व ऋतुमानाप्रमाणें वस्त्रांच्या फेरबदलीकडे लक्ष देत नाहींत आणि जे मनस्वी मानसिक श्रम करितात व जे नेहमीं मैथुन, काळजी आणि मनोव्यथा ह्यांनीं अगदीं ग्रस्त झालेले असतात, ते कफक्षयास पात्र होतात.

कित्येक लोक आपल्या मुलांची शुश्रूषा चांगली ठेवीत नाहींत व तीं लहान आहेत तोंच त्यांच्या शरीरप्रकृतीकडे वगैरे लक्ष न देतां तीं मोठीं विद्वान् आणि श्रीमंत व्हावीं ह्या हेतूनें त्यांस होईल तितकें लवकर विद्याभ्यासास जुंपितात; त्यामुळें तीं क्षयी आणि अल्पायुषी होतात. ज्या मुलांस कफक्षय होण्याचा संभव असतो, त्यांची मुखचर्या वगैरे लहानपणापासूनच वेगळी असते. तिचें निरूपण पहिल्या भागांत गंडमालाप्रकरणांत केलें आहे. क्षीणत्व, मग तें कोणत्याही कारणानें आलेलें असो, क्षयरोग उत्पन्न करण्यास कारणीभूत होतें. मधुमेह, बाळंतरोग, विस्फोटिक ज्वर, विषम आणि संतत ज्वर ह्यांचे परिणामीं कफक्षय होण्याची भीति असते. श्वासनलिकादाह आणि फुप्फुसदाह वारंवार होत गेल्यानें त्यांचे परिणामीं बहुतकरून कफक्षय होतो. धूळ, लोहकण, लोंकर, कापूस वगैरेंचे तंतू श्वासमार्गांत गेल्यानें तेथें क्षोभ उद्भवून त्याचे परिणामीं कफक्षय होतो. नाडीव्रण व भगंदर यांतून होत असणारा स्राव एकाएकीं बंद केल्यानें कफक्षय वाढतो. ज्या स्त्रिया क्षीण असून त्यांची बाळंतपणांत चांगली शुश्रूषा केली जात नाहीं व ज्या बरेच दिवसपर्यंत अंगावर मूल पाजितात त्यांस क्षयरोग होण्याचा संभव असतो. वर दिलेल्या कारणांपैकीं एकदोन कारणांनींच हा रोग उद्भवतो असें नाहीं, तर दोन चार किंवा सर्वच एकमेकांस सामील होऊन उद्भवतो असें वारंवार पाहण्यांत येतें. एका प्रकारचे सूक्ष्म कीटक श्वासेंद्रियांत प्रवेश करून तेथें घरें करितात. तीं घरें एखाद्या सूक्ष्म ग्रंथीसारखीं असतात, आणि त्यांचा आकार सरासरी नाचणीच्या दाण्याएवढा असतो. या ग्रंथींचा

रंग करडा किंवा पिंवळा असतो. हे ग्रंथी सर्व फुप्फुसभर पसरतात, किंवा एकत्र जमून त्यांचा एक कणमय पिंड होतो. ह्या ग्रंथींच्या संचयास बहुतकरून फुप्फुसाचे वरचे भागीं आरंभ होतो. डावें फुप्फुस हें ग्रंथींच्या संचयास विशेष पात्र असतें, असें बऱ्याच कुशल वैद्यांचें मत आहे. हे ग्रंथी कांहीं दिवसांनीं मृदुत्व पावतात, आणि असें झालें म्हणजे सभोंवतालच्या फुफ्फुसरचनेंत दाह उत्पन्न होऊन पू होतो, आणि ग्रंथी शेजारच्या श्वासनलिकेंत फुटतो, व त्या ठिकाणीं एक खोल क्षत होतें. कधीं कधीं ग्रंथी, पंजरांतस्त्वचेंत फुटतात. असें झाल्यावर फारच लवकर घातक परिणाम होतो. कित्येक उदाहरणांत ग्रंथींचा संचय पुष्कळ आणि अतिशय त्वरेनें होतो व तो दोन्ही फुप्फुसांत सपाट्यानें पसरतो. अशा वेळीं थोड्याच दिवसांत रोग्याचा अंत होतो. थंड आणि ओलसर हवेनें ह्या रोगास उत्तेजन मिळतें. पुरुषांपेक्षां स्त्रिया ह्या रोगास विशेष पात्र असतात. तरुणवयांत ह्याची गति फार तीव्र असते. बहुधा २० पासून ३० वर्षांच्या वयांत ह्या रोगाचें बीजारोपण होतें, असें बऱ्याच वैद्यांचें मत आहे.

ह्या रोगाच्या तीन अवस्था आहेत. प्रथमावस्था, द्वितीयावस्था आणि तृतीयावस्था. प्रथमावस्थेंत वर सांगितलेल्या ग्रंथींची फुप्फुसांत व्याप्ति होते. दुसऱ्या अवस्थेंत दाह होतो आणि तिसऱ्या अवस्थेंत क्षतें पडतात.

**लक्षणें:**—प्रथमावस्थेंत खोकला येतो. तो कांहीं दिवस कोरडाच असतो. नंतर फेनयुक्त कफ पडूं लागतो. कधीं कधीं कफांतून रक्त पडतें, किंवा रक्तनिष्ठीवन होतें. म्हणजे खोकल्याबरोबर कफमिश्रित लालसर रक्ताची वांती होते आणि

हें क्षयावस्थेचें एक खात्रीलायक चिन्ह होय. खोकून खोकून गळा घोगरा होतो. गळ्यांतही थोडाबहुत क्षोभ उत्पन्न होतो व क्षुधा मंद होते.

दुसऱ्या अवस्थेंत खोकला असतोच, परंतु कफ पूयसदृश होतो व तो पाण्यांत टाकला असतां तळीं बसतो. केव्हां केव्हां उरांत दुखतें, संध्याकाळीं थंडी वाजून क्षयजन्यज्वर येऊं लागतो आणि मोठ्या रात्रीं किंवा पहाटेस पुष्कळ घाम सुटतो. नाडी क्षीण आणि जलद, एका मिनिटांत १२० पर्यंत वाहूं लागते. यत्किंचित् श्रम केल्यानें दम लागतो, छाती धडधडते, रोग्याच्या मांसबलाचा क्षय होऊं लागतो, तरी डोळे पाणीदार दिसतात. रोगी स्त्री असल्यास तिचा विटाळ बंद पडतो.

तिसऱ्या अवस्थेंत रोगी ज्यास्त क्षीण होतो. केंस गळूं लागतात, घाम फार सुटतो, अतिसार उत्पन्न होतो, तोंडाच्या पिच्छात्वचेवर क्षतें पडतात, बोटांचीं शेवटें फुगीर होतात आणि नखें आंत वळून चिरमल्यासारखीं होतात. हातापायांची आग होते, दांतांवर पांढऱ्या रंगाच्या आडव्या रेघा पडतात. हिरड्यांवरही एक तांबडी रेषा उत्पन्न होते. रोगी रागीट आणि चिरडखोर होतो व दिवसेंदिवस अधिक क्षीण होत जाऊन शेवटीं मरतो. ह्या रोगांत शेवटपर्यंत बुद्धि भ्रष्ट होत नाहीं.

उरपरीक्षेच्या संबधानें पहिल्या अवस्थेंत विशेष फेरफार झालेले आढळत नाहींत. दुसऱ्या अवस्थेंत जत्रुअस्थी* खालीं

---

* पहिल्या फांसळीच्या वरचे भागाशीं ह्मणजे मानेच्या बुंधाशीं जें आडवें हाड असतें तें. हीं हाडें दोन आहेत, त्यांस कंठाचे पुढचे बाजूला मध्यावर जो खळगा दिसतो तेथें आरंभ होऊन तीं प्रत्येक बाजूचे स्कंधापर्यंत जाऊन पोंचतात. त्यांचा स्कंधसंधीला आधार होतो.

किंवा पाठीकडे बावळ्याच्या खवाळ्याखालीं "खर खर" असा आवाज ऐकू येतो. व तेथील खणखणीतपणांतही न्यूनत्व उत्पन्न होतें. आणि जेव्हां फुप्फुसांत मोठालीं क्षतें पडतात, तेव्हां ह्मणजे तिसऱ्या अवस्थेंत, एखाद्या अरुंद तोंडाच्या भांड्यांतून फुंकर घातल्याप्रमाणें "हूं हूं हूं हूं" असा ध्वनि ऐकू येतो. ह्याखेरीज आणखीही कांहीं ध्वनि ऐकू येत असतात, परंतु ते कुशल आणि अनुभविक वैद्यांखेरीज इतरांस समजणें कठिण आहे.

**परिणाम व कालमानः**—रोगाचा फैलाव आणि शक्तिक्षीणत्व हीं ज्या मानानें वाढलीं असतील, त्याप्रमाणें रोग्याच्या मरणाचें कालमान असतें. कित्येक रोगी महिन्याचे आंतच मरतात. कांहीं कित्येक वर्षेंपर्यंत खोकत असतात. कितीएक बरे झाल्यासारखे दिसतात, शरीरानेंही पुष्ट होतात, आणि कांहीं दिवसांनीं पुन्हां क्षयाचीं लक्षणें उद्भवून त्यांचा अंत होतो.

**उपचारः**—ज्या कारणांनीं कफक्षय उद्भवतो किंवा ज्या कारणांनीं त्यास उत्तेजन मिळतें, तीं कारणें जितकीं टाळतां येतील तितकीं टाळावीं. ताप आणि खोकला यांजकरितां विलंबी श्वासनलिकादाहांत सांगितलेले उपाय योजावे. फुप्फुसदाहाचीं लक्षणें असल्यास त्या प्रकरणीं सांगितलेले उपाय योजावे. घशांत क्षोभ उत्पन्न झाला असल्यास घशास ट्यानेट ऑफ ग्लिसरीन लावावें; आणि क्लोरेट ऑफ पोट्याश ५ ग्रेन, साखरेचा पाक अर्ध तोळा, पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा 'घसा दुखणें' ह्या प्रकरणांत सांगितलेले उपाय योजावे.' रक्तनिष्ठीवन (Hæmoptysis)

होऊं लागलें तर रोग्यानें स्वस्थ उताणें निजून असावें. आणि लिक्विड एक्स्ट्रॅक्ट ऑफ अरगट २० मि, पाणी १ औंस असें मिश्रण दर तीन तासांनीं ( मिळाल्यास ह्यांत थोडें बर्फ घालून ) घ्यावें. किंवा ग्यालिक ॲसिड ५ ग्रेन, डायल्यूट सलफ्यूरिक आसिड १० मि., टिंक्चर डिजिटेलीस ५ मि., साखरेचा पाक, १ ड्राम, पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा डाळिंबाच्या सालीची भुकणी १ मासा, हिरादखण १ मासा, बाभळीचा गोंद ४ गुंजा, अफू पाव गुंज अशीं एकत्र करून तीं मोरआवळ्यांत किंवा गुलकंदांत मिश्र करून दिवसांतून तीन वेळां खावी. फुप्फुसाच्या शेंड्यांकडे ब्लिस्टरें मारावीं, किंवा आयओडीन पेंट लावावें. ज्वर नसल्यास कॉडलिव्हर ऑईल द्यावें. कॉडलिव्हर आईल पुढें दिलेल्या रीतीनें तयार करून द्यावें ह्मणजे बरें पडतें. कॉडलिव्हर ऑईल २ ड्राम, गोंदाची भुकणी २० ग्रेन, साखर १ ड्राम, दालचिनीची भुकणी ५ ग्रेन, किंवा दालचिनीचा अर्क २ थेंब, पाणी १ औंस असें मिश्रण प्रत्येक जेवणानंतर घ्यावें. किंवा कॉडलिव्हर ऑईल २ ड्राम, टिंक्चर आयओडीन १० मि., फास्फेट ऑफ आयर्न ३ ग्रेन, साखरेचा पाक २ ड्राम, पाणी अर्धा औंस असें मिश्रण घ्यावें. किंवा मालटाईन काडलिव्हर आईल, ग्रिमाल्ट्स सिरप ऑफ धी हैपोफास्फेट ऑफ लाईम घ्यावें. क्षुधा बिघडली असल्यास प्यांक्रिआटिक इमल्शन घ्यावें. काडलिव्हर आईलपासून वांती होऊं लागल्यास तें पिण्याचे ऐवजीं अंगास चोळून जिरवावें. भुईमुग, बदाम आणि खोबरें यांचे ताजे तेलांत काडलिव्हर आईलप्रमाणेंच गुण आहेत, व तीं काडलिव्हर आई-

लच्या ऐवजीं क्षयांत वापरावीं, असें कित्येक कुशल वैद्यांचें मत आहे. शिवाय आरसनेट ऑफ आयर्न १ ग्रेन, एक्स्ट्राक्ट ऑफ जेनशियन ८ ग्रेन हीं औषधें एकत्र घोटून त्याच्या ३२ गोळ्या कराव्या, आणि प्रत्येक चार किंवा सहा तासांनीं १ गोळी पाण्याच्या किंवा दुधाच्या घोटाबरोबर घ्यावी. थंडी भरून ताप येऊं लागतो तेव्हां ताप भरण्यापूर्वीं ६ ग्रेन क्किनाईन द्यावें (पृष्ठ ९ भाग प. पहा). घाम फार सुटूं लागल्यास टिंक्चर बेलाडोना ५ मि., पाणी १ औंस असें मिश्रण दर तीन तासांनीं घ्यावें किंवा असिड सलफ्यूरिक अरोम्याटिक १० मि., लिकर मारफिया असिटेटिस १० मि., पाणी १ औंस सकाळीं संध्याकाळीं द्यावें. शक्तिक्षीणतेसाठीं ब्रांडीमिक्श्चर (यादी नं. १ भाग प.) किंवा द्राक्षारिष्ट दुधांत मिश्रण करून घ्यावें. अतिसार उत्पन्न झाला असल्यास डोव्हर्स पावडर ५ ग्रेन, कारबोनेट ऑफ बिसमथ १० ग्रेन, पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा आसिड ग्यालिक १८ ग्रेन, अफू १ ग्रेन, एक्स्टॅक्ट ऑफ जेनशियन ६ ग्रेन, हीं सर्व एकत्र घोटून त्याच्या ६ गोळ्या कराव्या, आणि प्रत्येक तीन तासांनीं १ गोळी पाण्याच्या घोटाबरोबर गिळावी.

दुर्गंधयुक्त कफ पडूं लागल्यास क्रियासोट ५ थेंब, टरपेंटाईन १० थेंब, अशीं एका अरुंद तोंडाच्या भांड्यांत घालून त्यांत आधणाचें पाणी घालावें; नंतर त्याजवर एक विरविरीत आणि स्वच्छ अशा फडक्याचा दादरा बांधून जी वाफ निघेल ती श्वासानें ओढावी किंवा **कॉगहील्स** ॲन्टीसेप्टिक इनहेलरचा उपयोग करावा. मराठी वैद्यकांतील उप-

चार, सुवर्णमालिनी वसंत घ्यावा (यादी नं. ३२). अभ्रकभस्म (ज्याला शंभरावर पुटें मिळालीं असतील असा) घ्यावें. प्रवाळभस्म घ्यावें (यादी नं. ३३). शिवायः—

**सितोपला चूर्णः**—ह्मणजे खडीसाखर १६ भाग, वंशलोचन ८ भाग, पिंपळी ४ भाग, वेलची २ भाग, दालचिनी १ भाग, हीं सारीं औषधें कुटून चूर्ण करून ठेवावें. ह्यापैकीं ३ मासे चूर्ण मध व तूप ह्यांत मिश्र करून घेतलें असतां श्वास, कास, क्षय, व हातापायांचा दाह होतो तो, अग्निमांद्य व जीभ शून्य पडते ती, पाठीचा शूल, अवढणें, हाडीज्वर, मस्तकादिकांत रक्तविकार होतो तो व पित्तविकार हे रोग दूर होतात.

**लवंगादि चूर्णः**—ह्मणजे लवंगा, भीमसेनीकापूर, वेलची, दालचिनी, नागकेशर, जायफळ, वाळा, सुंठ, निळें कमळ, जटामांसी, पिंपळी, कृष्णागर, तगर, पांढरा चंदन, नेत्रवाळा, शहाजिरें, कंकोळ, वंशलोचन, हीं १८ औषधें समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें आणि त्याचे निम्यानें त्यांत साखर मिळवावी. ह्यापैकीं २–४ मासे चूर्ण मध आणि खडीसाखर ह्यांत मिश्रण करून घेतलें असतां अग्नि प्रदीप्त होतो, तोंडास रुचि येते, वात, पित्त, कफ यांचा प्रकोप दूर होतो, शक्ति येते, हृद्रोग, कंठरोग, कास, उचकी, पडसें, क्षय, अतिसार, उरांत क्षतरोग होतो तो आणि परमा, संग्रहणी हे रोग देखील ह्या चूर्णानें दूर होतात.

**पथ्यः**—अन्न पौष्टिक, उत्तेजक व पचनीय असें असावें, स्वच्छ आणि कोरड्या हवेवर राहण्यास जावें, तळमजल्यावर राहूं नये, मोकळ्या हवेवर किंवा समुद्रकिनारीं फिरावयास

जावें, सवड असल्यास समुद्रस्नान करावें, तें न सोसल्यास उष्ण पाण्यानें स्नान करावें, स्नानानंतर अंग कोरडें करून अंगांत ऊर्णावस्त्र घालावें, वस्त्रें घामानें बिघडतांच बदलावीं, निजण्याची खोलीही मोठी, मोकळी व हवाशीर असावी व गारवा असल्यास खोलींत ऊब येईपर्यंत शेगडी ठेवावी.

---

## दमा.

ASTHMA.

कोणत्याही कारणानें फुप्फुसांतील बारीक श्वासनलिकांच्या स्नायुमय तंतूंचा उद्वेष्टनजन्य संकोच झाल्यामुळें फुप्फुसांतील अशुद्ध हवा बाहेर पडण्यास व बाहेरील शुद्ध हवा आंत जाण्यास प्रतिबंध होऊन श्वासोच्छ्वास करण्यास मोठी अडचण पडते, यामुळें दमा लागतो.

**कारणें**:—दमा हा बहुतकरून थंड आणि सर्द हवेच्या योगानें, किंवा हवेंत एकाएकीं फेरफार झाल्यानें उत्पन्न होतो. कित्येक उग्र पदार्थ ह्मणजे नवीन वाळलेलें गवत, इपिक्याकुआन्हा, मोहरी वगैरे पदार्थांचा वास घेतल्यानेंही कित्येकांस दमा उत्पन्न होतो. अपरिमित आहार केल्यानें किंवा लोणचीं, भजीं, वगैरे तेलकट, तिखट पदार्थ अतिशय खाण्यांत आल्यानें दमा उत्पन्न होतो. गर्भाशयोमान्द किंवा स्त्रियांचा अमानुष रोग ह्मणजे ज्याला इंग्रजींत "हिस्टिरिया" असें ह्मणतात तो झाल्यानेंही कधीं कधीं दमा उत्पन्न होतो. कोणत्याही कारणांनीं क्षीणता उत्पन्न झाली अथवा फुफ्फुस आणि पक्वाशय यांस व्यापणाऱ्या ज्ञानतंतूंचा क्षोभ झाला तरीही दमा उत्पन्न होतो. कित्येकांना दम्याची व्यथा वंशपरंपरेनें असते.

हा बहुतकरून मध्यवयस्क मनुष्यांस झालेला पाहण्यांत येतो, आणि स्त्रियांपेक्षां पुरुषांस फारकरून होतो. लहान मुलांस विरळा होतो. मनास एकाएकीं एखादा धक्का पोहोंचल्यानें दमा उत्पन्न होण्याचा संभव असतो. ह्यांखेरीज हृद्विकारांत, श्वासनलिकेच्या तीव्र दाहांत, फुप्फुसाचे अनेक रोगांत, फुप्फुसांत रक्तसंचय झाला असतां, दमा उत्पन्न होतो. धमनीचे आवाळूचा श्वासमार्गावर दाब पडला असतांही दमा उत्पन्न होतो.

लक्षणें:—दम्याच्या आरंभींचीं लक्षणें ह्मटलीं ह्मणजे तीं कांहीं दिवसांपूर्वी किंवा कांहीं तासांपूर्वी होऊं लागतात. प्रथम सर्दी झाल्यासारखें होतें, थकवा येतो, सुस्ती येते, डोकें दुखूं लागतें, पोटाला फुगवटी धरते, मळ साफ होत नाहीं आणि उराचा खालचा भाग आंवळल्यासारखा भासतो. दम्याचा वेग बहुतकरून मध्यरात्रीं एकाएकीं उत्पन्न होऊन रोग्याची झोंप मोडते. रोग्यास चैन पडत नाहीं, ह्मणून तो उठून बसतो. वारा पुष्कळ असला तरी त्याला वारा नाहींसा वाटून खिडकीजवळ अगर दरवाज्याजवळ येऊन तो उभा राहतो. प्रत्येक श्वासास खांदे वर करून डोकें मागें करितो, तोंड उघडें ठेवून धापा टाकितो. श्वासोच्छ्वास घेण्यास त्यास इतके आयास पडतात कीं, तो अगदीं घामाघूम होतो. घसा घरघर वाजतो, नाडी क्षीण होते, मुखचर्या म्लान, फिकट आणि चिंतातुर होते, अंग गार आणि चिकाचिकीत होतें, डोळे ताठ, व वटारल्यासारखे दिसतात. दम्याचा वेग कित्येक तासपर्यंत राहून शेवटीं फारच खोकला येऊन कफ पडतो, तेणेंकरून रोग्यास बरें वाटतें, आणि हळूहळू श्वासाचीं सर्व

लक्षणें कमी कमी होत जाऊन २४ तासांनीं नाहींशीं होतात. तरी पुन्हां दम्याचा वेग येण्याचा संभव असतो.

उपचारः—दम्याचा झटका येण्यापूर्वी चांगली कढविलेली काफी ऊन आहे तोंच दूधसाखर घातल्याशिवाय प्यावयास द्यावी ह्मणजे दम्याचा जोर मोडतो. कारण दूर करण्यासारखें असल्यास करावें. जर वावडें वगैरे खाल्लें असेल किंवा पोट फुगलें असेल तर इपिक्याकुआन्हा पौडर २० पासून २५ ग्रेन, कोंबट पाण्यात मिश्र करून प्यावयास द्यावी; किंवा मोहरीची पूड अथवा मीठ १ तोळा, कोंबट पाण्यांत मिश्र करून प्यावयास द्यावी, ह्मणजे उलटी होऊन कफ वगैरे पडून दम्याचा जोर कमी होतो. न झाल्यास उलटी येईतोंपर्यंत आणखी ऊन पाणी प्यावयास द्यावें. मलावरोध असल्यास जुलाब द्यावा ( यादी नं. ३ भा. प. ). ह्या उपायांनीं दम कमी न झाल्यास रोग्यानें खुर्चीवर बसावें आणि पुढें टेकण्यासाठीं योग्य उंचीचें बाक अगर मेज द्यावें आणि २ पासून ३ ड्रामपर्यंत सलफ्यूरिक इथर अथवा ३ पासून ४ थेंब इतकें नैट्रैट ऑफ अमैल रुमालावर शिंपून तें गुंगी येईतोंपर्यंत हुंगावें; किंवा काळ्या धोतऱ्याच्या पानाची किंवा तंबाकूची विडी करून ओढावी ह्मणजे सुख वाटतें. विडी ओढण्याची संवय नसल्यास आधणाच्या पाण्यांत धोतऱ्याचीं पानें टाकून वाफ श्वासावाटे ओढावी. किंवा १ तोळा पाण्यांत सूर्याखार ( पोट्याशनैट्रस ) जितका विरघळेल तितका विरघळवून नंतर त्यांत ब्राऊनपेपर ( जाड कागद ) भिजवून वाळवावा आणि तो विस्तवावर जाळून त्याचा धूर ओढावा. छातीवर टरपेन्टाईन तेल चोळावें. नंतर त्यावर अळशीच्या

पोटिसाचा शेक करावा किंवा छातीवर राईचा लेप मारावा. शिवाय स्पिरिट क्लोरोफार्म १० मि., स्पिरिट इथर १० मि., टिंक्चर लोबोलिया इथिरियेलीस ५ मि., टिंक्चर स्ट्रामोनिया १० मि., कापराचें पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून चार वेळ घ्यावें. किंवा टिंक्चर संबूल १० मि., स्पिरिट अमोनिया आरोम्याटिक १० मि., स्पिरिट क्लोरोफार्म १० मि, अमोनिया आयोडाईड ५ ग्रेन, डिकॉकशन ऑफ सेनीगारूट्स् १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा क्लोरोडाईन १० मि., कार्बोनेट ऑफ् अमोनिया ३ ग्रेन, व्हैनम इपिक्याकुआन्हा १० मि., आक्सीमेल सिल्ली १० मि., डिकॉकशन ऑफ सेनीगारूट १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा सुंठ १ तोळा, काळीं मिरें १ तोळा, ओंवा १ तोळा, या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांत कस्तुरी $\frac{1}{4}$ तोळा घालून सर्वांचा मधांत खल करावा आणि दोन गुंजा वजनाच्या गोळ्या करून एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर दिवसांतून तीन वेळां घ्यावी. किंवा अक्कलकाढा १ तोळा, ज्येष्टीमध १ तोळा, यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्याच्या मधांत वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्या आणि दर चार तासांनीं एक एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर गिळावी. किंवा काकडशिंगी १ तोळा, कायफळाची साल १ तोळा, मनुका १ तोळा हीं सर्व एकत्र कुटून त्यापैकीं अर्धा तोळा औषध मधांत मिळवून दिवसांतून तीन वेळां खावें. किंवा भुइरिंगिणीचीं मुळें २ तोळे, अडुळशाचा पाला २ तोळे, सुंठ १ तोळा, पिंपळमूळ १ तोळा, ज्येष्टीमध १ तोळा, आधणाचें पाणी १८ तोळे, यांचा काढा करून तो निम्मे

उरल्यावर गाळून त्यापैकीं दर वेळेस १॥ तोळा काढा थोडासा मध घालून दिवसांतून तीन वेळां घ्यावा. किंवा लवंगा १ तोळा, दालचिनी १ तोळा, पिंपळी १ तोळा, ओंवा १ तोळा, कापूर १ तोळा, अफीण पाव तोळा, ज्येष्टीमध १ तोळा, गोंद अर्धा तोळा यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून मधांत वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्या, आणि प्रत्येक चार तासांनीं एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर गिळावी. रोग्यानें आपले अंगांत नेहमीं फलाणीची बंडी ठेवावी. सर्दीला फार जपावें, मोकळ्या आणि कोरड्या हवेंत रहावयास जावें, घराच्या तळमजल्यांत राहूं नये व दम्याचा वेग गेल्यावर लोह वगैरे पौष्टिक औषधें घ्यावीं म्हणजे दम्याची व्यथा बहुधा होणार नाहीं.

---

## डांग्या खोकला.

### WHOOPING COUGH.

हा विकार बहुतकरून लहान मुलांस, तीं वाढीस लागल्यापासून ६--७ वर्षांचीं होत तोंपर्यंत केव्हांतरी एकदां होतो. डांग्या खोकल्याची सांथ येते व ती संसर्गानें पसरत जाते. हा बरा होण्यास बहुतकरून तीन महिने लागतात.

**लक्षणें:**—आरंभीं पडसें येतें, नंतर थोडासा ताप येऊन खोकला उत्पन्न होतो. पुढें १०–१२ दिवसांनीं ताप नाहींसा होऊन खोकला वाढत जातो व त्याचें लक्षण बदलतें. दिवसांतून तीन चार वेळां किंवा दर तीन अथवा चार तासांनीं खोकल्याची उमळ येते. ती अर्ध पळपासून तीन चार पळें राहते. नंतर थोडासा चिकट कफ पडतो अथवा वांति होते. उमळ गेल्यावर मूल नेहमींप्रमाणें खेळूं लागतें

व निरोगी आहेसें दिसतें. उमळ आली ह्मणजे मूल अगदीं गुदमरून एक मोठा श्वास घेतें, त्याबरोबर "हूप" असा किंवा कोंबड्याच्या सकंप स्वरासारखा चमत्कारिक आवाज होतो. त्या वेळीं मुलाचें तोंड व डोळे लाल होतात, डोळ्याचीं पोटें फुगतात व कधीं कधीं नाकांतून रक्त वाहतें. खोकल्याच्या उमळीचा रात्रीं जोर फार होतो. मूल अशक्त असल्यास त्यास उमळ आल्याबरोबर तिच्या नेटानें त्याचा मलमूत्रोत्सर्ग हातो. ह्या रोगाचें असें उग्र स्वरूप सुमारें २०–२२ दिवस असतें. नंतर रोगाचीं लक्षणें हळूहळू कमी होत जातात व मूल बरें होऊं लागतें. किंवा कधीं कधीं ह्या विकारांत दुसरे कांहीं विकार ह्मणजे फुप्फुसदाह, आंकडी इत्यादि सामील होऊन खोकल्याच्या उमळी वारंवार येऊं लागतात, तेव्हां मात्र भयंकर परिणाम होण्याचा संभव असतो.

**उपचारः**—मुलांस सर्द जाग्यांतून काढून मोकळ्या व कोरड्या जागेंत न्यावें. सोय असल्यास समुद्रकिनारीं राहण्यास जावें. मुलांचे अंगांत स्वच्छ आणि ऊबदार वस्त्रें घालावीं. आंबट, थंड, तेलकट असें अन्न देऊं नये. मूल अंगावर पीत असल्यास त्याचे आईनेंही पथ्यानें वागलें पाहिजे. मुलाचे छातीस व पाठीवर टरपेंटाईनचा शेक द्यावा ( यादी नं. ३० ). शेकणें झाल्यावर छाती कोरडी करून अंगांत गरम कपडे घालावे. शेक दिवसांतून दोन वेळां करावा. दोन्ही वेळां छातीस पुढचे अंगींच शेकूं नये. एक वेळां पाठीकडेसही शेक द्यावा. किंवा छातीवर दोन चार मिनिटेंपर्यंत मोहरीचा लेप द्यावा. किंवा कांपाउन्ड लिनिमेन्ट ऑफ़ कपांफर चोळावें. हा रोग बहुतकरून बाल्यावस्थेंत

होतो म्हणून औषधाचें प्रमाणही त्या मानानेंच १-२ वर्षांचे वयास पुरणारें असें दिलें आहे. मलशुद्धि होण्याकरितां सुरवारी हर्डा पाण्यांत उगाळून त्यांत मध किंवा साखर घालून एक वर्षाचे आंतील मुलास २-४ गुंजांपर्यंत दर दोन तासांनीं मलशुद्धि होईतोंपर्यंत द्यावा. किंवा जालप पावडर ३ ग्रेन मधांतून चाटवावी. नंतर कफ सुटण्याकरितां उलटीचीं किंवा कफ पाडणारीं औषधें द्यावीं, ह्मणजे डांग्या खोकल्याचा बराच जोर कमी होईल. इपिक्याकुआन्हा पावडरचे ५ ग्रेन एक चमचाभर कोंबट पाण्यांत मिश्र करून पाजावे. किंवा नागदवणीचा रस संधेची अर्ध पळीपासून सबंद १ पळीपर्यंत थोडा गूळ घालून पाजावा. किंवा १-२ गुंजांपर्यंत सतफळ किंवा समुद्रफळ पाण्यांत उगाळून पाजावें, ह्मणजे उलटी होऊन कफ पडतो. नंतर उमळीसाठीं पोट्याश ब्रोमाईड २ ग्रेन, टिंक्चर बेलाडोना २ मि., स्पिरिट क्लोरोफॉर्म २ मि., आक्सीमेल सिल्ली १० मि., पाणी १ ड्राम असें मिश्रण दिवसांतून तीन चार वेळां द्यावें. किंवा क्लोटन क्लोरल १ ग्रेन, टिंक्चर सिंकोना ५ मि., सिरप टोलुटेनम २० मि., पोट्याश क्लोरस २ ग्रेन, टिंक्चर बेलाडोना १ मि., पाणी १ ड्राम असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा नुसतें आक्सिमेल सिल्ली हें औषध प्रत्येक तीन किंवा चार तासांनीं ३० थेंबपर्यंत पाजावें. किंवा हरडा १ तोळा, बेहडा १ तोळा, ज्येष्ठीमध २ तोळे, पाणी १६ तोळे ह्यांचा काढा करून तो ४ तोळे शिल्लक राहिला ह्मणजे गाळून त्यांत एक तोळा खडीसाखर घालावी आणि त्यापैकीं संधेच्या पळीभर औषध दिवसांतून तीन चार वेळां पाजावें, किंवा

नुसताच खडीसारखेचा पाक थोडथोडा दिवसांतून तीन चार वेळां पाजावा. ताप येत असल्यास वारंवार पातीचा थोडा चहा पाजावा. किंवा लिकर अमोनिया आसिटेटिस २ ड्राम, स्वीट स्पिरिट ऑफ् नैटर १६ मि., व्हैनम इपिक्याकुआन्हा ४० मि., आक्सीमेल सिल्ली १६० मि., क्यांफर वाटर १ औंस या मिश्रणाचे ८ भाग करून दर दोन किंवा तीन तासांनीं १ पाजावा. किंवा साजूक तूप संधेची पळी भरून दिवसांतून दोन तीन वेळां पाजावें. किंवा कळकीच्या पाल्याचा काढा १ तोळा, टाकणखाराची लाही २ गुंजा, हळदीचें चूर्ण ३ गुंजा, आणि मध संधेची एक पळी अशीं दर वेळेस काढ्यांत घालून ह्याप्रमाणें दिवसांतून तीन वेळां द्यावें. कोणत्याच उपायानें फायदा न वाटल्यास कानाच्या आणि खालच्या जाभाडाचा कोन ह्यांच्या दरम्यान ब्लिस्तर लावावें. किंवा राईचा लेप लावून फोड आणावा. खोकला व ताप गेल्यानंतर मालटाईन काडलिव्हर आईल द्यावें. किंवा प्रवाळ, वसंत अथवा मंडूर हीं द्यावीं.

---

# मूत्रपिंडरोग.

## KIDNEY DISEASES

मूत्रपिंड रोगासंबंधीं लिहितांना प्रथम मूत्रपिंड आणि त्यांच्या क्रिया यांविषयीं थोडी माहिती वाचकांस करून देणें आवश्यक आहे.

**मूत्रपिंडः**—हे काजूच्या आकाराचे असून ते उदराच्या मागच्या भागीं कटिप्रदेशीं पाठीच्या शेवटच्या व कमरेच्या वरच्या मणक्याच्या मध्यावर दोन बाजूंस दोन असतात.

उजव्या मूत्रपिंडाच्या वरच्या अंगास यकृत असतें आणि डाव्या मूत्रपिंडाचे वरच्या अंगास प्लीहा असते. हें इंद्रिय एक इंच जाडीचें असून चारपासून साडेचार इंच लांब व दोन इंच रुंद असतें. प्रत्येक मूत्रपिंडाचें वजन चारपासून सहा औंस असतें. डावा मूत्रपिंड उजव्यापेक्षां किंचित् चिंचोळा व लांब असतो, आणि तो उजव्यापेक्षां किंचित् वर असतो. मूत्रपिंडासभोंवतीं वसा (चरबी) असते.

मूत्रपिंडाच्या योगानें शरीरांत ज्याचा उपयोग संपला असतो अशा नैट्रोजन, फॉस्फरस, गंधक, चुना आणि म्याग्नीशिया ह्या द्रव्यांचे, तसेंच अन्नांतील अथवा शरीरांतील उत्पन्न झालेले द्राव्यक्षार, व पाणी उत्सृष्ट होतात (रक्तापासून वेगळीं होतात.) ह्या उत्सृष्ट पदार्थास आपण मूत्र असें ह्मणतों, आणि ह्यावरूनच त्याच्या उत्सर्जक इंद्रियास मूत्रपिंड असें ह्मटलें आहे.

निरोगी मूत्र हें विसर्जन झाल्याबरोबर बहुधा स्वच्छ, गंधहीन आणि फिक्कट पिंवळ्या रंगाचें असतें. ह्यावेळीं त्यांत किंचित् आसिडधर्म* (आम्ल) असतात. हें त्यांत ब्ल्यू लिटमस पेपरचा ( एक जातीचा निळसर कागद ) तुकडा बुडविल्यानें तो कागद तांबूस होतो, त्यावरून कळतें. मूत्र होऊन बराच वेळ गेला ह्मणजे तें गढूळ होऊन त्यास उग्र व तिखट ह्मणजे नवसागर आणि चुना ह्यांच्या मिश्रणाचा वास येतो आाणि त्यांतले आम्लधर्म नाहींतसे होतात.

---

* एतद्देशीय वैद्य तैलबिंदु मूत्रांत सोडतात त्यावरून देखील मूत्र आम्ल किंवा आम्लप्रतियोगी ( अलकलाईन ) आहे हें कळतें तें असें कीं मूत्रांत तैलबिंदु सोडला असतां मूत्र आम्ल असल्यास तैलबिंदु पसरत नाहीं व आम्लप्रतियोगी असल्यास पसरतो.

स्वभावतः प्रौढवयांत प्रत्येक दिवशीं ४०-५० औंस इतकें मूत्र वित्सृष्ट होतें आणि त्याचें विशिष्टगुरुत्व १०१२ पासून १०२२ इतकें असतें. स्त्रियांच्या मूत्राचें विशिष्टगुरुत्व पुरुषांपेक्षां कमी असतें आणि बालकांच्या मूत्राचें तर त्याच्यापेक्षांही कमी असतें.

विशिष्टगुरुत्व काढण्यासाठीं विलायती औषधें विकणारांचे दुकानीं युरिनामीटर ( मूत्रमापकयंत्र ) व ग्रॅज्युएटेड ग्लास (मूत्रमापक नळी) हीं मिळतात, तीं घेऊन ग्लासांत ताजें मूत्र भरावें. नंतर त्यांत हळूच युरिनामीटर सोडावा. ह्मणजे मूत्राचें जेवढें विशिष्टगुरुत्व असेल तेवढ्या अंशावर युरिनामीटर तरंगेल. शिवाय मूत्रपरीक्षेच्या नियमांप्रमाणें हवेंतील उष्णमान कमी किंवा ज्यास्त असेल त्याप्रमाणें काढलेल्या विशिष्टगुरुत्वांत न्यूनाधिक्य करावें लागतें. आपल्या देशांत बहुतेक ठिकाणीं हवेचें उष्णमान सुमारें ८०° असतें म्हणून अशा उष्णमानाच्या ठिकाणीं मूत्राचें जें विशिष्टगुरुत्व निघेल त्यांत २° मिळवावें ह्मणजे बरोबर विशिष्टगुरुत्व निघेल.

युरिनामीटरवर शून्यांशापासून ह्मणजे १ हजार अंशापासून १०६० अंशांपर्यंत दहा दहा अंकांच्या अंतरानें आंकडे मांडलेले असतात. शिवाय मध्यें प्रत्येक चालू अंकाबद्दल एक आडवी रेघ मारलेली असते.

मूत्रपरीक्षेसाठीं जें मूत्र ठेवावयाचें तें एखाद्या स्वच्छ कांचेच्या पात्रांत झांकून ठेविलें पाहिजे. आणि परीक्षा करण्याकरितां सकाळीं उठतांच जें मूत्र होतें तें ठेवावें.

स्वास्थ्यांत आपल्या आहारांतील द्रवपदार्थांचें प्रमाण वाढविल्यानें मूत्रांतील द्रवपदार्थांचें प्रमाण वाढून त्याचें विशिष्ट-

गुरुत्व कमी होतें, आणि द्रवपदार्थ कमी पिण्यांत आल्यानें मूत्राचें विशिष्टगुरुत्व वाढतें.

अंगमेहनतीनें आणि उन्हाळ्याचे दिवसांत चर्माची उत्सर्जक क्रिया विशेष वाढते, तेव्हां मूत्राचें प्रमाण कमी असून विशिष्टगुरुत्व ज्यास्ती असतें. हिंवाळ्यांत ह्याच्या उलट प्रकार होतो, हें उन्हाळ्याचे दिवसांत अंगांतून बराच घाम निघतो आणि हिंवाळ्यांत कमी असतो त्यावरून स्पष्ट होतें.

निरोगी मूत्राचें पृथक्करण करून पाहिलें असतां त्याच्या एक हजारांशांत खालीं दिल्याप्रमाणें द्रव्य आणि घनपदार्थांचीं प्रमाणें असतातः—

| | | |
|---|---|---|
| पाणी .... .... .... .... | सुमारें | ९६७ |
| युरियानामक क्षार .... .... | ,, | १४ |
| युरिक आसिड ( आम्लक्षार ) | ,, | १ |
| इतर क्षार .... .... .... | ,, | १० |
| रंगविशिष्ट द्रव्यें, पिच्छिलत्वचा, प्राणिज निष्कर्षित द्रव्यें मिळून | | ८ |
| | एकंदर | १००० अंश होतात. |

आपण आतां मूत्रपिंडरोग—सामान्यतः नाळगुद ह्या नांवानें ओळखला जाणारा रोग—ज्याला इंग्रजी वैद्यकांत ब्राईट्स डिसीज असें ह्मणतात—त्याचा येथें विचार करूं. ह्या रोगाचे आशुकारी अथवा तीव्र आणि विलंबी अथवा मंद असे दोन प्रकार आहेत.

---

# आशुकारी मूत्रपिंडरोग.

## ACUTE BRIGHT'S DISEASE.

ह्या प्रकारांत मूत्रपिंडांच्या स्थितींत पालट होऊन सूक्ष्म मूत्रवाहिन्यांत दाह उत्पन्न होतो.

**कारणें:**—शैत्य, लोहितांगज्वर (Scarlet fever) आणि अति मद्यपान ह्यांपासून हा रोग होतो; शिवाय पटकीच्या वर्धमान अवस्थेंत, गरोदर स्थितींत, आणि कर्दमोत्थविषाच्या संसर्गानंतर हा रोग होण्याचा संभव असतो.

**लक्षणें:**—ह्या रोगाचे बहुतेक उदाहरणांत प्रथम थंडी वाजून ताप भरतो, मस्तक दुखूं लागतें, शोष पडतो, त्वचा शुष्क होते, नाडी जलद वाहूं लागते, आणि कंबरेंत वेदना होऊन कधीं कधीं उह्मासे व वांत्या होऊं लागतात. सर्वांगास जलशोथ (सूज) होतो. हा शोथ प्रथम तोंडावर येऊन नंतर सर्व शरीरभर पसरतो. पापण्यांचीं पोटें सुजतात, शौचास साफ होत नाहीं, मूत्र अल्प असतें, लघवीच्या वेळीं वेदना होते आणि मूत्रांत रक्त मिश्र झाल्याकारणानें त्याचा रंग काळसर, लाल किंवा धूम्रवर्णाचा असतो. त्यांत अलब्यूमेन (हा पदार्थ कोंबडीच्या अंड्यांत जो एक पांढऱ्या रंगाचा पातळ पारदर्शक पदार्थ असतो त्यासारखा असतो) आणि मूत्रनलिकांच्या त्वचेचे तुकडे असतात. शिवाय युरटेनामक क्षाराचें प्रमाणही बरेंच वाढलेलें असतें. मूत्राचें विशिष्टगुरुत्वही वाढतें आणि त्यांत आम्लता असते. मूत्रांतील ह्या सर्व गुणघटकांची परीक्षा करावयाची ह्मटली ह्मणजे वरील लक्षणांनीं युक्त मूत्र स्वच्छ कुपींत भरून तें

एखाद्या कुशल वैद्याकडे नेऊन तपासवावें ह्मणजे तो वैद्य त्याची यथाशास्त्र रसायनिक रीतीनें व सूक्ष्मदर्शकानें परीक्षा करून रोगाचें खात्रीलायक निदान करून देईल. कारण, मूत्रपरीक्षेच्या संबंधानें येथें सविस्तर हकीकत लिहावयाची ह्मटली ह्मणजे मूत्रपरीक्षेच्याच संबंधानें हा सर्व ग्रंथ भरेल; एवढ्याकरितां जागोजाग मूत्रपरीक्षेची थोडथोडी संक्षेपांत माहिती दिली आहे.

मूत्रांतील अलब्यूमेन पहाणें झाल्यास सुमारें संधेच्या एक दोन पळ्या ( टी स्पून्स् ) मूत्र घेऊन तें एका कांचेच्या नळींत ( टेस्ट टयूब ) भरून ती नळी मद्यार्काच्या दिव्यावर तापवावी, ह्मणजे मूत्र किंचित् पांढरवट रंगाचें होतें. त्यांत नैट्रिक आसिडाचे एक दोन थेंब घालावे ह्मणजे मूत्रांत अलब्यूमेन असल्यास तें घन होऊन तळीं बसतें.

**गतिः**—बहुतकरून रोगी बरा होतो, आणिं बरा होऊं लागला ह्मणजे ज्वर नाहींसा होतो. मूत्राचें प्रमाण वाढतें, व त्यांतील अलब्यूमेन वगैरे गाळ कमी होतात, हें सूक्ष्मदर्शकानें पाहिलें असतां खात्रीनें समजतें. मूत्रास त्याची स्वाभाविकस्थिति प्राप्त होते, अंगावरची सूज नाहींशी होते, आणि रोगी हळूहळू पूर्वस्थितीवर येतो, किंवा विकार विलंबी स्थिति पावतो.

वाईट परिणाम व्हावयाचा असल्यास जलशोथ तसाच कायम राहतो किंवा वाढत जातो, मूत्रांतील रक्त, अलब्यूमेन वगैरे गाळ वाढतात, रोगी दिवसेंदिवस अशक्त आणि फिकट होत जातो, शेवटीं मूत्रविसर्जन कमी कमी होत जाऊन तें बंद पडतें आणि एकाएकीं रक्त दूषित होऊन

रोगी बेशुद्ध होऊन मरतो. अथवा, नरडें, फुप्फुस किंवा हृदय ह्या ठिकाणीं जलशोथ पसरून श्वासावरोधानें मृत्यू येतो.

उपचारः—रोगी सशक्त असल्यास कंबरेवर फांसण्या टाकून तुमड्यांनीं* सुमारें ६ पासून ८ औंसपर्यंत रक्त काढावें. रोगी अशक्त असल्यास नुसत्याच तुमड्या लावाव्या किंवा कंबरेपर्यंत रोग्यास उष्ण पाण्यांत बसवावें अथवा त्याची कंबर उष्ण पाण्यानें शेकावी. पोटांत घेण्याकरितां पोट्याश आसिटस् १० ग्रे., टिंक्चर सिल्ली २० मि., स्वीट स्पिरिट ऑफ नैटर २० मि., पाणी २ औंस., असें मिश्रण दिवसांतून चार वेळां द्यावें. किंवा लिकर अमोनिया आसिटेटीस १ ड्राम, टिंक्चर ऑफ हेनब्रेन १० मि., पाणी २ औंस असें मिश्रण दिवसांतून चार वेळां द्यावें. किंवा पुनर्नवा, दारूहळद, सुंठ, बाळहरीतकी, गुळवेल, चित्रक, भारंगसाल,

* तुमडी लावणें ह्मणजे एखादी लहानशी पातळ व खोलगट अशी वाटी किंवा ग्लास घेऊन त्याचे बुडास किंचित् मद्य लावावें आणि तें, किंवा तेथें पातळसर कापूस पसरून तो पेटवावा आणि लगेच तें भांडें तुमडी लावण्याचे ठिकाणीं उपडें घालावें; किंवा तुमडी लावण्याचे ठिकाणीं एखादें लहानसे नाणें ठेवून त्यावर एक गुंजभर कापूर ठेवून तो पेटवावा. आणि लगेच त्यावर वाटी किंवा ग्लास उपडें घालावें ह्मणजे तें भांडें कातडीस आंत ओढून घेऊं लागतें. या प्रकारास शुष्क तुमडी ( ड्राय कपिंग ) असें ह्मणतात. आणि फांसण्या टाकून त्यावर तुमडी लावून रक्त ओढतात त्यास ओली तुमडी ( वेट कपिंग ) असें ह्मणतात. विलायती औषधें विकणाराचे दुकानीं तुमड्या लावण्याचीं यंत्रें मिळतात, त्यांस "कपिंग इनस्टृमेंट्स" असें ह्मणतात. आपल्या देशांत तुमड्या लावण्याचें काम बहुधा न्हावी लोक किंवा नाकाडोळ्यांचे वैद्य करितात. ते वस्तऱ्यानें फांसण्या टाकून शिंगानें रक्त ओढून घेतात. तुमडी दाहयुक्त भागाच्या बाजूस लावावी ह्मणजे वेदना होणार नाहींत.

देवदार हीं सर्व औषधें अर्धातोळा प्रमाणानें घेऊन किंचित् ठेंचून त्यांचा ६४ तोळे पाण्यांत काढा करावा. काढा अष्टमांश उरला ह्मणजे तो गाळून प्यावयास द्यावा. संध्याकाळीं पुन्हां त्यांतच पाणी घालून निकाढा करून द्यावा. किंवा बाळहिरडे, धमासा, बाहव्याचे शेंगेतला मगज, गोंखरू, लकड्यापाषाणभेद, पुनर्नवा हीं सर्व औषधें अर्धतोळा प्रमाणानें घेऊन त्यांचा वरल्याप्रमाणेंच काढा निकाढा करून द्यावा. किंवा पुनर्नवा, बाळहिरडे, दारुहळद, कडुनिंब, कटुकी, पटोळ, गरूळ, सुंठ हीं सर्व औषधें अर्धतोळा प्रमाणानें घेऊन त्यांचा वरल्याप्रमाणेंच काढा निकाढा करून द्यावा. (कित्येक वैद्य ह्यांत गोमूत्र मिश्र करून देतात, तेणेंकरून विशेष फायदा होतो.) वरील उपायांनीं शौचास साफ न होईल तर रेचक द्यावें (यादी नं. ३ भा. प.). पुढें क्षोभ कमी झाल्यावर शक्ति वाढण्याकरितां लोह द्यावा. किंवा टिंक्चर फेराय परक्लोरिडाय १० मि., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें.

पारद, अफू, टरपेंटाईन, सोमल, क्यांथरडीस, ब्लिस्टर्स, इत्यादि औषधांचा ह्या रोगांत उपयोग करूं नये.

**पथ्यः**—रोग्यानें स्वस्थ निजून असावें. त्यास शैत्याची पीडा होऊं देऊं नये. रोग्याच्या अंगांत सदोदित लोंकरीचीं वस्त्रें असूं द्यावीं. खाण्यास प्रथम पातळ पेजेसारखेच पदार्थ द्यावे किंवा नुसते दुधावरच रहावें. पुढें तब्येत सुधारूं लागली ह्मणजे थोडथोडे पौष्टिक व पचनीय पदार्थ द्यावे. मद्य वर्ज्य करावें. पाणी पाहिजे तितकें पिऊं द्यावें. तिखट,

आंवट, खाऊं नये. रोगी बरा होत आल्यावर त्यास उष्ण व कोरड्या हवेवर हवा बदलण्यास न्यावें.

---

## विलंबी मूत्रपिंडरोग.

### CHRONIC BRIGHT'S DISEASES.

ह्या प्रकारांत मूत्रपिंडांच्या रचनेंत फेरफार होतात, आणि मूत्रपिंडांतील वाहिन्या सुजून कांहींशा बुजाल्यासारख्या होतात.

**कारणें:**—विलंबी मूत्रपिंडरोग हा बहुतकरून तीव्र प्रकाराच्या परिणामीं होतो. किंवा शरीरावर वारंवार शैत्याचें कार्य घडल्यानें अथवा अति मद्यपान, उपदंश, पादाग्ररोग, गंडमाळ, इत्यादि रक्तदोषांपासून किंवा मूत्राशय आणि जननेंद्रियांचे विलंबी विकार, गरोदरावस्था, ह्यांपासून हा उद्भवतो. हा विकार फार करून गरीब लोकांस आणि जे मलीनपणानें वागतात, त्यांस होतो. हा बहुतकरून प्रौढ वयांत होतो, आणि स्त्रियांपेक्षां पुरुष ह्या विकारास विशेष पात्र असतात.

**लक्षणें:**—ह्या रोगाचा उगम हळूहळू आणि न कळत होतो. प्रथमतः पचनव्यापारांत बिघाड होऊन क्षुधा बिघडते, क्षीणता वाढते, त्यामुळें रोगी फिक्कट व पांढरा फटफटीत दिसूं लागतो. पायांवर व तोंडास सूज येते, डोळ्यांच्या पापण्यांसही सूज येते, डोकें दुखूं लागतें, भोंवळ येते, दृष्टीस मांद्य येतें, उह्मासे येतात किंवा वांत्या होऊं लागतात, कंबरेंत वेदना होऊं लागतात, आणि वारंवार लघवीस जाण्याची इच्छा होते, परंतु लघवीला बरोबर होत नाहीं. मूत्र फिक्कट, पिंवळें किंवा धूसर रंगाचें असतें. त्यांत अलब्यूमेन, त्वचेचे

तुकडे, चरबी वगैरे गाळ असतात; परंतु मूत्राचें विशिष्ट-गुरुत्व साधारणपणें स्वाभाविकच असतें. कधीं कधीं अतिसार होतो, किंवा श्वासमार्गांत दाह पसरून खोकला उत्पन्न होतो.

**गति व परिणाम:**—बहुतकरून रोगी बरेच दिवस क्षीण स्थितींत असतो. योग्य व्यवस्था राखल्यानें कित्येक रोगी कांहीं वर्षेंपर्यंत ह्याच स्थितींत काढतात. शेवटीं क्षीणता वाढते, जलशोथ वाढतो, आणि तो हृदय, फुप्फुस वगैरे इंद्रियांत वाढत जातो, त्यामुळें त्याचा श्वासेंद्रियावर दाब पडून श्वासावरोधानें मरण येतें, किंवा मूत्रविसर्जन बंद पडून रोगी बेशुद्ध होऊन मरण पावतो.

**उपचार आणि पथ्य:**—औषधांपैकीं पोट्याश आसिटस् १० ग्रे., टिंक्चर ऑफ् स्किल १० मि., फरम् टार्टरेटम २ ग्रे., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा मागें तीव्र प्रकारांत सांगितलेले काढे द्यावे, किंवा कुमारी आसव द्यावें. सूज वाढून श्वास वगैरे लागल्यास रेचक द्यावें (यादी नं. ३ भा. प.). त्या रेचकानें काम न झाल्यास अर्धा ग्रेन इलीटेरीयम घेऊन त्याची गोळी करून द्यावी. किंवा कडु वृंदावनाच्या फळांचा काढा करून द्यावा, अथवा रेवाचिनीच्या शिऱ्याची पावगुंज प्रमाणाची गुळांत गोळी करून ती वडीशेपेच्या काढ्याबरोबर द्यावी. रोग्यास कंबरेपर्यंत ऊष्ण पाण्यांत बसवावें, किंवा कंबर ऊष्ण पाण्याच्या पिळ्यांनीं शेकावी. अंगांत सर्वकाळ लोकरीचीं वस्त्रें असूं द्यावी, थकवा आणणारीं कामें करूं नयेत, बेताचा व्यायाम करावा, मोकळ्या आणि कोरड्या हवेंत रहावें, घराचे तळमजल्यांत राहूं नये, माडीवर रहावें, मद्य मिरच्या

वगैरे पदार्थ खाऊं नयेत, व पेजसारखे पौष्टिक आणि पचनीय असे पदार्थ खावे.

---

## मूत्रपिंडशूळ.

NEPHRITIC COLIC OR NEPHRALGIA.

**कारणें:**—हा विकार बहुतकरून जे लोक उष्ण आणि रेताड प्रदेशांत रहातात त्यांस व जे मिष्टान्न सेवन करून निरुद्योगी असतात त्यांस होतो. शिवाय कडक दारू पिण्यांत आल्यानें आणि मिरच्यासारखे तिखट पदार्थ अतिशय खाण्यांत आल्यानेंही हा विकार उत्पन्न होतो.

**लक्षणें:**—ह्या विकारांत वर सांगितलेल्या कारणांपासून दोन्ही किंवा एकाच बाजूच्या मूत्रपिंडांत रेती उत्पन्न होत असते. ही रेती दोन प्रकारची असते. एक कठिण व तांबड्या रंगाची आणि दुसरी नरम व पांढऱ्या रंगाची असते. शूल बहुतकरून तांबड्या रेतीपासून होतो ही रेती जेव्हां मूत्राबरोबर मूत्रपिंडांतून मूत्राशयाकडे येत असते, तेव्हां एकाएकींच कंबरेच्या बहुतकरून कोणत्या तरी एका बाजूस तीव्र वेदना होऊं लागतात. ह्या वेदना राहून राहून आणि खोकल्यानें, शिंकल्यानें, अथवा दीर्घश्वास घेतल्यानें ज्यास्त होतात. शेवटीं ह्या वेदना मूत्रवाहिन्यांतून मूत्राशयाचे मानेकडे आणि मांड्यांच्या आंतल्या बाजूस व अंडांतही पसरतात. त्या बाजूचा अंडही किंचित् वर ओढल्यासारखा होतो. मूत्र आरक्त व अल्प असतें व तें होतांना तिडीक मारते आणि आगही होत असते व जिव्हा मलानें लिप्त असते. कोष्ठबद्ध असतो व वायूनें पोट फुगतें, तहान लागते, वांत्या होऊं लागतात,

नाडी जलद व टणक असते, आणि रोगी अस्वस्थ व चिंतातुर होतो. कधीं कधीं किंचित् ज्वरही उत्पन्न होतो.

**गतिः**—रेती मूत्राबरोबर वाहून गेली ह्मणजे वरील सर्व लक्षणें नाहींतशीं होतात आणि रोगी पूर्ववत् हुषार होतो. कधींकधीं रेती मूत्रपिंडांत किंवा मूत्राशयांत जमून तेथें तिचा खडा बनतो. खडा मूत्रपिंडांत झाला तर मूत्रपिंडाचें शोषण होतें किंवा मूत्रपिंडांत विद्रधी (Abscess) होऊन तो कटिप्रदेशीं फुटतो, आणि त्यांतील पुवाबरोबर मुतखडा बाहेर पडतो. ह्या विद्रधीला जें तोंड होतें तें कधींच बरें होत नाहीं. त्यांतून सदोदित मूत्र पाझरूं लागतें. कधींकधीं रेतीचे लहान लहान कंकर बनून ते मूत्रनळांत येऊन अडकतात तेव्हां ते मूत्राबरोबर वाहून न गेल्यास कुशल वैद्याकडून शस्त्रोपचार करून काढवावे.

**उपचार आणि पथ्यः**—कारण दूर करावें शूल उत्पन्न होतो तेव्हां अफूच्या बोंडांचा काढा करून त्यानें कंबर शेकावी. आणि सैट्रेट ऑफ पोट्याश २० ग्रेन, स्वीट स्पिरिट ऑफ नैटर १० मि., अळशीचा फांट २ औंस (या. नं. ३४) असें मिश्रण दर तीन तासांनीं द्यावें. किंवा सैट्रेट ऑफ लिथीया २० ग्रेन, कापराचें पाणी २ औंस असें मिश्रण दर तीन तासांनीं द्यावें. शौचास होत नसल्यास ह्यांतच १—२ ड्राम सल्फेट ऑफ म्याग्नीशिया घालावा. किंवा धने, गोंखरू यांचा काढा करून त्यांत पाषाणभेद ३ मासे घालून सकाळ संध्याकाळ द्यावा. किंवा एलची, पाषाणभेद, शिलाजीत, पिंपळी, गोंखरू हीं सर्व समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें आणि त्यापैकीं ६ मासे चूर्ण, ४ तोळे

तांदुळाच्या धुणाबरोबर द्यावें. किंवा गोंखरू, पाषाणभेद, एलची, बाहाव्याचे शेंगेंतील मगज, एरंडमूळ, दारूहळद, ज्येष्ठमध, धने हीं सर्व अर्ध तोळाप्रमाणें घेऊन त्यांत ६४ तोळे पाणी घालावें आणि काढा अष्टमांश उरला ह्मणजे तो गाळून घ्यावा. पाणी पिण्याचे ऐवजीं लिथीया किंवा विची-वाटर द्यावें; किंवा बेदाणा, कमळकाकडीचें मूळ अथवा फूल ह्यांपैकीं कोणतें तरी एक पाण्यांत २ तासपर्यंत भिजत घालून नंतर तें पाणी गाळून प्यावें किंवा आळशीचा फांट करून तो द्यावा. पथ्यास मिष्टान्न खाऊं नये, दारू पिऊं नये, तिखट खाऊं नये, आहार साधा आणि पचनीय असा ठेवावा. पालेभाज्या यथेच्छ खाव्या. नित्य उघड्या हवेंत व्यायाम करावा व कंबरेभोंवतीं नेहमीं लोंकरीचें वस्त्र गुंडाळलेलें असावें.

ज्यांस मूत्रपिंडशूळ होईल त्यांनीं सदरील पथ्याचा बेत नेहमीं चालू ठेवल्यास बहुधा त्यांस ह्या शूळाची बाधा पुन्हां होणार नाहीं.

---

## मधुमेह.

DIABETES MELLITUS.

ह्या रोगांत लघवीला पुष्कळ होतें आणि त्यांत साखर असते, त्यामुळें लघवीचें विशिष्टगुरुत्वही वाढलेलें असतें.

मधुमेह हा रोग आपल्या देशांत फार विरळ होतो. परंतु आलीकडे व्यापारधंदे वाढल्यामुळें मोठमोठ्या शहरांतून मधु-मेहाचे रोगी बरेच पाहण्यांत येऊं लागले आहेत.

**कारणें:**—ह्या रोगाचें खात्रीलायक कारण अद्यापि सम-जलें नाहीं, तथापि शैत्याची पीडा वारंवार होऊं लागल्यानें

आणि उन्हांतून श्रमून आल्याबरोबर गारपाणी पिण्यांत आल्यानें किंवा पेजाविशिष्ट ( खळीच्या जातीचे पदार्थ Starchy substance ) आणि शर्कराविशिष्ट पदार्थ अतिशय खाण्यांत आल्यानें, अति मद्यपानानें, अति मानसिक श्रम केल्यानें, अतिचिंतेनें आणि मज्जाकंद व ग्हिडकरज्जु ( Spinal Cord ) यांस धक्का पोंचल्यानें मधुमेह रोग उत्पन्न होतो असें ब्ऱ्याच कुशल वैद्यांचें मत आहे. हा रोग अलीकडील विद्वान लोकांत फार आढळतो. याचीं कारणें तरी भाताचें खाणें आणि अतिशय मानसिक श्रम हीं होत. हा रोग वंशपरंपरेनें होतो, असेंही कित्येक वैद्यांचे पाहण्यांत आलें आहे. कधीं कधीं हा रोग झाल्याचा भास, कांहीं जालम औषधें ह्मणजे स्ट्रिकनिया, वुरारा. ह्यांच्या सेवनानें, व क्लोरोफॉर्म नामक औषधाची वाफ श्वासाबरोबर शरीरांत गेल्यानें रक्तांत* शर्करा उत्पन्न होऊन ती मूत्रद्वारें बाहेर पडूं लागते, तेव्हां होतो; परंतु त्या औषधांचा अंमल नाहींसा होतांच मूत्रांतील शर्कराही नाहींशी होते.

हा रोग बहुतकरून २५ पासून ६० वर्षांच्या वयांत होतो आणि स्त्रियांपेक्षां पुरुषांस फार होतो. ज्या जातींत मांसाहार कमी असतो त्या जातींत बहुशः हा रोग पाहण्यांत येतो, असें एका विद्वानाचें ह्मणणें आहे.

लक्षणें:—ह्या रोगांत पुष्कळ वेळां लघवीस जावें लागतें व तिचें प्रमाणही अतिशय वाढतें. ह्मणजे २४ तासांत ४० पासून ५० औंस होण्याचे ऐवजीं सुमारें २००

* स्वभावत. रक्तांत शेंकडा १/१० पासून १/८ अंश इतक्या साखरेची आवश्यकता असते. तिच्या योगानें रक्तांतील उष्णता नेमस्त राहून पोषणव्यापारास मदत होते; परंतु जेव्हां मधुमेह रोग होतो तेव्हां शर्करेचें प्रमाण वाढून, ती लघवींतून बाहेर पडूं लागतें.

पासून ४०० औंस, ह्मणजे सुमारें ४०० पासून ८०० तोळे इतकी लघवी होते, आणि १५ पासून २५ औंस, ह्मणजे ४० पासून ६० तोळे इतकी साखर प्रत्येक दिवशीं लघवींतून जाते. त्यामुळें लघवीचें विशिष्टगुरुत्वही वाढतें, ह्मणजे १०३० पासून १०४०, व कधीं कधीं ह्याहीपेक्षां ज्यास्त ह्मणजे १०६० पर्यंत वाढतें. मूत्रांतील यूरीआनामक क्षारही ज्यास्त होतो. लघवी करितांना कधीं कधीं किंचित् आग होते व पुढें कांहीं दिवसांनीं मूत्रनळीच्या तोंडावरचे कातडीस चिरा पडतात. रोगी स्त्री असल्यास योनीच्या तोंडाशीं तशीच स्थिति उत्पन्न होते. मूत्राला वाळलेल्या गवताचा वास येतो, व तें पेंढ्यासारखें फिक्कट पिंवळ्या रंगाचें दिसतें. त्यावर माशा बसतात व मुंग्याही येतात, आणि तें वाळलें ह्मणजे त्या ठिकाणीं धूसर रंगाचा सांखा जमतो. तहान फार लागते, तोंड गुळचट होतें, व वारंवार कोरडें पडतें, जिभेवर चिकट पांढरा सारा जमतो, व कधीं कधीं ती लाल व फुटलेली अशी दिसते. जिभेचें रसज्ञान कमी होतें, शौचास साफ होत नाहीं, बहुतकरून खडाच होतो, क्षुधेंत फारसा फरक पडत नाहीं, तरी ती प्रथमारंभीं फार वाढते व अन्नही पुष्कळ जातें; परंतु तेवढ्यानें रोग्याची तृप्ति होत नाहीं व तें अन्न त्याच्या अंगींही लागत नाहीं. कृशता एकसारखी वाढत जाते, अनायासें श्रम वाटतात, त्वचा शुष्क व खरखरीत होते, कंबर आणि हातपाय ह्यांत फूट होत असते, हातापायांला भिरभिरी येते, लघुशंकेनें झोंपेचा मोड होतो, कामवासना कमी होते, व कित्येक रोग्यांत ती अगदींच नष्ट होते. दृष्टीस मांद्य येतें, व नाडी

क्षीण वाहूं लागते. तथापि ह्या सर्व लक्षणांवरून मधुमेहाचें निदान निश्चित ठरवितां येणार नाहीं. ह्याकरितां मूत्रपरीक्षा झाली पाहिजे, ह्मणून मूत्रशर्करेची जी एक सोपी रीत आहे, तेवढीच येथें सांगतों. तिला 'मूर्स टेस्ट' असें ह्मणतात. ती खालीं दिल्याप्रमाणें आहे.—मधुमेहाच्या लक्षणांनीं युक्त असें मूत्र घेऊन तें व शुद्ध लैकर पोट्यासी अशीं समप्रमाणांनीं एका कांचेच्या नळींत भरून तीं मद्यार्काच्या दिव्यावर कढवावीं, ह्मणजे शर्करायुक्त मूत्रास तांबूस रंग येतो. परंतु ह्या रीतीनें शर्करेच्या सूक्ष्म प्रमाणाची परीक्षा होत नाहीं; एवढ्याकरितां मधुमेहाच्या लक्षणांनीं युक्त मूत्र स्वच्छशा कुपींत भरून तें एखाद्या कुशल वैद्याकडून तपासवावें, ह्मणजे मधुमेहाचें निदान कायम ठरवितां येईल.

**गतिः**—मधुमेहाच्या गतीचें मान बहुतेक रोग्याच्या पथ्यावर अवलंबून असतें. पथ्याची व्यवस्था ठेवल्यानें रोगी बरींच वर्षेंपर्यंत चांगल्या स्थितींत राहूं शकतो. परंतु असाध्य प्रकारांत ह्मणजे जेव्हां अलब्यूमेनयुक्त घटकावयवांपासून तत्काळ शर्करा होते, तेव्हां दिवसेंदिवस कृशता वाढत जाते, हिरड्या स्पंजासारख्या विरळ होऊन दांत ढिले होतात, अंगावर गळवें व काळपुळ्या उठतात आणि फुप्फुसांत ग्रंथिजन्य विकार उत्पन्न होतो, व ह्यांनीं बहुतकरून रोग्याचा अंत होतो. किंवा मूत्रपिंडास एखादा विकार होऊन मूत्रविसर्जन बंद पडतें आणि एकाएकीं रक्त दूषित होतें व रोगी बेशुद्ध होऊन मरतो.

**उपचारः**—ह्या रोगांत पथ्याची योग्य व्यवस्था ठेवणें हाच मुख्य उपचार होय. ह्मणून मधुमेहाचे रोग्यानें औष-

धादि उपचारांपेक्षां अन्न, वस्त्र आणि हवा यांजकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. मधुमेहाचे रोग्यानें मांसान्न खाल्लेंच पाहिजे-ह्मणजे मांस, (जनावरांतील यकृत खेरीजकरून अवयवांचें मांस) अंडीं, मासे, इत्यादि खावें. परंतु ज्यांस मांस खाणें आवडत नसेल, त्यांनीं दूध, गव्हांच्या कोंड्याची भाकरी किंवा लापशी करून खावी. साखर, गूळ, आणि कोणताच गुळचट पदार्थ खाऊं नये. भात, बटाटे, गाजर, मुळा, वगैरे पिष्टमय (Starchy) पदार्थ जितके कमी खाण्यांत येतील तितकें चांगलें. पिष्टमय पदार्थ तोडणें झाल्यास हलके हलके तोडावे, एकदम तोडूं नये. कोबी, कॉली फ्लावर, मेथी, माठ, इत्यादि भाज्या खाण्यास हरकत नाहीं. जेवणाचे पदार्थांमध्यें नेहमीं फेरफार करावा ह्मणजे पचनशक्ति वाढते. चहा, कापी, वगैरे पिणें झाल्यास त्यांत साखर घातल्याशिवाय प्यावीं. अशक्तपणांत ब्रांडी, ड्राय शेरी किंवा व्हिसकी हीं घेण्यास हरकत नाहीं. बर्फ घालून गार केलेलें पाणी पिण्यासही हरकत नाहीं. उघड्या हवेंत नेहमीं बेताचा व्यायाम करावा, व तो हळूहळू वाढवावा ह्मणजे औषधाशिवाय मेह बरा होतो, असें कित्येक डाक्टरांचें ह्मणणें आहे. समुद्रकिनारीं रहावयास जावें. समुद्रस्नान करणेंही हितावह आहे. अंगांत ऊर्णावस्त्रें घालावीं. चिंता वाहूं नये, मानसिक श्रमही करूं नयेत, जबाबदारीचीं आणि नुकसानीचीं कामें करूं नये आणि ज्या कोणत्या कारणानें ह्या रोगास उत्तेजन येण्यासारखें असेल तें टाळावें.

**औषधोपचारः**—लघवी अतिशय होत असल्यास दिवसांतून एक दोन वेळां $\frac{1}{4}$ ग्रेन पासून $\frac{1}{2}$ ग्रेन अफू किंवा

एक्स्ट्रॅक्ट ऑफ बेलाडोना द्यावा. शक्ति क्षीण होते त्यासाठीं बलवर्धक औषधें द्यावीं. ईस्टन्सासिरप द्यावें, किंवा सिरप फेरी ब्रोमाईड द्यावें. किंवा टिंक्चर फेराय परक्लोराईड १० मि., आसिड फॉसफरिक डिल्यूट १० मि., लैकर स्ट्रिकनिया ५ मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून दोन तीन वेळां प्रत्येक जेवणानंतर द्यावें. किंवा लोह द्यावा (यादी नं. २७ भा. प.). किंवा वंगभस्म द्यावें. शौचास साफ होत नसल्यास मधूनमधून रेचक द्यावें (यादी नं. ११ किंवा ३ भाग प.)

आलीकडेस जांभळीच्या बियांची पूड ४ गुंजा प्रमाणानें दिवसांतून तीन वेळां घेतात, त्यानेंही फायदा होतो.

**सूचनाः**—अंगास जखम वगैरे होऊं नये अशी काळजी घ्यावी व शस्त्रक्रियेचे उपाय करूं नयेत. कारण त्यापासून जखमेंत तीव्र दाह उत्पन्न होऊन तो पसरण्याचा संभव असतो आणि दाह शांत न होण्याचीही भीति असते. शस्त्रप्रयोगानंतर जखमेंतून कधीं कधीं अनिवार्य रक्तस्राव होऊं लागतो, त्यामुळें रोगी अतिशय क्षीण होतो, ह्मणून शस्त्रप्रयोग करणें झाल्यास फार विचार करून केला पाहिजे.

---

## जलमेह किंवा बहुमूत्ररोग.

### DIABETES INSIPIDUS.

ह्या रोगांत मधुमेहाप्रमाणेंच लघवीचें प्रमाण वाढलेलें असतें, परंतु त्यांत शर्करा किंवा लघवींतील कोणत्याही क्षाराचें प्रमाण वाढलेलें नसून फक्त पाण्याचा अंश मात्र वाढलेल

असतो, त्यामुळें लघवीचें विशिष्टगुरुत्व कमी ह्मणजे १००० अंशांपासून १००४ अंशांपर्यंत असतें.

ह्या रोगाचीं कारणें व लक्षणें बहुतेक मेहाच्या कारणांपैकीं आणि लक्षणांपैकींच असतात. कधीं कधीं ह्या रोगाचा संबंध अमानुष रोगाशीं (गर्भाशयोन्माद Hysteria) असतो. ह्या रोगांत मधुमेहाप्रमाणें काळपुळ्या आदिकरून संकर उत्पन्न होत नाहींत, परंतु कृशता मात्र वाढते.

**उपचारः**—द्रवपदार्थ बेतानेंच प्यावे. क्षारमय पदार्थ खाऊं नयेत. पौष्टिक व पचनीय अन्न खावें. मधुमेहांत सांगितलेलीं बलवर्धक औषधें घ्यावीं. उघड्या हवेंत व्यायाम करावा आणि घर्षणानें त्वचेची क्रिया वाढवावी.

---

## रक्तमूत्र.

### HÆMATURIA.

ह्या विकारांत मूत्रांत रक्त असतें, व तेणेंकरून मूत्र तांबड्या लाल रंगाचें किंवा धूम्र वर्णाचें दिसतें. हें मूत्र ग्लासांत धरून ठेविलें, ह्मणजे कांहीं वेळानें त्यांतील रक्ताच्या घन अंशाचा तांबूस गाळ तळीं बसतो. असा परिणाम उष्णता लावल्यानें त्वरित होतो. सूक्ष्मदर्शकानें ह्या मूत्राची परीक्षा करून पाहिली असतां त्यांत रक्तपिंड दृष्टीस पडतात. ह्या मूत्रांत नैट्रिक आसिडाचे एक दोन थेंब टाकल्यानें त्यांतील रक्त गोठून त्याचा धूसर किंवा तपकिरी रंगाचा गाळ तळीं बसतो. लिकर अमोनियाच्या योगानें त्यांतील रक्ताचा रंग ज्यास्त खुलतो. तेणेंकरून त्यास बहुधा किरमेजी रंग येतो.

**कारणें:**—मूत्रेंद्रियांतून * रक्तस्राव होण्याचीं कारणें अनेक आहेत. कित्येक क्षोभक पदार्थ ह्मणजे क्यांथारिडीस, टरपेंटाईन, मिरच्या, कस्तुरी, कडक दारू इत्यादिकांचें प्रमाणातिरिक्त किंवा सतत बरेच दिवस सेवन केल्यानें मूत्रेंद्रियांतून रक्तस्राव होतो. मूत्रेंद्रियांतून मूत्रखडा झाल्यानें आणि मूत्रेंद्रियांचे कोणत्याही भागावर आघात किंवा शस्त्रप्रयोग केल्यानें अथवा त्या ठिकाणीं दुष्ट व्रण पडल्यानें मूत्रेंद्रियांतून रक्तस्राव होतो. शिवाय रक्ताधिक्यप्रकृति, लोहितांगज्वर, ( Scarlet fever ) जांबुवर्ण रोग, ( Purpura Hœmorrhag'ca ) ब्राइट्सचा मूत्रपिंडरोग, प्रमेह इत्यादि विकारांपासून कधीं कधीं मूत्रेंद्रियांतून रक्तस्राव होतो. कधीं कधीं स्त्रियांचा मासिक ऋतुस्राव बंद पडून तो मूत्रेंद्रियांतून होऊं लागतो.

रोगी स्त्री असल्यास योनींतून किंवा गर्भाशयांतून कांहीं कारणानें रक्त पाझरून तें मूत्रविसर्जनाचे वेळीं मूत्रांत मिश्र होतें आणि मूत्रेंद्रियांतून रक्तस्राव झाल्याचा भास होतो. अशा वेळीं विशेष चौकशी केली ह्मणजे खुलासा होतो.

आतां मूत्रांतील रक्त मूत्रेंद्रियांच्या कोणत्या भागापासून येत आहे हें समजणें जरूर आहे.

जर मूत्र होतांना किंवा त्याचे पूर्वीं कंबरेंत वेदना होत आहेत, थंडीच्या हुडहुड्या भरत आहेत, रक्त मूत्राबरोबर अगदीं मिश्र आहे व तें धूसर रंगाचें किंवा पोर्टवाईनच्या रंगाचें दिसत आहे, आणि सूक्ष्मदर्शकानें त्यांत सूक्ष्म मूत्रनलिकांच्या वळ्या दिसत आहेत, तर तें रक्त मूत्रपिंडा-

* मूत्रपिंड, मूत्रवाहिन्या ( युरीटर्स् ) मूत्राशय, आणि मूत्रनळ इत्यादि इंद्रियांस मूत्रेंद्रियें ह्मणतात.

पासून येत आहे असें समजावें. जर रक्त मूत्र झाल्यानंतर पडत आहे आणि लाल रंगाचें आहे, आणि मूत्राशयप्रदेशीं ह्मणजे बेंबीचे खालचे भागीं वेदना होत आहेत, तर तें मूत्राशयापासून पडत आहे असें समजावें. जेव्हां तें मूत्रनळांतून येतें तेव्हां तें बहुधा मूत्रविसर्जनाच्या पूर्वी मूत्राचे थोड्या भागाबरोबर मिश्र होऊन पडतें. शिवाय, मूत्रविसर्जन झाल्यानंतरही पडतें. मूत्रनळ दाबला असतांही तें पडतें. कधीं कधीं मूत्रनळांतील रक्त मूत्राशयांत परत जाऊन मूत्राबरोबर मिश्र होऊन पडतें. अशा वेळीं घोटाळा होतो, परंतु चौकशीअंतीं संशयनिवृत्ति होते.

**उपचार आणि पथ्यः**—रोग्यानें स्वस्थ पडून असावें. मूत्रेंद्रियाच्या कोणत्या भागापासून रक्त येत आहे त्याची चौकशी करावी. कारण शोधून तें टाळतां येण्यासारखें असल्यास टाळावें. ज्या भागापासून रक्तस्राव होत असेल त्याठिकाणीं बर्फ लावावें किंवा थंड पाण्याची घडी ठेवावी. तो भाग किंचित् उंच करून ठेवावा. रक्तस्राव मूत्रशयांतून किंवा मूत्रनळींतून होत असेल, तर त्यांत थंड पाण्याच्या अथवा मायफळाचा काढा ८ तोळे, तुरटी १ मासा अशीं एकत्र करून त्याच्या पिचकाऱ्या माराव्या. हें काम स्वतःला होणें अंमळ कठिण आहे, करितां तें कुशल वैद्याकडून करवावें. पोटांत आसिड ग्यालिक ५ ग्रेन, ॲसिड सलफ्युरिक अरोम्याटिक ५ मि., टिंक्चर ऑफ अरगट १० मि., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा ह्याजलीन २० मि., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा खजूर, पुष्करमूळ, टेंबुर्णी, गुळवेल, हीं सर्व एकएक तोळा प्रमा-

णानें घेऊन त्यांत ६४ तोळे पाणी घालून काढा अष्टमांश उरला ह्मणजे गाळून त्यांत ६ मासे मध घालून द्यावा. किंवा नागभस्म १ वाल, आंवळकाठीचें चूर्ण ६ मासे, हळदीचें चूर्ण ३ मासे अशीं एकत्र करून तीं सकाळ संध्याकाळ एक तोळा मधांत मिश्र करून द्यावीं. किंवा कातार्चे चूर्ण ४ गुंजा, हिरादखण ४ गुंजा, बाभळीचा गोंद ८ गुंजा, अफू पाव गुंज अशीं एकत्र करून सकाळ संध्याकाळ साखरेच्या पाकांतून द्यावें; किंवा त्रिफळ्यांतून लोह द्यावा (यादी नंबर २७ भाग प.). ह्या सर्व उपचारांनीं रक्तस्राव बंद न झाल्यास कुशल वैद्यांकडून त्याची चिकित्सा करवावी. जेवण्यास पेजेसारखे पातळ पदार्थ द्यावे व हवा बदलावी, ह्मणजे गुण येतो.

---

## धातुपरसमिश्रित* मूत्र.

### CHYLURIA OR CHYLOSIROUS URINE.

ह्या विकारांत मूत्रास दुधासारखा पांढरा रंग येतो, तरी कधींकधीं त्यांत किंचित् तांबुसपणाही असतो. हें मूत्र विसृष्ट झाल्यानंतर कांहीं वेळानें बरेंच घन होतें. त्यांत नैट्रिक आसिड घातल्यानें किंवा त्यास उष्णता लावल्यानेंही तें घन होतें. सूक्ष्मदर्शकानें आणि रासायनिक रीतीनें परीक्षा करून पाहिलें असतां त्यांत अलब्यूमेन, रक्तघटकद्रव्यें आणि वसा असे पदार्थ सांपडतात, त्यामुळें तें मूत्र अपारदर्शक दिसतें. डाक्टर लुईस व कनिंगह्याम ह्यांनीं ह्या मूत्रांत एका प्रकारचे

---

* अन्नाचे अंत्रांत पचन झाल्यानंतर जो एक दुधासारखा पांढरा व कांहींसा घट्ट पदार्थ होतो, त्यास धातुपरस ह्मणतात.

सूक्ष्म कीटक असतात, असा शोध लाविला आहे. आणि हे कीटक मूत्रपिंडाजवळील धातूप्रवाहिन्यांत जाऊन त्यांचा नाश करितात, त्यामुळें त्यांतील धातुपरस मूत्रपिंडांत पाझरून तो मूत्रद्वारें बाहेर पडतो, असें डाक्टर राबर्ट ह्यांचें मत आहे. हे कीटक लघवींत कधींकधीं रात्रीं पाहण्यांत येतात.

हा रोग उष्ण प्रदेशांत होतो. बंगाल्यांत ह्याचें प्राबल्य बरेंच आहे असें आढळतें; आणि वृषणाचा श्लिपदविकार ज्यास असतो त्यास बहुश: हा विकार होतो, असें पाहण्यांत आलें आहे. ह्या रोगांत रोगी कांहींसा क्षीण व कृश होतो.

**उपचार व पथ्य:**—हा रोग बहुधा आपोआपच कांहीं दिवसांनीं नाहींसा होतो, तरी लोह द्यावा (यादी नं. २७ भा. प.). किंवा टिंक्चर फेराय परक्लोरिडाय १० मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. हवा बदलावी. पाचक आणि पौष्टिक पदार्थ खावे, मांसान्न खाऊं नये. अशा बेतानें दोन तीन महिने राहिलें ह्मणजे गुण येतो.

---

## मूत्राश्मरी (मुतखडा).

### URINARY CALCULI.

**कारणें:**—मूत्रखडा उत्पन्न होण्याचें कारण अद्यापि निश्चित नाहीं, तथापि उष्ण आणि रेताड प्रदेशांत रहाणाऱ्या लोकांस मूत्रखडा होतो असें बऱ्याच वैद्यांचें मत आहे. आपल्या देशांत हा रोग सिंध, कराची, काठेवाड, खानदेश वगैरे ठिकाणीं जे लोक रहातात त्यांस बहुतकरून होतो असें पहाण्यांत आलें आहे. तरी अन्नपाण्याच्या विपरीतपणामुळें पचनपोषणांत फेरफार होऊन मूत्रांतील द्रवांश कमी झाल्यानें

किंवा त्यांतील क्षारमय द्रव्याचें प्रमाण वाढल्यानें, क्षार मूत्राबरोबर वाहून न जातां मूत्रेंद्रियांत सांचून त्याचा मूत्रखडा बनतो. मूत्रांतील क्षारांपैकीं आग्झलेट, फॉसफेटस, आणि युरेटस् किंवा लिथेटस ह्या क्षारांचा मूत्रखडा बनतो. ह्यांपैकीं ज्या क्षारांचें प्रमाण वाढतें त्याप्रमाणें शरीरप्रकृतीस निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. त्यांस इंग्रजींत डायाथिसिस (Diathesis) असें ह्मणतात. त्या—युरिक आसिड डायाथिसिस, आग्झलिक आसिड डायाथिसिस आणि फारफेटिक आसिड डायाथिसिस ह्या होत.

**युरिक किंवा लिथिक आसिड डायाथिसिसः—** हा मूत्रविकार जे मनुष्य मांसाहार करून व्यायाम करीत नाहींत त्यांस, व ज्यांच्या शरीरामध्यें विपुल रक्त आहे अशा लोकांस होतो. त्यांतील मूत्र लालसर रंगाचें व अल्प असतें. त्यांत आम्लधर्म असतात. मूत्रविसर्जनाचे वेळीं तें स्वच्छ असतें, परंतु कांहीं वेळानें गढूळ होतें व त्याचा लालसर उदी रंगाचा किंवा पिंवळ्या रंगाचा सांखा तळीं बसतो. मूत्र उष्ण केलें असतां सांखा विरघळून जाऊन मूत्र पुन्हां स्वच्छ होतें. सांखा सूक्ष्मदर्शकानें पाहिला असतां त्याचे कण मिऱ्यासारखे दिसतात. ह्या क्षारापासून जे मूत्रखडे होतात ते मोहरीपासून आंब्याएवढे असतात व कांहींसे अंडाकार असून चापट व गुळगुळीत असतात. त्यांचा रंग बहुधा उदी असतो आणि ते कापून पाहिले असतां एकावर एक थर जमून झालेले आहेत असें दिसतें.

**उपचारः—**पोट्याश बायकार्बोनस १० ग्रेन., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा

लिकर पोट्यासी १० मि., पाणी १ औंस असें मिश्रण द्यावें. किंवा पाषाणभेदाचें चूर्ण २ मासे गोखरूचे काढ्यांतून द्यावें.

**पथ्य:**—तिखट पदार्थ खाऊं नयेत, मद्यसेवन बंद करावें, मोकळ्या हवेंत व्यायाम करावा, आहार साधा आणि पचनीय घ्यावा.

**आग्झलिक आसिड डायाथिसिस:**—हा मूत्रविकार ज्यास मानसिक श्रम फार करावें लागतात किंवा ज्याच्या पाठीमागें फार काळजी असते त्यास होतो. ह्या प्रकारचा रोगी बहुधा फिक्कट दिसतो, याची पचनशक्ति बिघडते, बरोबर झोंप लागत नाहीं, शक्ति क्षीण होते, पुरुषत्व कमी होतें, कमर दुखते, घाम येतो व अंगास आंबुस वास येतो. मूत्रविसर्जन वारंवार होतें व मूत्र फिक्कट रंगाचें व त्रिपुल असतें. त्यांत आम्लधर्म असतात. मूत्रांत आग्झलेट ऑफ लाईमचे अष्टकोनी स्फटिक असतात, ते सूक्ष्मदर्शकानें पाहिले असतां दृष्टीस पडतात. ह्या विकारापासून जे मूत्रखडे होतात ते काळे व तुतीच्या फळासारखे खरबरीत असतात. हे बहुधा वाटोळे व कठिण असून मोठ्याशा सुपारीएवढे असतात.

**उपचार:**—टिंक्चर फेराय परक्लोरिडाय १० मि., आसिड हैड्रोक्लोरिक डिल्यूट १० मि., टिंक्चर नक्सव्हामीका ९ मि., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां जेवणानंतर घ्यावें, किंवा लोह द्यावा. मिष्टान्न, मद्य वगैरेंचा उपयोग करूं नये. आहार पौष्टिक परंतु साधा असावा. मोकळ्या हवेंत व्यायाम करावा व मानसिक व्यापार बंद ठेवावा.

**फासफेटिक आसिड डायाथिसिस:**—हा मूत्रविकार बहुधा वृद्ध आणि अशक्त लोकांस तसेंच लहान

मुलांसही होतो. ह्या प्रकारांत मूत्र विपुल आणि फिक्कट असतें व तें आम्ल किंवा आम्लप्रतियोगी धर्माचें असतें, किंवा दोन्ही धर्मांनीं युक्त असें असतें. त्यांत किंचित् त्वचेचे सूक्ष्म तंतूही असतात. ह्या मूत्रास एक प्रकारचा उग्र वास येतो, आणि ह्यांतील क्षार पांढऱ्या मातीसारखा दिसतो. ह्यापासून जो मूत्रखडा होतो, तो मृदु व ठिसूळ असतो.

**उपचारः**—मागच्या प्रकारांत सांगितलेलीं औषधें द्यावीं, हवा बदलावी, ह्मणजे प्रकृति सुधारते.

वर ज्या तीन अवस्था सांगितल्या त्यांच्या परिणामीं बहुधा मूत्रखडा उत्पन्न होतो. किंवा मूत्रावरोध झाल्यानें मूत्राक्षार घन-रूप पावून मूत्रखडा होतो. किंवा मूत्राशयांत परकी पदार्थ शिरला असतां, अथवा मूत्राशयांत रक्त सांखलें असतां त्यावर मूत्रक्षाराचा सांखा बसून मूत्रखडा होतो.

---

## मूत्राशयगत अश्मरी.

### STONE IN THE BLADDER.

मूत्रखडा मूत्रपिंडांत उत्पन्न होऊन तो मूत्राबरोबर मूत्राशयांत वाहत येतो, किंवा मूत्राशयांतच उत्पन्न होतो.

मूत्रखड्यांचें आकारमान निरनिराळें असतें. ते लहानशा चिंचोक्यापासून मोठ्याशा अंड्याएवढे होतात व कधीं कधीं याहूनही मोठ्या आकाराचे आढळतात. कित्येक वाटोळे व गुळगुळीत असतात व कित्येक चापट आणि खरबरीत असतात. ह्यांची संख्या कधींकधीं एकापेक्षां जास्त ह्मणजे २–४–८ किंवा त्यांपेक्षांही जास्त असते. मूत्रखडा तरुण वयापेक्षां वृद्धावस्थेंत व वृद्धवयापेक्षां बाल्यावस्थेंत होण्याचा

विशेष संभव असतो. स्त्रियांपेक्षां पुरुषांस हा विशेषेंकरून होतो.

**मूत्राशयगत आश्मरीचीं चिन्हें:**—मूत्राशयांत मूत्रखडा झाला ह्मणजे तेथें तो क्षोभ उत्पन्न करितो, त्यामुळें वारंवार लघवीस जावें लागतें. लघवी करितांना वेदना होतात. केव्हां केव्हां सर्व लघवी संपण्यापूर्वींच मूत्रखडा मूत्राशयाचे तोंडीं येऊन बसतो, त्यामुळें मूत्र होण्याचें थांबतें व मग अति तीव्र वेदना होऊं लागतात. परंतु उताणें निजून मूत्र करूं लागलें ह्मणजे मूत्रखडा मागें जाऊन पुन्हां मूत्र होऊं लागतें. वेदना कधीं कधीं मांड्या, वृषण, व त्याखालचा भाग ह्यांतही होत असतात. मूत्रास अमोनियाचा उग्र वास येत असतो व त्यांत मूत्राशयाच्या अंतस्त्वचेचे अनेक सूक्ष्म तंतू असतात. हिंडल्यानंतर किंवा गाडींत बसल्यानंतर मूत्राशयांत कळा होतात. मूत्रखडा आग्झलेट क्षाराचा असल्यास तो खरखरीत असतो, त्यामुळें मूत्राशयास टोंचून सतत वेदना होत असतात. कधींकधीं वेदना मूत्रनळाचे तोंडीं पसरतात, त्यामुळें मुलें वारंवार मूत्रनळ चिंवळतात व त्याजवरची चामडी पुढें ओढतात. रोगी धांवला किंवा त्यास हिसके बसले तर मूत्रखड्याचे घर्षणानें कधीं कधीं मूत्राशयाची त्वचा फाटून मूत्रांतून रक्त पडूं लागतें. कधीं कधीं मूत्रखड्याच्या क्षोभानें वारंवार शिस्नोत्थान होऊन वीर्यस्राव होतो. मुलांस त्यापासून वारंवार शौचास होतें. त्यावेळीं तीं कुंथतात व त्यामुळें गुद बाहेर पडतें. वरील सर्व चिन्हांवरून मूत्रखडा झाल्याचा संभव होतो. परंतु शस्त्रवैद्याकडून परीक्षा केल्याशिवाय पूर्ण खात्री होत नाहीं. कारण लहान

मुलांत आंत्रकृमीपासून अशींच चिन्हें उद्भवतात. मूत्राशयांत शलाका घातल्यानें शलाका मूत्रखड्यावर आपटून खणखण नाद उत्पन्न होतो, त्यावरून मूत्रखडा झाल्याची खात्री होते.

**उपचार:**—ह्याजवर औषधी उपाय नाहीं. शस्त्रोपचार आहे, तो शस्त्रवैद्याकरवीं करवावा.

**सूचना:**—मूत्रखडा फार दिवस शस्त्रोपचार केल्याशिवाय राहूं दिला, तर त्यापासून मूत्राशयांत दाह उत्पन्न होतो. पुढें तो दाह मूत्रनलिकांतून वर मूत्रपिंडांत पसरतो व शेवटीं रोगी मरण पावतो. एक वेळ मूत्रखडा काढला ह्मणजे त्यास पुन्हां मूत्रखडा होणार नाहीं असें नाहीं; तर त्याकरितां रोग्यानें वर जीं मूत्रखडा होण्याचीं कारणें सांगितलीं आहेत तीं टाळावीं व मूत्रपिंडगतशूल ह्या प्रकरणीं सांगितलेले उपचार कधीं कधीं करावे व नेहमीं पोट्याश वाटर किंवा लिथीया वाटर प्यावें. पाणी प्यावयाचें तें चांगलें गाळून शुद्ध करून प्यावें (पृष्ठ ९१ ते ९३ भा. प.). आपल्या देशांतील कित्येक हकीम, नापीक व नाकाडोळ्याचे वैद्य मूत्रखडा काढतात, परंतु त्यापासून रोग्यास फार त्रास होतो व कधीं कधीं त्यापासून फारच भयंकर परिणाम होतात. सबब कुशल वैद्याकडून त्याचे उपाय होणें योग्य आहे.

# मूत्राशयदाह*.

## CYSTITIS OR INFLAMMATION OF THE BLADDER.

ह्या विकाराच्या दोन अवस्था आहेत. तीव्रावस्था आणि विलंबी आवस्था.

**तीव्रावस्थेचीं कारणें:**—मूत्राशयदाह हा मूत्राशयांत प्रमेहदाह पसरल्यानें उत्पन्न होतो; किंवा मूत्रखड्याच्या क्षोभानें अथवा मद्यादि कडक पदार्थांचे सेवनानें आणि शस्त्रादिकांच्या आघातानें मूत्राशयास जखम झाली असतां मूत्राशयदाह उत्पन्न होतो.

**लक्षणें:**—बेंबीचे आणि अंडाचें खालचे भागीं वेदना होत असतात व त्या स्पर्शानें ज्यास्त होतात. थंडी वाजून ताप भस्तो. नाडी क्षीण व जलद वाहते. शौचास साफ होत नाहीं. लघवीस वारंवार जावें लागतें व लघवी आरक्त, व अल्प असते. तिडका मारतात. तींत रक्त, पू आणि त्वचेचे सूक्ष्म तंतू असतात. कधीं कधीं हा दाह, वर मूत्रपिंडाकडेस पसरत जातो, तेव्हां त्याबरोबर लक्षणेंही वाढतात. शिस्न

---

* मूत्राशय.- हा स्थितिस्थापकत्वचेनें घटित शंक्वाकार फुगा आहे; आणि तो बेंबीच्या खालच्या भाग व शिस्नमूल ह्यांचेमधील जो कटिराचा आशय त्यांत असतो. पुरुषांत तो गुदाला लागून असणाऱ्या आंतड्याचे रेक्टम् नामक भागाच्या पुढेंच असतो. परंतु स्त्रियांत योनि व गर्भाशय हे अवयव शिवाय असतात, त्यांच्यापुढें तो असतो. मूत्रपिंडांत उत्पन्न होणारें मूत्र युरेटर्स नामक नलिकांच्या द्वारें मूत्राशयांत येऊन सांचतें. हा आशय मूत्रसंचयानें पूर्ण भरला म्हणजे तो बेंबीपर्यंत वर चढतो.

आणि गुद ह्या ठिकाणीं व सर्व पोटभर वेदना पसरतात. रोग्यास चैन पडत नाहीं, मूत्रास दुर्गंधि सुटते, कधीं कधीं मूत्रविसर्जन बंद पडतें. वांती होऊं लागते, ताप वाढतो, रोगी बडबड करूं लागतो, त्यास आंचके येतात, किंवा तो बेशुद्ध होतो, व शेवटीं क्षीण होऊन मरतो. कधीं कधीं दाह विलंबी अवस्था पावतो. किंवा त्याचें शमन होऊन रोगी बरा होतो.

**तीव्र प्रकाराचे उपायः**—कारण दूर करावें. रोग्यानें स्वस्थ पडून असावें. मूत्राशयप्रदेशीं ह्मणजे बेंबीचे खालचे भागीं ऊन पाण्याच्या पिळयांनीं शेक करावा. किंवा रोग्यास, अर्धा तास, बेंबीपर्यंत ऊन पाण्यांत बसवावें. वेदना फार होत असल्यास सकाळ संध्याकाळ अफू $\frac{१}{२}$ ग्रे., कोकमाचें तेल ६ ग्रे., अशीं एकत्र घोटून त्यांची फलवर्ती (मोदकाच्या आकाराची चिंचोळी गोळी) करून गुदांत ठेवावी. आळशीचा फांट करून घ्यावा (यादी नं. ३४). जवसाची पेज घ्यावी किंवा गोंदाचें पाणी घ्यावें. किंवा वैनं एन्टीमोनी-आलिस ५ मि., टिंक्चर हायोसियामस २० मि., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. लघवी बंद पडल्यास कुशल वैद्याकडून शलाकाप्रयोग करून ती काढवावी.

सर्व उत्तेजक पदार्थ बंद करावे. चहा, काफी देखील पिऊं नये. पेजेसारखे पातळ पदार्थ घ्यावे.

**विलंबी मूत्राशयदाहः**—हा बहुतकरून तीव्र प्रकाराच्या परिणामीं होतो. किंवा तो प्रथमच विलंबी स्थितींत

उत्पन्न होतो. मूत्राशयदाहाचा हाच प्रकार बहुधा वारंवार दृष्टीस पडतो.

**कारणें:**—वर तीव्र प्रकाराचीं जीं कारणें सांगितलीं त्यांखेरीज मूत्रमार्गसंकोचविकार झाल्यानें मूत्राशयाचा विलंबी दाह उत्पन्न होतो, किंवा प्रास्टेट नामक पिंडास विकार झाल्यानेंही तो उत्पन्न होतो. शिवाय मूत्राशयाच्या स्नायूंचा शक्तिऱ्हास झाल्यानेंही तो उद्भवतो.

**लक्षणें:**—बहुतेक तीव्र प्रकाराप्रमाणेंच असतात, परंतु तीं फार सौम्य असतात. ह्यांत मूत्र प्रथम कांहीं दिवस स्वच्छ असतें, नंतर त्यांतून त्वचेचे सूक्ष्म तंतू व चिथड्या वाहूं लागतात, त्यामुळें मूत्र पुवासारखें दिसतें. कधीं कधीं त्वचेच्या चिथड्या मूत्रनळांत अडकून लघवी बंद होते. मूत्र एखाद्या पात्रांत धरून ठेविलें असतां, मूत्रांतील त्वचेचे तंतू पात्राच्या बुडास चिकटलेले असतात.

**गति:**—योग्य उपचार झाले असतां, बहुधा रोगी बरा होतो. नाहींतर रोगी क्षीण होऊन किंवा दाह मूत्रपिंडांत पसरून, मूत्रविसर्जन बंद पडतें आणि रोगी मरण पावतो.

**उपचार:**—प्रथमतः तीव्र प्रकारांत सांगितलेले उपचार करावे. विकार जुना झाला ह्मणजे इन्फ्यूजन ऑफ बकू किंवा युवा आर्सि २ औं., प्रमाणानें दिवसांतून तीन वेळां द्यावा. किंवा बालसम कोपेबा १० मि., लिकर पोट्यासी १० मि., टिंक्चर हायोसियामस १० मि., गोंदाचें पाणी २ ड्रा., पेपरमिंट वाटर १ औं., असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. दुर्गंधयुक्त मूत्र असतें तेव्हां मूत्राशय, बोऱ्यासिक

आसिड १६ ग्रे., कोंबट पाणी ८ औं., यांच्या मिश्रणानें धुतला पाहिजे. ही क्रिया शस्त्रवैद्याकडून करवावी.

**पथ्यः**—तीव्र प्रकाराप्रमाणेंच ठेवावें.

---

## प्रमेह (परमा).

GONORRHŒA.

हा विशिष्ट जातीचा सांसर्गिक रोग आहे. तो व्यभिचारी स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियाचे पिच्छात्वचेस § होतो. त्याचा संसर्ग पुरुषांस शिस्न मुखांत व स्त्रियांस बहुधा योनींत होतो. आणि त्यापासून दाह उत्पन्न होऊन, चिकट लसेचा किंवा पिंवळट रंगाच्या पुवाचा स्राव होऊं लागतो. ह्या स्थितीस प्रमेह किंवा परमा असें ह्मणतात.

**कारणें:**—मलिन आणि अनियमित मैथुनापासून एक विशिष्ट प्रकारचें प्राणिज विष उत्पन्न होतें आणि त्यापासून ह्या रोगास प्रारंभ होतो. नंतर संयोगद्वारें तो अनेक मनुष्यांस होतो. पुरुषांत हा विकार मूत्रनळाचा पुढचा भाग व्यापितो व कधीं कधीं मूत्राशयाच्या पिच्छात्वचेंतही पसरतो. स्त्रियांत योनीच्या पिच्छात्वचेस होतो व क्वचित् गर्भाशयाच्या पिच्छात्वचेंत आणि मूत्रमार्गांतही पसरतो.

**लक्षणें:**—ह्या रोगाच्या तीन अवस्था आहेत. क्षुब्धावस्था, तीव्रावस्था आणि मंदावस्था.

**क्षुब्धावस्थाः**—ही अवस्था संयोगानंतर बहुधा चार पांच दिवसांनीं उत्पन्न होते. तेव्हां रोग्याचे मूत्रनळामध्यें आणि विशेषेंकरून शिस्नाचे तोंडीं खाज व चुरचुर सुटते

---

§ भाग १ ला, पृष्ठ १३८ पहा.

आणि आग होते. मूत्रमार्गाच्या छिद्राचे ओंठ किंचित् सुजतात व लाल होतात आणि शिस्न बोटामध्यें दाबलें असतां त्यामधून लसमिश्रित पू बाहेर पडतो. कधीं कधीं हीं लक्षणें संभोगानंतर लागलींच उद्भवतात. ह्या स्थितीस २४ तास झाल्यानंतर तीव्रावस्थेस आरंभ होतो.

**तीव्रावस्थाः**—ह्या अवस्थेंत पुवाचा स्राव विपुल, घट्ट, व कांहींसा हिरवट पिंवळ्या रंगाचा किंवा रक्तमिश्रित असा असतो. लघवीस वारंवार होतें आणि लघवी करितांना तिडका मारतात व आग होते. शिस्न सुजतें आणि मूत्रमार्ग सुजल्यामुळें लघवीची धार बारीक होते. जननेंद्रियाजवळील भाग ह्मणजे कमर, मांड्या, वृषण व त्याखालचा भाग हीं सर्व दुखूं लागतात. रात्रीं वारंवार शिस्नोत्थान होऊन फारच वेदना होऊं लागतात आणि शिस्न वक्र होते. ह्या स्थितीस इंग्रजी वैद्य 'कार्डी' (chordee) असें ह्मणतात. ह्या अवस्थेंत बराच ज्वर येतो. हीं लक्षणें बहुशः १५ पासून २० दिवसांनीं कमी होऊन मंदावस्थेस आरंभ होतो.

**मंदावस्थाः**—ह्या अवस्थेंत सर्व दाहजनक लक्षणांचें हळूहळू उपशमन होतें. ह्मणजे, ठणका, आग व सूज हीं कमी होत जातात. तरी पातळ, पांढऱ्या लसमिश्रित पुवाचा स्राव होत असतो. ह्या अवस्थेंत योग्य उपचार झाले असतां रोगी बरा होतो, नाहींतर स्राव वर्षानुवर्ष चालू रहातो. ह्या स्थितीस इंग्रजींत ग्लीट (गळ) असें ह्मणतात. ही स्थिति दूर होणें कठिण पडतें. तृतीयावस्थेंत जरी दाह कमी असतो, तरी स्रावाचा सांसर्गिक गुण कमी होत नाहीं. हा सांसर्गिक गुण स्त्रियांत फारच प्रबळ असतो.

**पथ्य व उपचारः**—क्षुब्धावस्थेंत रोग्यानें स्वस्थ निजून रहावें व श्रम करूं नयेत. आहार अल्प आणि अनुत्तेजक असा ठेवावा, ह्मणजे गव्हांची पोळी, वरण, भात, किंवा तांदुळाची पेज, उकडलेली पालेभाजी, आणि चालत असल्यास अळणी मांसरस, अशा रीतीचा असावा. परंतु मद्य, मांस, आणि अंडीं हीं उपयोगी नाहींत. तसेंच मिरची, मसाला, चहा, काफी, तेलकट आणि आंबट पदार्थ खाऊं नयेत. मद्य पिण्याची संवय असल्यास आणि त्यावांचून चालत नसल्यास ताडी किंवा जिन नांवाची दारू घ्यावी. स्त्रीसंयोग वर्जावा, आणि रात्रीं जागरण करण्याचेंही सोडावें. प्रथमावस्थेंत २ ग्रे. सल्फेट ऑफ झिंक आणि १ औंस पाणी, ह्या मिश्रणाची पिचकारी मूत्रनळांत दिवसांतून तीन चार वेळां मारावी. परंतु त्यापासून कांहीं इजा होतेशी वाटल्यास पिचकारी मारणें बंद करावें. (पिचकारी मारण्याचा प्रकार पुढें शेवटीं दिला आहे.) शिस्नावर थंड पाण्याची घडी ठेवावी. शिस्न लंगोटीनें सांवरून ठेवावें, रेचक द्यावें, ह्मणजे पावडर जालप २० ग्रे., आसीड टॉर्टेट ऑफ पोव्याश ४० ग्रे., हीं गुलकंदांत मिश्र करून खावीं आणि दुसरे दिवशीं पुढील औषध घ्यावें. लिकर अमोनिया असिटेटीस २ ड्रा., स्पिरिट ऑफ नैट्रिक ईथर २० मि., म्याग्नीशिया सल्फस १ ड्रा., कापराचें पाणी १ औंस (यादी नंबर १४ भाग प.) असें मिश्रण करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें. पुढें दुसरी अवस्था प्राप्त झाल्यावर शिस्न सुजतें आणि विटपस्थानीं*

---

* वृषणाचे खालचा भाग जो खालीं गुदापर्यंत पोंचतो. तो त्यास इंग्रजींत पेरीर्गयन् असें ह्मणतात.

स्पर्श असह्य होतो, ह्मणून रोग्यानें कमरेपर्यंत उष्ण पाण्याच्या पिपांत अर्ध तासपर्यंत बसावें. किंवा अफूच्या बोंडांचा कांढा करून त्यानें ते भाग शेकावे. शिस्नावर उष्ण पाण्याची घडी ठेवून त्यावर ऊन पाणी वारंवार सोडीत असावें. आणि पुढील औषधें घ्यावीं. आळशीचा फांट २ औंस (यादी नंबर ३४ भाग प.), सोरा २० ग्रेन (पोव्याश नैट्रस) असें एकत्र करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा म्याग्नीशिया सल्फस १ ड्राम, टिंक्चर हयोसियामस् १० मि., स्पिरिट ऑफ नैट्रिक इथर २० मि., पोव्याश नैट्रस १० ग्रेन, व्हाइना अंटीमोनियेलीस ३ मि., कापराचें पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. विटपाचा दाह कमी न झाल्यास त्याचे वेदनायुक्त भागास १०–१२ जळवा लावाव्या. नंतर अफूच्या बोंडांचे काढ्यानें शेकावें, ह्मणजे त्या ठिकाणचा दाह व वेदना कमी होतील. त्या अवस्थेंत वक्र शिस्नोत्थान होतें, त्यामुळें फार वेदना होत असतात व रात्रीं झोंप येत नाहीं; तेव्हां तीन ग्रेन कापूर व एक ग्रेन अफू यांची गोळी करून सकाळ संध्याकाळ खावी; किंवा ३ ग्रेन कापूर, २ ग्रेन एक्स्ट्र्याक्ट हायोसियामस, आणि $\frac{1}{4}$ ग्रेन एक्स्ट्र्याक्ट बेलाडोना, ह्यांची गोळी करून सकाळ संध्याकाळ खावी; किंवा २ ग्रेन अफू, २ ग्रेन कापूर, आणि ५ ग्रेन रातांबेल (कोकमाचें तेल) यांची एक चिंचोळी गोळी करून ती रात्रीं निजण्याचे पूर्वी एक तास गुदांत शिरवून ठेवावी, ह्मणजे वेदना कमी होऊन झोंप येते.

**पथ्यः**—प्रथमावस्थेंत सांगितल्याप्रमाणें असावें.

तिसऱ्या अवस्थेंत दाह कमी झाल्यावर पुढील औषधें घ्यावीं. बालसम् कोपेबा १० मि., लिकर पोट्याशी १० मि., पोट्याशी नैट्रस १० ग्रे., टिंक्चर हयोसियामस २० मि., पाणी १ औं., असें मिश्रण करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें; किंवा बालसम् कोपेबा ३० थेंब, कबाबचिनीची भुकणी १ ड्रा., गोंदाची भुकणी १ ड्रा., हीं सर्व एकत्र करून साखरेच्या पाकांत तीन गोळ्या कराव्या आणि चार चार तासांनीं एक एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर खावी. किंवा चंदनी तेल १० थेंब, म्याग्नीशिया कार्बोनस १० ग्रे., साखरेचा पाक १ तोळा, गुलाबपाणी १ घोटभर, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें; किंवा बालसम् कोपेबा ३० मि., फेराय कार्बोनस साकरेटा १२ ग्रे., कबाबचिनीची भुकणी १ ड्रा., हीं सर्व साखरेच्या पाकांत घोटून त्याच्या तीन गोळ्या कराव्या आणि चार चार तासांनीं एक एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर घ्यावी. वरील औषधापासून उलटी होऊं लागल्यास बर्फ आणि सोडावाटर घ्यावें किंवा म्याटिको क्यापसूलस घ्यावे. हीं घेण्यास सोईचीं पडतात. ह्या अवस्थेंत शेवटीं पिचकाऱ्या उपयोगी पडतात. परंतु दाह तीव्र असल्यास पिचकारीपासून मूत्रमार्गसंकोच किंवा वृषणदाह होण्याचा संभव असतो, ह्मणून दाहाचा जोर कमी झाल्याशिवाय पिचकाऱ्या मारूं नयेत. पिचकारी पुढील औषधांची योजावी. प्लंबाय असिटस २ ग्रे., टिंक्चर ओपाय (अफूचा अर्क) १० थेंब, पाणी १ औं., ह्या मिश्रणाची पिचकारी दिवसांतून दोन वेळां मारावी किंवा लिकर पोट्याशी परम्यां-

गनस १० थेंब, पाणी १ औंस, ह्या मिश्रणाची पिचकारी दिवसांतून दोन वेळां मारावी; किंवा तुरटी (फटकी) २ ग्रे., पाणी १ औं., ह्या मिश्रणाची पिचकारी दिवसांतून दोन वेळां मारावी; किंवा म्याटिको इंजेक्शन मारावें. स्राव बंद होतांच पिचकाऱ्या बंद कराव्या, नाहींतर पुन्हां स्राव उत्पन्न होईल. पिचकारीपासून वेदना होऊं लागल्या किंवा रक्तस्राव होऊं लागला, तर पिचकाऱ्या मारणें बंद करावें.

गळ:—(ग्लीट) ही प्रमेहाची चतुर्थावस्था होय. प्रमेह-विकार ही अवस्था पावला ह्मणजे तो बरा होणें कठिण पडतें. ह्या स्थितींत रोग्यानें रोज समुद्रस्नान करावें, शुद्ध हवेवर रहावयास जावें, पथ्य मागें प्रथमावस्थेंत सांगितल्या-प्रमाणेंच ठेवावें आणि पुढील औषधें घ्यावीं:—कबाबचिनीची भुकणी १ ड्राम, फेराय आक्सीडम् १५ ग्रेन, गोंदाची भुकणी ३० ग्रेन, हीं सर्व एकत्र घोटून त्याच्या ६ गोळ्या कराव्या आणि दर चार चार तासांनीं दोन गोळ्या पाण्याच्या घोटाबरोबर घ्याव्या. किंवा टिंक्चर फेराय परक्लोरीडाय १० मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें; किंवा टिंक्चर फेराय परक्लोरीडाय १० मि., टिंक्चर क्यानाबिस इन्डीका ५ मि., टिंक्चूरी क्यांथारिडिस ३ मि., इन्फ्यूजन काशिया १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा कापूर ३ ग्रेन, फेराय आक्सीडाय १२ ग्रेन, एक्स्ट्रॅक्ट क्यानाबिस इन्डीका ३ ग्रेन, एक्स्ट्रॅक्ट नक्सव्हामीका १॥ ग्रेन, ह्यांच्या ६ गोळ्या करून दर चार चार तासांनीं एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर घ्यावी.

लघवीनंतर वेदना होत असतात आणि लघवींत पिच्छा ह्मणजे दोराळ व चिकट लस किंवा कापसासारखा रेषामय तवंग जो कांहीं वेळानें किंवा तावडतोब सांचत असतो, तो पडत असल्यास, इनफ्यूजन बकू ह्मणजे बकू फोलिया $\frac{1}{2}$ औं., आधणाचें पाणी १० औं., हीं एका भांड्यांत झांकून तासभर भिजत घालून नंतर गाळून दिवसांतून दोन तीन वेळां २ औं., प्रमाणानें घ्यावीं. किंवा युवाअर्साचीं पानें $\frac{1}{2}$ औंस, आधणाचें पाणी १० औंस, हीं दोन तास एकत्र झांकून ठेवावीं; नंतर गाळून दर वेळेस दोन औंस प्रमाणें दिवसांतून दोन तीन वेळां घ्यावें. गळ जुनी झाल्यावर पुढील औषधांच्या पिचकाऱ्या माराव्याः—क्लोराईड ऑफ झिंक १ ग्रेन, पाणी ४ औंस, ह्या मिश्रणाची पिचकारी दिवसांतून दोन तीन वेळां मारावी. किंवा नैट्रेट आफ सिल्व्हर १ ग्रेन अर्कोदक (डिस्टिल्ड वाटर) १ औंस, ह्या मिश्रणाची पिचकारी मारावी आणि मूत्रनळाचे बाहेरचे बाजूस आयओडीन पेंट लावावें, किंवा ब्लिस्टर मारावें (यादी नं. २२ भ. प.). ज्यांस अनेक वेळां प्रमेह झाला आहे, किंवा ज्यांची प्रकृति आमवातानें, कफक्षयानें किंवा गंडमाळेनें बिघडली आहे, त्यांस ह्या रोगांतून बरें होणें कठिण पडतें. अशा स्थितींत औषध बरेच दिवस चालू ठेवलें पाहिजे ह्मणजे फायदा होतो.

**पिचकारी मारण्याचा प्रकारः**—ही क्रिया रोग्यानें स्वतः करण्यासारखी आहे. ह्मणजे रोग्यानें खुर्चीच्या किंवा बाकाच्या पुढेंच कांठाशीं बसून ज्या द्रवाची पिचकारी मारणें असेल तो द्रव एका कांचपात्रांत घेऊन तो एखाद्या बोंथट किंवा गोल तोंडाच्या कांचेचे पिचकारींत भरून तिचें टोंक

मूत्रमार्गांत सरासरी अर्ध इंचपर्यंत आंत घालून शिस्न डाव्या हाताचे बोटांनीं पिचकारीवर मूत्रनळाचे शेवटीं दाबून धरावें, ह्मणजे द्रव मूत्रनळांत जात असतां बाहेर पडणार नाहीं. नंतर उजवे हाताचा आंगठा आणि त्याचे शेजारील बोट खेरीजकरून बाकीच्या बोटांनीं पिचकारी सांवरावी. आणि उजवे तर्जनीनें (आंगठ्या शेजारील बोटानें) पिचकारीचा दट्टया सावकाश चेपावा. नंतर पिचकारी मागें ओढावी आणि मूत्रछिद्र दोनचार मिनिटें दाबून धरून नंतर मोकळें सोडावें, ह्मणजे द्रव मूत्रमार्गास लागून बाहेर पडतो.

**मराठी औषधें:**—गुळवेलीचा आंगरस अर्ध तोळा व मध पाव तोळा अशीं एकत्र करून घ्यावीं; किंवा आपट्याच्या पाल्याचा रस २ तोळे व साखर १ तोळा अशीं एकत्र करून सकाळसंध्याकाळ घ्यावें. किंवा वावडिंग, दारूहळद, ज्येष्टीमध, गोखरू यांचा काढा मध घालून घ्यावा. किंवा हिरडा, बेहडा, आंवळकांठी, देवदार, दारूहळद, नागरमोथे ह्यांचा काढा मध घालून घ्यावा; किंवा वेलदोडे, शिलाजित, पिंपळी, पाषाणभेद, गोखरू, हीं सर्व समभाग घेऊन त्यांतील अर्ध तोळा चूर्ण सकाळ संध्याकाळीं तांदुळाचे धुणांत घ्यावें; किंवा वंशलोचन, गोखरू, कबाबचिनी, वेलदोडे, खडीसाखर, हीं सर्व समभाग घेऊन त्यांतील अर्धा तोळा चूर्ण सकाळसंध्याकाळ खावें; किंवा त्रिफळ्याची पूड मधांत खावी (यादी नंबर २४ भाग प.); किंवा लोहभस्म त्रिफळ्यांत घ्यावें (यादी नंबर २७ भाग प.); किंवा कबाबचिनी ४ भाग, लकडीरेवाचिनी ४ भाग, मायफळ ४ भाग, शंखजिरें ४ भाग, कात ½ भाग, कापूर ¼ भाग, ह्या सर्वांचें वस्त्रगाळ

चूर्ण करून त्याच्या चंदनी तेलांत वाटाण्याएवढाल्या गोळ्या कराव्या आणि सकाळसंध्याकाळ दर वेळेस दोन गोळ्या साखरेच्या पाकाबरोबर खाव्या. परमा जुना असल्यास, गोखरू २ तोळे, बेदाणा २ तोळे, धने २ तोळे, कबाबचिनी २ तोळे, सफेत मुसळी २ तोळे, साखर ६ तोळे, पाणी ९ तोळे, हीं सर्व औषधें साधारण ठेचून रात्रभर भिजत ठेवावीं, नंतर सकाळीं गाळून त्याचे तीन भाग करावे आणि दर वेळेस एक भाग ह्याप्रमाणें दिवसांतून तीन वेळां घ्यावें. हें औषध सात दिवस घ्यावें. किंवा प्रवाळभस्म (यादी नं. ३३ भा. प.) ३ गुंजा सकाळसंध्याकाळ लोणी आणि खडीसाखरेशीं खावें. किंवा वंग १ गुंज, गोखरूंची पूड ·||· तोळा, आंवळकाठीची पूड ·|· तोळा, गुळवेलीचें सत्व ४ मासे, साखर १ तोळा असें एकत्र करून सकाळ संध्याकाळ खावें.

**शुष्कप्रमेहः**—(Gonorrhœa Sikka.) हा एक प्रमेहाचा प्रकार आहे. ह्यांतील सर्व चिन्हें प्रमेहासारखीं असून स्राव मात्र होत नसतो.

**उपचारः**—क्षारमय मिश्रण द्यावें (यादी नं. २९ भा. प.). शिस्नावर थंड पाण्याची घडी ठेवावी ह्मणजे फायदा होतो. किंवा मागें सांगितलेले प्रमेहावरील उपाय करावे.

---

## स्त्रीप्रमेह.

स्त्रियांत प्रमेहविकार संपूर्ण योनि व्यापितो. परंतु पुरुषांप्रमाणें स्त्रियांत तो तीव्र नसतो. स्त्रियांचा मूत्रमार्ग योनीच्या

वरल्याभागीं व योनीपासून वेगळा असून आंखूड असतो, ह्मणून स्त्रियांस पुरुषांप्रमाणें मूत्रावरोध होण्याचा संभव कमी असतो.

चिन्हें:—योनीपासून पुष्कळ पुवाचा स्राव होत असतो. योनीचे कांठ सुजतात व दुखूं लागतात, लघवीस वारंवार होतें व लघवी करितांना आग होते. वंक्षणापिंड सुजतात (बद होतात). स्त्रियांत प्रमेहविकार बरेच दिवस रहातो, आणि तो जसजसा जुना होत जातो, तसतसा तो धुपणी विकारापासून ओळखणें कठिण पडतें. कधीं कधीं हा विकार गर्भाशयापर्यंत पोहोंचून अंडाशयापर्यंत पोहोंचतो आणि असें झालें ह्मणजे ओटींत वेदना होऊं लागतात, ताप भरतो व रात्रीं झोंप येत नाहीं अशी स्थिति होते.

उपचार:—रोग्यानें स्वस्थ पडून असावें, श्रम करूं नयेत. हलका आणि अनुत्तेजक आहार घ्यावा. दाहयुक्त भागावर उष्ण पाण्याची घडी ठेवावी किंवा अफूच्या बोंडांचे काढ्यानें तो शेकावा. सलाईन मिक्श्चर द्यावें (यादी नं. २९ भा. प.) आणि पुढील औषधांच्या योनींत पिचकाऱ्या* माराव्या:—तुरटी (फटकी) १॥ मासा, पाणी ६ तोळे ह्या मिश्रणाची पिचकारी दिवसांतून तीन चार वेळां मारावी; किंवा लेड लोशनच्या पिचकाऱ्या माराव्या (यादी नंबर २१ भाग प.); किंवा झिंसी सल्फस् २० ग्रेन, पाणी १० औंस, ह्या मिश्रणाची पिचकारी मारावी किंवा त्रिफळ्याच्या काढ्याची पिचकारी मारावी (यादी नं. २४

---

* योनींत मारावयाच्या पिचकारीला चिंचोळें टोंक नसून चाळणीसारखीं अनेक छिद्रें असतात.

भा. प. ); किंवा लिकर पोट्यासी परम्यांगनस ३० थेंब, कोंवट पाणी १० औंस, ह्या मिश्रणाच्या पिचकाऱ्या दिवसांतून चार पांच वेळां माराव्या, आणि पिचकाऱ्या मारल्यावर सांगितलेल्या पिचकाऱ्यांच्या औषधांपैकीं एखादे औषधांत लिंटचा किंवा कापसाचा बोळा भिजवून तो योनींत घालून ठेवावा. प्रमेह मूत्रमार्गांत पसरला असल्यास, मागें प्रमेहप्रकरणीं सांगितलेलें कोपेबाचें मिश्रण द्यावें.

---

## भेदक विचार.

प्रमेहासारखा स्राव ज्या कारणांनीं उत्पन्न होतो तीं कारणें:—अति मैथुन, मूत्रशलाका मूत्रमार्गांत घालणें, घोड्यावर फार वेळ स्वारी करणें, जठरक्षोभ, मुतखडे, कृमि (जंत) इत्यादिकांच्या क्षोभानें, आणि अति कडक औषधें, मद्य, मिरच्या ह्यांच्या सेवनानें प्रमेहासारखा स्राव उत्पन्न होतो. आमवातप्रकृतीच्या मनुष्याचे मूत्रांत आम्लक्षाराचें प्रमाण ज्यास्त झाल्यानेंही हा स्राव उत्पन्न होतो. स्त्रिया रजस्वला असतां किंवा त्यापूर्वीं योनींतून कांहीं क्षोभक स्राव होत असतो, अगर प्रसूतीनंतर स्राव होत असतो, त्या वेळीं अथवा स्त्रियांना धुपणीचा विकार असतां त्यांच्याशीं संयोग घडल्यानें मूत्रमार्गांत दाह उत्पन्न होऊन प्रमेहासारखा स्राव होऊं लागतो व लघवी करितांना जळजळतें. परंतु ह्या स्थितीस 'मूत्रमार्गदाह' (यूरिथ्रायटीस Urithrites) असें ह्मणतात. धुपणीखेरीज करून स्त्रियांत प्रमेहासारखा स्राव योनी अस्वच्छ ठेवल्यानें आणि दंतोद्भवाचे वेळीं कधीं कधीं होत असतो.

मूत्रमार्गदाहाचीं लक्षणें बहुतेक प्रमेहासारखीं असून उपचारही तेच लागू पडतात. प्रमेहविकार वर सांगितलेल्या कारणांनीं उद्भवलेल्या स्रावापासून ओळखणें फार कठिण आहे, तरी ज्या स्त्रीपुरुषांचा संयोग झाला त्यांची वर्तणूक (सभ्य किंवा व्यभिचारी), तसेंच वय, प्रकृति, हकीकत ह्मणजे वर सांगितलेल्या एखाद्या कारणापासून स्राव उत्पन्न झाला किंवा कसें यावरून आणि रोग उद्भवल्याचा काळ ह्मणजे संयोग झाल्यानंतर लागलीच किंवा कांहीं आठवड्यांनीं स्राव सुरू झाला ह्याची चवकशी केली ह्मणजे बहुतेक खात्री होते.

**प्रमेहानुषंगिक विकार किंवा त्याचे परिणामः**— प्रमेह जरी अगदीं स्थानिक रोग आहे, तरी शरीरांत तो फार दिवस राहिल्यानें त्याच्या विषाचें शोषण होऊन अशक्त प्रकृतीच्या मनुष्यांत कधीं त्यापासून खालीं दिलेले सार्वदेहिक* विकार उत्पन्न होतातः—१ वक्रशिस्नोत्थान, २ वाघणा किंवा बद, ३ निरुद्ध प्रकाश, ४ परिवर्तिका, ५ मूत्राशयक्षुब्धावस्था, ६ मूत्रावरोध, ७ मूत्रमार्गांतर्गत रक्तस्राव, ८ मूत्रमार्गसंकोच, ९ नासिकादाह, १० त्वग्विकार, ११ चामखीळ, १२ वीर्यस्राव, १३ विटपविद्रधि, १४ नेत्रदाह, १५ संधिवात, १६ वृषणदाह इ०.

**वक्रशिस्नोत्थानः**—(Chordee) ह्याविषयीं वर प्रमेहाचे दुसरे अवस्थेंत सांगितलें आहे.

**वाघणा किंवा बदः**—(Bubo) प्रमेहक्षोभापासून कधीं

---

* प्रमेहाचे हे सार्वदेहिक विकार उपदंशाचे (गरमीचे) सार्वदेहिक विकारांप्रमाणें हटकून होतात असें नाहीं.

कधीं कोमल प्रकृतीच्या मनुष्यास बद होतात. ते पुबळणास न येतां बसतात.

**उपचार:**—जळवा लावाव्या, शेक करावा, लेड लोशनची ( यादी २१ भा. प. ) किंवा स्पिरिट ऑफ वाईन अर्धा औंस, अमोनियम क्लोराईड १ ड्राम (नवसागर), प्लंबाय असिटस अर्धा ड्राम, पाणी १० औंस ह्या मिश्रणांत भिजविलेली कापडाची घडी सतत ठेवावी किंवा काळें प्लास्टर (यादी नं. १६ भा. प.) लावावें.

**निरुद्धप्रकाश:**—( Phymosis ) ह्यांत प्रमेहक्षोभामुळें शिस्नमण्यावरील कातडी सुजून मण्यावर घट्ट बसते; मागें सरकत नाहीं आणि तिचें तोंड आवळतें.

**उपचार:**—थंड पाण्याची किंवा लेड लोशनची घडी ठेवावी ( यादी नं. २१ भा. प. ). ह्यानें कांहीं फायदा न झाला तर शस्त्रवैद्याकडे जावें.

**परिवर्तिका:**—( Paraphymosis ) ह्यांत शिस्नमण्यावरील कातडी उरफाटी सरकून मण्याचे कंगोऱ्यामागें गच्च बसते आणि तिचे दाबामुळें जलशोथ ( पाण्यानें भरलेली सूज ) उद्भवतो आणि वेदना होऊं लागतात.

**उपचार:**—हा प्रकार क्वचित् होतो. सुजेवर लेड लोशनची घडी ठेवावी ( यादी नं. २१ भा. प. ). सूज कमी झाल्यावर रोग्यास उंचशा जागीं निजवून आपल्या डाव्या हाताच्या मुठींत शिस्न धरावें, आणि उजव्या हाताचे पांची बोटांस आणि शिस्नमण्यास तिळाचें तेल चोपडून त्या सर्व बोटांनीं शिस्नमणी मागें लोटावा. नंतर डाव्या हाताचे मुठीनें ती सुजीर चामडी पुढें ओढावी, ह्मणजे मागें परत-

लेली चामडी जागचेजागीं येऊन बसते. नंतर त्यावर थंड पाण्याची किंवा लेड लोशनची घडी रात्रंदिवस ठेवावी. ही क्रिया साधारणपणें फार कठिण आहे, ह्मणून ती शस्त्रवैद्याकडून करवावी.

**मूत्राशयक्षुब्धावस्था:**-(Irritability of the Bladder) ह्यांत लघवीस वारंवार होतें आणि लघवी करितांना फार क्लेश होतात. ओटींत आणि विटपांत (पेरिनियमांत) दुखतें आणि त्या ठिकाणीं सूज येतें.

**उपचार:**—विटपास जळवा लावाव्या किंवा खसखशीच्या बोंडाचे काढ्यानें शेंकावें. डोवर्स पावडर ५ ग्रेन प्रमाणें, दिवसांतून दोन वेळां पाण्यांतून घ्यावी. किंवा टिंक्चर हायोसियामस् १० मि., पोट्याशी नैट्रस १० ग्रे., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. वेदना फार होत असल्यास मागें तीव्र मूत्राशयदाहप्रकरणीं सांगितलेली फलवर्ती गुदांत शिरवावी.

**मूत्रावरोध:**—( Retention of urine ) मूत्रनळाची अंतस्त्वचा प्रमेहदाहामुळें सुजून कधीं कधीं मूत्रावरोध होतो.

**उपचार:**—विटपास जळवा लावाव्या. उष्ण पाण्याचे पिपांत बसावें. सलाईन मिक्श्चर (यादी नं. २९) घ्यावें. ह्मणजे मूत्रविसर्जन होतें. परंतु तें २४ तासपर्यंत न झालें तर शस्त्रवैद्याकडे जाऊन शलाकाप्रयोग करावा, ह्मणजे मूत्रावरोध दूर होतो.

**मूत्रमार्गांतर्गत रक्तस्राव:**-(Urethral Hamorrhage) कधीं कधीं मागें सांगितलेले वक्रशिस्नोत्थानस्थितींत किंवा

मूत्रावरोधासाठीं मूत्रमार्गांत शलाका शिरविल्यानें त्यांतून रक्तस्राव होऊं लागतो.

**उपचारः**—रक्तस्राव अल्प असल्यास हितावह होतो, परंतु ज्यास्त होऊं लागल्यास शिश्नासभोंवतीं थंड पाण्याची घडी गुंडाळून त्यावरून पट्टा बांधावा. ह्या उपायांनीं रक्तस्राव बंद न झाल्यास शस्त्रवैद्याकडे जावें.

**मूत्रमार्गसंकोचः**—( Stricture of the urethra ) प्रमेहस्राव वर्षानुवर्षे चालू राहिल्यानें किंवा प्रमेहविकार वारंवार झाल्यानें मूत्रमार्गाची पिच्छात्वचा मंद दाहानें जाड होते. तेणेंकरून मूत्रमार्गसंकोच होतो. असा संकोच आघातादि इतर कारणांनींही होतो. मूत्रमार्ग एकाच ठिकाणीं किंवा अनेक स्थानीं संकोच पावतो.

**चिन्हें**—मूत्रमार्गसंकोच झाला असतां लघवीची धार अगदीं बारीक होते किंवा बंद होते, नंतर ओटी ताठून जाते, ताप भरतो आणि विटपांत कळा लागतात.

**उपचारः**—कमरेपर्यंत ऊन पाण्याचे पिपांत अर्धा तास बसावें. रेचक घ्यावें (यादी नं. ११ भा. प.). नंतर टिंक्चर फेराय परक्लोरिडाय १० मि., पाणी १ औंस असें मिश्रण तीन तीन तासांनीं घ्यावें. २४ तासांपुढें शलाकाप्रयोग करावा.

**प्रमेहजन्य नासिकादाहः**—(Inflammation of the Nose) ह्या विकारांत कधीं कधीं नाक सुजून स्पर्शासह्य होतें, व त्यांतून पू वाहूं लागतो आणि घाण येते.

**उपचारः**—पिकवणें ( यादी नं. १० भा. प. ) बांधावीं. किंवा अफूच्या बोंडाचे काढ्यानें नाक शेकावें आणि तुरटीच्या पाण्याच्या पिचकाऱ्या माराव्या ( तुरटी १६ ग्रेन, पाणी ४

औंस ). किंवा झिंसीसल्फस ८ ग्रेन, पाणी १ औंस, ह्या मिश्रणाच्या पिचकाऱ्या सांजसकाळ माराव्या; नंतर आयडो-फार्मची भुकणी दाहयुक्त भागावर पसरावी. पोटांत सार्सो-परिलाचा काढा घ्यावा ( यादी नं. ६ भा. प. ), किंवा उपळसरीचा काढा करून घ्यावा, किंवा गंधकरसायन ( यादी नं. ३९ ) द्यावें.

**प्रमेहपिटिका**:—(Gonorrhœal eruption) प्रमेह झाल्यानंतर दोन तीन महिन्यांनीं अंगावर गुलाबी किंवा कधीं कधीं पांढऱ्या खवलांनीं युक्त अशीं मंडळें उठतात. हीं मंडळें बहुधा छाती व पोट ह्या ठिकाणीं उठतात. ह्यांस ताम्र रंग नसतो. ह्यांबरोबर घसा, तालूचा मृदु भाग आणि पडजीभ हीं आरक्त होतात, किंवा त्यांवर उथळ क्षतें पडतात.

**उपचार**:—जुलाब घ्यावा ( यादी नं. ११ भाग प. ), नंतर पोट्याश आयओडाईड ३ ग्रेन, सार्सापरिलाचा काढा १ औंस ( यादी नं. ६ भाग प. ), ह्याप्रमाणें दिवसांतून तीन वेळां घ्यावें किंवा गंधकरसायन ( यादी नं. ३९ ) द्यावें.

**चामखीळ**:—(Warts) प्रमेहस्रावाच्या क्षोभापासून शिस्नावर किंवा मूत्र बाहेर पडण्याच्या ठिकाणापाशीं चामखीळ होतात. त्यावरील उपचार पहिल्या भागांत चामखीळ प्रकरणांत सांगितले आहेत.

**प्रमेहजन्य वीर्यस्राव**:—(Spermatorrhœea) ह्याविषयीं पहिल्या भागांत विचार केला आहे.

**विटपविद्रधि**:—(Pireneal Abscess) प्रमेहस्रावामुळें मूत्रमार्गसंकोच होतो, त्यामुळें लघवीचे वेळीं कुंथावें लागतें, कुंथल्यानें संकोचाच्या मागें मूत्रमार्ग विस्तृत होतो,

आणि विटपत्वचा फाटून लघवीचे वेळीं त्यांतून मूत्र पाझरतें व त्याच्या क्षोभानें तेथें विद्रधि होतो.

**लक्षणें**:—विटप सुजतो, ठणकतो व आग होते.

**उपचारः**—पोटिसें बांधावीं ( यादी नं. १० भा. प. ). पिकल्यावर शस्त्रवैद्याकडून चिरवावें.

**प्रमेहजन्य नेत्रदाहः**—(Opthalmia) प्रमेहाचा पू नेत्रांस लागल्यामुळें नेत्रांत दाह उत्पन्न होतो. संसर्गानंतर सुमारें ४८ तासांनीं नेत्रपिच्छात्वचा सुजून लाल होते. प्रथम पापण्या सुजून त्यांस कंडू सुटतो आणि रेती शिरल्याप्रमाणें खूप उद्भवते. नेत्रांत आग होते व त्यांतून एकसारखे अश्रु वहात असतात, त्याबरोबर लसमिश्रित पूही वाहतो. उजेडाकडे पहावत नाहीं आणि डोळे उघडून पाहिलें असतां त्यांतील सफेत भाग आरक्त झालेला दृष्टीस पडतो.

**उपचारः**—डोळ्यांचा व्यापार जितका बंद ठेववेल तितका ठेवावा. डोळा वारंवार ऊन पाण्यानें किंवा बोऱ्यासिक आसिड ४ ग्रेन, पाणी २ औंस ह्या मिश्रणानें धुवावा. सुजेवर लेडलोशनची घडी ठेवावी. क्षारमय मिश्रण (यादी नं. २९) दिवसांतून दोन वेळां द्यावें. पुढें एक दोन दिवसांनीं सार्सोपरिलाचा काढा (यादी नं. ६ भा. प.) द्यावा, किंवा गंधक रसायन द्यावें. शिवाय नैट्रेट ऑफ सिल्व्हर २ ग्रेन, बाष्पोदक १ औंस ( डिस्टिल्ड वाटर ) हीं एकत्र करून तो द्रव एका निळसर स्वच्छ बाटलींत भरून ठेवावा व त्याचे सांजसकाळ दोन थेंब डोळ्यांत सोडावे; किंवा स्वच्छ तुरटी ४ ग्रेन, बाष्पोदक १ औंस ह्या मिश्रणाचे दोन दोन थेंब डोळ्यांत सोडावे आणि अफूच्या बोंडांचे काढ्यानें डोळा शेकावा.

**प्रमेहजन्य संधिवातः**—(Rheumatism) प्रमेहस्राव सुरू असतांच बहुतकरून संधिविकार उत्पन्न होतो. तो बहुधा पायाची खोट आणि तळपाय यांत प्रथम सुरू होऊन नंतर गुल्फसंधि आणि ढोंपर हीं धरतात. क्वचित् इतर संधींसही विकार होतो. संधि धरले असतां त्यांत वेदना होतात, संधी सुजतात, लाल होतात, ताप भरतो, आणि रात्रीस झोंप येत नाहीं. संधींत बहुशः पू होत नाहीं; झालाच तर संधींतील *कुर्चेचा नाश होऊन सांधा ताठ होतो. असें झालें ह्मणजे सांध्यांत चालतांना कटकट असा आवाज होतो.

हा विकार बहुतकरून तरुण मनुष्यांस आणि ज्यांच्या शरीरांत रक्ताधिक्य झालें असेल अशा मनुष्यांना किंवा गंडमाळाजनकप्रकृतीच्या मनुष्यांस प्रमेहविकार झाला असतां होतो.

**उपचारः**—प्रमेहस्राव चालू असल्यास तो प्रमेहावरील उपायांनीं बंद करावा. सांध्याचे चलनवलनादि व्यापार बंद ठेवावे, सांधा स्थिर ठेवावा, गुडघा सुजला असल्यास, तो लांब सरळ करून ठेवावा. सांधा अफिणीचे बोंडांच्या काढ्यानें शेकावा व त्यावर कापूस आणि फलाणीनच्या कपड्याचा पट्टा बांधावा. क्षारमय मिश्रण द्यावें ( यादी नं. २९ ). किंवा म्याग्नीशिया सल्फस १ ड्राम, व्हैनमकॉलची साय १० मि., टिंक्चर ऑफ हेनबेन १० मि., पेपरमिंटचें पाणी १ औंस, असें मिश्रण करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा पोट्याश आयओडाईड २ ग्रेन, सार्सापरिलाचा काढा १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा पोट्यासी नैट्रस १० ग्रे., पल्व्हीस डोव्हराय ५ ग्रेन, अशीं एकत्र

*पातळ हाडासारखी त्वचा.

करून पाण्याचे घोटाबरोबर दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा आमवातप्रकरणांत सांगितलेला एखादा काढा घ्यावा. रोगी क्षीण असल्यास टिंक्चर सिंकोना १० मि., पोव्याश क्लोरस १० ग्रे., अमोनिया कार्बोनस २ ग्रे., स्पिरिट अमोनिया अरोम्याटिक १० मि., व्हैनमकॉलची साय १० मि., पेपरमिंटचें पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. पुढें दाहाचीं लक्षणें कमी झाल्यावर कापराचें तेल ( यादी नं. १३ भा. प. ) आणि टरपेन्टाईन हीं समभाग घेऊन सांध्यावर चोळावीं, किंवा वेदनाशामक तेल ( यादी नं. २८ ) सकाळ संध्याकाळ दहापांच मिनिटेंपर्यंत सांध्यावर चोळावें, नंतर सांधा ऊर्णवस्त्रांत गुंडाळून ठेवावा.

**पथ्यः**—आंबट, थंड खाऊं नये. कोरड्या हवेंत रहावें.

**प्रमेहजन्य वृषणदाहः**—(Orchitis) हा दाह प्रमेहस्राव सुरू असतांच अंडावर तडाका किंवा हिसका बसल्यानें अथवा त्यास शैत्य लागल्यानें अंडांत उद्भवतो. कधीं कधीं हा दाह प्रमेहजन्य आमवाताबरोबर उद्भवतो. हा दाह शिथिल अंडाचे मनुष्यांस होतो. प्रमेहजन्य अंडदाह बहुतकरून एकाच अंडास होतो. प्रमेहजन्य वृषणदाहाविषयीं दोन कल्पना आहेत. एक प्रमेहदाह वीर्यनळांतून अंडांत उतरल्यानें हा उद्भवत असावा, किंवा प्रमेहदाहाचें मूत्रनळांतून अंडांत स्थलांतर होऊन तो होत असावा.

प्रमेहपरिणामीं हा दाह अंडाचा *एपिडेडिमीस नांवाचा भाग व्यापितो. इतर कारणांपसून ह्मणजे आघात, उपदंश,

---

*वृषणपिंड ( अंड ) आणि वृषणरज्जु यांजमध्यें जो रज्जूंचा विस्तृत भाग असतो तो.

पादाग्ररोग किंवा गालगुंडांतील दाहाचें अंडांत स्थलांतर होऊन उत्पन्न झालेला अंडदाह सर्व अंड व्यापितो.

प्रमेहजन्यवृषणदाहाचे दोन प्रकार आहेत—तीव्र आणि मंद.

**लक्षणें:**—अंड सुजतो, जड होतो व दुखूं लागतो, चेपला असतां कळा जास्त होतात व कळा अंडरज्जूंतून मांड्यांत आणि कमरेंत पसरतात. लघवी करितांना किंचित् आग होते आणि शौच्यास साफ होत नाहीं. अंडदाहामुळें कधीं कधीं अंडवेष्टक पिशवींत दाहजनक स्राव पाझरून जलवृद्धि होते, त्यास इंग्रजींत "हैड्रोसील असें ह्मणतात.

**मंदप्रकार:**—ह्यांत अंड हळूहळू मोठा होतो आणि वेदनाही अल्प असतात.

**उपचार:**—रोग्यानें स्वस्थ पडून असावें. दाह तीव्र असल्यास अंडावर ६ जळवा लावाव्या. नंतर त्यावर अफूचे बोंडांचे काढ्याचा शेक करावा. लंगोटी लावावी व अंड लोंबकळूं देऊं नये. क्षारमय मिश्रण ( यादी नं. २९ ) घ्यावें. दाह उपदंशिक असल्यास पोट्याश आयओडाईड २ ग्रेन, सार्सापरिलाचा काढा १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें आणि अंडावर मरक्यूरियल प्लास्टर लावावें, ह्मणजे अंडदाहाचें शमन होतें.

अंडदाह मंदावस्था पावल्यावर अंडावर ब्लिस्टर मारावें (यादी नं. २२ भा. प.); किंवा अंडावरचे केंस काढून त्यासभोंवतीं चिकट पट्टी ( स्टिकिंग प्लास्टर Sticking plaster ) लपेटावी, ह्मणजे एका आठवड्याचे आंत अंडाची सूज व वेदना नाहींतशा होतात.

**पथ्य:**—आंबट, थंड, तिखट, तेलकट खाऊं नये.

# आमवात.

## RHEUMATISM.

ह्या रोगांत संधींचा आणि कित्येक तंतुमयत्वचेचा दाह होतो.

**उत्पत्तिः**—रक्तांत कांहीं विकृत पदार्थांचा संचय झाल्यानें हा रोग होतो, असें कित्येक वैद्यांचें मत आहे. परंतु अलीकडील बहुतेक वैद्यांचें असें मत आहे कीं, शरीरांत वियोजित होणाऱ्या ल्याक्टीक आसिड नामक पदार्थांचें शरीरांतून बरोबर उत्सर्जन न झाल्यामुळें तो पदार्थ रक्तांत जमून राहतो, आणि शैत्यानें किंवा पुढें सांगितलेल्या एखाद्या कारणानें हा रोग वातज्वराचे रूपानें बाहेर पडतो.

**कारणें:**—सर्द आणि ओलसर हवेंत व्यापार करणें, भिजलेलीं चिरगुटें अंगांत राहूं देणें, अतिशय श्रम झाल्यावर किंवा अंगांतून घाम निघत असतांना वाऱ्यावर उघडें बसल्यानें हा रोग होतो. कित्येकांना हा रोग वंशपरंपरेनें असतो. तो बहुतकरून १५–२५ वर्षांचे वयाचे मनुष्यास होतो. क्वचित् ह्या वयापूर्वी किंवा नंतरही होतो.

यकृत आणि पक्वाशय ह्यांच्या व्यापारांत अव्यवस्था झाल्यानें किंवा कोणत्याही रोगानें शरीरकृति बिघडली असतां, मनुष्य ह्या रोगास पात्र होतो. प्रमेह आणि उपदंश या रोगांत देखील आमवात रोग उद्भवतो.

स्त्रियांचा विटाळ बंद पडल्यानें अथवा गर्भाशयास कांहीं विकार जडल्यानें त्या ह्या रोगास पात्र होतात. हा रोग बहुतकरून पावसाळ्याचे सुमारास किंवा हिंवाळ्यांत होतांना आढळतो.

आमवाताचे तीन प्रकार आहेत, १ संधिमय आमवात, २ स्नायुमय आमवात आणि ३ उपदंशिक आमवात.

संधिमय आमवाताच्या तीन अवस्था आहेत, तीव्र, मध्यम आणि जुनाट.

**लक्षणें:**—तीव्र आणि मध्यम अवस्थेचीं लक्षणें बहुतेक सारखींच आहेत. मात्र तीं तीव्र प्रकारांत तीव्र असतात. तीव्र प्रकारांत बहुधा मोठ्या संधींना विकार होतो—ह्मणजे कोपर, मनगट, गुडघा, मांडीचा व पायाचा खुबा ह्या संधींस विकार होतो. विकृत संधि सुजतो, आरक्त होतो, तप्त होतो आणि त्यांत वेदना होऊं लागतात. वेदना चलनवलनानें आणि दाबल्यानें जास्त होतात. ह्यापूर्वी अस्वस्थता उत्पन्न होऊन थंडी लागून ताप भरतो. अंगाचें उष्णमान १०२ पासून १०४–५ पर्यंत वाढतें, नाडी पूर्ण व कधीं कधीं टणक असते, एका मिनिटांत तिची गति ११० पासून १२० पर्यंत वाढते, अंग ठणकतें, रात्रीस झोंप येत नाहीं, जिभेवर पांढरा तवंग जमलेला असतो, वारंवार तहान लागते, कोष्ठशुद्धि सफा होत नाहीं, मूत्र अल्प व आरक्त असतें, व किंचित् आग होते. ह्या तापांत अंग जरी कढत असतें, तरी तें फारच ओलसर असतें. कधीं कधीं फारच घाम सुटतो व त्याला आंबूस वास येतो. आंबूस वास येणें हें ह्या रोगाचें एक गुणबोधक लक्षण आहे. क्षुधा मंद अथवा अगदींच बिघडते. कधीं कधीं असें होतें कीं, एकाच बाजूचे सर्व संधी किंवा एक वरच्या शाखेचा आणि दुसरा खालच्या विरुद्ध बाजूच्या शाखेचा असे धरतात. संधी अधःशाखेचे धरले असल्यास रोगी ती शाखा हालवूं शकत नाहीं व

संधींस कोणास स्पर्शही करूं देत नाहीं, आणि गुडघे उभे करून उताणा निजतो.

**गतिः**—बहुतकरून तीनपासून चार किंवा सहा आठवड्यांचे सुमारास रोगी बरा होतो. परंतु एक वेळां संधिवाताची संवय झाली ह्मणजे पुन्हां तो वारंवार होण्याचा संभव असतो.

**परिणामः**—संधींत बहुशः पू होत नाहीं, परंतु कधीं कधीं सर्व दाहाचीं लक्षणें नाहींशीं झाल्यावर सांधा ताठ होण्याचा संभव असतो. शिवाय सांधिवातग्रस्त रोग्यांस हृदय विकार, ( हार्ट डिसीझ ) फुप्फुससंबंधीं विकार वगैरे होण्याची फार भीति असते. ह्मणून रोग्यानें आपलें हृदय कुशल वैद्याकडून तपासवावें, आणि छातींत दुखूं लागल्यावर बिलकुल हयगय करूं नये.

मध्यम प्रकारांतील लक्षणें हीं बहुतेक वरल्याप्रमाणेंच, परंतु कांहींशीं सौम्य असतात.

**उपचारः**—सांध्यांचे चलनवलनादि व्यापार बंद ठेवावे. रोग्यानें उबदार कपडे अंगांत घालावे. बिछाना उबदार असावा. संधींस उशा किंवा तक्क्यांचा टेकावा द्यावा. रोग्याचे अंगावर वारा येऊं देऊं नये. विकृत संधींस खसखशीच्या बोंडांचा काढा करून लोंकरीच्या पिळ्यानें शेकावें किंवा संधींस नारळाचा पेंड बांधावा. अथवा धोतऱ्याच्या पाल्याचा शेक द्यावा. ह्या उपायांनीं गुण न वाटल्यास सालिसिलेट ऑफ सोडा २ ड्राम, आणि १० औंस पाणी, अशीं एकत्र करून त्यांच्या मिश्रणांत भिजवलेली वस्त्राची घडी ठेवावी. किंवा सोडा बायकोर्बोनस २ ड्राम, पोट्याश बायकार्बोनस

२ ड्राम, टिंक्चर ओपाय ४ ड्राम, अधणाचें पाणी ४ औंस, ह्या मिश्रणांत भिजविलेली घडी सांध्यांवर ठेवावी. किंवा टिंक्चर आरनिका, टिं. बेलाडोना व टिं. ओपाय, हीं समप्रमाणांनीं एकत्र करून हळूहळू सांध्यांवर चोळावीं. किंवा नवसागर एक तोळा, कोलन वाटर किंवा बेवडा दारू २ तोळे, पाणी १६ तोळे, अशीं एकत्र करून त्यांत भिजविलेली घडी संधींवर ठेवावी; किंवा अफू पाव तोळा, कापूर २ तोळे, टरपेंटाईन २ तोळे, तिळाचें तेल ४ तोळे, असें एकत्र करून तें संधींवर चोळावें. रोग जुनावत चालल्यास त्यावर लिनिमेंट अमोनिआ चोळावें. किंवा लिनिमेंट क्यांफर कंपाउन्ड १ औंस, टिंक्चर ऑफ ओपियम $\frac{1}{2}$ औंस, सोप लिनिमेंन्ट १ औंस, अशीं एकत्र करून हळूहळू संधींवर चोळावें. शौचास साफ होत नसल्यास क्षारमय मिश्रण (यादी नं. २९) द्यावें. लिंबाचें सरबत हवें तितकें प्यावयास द्यावें, असें कित्येक वैद्यांचें मत आहे, परंतु तें कितपत लागू पडेल, याची शंकाच आहे. सोडा सालीसिलस १० ग्रेन, पोट्याश बायकार्बोनस १० ग्रेन, स्वच्छ पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. सोडा सालिसिलसच्या योगानें हृदयाचे विकार बहुतकरून होत नाहींत, तरी नाडी मंद होईपर्यंत द्यावा, पुढें देऊं नये. किंवा पोट्याश बायकार्बोनस १० ग्रेन, पोट्याश असीटस् २० ग्रेन, टिंक्चर ऑफ हेनबेन ३० मि., वैनं कालच्चिसाय १० मि., स्वच्छ पाणी १ औंस ह्यांचें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. वेदना फार होत असून झोंप येत नसल्यास पोट्याश नैट्रस १ ड्राम, डोव्हर्स पौडर $\frac{1}{2}$ ड्राम, शुद्ध केलेला गंधक १ ड्राम,

अशीं एकत्र करून त्याच्या ६ पुड्या कराव्या, आणि वेद-नांच्या मानानें दिवसांतून दोन किंवा तीन पुड्या घोटभर पाण्यांत मिश्र करून द्याव्या. अशक्तपणा फार असून घामही फार येऊं लागला तर, व रोगी सुस्त झाला तर, टिंक्चर सिं-कोना ३० मि., अमोनियेटेड टिंक्चर ऑफ ग्वायकम् ३० मि., कार्बोनेट ऑफ अमोनिआ ४ ग्रेन, पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. ज्वर गेल्यावर संधींत वेदना आणि ताठपणा राहिल्यास संधींवर ब्लिस्टर मारावें (यादी नं. २२ भा. प.), किंवा बिबा घालावा. राश्नादि काढा—ह्मणजे राश्ना ७ तोळे, गोखरू १ तोळा, एरंडमूळ १ तोळा, देवदार १ तोळा, पुनर्नवा १ तोळा, गुळवेल १ तोळा, बहाव्याचे शेंगेंतील मगज १ तोळा, ह्या सर्वांचे ७ भाग करून प्रत्येक भाग ३२ तोळे पाण्यांत कढवून काढा अष्टमांश उरला ह्मणजे गाळून प्यावा. हा काढा आम-वातावर प्रशस्त आहे. किंवा दशमूळादि काढा द्यावा (यादी नं. ३६).

**पथ्यः**—दूधभात, गव्हांची चपाती, उडदाच्या अथवा तुरीच्या डाळीचें वरण, जवसाचा चहा, असें खावें. आंबट, तेलकट, तिखट, उष्ण असें खाऊं नये. सर्द जागेंत राहूं नये, कोरड्या हवेंत रहावयास जावें, ह्मणजे वात लवकर नाहींसा होतो.

# जुनाट संधिवायु.

## CHRONIC RHEUMATISM.

ह्या प्रकारांत संधींमध्यें किंवा तंतुमय त्वचेमध्यें आरक्तता व सूज उत्पन्न होत नाहीं. वेदना मात्र होत असतात. संधिवायूचा हा प्रकार बहुशः तीव्र प्रकारानंतर होत असतो, किंवा रक्तदोषामुळें आपोआपच हळूहळू उत्पन्न होतो. ह्यांत बहुशः ज्वर नसतो आणि असला तरी फारच थोडा असतो. ह्या प्रकारांत कांहीं दिवसांनीं संधी ताठ व संकोचित होतात.

**उपचारः**—मागें तीव्र प्रकारांत सांगितलेले उपाय करावे; किंवा संधीवर ओंव्याचें फूल अर्ध तोळा, दारू (मद्य) १० तोळे, अशीं एकत्र करून तें संधीवर चोळावें; किंवा केरोसीनचें तेल आणि टरपेंटाईन अशीं एकत्र करून तें चोळावें; किंवा लिनीमेंट आयओडीन पिसानें अथवा काडीला कापूस गुंडाळून तिनें दिवसांतून एक वेळां संधीवर लावावें. अथवा संधीवर ब्लिस्टर मारावें ( यादी नं २२ भा. प. ). अशक्तपणा असल्यास पुष्टिवर्धक औषधें द्यावीं. सिरप फेरी आयओडाईड १० मि., क्विनाईन २ ग्रे., पाणी १ औंस असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा योगराज गुग्गुळ* राश्नादि काढ्यांतून घ्यावा. ग्लानि वाटूं लागल्यास जेवणाचे वेळीं १–२ तोळेपर्यंत पोर्टवाईन किंवा द्राक्षारिष्ट घ्यावें (यादी नं. २१).

**पथ्यः**—तीव्र प्रकारांत सांगितल्याप्रमाणें असावें.

---

* हा खात्रीलायक वैद्याकडून घ्यावा.

# स्नायुमय आमवात.

## MUSCULAR RHEUMATISM.

ह्यासच कोणी उसण किंवा वायूची चमक असें ह्मणतात. ह्यांत वेदनेखेरीज दाहाचें कोणतेंच लक्षण नसतें. वेदनाही कायमची नसून किंचित् हलनचलनानें मात्र अति तीव्र होते.

ज्या ठिकाणीं वेदना किंवा चमक उठते, त्याप्रमाणें त्यांस निरनिराळीं नांवें दिलीं आहेत, ह्मणजे कंबरेच्या स्नायूंना वातविकार झाला असतां कटिशूळ, कुशी दुखूं लागल्यास कुक्षिशूळ, पार्श्वशूळ इत्यादि.

**उपचारः**—कोष्टशुद्धि होत नसल्यास क्षारमय मिश्रण द्यावें ( यादी नं. २९ ). चमक निघत असेल त्या ठिकाणीं मागें सांगितलेलीं तेलें चोळावीं, किंवा वेदनाशामक तेल चोळावें (यादी नं. २८). शेक करावा, राईचा लेप मारावा किंवा बिब्रा घालावा, रात्रीं झोंप येत नसल्यास घोंटभर पाण्यांत डोव्हर्स पौडर १० ग्रेन मिळवून द्यावी. किंवा पोट्याश ब्रोमाईड १० ग्रेन, टिंक्चर ऑफ हेनबेन २० मि., व्हैनं कालच्चिसाय २० मि., अमोनियेटेड टिंक्चर ऑफ ग्वायेकम २० मि., स्पिरिट ऑफ नैट्रिक इथर २० मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें, किंवा दशमूळादि अथवा राश्नादि काढा द्यावा.

## उपदंशापासून होणारा संधिवायु.

SYPHILETIC RHEUMATISM.

हा प्रकार उपदंश झालेल्यास होतो. परंतु उपदंशविकार होऊन गेल्यानंतर केव्हां तरी होतो, त्यामुळें रोग्यास संधिवायु होण्याचें कारण ध्यानांत येत नाहीं. सांधे सुजतात व सांध्यांतील वेदना थंड वेळेस जास्त होतात.

**उपचारः**—सांधा स्थिर ठेवावा. त्यावर लिनिमेंट ऑफ आयओडिन दिवसांतून एक वेळां पक्ष्याचे पिसानें अथवा कापसाचे बोळ्यानें लावावें, किंवा मागें सांगितलेलीं तेलें लावावीं. पोटांत पोट्याश ऑफ आयओडाईड ३ ग्रेन, पोट्याश बायकार्बोनस १० ग्रेन, सिरप फेरी आयओडाईड १० मि., स्पिरिट अमोनिआ अरोम्याटिक १० मि., स्पिरिट ऑफ नैट्रिक इथर २० मि., सार्सापरिलाचा काढा एक औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें किंवा गंधकरसायन द्यावें (यादी नं. ३९). कित्येक वैद्य ह्या वेळीं पाऱ्याचीं औषधें देतात. रात्रीं झोंप येत नसल्यास १० ग्रेन डोव्हर्स पौडर, घोटभर पाण्यांत मिश्र करून द्यावी.

**पथ्यः**—मागील प्रकारांत सांगितल्याप्रमाणें.

**प्रमेहजन्य संधिवायुः**—ह्याचा प्रमेह प्रकरणांत विचार केला आहे.

---

## पादाग्ररोग.

GOUT.

रक्तांत युरिक ॲसिड नामक आम्ल पदार्थाचें प्रमाण वाढल्यामुळें रक्त दूषित होऊन हातापायांच्या अंगठ्यांचे

संधींत युरेट ऑफ सोड्याचा सांका जमतो आणि त्याच्या क्षोभामुळें जो परिणाम उद्भवतो त्यास "पादाग्ररोग" असें ह्मणतात. हा रोग आपल्या उष्ण कटिबंधांतील लोकांस क्वचित् होतो, तरी त्याचा आमवात रोगाशीं कांहीं गोष्टींनीं निकट संबंध असल्याकारणानें येथें त्याचा विचार करणें जरूर आहे.

हा रोग जे लोक मद्य (बिअर, पोर्टवाईन इ.), मांसादि भक्षण करून चैनीनें राहतात, व उघड्या हवेंत बिलकूल व्यायाम करीत नाहींत, अशा लोकांस होतो. रात्रसत्रास खाणें खाणाऱ्यांस व शिशाचे कारखान्यांत काम करणारांसही हा रोग होतो. आपल्या देशांत बहुतकरून पारशी, युरोपियन वगैरे लोकांस हा रोग झालेला आढळतो. बहुतेकांत तो वंशपरंपरेनेंच असतो. कदाचित् एक पिढी टाकून दुसऱ्या पिढींत उद्भवतो, व त्याचें कारण असें असतें कीं, बापास रोग असला ह्मणजे मुलगा खाणें पिणें व्यायाम वगैरे बेताचे ठेवितो, परंतु नातू इतकी काळजी घेत नाहीं, त्यामुळें तसा प्रकार होतो. तीसपासून पसतीस वर्षांचे वयाचे सुमारास हा रोग होतो. वंशपरंपरेचें प्राबल्य असलें ह्मणजे वयाचा बहुतकरून नेम नसतो, तथापि तारुण्यावस्था प्राप्त होण्यापूर्वी हा रोग क्वचित् होतो. स्त्रियांपेक्षां पुरुषांस हा फार होतो. या रोगाचे दोन प्रकार आहेत, तीव्र आणि मंद.

**लक्षणें:**—ह्या रोगास प्रारंभ झटला ह्मणजे पावसाळ्याच्या किंवा हिंवाळ्याच्या सुमारास होतो. प्रथम कांहीं दिवस जठराची अव्यवस्था होऊन मूत्र गढूळ होतें आणि रोगी सुस्त, शीघ्रकोपी किंवा अस्वस्थ होतो. हीं लक्षणें

होऊन कांहीं आठवडे गेल्यानंतर एखादे दिवशीं मध्य रात्रींचे सुमारास किंवा त्याच्यानंतर पायाचे किंवा हाताचे अंगठ्यांत एकाएकीं वेदना होऊन रोगी जागृत होतो. ताप भरतो, अंगठा सुजून काळसर लाल रंगाचा व तुळतुळीत होतो, सांध्यांस स्पर्श सहन होत नाहीं, आणि त्यांवरील शिरा रक्तानें भरल्याप्रमाणें टवटवीत दिसतात. सांध्यांत ठुसठुस सुटते, आग होते आणि वेदना फारच जबर ह्मणजे कुरतुडल्याप्रमाणें किंवा फाडल्यासारख्या होतात. ह्या वेदना कमी न होतां कांहीं तास किंवा दुसऱ्या मध्यरात्रीपर्यंत तशाच चालू राहून नंतर किंचित् घाम येऊन ज्वर आणि वेदना हीं कमी होतात व रोग्यास झोंप येते. रोगी सकाळीं उठला ह्मणजे त्याला पुष्कळ बरें वाटतें, परंतु संध्याकाळीं पुनः वेदना वाढून सकाळीं कमी होतात. ह्याप्रमाणें साध्य उदाहरणांत कांहीं आठवडेपर्यंत चढउतार होऊन शेवटीं पुष्कळ घाम सुटतो, पातळ शौच होतें, किंवा अतिशय लघवी होऊन त्यांत चूर्णमय द्रव्याचा गाळ (युरेट-ऑफ सोड्याचा सांका) बसतो, व दाहयुक्त भागावरील कातडीचे पोपडे उडतात किंवा कोंडा जातो. असें झालें ह्मणजे रोगी बरा होतो. ह्या रोगाचे वेग वारंवार कांहीं दिवसांचे अंतरानें येत गेले ह्मणजे रक्तांतील दूषित पदार्थ (युरेट ऑफ सोडा) रक्ताबरोबर अभिसरण पावून सांध्यांत आल्यावर त्या ठिकाणीं सांख सांचून, त्याचे खडूसारखे अनेकाकृति खर बनतात. तेणेंकरून सांध्यांचें चलनवलन बंद होऊन ते स्थिर व संकोचित होतात. असें झालें ह्मणजे रोग जुना होऊन लांबणीवर पडला, असें समजावें. ह्या खड्यांच्या सांध्यांसभोंवतीं वांकड्या

तिकड्या अनेक गांठी होतात, व कधीं कधीं त्यांवरील कातडींत व्रणीभवन होऊन त्यांतून खडूसारखा पदार्थ बाहेर पडतो, त्यामुळें तेथें एक त्रासदायक व्रण होतो. विकार जुना झाल्यावर दाहाचीं लक्षणें कमी होऊन संधींतील वेदनेची तीव्रताही कमी होते, तरी ती मंद वेदना फार वेळ रहाते व अनेक स्थानीं होते. ह्यांत ज्वर नसतो, परंतु क्षीणता बरीच असते. ह्यावेळीं विकार कधीं कधीं मोठ्या सांध्यांत उत्पन्न होतो.

**उपचारः**—वेगकाळीं ३ ग्रेन कालोमेल आणि ५ ग्रेन एक्स्ट्रॅक्ट कालसिंथ कंपाउंड याच्या दोन गोळ्या करून त्या पाण्याच्या घोटाबरोबर गिळाव्या. दुसरे दिवशीं जुलाब घ्यावा (यादी नं. ७ भा. प.). नंतर पुढील औषध सुरू करावें. व्हैनम् कालचिसाय १० मि., टिंचर ऑफ हेनबेन १० मि., पोट्याश बायकार्बोनस् १० ग्रेन, म्याग्नीशिया सल्फस १ ड्राम, पाणी १ औंस असें मिश्रण करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा पोट्याश ब्रोमाईड १० ग्रेन, पोट्याश बायकार्बोनस् १० ग्रेन, व्हैनम् कालचिसाय १० मि., पेपरमिंटचें पाणी १ औंस, असें मिश्रण करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा सालिसिलिक आसिड १० ग्रेन, बडीशेपेचें पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. रात्रीं झोंप येत नसल्यास ५–१० ग्रेन डोव्हर्स पावडर घ्यावी. अशक्तपणा असल्यास क्विनाईन ६ ग्रेन, एक्स्ट्रॅक्ट कालचिसाय ६ ग्रेन, एक्स्ट्रॅक्ट डिजीटेलीस* ६ ग्रेन, एक्स्ट्रॅक्ट ओपी १ ग्रेन, ह्यांच्या ६

* हें औषध एक सप्तकापेक्षां ज्यास्त दिवस सुरू ठेवूं नये.

गोळ्या करून, दर चार चार तासांनीं एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर घ्यावी. सांधा स्थिर व उंच करून ठेवावा. तो खसखशीच्या बोंडांचे काढ्यानें शेकावा, किंवा त्यावर नारळाचा पेंड बांधावा अथवा पोटिसें बांधावीं ( यादी नं. १० भा. प. ). नंतर त्यावरून कापूस किंवा फलाणीनच्या कपड्याचा पट्टा गुंडाळावा. ह्यांनीं कांहीं गुण न आल्यास पुढील औषधांचा उपयोग करावा. लिनिमेंट क्यांफर कंपाउन्ड अर्धा औंस, लाडेनम ( अफूचा अर्क ) अर्धा औंस, अशीं एकत्र करून तीं हळूहळू सांध्यावर पांचएक मिनिटेंपर्यंत चोळावीं. किंवा त्यांत मलमलीचा अथवा लिंटचा तुकडा भिजवून सांध्यावर ठेवावा. किंवा पोट्याश बायकार्बोनेस २ ड्राम, अफूचा अर्क अर्धा औंस, व आधणाचें पाणी ४ औंस अशीं एकत्र करून त्या मिश्रणांत भिजवलेली लिंटाची अगर कापसाची घडी सांध्यावर ठेवावी. किंवा टिंक्चर आरनिका अर्धा औंस, टिं० बेलाडोना अर्धा औंस, टिं० ओपाय अर्धा औंस, अशीं एकत्र करून त्यांत लिंट किंवा कापूस भिजवून सांध्यांवर ठेवावा, किंवा तीं औषधें सांध्यांवर चोळावीं. नंतर सांधा कापसानें किंवा फलाणीनच्या पट्ट्यानें गुंडाळून ठेवावा. सांध्यांस वारा लागूं देऊं नये. प्रथम वेगाचे वेळीं असा योग्य बंदोबस्त ठेवल्यानें बहुधा दुसरा वेग येत नाहीं, आणि रोगाचा बीमोड होतो. रोग जुनाट असल्यास प्रत्येक जेवणानंतर २ ड्राम कॉडलिव्हर आईल घ्यावें. आणि पोट्याश आयओडाईड ३ ग्रेन, व्हैनम कालचीसाय ५ मि., सार्सापरिलाचा काढा १ औंस, असें मिश्र करून दिवसांतून तीन वेळां घ्यावें. क्षीणत्व फारच आल्यास टिंक्चर डिजिटेलिस ५ मि.,

ब्रांडी २ ड्राम, पोट्याश ब्रोमाईड १० ग्रेन, स्पिरिट अमोनिया आरोम्याटिक १० मि., सार्सापरिलाचा काढा १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा पुढील औषधें देऊन पहावीं: रास्ना १ तोळा, गुळवेल $\frac{1}{2}$ तोळा, सुंठ $\frac{1}{4}$ तोळा, बहाव्याचे शेंगेंतील गीर [ मगज ] १ तोळा, एरंडमूळ $\frac{1}{2}$ तोळा, गोखरू $\frac{1}{2}$ तोळा, पुनर्नवा $\frac{1}{2}$ तोळा, देवदार $\frac{1}{2}$ तोळा, बडीशेप $\frac{1}{2}$ तोळा, अतिविष $\frac{1}{2}$ तोळा, कटुकी $\frac{1}{2}$ तोळा, आधणाचें पाणी १६ तोळे, हीं औषधें किंचित् ठेचून १० मिनिटेंपर्यंत उकळावीं आणि थंड झाल्यावर गाळून दिवसांतून दोन वेळां याप्रमाणें एक किंवा दोन सप्तकें हा काढा घ्यावा, ह्मणजे रोग समूळ नाहींसा होतो. किंवा दशमूळादि काढा द्यावा (यादी नं. ३६).

**भेदाभेदः**—हा रोग कांहींसा आमवात रोगासारखा दिसतो. तेव्हां तो त्यापासून पुढील लक्षणांनीं ओळखावा. पादाग्र रोगांत युरेट ऑफ सोड्याचे खडूसारखे खडे दाहस्थानीं उत्पन्न होतात व ह्यांत वंशपरंपरेचें प्राबल्य असतें, आणि घाम येतो त्यास अंबूस वास येत नाहीं, व प्रारंभ होण्याचा काळ अगदींच चमत्कारिक ह्मणजे मध्यरात्रीनंतर होतो. हा रोग बहुतकरून श्रीमंत लोकांस व विशेषें करून पुरुषांस होतो. वरील विशेष लक्षणांनीं तो आमवातापासून ओळखावा.

**साध्यासाध्य विचारः**—पादाग्ररोग उपचारांतीं बरा होसारखा आहे खरा, तरी त्याचें परवाना ...

शय ), मेंदू, मूत्रपिंड, हृद्, फुप्फुसें, न्हिडकरज्जु किंवा मज्जास्तंभ इत्यादि ठिकाणीं होतें.

हें स्थलांतर होण्यापूर्वीं पादाग्र रोगाचीं चिन्हें असून नागाहून ज्या ज्या इंद्रियांत त्याचें स्थलांतर होतें, त्या त्या त्यांच्या व्यापारविकाराचीं लक्षणें उद्भवतात. ह्मणजे- पक्वा- यांत स्थलांतर झालें असतां पक्वाशयास वाम ( पेटके ) ऊन उह्मासे व वांत्या येऊं लागतात आणि ग्लानि येते.

२. मेंदूंत स्थलांतर झालें असतां मस्तकशूल, भोंवळ आणि सुस्ती हीं लक्षणें असतात.

३. मूत्रपिंडांत स्थलांतर झालें असतां विलंबी मूत्राशयदाह, मत्रमार्गदाह, मूत्राश्मरी वगैरे विकार होतात.

४. हृदयांत स्थलांतर झालें असतां उरोयातना, हृत्प्रदेशीं घडघड आणि मूर्च्छा हीं लक्षणें असतात. पादाग्र रोगानें हें इंद्रिय बिघडण्याची विशेष भीति असते.

५. फुप्फुसांत स्थलांतर झालें असतां त्रासदायक खोकला, दम आणि श्वासावरोध हीं लक्षणें असतात.

६. मज्जास्तंभांत स्थलांतर झालें असतां वायूचे झटके वगैरे प्रकार दृष्टीस पडतात.

**उपचारः**— वरील इंद्रियांपैकीं एखाद्या इंद्रियांत स्थलां- तर झालें असतां, एखाद्या अग्र संधींत क्षोभ उत्पन्न करावा. ह्मणजे सांध्यावर मोहरीचें प्लास्टर मारावें, किंवा सांधा खूप चोळावा, ह्मणजे रोग पुनः सांध्यांत उतरतो.

—हा रोग उत्पन्न न होण्याबद्दल चैनी लोकांनीं प्रथमपासून-

करावा, आणि व्यायाम करून आल्यानंतर उघड्या अंगानें न रहाण्याची काळजी घ्यावी. मद्यमांसादि पदार्थांचा उपयोग करूं नये.

---

## गुडघी.

### SYNOVITIS.

**गुडघी:**—संधींतील सायनोव्हियल* पडद्याचा दाह. हा विकार बहुतकरून गुडघ्यांत होतो, ह्मणून त्यास गुडघी हें नांव दिलें आहे.

**कारणें:**—शैत्य झाल्यानें किंवा संधिस्थानीं एखादा आघात झाल्यानें, अथवा उडी मारल्यानें किंवा संधि लचकल्यानें गुडघीचा रोग होतो; उपदंश, आमवात वगैरे रक्तदोषांपासूनही हा रोग उत्पन्न होतो. क्वचित् कांहीं दृश्य कारणांवांचूनही तो उद्भवतो, तेव्हां त्याची सांथ आली आहे असें ह्मणतात.

विकार आघातापासून असल्यास आघात झालेल्या संधीसच होतो, परंतु अन्य कारणांपासून असल्यास अनेक संधींस होतो.

गुडघीच्या रोगाचे दोन प्रकार आहेत, तीव्र आणि मंद. तीव्र प्रकाराचीं लक्षणें:—संधि सुजतो, उष्ण होतो व तुळतुळीत दिसतो व त्यांत तीव्र वेदना होत असतात व त्या ठिकाणीं चेपून पाहिलें असतां त्यांत प्रवाही पदार्थ लागतो. सायनोव्हियल पडदा, संधीच्या ज्या बाजूस जास्त असतो त्या बाजूस सूज ज्यास्त असते. दाह गुडघ्यांत झाला असतां, सूज गुडघ्याचे वरचे व बाहेरचे अंगीं असते. संधि हालविला

---

* ह्या पडद्याचे योगानें संधींसबंधानें वगैरे भाग मढले जातात.

असतां, वेदना जास्त होऊं लागतात. परंतु संधीच्या वरचीं आणि खालचीं हाडें एकमेकांवर चेपलीं असतां वेदना होत नाहींत. ह्या चिन्हांबरोबर अंगांत ज्वर असतो, मलशुद्धि साफ होत नाहीं, जिभेवर मळ सांचतो, लघवी आरक्त होते व वेदनेमुळें रात्रीस बरोबर झोंप येत नाहीं.

**गतिः**—योग्य उपचार झाले आणि शरीरांत रक्तदोष नसला, तर बहुधा एक किंवा दोन आठवड्यांचे आंतच दाहाचें शमन होतें आणि रोगी बरा होतो, किंवा दाह ज्यास्ती वाढून संधि अधिक सुजतो व त्यांत पूं होऊन शेवटीं संधीच्या कुर्चांतही दाह पसरून कुर्चा झरून पुंवांत मिसळतात आणि दाह अस्थींत पसरतो. हा विकार पुन्हां पुन्हां होण्याचा संभव असतो, आणि असें होतां होतां संधि ताठ होतो, परंतु कितीएक वेळां संधि ढील होतो.

**उपचारः**—संधि स्थिर ठेवावा. त्यास उशा, तक्के, वगैरेंचा टेंकावा द्यावा किंवा झोळी बांधावी. दाहयुक्त संधीवर प्रथम स्थितींत बर्फ एकसारखें ठेवावें, किंवा शक्तीच्या मानानें १२–२४ जळवा लावून रक्त काढवावें. रक्त काढल्यावर संधि उष्ण पाण्यानें किंवा खसखशीच्या बोंडांचे काढ्यानें शेकावा. किंवा नवसागर १ तोळा, मद्य किंवा कोलनवाटर २॥ तोळे, पाणी ६० तोळे असें एकत्र करून त्या मिश्रणांत भिजविलेली घडी संधीवर ठेवावी. ती वाळली असतां पुन्हां भिजवावी. सल्‍ईन मिक्श्चर द्यावें (यादी नं. २९). किंवा संधिवात प्रकरणांत सांगितलेलीं औषधें द्यावीं. किंवा गुळवेल १ तोळा, त्रिफळा २ तोळे ह्यांचे काढ्यांत १ तोळा गुग्गुळ घालून दिवसांतून तीन वेळां द्यावें. विकार उपदंशाचे पीडे-

पासून असल्यास आयओडाईज्ड् सार्सापरिला द्यावा. कितीएक वैद्य त्या विकारांत पारा देतात, परंतु पारा देण्याचें बहुशः कारण पडत नाहीं. संधींत पूं झाल्यास कुशल वैद्याकडून त्याची चिकित्सा करवावी.

**पथ्यः**—प्रथम पेजेशिवाय दुसरें कांहीं देऊं नये. नंतर शक्ति क्षीण झाल्यास पौष्टिक अन्न द्यावें.

**मंदप्रकारः**—हा प्रथमपासूनच मंद असतो, किंवा तीव्र दाहच मंदावस्था पावतो. जेव्हां तो प्रथमपासूनच मंद प्रकारचा असतो, तेव्हां संधि हळू हळू सुजतो व त्यांत मंद वेदना होत असतात. हा प्रकार बहुतकरून रक्तदोषापासूनच उद्भवतो.

**उपचारः**—आमवातिक प्रकृति असल्यास त्या प्रकरणीं सांगितलेले उपचार योजावे. उपदंशिक असल्यास आयओडोईज्ड सारसापरिला द्यावा, संधि अचल ठेवावा, त्यावर वारंवार ब्लिस्टरें मारावीं किंवा लिनिमेंट आयओडाईन लावावें. ह्यानें सांध्याची सूज कमी न झाल्यास संधीवर एम्प्लास्टर हैड्रारजिरायची पट्टी ( पाऱ्याच्या मलमाची पट्टी ) लावावी. किंवा संधीवर दररोज कांहीं वेळपर्यंत थंड पाण्याची धार धरावी. कित्येक वैद्य ह्या वेळीं संधीवर डाग देतात, आणि डाग देणें हें कित्येक वेळां फार चांगलें लागू पडतें.

**पथ्यः**—तीव्र प्रकारांत सांगितल्याप्रमाणेंच असावें. सांधा कांहीं दिवस हालवूं नये, परंतु पुढें हळूहळू चोळावा व हलके हलके थोडें चालावें.

# जठरविकार.

## DISEASES OF THE STOMACH.

जठरसंबंधीं विकारांचें विवेचन करण्यापूर्वी जठर आणि त्याच्या क्रिया यासंबंधानें थोडी माहिती वाचकांस करून देणें आवश्यक आहे,

जठर किंवा ज्याला कोणी पक्वाशय अथवा कोठा असें ह्मणतात, तें अन्नमार्गाचा अत्यंत फुगलेला भाग असून, पचनसंबंधीं मुख्य अवयव होय. अन्नपचनाची बहुतेक क्रिया येथेंच होते. जठराचा आकार कांहींसा पखालीसारखा असून तें उदराच्या वरच्या अंगास शिपीच्या प्रदेशीं यकृत आणि प्लीहा ह्या दोन इंद्रियांच्या मध्यभागीं किंचित् डाव्या बाजूस आडवें असतें. जठरास मुख्य तीन पडदे किंवा थर असतात. पैकीं आंतला पडदा मृदु त्वचेनें झालेला असतो;. मधला स्नायुमय असून फार बळकट असतो आणि बाहेरील पडदा पातळ त्वचेचा असतो. ह्याच्या योगानें अन्नाच्या प्रत्येक अंशाचें पाचक रसांशीं मिश्रण होऊन अन्नाचें पचन होतें आणि पचन झालेलें अन्न पुढें ढकललें जातें.

जठराच्या आंतल्या पडद्यावर अनेक लहान लहान मांसपिंड असतात, त्यांपासून एक प्रकारचा पाचक रस ज्याला इंग्रजींत ग्यासट्रिक ज्यूस असें ह्मणतात, तो उत्पन्न होतो. याचे धर्म कांहींसे आम्ल आहेत, त्याच्या योगानें अन्नाच्या कांहीं पौष्टिक अंशांचें (नैट्रोजन विशिष्ट पदार्थांचें) द्रावण होऊन त्यास रक्ताशीं मिळण्याची योग्यता येते.

जठराचें वरचें तोंड (Cordiac End) गलमार्ग किंवा ज्याला इंग्रजींत इसाफेगस असें ह्मणतात त्याशीं, ह्मणजे

अन्नमार्गाचा जो भाग घशाकडून खालीं उतरतो त्याशीं संयोग पावतें, व खालचें तोंड (Pyloric End) लहान आंतड्याच्या वरच्या भागाशीं संयोग पावतें. येथपर्यंत जठर आणि त्याच्या क्रिया यासंबंधानें साधारण माहिती झाली. जठरेतर पचनेंद्रियांची माहिती पुढें अग्निमांद्यविकारांत पचनव्यापाराविषयीं लिहितांना दिली आहे. आतां आपण जठर विकाराचा विचार करूं.

---

## जठरदाह.

### GASTRITIS.

जठरदाहाचे मुख्य दोन प्रकार आहेत, १ तीव्र आणि २ विलंबी.

---

## तीव्र जठरदाह.

### ACUTE GASTRITIS.

**कारणें:**—तीव्र जठरदाह हा बहुतकरून कांहीं क्षोभक पदार्थ जसें सोमल, रसकापूर, टार्टर, एमेटिक, क्यांथरिडीस, साऽहीन, तंबाखू इत्यादिकांच्या सेवनानें किंवा एखादे यांत्रिक क्षोभामुळें होतो. आपल्याकडेस गारोडी लोक प्रेक्षकांना चकित करण्याकरितां सुया, टांचण्या, कांचेचे तुकडे, चाकू वगैरे तीक्ष्ण वस्तू गिळून दाखवितात त्यामुळें त्या लोकांसही हा होतो. अशक्त, रुक्ष आणि मद्यपी लोक ह्या विकारास विशेष पात्र असतात. विस्फोटिक ज्वर, फुफ्फुसदाह, सूतिकाज्वर, आमवात इत्यादि रोगांत किंवा त्या रोगांतून उठल्यावर कधीं कधीं जठरदाह उत्पन्न होतो.

शिवाय अतिशय तिखट, जड आणि नासके पदार्थ खाण्यांत आल्यानें तो होतो. अति मद्यपानानें अथवा कडक मद्य पिण्यांत आल्यानें, किंवा अति थंड अथवा कढत पदार्थ खाण्यांत किंवा पिण्यांत आल्यानेंही तो होतो. कधीं कधीं कांहीं विशिष्ट ज्वर, आमवात, पटकी वगैरे विकारांबरोबर हा विकार उत्पन्न होतो. वारंवार अजीर्ण झाल्यानें, अतिशय जेवल्यानें, किंवा जेवणापूर्वी तंबाखू ओढल्यानें, अथवा खाल्ल्यानें तीव्र जठरदाह होतो. ह्मणून अशा लोकांनीं ह्या गोष्टीकडे अवश्य लक्ष देणें अत्यावश्यक आहे. हा आजार सर्दीमुळेंही होऊं शकतो. मेहनत झाल्यानंतर अंगाची उष्णता कमी न होऊं देतां जर गार पाणी पिण्यांत आलें तर त्यापासूनही हा रोग होतो. सोमल हा पदार्थ जरी प्रत्यक्ष रीतीनें पोटांत घेतला नाहीं, तरी अज्ञानपणें किंवा श्वासोच्छ्वासद्वारें शरीरांत त्याचा प्रवेश होऊं शकतो. तो असा कीं, कित्येक लोक आपली निजण्याबसण्याची जागा शोभविण्यासाठीं तिचे भिंतीस चित्रविचित्र रंगाचे कागद चिकटवितात, किंवा तेलकट रंग देतात. त्यांत कधीं कधीं सोमलाचा अंश असतो, तो हवेंतील उष्णतेच्या योगानें त्यापासून वेगळा होऊन श्वासोच्छ्वासद्वारें तेथें सतत निजणार बसणाराच्या शरीरांत जाऊन त्यास जठरदाहाची पीडा होते.

वर जीं जठरदाहाचीं कारणें सांगितलीं त्यांपासून जठराचे पडद्यांत क्षोभ उत्पन्न होऊन त्यांतील सूक्ष्म शिरा फुगतात आणि त्यांपासून एक प्रकारच्या चिकट आणि पांढरवट रंगाच्या पदार्थाची उत्पत्ति होते. किंवा त्यापासून पित्त आणि रक्तमिश्रित कफाचा स्राव होऊं लागतो. दाह विषापासून किंवा

बाह्य क्षोभामुळें उद्भवला असल्यास जठराच्या अंतस्त्वचेवर तांबडे चट्टे पडतात व त्याच्यावरील त्वचा जाड होते.

**लक्षणें:**—ह्या रोगांत जीं लक्षणें होतात त्यांचे स्थानिक आणि सार्वदेहिक असे दोन प्रकार केले आहेत. कित्येकांस कांहीं लक्षणें होत नाहींत व कित्येकांस तीं फारच उग्र होतात; ह्यावरून सगळीं लक्षणें प्रत्येक रोग्यास होतात असा नियम नाहीं. ज्या कारणामुळें हा रोग उद्भवला असेल त्याच्या उग्रतेवर अथवा सौम्यतेवर ह्या रोगाची सौम्यता व उग्रता हीं फार करून अवलंबून असतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं. विषापासून हा अजार झाला असल्यास त्याचीं लक्षणें विषाप्रमाणें निराळीं असतात. तीं विषें कांहीं अंशानें एखादे वेळेस कोठ्यांत सांपडतात. कधीं कधीं विषामुळें जठराच्या त्वचेचा नाश झालेला आढळतो. हा आजार उत्पन्न होतांच जरी सौम्य स्थितींत असला, तरी पुढें एखाद्या वेळेस फारच वाढतो व फार दुःसह होतो.

**स्थानिक लक्षणें:**—पोटाच्या शिंपींत बहुतकरून वेदना आणि जळजळल्याचा भास होऊं लागतो. वेदना फार करून पाठीकडल्या बाजूस पसरते. घशाशीं जळजळतें. कित्येकांस शिंपीच्या प्रदेशीं जडत्वाचा भास होतो. हा भास जेवलें असतां, खोकलें असतां, शिंकलें असतां आणि जोरानें श्वासोछ्वास केला असतां ज्यास्त होतो. ओकारी झाली असतां हीं लक्षणें कांहीं कमी होतात. परंतु कित्येक वेळां ओकण्यापासून हीं लक्षणें ज्यास्त होतात. कधीं कधीं शिंपीच्या प्रदेशीं जबर कळ निघते, तेव्हां पोटांतील स्नायू वळतात, त्यास आपण पोटांत वेठ वळतात असें ह्मणतों, आणि ती जागा हुळहुळी

होते व सुजते. ओकारी व घशाशीं येणें हीं लक्षणें ह्या रोगांत मुख्य आहेत. हा रोग ज्यास्त वाढला असतां, कांहीं खाल्लें तरी तें तावडतोब ओकून पडतें. ओकारींत कफ, लाळ, पित्त व एखादे वेळेस रक्त अथवा भाजून दळलेल्या काफीप्रमाणें एक प्रकारचा पदार्थ पडतो. तहान फार लागते व गार पाणी पिण्याची इच्छा फार उद्भवते, जीभ तांबडी असून क्षोभ पावलेली असते व ती फारकरून शेंड्याजवळ व कडेस फार असते, अथवा तिच्या मध्यभागीं बुरसा येऊन ती गुळगुळीत होते आणि शुष्क बनते. किंवा ती पसरट होऊन ओलसर होते आणि पांढरा बुरसा येतो व तिच्यावरील कांटे असतात ते फुगतात. तोंड चिकट होऊन कोरडे पडतें व बेचव होतें. अंत्राची जशी स्थिति असेल त्याप्रमाणें अतिसार अथवा बद्धकोष्ठता होते. एखाद्या वेळेस ओठांची जर उत-स्याप्रमाणें स्थिति होते. ही स्थिति सर्वांनाच होते असें नाहीं. ह्याप्रमाणें ह्या रोगाचीं स्थानिक लक्षणें झालीं, आतां सार्वदेहिक लक्षणांचा विचार करूं.

**सार्वदेहिक लक्षणें**:—ह्यांमध्यें कधीं कधीं कांहीं फेरफार आढळतात. ते असे कीं, कित्येक उदाहरणांत कांहीं पूर्वरूप लक्षणें दृष्टीस पडतात, ह्मणजे पडसें येतें, थंडीनें कांटा येतो व ताप भरतो वगैरे होतात. तथापि हा अजार जडला असतां थोडाबहुत ताप असतोच; ह्याचप्रमाणें चैन न पडणें, शक्ति कमी होणें, झोंप न लागणें वगैरे चिन्हें असतात. रोग फार जोरावला असतां व विशेषेंकरून हा रोग विषामुळें उद्भवला असतां, रोगी अगदीं निजून असतो व तो अगदींच गळून जातो. डोळे खोल जातात, गाल बसतात, त्याचें अंग गार व

चिकचिकित लागतें व तो फार उदास आहे असें दिसतें. त्याची नाडी सूक्ष्म, क्षीण आणि चपल अशी वाहते. ह्याच्यांत त्रासदायक उचकी उत्पन्न होते, आणि श्वासोच्छ्वासही फार वाढतो.

**भेदाभेदः**—वर सांगितलेलीं लक्षणें जर व्यक्त असतील तर हा रोग ओळखण्यास फार पंचाईत पडेल असें नाहीं; परंतु तापांत एखादे वेळेस ह्याचें अंग असतें तेव्हां ह्या रोगाचें कायमचें निदान ठरविण्यास फार पंचाईत पडते. अशा वेळेस वरती जिव्हापरीक्षा सांगितली आहे, तिच्यापासून फार मदत होते. ह्या रोगांत कधीं कधीं फार ताप येतो त्यास इंग्रजींत "ग्यासट्रिक फीवर" असें ह्मणतात. ह्या तापांत पहिल्या प्रथम विषम ज्वराचाच भास होतो; त्यामुळें ह्या रोगाचें कायम निदान ठरविण्यास त्याचें मूळ कारण शोधून काढणें अत्यावश्य आहे व त्यावरून ह्याचें निदान ठरवितां येतें. ह्या रोगांतील लक्षणें जेव्हां फारच उग्र असतात, तेव्हां हा तीव्र रोग आहे व तो कोणतेंही एखादें क्षोभक विष शरीरांत गेल्यामुळें (मग तें मुद्दाम दिलें असो अगर साहजिक गेलें असो) झाला आहे असें खास समजावें.

**साध्यासाध्यविचारः**—ह्या रोगापासून कोणी जाया होत नाहीं; परंतु हा रोग विषापासून झाला असेल, तर मात्र कांहींसा अपाय घडतो. कधीं कधीं जठराच्या पडद्यांत मांसक्षातन होऊन व्रण पडतात. रोगी अशक्त, ह्मातारा अथवा लहान मूल असून ताप येत असेल व सर्व लक्षणें अगदीं व्यक्त असतील तर दगावतो. हा रोग बहुशः लांबणीवर जातो, ह्मणजे त्यास विलंबी स्थिति प्राप्त होते.

**उपचारः**—हा रोग झाल्याबरोबर कोठ्यांत जर कांहीं क्षोभ करणारा पदार्थ असेल तर तो अगोदर काढून टाकिला पाहिजे. ह्याकरितां एखादें वमन द्यावें (यादी नं. २ भा. प.). किंवा गेळीचे फळांतील मगजाचें चूर्ण मद्यांतून द्यावें. किंवा एखादें सौम्य ढाळक द्यावें (यादी नं. ७ भा. प.). परंतु जर एखादें जबर विष असेल, तर कुशल वैद्याकडून जठर-शोधकनळीच्या योगानें (Stomach Pump) जठर धुवून काढून तुपासारखे किंवा भातावरील पेजेसारखे स्निग्ध पदार्थ प्यावयास द्यावे, (फास्फरस असल्यास तूप, तेल यांचा उपयोग करूं नये) व विषप्रतियोगी औषधांचा उपयोग करावा. रोग्यानें स्वस्थ असावें, मेहनत करणें अगदीं उपयोगी नाहीं, नेहमीं पडून राहिलें पाहिजे आणि ज्याप्रमाणें रोगाचें स्वरूप व जठराची स्थिति असेल, त्याप्रमाणें जठरांत होणारी पचनक्रिया बंद ठेविली पाहिजे-ह्मणजे जितकें कमी खाववेल तितकें कमी खावें, अथवा अजीबात खाऊं नये. ज्यावेळीं रोगाचें भयंकर स्वरूप असेल, त्यावेळीं खाणें तर अगदीं वर्जच केलें पाहिजे. अशा वेळेस पोषक पदार्थांचा ह्मणजे दुधांत तयार केलेली तवाकिलाची किंवा आरारूटची लापशी, अशा पदार्थांचा, किंवा दूध आणि कोंबडीचे अंड्यांतील बलक अशीं एकत्र करून त्याचा वस्ती द्यावा (यादी नं. ८ भा. प.). कांहीं खावेसें वाटल्यास, असल्याच लापशा नियमित वेळीं व थोडथोड्या प्रमाणानें खाव्या. किंवा दुधांत चुन्याची निवळ (यादी नं. ९ भाग प.), अथवा सोडावाटर घालून तें प्यावें. पाहिजे असल्यास थोडा मांसरस द्यावा. परंतु जडान्न बिलकुल उपयोगी नाहीं, त्यापासून

कोठ्यास ज्यास्त इजा पोचते. रोग्यास फार पाणी पितांही उपयोगी नाहीं. परंतु तहान फारच लागली तर बर्फाचे लहान लहान तुकडे चोखावयास द्यावे ह्मणजे तहान कमती होईल. उत्तेजक पदार्थ कधींच देऊं नये. परंतु ग्लानि अतिशय वाढली असल्यास एखादे कुशल वैद्याचे संमतीनें थोडी ब्रांडी अगर द्राक्षारिष्ट दुधांत अथवा मांसरसांत मिश्र करून द्यावें. तीं उलटून पडूं लागल्यास त्यांचा बस्ती द्यावा. ह्या रोगावर औषध देणें तें शामक, आम्लप्रतियोगी असें असावें. तेणेंकरून हित होतें. ह्यावर बहुतकरून खालीं दिलेलीं औषधें चांगलीं उपयोगी पडतात. बिसमथ सबनैट्रस १० ग्रेन, ॲसिड हैड्रोसियॉनिक डिल्यूट ३ मि०, लैकर मॉरफिया हैड्रोक्लोरेटिस ५ मि०, गोंदाचें पाणी २ ड्राम, पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा सोडा बायकार्बोनस १० ग्रेन, बिसमथसबनैट्रस १० ग्रे., टिंक्चर कार्डमम कंपाउन्ड १० मि., गोंदाचें पाणी २ ड्राम, ॲसिड हैड्रोसियानिक डिल्यूट ३ मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन चार वेळां द्यावें. कित्येक वैद्यांचें असें मत आहे कीं, ह्या विकारांत एक वेळ एफरव्हेसंट ड्राफ्टस् (मिश्र केल्याबरोबर उतून जाणारें पेय) ऑफ सोडा (यादी नं. ३७) व एक वेळ पाव ग्रेन प्रमाणाची अफूची गोळी असें दिलें असतां फार चांगला गुण येतो. किंवा किराईत, निंबसाल, त्रिफळा, पडवळ, आडुळसा, गरमाळा, पित्तपापडा, माका यांचा काढा करावा व मध घालून द्यावा. किंवा द्राक्षें, हरीतकी, साखर हीं समप्रमाणानें घेऊन त्याच्या बोरांतील आठीएवढ्या गोळ्या करून

त्यांपैकीं दोन दोन गोळ्या दिवसांतून तीन वेळां द्याव्या, किंवा शुद्ध पापडखाराची किंवा टंकणखाराची लाही २ पासून ४ गुंजांपर्यंत मधांतून अथवा दुधांत मिश्र करून द्यावी, ह्मणजे वांति वगैरे लक्षणांचें शमन होतें. वरील एकंदर औषधांचें कार्य तीक्ष्ण असल्यामुळें तीं लहान मुलांस देणें झाल्यास फार विचार करून दिलीं पाहिजेत.

हा रोग फार वाढला असतां कांहीं स्थानिक उपचार करण्याची जरूर पडते. अशा वेळेस पोटाच्या शिंपीवर जळवा लावाव्या, कढत पाण्यानें शेकावें, त्यापासून फार चांगला फायदा होतो. पोटावर थंड पदार्थ ठेविला असतां चांगलें गुणावह आहे, असें कित्येक वैद्यांचें मत आहे. पोटाचे शिंपीवर मोहरी घातली असतां कधीं कधीं उपयोग घडतो, परंतु मोहरीशिवाय दुसऱ्या कोणत्याही त्वक्क्षोभक पदार्थाचा उपयोग करूं नये. आमवात रोगामुळें किंवा पादाग्ररोगाचें स्थलांतर होऊन जर हा रोग झाला असेल, तर संधीच्या ठिकाणीं क्षोभ उत्पन्न करावा, ह्मणजे विकार नाहींसा होतो. विकार बरा होऊं लागला ह्मणजे फार बेताबातानें राहिलें पाहिजे. ह्मणजे खाणेंपिणें, रहाटी, हवापाणी ह्यांच्याबद्दल जितकी योग्य काळजी घेववेल तितकी घेतली पाहिजे. कारण, एकदां हा रोग उद्भवला ह्मणजे औषधोपायांनीं त्याचें शमन होतें खरें, परंतु पुन्हां तो वारंवार उद्भवण्याचा संभव असतो. शौच्यास नेहमीं साफ होईल अशी तजवीज ठेवावी. ह्याकरितां कारण पडल्यास एरंडेलासारखें मृदु रेचक द्यावें; परंतु ह्या विकारांत वारंवार रेचक घेणें हेंही चांगलें नाहीं, करितां जरूर पडल्यास

बस्तीचा उपयोग करावा. ज्या कारणांनीं ह्या रोगास उत्तेजन मिळत असेल तीं सर्व टाळावीं.

---

## विलंबी जठरदाह (आम्लपित्त).

### CHRONIC GASTRITIS.

**कारणें:**—विलंबी जठरदाह हा बहुतकरून तीव्र प्रकाराच्या परिणामीं होतो. किंवा अपचनीय अन्न, चहा, मद्य, रेचक, उत्तेजक आणि क्षोभक औषधें यांच्या योगानें जठराचा वारंवार क्षोभ होत गेल्यानें हा होतो. किंवा जठराच्या रचनाविकारी रोगांत ह्मणजे बहुतकरून जठराचे कर्कटरोग किंवा दुष्ट ग्रंथि, (Cancer) व्रण इत्यादिकांच्या संबंधानें हा आढळतो. क्षय, पादाग्ररोग, मूत्रपिंडरोग, इत्यादि शरीरविकृत अवस्थेपासूनही तो होतो. यकृतांत रक्तसंचय झाल्यानेंही हा रोग उद्भवतो.

**लक्षणें:**—जठरप्रदेशीं अस्वस्थतेचा भास होतो आणि पोटाचे शिंपींत वेदना होते, ती बहुधा त्या ठिकाणीं चेंपून पाहिल्यानें किंवा कढत आणि मसालेदार जिन्नस खाल्ल्यानंतर जास्त होते. छातींत आणि घशाशीं जळजळल्याचा भास होऊं लागतो, पोटांत वायु धरतो आणि आंबट गुचके घशाशीं येऊं लागतात, ढेंकर येतात, क्षुधेचा नाश होतो, थोडक्याच अन्नानें तृप्ति होते, तहान फार लागते, आणि जेवणानंतर व संध्याकाळचे प्रहरीं ती विशेष वाढते, पाणी जितकें गार असेल तितकें अधिक आवडतें, जिव्हा लालभडक होते व तिजवरचे कांटे किंचित् वर येतात व ओंठ, गाल आणि घसा, ह्यांच्या त्वचेचा क्षोभ झाल्याप्रमाणें तीं

कांहींशीं लाल दिसतात. कधीं कधीं ह्या ठिकाणीं लहान लहान क्षतें पडतात. रोग्याचा उच्छ्वास कढत आणि दुर्गंधयुक्त असतो. अंत्राच्या स्थितीप्रमाणें कोष्ठबद्धता किंवा अतिसार असतो. पोटांतही कधीं कधीं मुरडल्यासारख्या कळा निघतात, तोंडाला पाणी सुटतें, आणि तोंडांतून एकसारख्या निवळ पाण्याच्या गुळण्या येतात. जेवणानंतर किंवा सकाळींच ओकारी होते, वांतींत चिकट आणि उग्र, द्रव किंवा पित्त असे पदार्थ असतात व कधीं कधीं रक्तही असतें. जेवल्यानंतर किंवा संध्याकाळचे वेळीं अथवा कांहीं उत्तेजक घेतल्यानंतर कधीं क्वचित् थोडासा क्षयजन्य ज्वर येतो, व नाडी बहुतकरून जलद असते. त्वचा शुष्क आणि खरबरीत असते, हातापायांच्या तळव्यांत आग होते, मांसक्षय होतो, आणि क्षीणता वाढते, रोगी फिक्कट आणि उदास होतो, मूत्रांतून फास्फेटस्, युरेटस् वगैरे क्षार फार जातात व कधीं कधीं अंगावर एक प्रकारचा पुरळ उठतो. ह्या विकारांत कधीं कधीं हृत्कंप आणि खोकला हीं उत्पन्न होतात आणि रोगी बहुतकरून चिरडखोर होतो.

विलंबी जठरदाहाचा रोगी बरेच वर्षेपर्यंत वाचतो. मधून मधून त्यास बरेंही वाटतें आणि जेव्हां मरतो तेव्हां बहुतकरून यकृतास किंवा मूत्रपिंडास विकार होऊन मरतो.

**उपचार व पथ्यः**—ह्या रोगांत पथ्य हा मुख्य उपचार होय. रोग्याचा आहार अगदीं थोडा असून त्यांत पोषक शक्ति असावी. परंतु मसालेदार, उत्तेजक आणि क्षोभकारी पदार्थ नसावे. चहा, काफी, मद्य इ० देऊं नयेत. ह्यांत मुख्य गोष्ट हीच कीं, जितका आहार, पोटांत दुःख उत्पन्न झाल्या-

शिवाय, वांती झाल्याशिवाय किंवा जळजळल्याशिवाय किंवा पोट फुगल्याशिवाय खाववेल तितका घ्यावा. दूध आणि चुन्याची निवळ हीं समप्रमाणानें एकत्र करून तें थोडथोडें तासा दोन तासांनीं द्यावें. पुढें दोन चार दिवसांनीं आरारूटची किंवा तवकिलाची लापशी द्यावी. नंतर दूधभात किंवा भाकरी दुधांत कुसकरून द्यावी; क्षोभ कमी होत गेल्यावर हळूहळू अन्नाचें प्रमाण वाढवावें. ज्यांस मांसाहाराची संवय असेल, त्यांनीं मांसरस प्यावा. पुढें उकडलेलें मांस खावें, परंतु तळलेलें किंवा मसाले घालून तयार केलेलें मांस किंवा इतर खाण्याच्या वस्तू खाऊं नयेत. खाण्यांत मिठाचा उपयोग करण्यास अडचण नाहीं. मसाला वापरणें झाल्यास धणे, बडिशेप, जिरे व किंचित् ओवा किंवा दालचिनी हीं क्षोभ कमी झाल्यावर वापरल्यास चालतील. भाज्या खाव्याशा वाटल्यास उकडलेल्या पालेभाज्या उत्तम. वाल, वाटाणे, तूर वगैरे धान्यें खाऊं नयेत. उघड्या हवेंत बेताचा व्यायाम करावा व हवा बदलावी.

औषधोपचारांपैकीं मागें तीव्र प्रकारांत सांगितलेलीं औषधें द्यावीं. किंवा "नायट्रेट ऑफ सिल्व्हर" (काडीखार) हें फार चांगलें उपयोगी पडतें, असा पुष्कळांचा अनभव आहे. डाक्टर जॉनसन हे पुढें लिहिल्याप्रमाणें हें औषध तयार करून देत असत. काडीखार पाव ग्रेन, आणि एक्स्ट्राक्ट ऑफ हायोसिआमस दोनपासून चार ग्रेनपावेतों, ह्याप्रमाणें घेऊन त्याची एकच गोळी करावी व ती रात्रीं द्यावी. ह्या गोळींतील काडीखार पुढें क्रमाक्रमानें दोन ग्रेनपर्यंत चढविला असतां हरकत नाहीं. निजतांना दररोज रात्रीं एक

गोळी द्यावी. हें औषध फार झालें तर दीड पावणेदोन महिनेपर्यंत द्यावें, पुढें देऊं नये. काडीखाराचा द्रव करून त्याचा उपयोग केला असतां चांगला फायदा होतो, असें डाक्टर फ्लेमिंग ह्यांचें मत आहे व ते पुढें सांगितल्याप्रमाणें औषध तयार करून घेण्यास सांगतात. काडीखाराचे कण २ ग्रेन्स आणि अर्कोदक ( Distilled water ) अर्धा फ्लुईड औंस, ह्यांचें मिश्रण करून तें प्रत्येक रात्रीं द्यावें. हें मिश्रण रिकाम्या पोटीं घेतलें पाहिजे. रोगाची जशी सौम्यता असेल त्याप्रमाणें प्रत्येक दुसऱ्या दिवशीं, तिसऱ्या दिवशीं, अगर चवथ्या दिवशीं रात्रींच हें मिश्रण द्यावें, तेंणेंकरून फायदा होतो.

---

## जठरव्रण.

### ULCER OF THE STOMACH.

जठरांत क्वचितच व्रण पडतात. त्यांचे मुख्य दोन प्रकार आहेत. १ ला वेधोत्पादक व २ रा विलंबी. जठरव्रण होण्यास पुरुषांपेक्षां स्त्रिया विशेष पात्र असतात. जठरव्रण बहुतकरून २५ पासून तीस वर्षांच्या वयाचे आंत किंवा उतारवयांत झालेला पाहण्यांत येतो. वेधोत्पादक व्रण हा बहुतकरून तरुण स्त्रियांना होतो, आणि विलंबी व्रण बहुधा पुरुषांस होतो असें पाहण्यांत आलें आहे.

**कारणें:**—जठरव्रण हा अतिमद्यपान, गलिच्छ स्थितींत रहाणें, अति चिंता, ग्रंथिजन्य क्षय, नष्टार्तवस्थिति इ० विकारांत जठराचा क्षोभ किंवा दाह झाल्यानें होतो असें कित्येक वैद्यांचें मत आहे. परंतु जठराचे अंत्राकडील किंवा खालचे

शेवटांत कांहीं प्रतिबंध उत्पन्न झाल्यानें जठर फुगतें, आणि त्यापासून जठरव्रण उत्पन्न होतो, असें डा० रॉबर्ट यांचे पहाण्यांत आलें आहे. कित्येक वैद्यांचें असेंही ह्मणणें आहे कीं, जठराचे पिच्छात्वचेस कांहीं कारणानें रक्ताचा पुरवठा होण्यास व्यत्यय आल्यानें जठराची जीवित्वशक्ति कमी होते, व त्यामुळें जठररसाचें जठराचे पिच्छात्वचेवर कार्य घडून जठरास व्रण पडतात. जठरव्रण हा बहुतकरून जठराचें जें कण्याकडलें अंग असतें, त्या बाजूस अंत्राशीं संबंध पावणाऱ्या शेवटाजवळ पडतो. आणि ह्या ठिकाणीं जो व्रण पडतो, तो बहुतकरून विलंबी प्रकारचा असतो; परंतु कधीं कधीं पुढचे अंगीं ह्मणजे शिपीजवळ किंवा गलमार्गाशीं संयोग पावणाऱ्या शेवटाकडे पडतो. ह्या ठिकाणीं व्रण पडला असतां त्यास बहुधा छिद्र पडतें. जठरास छिद्र पडतें तें बहुतकरून जठरसंबंधानें कांहीं जोराचें कृत्य घडल्यानें पडतें. ह्या व्रणाची आकृति साधारणपणें वालाचे डाळिंबी-पासून तों एका आधेलीएवढी असते; त्यास छिद्र पडलें ह्मणजे त्यास कांहींशी एखाद्या गळतीप्रमाणें आकृति येते.

**लक्षणें:**—व्रणस्थानीं कुरतुडल्याप्रमाणें किंवा भाजल्याप्रमाणें भास होत असतात. हे भास शिपीच्या किंचित् खालीं किंवा पाठीकडे कण्याचे बाजूस जेथें जठराचा संबंध आहे तेथें होतात. तेथें चेपलें असतां ती जागा दुखते. ह्यांत वांती होणें हें एक मोठें महत्वाचें लक्षण समजतात. वांती बहुतकरून कांहीं खाल्ल्यानंतर होते आणि विशेषेंकरून कढत आणि क्षोभक पदार्थ खाण्यांत आल्यानंतर होते. ह्यांत उह्मासे येत नाहींत. वांतींत अन्न किंवा जठराच्या

त्वचेचे तुकडे पडतात, व कधीं कधीं रक्तही पडतें. व्रणस्थानाची वेदना जठर रिकामें झालें ह्मणजे बहुतकरून थोडा वेळ थांबते. शिवाय ह्यामध्यें अग्निमांद्याचीं कांहीं लक्षणें होत असतात, ह्मणजे पोटांत वायु धरतो, ढेंकर येतात, घशाशीं कडू, आंबट किंवा बेंचव द्रवाचें गुचके येतात, तोंडाला पाणी सुटतें व कधीं कधीं कोष्ठबद्ध असतो किंवा अतिसार उत्पन्न होतो, दिवसेंदिवस कृशता वाढत जाते आणि रोगी थकतो.

जठरव्रण बरींच वर्षें रहातो. बहुधा तो बरा होतो, किंवा व्रण चरत जाऊन तेथें छिद्र पडतें. असें झालें ह्मणजे जठरांतील पदार्थ आंत्रवेष्टणत्वचेंत पाझरून तेथें दाह उत्पन्न होतो, आणि त्यामुळें रोगी मरतो, किंवा जठराचे धमनीस छिद्र पडून भयंकर रक्तस्राव होऊन रोगी त्वरित मरतो.

**उपचार:**—जठरव्रण झाला आहे हें समजणेंच अंमळ कठिण आहे; परंतु वरील सर्व लक्षणें अगदीं व्यक्त असलीं ह्मणजे रोग्यानें कांहीं आठवडेपर्यंत अगदीं पडून असावें, आणि पेज, मांसरस, दूध, इ० पदार्थ वारंवार थोडथोड्या प्रमाणानें घ्यावे. वांतीमुळें अन्न ठरेनासें झालें तर पोषकपदार्थांचा बस्ती मारावा (यादी नं. ८ भा. प.). इतर लक्षणें त्या त्या प्रकरणीं सांगितलेल्या उपायांनीं शमवावीं. व्रणस्थानीं वेदना अतिशय होऊं लागल्यास तेथें मोहरीचें पोटीस बांधावें किंवा वेदनाशामक तेल (यादी नं. २८ भा. प.) किंवा एमप्लास्ट्रम बेलाडोना किंवा एमप्लास्ट्रम ओपाय लावावें. वेदना कायमची झाल्यावर त्या ठिकाणीं ब्लिस्टर मारावें.

# जठरकर्कट किंवा जठराचे दुष्ट ग्रंथि.*

## (वाळूक किंवा गांठ).

## CANCER OF THE STOMACH.

जठरांत कधीं कधीं दुष्ट ग्रंथि उत्पन्न होतात. त्यांचे दोन प्रकार आहेत. १, पाषाणकर्कट (Schirros) व २, चर्मरसाभकर्कट. (Colloid). हे ग्रंथि ३० पासून ७० वर्षांच्या वयांत झाले तर होतात, आणि स्त्रियांपेक्षां पुरुषांत फार करून होतात. देशहितवादी लोक ह्या विकारास विशेष पात्र असतात. हे ग्रंथि बहुधां जठराचे खालचे किंवा अंत्राशीं संयोग पावणाऱ्या शेंवटाकडेस (Pyloric End) होतात.

**कारणें:**—हा रोग होण्यास बहुधां वंशपरंपरेचें प्राविण्य कारण असतें, किंवा हा विकार जठराचा वारंवार क्षोभ होत गेल्यानें होतो. अथवा शिंपीचे प्रदेशीं सतत दाब पडल्यानेंही तो उद्भवतो, असेंही कित्येक वैद्यांचें मत आहे.

**लक्षणें:**—प्रारंभीं लक्षांत येण्यासारखें लक्षण कांहींच नसतें, परंतु कांहीं अग्निमांद्याचीं लक्षणें होऊं लागतात. ग्रंथि जठराचे खालचे शेवटास झाला असतां जठर ताणतें व त्याची वृद्धि होते. असें झालें ह्मणजे जठरांतील अन्नरस आंतड्यांत उतरण्यास प्रतिबंध होतो. त्यामुळें अन्न जठरांत जमून

---

* ह्यांस दुष्ट ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, ह्या ग्रथींपासून रोग्याचा परिणाम फार वाईट होतो. हा त्वरित वाढतो. ह्यांत दुःसह वेदना होत असतात. ज्या ठिकाणीं हा ग्रंथि होतो, त्याचे आसपासचे शोषक पिंड ( Lymphatic ) सुजतात. रोगी कृश होत जातो, आणि तीन चार वर्षांच्या आंत मरतो. हा ग्रंथि कापून काढिला असतां पुन्हां उद्भवतो. असा प्रकार सौम्य ग्रंथींत घडत नाहीं.

आंबतें व जठर अतिशय फुगतें व त्यास तडस लागते. हीं लक्षणें सपाटून वांती झाल्याबरोबर नाहींशीं होतात. जठराचे खालचे शेवटास जो ग्रंथि होतो तो बहुधा कठिण प्रकारचा असतो. ग्रंथि जठराचे वरचे शेवटास ( Cardiac End ) ह्मणजे गलमार्गाकडील शेवटास झाला असतां जठर संकोचित होतें. त्या ठिकाणीं जो ग्रंथि होतो तो बहुधा नरम असतो. अन्न गिळतांच किंवा गिळण्याच्यापूर्वी वमन झालें तर बहुतेक जठराच्या वरच्या शेवटास ग्रंथि झाला असें समजावें. ग्रंथि जठराचे मध्यभागीं झाला असतां जठर वालुकायंत्राप्रमाणें मध्यभागीं संकोचित होतें. ग्रंथि उद्भवला ह्मणजे जठरांत कुरतडल्यासारख्या किंवा भोंसकल्यासारख्या वेदना होऊं लागतात. वांत्या होतात त्यांत रक्त, फफ किंवा काळसर फेंस पडतो व त्यांत ग्रंथींतील पिंड असतात. कोष्टबद्ध असतो. पोट खपाटीस जातें व कठिण आणि रुंद होतें. रात्रीं चांगली झोंप लागत नाहीं. रोगी दिवसेंदिवस फिकट होत जातो, गाल बसतात व मुखचर्या क्लेशसूचक असते. ह्या लक्षणांवरून कार्कटिक क्षयाची स्थापना झाली असें समजावें. ह्या विकारांतील अग्निमांद्याचीं लक्षणें कोणत्याच उपायांनीं कमी होत नाहींत.

दुष्ट ग्रंथि वृद्धिगत झाले असतां त्यांची शिपीचे प्रदेशीं सरासरी मोठ्याशा आंब्याएवढी गांठ हातास लागते. हे ग्रंथि कधीं कधीं इतके वाढतात कीं एखादे वेळेस त्यांचा यकृताच्या शिरेवर दाब पडून जलोदर होतें किंवा पित्ताशयावर दाब पडून कावीळ उत्पन्न होते.

हा रोग घातक आहे, तरी रोगी दीड दोन वर्षें वाचूं शकतो.

**उपचार:**—ह्या विकारांत रोग्याची शक्ति सांवरली पाहिजे. करितां वारंवार रोग्यास ताजें दूध, आरारूटची पेज किंवा मांसरस द्यावा. किंवा त्यांचा बस्ती द्यावा. काडलिव्हर आईल पोटावर चोळावें. ग्लानि फारच वाढली असल्यास वारंवार थोडथोडी शंपेन नांवाची दारू, सोडावॉटरबरोबर मिश्र करून द्यावी किंवा द्राक्षारिष्ट द्यावें. शक्तिवर्धक औषधें द्यावीं. वेदनायुक्त भागावर बेलाडोना प्लास्टर लावावें, किंवा अफूचे बोंडांचे काढ्यानें शेकावें.

---

## अग्निमांद्य.

DYSPEPSIA.

**अग्निमांद्य:**—पाचक इंद्रियांचे क्रियेंत कांहीं कारणामुळें न्यूनाधिक्य झाल्यानें अन्नाचें जसें पचन व्हावें तसें होत नाहीं, आणि त्यापासून जो परिणाम होतो, त्यास अग्निमांद्य असें ह्मणतात. अग्निमांद्याचीं कारणें, लक्षणें, परिणाम, आणि उपचार हीं सांगण्यापूर्वीं प्रथम पचनव्यापार आणि अन्नमार्ग ह्यांविषयीं थोडा विचार करूं.

**पचनव्यापार:**—ज्या व्यापाराच्या योगानें आपण खाल्लेल्या अन्नाचें पचन होऊन त्याच्या पोषक द्रव्यांपासून शरीरांत नेहमीं चालू असलेल्या घडामोडीमुळें निरनिराळ्या त्वचांचा जो व्यय होत असतो त्यांची पुन्हां पुन्हां घटना व स्थापना होते, ज्याचे योगानें अन्नांतील निरनिराळीं द्रव्यें शरीराच्या वृद्धीस कारणीभूत होतात व ज्यापासून शरीरांत उष्णोत्पत्ति होत असते, त्या व्यापारास पचनव्यापार असें ह्मणतात.

आपल्या अन्नाची घटना कशी असावी आणि आरोग्य राहण्याकरितां कोणत्या प्रकारचें व किती अन्न असावें, ह्याचा पुढें आरोग्यरक्षणासंबंधीं नियमांत विचार केला आहे.

**अन्नमार्ग व त्यांत अनुक्रमें होणारे अन्नाचे फेरफार:**—अन्न तोंडांत घातल्यापासून त्यांतील पोषक भागांचें शोषण होऊन शेष बाहेर पडेपर्यंत त्यांजवर कोणकोणत्या क्रिया घडतात व निरनिराळ्या ठिकाणीं त्यांची कशी कशी व्यवस्था लागते याचा येथें थोडक्यांत विचार करूं.

**अन्नमार्ग:**—ही सुमारें ३० फूट लांबीची नळी आहे. ती तोंडापासून तों थेट गुदापर्यंत पोंचते. त्याचीं स्थलविशेषीं निरनिराळीं नांवें बदलतात. तीं अनुक्रमें ह्मटलीं ह्मणजे तोंड, अन्ननळी किंवा गलमार्ग, पक्काशय, लहान आंतडीं आणि मोठीं आंतडीं हीं होत. ह्या सर्वांस पचनेंद्रियें ह्मणतात. ह्यांखेरीज कित्येक साह्यकारी इंद्रियें आहेत. उदाहरणार्थ, दांत, लालोत्पादक पिंड, यकृत, आणि प्यांक्रिआज हीं होत. ह्या सर्वांच्या योगानें जें अन्न आपण खातों त्याचें पचन होतें व त्यास रक्ताशीं संम्मेलन होण्याची योग्यता येते. नंतर त्याची शरीरांत वांटणी होऊन शरीरव्यापार यथास्थित चालू लागतात आणि निरुपयोगी अंश बाहेर टाकला जातो. अन्न पचतें किंवा पक्व होतें, ह्मणजे तें जळतें, अशी साधारण लोकसमजूत आहे. परंतु ती शास्त्रीयरीत्या खरी नाहीं, कारण अन्नाचें पचन होणें ह्मणजे त्याचें द्रवण होऊन रक्त बनणें हें होय.

पचनास योग्य अन्न तोंडांत घातलें कीं, प्रथम दांतांच्या योगानें त्याचें चर्वण होतें. जिभेची चर्वणक्रियेंत बरीच मदत

होते, ह्मणजे ती तोंडांतील अन्न दांतांखालीं ढकलते आणि अन्नाचा दांतांखालीं रगडलेला भाग तोंडांत चोहोंकडे फिरविते, तेणेंकरून अन्नाचें लाळेशीं मिश्रण होतें. तोंडाच्या आंतल्या अंगास अनेक लालोत्पादक पिंड आहेत, परंतु त्यांत मुख्य असे सहाच आहेत. ते—दोन कानाजवळील जाभाडांचे आंतले बाजूस, खालच्या जाभाडाच्या आंतल्या दोन्ही बाजूंस दोन, व जिभेखालीं दोन, असे असतात. त्यांतून नेहमीं थोडीबहुत लाळ झिरपत असते. ती पहाणें झाल्यास उजेडांत तोंड उघडून आरशांत पहावें आणि गालाची आंतली बाजू शेवटच्या दुसऱ्या दाढेपाशीं लहानसा उंचवटा दिसतो तेथें दाबून धरावी, ह्मणजे किंवा जिभेचा शेंडा जितका उलटा फिरवेल तितका फिरवून सर्व जीभ जोरानें पुढच्या दांतांकडे लोटीत न्यावी ह्मणजे लालोत्पादक पिंडांतून लाळेचे बारीक बिंदु बाहेर पडतांना दृष्टीस पडतात.

प्रत्येक चोवीस तासांत सुमारें २$\frac{1}{2}$ शेर लाळ निघते. लाळ ही कांहींशी घण असून निळसर रंगाची दिसते. ही उत्पन्न होतांच अंमळ खारट असते, परंतु कांहीं वेळानें ती किंचित् आंबट होते. तोंड रिकामें असतां ती बेतानें ह्मणजे तोंडांत ओलावा रहाण्याइतकीच उत्पन्न होते, परंतु तोंडांत अन्न पडतांच किंवा अन्नाची वासना उत्पन्न होतांच, अथवा आंबट, तिखट पदार्थ दृष्टीस पडतांच अतिशय लाळ उत्पन्न होते, व जठरांत अन्नाचें पचन चालू आहे तोंपर्यंत ती तशीच उत्पन्न होत असते. लाळेपासून तोंड ओलसर राहून वर्णोच्चार स्पष्ट होतो, आणि अन्न नरम होऊन त्याचा स्वाद जिव्हेस कळतो व तें गिळण्याजोगें होतें. शिवाय

लाळेच्या योगानें अन्नांतील कांहीं खळीची (starch) साखर बनते. ह्या रीतीनें तोंडांत अन्नावर संस्कार न घडला तर जठरास अन्न पचविण्यास फार श्रम पडतात, तें थकतें आणि त्यास इजा होते. याकरितां अन्नाचें चांगलें चर्वण झाल्याशिवाय तें गिळतां उपयोगाचें नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तोंडांत अन्नाचें चर्वण होऊन त्यांतील खळीची साखर बनल्यावर ती अन्नाचे अवशिष्ट भागासह जिभेनें गोळा होऊन घशाकडे जाते, तेथून ती अन्ननळींतून जठरांत उतरते. ही अन्ननळी घशाकडे कांहींशी रुंद व वांकडी असते. ही वरच्या बाजूस मस्तकाच्या कवटीचे बुडापर्यंत विस्तारली आहे, व कान, नाकपुड्या आणि फुफ्फुसें यांशीं अनेक मार्गांच्या योगानें तिचा संबंध जोडला आहे. ही नळी खालीं जठराकडे किंचित् अरुंद होत गेली आहे. तिच्या आंतील पडद्यांत पुष्कळ सूक्ष्म पिंड आहेत, त्यांपासून एक प्रकारचा बुळबुळीत रस ह्या नळींतून अन्न जाऊं लागलें ह्मणजे उत्पन्न होतो, त्यावरून अन्न घसरत जठरांत उतरतें. अन्न जठरांत उतरलें कीं, त्याच्या स्पर्शानें जठररसाची उत्पत्ति होऊं लागते, आणि जठरस्नायूंचे योगानें अन्नावर मंथनाची क्रिया घडून तें जठररसाशीं पूर्ण-पणें मिश्र होतें, व त्यांतील कांहीं प्रोटीड पदार्थांचें द्रवण होऊन पेपटोन्स् (मांसघटक द्रव) बनतात. हे पेपटोन्स आणि वर सांगितल्याप्रमाणें अन्नांतील खळीची लाळेच्या योगानें बनलेली साखर ह्या दोहोंचें जठरत्वचेंतून जठरशिरंत शोषण होतें. नंतर तेथून तीं एका यकृतशिरेच्या द्वारें (Portalvein) यकृतांत जातात. तेथें त्यांची शुद्धि होऊन दुसऱ्या एका यकृतशिरेच्या द्वारें (Hepaticvein) पाठीच्या मणक्याच्या बा-

जूनें मानेकडेस जी एक शीर जाते तींतून रक्ताशयाच्या (हृदयाच्या) उजव्या कप्प्यांत जातात. बाकी जठरांत ज्याचे पेपटोन्स वगैरे बनत नाहींत असें जें कांहीं अन्न जठरांत शिल्लक असतें, त्या अन्नाचा कांहींसा लापशीसारखा किंवा मलईसारखा रस होतो, त्याला इंग्रजींत काइम (पाक) असें ह्मणतात. त्या अवशिष्ट अन्नाचा जसजसा पाक होतो तसतसा तो जठराच्या खालच्या अंगीं एक तोंड आहे त्यांतून बाहेर पडून आंतड्याच्या वरल्या भागांत जातो.

दोन्ही आंतडीं मिळून सरासरी २९ फूट लांबीची एक नळी आहे, ती पोटाच्या पोकळीमध्यें एका कुशीपासून दुसऱ्या कुशीपर्यंत आडव्या तिडव्या घड्या घालून उत्तम प्रकारें बसविली आहे. सर्व प्राण्यांच्या आंतड्यांची लांबी सारखी असते असें नाहीं, तर ज्याचें अन्नपचन होण्यास अधिक वेळ लागतो, त्याप्रमाणें त्याचीं आंतडीं लांब असतात. जेव्हां अन्नाचा पाक कोठ्यांतून निघून आंतडयांच्या वरील भागांत प्रवेश करितो, तेव्हां त्यांतील चरबी, तेल, इत्यादि, ज्यांचें जठररसानें द्रावण होत नाहीं, त्यांचें, यकृतांतून पित्त, व प्यांक्रिजमधून* प्यांक्रिअटिक रस, व आंतडयांतून आंवेसारखा एक रस, ह्या सर्वांचे योगानें पृथक्करण होऊन तैलादि पदार्थांचा दुधासारखा पांढरा रस होतो. आणि अन्नांतील अवशिष्ट राहिलेले प्रोटीड्स व स्टार्च ह्यांच्यावरही प्यांक्रिआजपासून व आंतडयांपासून उत्पन्न होणाऱ्या रसाच्या क्रियेनें प्रोटीड्सचे पेपटोन्स व स्टार्चची साखर होते. नंतर तीं सर्व

---

* हें इंद्रिय जठराच्या खालच्या बाजूस असतें. त्याचा आकार कांहींसा सोनाराच्या हातोड्यासारखा असतो.

एकत्र होऊन जो रस होतो त्याला इंग्रजींत कैल (धातुपरस अथवा अन्नरस) असें ह्मणतात. हा धातुपरस आंतड्यांस लागून असणाऱ्या अन्नरसशोषक वाहिन्यांच्या (Lactels) योगानें शोषला जातो. नंतर त्या वाहिन्यांची एक जी मोठी वाहिनी होते ती तो रस पाठीच्या मणक्यांच्या बाजूनें मानेकडे जी शीर जाते तींत नेऊन सोडते. तेथें अन्नरसाचें रक्ताशयाच्या उजव्या कप्प्यांतील अशुद्ध रक्ताशीं मिश्रण होतें. नंतर तें फुफ्फुसांतील शिरांत येऊन तेथें श्वासांतील प्राणवायूशीं त्याचा संबंध झाला ह्मणजे त्याचें शुद्ध रक्त बनतें; नंतर तें रक्ताशयाचे डाव्या कप्प्यांत जातें व तेथून त्याची सर्व शरीरभर शरीरपोषणार्थ वांटणी होते, व शेष राहिलेला ह्मणजे निस्तेज व निरुपयोगी असा जो अन्नाचा भाग असतो, त्याचा मल बनून तो मलद्वारावाटे बाहेर पडतो. अशा रीतीनें आपण खाल्लेल्या अन्नाची व्यवस्था लागते. तेव्हां अर्थात् या व्यवस्थेंत कोणत्याही कारणानें व्यत्यय आला असतां अग्निमांद्याची पीडा होते, व त्यापासून दुसरे अनेक रोग उद्भवण्याचा संभव असतो. आतां आपण अग्निमांद्याचीं कारणें, लक्षणें, परिणाम व उपचार यांचा विचार करूं.

**अग्निमांद्यः—**(Dyspepsia) हा विकार सर्वत्र अगदीं साधारण आहे असें ह्मटलें तरी चालेल. तो श्रीमंत आणि गरीबांस सारखाच होतो. दिवसेंदिवस नवीन सुधारणा निघूं लागल्या, लोकसंख्या वाढत चालली, दुर्व्यसनें वाढलीं, लोकांस भलभलत्या संवयी लागूं लागल्या, ह्याखेरीज आपल्या देशांतील जमिनीवरचा सारा वाढला, त्यामुळें शेतकरी लोक दरिद्री झाले, आणि त्यांचीं शेतकीच्या कामीं उपयोगीं पड-

ण्यासारखीं जनावरें कमी झालीं, सबब त्यांच्यानें जमिनीची जशी कमावणी व्हावी तशी होत नाहीं, ह्मणून धान्य चांगलें कसदार उत्पन्न होत नाहीं, त्यांतून जें कांहीं बरें वाईट धान्य उत्पन्न होतें, त्यापैकीं बराच भाग परमुलुखीं जाऊं लागल्यामुळें इकडे धान्याची महर्गता झाली, शिवाय, आपल्या लोकांत लवकर लग्नें करण्याची चाल असल्यामुळें मनुष्य लवकरच कुटुंबी होतो, त्यांत त्या एकट्यानें कमवावें आणि पांच दहा असामींनीं खावें, अशी स्थिति येते, या व अनेक दुसऱ्या अडचणींमुळें प्रत्येकास पराकाष्ठेचे श्रम करावे लागतात व कोणालाच वेळेवर चांगलें शिजविलेलें पोटभर अन्न, आंगभर स्वच्छ वस्त्र, आणि मनमुराद स्वच्छ हवा, उजेड व पाणी हीं मिळूं शकत नाहींत. मग आरोग्य कोठचें असणार व अग्नि प्रदीप्त कसा राहणार? एक दारिद्र्य असलें ह्मणजे लोकांची ताबेदारी करावी लागते, आणि ताबेदारी संभाळण्यास जिवापाड श्रम करावे लागतात आणि काळजी घ्यावी लागते. ताबेदारीमुळें पचनव्यापाराची कशी अव्यवस्था होते याचें एक ठळक उदाहरण ह्मटलें ह्मणजे मोठमोठ्या कारखान्यांतील नोकर लोक. त्यांच्या नोकरीवर हजर होण्याच्या वेळा कांहींशा चमत्कारिक असल्यामुळें पूर्वीची जी त्यांची दहा किंवा अकरा वाजतां जेवणाची संवय असते ती बदलून अगदीं सुप्रभात किंवा मध्यान्हीनंतर त्यांस जेवावें लागतें, त्यामुळें कित्येकांस नोकरीची वेळ होत आली ह्मणजे स्नान केलें न केलें, अन्न शिजलें न शिजलें, तें नीटपणें चर्वण केलें न केलें, जेमतेम पोटाची भर झाली न झाली तोंच उठून अंगवस्त्रें नीट चढविल्याशिवाय धांवपळ करीत नोक-

रीवर रुजू व्हावें लागतें. मग अशा लोकांचें अन्नपचन चांगलें होणार कोठून? असा प्रकार सतत कांहीं दिवस होऊं लागला ह्मणजे शारीरिक व मानसिक क्षीणतेनें प्रथमतः पचनव्यापाराची थोडीबहुत अव्यवस्था होणें अगदीं सहाजिकच आहे. आपल्या देशांत तर शेंकडा पांच किंवा फार तर दहा असामीच ह्या विकारापासून मुक्त असे सांपडतील. बहुतेक लोकांना जठरासंबंधीं कांहींना कांहीं विकार आहेच. परंतु जोंपर्यंत ह्या रोगास एखादें उग्र स्वरूप आलें नाहीं, तोंपर्यंत हा विकार आहे असें कोणास वाटत नाहीं व त्यामुळें त्यांस अंथरूण धरूनही बसावें लागत नाहीं, आणि त्याच स्थितींत ते कित्येक वर्षें काढितात. कित्येकांचे तर हा रोग केवळ अंगवळणींच पडल्यासारखा असतो. परंतु जेव्हां हा विकार विकोपास चढतो तेव्हां मात्र त्याकडे लोकांचें लक्ष लागतें.

**अग्निमांद्याचीं कारणें:**—अगिमांद्य होण्याचीं कारणें अनेक आहेत. जठर किंवा आंतडीं ह्यांस एखादा विकार झाला असतां, बहुधा अग्निमांद्यविकार होतो. किंवा त्या इंद्रियांशीं दुसऱ्या एखाद्या रोगाचा कांहीं विवक्षित रीतीनें संबंध असल्यानें हा विकार उत्पन्न होतो. बहुतकरून जठराशीं संबंध नाहीं, असे रोग फारच थोडे सांपडतील. बहुतेक रोगांचा जठराशीं संबंध असतोच. कारण, कोणताही रोग, मग तो भयंकर असो अथवा अगदीं क्षुल्लक असो, उत्पन्न झाला कीं त्यापासून मनाची थोडीबहुत दुःस्थिति उत्पन्न होते. त्यामुळें जठराचा व्यापार बरोबर चालत नाहीं आणि अग्निमांद्य होतें. जठराग्नि किंवा पाचक रस (ग्यास्ट्रिक जूस) कमी प्रमाणानें उत्पन्न होऊं लागल्यास अन्नपचन

चांगलें होत नाहीं. व तें पुष्कळ वेळपर्यंत जठरांत जशाचें तसेंच असतें. आरोग्यस्थितींत प्रौढ वयांत नेमस्त आहाराचें पचन तीनपासून चार तासांत होतें असा बहुतेक नियम आहे. जठराच्या स्नायुमय पडद्याची कांहीं कारणानें शक्ति कमी झाली असतां अग्निमांद्य होतें. शिवाय आग्रहानें किंवा अधाशीपणानें अतिशय अन्न खाणें, अन्न चांगलें चावल्यावांचून गिळणें, प्रमाणानें आणि गुणानें अयोग्य असें अन्न खाणें, वेळीं अवेळीं जेवणें किंवा भुकेच्या वेळीं न जेवतां उशिरां जेवणें, वारंवार उपोषणें करणें, अति पाणी पिणें, वाईट हवेंत राहणें, बसून काम करणें, व्यायाम न करणें, अतिशय मांनसिक किंवा शारीरिक श्रम करणें, जाग्रणें करणें, तंबाखू खाणें किंवा ओढणें, चहा, कॉफी, मद्य इत्यादिकांचा अति उपयोग करणें, ह्या सर्व कारणांपासून अग्निमांद्यविकार उत्पन्न होतो. भ्रांतिष्ट मनुष्यानें त्यास जो पदार्थ आवडत नाहीं तो खाल्ला असतां त्यासही अग्निमांद्य होतें.

**अग्निमांद्याचीं लक्षणें:**—हीं बहुतेक जठरदाहाच्या लक्षणाजवळ जवळ असतात. तरी जेवण होतांच किंवा जेवण झाल्यानंतर कांहीं तासांनीं शिंपीचे प्रदेशीं जडत्वाचा भास आणि वेदना होऊं लागतात. कधीं कधीं उरांत जठराच्या वरच्या शेवटाकडे जळजळ आणि वेदना होत असतात. घशाशीं आंबट, कडू अथवा तेलकट पदार्थांचे गुचके येऊं लागतात, त्यास इंग्रजींत 'हार्टबर्न' असें ह्मणतात. पोट रिकामें असतां बहुधां पोटांत वायु धरतो आणि करपट किंवा जे पदार्थ खाण्यांत आले असतील त्यांच्या ढेंकरा येऊं लागतात. अंत्राची जशी स्थिति असेल त्याप्रमाणें कोष्टबद्ध

असतो किंवा अतिसार उत्पन्न होतो. मूत्र बहुधा विपुल आणि पाण्यासारखें असतें. क्षुधेंत फरक होतो, ह्मणजे क्षुधा फार वाढते किंवा कमी होते, भलतेच वेळीं भूक लागते आणि आंबट, थंड, तेलकट असे पदार्थ खाण्याची इच्छा होते व कपाळ दुखतें. जिभेवर पिंवळट पांढरा सारा जमतो व कित्येक उदाहरणांत जीभ फुटते, किंवा ती जाड होऊन तिजवर दांत लागून तिला खळ्या पडतात व तोंडाची रुचि कमी होते. कधीं कधीं वांती होते किंवा मळमळतें आणि तोंडाला बेचव पारदर्शक पाणी पुष्कळ सुटतें. वांतींत अन्न, कफ किंवा हिरवट पिंवळ्या रंगाचें पित्त पडतें. तोंडाला दुर्गंधी सुटते, व कधीं कधीं उचकी लागते. रात्रीं चांगली शांत झोंप लागत नाहीं आणि तऱ्हेतऱ्हेचीं स्वप्नें पडतात. घशांत लाली उत्पन्न होते व कधीं कधीं तोंडांतील व घशांतील पिच्छात्वचेवर लहान लहान क्षतें पडतात. सकाळच्या प्रहरीं खोकल्याचा ठसका लागून कफ पडतो. अंग गार आणि चिकचिकित होतें. हातापायांची आणि डोळ्यांची आग होते. हीं लक्षणें कांहीं उपाय झाल्याशिवाय बरेच दिवस राहिलीं ह्मणजे रोग्यास वारंवार थकल्यासारखें वाटतें, उरांत धडधडतें, डोळ्यांपुढें अंधाऱ्या येतात, भोंवळ येते, नाडीची गति अनियमित होते, शेवटीं मनाची स्थिति बदलते, रोगी चिरडखोर होतो, त्यास एकांत आवडूं लागतो, तो उदास होतो, उद्योगधंदा सुचत नाहीं, आणि त्याचे विचार त्याच्या दुखण्याकडे लागतात व त्यास अनेक रोग झाल्याचे भास होऊं लागतात.

**गतिः**—अग्निमांद्याची गति निरनिराळ्या तऱ्हेची असते. कधीं कधीं अग्निमांद्याचीं लक्षणें कांहीं महिनेपर्यंत तशींच राहिल्यानंतर हवेचा फेरफार झाल्यामुळें अथवा रोग्याची खाण्यापिण्याची रीति बदलल्यामुळें, किंवा कधीं कधीं कांहीं उघड कारणांशिवाय एकाएकीं नाहींशीं होतात. कित्येकांत ही पीडा चिरकाल राहते. असें झाल्यास दुःखदायक लक्षणें शांत करण्याखेरीज दुसरा कोणताच इलाज नसतो. अग्निमांद्यापासून जीवाला धक्का बसत नाहीं, पण तें जर फार दिवस राहिलें, तर परिणामीं दाह होतो, आणि त्यापासून कधीं कधीं आमवात, मधुमेह, हृद्रोग आणि अग्झालिक किंवा युरिक ॲसिड डायाथिसिस नांवाचे मूत्रविकार होतात.

**उपचार व पथ्यः**—आपण खाल्लेल्या अन्नाचें जर पचन होणार नाहीं, व शरीरपोषक जो रक्तधातु तो उत्पन्न होणार नाहीं, तर शरीरांत जोम राहणार कोठून व शरीरव्यापार तरी चालणार कसे? ह्मणून प्रत्येक मनुष्यानें आपला पचनव्यापार न बिघडे अशी तजवीज ठेविली पाहिजे.

अग्निमांद्य विकारांत पथ्य हाच मुख्य उपाय होय, ह्मणून अग्निमांद्याचीं जीं कारणें सांगितलीं आहेत त्यांपासून दूर असावें. आग्रहानें किंवा अधाशीपणानें अधिक जेवूं नये. अन्नाचें चांगलें चर्वण झाल्याशिवाय तें घाईघाईनें गिळूं नये. वृद्ध असतील त्यांनीं जड पदार्थ न खातां पेजेसारखे पातळ पदार्थ खावे. अन्न स्वच्छ, ताजें आणि चांगलें शिजविलेलें असें खावें व दिवसांतून तीन किंवा चार वेळां जेवावें; परंतु अन्न बेतानें खावें आणि एकदां खाऊन पुन्हां पांच तास गेल्याशिवाय दुसऱ्यांदा खाऊं नये. श्रांतिष्ट मनुष्यानें त्यास न आवडणारा

पदार्थ खाऊं नये. जेवणाची वेळ नियमित असावी. जेवतांना मन शांत ठेवावें. संताप किंवा काळजी करूं नये. जेवण होतांच निजावयास जाऊं नये, सुमारें अर्धा तासपर्यंत हळूहळूं शतपावली करावी. येतां जातां पाणी पिऊं नये, जेवतांना किंवा जेवण झाल्यानंतर परिमित पाणी प्यावें. दररोज मोकळ्या हवेंत बेताचा व्यायाम करावा व व्यायाम होण्याबरोबर अंगास थंडी लागून कांटा येऊं नये, एतदर्थ खबरदारी घ्यावी. नेहमीं दोन वेळां अगर एक वेळां नेमलेल्या वेळीं मलशुद्धि करण्याची संवय ठेवावी. उन्हाळ्याच्या दिवसांत कच्चीं फळें वगैरे खाऊं नयेत, आणि कोणत्याही प्रकारचे श्रम बेतानेंच करावे. तंबाखू, मद्य यांचा उपयोग करूं नये व चहाकफीची संवय ठेवूं नये. जाग्रणें करूं नये. काळजी उत्पन्न करणारीं जीं कारणें असतील तीं टाळावीं, व ज्या गोष्टींसंबंधानें काळजी उत्पन्न होते त्या गोष्टी आपल्या उपयोगाच्या नाहींत, असें समजून आपला वेळ एखाद्या समाधानकारक उद्योगांत घालवावा. दररोज थंड पाण्यानें स्नान करावें व अंग चोळून धुवावें. त्यापासून थंडी होऊं लागल्यास तें बंद करावें.

वांती आणि शिंपीचे प्रदेशीं वेदना व स्पर्शासहनत्व असतें, तेव्हां त्या ठिकाणीं पांच सहा जळवा लावाव्या, किंवा ब्लिस्टर मारावें, अथवा मोहरीचा लेप लावावा त्यांनीं वेदना आणि वांती बंद न झालीं तर ॲसिड हैड्रोसियानिक डिल्यूट २ मि., सोडा बायकार्बोनस १० ग्रेन, पाणी १ औंस असें मिश्रण दर तीन तासांनीं द्यावें, किंवा बिसमथ सबनैट्रस १० ग्रेन, टिंक्चर ओपाय ९ मि., गोंदाचें पाणी

१ तोळा, पाणी १ औंस असें मिश्रण द्यावें; किंवा दुधांत २ गुंजा टांकणखाराची लाही घालून तें पाजावें, अथवा आवळकठीची राख मधांत चाटवावी आणि पथ्यास $\frac{२}{३}$ दूध व $\frac{१}{३}$ चुन्याची निवळ ( यादी नं. ९ भा. प. ) असें एकत्र करून द्यावें. त्याचे योगानें वांती बंद होते, व रोग्याचें पोषणही होतें. ढेंकरा फार येत असल्यास सोडा बायकार्बोनस १० ग्रे., बिसमथ सबनैट्रस ५ ग्रे., गोंदाचें पाणी ०॥ तोळा, पाणी १ औंस, असें मिश्रण जेवणाचे पूर्वी घ्यावें. पोटांत वायू धरतो तेव्हां स्पिरिट आमोनिया अरोम्याटिक १० मि., स्पिरिट क्लोरोफार्म १० मि., डिस्टिल्ड वाटर १ औंस, असें मिश्रण दर तीन तासांनीं द्यावें. किंवा बिसमथ सबनैट्रस १५ ग्रे. क्रियसोट १ मि., एक्सट्र्याक्ट जेनाशियन ६ ग्रे., यांच्या तीन गोळ्या करून दर तीन तासांनीं एक गोळी पाण्याच्या अथवा दुधाच्या घोंटाबरोबर घ्यावी; किंवा हर्तकी, पादेलोण, हिंग, वेखंड, अतिवीष आणि इंद्रजव हीं सर्व समप्रमाणानें घेऊन त्यांचें चूर्ण करून त्यापैकीं दोन किंवा तीन मासे चूर्ण ऊन पाण्यांत घालून घ्यावें. किंवा लसूण, संचळ, जिरें, सैंधव, त्रिकटु, हिंग हीं समप्रमाणांनीं घेऊन त्यांचा लिंबाच्या रसांत खल करून बोराएवढ्या गोळ्या कराव्या. त्यांपैकीं एक गोळी ताकांतून अगर पाण्यांतून द्यावी. किंवा हिंग, वेखंड, बीडलोण, सुंठ, ओंवा, बाळहर्तकी हीं सर्व समप्रमाणांनीं घेऊन त्यांचें चूर्ण करून त्यापैकीं दोन किंवा तीन मासे चूर्ण ताकांतून अगर पाण्यांतून घ्यावें, ह्मणजे पोटांतील वायु वगैरे नाहींसा होऊन अन्नाचें पचन होतें व शौचासही साफ होतें. तोंडास दुर्गंधी वगैरे येत असल्यास क्लोरेट ऑफ पोट्याश ५

ग्रे., पाणी १ औंस, असें मिश्रण द्यावें. किंवा कोळसा अथवा चारकोल बिस्किट्स खावीं. तोंडांत गुळण्या येऊं लागल्या तर बिसमथ सबनैट्रस १० ग्रे., गोंदाचें पाणी ·॥· तोळा असें एकत्र करून घ्यावें, किंवा पल्व्हिस कायनो १० ग्रेन, पाणी एक औंस, असें मिश्रण घ्यावें. कोष्टशुद्धि होत नसल्यास एखादें सौम्य रेचक द्यावें (यादी नं. ७ भाग प.). कंपाउन्ड ऱ्हुबार्ब पावडर अर्धा ड्राम, आणि सोडा टार्ट्रस १ ड्राम, असें एकत्र करून दिलें असतां चालेल, परंतु तीव्र रेचकांचा उपयोग करूं नये. जठराचा क्षोभ कमी झाला ह्मणजे किराइताचा फांटा १ औंस (यादी नं. १२ भा. प.), टिंक्चर नक्सव्हामिका ५ मि., आसिड हैड्रोक्लोरिक डिल्यूट ५ मि., असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा आसिड नैट्रोम्युरियाटिक डिल्यूट २ मि., टिंक्चर जेन्शियन २० मि., टिं. नक्सव्हामिका ५ मि., इनफ्यूजन काशिया १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा कोलंबकाचरी १ तोळा, बडीशेप २ तोळे, बाळहर्तकी २ तोळे, सैंधव २ तोळे, संचळ २ तोळे, दालचिनी १ तोळा, लवंग १ तोळा, सुंठ १ तोळा, वेलची १ तोळा, मीरी एक तोळा, कुचला पाव तोळा, ह्या सर्वांची वस्त्रगाळ पूड करून ती सकाळ संध्याकाळ पाव तोळाप्रमाणें पाण्यांत घ्यावी. किंवा किराईत, निंबसाल, त्रिफळा, पडवळ, अडुळसा, गरमाळा, पित्तपापडा, माका यांचा काढा करून घ्यावा. अतिसार झाला असल्यास तो अतिसारप्रकरणीं सांगितलेल्या उपायांनीं बंद करावा, आणि नेहमीं पथ्यानें रहावें ह्मणजे अग्निमांद्याची पीडा होणार नाहीं.

# अजीर्ण किंवा मोडशी.

INDIGESTION.

अजीर्ण किंवा मोडशी हा एक अग्निमांद्याचाच प्रकार आहे. कित्येक वैद्य हीं दोन्ही एकाच रोगांत गणतात. परंतु ह्यांत भेद एवढाच आहे कीं, अग्निमांद्यांत दोषाची पीडा फार दिवस राहून नंतर कांहीं दिवसांनीं तिचा परिणाम शरीरावर घडतो, व अजीर्णांत तो ताबडतोब अनुभवास येतो.

**कारणें:**—अजीर्ण होण्याचीं कारणेंही बहुतेक अग्निमांद्याच्याच कारणांपैकीं आहेत. ह्मणजे कांहीं जडान्न, पक्वान्नें किंवा वाल, उडीद, मका इत्यादि धान्यें अतिशय खाण्यांत आल्यानें, किंवा अपक्व फळें खाण्यांत आल्यानें, किंवा हलवा नांवाचा एक मासा असतो तो खाण्यांत आल्यानें, अथवा नासकें मांस खाण्यांत आल्यानें अजीर्ण होतें. एकदां खाल्लेल्या अन्नाचें पचन होण्यापूर्वीच दुसऱ्यांदां खाणें, जाग्रण करणें, फार पाणी पिणें इत्यादि कारणांनींही अजीर्ण उत्पन्न होतें. नासके पदार्थ खाण्यांत किंवा पिण्यांत आल्यानें अजीर्ण होतें. अतिशय मानसिक अथवा शारीरिक श्रम झाल्यानें, आणि चिंता, क्रोध, भय, मोह, शोक इत्यादीपासून कधीं कधीं तत्काळ अजीर्ण होतें. अजीर्णाचा उपद्रव फार करून उष्ण ऋतूंत होतो.

**लक्षणें:**—घशाशीं आंबट कडू पदार्थांच्या गुचक्या येतात, ढेंकरा येतात व त्यांस बहुतकरून करपट वास असतो. मळमळतें किंवा ओकाऱ्या होतात व ओकारींत अपचनीय अन्न पडलें ह्मणजे बरें वाटतें. पोटांत गुरगुरतें, कळ येते, व कधीं

कधीं पाण्यासारखे रेच होतात. शोष पडतो व जिव्हा लालभडक किंवा तिजवर पिंवळट पांढऱ्या रंगाचा सारा जमला असतो. नाडी क्षीण असते, ग्लानि येते, डोळे खोल जातात, हातपाय फुटतात, व गळाल्यासारखे होतात. कधीं कधीं ह्या लक्षणांबरोबर अंगांत ज्वर भरतो. लहान मुलांना हा विकार झाला असतां वरील लक्षणांबरोबर त्यांस कधीं कधीं आंकडे (Convulsions) येऊं लागतात.

**उपचारः**—एक दोन वांत्या किंवा रेच झाले ह्मणजे बहुतकरून कारण दूर होतें, आणि रोग्यास आराम पडतो. परंतु रेच किंवा वांती न झाल्यास वमन द्यावें (यादी नं. २ भा. प.), किंवा एखादें सौम्य रेचक द्यावें, (यादी नं. ७ भा. प.). रेच व वांत्या फार होऊं लागल्यास तीं त्या त्या प्रकरणीं सांगितलेल्या उपायांनीं बंद करावीं. बाकीचीं लक्षणें अग्निमांद्य विकारांत सांगितलेल्या उपायांनीं बंद करावीं. अवश्य वाटेल तेव्हां एखाद्या कुशल वैद्याचें मत घ्यावें. आहार साधा ह्मणजे जठरदाहविकारांत सांगितल्याप्रमाणें असावा व पुढें पथ्यानें वागावें.

---

## विषूचिका (पटकी).

### CHOLERA.

हा रोग महामारी, जरीमरी, वाखा, इत्यादि नांवांनीं आपल्या देशांत प्रसिद्ध आहे.

**उत्पत्ति व कारणें:**—ह्या रोगाच्या उत्पत्तीविषयीं डाक्टर लोकांचीं अनेक मतें आहेत. पाण्यांत झाडपाला, प्राण्यांची विष्ठा वगैरे कुजल्यानें, किंवा माणसें, जनावरें यांचीं

शरीरें सडत पडल्यानें एक प्रकारचें प्राणिज विष उत्पन्न होऊन तें हवेंत पसरतें. त्यांत एक प्रकारचे सूक्ष्म विषारी कीटक असतात. ते श्वासमार्गानें अथवा खाण्यापिण्याचे पदार्थांबरोबर मनुष्यांचे शरीरांत जाऊन हा रोग उत्पन्न होतो. हा रोग सांसर्गिक असल्या कारणानें ज्या मनुष्यास तो होतो त्याच्या शरीरांतून जुलाब, वांती, घाम वगैरे मळ निघतात, त्यांत ह्या रोगाचें विष असतें; तें हवेंत पसरून त्याच्या संसर्गानें हा रोग उत्पन्न होतो. ह्या विषाचा फैलाव त्वरित होतो. ह्या रोगाच्या संसर्गाचा अंमल बहुतकरून ज्या लोकांत खाण्यापिण्याचा धरबंध नसतो व जे प्रमाणानें आणि गुणानें अयोग्य असें अन्न व पाणी ह्यांचा उपयोग करितात, किंवा जे मलीनपणानें वागतात, आणि दाट, कोंदट व गलिच्छ वस्तींत* राहतात, जाग्रणें करितात, लांबची मजल करितात, धास्ती किंवा चिंता वाहतात, व जे वारंवार रेचकाचा उपयोग करितात, त्या लोकांवर लौकर बसतो. शिवाय व्यसनी, क्षीण आणि रोगट अशीं मनुष्यें ह्या रोगाचे सांथीस विशेष पात्र असतात. बहुतकरून उंच प्रतीपेक्षां नीच प्रतीच्या लोकांना ह्या रोगापासून विशेष पीडा होते. लहान मुलांना ह्या रोगाची पीडा क्वचित् होते, आणि जेव्हां लहान मुलांना हा विकार होतो तेव्हां सांथ भयंकर प्रकारची आहे असें समजावें.

हा रोग कोणत्या ऋतूंत उद्भवतो ह्याचा नेम नाहीं, तरी पावसाळ्याचे सुमारास ह्याची सांथ येतांना बहुशः आढळते. ह्याचें कारण असें असतें कीं, त्या वेळीं ओढे, विहिरी,

---

* ह्याचीं प्रमाणें तुरुंग, लष्कर, आणि यात्रा ह्या ठिकाणीं नेहमीं पाहण्यांत येतात.

नद्या, यांचें पाणी बिघडतें व हवेंतील उष्णतेच्या योगानें लोकांची पचनशक्तिही कमी झालेली असते.

**लक्षणें:**—बहुतकरून पोटांत दुखल्याशिवाय ढाळ होणें हें ह्या रोगाचें पहिलें लक्षण असून बहुधा त्यास सकाळीं प्रारंभ होतो. शक्ति गेल्यासारखी वाटते, चेहरा बदलून एकाएकीं उदासिनता प्राप्त होते, डोकें दुखतें, भोंड येते, कानांत आवाज होऊं लागतात, आणि कांहीं वेळानें जुलाब लवकर लवकर होऊं लागून वांत्या सुरू होतात, व प्रकृति फार क्षीण झालीसें वाटून पोट अगदीं खपाटीस जातें; तहान अतिशय लागते, हातापायांस वांब येतात, पोटाचे स्नायु ओढतात, अंग गार पडतें; ह्यावेळीं जुलाबाचा रंग बदलून जुलाब तांदुळाच्या पेजेसारखा दिसतो. प्रथम वांतीच्या बरोबर पोटांत असेल तें पडतें. नंतर ज्या वांत्या होतात, त्या बहुतेक पाण्यासारख्याच असतात; परंतु कधीं कधीं वांतीचा रंग पिंवळा होतो, तळमळ फार होते, लघवी होत नाहीं, आणि लघवी न होणें हें ह्या रोगाचें एक मोठें महत्वाचें लक्षण आहे. ह्या विकारांत बुद्धीला बहुतकरून विकार होत नाहीं. अंग गार पडतें, तरी अंगाचा फारच दाह होत असतो. अंग घामानें चिकचिकित होतें, कधीं कधीं अंगाचें उष्णमान अगदींच कमी होतें, ह्मणजे ७२ अंशावर सुद्धां येतें, नाडी हातास लागते न लागते अशी होते किंवा अगदींच लागत नाहींशी होते, ढाळ आंथरुणांतच होऊं लागतात, शब्द खोल जातो, डोळे आंत जाऊन अर्धे मिटलेले दिसतात, नखें व ओंठ काळसर दिसूं लागतात, नाक बारीक व चिंचोळें दिसतें, गालफडें बसतात, अंगास

सुरकुत्या पडतात, व सर्व शरीराची कांति बदलून त्याला प्रेतकळा येते. अशी स्थिति मरेपर्यंत असते.

**गतिः**—रोगी बरा व्हावयाचा असल्यास ग्लानि कमी कमी होत जाऊन हुशारी वाटूं लागते, अंगांत ऊब येऊं लागते, नाडी हातास लागूं लागते, लघवी होते, आणि एकंदर रसक्रिया हळू हळू पूर्वस्थितीवर येऊन रोगी बरा होतो. किंवा ग्लानि वाढत जाऊन रोगी मरतो. अथवा एखाद्या जीवितावश्यक इंद्रियांत दाह होऊन किंवा ज्वर भरून कांहीं वेळानें रोगी मरतो. कधीं कधीं असें होतें कीं, रोग्याला एखादाच रेच किंवा उलटी होते, आणि रोगी एकदोन तासांचे आंत मरतो. पटकीनें लागलेल्या लोकांपैकीं निम्मे रोगी बहुतकरून २४ तासांचे आंत मरतात. कित्येक २–३ दिवसपर्यंत राहून कांहींसे सुधारल्यासारखे होतात आणि पुन्हां लक्षणांचा चढ होऊन मरतात.

**भेदाभेदः**—तांदुळाच्या पातळ पेजेसारखे जुलाब व वांत्या होणें, लघवी बंद पडणें, हातापायांस वांब येणें, अंगाचें उष्णमान अतिशय कमी होणें, नाडी नाहींशी होणें, इत्यादि लक्षणांवरून पटकीचा रोग, अतिसार, अजीर्ण ह्यांपासून ओळखतां येतो.

**उपचारः**—ह्या घातक रोगावर खात्रीलायक उपायाचा अद्याप शोध लागला नाहीं, तरी कित्येक शोधक वैद्यांच्या अनुमानानें ठरविलेल्या औषधांपासून कधीं कधीं फायदा होतांना आढळतो. ह्मणून त्या औषधांची व उपायांची योजना खालीं लिहिली आहे. ह्या रोगाची सांथ आली असतां एखाद्या मनुष्यास रेच झाल्याबरोबर पुन्हां रेच न व्हावे ह्मणून टिंक्चर

ओपाय ९ मि., आसिड ग्यालिक १० ग्रेन, असिड सल्फ्युरिक डिल्यूट १० मि., पेपरमिंट वॉटर १ औंस असें मिश्रण द्यावें. किंवा क्लोरोडाईन १० थेंब, पाणी १ औंस असें मिश्रण द्यावें. किंवा अफू २ गुंजा, हिंग ४ गुंजा, काळ्या मिऱ्यांची पूड १९ गुंजा, मिरच्यांची पूड ६ गुंजा, कापूर ३ गुंजा ह्यांच्या आल्याचे रसांत ९ गोळ्या करून त्यांपैकीं एक गोळी पाण्याच्या घोटाबरोबर जुलाब बंद होईपर्यंत दोन दोन तासांनीं द्यावी. किंवा भांग २ गुंजा, सुंठ ३ गुंजा, काळीं मिरें २ गुंजा, पिंपळी ४ गुंजा, या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून डाळिंबाच्या रसांत चांगला खल झाल्यावर वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्या आणि त्यांपैकीं २ गोळ्या प्रत्येक दोन किंवा तीन तासांनीं जुलाब बंद होत तोंपर्यंत द्याव्या. तांदुळाच्या पातळ पेजेसारखे जुलाब आणि वांत्या होऊं लागल्या ह्मणजे कित्येक डाक्टर ९ ग्रेन क्यालोमेल (शुद्ध केलेला रसकापूर) थंड पाण्यांत मिश्र करून प्यावयास देतात. कित्येक एरंडेल २ ड्राम, पेपरमिंट वॉटर १ औंस, असें मिश्रण देतात. नंतर प्राणिज कोळसा ( Animal Charcoal ) १ ड्राम, ब्रांडी २ ड्राम, पाणी एक औंस असें मिश्रण दर तीन तासांनीं देतात, त्यापासून क्वचित् कधीं फायदा होतो. डा. लीथस कालरा मिक्श्चर द्यावें. वांत्या होऊं लागतात तेव्हां पोटावर मोहरीचें प्लास्टर मारावें, किंवा क्लोरोफॉर्म व थोडेसें टिंक्चर ओपीयम यांमध्यें भिजविलेली कापडाची घडी पोटाचे शिंपीवर ठेवावी. बर्फाचा तुकडा चोखावयास द्यावा किंवा लाईकर अमोनिया फॉरच्यर ३ मि., टिंक्चर ओपाय ९ मि., ब्रांडी २ ड्राम, पेपरमिंट वॉटर १ औंस, असें मिश्रण प्रत्येक

तासानें घ्यावें. किंवा क्रेटा प्रिपेरेटा १० ग्रे., टिंक्चर ओपाय ५ मि., टिंक्चर क्याटेच्यू १० मि., आसिड ग्यालिक ५ ग्रे., अक्वा सिनामोमी १ औंस, असें मिश्रण प्रत्येक तासानें द्यावें. किंवा टरपेंटाईन १० मि., स्पिरिट इथरिस नायट्रोसी १० मि., लाइकर मॉरफिया हायड्रोक्लोरेटिस ५ मि., म्युसीलेज १ ड्राम, पाणी १ औंस असें मिश्रण प्रत्येक २ तासांनीं द्यावें. सल्फ्यूरिक आसिड डिल्यूट १० थेंब, पाणी १ औंस, असें मिश्रण उलटी बंद होईपर्यंत घ्यावें. किंवा हैड्रेट क्लोरल ५ ग्रेन, साखरेचा पाक २ ड्राम, पाणी १ औंस, असें मिश्रण उलटी बंद होईपर्यंत घ्यावें.

रोग्याच्या तैनातीस असलेला मनुष्य धीट, निरोगी आणि सदृढ असावा. रोग्यास वांती आणि मळ झाल्याबरोबर त्यांत हिराकस (सल्फेट ऑफ आयर्न), ब्लीचिंग पावडर, किंवा क्यारबॉलिक आसिड घालून त्या मळाची दुर्गंधी हवेंत पसरूं न देतां ती घरापासून दूर अंतरावर नेऊन ३ फूट ओंड खाड्यांत पुरून टाकावी. विहिरी, तळीं वगैरेशीं ह्या मळाचा मुळींच संपर्ग होऊं देऊं नये. तसेंच वांती आणि मळ यांनीं बिघडलेले कपडे क्याबोलिक आसिडाच्या पाण्यांत (यादी नं. ३८) उकळून धुऊन काढावे, व ज्या ठिकाणीं रोग्याची वांती व मळ पडला असेल तीं ठिकाणें स्वच्छ धुऊन साफ करावीं. त्या ठिकाणीं दुर्गंधिनाशक पदार्थ टाकावे (भा. प. शुश्रूषा पहा). रोग्याच्या अंथरुणाजवळ पुष्कळ कापूर, व ऊद जाळावा, किंवा त्या खोलींत डांबर व गंधक जाळावा. तेथें कोणास येऊं देऊं नये. म्युनिसिपालिटीचे लोक अशी कांहीं व्यवस्था करण्यास आले असतां त्यांस हरकत करूं नये.

तहान लागते त्यासाठीं मिळाल्यास बर्फाचे तुकडे पाहिजे तितके द्यावे. पण पाण्याचा एक थेंबही देऊं नये. बर्फ न मिळाल्यास अतिशय गार पाणी पाहिजे तितकें द्यावें. पाणी गाळून तापल्यानंतर गार करून पाजावें. कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, पाण्यांत मीठ किंवा बायकारबोनेट आफ् सोडा असें मिश्रण करून पाजावें.

**पथ्य:**—प्रथमतः कांहींच देऊं नये. रोग्यानें मागितल्यास तांदुळाच्या कण्यांची किंवा तवकिलाची पेज द्यावी, किंवा स्वच्छ तापविलेलें दूध थंड झाल्यानंतर पाजावें. असें पथ्य शौच्य घट्ट होऊन प्रकृति सुधारणेच्या पंथास लागेतोंपर्यंत सुरू ठेऊन नंतर हळूहळू थोडें जडान्न देण्यास सुरुवात करावी.

हातापायांस वांब येतात त्याजवर राईचे लेप मारावे. किंवा सुंठीचें चूर्ण पाण्यांत कालवून लावावें. अथवा क्लोरोफार्म आणि टरपेंटाईन, हीं समप्रमाणानें एकत्र करून चोळावीं, किंवा लिनिमेंट क्यांफर कंपाऊंड चोळावें. किंवा ब्रांडी अथवा कोलन वॉटर ऊन करून चोळावें. किंवा ऊन पाण्यानें भरलेल्या बाटल्यांनीं किंवा विटकरांनीं शेकावें, ह्मणजे अंगांत ऊब येते. वारंवार थोडी ब्रांडी व गार पाणी द्यावें. ऊर्णावस्त्रानें अंग आच्छादावें. मूत्र बंद होऊन पोट फुगलें तर, टिंक्चर डिजीटेलिस ५ मि., स्पिरिट इथरीस नैट्रोसी १० मि., स्पिरिट जुनीपर १० मि., पाणी १ औंस, असें मिश्रण प्रत्येक तासानें मूत्र होईपर्यंत द्यावें. कंबरेवर पळसाचे फुलांचा शेक करावा, किंवा आळशीच्या पोटिसांत टिंक्चर डिजीटेलिस, किंवा डिजीटेलिसचीं पानें घालून तें कंबरेवर बांधावें.

रोगी सुस्त झाला, आणि नेत्रत्वचा आरक्त झाली, तर मस्तकावर बर्फ लावावा. मानेवरील किंवा मस्तकावरील केंस काढून त्या ठिकाणीं ब्लिस्टर मारावें (यादी नं. २२ भा. प.).

कांहीं दिवसांमागें एका डाक्टरानें पटकीवरील उपाय प्रसिद्ध केला होता तोः–स्ट्रॉंग असेटिक आसीड ३० थेंब, स्वीट स्पिरिट ऑफ् नैटर १० थेंब, अशीं एक घोंटभर पाण्यांत मिश्र करून तें रोग्यास द्यावें. हें औषध एकदाच दिलें ह्मणजे पुरे. दोन वेळ देण्याची क्वचित् जरूर पडते, व रोग्याच्या कोणत्याही अवस्थेंत ह्याचा उपयोग होतो, असें ते डाक्टरसाहेब ह्मणतात. हें औषध चालू असतां तंबाखूचा कोणताही प्रकार देऊं नये. फार शोष पडल्यास एक घोंटभर सोडावाटर द्यावें. सेगू मुळींच देऊं नये. औषधानंतर १२ तासांनीं आरारूटची पेज, कोंबडीच्या पिलांचा रसा व कोरडी भाकर देण्यास हरकत नाहीं.

**हा रोग न होण्यास उपायः**—ज्या अर्थीं या रोगावर खात्रीलायक उपाय नाहीं, त्याअर्थी मागें दार्शित केलेलीं कारणें या रोगास कारणभूत आहेत असें समजून त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. जेव्हां गांवांत ह्या रोगाची सांथ येते, तेव्हां न घाबरतां मन स्वस्थ ठेवून धैर्य धरावें. वस्त्रप्रावर्णे आणि शरीर ह्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावें. वस्त्रें शुभ्र रंगाचीं असावींत, ह्मणजे पटकीच्या विषाचा अंमल बहुतकरून बसत नाहीं. घराच्या भिंती धुवून त्यांस चुन्याचा हात द्यावा. घरांतील व त्याच्या आसपास एखादा उकिरडा वगैरे असल्यास तो न हालवितां जाळून टाकावा. कारण, हालविला असतां, त्यांतले विषारी किडे बाहेर येऊन चोहोंकडे पसरतात. ज्या

दिशेनें दूषित वारा येत असेल त्या दिशेकडील द्वारें बंद करावीं. घरांतील माणसांची दाटी कमी करावी. गटारें, मोऱ्या, शौचकूप, उकिरडे, वारंवार साफ करवून त्या ठिकाणीं दुर्गंधिनाशक औषधें टाकावीं ( शुश्रूषा, भाग पहिला पहा. ). पिण्याच्या पाण्याविषयीं फार जपावें. तें चांगलें तापवून गाळून नंतर थंड करून प्यावें ( पृ. ९१ ते ९२ भा. प. ).

**अन्नः**—स्वच्छ, ताजें आणि चांगलें शिजविलेलें असें अन्न खावें, वेळच्या वेळीं जेवावें, रात्रीं फार खाऊं नये, जेवतांना घाई करूं नये, व मन शांत ठेवावें. आंबे, करवंदें, काकडी, चिबुड, अपक्व आणि अविकलेलीं फळें खाऊं नयेत, आणि रुक्ष धान्य हीं फारशीं खाऊं नयेत. उन्हांत फिरूं नये, जाग्रणें करूं नयेत, कोणतेंच व्यसन किंवा अंमल करूं नये, कापूर वगैरे सुगंधिक द्रव्यें नेहमीं जवळ ठेवावीं, वैद्याच्या संमतीखेरीज जुलाब घेऊं नये व पटकीचा उपद्रव सुरू असतां जुलाब होतांच वैद्याचें औषध घ्यावें. वैद्य मिळण्यासारखा नसल्यास, एखाद्या कुशल वैद्याचे माहितीनें पटकीवरील औषधें आणून ठेवावीं. कोणतेही श्रम अतिशय करूं नयेत. पटकीनें कोणी मेला असेल तर, त्याची तत्काळ चालीप्रमाणें व्यवस्था लावावी. प्रेत पुरावयाचें झाल्यास मनुष्यवस्तीपासून व पाण्याच्या पुरवठ्यापासून लांब व खोल पुरावें. प्रेताच्या आसपास, कापूर, ऊद, चंदन वगैरे दुर्गंधिनाशक द्रव्यें किंवा मीठ टाकून तें पुरावें. रोग्याचे कपडे, बिछाना वगैरे जाळून टाकावें, किंवा क्यारबॉलिक ॲसिडाच्या पाण्यांत उकळून साबूनें ते स्वच्छ धुवावेत. ज्या ठिकाणीं रोग्याची ( बरी किंवा वाईट ) व्यवस्था लागली असेल, तें

ठिकाण स्वच्छ धुऊन चुन्याचा हात द्यावा. जमीन खणून नवी करावी, घराचे दरवाजे बंद करून गंधक जाळावा व एक दोन आठवडे जात तोंपर्यंत त्या ठिकाणीं वस्ती करूं नये. रोग्यासाठीं ज्या वस्तूंचा उपयोग केला असेल त्या सर्व क्यार्बोलिक ॲसिडाच्या पाण्यानें धुऊन स्वच्छ कराव्या.

---

## मसूरिका.

SMALL POX.

ह्या रोगांत मसुरीच्या डाळीसारख्या अंगावर पुळ्या उठत असतात, ह्मणून त्यास 'मसूरिका' असें नांव दिलें आहे. तरी व्यवहारांत हा रोग 'देवी' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. यासच कोणी आंगचें असें ह्मणतात. घाटावरील लोक त्यास फोड्या असें ह्मणतात व उत्तर हिंदुस्थानांतील लोक 'माता' असें म्हणतात. हा रोग सांसर्गिक आहे. याची सांथ येत असते. ह्या रोगाचा सांसर्गिक गुण देवीच्या लसेंत आणि त्याजवरील खपल्यांत असतो. तो साक्षात् स्पर्शानें किंवा अन्न, पाणी व हवा ह्यांचेद्वारें बहुतकरून देवी न आलेल्या मनुष्यास जडतो. एकदा एका गांवांत ह्या रोगाचा प्रवेश झाला, ह्मणजे घरटिपेसारखी याची सुरवात होते. हा रोग बहुधा लहानपणींच येतो, तरी मोठेपणीं देवी आलेले पुष्कळ लोक आढळतात. हा रोग मोठा भयंकर आणि घातक असून अतिशय क्लेशकारक आहे. देवींचे वण कधींच नाहीं-तसे होत नाहींत. ह्या दुष्ट रोगांतून वाचणें ह्मणजे पुनर्जन्मच होतो. हा रोग झालेल्या मुलांपैकीं सरासरीनें पाहतां तिहींतून एक मरण पावतें. आणि देवीचे तीव्र प्रकारानें

पछाडलेल्या मनुष्यांपैकीं जे वांचतात ते बहुतेक कुरूप होतात, ह्मणजे आंधळे, बहिरे, लंगडे किंवा लुले होतात. बहुतेक आंधळ्यांची चौकशी करून पाहिली असतां त्यांची हकीकत देवीनें डोळे गेल्याची असते. ह्यापासून पुष्कळ मुलें गंड-माळा आणि क्षयरोग ह्यांस पात्र होतात.

देवीपासून जे हे भयंकर परिणाम उत्पन्न व्हावयाचे त्यांची तीव्रता कमी करण्यासाठीं आपल्या देशांत प्राचीन-काळीं तोडगे देत असत. ह्मणजे ज्या मनुष्याला आपोआप देवी आल्या असतील त्याच्या देवींतील लस घेऊन ती देवी न आलेल्या मनुष्याच्या त्वचेंत (त्वचा किंचित् फाडून) मनग-टाजवळ घालीत. ह्या उपायापासून ह्या रोगास किंचित् सौम्यपणा येत असे. हा प्रचार डाक्टर जेनर ह्या नांवाचे इंग्लिश वैद्यानें देवीच्या रोगाचा प्रतिबंधक उपाय शोधून काढीपर्यंत सर्वत्र चालू होता.

आतां आपण डा० जेनर ह्या विद्वान गृहस्थानें देवीच्या रोगाचा जो एक प्रतिबंधक उपाय शोधून काढला आहे त्या-विषयीं विचार करूं. नंतर आपोआप स्पर्शसंचारानें उत्पन्न होणाऱ्या देवींचा विचार करूं.

डा० जेनर ह्या शोधक गृहस्थानें देवीच्या रोगाचा प्रति-बंधक उपाय शोधून काढल्या दिवसापासून त्याचें प्राबल्य दिवसेंदिवस कमी होत चाललें आहे. आणि कित्येक सुधा-रलेल्या देशांतून तर हा रोग समूळ नाहींसा झाल्यासारखा आहे.

सन १८०० च्या सुमारास डा० जेनर साहेबांनीं असा शोध लाविला कीं, गाईची ओटी आणि सड यांजवरील फोड्या, ज्यांस गाईच्या देवी असें ह्मणतात, त्यांतील लस घेऊन ती

मनुष्यांच्या त्वचेंत घातली तर त्यांना बहुतकरून आपोआप येणाऱ्या देवी येत नाहींत. मात्र टोंचलेल्या ठिकाणीं देवीसारखे फोड उत्पन्न होतात; ह्या संस्काराचे परिणामाला गोस्तनदेवी (Cow Pox) असें नांव दिलें आहे. अंगच्या देवीप्रमाणें ह्यांत सांसर्गिक गुण मुळींच नसतो व ह्यापासून भयंकर परिणामही होत नाहींत. गोस्तनदेवीचा संस्कार करण्याचे कृतीला शिक्के देणें, देवी काढणें अथवा तोडगे देणें (Vaccination) असें ह्मणतात.

कित्येक लोकांच्या देवींच्या संबंधानें कांहीं चमत्कारिक समजुती आहेत; त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, देवी येणें, हा रोग नसून केवळ दैविक क्षोभ आहे, आणि त्याचा प्रतिबंध करणें ह्मणजे मोठें पाप होय. देवतांचा अपमान किंवा त्यांच्या भजनपूजनांत न्यूनत्व झालें असतां त्यांस कोप येतो, आणि त्याचा सूड उगविण्याकरितां त्या येत असतात, आणि जर कां ह्यावेळीं त्यांचा पूजादिक यथास्थित सत्कार न झाला, तर त्या अधिकच कोपास चढतात, आणि बहुधा त्या मनुष्याचा बळी घेतात, किंवा हाल हाल करून त्यास कुरूप करितात. तेव्हां ह्या दैविक क्षोभास प्रतिबंधक उपाय करून कोणता फायदा? जी गोष्ट घडणार ती झाल्यावांचून रहाणार नाहीं. पण अशा समजुतीच्या लोकांनीं असें खास समजावें कीं, कोणताही व्याधि ईश्वर स्वतः होऊन घालीत नाहीं. मनुष्य आपल्याच मूर्खपणानें आणि निष्काळजीपणानें आरोग्यशास्त्राच्या नियमांचें उल्लंघन करितो, त्यामुळें त्यास नानाप्रकारचे व्याधि होतात.

इंग्लिश सरकारानें देवीचे शिक्के घेण्याचे संबंधानें कायदा काढला आहे, आणि तो मोठमोठ्या शहरांतून चांगला अमलांत आणला जातो. ह्या कायद्यांत असें ठरविलें आहे कीं, प्रत्येक मुलाच्या पालकानें मूल सहा महिन्यांचे आंत आहे तोंच त्यास गोस्तनदेवीचे शिक्के द्यावे, आणि जे कोणी तसें न करितील ते कायद्यांतील दंडास पात्र होतील.

प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं सरकारानें देवी डाक्टर नेमले आहेत. ते गांवोगांव फिरून ज्या कोणास देवी आल्या नसतील त्यास प्रत्येक दंडावर पुढचे व बाहेरचे अंगीं २–३ ठिकाणीं टोंचून त्यांत कालवडीच्या देवीची लस भरतात ह्मणजे देवी काढतात. सर्व जातींचे लोक श्रीमंत आणि गरीब हा संस्कार आतां मोठ्या आनंदानें करून घेतात, परंतु अडाणी लोक मात्र आमच्या कुळांत देवी काढण्याची चाल नाहीं, वगैरे सबबी सांगून ह्या अद्भूत उपचाराचा अव्हेर करितात आणि देवदेवसकी करण्यासाठीं ढोंगी लोकांच्या नादीं लागून रोग्याची आणि पैशाची खराबी करून घेतात.

आतां आपण गोस्तनदेवीचा संस्कार केव्हां व किती वेळ करावा ह्याचा विचार करूं.

तीन महिन्यांचें मूल झालें ह्मणजे त्यास गोस्तनरोगाचा संस्कार करावा. या वेळेस जर कांहीं प्रकृतीचा बिघाड असेल, —ज्वर, खोकला, हगवण, खरूज इत्यादि—तरच मात्र ही संधि साधत नाहीं. मुलांना सात आठ महिन्यांच्या वयाचे आंतच हा संस्कार होऊन जावा. कारण या वयांत मुलांना दांत येऊं लागतात आणि त्यावेळेस त्यांची प्रकृति अधिक-

उणी बिघडत असते. तिसऱ्या महिन्यानंतर मुलांस गोस्तनरोग संस्कार करावा असें जरी आहे, तरी गांवांत जर देवींची जबर सांथ आलेली असली, तर विलंब लावतां कामा नये; कारण देवींचा विकार केव्हांही होणार आहे. शीत ऋतु हा गोस्तनरोगाच्या संस्कारास उत्तम काल ह्मणून आपोआप देवींचा प्रादुर्भाव नसल्यास फार तर तोंपर्यंत थांबण्यास हरकत नाहीं. परंतु या रोगाचें किंचित् चिन्ह दिसेल तर एक दिवसही विलंब लावणें हें जोखमीचें काम आहे. ह्मणून अशावेळीं मोठें दुखणें असल्याविना प्रकृतीचा अल्पस्वरूप बिघाड हा संस्कार करण्यास प्रतिबंधक आहे असें समजूं नये. कित्येक लोकांची समजूत अशी आहे कीं, गोस्तनरोगाचे शिक्के दिले असतांही देवी येतात व त्यापासून मुलें दगावतात. तेव्हां तो संस्कार करून कोणता फायदा? परंतु हा त्यांचा समज चुकीचा आहे. कारण जर गोस्तनरोगाचा संस्कार यथाशास्त्र झाला आहे, तर शेंकडा ९९ हिशांनीं देवीच्या रोगाची भीति कमी होते. ह्याची प्रतीति वाचकांस गोस्तनरोगाचा संस्कार कशा रीतीनें फलद्रूप होतो ह्याविषयीं माहिती करून दिली ह्मणजे सहज कळेल.

देवी काढल्यानंतर दोन दिवसांनीं त्या ठिकाणीं किंचित् सूज येते. व त्यासभोंवतालची कातडी लाल होते. पांचव्या दिवशीं त्या ठिकाणीं मौक्तिकासारखी चकाकणारी पुळी उत्पन्न होते, तींत पातळ पारदर्शक द्रव पदार्थ असतो. आठव्या दिवशीं ती पिकते व अंगच्या येणाऱ्या देवीच्या पुळीप्रमाणें मध्यभागीं किंचित् दबलेली असते. अकराव्या दिवशीं ती फुटून लाल होते, आणि १४ व्या दिवशीं त्यावर खपली

धरते. ती खपली १ महिन्याचे आंत पडते व तेथें वाटोळा वण राहतो. देवी काढल्यानंतर कधीं कधीं आठव्या दिवशीं थोडासा ज्वर, अस्वस्थता वगैरे लक्षणें उत्पन्न होतात. परंतु तीं एक दोन दिवसांनीं आपोआप नाहींशीं होतात. अशा रीतीनें हा संस्कार पार पडला ह्मणजे देवीच्या रोगाची भीति पुष्कळ अंशीं कमी होते, तथापि पीटिका मोठ्या झाल्यावरही फुटून जाऊं नयेत. त्यावर खपली होऊन ती आपोआप पडूं द्यावी. त्या ठिकाणीं सखल वण पडावा, व त्याचें स्वरूप चाळणीसारखें दिसावें. याप्रमाणें जर क्रम पूर्ण झाला, तर गोस्तनसंस्कार फलद्रूप झाला असें समजावें. परंतु देवी काढल्यानंतर जर त्यांचे फोड बरोबर उठले नाहींत, व ते जसे असावेत तसे नसले अथवा ते लवकरच फुटून गेले, किंवा जलदीनें उमटून जलदीनें सुकले व त्यांच्या खपल्या पडल्यावर वण चांगले राहिले नाहींत, तर गोस्तनरोगाचा संस्कार अपूर्ण झाला असें समजावें. व त्यापासून अंगच्या देवी येण्याची भीति कायम राहिली, असेंही समजावें. कदाचित् असेंही होतें कीं, पीटिका चांगल्या उठून व्रणही चांगला राहिला असतां देवींची पीडा होते. परंतु चार व्रण ज्याच्या दंडावर असतात त्यास एकाएकीं देवींचा उपद्रव होत नाहीं. चोहोंपेक्षां कमी असतात त्यांना मात्र पीडा होण्याचा संभव असतो. ह्मणून चोहोंपेक्षां कमी वण ज्यांच्या अंगावर असतील त्यांना देवीची सांथ आली असतां पुन्हां शिके दिल्यानें भीति रहावयाची नाहीं.

आणखी असें अनुभवास आलें आहे कीं, गोस्तनरोगाचा एकदां संस्कार केल्यानंतर सुमारें ७ वर्षांनीं त्याचा गुण कमी

होतो, आणि देवींचा उपद्रव फार नाहीं तरी थोडाबहुत होण्याचा संभव असतो. यास्तव देवींची सांथ आली असतां सर्वांनीं पुन्हां गोस्तनदेवीचा संस्कार करून घ्यावा, हें बरें. एकदां गोस्तनरोगाचे शिक्के चांगले उठलेले असले, तर ते पुन्हां घेण्याची जरुरी नाहीं, असें बहुतेकांस वाटतें, परंतु अनेक कारणांमुळें पहिला संस्कार पक्का होत नाहीं, ह्मणून देवींची सांथ आली असतां पुन्हां संस्कार करावा हें उत्तम आहे. हा शिक्क्याचा संस्कार यथास्थित झाला किंवा नाहीं हें पहाण्याकरितां शिक्के देणारे लोक आठव्या दिवशीं रोग्यास पहावयास येतात, तेव्हां रोग्याचे पालकांनीं त्यांस ते रोगी दाखविण्यास हरकत घेऊं नये, व त्यांस जरूर पडल्यास देवींतील लसही* घेऊं द्यावी; कारण ती लस दुसऱ्या मुलांस देवी काढण्यास उपयोगी पडते. लस काढून घेतल्यानें रोग्यास कांहींच इजा पोंचत नाहीं; परंतु कित्येक लोक ह्या गोष्टीस विनाकारण हरकत घेतात. मोठ्या शहरांखेरीज प्रत्येक ठिकाणीं कालवडीची लस नेण्याची सवड नसते, करितां गांवगन्ना लोकांनीं एकमेकांच्या उपयोगी पडण्यास चुकूं नये. देवी काढणारे लोक जुलमानें लस काढून नेतील या भीतीनें कित्येक लोक आठ दिवसांचे आंत पीटिका फोडून त्यांत माती अथवा राख भरतात, त्यामुळें रोगी इजा पावतात, इतकेंच नाहीं, तर देवींचा उपद्रव होण्याची पात्रता त्यांचे अंगीं कायम रहाते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

* लस घ्यावयाची ती लहान बालकाचीच घ्यावी, परंतु तें बालक सशक्त निरोगी, शुद्ध रक्ताचें आणि सशक्त आईबापांचें असलें पाहिजे. नाहीं तर त्याचे अंगीं असलेले विकार संसर्गानें दुसऱ्यास लागण्याचा संभव असतो.

मसूरिका रोगासाठीं जरी प्रतिबंधक उपाय आहे, तरी लोकांच्या अज्ञानामुळें किंवा हयगयीमुळें हा दुष्ट रोग त्यांस होण्याचा संभव असतो, ह्मणून त्यांच्या संबंधानें संपूर्ण माहिती वाचकांस करून देणें अत्यावश्यक आहे. मसूरिका रोगाचे (संसर्गानें आपोआप येणाऱ्या देवी) सौम्य किंवा मोकळ्या (Variola Discrete) आणि तीव्र किंवा मिसळलेल्या मसूरिका (Variola Confluent) असे मुख्य दोन प्रकार आहेत.

**लक्षणें:**—सौम्य प्रकारांत प्रथम ग्लानि आल्यासारखें होतें, नंतर थंडी वाजून ताप भरतो, पडसें येतें, डोकें दुखूं लागतें, ओकाऱ्या येतात, शिंपीच्या प्रदेशीं वेदना होत असतात, पाठींत व कमरेंत तिडका मारतात व एखादे वेळीं मज्जेंत क्षोभ उत्पन्न झाल्यानें रोगी बडबड करूं लागतो. लहान मुलास आंचके (आंकडे) येऊं लागतात. हीं लक्षणें विषसंचारानंतर १०—१२ दिवसांनीं उद्भवतात. कारण, तोंपर्यंत देवींचें विष शरीरांत गुप्त रहातें. तिसऱ्या दिवशीं अंगावर लहान लहान पुळ्या उमटतात, तेव्हां ज्वराचीं चिन्हें बहुधा नाहींशीं होतात किंवा शांत होतात. ह्या पुळ्या प्रथम मसुरीच्या डाळीच्या रंगाच्या व आकाराच्या असून कठिण असतात. त्या भगदीं सुट्या ह्मणजे वेगवेगळ्या असतात. त्या प्रथम तोंडावर, नंतर मान व मनगटें ह्या ठिकाणीं उमटून शेवटीं सर्व शरीरभर येतात. त्या दोन दिवसपर्यंत येत असतात. कधीं कधीं त्यांस अतिशय खाज सुटते. तिसऱ्या दिवशीं त्यांत पाण्यासारखी पातळ लस उत्पन्न होऊन त्या फुगतात व त्यांच्या सभोंवतालची कातडी लाल होते. चवथ्या दिवशीं

त्यांच्या मध्यभागीं एक खळगा पडतो. पांचव्या दिवशीं पुटकुळ्या पिकतात व ह्यावेळीं पुन्हां थोडींशीं ज्वरचिन्हें उत्पन्न होतात, परंतु तीं थोड्याच दिवसांनीं नाहींशीं होतात. घशांतही थोडासा दाह उत्पन्न होतो. आठव्या किंवा नवव्या दिवशीं मधला खळगा नाहींसा होऊन पुळ्या फुटतात, आणि त्यांजवर खपल्या धरतात. ह्या वेळीं रोग्याच्या अंगांतून एक प्रकारचा चमत्कारिक दुर्गंध निघत असतो. पुढें चार पांच दिवसांनीं खपल्या पडूं लागतात. देवींचा ज्या क्रमानें उगम होत असतो, त्याच क्रमानें त्या मावळूं लागतात आणि रोगी हळू हळू बरा होतो. ह्या प्रकारांत घातक परिणाम क्वचित् होतो. खपल्या पडल्यानंतर त्या ठिकाणीं तांबूस डाग राहतात, व ते एक दोन महिन्यांनीं आपोआप नाहींसे होतात; परंतु जे खोल वण असतात, ते मात्र कधींच जात नाहींत.

तीव्र प्रकारांतील लक्षणें बहुतेक सौम्य प्रकाराप्रमाणेंच असतात, परंतु तीं फार तीव्र असतात. ह्या प्रकारांत देवींचें उगवण लवकर होतें व तें फार दाट असतें, ह्मणजे ह्यांतील पुळ्या अगदीं एकमेकांत मिसळलेल्या असतात. ह्यांत घसा बराच सुजतो, गाल सुजतात व तोंडांतून अतिशय लाळ गळते. पुळ्या पिकूं लागल्या ह्मणजे त्वचा सुजते, तोंड विरूप आणि भयंकर दिसतें व पापण्यांस सूज आल्यामुळें डोळे मिटलेलेच राहतात. फोड फुटल्यावर त्या ठिकाणीं काळसर तांबूस रंगाच्या खपल्या धरतात, त्यांतून एक प्रकारची चमत्कारिक दुर्गंधि निघत असते. देवी एकमेकींशीं संलग्न असल्यामुळें खपल्याही मोठमोठ्याच धरतात आणि त्या निघाल्या ह्मणजे

अंगावर मोठमोठीं फांपरें किंवा चकदळें पडतात. मज्जातंतूचे क्षोभामुळें व्यंगें उत्पन्न होण्याचा संभव असतो. देवींचा डोळ्यांत प्रवेश झाला असतां डोळे जातात. ह्या प्रकारांत नाक, डोळे, घसा, तोंड, व जननेंद्रिय ह्यांच्या अंतस्त्वचेवर फोंड येतात, किंवा पांढरे चट्टे पडतात. घसा दुखूं लागतो व आवाज बसतो. गिळवत नाहींसें होतें व जीभ काळसर होऊन कोरडी पडते. नाडी क्षीण आणि जलद वाहूं लागते, रोगी बडबड करूं लागतो, व शेवटीं क्षीण आणि अस्वस्थ होऊन मरतो.

कधीं कधीं श्वासनलिका आणि फुप्फुसें ह्यांत दाह उत्पन्न होऊन खोकला येऊं लागतो. श्वासोच्छ्वास अडखळत चालतो व शेवटीं श्वासावरोध होऊन मृत्यु येतो. ह्याशिवाय धावरें, हागवण, आंकडी, पूयरक्त ( रक्त बिघडून शरीराच्या निरनिराळ्या भागांत पू होणें ) वगैरे विकार उत्पन्न होत असतात. ह्या प्रकारानें पछाडलेलीं मुलें बहुशः वांचत नाहींत.

**उपचारः**—देवी स्पष्ट असल्यास उपचाराची विशेष जरूर नसते. परंतु लक्षणें तीव्र असून ताप फार जोराचा असला व मलशुद्धिही साफ होत नसली, तर सलाईन मिक्श्चर द्यावें ( यादी नं. २९ ). किंवा पहिल्या भागांत गोंवर प्रकरणांत सांगितलेला काढा द्यावा. नुसता तापच येत असल्यास घाम येण्याचें औषध द्यावें ( यादी नं. ४ भा. प. ). कित्येक वैद्य देवींचा उपक्रम चांगल्या रीतीनें पार पडावा ह्मणून उंबराच्या पानावरील फोडांचा काढा करून सकाळ संध्याकाळ ह्याप्रमाणें २।३ दिवस देतात. घसा सुजला असल्यास सल्फेट आफ् झिंक २० ग्रेन, पाणी १० औंस अशीं एकत्र

करून त्याच्या गुळण्या कराव्या. किंवा गुलाबाच्या फुलांचा काढा १० औंस, मध अर्धा औंस, अफूचा अर्क ४० थेंब, किंवा अफू १ गुंज, अशीं एकत्र करून त्याच्या गुळण्या कराव्या. ग्लानि वाटूं लागण्यास वाईन किंवा द्राक्षारिष्ट द्यावें (यादी नं. ३१). देवींचे फोड फोडून त्यांत सुईच्या अग्रानें क्यार्बोलिक आसिड घालावें किंवा फोडावर तिळांचें ताजें तेल लावावें; किंवा तिळाचें तेल १ औंस, आसिड क्यार्बोलिक १ ड्राम, अशीं एकत्र करून तें त्यावर लावावें. रोग्यास मधून मधून कोमट पाण्यानें अथवा स्नानाचे पाण्यांत क्यार्बोलिक लोशन (यादी नं. ३८) मिश्रण करून त्याचें स्नान घालावें. कढत पाणी व दूध अशीं एकत्र करून त्यांनीं देवींची लस धुवावी. किंवा कांडीस फ्लुईड १ ड्राम, पाणी १० औंस, अशीं एकत्र करून त्यांनीं लस धुवावी. फोड फुटल्यावर ते लवकर सुकावे व त्या ठिकाणीं खाडे पडूं नयेत ह्मणून त्यांवर आक्साईड ऑफ झिंक पेरावें किंवा त्याचें मलम करून ह्मणजे आक्साईड ऑफ झिंक १ ड्राम, साधें मलम १ औंस एकत्र करून लावावें, किंवा पिंपळाच्या सालीची वस्त्रगाळ भुकणी करून ती लावावी. कित्येक वैद्य त्यावर शेणीची राख आणि बुक्का अशीं एकत्र करून तें लावतात. दुसरे गौण विकार उत्पन्न होतात तेव्हां त्या विकारांचे उपचार करावे. कुशल वैद्यास बोलावून त्याचें मत घ्यावें. दुखणेकऱ्यास गडबड होऊं देऊं नये. त्याच्या अंगावर शुभ्र आणि पातळ वस्त्रें असावीं व तीं बिघडलीं असतां त्वरित बदलावीं. त्याच्या खोलींतील हवा मोकळेपणें खेळली जाईल अशी तजवीज ठेवावी. रोग्याचे अंगावर वारा येऊं देऊं नये. थंडीचे वेळीं

खोलींत अकटी पेटवावी. घसा दुखत असतो तेव्हां जवसाचा किंवा भाताच्या लाह्यांचा काढा करून तो प्यावयास द्यावा. सौम्य प्रकारांत नेहमींचेंच जेवण असलें तरी चालतें. क्षीणता उत्पन्न झाली असल्यास पाचक व पौष्टिक असें अन्न द्यावें. रोगी बरा झाल्यावर त्यास हवा बदलण्याकरितां समुद्रकिनारीं पाठवावें.

**देवींचा संसर्ग फैलावूं नये एतदर्थ सूचनाः**—देवींचें उगवण अंगावर दिसतांच रोग्यास लागलेच एका स्वतंत्र कोठडींत ठेवावें. त्याच्याशीं इतर मनुष्यांचा फारसा संबंध ठेवूं नये. रोग्याचे कोठडींत कांहीं एक सामान ठेवूं नये. कारण, ह्या रोगाचा संसर्ग त्या सामानास चिकटून तो दुसऱ्या मनुष्यांस जडण्याचा संभव असतो. रोग्याचे मलमूत्रानें भरलेलीं चिरगुटें जाळून टाकावीं किंवा खार घालून उकळावीं. नाहीं तर धोब्याचे मार्फत घरोघर संसर्ग पोंचण्याचा संभव असतो. रोग्यानें मलमूत्र केलेली जागा क्यार्बोलिक लोशनानें धुवावी. खोलीच्या दरवाजावर एक स्वच्छ पडदा टांगावा व त्यावर क्यॉर्बोलिक लोशन वारंवार शिंपडावें. रोग्याच्या खोलींत ऊद जाळावा, ह्मणजे देखील तेथील हवा शुद्ध होते व रोगाच्या बीजाचा नाश होतो. लहान मुलाच्या विष्टेनें भरलेल्या गवताच्या किंवा पेंढ्याच्या लहान गुंड्या अथवा फडक्याच्या पुरचुंड्या रस्त्यावर फेंकून देण्याचा किंवा पाहिजे त्या ठिकाणीं टाकण्याचा कित्येक लोकांचा संप्रदाय आहे, तर तसें न करितां विष्टा वगैरे सर्व मळ शौचकूपांत किंवा दूर अंतरावर जेथें त्याचा पाण्याशीं संपर्क होणार नाहीं, अशा ठिकाणीं नेऊन पुरून टाकावा व खपल्या जाळून टाकाव्या. रोग्यानें

वापरलेल्या वस्तू क्यार्बोलिक लोशनानें शुद्ध केल्याशिवाय कोणी वापरूं नये. रोगी मनुष्याचे खोलींत गेलेलें अन्न व पाणी कोणी उपयोगांत आणूं नये, तें लांब नेऊन टाकावें. रोग्याजवळ असणाऱ्या मनुष्यांनीं बाहेर जाऊं नये. तसेंच बाहेरच्या मनुष्यांनीं देवी आलेल्या मनुष्याजवळ येऊं नये. जाणें झाल्यास जाऊन आल्यावर आपल्या अंगावरचीं चिरगुटें बदलावीं व तीं तावडतोब धुवून टाकावीं. रोग्याकडे जाणाऱ्यांनीं स्वच्छ व शुभ्र वस्त्रें नेसावीं. रोग्याचे कोठडींत सुवासिक पदार्थ, फुलें इत्यादिकांचा विशेष उपयोग करावा. रोगी बरा झाल्यावर खोली स्वच्छ धुवून काढावी, भिंतींस चुन्याचा हात द्यावा व जमीन, शेणांत थोडें क्यार्बोलिक आसिड घालून सारवावी. नंतर कांहीं दिवसपर्यंत खोली बंद ठेवून मग उपयोगांत आणावी.

---

## कांजिण्या.

### CHICKEN POX

**कांजिण्याः**—हा एक सौम्य प्रकारचा संसर्गजन्य रोग आहे. ह्याची सांथ येत असते, आणि तो बहुतकरून १२ वर्षांच्या आंतील वयाचे मुलांस होतो. ह्याचा संसर्ग एक वेळ होऊन गेल्यावर पुन्हां त्याची पीडा होत नाहीं. ह्या रोगास बहुतकरून साधारण पडसें, खोकला आणि ताप ह्यांनीं आरंभ होतो; आणि २४ तासांनंतर पुटकुळ्या उठतात. त्या प्रथम पाठीवर, नंतर हात, छाती आणि डोकें ह्या ठिकाणीं येतात. कधीं कधीं त्यांस खाज सुटते, तेव्हां मुलांस खाजवूं देऊं नये. दुसऱ्या दिवशीं त्यांच्या जलपीटिका होतात—ह्मणजे

कढत पाणी अंगावर पडलें असतां, जसे फोड उठतात, त्याप्रमाणें त्या दिसतात. तिसऱ्या दिवशीं त्या फुटून तेथें खपली धरते व ही खपली पांच दिवसांनीं पडते. देवीप्रमाणें यांचे वण रहात नाहींत.

**उपचार आणि पथ्य:**—रोग्यास स्वस्थ निजवून ठेवावें व त्यास शैत्याची वगैरे बाधा न होण्याविषयीं जपावें. तांदुळाची दुधांत तयार केलेली पेज द्यावी, किंवा वरणभात द्यावा. आंबट, थंड देऊं नये. शौचास साफ होत नसल्यास सलाईन मिक्श्चर द्यावें (यादी नंबर २९), किंवा पहिल्या भागांत गोंवर प्रकरणीं सांगितलेला काढा द्यावा.

---

## अग्निरोहिणी–काळपुळी.

### CARBUNCLE.

हा एक ग्रंथिज विकार असून त्याच्या नांवाप्रमाणें तो भयंकर आहे. ह्या विकारांत प्रथम एखाद्या मोठ्याशा गळवाप्रमाणें सूज उत्पन्न होऊन त्यांत तीव्र वेदना आणि जळजळ होत असते. ही गांठ प्रथम कठिण, चापट व सीमायुक्त असते, व तिचा रंग काळसर तांबूस असतो. पुढें ती हळूहळूं वाढत जाते व तिचा रंग बदलून जांभळा होतो. शेवटीं तिच्यावरील कातडी कितीएक ठिकाणीं कुजून तिला छिद्रें पडतात आणि त्यांतून एक प्रकारचा लालसर वाईट पू वहात असतो व कधीं कधीं ह्या छिद्रांत कातडीखालच्या त्वचेचे कुजलेले तुकडे येऊन अडकतात. ही गांठ बहुधा पाठीवर किंवा मानेवर होत असते. क्वचित् शरीराच्या अन्य ठिकाणीं ही होते. ह्याबरोबर किंचित् ज्वर असतो, तहान

अतिशय लागते, झोंप येत नाहीं, अस्वस्थता वाटते आणि जनक दुखतें. गांठ फार मोठी असून मांसक्षातन फार झपाट्यानें होत असल्यास ज्वर फार जबर असतो. शेवटीं रोगी अगदीं क्षीण होतो, बेशुद्ध पडतो आणि मरतो. हा विकार बहुधा मधुमेहाच्या रोग्यास होतो. क्वचित् क्षयी आणि अलब्यूमिनोरियाग्रस्त मनुष्यास हा होतो.

**उपचारः**—शौच्यास साफ होत नसल्यास रेचक द्यावें (यादी नं. ११ भा. प.). नंतर क्किनाईन सल्फस १ ग्रेन, आसिड हैड्रोक्लोरिक डिल्यूट ५ मि., टिंक्चर फेराय परक्लोरिडाय १० मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा लोह द्यावा. प्रकृति अतिशय क्षीण झालेली असल्यास ब्रांडी मिक्श्चर (यादी नं. १ भा. प.) द्यावें, किंवा द्राक्षारिष्ट द्यावें (यादी नं. ३१). किंवा स्पिरिट अमोनिया आरोम्याटिक २० मि., डिकॉक्शन ऑफ सिंकोनाबार्क १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. झोंप येत नसल्यास $\frac{1}{4}$ पासून $\frac{1}{2}$ ग्रेन अफू द्यावी. पुळीवर पिकवणें बांधावीं व ती नरम झाली ह्मणजे त्या ठिकाणीं काडीखार (नैट्रेट ऑफ सिल्व्हर) किंवा पोट्यासा फ्युजा एक दोन मिनिटेंपर्यंत चोळावा. हा प्रकार कुशल वैद्याच्या संमतीवांचून करूं नये. पुळी फुटल्यावरही पिकवणें बांधावयाचीं सुरू ठेवावीं. व जखम भरून येण्याकरितां घायतेल किंवा जखम भरून आणणारें मलम लावावें (यादी नं. १६—१७ भा. प.).

**पथ्यः**—ज्या विकृत अवस्थेशीं या पुळीचा संबंध असेल त्याप्रमाणें पथ्याचा बेत ठेवावा. बहुधा पौष्टिक आणि पचनीय असें अन्न द्यावें.

# अग्निविसर्प किंवा आग्या धावरें.

ERYSIPELAS.

हा एक त्वचेस होणारा रोग आहे. ह्या रोगांत चामडी आणि तिजखालची जालसदृशत्वचा ह्यांमध्यें एक विशिष्ट जातीचा दाह उत्पन्न होत असतो.

**कारणें:**—अग्निविसर्पाचीं कारणें अद्यापि चांगलीं समजलीं नाहींत. तथापि शरीरप्रकृतीच्या कांहीं विवक्षित स्थितीमुळें, किंवा हवेंत कांहीं दोष उत्पन्न झाल्यामुळें हा विकार होतो. शरीरावर आघात झाला असतां, व विशेषेंकरून तोंड व मस्तक ह्या ठिकाणीं आघात झाला असतां, हा रोग उत्पन्न होतो. कित्येक लोकांचे चामडीस, बिब्बा, आरनिका, गोवापौडर, क्रिसोफेनिक आसिड वगैरे औषधें लागल्यानें हा रोग उत्पन्न होतो. शैत्यापासून किंवा अजीर्ण झाल्यानें अथवा कवच असणारे जलचर प्राणी खाण्यांत आल्यानें हा रोग होतो. मधुमेह आणि अलब्यूमेनोरिया ह्या रोगांत देखील हा रोग उद्भवण्याचा संभव असतो. शिवाय मद्यपी आणि प्लेथोरिक ( ज्यांच्या शरीरांत रक्ताधिक्य झालें आहे असे ) लोक ह्या रोगास पात्र असतात. शीतकटिबंधांतील लोकांवर ह्या रोगाचें प्राबल्य बरेंच असतें. हा रोग सांसर्गिक आहे, आणि ह्याची बहुधा सांथ येत असते. सांथीचा प्रकार इस्पितळें, छावण्या इत्यादि ठिकाणीं कधीं कधीं चांगला अनुभवास येतो.

**लक्षणें:**—थंडी वाजून ताप भरतो. हा ताप दाहाचें शमन होईतोंपर्यंत एकसारखा असतो. नाडी जलद वहाते.

जिभेवर मळ सांचतो, कोष्ठशुद्धि बरोबर होत नाहीं, शोष पडतो, मळमळतें किंवा वांती होतें, डोकें दुखूं लागतें आणि ह्या लक्षणांबरोबरच किंवा एक दोन दिवसांनीं कोठें तरी त्वचेंत दाह उत्पन्न होतो. दाहयुक्त भागाचा वर्ण गुलाबी असतो, आणि तेथें चेपलें असतां दाब आहे तोंपर्यंत त्यांतील तांबडेपणा नाहींसा होतो. दाहयुक्त भाग सुजतो व जाड होतो आणि त्यांत आग होत असते. हा दाह आसपासचे भागांत त्वरित पसरतो. कधीं कधीं त्याचें स्थलांतरही होतें.

जेव्हां हा विकार आघातजन्य असतो, तेव्हां तो बहुतकरून तोंड आणि मस्तक ह्या ठिकाणीं होतो. तेणेंकरून ते भाग सुजतात, मुखचर्या विद्रूप होते, व पापण्या सुजल्यामुळें डोळे बंद होतात. कधीं कधीं दाह मेंदूपर्यंत पसरतो, त्यामुळें मज्जेच्या त्वचेलाही कधीं कधीं विकार होतो, आणि असें झालें ह्मणजे मस्तकशूळ, प्रलाप, आणि आंकडी येणें, इत्यादि लक्षणें उत्पन्न होऊन, घशांतही दाह उत्पन्न होतो. शेवटीं सन्निपातज्वराचीं लक्षणें उत्पन्न होतात. रोगी क्षीण आणि वृद्ध असल्यास बहुतकरून वाईट परिणाम होतो.

विकार अघातजन्य असल्यास आणि जखम झालेली असल्यास जखमेपासून होणारा स्राव बंद होतो; व तिचे कांठ सुजून लाल व गुलाबी होतात, व कधीं कधीं जखम भरून आलेली असल्यास ती पुनः फुटून वाहूं लागते.

साध्य उदाहरणांत ८—१० दिवसांनीं दाहयुक्त भागावरील कोंडा निघून जातो, आणि दाहाचें शमन होतें. कधीं कधीं दाहयुक्त भागावर लालसर द्रवानें भरलेले फोड उठ-

तात, ते कांहीं वेळानें आपोआप बसून जाऊन त्यावरील पापोद्रा निघून जातो आणि दाहाचें शमन होऊन रोगी बरा होतो.

असाध्य उदाहरणांत दाह जालसदृश त्वचेंत पसरतो व तेथें पुवानें भरलेले फोड उठतात आणि सरासरी ८—१० दिवसांनीं कातडीखालीं पूयभवन अथवा मांसनाशक क्रिया उत्पन्न होते, तेव्हां तो भाग बिलबिलीत व काळसर होतो, आणि तेथील त्वचा कुजूं लागते. दिवसानुदिवस पू आसपास पसरत जातो. शेवटीं सन्निपाताचीं लक्षणें होऊन रोगी क्षीण आणि सुस्त होऊन मरतो.

**उपचार:**—रोग्यानें स्वस्थ निजून असावें व वाऱ्यावर वगैरे फिरूं नये. मलशुद्धि साफ होत नसल्यास सलाईन मिक्श्चर द्यावें (यादी नं. २९). नंतर टिंक्चर फेरी परक्लोराईड १० मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा कडूपडवळ, अडूळसा, किराईत, कडुनिंब, कटुकी, बेहडा, आंवळकाठी, चंदन, गुगुळ, हीं सर्व अर्ध अर्ध तोळा घेऊन त्यांत ६४ तोळे पाणी घालून काढा अष्टमांश उरला ह्मणजे गाळून घ्यावा; किंवा कडू पडवळ, कडुनिंब, दारूहळद, कटुकी, ज्येष्ठमध, त्रायमाण हीं सर्व औषधें पाऊण तोळा प्रमाणानें घेऊन त्यांचा वरल्याप्रमाणेंच काढा करून घ्यावा, आणि दाहयुक्त भागावर तवकीर लावून वर कापूस व फडकें गुंडाळावें, किंवा लेडलोशन लावावें (यादी नं. २१ भा. प.). किंवा खसखशीच्या फुलांचा काढा करून त्यानें तो भाग शेकावा. किंवा नवसागर १ तोळा, मध ४ तोळे, पाणी ८० तोळे, अशीं एकत्र करून त्या मिश्र-

णांत भिजविलेली वस्त्राची घडी दाहयुक्त भागावर ठेवावी. किंवा जटामांसी, राळ, लोध्र, ज्येष्ठमध, रेणुकाबीज, मोरवेल, निळें कमळ, शिरस वृक्षाचीं फुलें, हीं सर्व पाण्यांत खलून त्यांचा लेप द्यावा. किंवा वड, पिंपळ, उंबर, पायरी आणि नांदरुखी या सर्वांच्या साली घेऊन, त्या पाण्यांत भिजत घालून वाटाव्या; नंतर त्यांत शतधौत तूप घालून त्याचा लेप द्यावा.

हा दाह पसरूं नये ह्मणून दाहयुक्त भागासभोंवतीं नैट्रेट ऑफ् सिल्व्हर (काडीखार) किंवा आयओडीन लावावें. पू झाल्यावर पोटिसें बांधावीं. कुशल वैद्यास बोलावून शस्त्रोपचाराची जरूर असल्यास करावा. शक्ति क्षीण झाली असल्यास ब्रांडी मिक्चर (यादी नं. १ भा. प.) द्यावें. किंवा द्राक्षारिष्ट आणि लोह द्यावें (यादी नं. ३१)., शिवाय अमोनिया कार्बोनस् ३ ग्रे., डिकॉक्शन ऑफ् सिंकोनाबार्क १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें.

**पथ्यः**—आहार साधा ह्मणजे साबू तांदुळाची पेज, वरणभात, तूप, इत्यादि असावा. मांसाहारी असतील त्यांनीं मांसरस प्यावा.

---

## विसर्पिणी अथवा पैण.

HERPES.

हा एक कातडीवर होणारा रोग आहे. शरीरप्रकृति बिघडल्यामुळें शरीरांतील कोणत्या तरी एकाद्या मज्जातंतूचा (ज्ञानतंतु) क्षोभ होऊन त्या मज्जातंतूच्या मार्गांतील त्वचा सुजते आणि त्यावर पाण्यासारख्या लसेनें भरलेल्या अशा अनेक दाणेदार पुटकुळ्या उठतात. ह्या पुळ्यांचीं बहुधा

वर्तुळें असतात. ज्या भागावर ह्या पुळ्या उठतात त्या भागास ह्या पुळ्यांचा केवळ वेढा पडला आहे असें दिसतें. ह्या पुळ्यांत आग, वेदना आणि चुरचुर होत असते. त्या एक-मेकींशीं मिळून फुटतात आणि त्यांतील लस सुकून तेथें पातळ खपल्या धरतात. ह्याचें कालमान ह्मटलें ह्मणजे सुमारें एक आठवडापर्यंत असतें. ह्या विकारांत कधीं कधीं किंचित् ज्वरही असतो. हा विकार शरीराच्या निरनिराळ्या भागांवर ह्मणजे ओंठ, मान, खांदे, गळा, कुशी, कंबर आणि जननेंद्रिय इत्यादि ठिकाणीं होतो.

**उपचारः**—पचनव्यापार बिघडला असल्यास सुधारावा. सलाईन मिक्श्चर द्यावें ( यादी नंबर २९ ). किंवा अग्निविसर्प प्रकरणांत सांगितलेला काढा द्यावा. सेडलीस पौडर दिवसांतून एक वेळां घ्यावी. पुळ्यांवर बोऱ्याक्स ( टंकणखार ) १ ड्राम, टिंक्चर ओपाय ( अफूचा अर्क ) २ ड्राम, ग्लिसरीन २ ड्राम, पाणी २० औंस असें मिश्रण तयार करून त्यांत भिजविलेली वस्त्राची घडी ठेवावी. किंवा झिंकी ऑक्साईड १ ड्राम, साधें मलम १ औंस, ( यादी नं. १८ भा. प. ) असें एकत्र घोंटून त्याची पट्टी करून लावावी. किंवा लिकर प्लंबाय १ ड्राम, ग्लिसरीन २ ड्राम, पाणी २० औंस, ह्या मिश्रणांत भिजविलेली वस्त्राची घडी त्यावर ठेवावी. वेदना फारच होत असल्यास लिनिमेंट ऑफ आकोनाईट, किंवा लिनिमेंट बेलाडोना त्या ठिकाणीं लावावें. किंवा सोनागेरू दह्यांत उगाळून लावावा.

# इसब.

## ECZEMA.

हा एक त्वचेसंबंधीं रोग आहे. आणि तो हात, पाय, मान, डोकें इत्यादि ठिकाणीं झालेला बहुशः आढळतो. कधीं कधीं असें होतें कीं, ज्या बाजूच्या शाखेवर हा विकार होतो, त्याच ठिकाणीं दुसऱ्या बाजूच्या शाखेवर तो होतो; ह्यांत त्वचेवर पाण्यानें भरलेला बारीक बारीक पुरुळ उठतो व त्यास अतिशय खाज सुटते, आणि खाजविल्यावर त्यांतून एकप्रकारचें चिकट पाणी निघतें. पुटकुळ्या फुटल्यावर त्यांतील लस सुकून तिच्या पातळ खपल्या धरतात, आणि खपल्यांखालून थोडाबहुत लसेचा स्राव होत असतो, व त्यांत झोंबणें आणि मिरमिरणें हीं होत असतात. ज्या ज्या ठिकाणीं ही लस लागते त्या त्या ठिकाणीं बहुधा तशाच पुळ्या उठतात. ह्या पुळ्यांचा जोर शुक्लपक्षांत जास्त होतो, व वद्यपक्षांत कमी होतो, असें पाहण्यांत आलें आहे. इसबाचे तीन प्रकार आहेत. सौम्य, मध्यम आणि तीव्र; किंवा साधा, आरक्त आणि पूयसदृश.

**कारणें:**—बहुतेक उदाहरणांत कांहीं कारण नसतें. तरी वाईट प्रकारचें अन्न खाणें किंवा पचनव्यापारांत बिघड होणें, ह्यांपासून हा विकार होतो. गंडमाळेसारखा रक्तदोष, नष्टार्तवस्थिति, मलीनपणा आणि व्यायामाभाव, इत्यादि कारणांपासूनदेखील हा विकार होण्याचा संभव असतो.

**उपचार:**—हा विकार कितीएक महिने किंवा वर्षानुवर्षे असतो आणि बरा होण्यास फारच त्रास पडतो. कारण सा-

पडल्यास तें दूर करावें. प्रथम त्या ठिकाणीं जवसाचें पोटीस करून बांधावें, ह्मणजे खपल्या वगैरे घाण निघून जाऊन ती जागा स्वच्छ होते. नंतर त्यावर टार १ ड्राम, रेक्टिफाईड स्पिरिट ऑफ वाईन ४ ड्राम, ग्लिसरीन २ ड्राम, आसिड क्यार्बोलिक ४० मि., अशीं एकत्र करून तें मिश्रण पिसानें अथवा कापसाचे बोळ्यानें इसबावर दिवसांतून दोन वेळां लावावें; किंवा सोडा बाय कार्बोनस २ ड्राम, पाणी १० औंस, ह्या मिश्रणांत वस्त्राची घडी भिजवून ती २ तासपर्यंत इसबावर ठेवावी. किंवा सल्फेट ऑफ् झिंक १६ ग्रे०, पाणी २ औंस, अशीं एकत्र करून त्यांत भिजविलेली पट्टी त्या जागेवर ठेवावी. पट्टी सुकूं नये ह्मणून तें मिश्रण वारंवार त्या ठिकाणीं शिंपडावें. ह्या उपायांनीं गुण न आल्यास गंधक १ ड्राम, आक्साईड ऑफ झिंक १ ड्राम, साधें मलम १ औंस, अशा मिश्रणाची पट्टी त्या ठिकाणीं लावावी. किंवा झिंक आक्साईड अथवा बिसमथ पौडर हीं त्याजवर टाकावीं; किंवा लिकर प्लंबाय १ ड्राम, ग्लिसरीन २ ड्राम, पाणी २० औंस, ह्या मिश्रणांत भिजविलेली कापडाची घडी त्या ठिकाणीं लावावी. किंवा रेड आक्साईड ऑफ मरक्युरी १ ड्राम, कापूर ४० ग्रेन, साधें मलम १ औंस, ग्लिसरीन २ ड्राम, असें एकत्र करून तें लावावें. किंवा कबाबचिनी, गेरू, कोष्ट, मोरचूत, गोपीचंदन ह्यांची वस्त्रगाळ पूड करून पाण्यांत कालवून ती इसबावर लावावी. किंवा राळ एक तोळा, गंधक १ तोळा, मोरचूत १ मासा, अशीं तुपांत घोटून लावावीं; किंवा कवठीचा पाल आणि कडू जिरें अशीं बारीक वाटून तीं दह्यांत कालवून

इसबावर लावावीं ह्मणजे इसब बरा होतो. इसब दररोज दिवसांतून दोन वेळां क्यार्बोलिक अथवा टारसोपनें (साबू) धुवावा. वेळेस कोणतेंही औषध न मिळाल्यास जाडे कपड्यांनीं इसब बांधून ठेवावा ह्मणजे हवेचा प्रतिबंध होऊन कधीं कधीं इसब बरा होतो.

---

## गजकर्ण.

### RINGWORM.

हा काय रोग आहे, हें बहुतकरून आपल्या देशांतील सर्व आबालवृद्धांसही कळत असेल.

हा एक त्वचेचाच रोग आहे, आणि तो बहुतकरून मोठ्या उमरींतच होतो. तो कमर आणि जंघा ह्या ठिकाणीं विशेषेंकरून पाहण्यांत येतो. तरी मान, खांदे आणि मस्तक इत्यादि ठिकाणींही तो होतो. चामडीवर ह्याचें प्रथम वाटाण्याच्या आकृतीचें वर्तुल उत्पन्न होतें, नंतर तें दिवसानुदिवस अधिकाधिक पसरत जातें. ह्या वर्तुलांचा आकार बदलून तीं किंचित् लाल होतात व त्यांसभोंवतीं बारिक पुटकुळ्या उठून खाज सुटते आणि एक दोन दिवसांनीं त्यांजवर खपल्या धरून भूस निघून जातें.

**कारणें:**—ह्या रोगांत कातडींत एक सूक्ष्म कीटक असतो. तो मलीनपणापासून उद्भवतो, ह्याकरितां शरीर फार स्वच्छ ठेवून स्वच्छ वस्त्रें वापरावीं. हा रोग स्पर्शसंचारी आहे, ह्मणून ज्याला हा रोग झाला असेल त्याचे कपडे इतरांनीं अंगावर घेऊं नयेत, त्यांपासून त्यांसही हा रोग जडतो.

उपचारः—साबूनें अंग धुवावें व स्वच्छता ठेवावी. गजकर्णावर डिल्यूट आसिटिक आसीड अथवा टिंक्चर आयओडीन दररोज बरें होईपर्यंत लावावें. किंवा गोआपावडर, ब्रांडींत, कोलनवाटरांत किंवा लिंबाचे रसांत मिळवून लावावी. किंवा सिट्रन आइंटमेंट लावावें. किंवा क्यांफर ३० ग्रेन, क्यारबॉलिक आसिड ३० ग्रेन, कारबोनेट आफ् पोट्याश १ ड्राम, गंधक १ ड्राम साधें मलम १ औंस (यादी नं. १८ भा.प.) अशीं एकत्र घोटून त्यापैकीं मलम सकाळ संध्याकाळ गजकर्णावर लावावें. किंवा शिरका ( खाटी अथवा आंब, ) आणि गजकर्णीच्या पानाचा रस अशीं मिश्र करून तें मिश्रण बोळ्यानें गजकर्णावर लावावें. किंवा कापूर, गंधक, फटकी, कात, हीं सर्व सम प्रमाणानें घेऊन खाटेलिंबाचे रसांत त्यांचा खल करून तें लावावें. किंवा साजी खार, एरंडाच्या बिया, एळीयाबोळ ह्या तीन औषधांचा लिंबाचे रसांत खल करून त्याचा गजकर्णावर लेप करावा. गजकर्णे शिश्न किंवा अंड ह्या ठिकाणीं झालें असल्यास तेथें फार कडक औषधें लावू नयेत. लावणें झाल्यास कुशल वैद्याच्या सल्ल्यानें लावावींत. परंतु १ ड्राम टांकणखार आणि १ औंस पाणी यांचें मिश्रण लावण्यास हरकत नाहीं. गजकर्ण मस्तकावर झालें असल्यास तेथें सलफ्युरस आसिड १ औंस व पाणी ६ औंस ह्यांचे मिश्रणांत भिजविलेली घडी ठेवावी.

# खवडे.

## TINEA FAVOSA.

हा रोग एका जातीच्या उद्भिज अन्योपजीवी (Fungus) पासून ह्मणजे बुरशीसारख्या कीटकसदृश रचनेपासून उत्पन्न होतो. ह्याचें नांव **आकेरिअन शोनालइनाय** असें आहे. हा रोग मुख्यत्वेंकरून डोक्याच्या ज्या भागावर केंस येतात त्या ठिकाणीं होतो. ह्याचे प्रथम वाटाण्याएवढे फोड उठतात. हे फोड निरनिराळे असतात, किंवा अगदीं एकमेकाशीं मिसळलेले असतात. हे संसर्गाच्या योगानें दुसऱ्यास होतात. ह्यांचा उगम प्रथम त्वचेच्या आंत केंसांच्या मुळाजवळ होतो, नंतर त्वचेवर फोड दृष्टीस पडतात.

**लक्षणें:**—ज्या ठिकाणीं हा रोग व्हावयाचा असेल, त्या ठिकाणीं प्रथम थोडी खाज सुटते, नंतर त्या ठिकाणीं बारीक बारीक तांबड्या पुळ्या उठतात. बारा तासांनंतर पुळ्यांचीं तोंडें पिंवळीं होतात. ह्या पुळ्या फुटल्यावर त्यांतून चिकट लस वाहूं लागते. ही लस वाळून त्या ठिकाणीं शुष्क, ठिसूळ आणि मधाच्या पोळीप्रमाणें भोंकें पडलेली अशी खपली धरते. खपली नवीन असते तेव्हां तिचा रंग पिंवळट असतो, व जुनी झाली ह्मणजे फिक्कट होतो. लस केंसांस लागून ते एकमेकांस चिकटतात, व त्या ठिकाणीं मांजराच्या किंवा उंदराच्या मुताप्रमाणें घाण येत असते. खवडे फारच वाढले असतां ते बरेच खोल जातात. आणि असें झालें ह्मणजे मस्तकाचे कवटीला इजा होण्याचा संभव असतो. खवड्यावरील खपली काढिली असतां एखादे वेळेस त्यांतून रक्तस्राव होतो.

**उपचारः**—ज्या भागावर खवडे झाले असतील त्यावरील केंस वस्तऱ्यानें चांगले काढावे आणि लस, खपल्या वगैरे साफ निघून जाततोंपर्यंत त्यावर पोटिसें बांधावीं, ह्मणजे ती जागा स्वच्छ होऊन तेथें औषधही चांगलेपणीं लावतां येतें. खवडे दररोज दिवसांतून एक दोन वेळा क्यार्बोलिक अथवा टार सोपनें (साबु) धुवावे, किंवा रिठ्याचे अथवा शिकेकाईचे पाण्यानें धुवावे. ज्यास खवडे झाले असतील त्याचा संबंध दुसऱ्या मनुष्याशीं होऊं देऊं नये. मोरचूत २ गुंजा, पाणी ९ तोळे, अशीं एकत्र करून तें मिश्रण, किंवा काडीखार २ गुंजा, ( अरजेंटी नैट्रस ) पाणी ९ तोळे, अशीं एकत्र करून तो द्रव दिवसांतून तीन चार वेळां खवड्यांवर लावावा. किंवा क्यार्बोलिक आसिडाचें पाणी (यादी नं. ३८) लावावें. किंवा डांबर ५ भाग आणि पिंवळें मेण २ भाग, हीं एकत्र वितळून जें मलम होतें तें त्या ठिकाणीं लावावें. किंवा काकमारीच्या बीचें चूर्ण एक तोळा, साधें मलम १ औंस ( यादी नं. १८ भा. प. ) अशीं एकत्र करून लावावीं. किंवा कोष्ठाचें चूर्ण खापरांत भाजून तें कवठीचे अथवा करंजेल तेलांत कालवून खवड्यावर लावावें. किंवा खैर, कडुलिंब, व जांभूळ ह्यांच्या सालीचें चूर्ण गोमूत्रांत खलून खवड्यावर लावावें. किंवा कुड्याची साल गोमूत्रांत उगाळून लावावी, किंवा कवठीच्या बियांचें तेल १ तोळा, मोंगली एरंडाचें तेल १ तो., कापूर १ तो., गंधक १ तो., हीं एकत्र करून त्यांचा खल करावा आणि तें खवड्यावर लावावें, ह्मणजे ते बरे होतात. हे वरील उपचार करितांना पोटांतही कांहीं औषध दिलें पाहिजे. पचनव्यापारांत

पदार्थ असतो. कांहीं दिवसांनीं त्यांचीं अग्रें पिकून फुटतात आणि त्यांजवर खपली धरते. जेव्हां मुमें गुलाबी किंवा तांबूस रंगाचीं असतात तेव्हां तो भाग सुजतो आणि त्याच्यावर निळ्या रंगाच्या रेषा दिसूं लागतात. असें बहुशः मुमें नाकाजवळ उठलीं असतां होतें. कधीं कधीं असें होतें कीं, कित्येक मुमें एकत्र जमून त्यांचें एक लहानसें अवाळूंच होतें. हा प्रकार बहुशः मध्यवयस्कांत आढळतो.

**कारणें:**—जठरव्यापाराची अव्यवस्था, अतिमात्र भोजन, मद्यपान, मलीनपणा, आणि स्त्रियांत नष्टार्तवस्थिति यामुळें मुमें उत्पन्न होतात.

**उपचार:**—आहार अल्प आणि साधा असा ठेवावा. सर्व उत्तेजक आणि अमली पदार्थ वर्ज करावे. भाजीपाला हीं सर्व ताजींच खावीं. वस्त्रप्रावरणाची स्वच्छता ठेवावी व मोकळ्या हवेंत व्यायाम करावा. मुरुम्यांवर टंकणखार १० गुंजा, कडव्या बदामांचें दूध १ तोळा, लिंबाचा रस २ तोळे, असें एकत्र करून दिवसांतून तीन चार वेळां लावावें. किंवा सिट्रन आईटमेंट लावावें. किंवा हैड्रारजिराय परक्लोराईड २ ग्रेन, पाणी एक औंस, हें मिश्रण कापसाचे बोळ्यानें दिवसांतून एक दोन वेळां मुरुम्यांवर लावावें. किंवा कडव्या बदामाचे दुधांत गंधक उगाळून लावावें. [illegible] कार्बोनेट ऑफ् पोट्याश एक ड्राम, साधें मलम १ औंस (याद. [illegible] १८ भा. प.) असें मिश्रण लावावें. किंवा गोडें तेल आणि चुन्याची निवळ अशीं एकत्र करून तीं मुम्यांवर लावावीं. किंवा आयओडाईड ऑफ् सल्फर ॥ ड्राम, साधें मलम १ औंस, असें एकत्र करून लावावें. किंवा जायफळ, चंदन,

मिरीं हीं एकत्र वाटून त्याचा लेप द्यावा. किंवा लोध्र, धने, वेखंड यांचा, किंवा गोरोचन आणि मिरीं हीं पाण्यांत उगाळून त्यांचा लेप द्यावा. किंवा शिरस, वेखंड, लोध्र आणि सैंधव हीं गाईच्या दुधांत वाटून त्याचा किंवा अर्जुनवृक्षाची साल दुधांत वांटून तिचा, किंवा मधांत मंजिष्ट उगाळून त्याचा लेप करावा; अथवा सांवरीचे कांटे दुधांत वाटून त्यांचा लेप करावा, ह्मणजे तारुण्यपीटिका नाश पावतात. शिवाय सलाईन मिक्श्चर घ्यावें (यादी नं. २९). किंवा दारूहळद ·॥· तो., मंजिष्ट ·॥· तो., निशोत्तर ·॥· तो., बाहव्याचे शेंगेंतील गीर ·॥· तो., बडिशेप ·॥· तो., कोष्ट ·॥· तो., पटोळ ·॥· तो., उपळसरी ·॥· तो., हीं सर्व औषधें किंचित् ठेंचून त्यांचा ३२ तोळे पाण्यांत काढा करावा. काढा चतुर्थांश उरला ह्मणजे गाळून त्यापैकीं १॥ तोळा काढा दिवसांतून दोन किंवा तीन वेळां घ्यावा. किंवा सार्सापरिलाचा काढा घ्यावा (यादी नं. ६ भा. प.), ह्मणजे मुमें नाहींशीं होतात.

---

## घट्ट.

### CORNS.

शरीराचा एखादा भाग विशेष चो[illegible] किंवा दाबला गेल असतां, तेथील [illegible] ·ड व कठिण होते, तेव्हां त्या[illegible] [illegible] असें ह्मणतों.

हे घट्टे, जाड आणि तंग जोडे, बूट, किंवा वहाणा यां[illegible] योगानें पायांवर, आणि दळणकांडण करणाऱ्या मनुष्याचे तळहातावर होतात. हे वेदनारहित असतात. परंतु कधीं कधीं ह्यांत दाह उत्पन्न होऊन पू होतो. पायांचे तळव्यांस कांटा,

खडा वगैरे लागल्यानें क्षोभ होऊन त्याचे परिणामीं तेथें घट्टा पडतो, त्यास आपण 'भौरी' असें ह्मणतों. त्या भौरींत कधीं कधीं फार वेदना होतात, त्यामुळें पाय जमिनीवर टेंकवत नाहीं.

**उपचारः**—ज्या भागावर घट्टे पडले असतील तो भाग घट्टे नरम होईतोंपर्यंत ऊन पाण्यांत बुडवून ठेवावा. नंतर घट्टे चाकूनें तासून काढावे; नंतर त्यावर कंपाउन्ड प्लास्टर ऑफ ग्यालबानम् १९ दिवसपर्यंत लावावें; किंवा पापडखार १ तोळा, चरबी ॥ तोळा, अशीं एकत्र खलून त्याची पट्टी करून घट्ट्यावर लावावी. किंवा अंग्वेंन्टम पोट्याश आयओ-डाईड घट्ट्यावर लावावें. अथवा टिंक्चर ऑफ आयओडा-ईन लावावें.

घट्टे जोड्याच्या दाबामुळें पडले असल्यास सईल व मृदु जोडा घालावा. किंवा घट्ट्यावर येणाऱ्या जोड्याचे भागास छिद्र करावें, ह्मणजे घट्टे पडणार नाहींत.

---

## आंजुरली, आंजिणी अथवा रांजणवाडी.

### STYE or HORDEOLUM.

डोळ्याच्या पापणीवर, कांठाशीं, मध्यें किंवा बाजूस लहान पुळी येते तिला रांजणवाडी अथवा आंजिणी असें ह्मणतात.

**कारणेंः**—आंजिणी बहुतकरून लहान मुलांस आणि अशक्त व नाजुक प्रकृतीच्या मनुष्यांस अजीर्णानें, जाग्रण केल्यानें, किंवा शौच्यास साफ होत नसल्यानें उत्पन्न होते. कधीं कधीं सन्निपात ज्वरांत किंवा ज्वरानंतर आंजीण उत्पन्न होते. ही सरासरी लहानशा वाटाण्याएवढी वाढून किंचित् लाल रंगाची असते.

**लक्षणें:**—तींत थोड्याबहुत वेदना आणि आग हीं होत असतात. डोळ्याला अश्रूंची धार लागते.

**उपचार:**—आंजिणी बहुतकरून आपोआप पिकून फुटते, न फुटली तर गव्हांच्या अथवा अळशीच्या पिठाचीं पिकवणें बांधावीं ( यादी नं. १० भा. प. ); किंवा ऊन पाण्यानें शेकावी, ह्मणजे ठणका नाहींसा होऊन आंजिणी बरी होते. आंजिणी ज्या ठिकाणीं नरम व पिंवळट झाली असेल त्या ठिकाणीं सुईच्या किंवा टांचणीच्या अग्रानें लहानसा फाड करावा ह्मणजे पू बाहेर पडून आंजिणी बसून जाते. कधीं कधीं ह्या आंजिण्या एक बरी होत आहे तोंच दुसरी याप्रमाणें उत्पन्न होऊं लागतात. असें होऊं लागलें ह्मणजे ४–८ दिवसांनीं जुलाब घ्यावा ( यादी नं. ७ भा. प. ). किंवा शुद्ध गंधक १ तोळा, सोनामुखीची पूड ८ गुंजा, गुलकंद १ तोळा, हीं एकत्र करून पाण्याबरोबर घ्यावीं. रांजणवाडीवर टिंक्चर ऑफ आयओडीन किंवा स्पिरिट ऑफ हार्टस हॉर्न दाभणाइतपत बारीकशा काडीनें दिवसांतून २–४ वेळां लावावें, ह्मणजे रांजणवाडी ४–८ दिवसांत बसून जाते. मात्र औषध आजूबाजूस न लागेल अशी तजवीज ठेवावी; किंवा रसवंती पाण्यांत उगाळून तिचा आंजिणीवर लेप द्यावा; किंवा आंब्याच्या पानाचा चीक लावावा ह्मणजे ती बरी होते. पोट्याश आयओडाईड २ ग्रेन, किराइताचा फांट १ औंस ( यादी नं. १२ भा. प. ), असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां घ्यावें. किंवा सार्सापरिलाचा काढा (यादी नं. ६ भा. प.) घ्यावा; हें औषध कांहीं दिवसपर्यंत चालूं ठेवावें, ह्मणजे शरीरप्रकृति सुधारून रांजणवाडी होत नाहीं. जाग्रण करूं नये.

---

# डोळ्यांतील सारा व फुलें.

## OPACITY OF THE CORNIA.

डोळ्यांत सारा आला किंवा फुलें पडलीं ह्मणजे पदार्थ धुरकट दिसूं लागतात आणि दृष्टि मंद होते.

**कारणें:**—खुपऱ्यांच्या योगानें, पापण्यांचे केश बुब्बुळा-वर घासले गेल्यानें, डोळ्यांत केर वगैरे जाऊन क्षोभ उत्पन्न झाल्यानें, आणि *कार्निआच्या दाहयुक्त विकारानंतर, डोळ्यांत सारा येतो किंवा फुलें पडतात.

**उपचार:**—कारण दूर झाल्यावर पोट्याश आयओडाईड ४ ग्रेन, अर्कोदक ( Distilled Water ) १ औंस, असें एकत्र करून त्याचे एक दोन थेंब सकाळ संध्याकाळ डोळ्यांत सो-डावे; किंवा यलो आईटमेंट लावावें ह्मणजे कांहीं महिन्यांनीं सारा व फुलें नाहींशीं होतात. फुलें व सारा वरवर आणि थोडकाच असला व रोगीही अल्पवयी असला, तर तीं वरील औषधांनीं नाहींशीं होतात. परंतु जुनाट आणि घण फुलें किंवा सारा बहुश: नाहींशीं होत नाहींत.

**फूल, भूर इत्यादिकांवर मराठी वैद्यांचे उपचार:**— करंज्याच्या बियांचें चूर्ण करून त्यास पळसाच्या फुलांच्या रसाचीं दहा बारा पुटें द्यावीं. नंतर बारीक खलून त्याच्याच रसांत गोळ्या बांधाव्या. ती गोळी पाण्यांत उगाळून अंजन करावें. किंवा समुद्रफेस, सैंधव, शंख, कोंबडीच्या अंड्याची कवची व शेवग्याचें बीं, हीं पांचही औषधें पाण्यांत बारिक वाटून गोळी करावी. ही गोळी पाण्यांत उगाळून डोळ्यांत घालावी; किंवा लाल

---

* बुब्बुळावरील तपकिरी रंगाचा पडदा.

एरंडाचा चीक डोळ्यांत घालावा, ह्मणजे कांहीं दिवसांनीं डोळ्यांतील भूर आणि फूल नाहींशीं होतात, असें ह्मणतात

---

## सांतोत्पन्न शीतवातज्वर–इन्फ्ल्युएंझा.

### INFLUENZA OR EPIDEMIC CATARRH.

ह्या ज्वराची युरोप आणि अमेरिका खंडांतील देशांत सांथ येंत असते. हा ज्वर आपल्या हिंदुस्थान देशांत पूर्वी कधींच उद्भवला नव्हता, परंतु थोडया वर्षांपूर्वीं हा प्रथम मुंबई शहरांत उत्पन्न होऊन जारीनें सर्व हिंदुस्थानभर पसरला. अलीकडेस केव्हां कोठें ह्या रोगाची सांथ आल्याबद्दल बातमी असते, ह्मणून ह्या ज्वराचा येथें विचार केला आहे.

हा ज्वर एका विशिष्ट जातीच्या विषाचा हवेंत संचार होऊन हवा बिघडते त्यामुळें उद्भवतो, असें बहुतेक नामांकित वैद्यांचें मत आहे. हा ज्वर मोठमोठ्या वस्तीच्या शहरांतील पांथळ आणि सखल जाग्यांत प्रथम उद्भवून नंतर जारीनें कोणत्या तरी दिशेकडे पसरत जातो. हा बहुतकरून पावसाळ्याचे सुमारास किंवा पावसाळ्यानंतर जेव्हां पूर्वेकडील वारा वाहूं लागतो, तेव्हां मोकळ्या अंगानें जे त्याच्या सपाट्यांत सांपडतात त्यांस गांठतो. तो बहुतकरून प्रौढ वयांतील मनुष्यांस पछाडतो. आणि अशक्त प्रकृतीचे लोक ह्याचे सांथीस विशेष पात्र असतात. ह्या ज्वराची पाळी एकदां एखाद्यावर येऊन गेली ह्मणजे पुन्हां त्यास ताप येत नाहीं असें नाहीं. कित्येकांना तो पुन्हां येतो आणि तो पहिल्या पाळीपेक्षां जास्त तीव्र असतो.

**लक्षणें:**—ह्या ज्वराचीं लक्षणें साधारणपणें शीत आणि वातज्वर ह्या दोहोंपैकीं असतात, ह्मणूनच ह्यास हें नांव दिलें आहे. ह्यांचीं लक्षणें निरनिराळ्या रोगांत निरनिराळीं असतात. तथापि जीं नेहमीं पाहण्यांत येतात, त्यांचाच येथें विचार केला आहे. ह्या ज्वरास बहुधा किंचित् थंडी लागून व हातपाय मोडल्यासारखे होऊन प्रारंभ होतो. डोकें दुखतें, कंबर, मांड्या, पाठ आणि मान हीं फारच दुखत असतात, त्यामुळें रोगी अस्वस्थ होतो, झोंप चांगली येत नाहीं, ज्वराचें उष्ण मान १०० अंशावर वाढतें, त्वचा शुष्क आणि कढत असते, रोग्यास मधून मधून थंडी वाजते व मध्येंच दाह होतो. कधीं कधीं किंचित् आंबूस असा घाम सुटतो आणि ग्लानि फार येते. नाडी प्रथमतः जलद आणि टणक असते, परंतु पुढें क्षीण, मंद आणि मृदु अशी होते. मूत्र अल्प व आरक्त असतें व शौचास साफ होत नाहीं. जिव्हा मलानें लिप्त असते, तोंडाला अरुचि येते आणि क्षुधेचा नाश होतो. कधीं कधीं उह्मासे किंवा वांती सुरू होते. पापण्या चुरचुरतात, नाक प्रथम शुष्क आणि कढत होतें, नंतर शिंका येऊं लागतात व पडसें होतें. गंधज्ञान कमी होतें व कधीं कधीं नाकांतून रक्तस्राव होतो. घसा लाल होतो व खवखवतो, खोकला उत्पन्न होतो व तो प्रथम कोरडा आणि सतत किंवा ढासल्यासारखा असतो, नंतर कफ पडूं लागतो.

**गतिः**—नुसतीं ज्वरचिन्हें चारपांच दिवसांत कमी होतात, पण अशक्तपणा आणि खोकला हीं लक्षणें मात्र कित्येक दिवस तशींच चालू राहतात. कधीं कधीं खोकला आणि ज्वरचिन्हें वाढून श्वासनलिकादाह किंवा फुप्फुसदाह उत्पन्न होतो.

कचित् मज्जाजालाचा क्षोभ होऊन रोगी बडबड करूं लागतो व बेशुद्ध होतो. योग्य उपचार झाले असतां रोगी सुधारतो, नाहीं तर भयंकर परिणाम होण्याचा संभव असतो.

**उपचार आणि पथ्य:**—रोग्यानें वाऱ्यावर वगैरे न फिरतां घरांत पडून अथवा बसून असावें. प्रथमतः एखादें सौम्य रेचक द्यावें (यादी नं. ३ भा. प.). नंतर घाम आणणारें औषध द्यावें (यादी नं. ४ भा. प.). किंवा सोडा सालीसिलस १० ग्रे., पाणी १ औंस, असें मिश्रण दर तीन तासांनीं द्यावें. किंवा अंटीपेरीन ३ ग्रे., पाणी १ औंस असें मिश्रण दर चार तासांनीं द्यावें. किंवा टिंक्चर टोलू १० मि., टिं. अकोनाईट ३ मि., ऑक्सीमेलसिह्ली ३० मि., पोट्याश क्लोरस १० ग्रे., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. किंवा जेष्टीमध, नागरमोथे, धमासा, काटेरिंगणी, वाळा, रक्तचंदन, धणे, हरडा, पिंपळी, अतिविष, राश्ना, गुळवेल, बाहव्याचे शेंगेंतील मगज, सुंठ, पित्तपापडा, इंद्रजव हीं सर्व औषधें पाव पाव तोळा घेऊन त्यांचा काढा निकाढा करून तो सकाळसंध्याकाळ अर्ध तोळा मध घालून द्यावा. झोंप न आल्यास सल्फोनल द्यावें. घसा दुखूं लागल्यास घसा दुखणें ह्या प्रकरणीं सांगितलेले उपचार करावे. खोकल्यासाठीं खोकल्याचे प्रकरणांत सांगितलेले उपचार करावे. ज्वर कमी झाल्यावर क्विनाईन मिक्श्चर द्यावें (पृष्ट ९ भा. प.). अशक्त आणि वयोवृद्ध रोग्यास ग्लानि वाटूं लागली तर ब्रांडी अथवा द्राक्षारिष्ट द्यावें (यादी नं. २१). पाठ, कंबर आणि मान ह्या ठिकाणीं कळा फार मारीत असल्यास तेथें लिनिमेंट ऑफ अमोनिया किंवा पेनकिलर चोळावें, किंवा

मोहरीचा लेप मारावा. आणि टिंक्चर सिंकोना ३० मि., पोट्याश आयओडाईड ३ ग्रेन, पोट्याश ब्रोमाईड १० ग्रेन, व्हैनं कॉलचिसाय १० मि., टिंक्चर ओपाय ९ मि., पाणी १ औंस, असें मिश्रण दिवसांतून तीन वेळां द्यावें. मज्जा-जालाचा क्षोभ झाला असल्यास मस्तकावर शैत्य लावावें, किंवा ३—४ जळवा लावून रक्त काढावें. जेवणास पेज, दूध वगैरे पचनीय पदार्थ द्यावे. आंबट थंड वगैरे खाऊं नये. चालत असल्यास मांसरस द्यावा. रोगचिन्हें नाहींशीं झाल्या-वर शक्ति सुधारण्याकरितां फेलोज किंवा इस्टन्स सिरप द्यावें, किंवा लोह अथवा वसंत द्यावा. ताप गेल्यावर २—३ दिवस स्वस्थ पडून असावें. हवा बदलण्यास कोरड्या आणि उष्ण हवेवर जावें. अंगांत नेहमीं लोकरीचें वस्त्र असावें.

**सूचनाः**—गांवांत सांथ आली ह्मणजे सर्वांनीं पाणी ऊन करून गाळून प्यावें. पथ्यानें वागावें—ह्मणजे उघड्या अंगानें वाऱ्यावर फिरूं नये, आंबट थंड वगैरे खाऊं नये, व थंडी न होण्याविषयीं जपावें.

# औषधांच्या यादी.

पूर्वोक्त रोगचिकित्सेंत ठिकठिकाणीं 'यादी नंबर' आले आहेत, त्यांपैकीं २७ यादी पहिल्या भागांत दिल्या आहेत आणि २८ पासून पुढच्या मात्र खालीं दिल्या आहेत. यांतील औषधें तयार करितांना पहिल्या भागांत ग्रंथारंभीं औषधें तयार करणारांस ज्या सूचना केल्या आहेत त्यांकडे अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे.

## यादी नं. २८.

### वेदनाशामक तेल.

**कृतिः**—लिनिमेंट बेलाडोना २ ड्राम, लिनिमेंट अकोनाईट २ ड्राम, क्लोरोफॉर्म २ ड्राम, अशीं एकत्र करून तीं एका चांगल्या बंदोबस्ताच्या कुपींत भरून ठेवावीं.

**योजनाः**—वायुगत शूळ आणि वेदना यांजवर हें तेल पांचपासून दहा मिनिटेंपर्यंत चोळावें.

## यादी नं. २९.

### सलाईन मिक्श्चर (क्षारमय मिश्रण.)

**कृतिः**—पोट्याश नैट्रस २० ग्रेन, म्याग्नीशिया सल्फस १ ड्राम, स्वीट स्पिरिटस ऑफ नैटर २० मि., सोल्यूशन ऑफ असिटेट ऑफ अमोनिया २ ड्राम, कापराचें पाणी (यादी नं. १४ भाग प.) १ औंस, असें एकत्र करावें.

**प्रमाणः**—प्रौढास १ औंस, वर्षाचे मुलास $\frac{1}{2}$—१ ड्रामपर्यंत द्यावें.

**योजनाः**—हें दाहप्रतियोगी आहे. पक्काशय आणि आंतडीं ह्या खेरीजकरून कोणत्याही ठिकाणीं दाह उत्पन्न झाला असतां याचा उपयोग करावा. ह्यापासून आंतडीं व मूत्रपिंड ह्यांच्या क्रिया उत्तेजित होऊन दाहाचें आणि तज्जन्य ज्वराचें शमन होतें.

---

# यादी नं. ३०.

## टरपेंटाइनचा शेक.

**कृतिः**—१ औंस टरपेंटाइन तेल घेऊन त्यांत तितकेंच तिळाचें अथवा खोबरेल तेल मिसळून तें विकृत भागावर चार पांच मिनिटेंपर्यंत चोळावें. नंतर फल्याणीनचा, धाबळीचा, अथवा घोंगडीचा दीड हात लांब व हातभर रुंद असा तुकडा घेऊन तो तुकडा कढत पाण्यांत बुडवून पिळावा आणि त्यानें तो विकृत भाग शेकावा. पिळा थंड झाल्यावर पुन्हां पाण्यांत भिजवून पिळून शेकावा, असा अर्धा तासपर्यंत शेक चालू ठेवावा. शेक पुरा झाल्याबरोबर तो भाग कोरडा करून त्याजवर ऊर्णावस्त्र गुंडाळून ठेवावें. अगदीं नाजूक कातडीच्या लोकांस अशा तऱ्हेच्या शेकापासून कधीं कधीं त्रास होतो, तेव्हां त्यांस टरपेंटाइनचा शेक देणें झाल्यास टरपेंटाइन तेल चोळण्याचे ऐवजीं शुद्ध टरपेंटाइन ऊन पाण्याचे पिळ्यावर शिंपडून शेकतात, तेवढ्यानें कार्य होतें.

---

## यादी नंबर ३१.

### द्राक्षारिष्ट.

**कृतिः**—द्राक्षें ५० तोळे प्रमाणानें घेऊन त्यांत ८ शेर (६४ तोळ्यांचा शेर) पाणी घालावें, आणि चवथाई पाणी राहीतोंपर्यंत काढा करून गाळून थंड झाल्यावर त्यांत गूळ २०० तोळे घालावा. नंतर दालचिनी, विलायची, तमालपत्र, नागकेशर, वाघांटीचें मूळ, अथवा राळे, मिऱ्यें, पिंपळी, वावडिंग हीं आठ औषधें एक एक तोळ्याप्रमाणें घेऊन त्यांचें चूर्ण करून तें त्या काढ्यांत घालून ढवळावें, आणि सारीं एकत्र मिळालीं ह्मणजे मडक्यांत घालून तोंडाला मेणकापड लावावें; आणि एक महिनापर्यंत तें मडकें तसेंच उबदार जमिनींत पुरून ठेवावें. नंतर मेणकापड काढून टाकून टांकडाच्या दांड्यानें चांगलें ढवळावें. याला द्राक्षारिष्ट असें असें ह्मणतात. हा अरिष्ट गाळून पोटांत घ्यावा. येणेंकरून उर.क्षतरोग, क्षयरोग, खोकला, श्वास, कंठाचे रोग हे सारे दूर होतात. हें मोठें पाचक, दीपक व उत्तेजक असून त्यापासून शक्ति येते, वातादि दोषांचें शोधन होतें व मळ साफ होतो.

**प्रमाणः**—प्रौढास २–४ तोळेपर्यंत द्यावें. १–५ वर्षांचे मुलास संधेची १–२ पळी किंवा १–२ टी स्पून फुलपर्यंत द्यावें.

---

## यादी नंबर ३२.

### सुवर्णमालिनी वसंत.

**कृतिः**—सोन्याचा चूर अथवा वर्ख १ तोळा, मोत्याचा चूर २ तोळे, हिंगूळ ३ तोळे, पांढरीं मिरें ४ तोळे, कल-

खापरी ८ तोळे, या सर्वांची शुद्धि* करून वस्त्रगाळ चूर्ण झाल्यावर त्यांत गाईचें लोणी २॥ तोळे घालून एक दिवसभर खलून नंतर खाद्या लिंबाचा रस घालून ४२ दिवस खललें असतां फार उत्तम प्रकारचा वसंत तयार होतो. त्याच्या १ किंवा २ गुंजा प्रमाणाच्या गोळया वळाव्या. नंतर बलाबल पाहून दररोज १–२ गोळ्या मध व पिंपळीं घालून द्याव्या. आणि वर दूध प्यावें. तेणेंकरून पुष्टि येते आणि जीर्णज्वर, क्षय, कास, श्वास, शैत्य, धातुगतज्वर, रक्तविकार, कृशत्व, सूतिकारोग हे सर्व विकार दूर होतात.

---

## यादी नंबर ३३.

### प्रवाळभस्म ( पोंवळ्याचें भस्म ).

**कृतिः**—पोंवळ्याच्या तांबड्या लाल व जाड अशा वेली किंवा पोंवळीं आणून तीं १२ तासपर्यंत लिंबाचे रसांत भिजत घालावीं, नंतर पाण्यानें स्वच्छ धुवून वाळवावीं. ह्याप्रमाणें ७ दिवस करून नंतर त्यांचा जयंतीचे रसांत किंवा उत्तम गुलाबाच्या पाण्यांत ३ दिवस सारखा खल करावा ह्मणजे उत्तम प्रवाळभस्म तयार होतें.

---

* मोत्यें स्वच्छ धुऊन वाळलीं ह्मणजे निखाऱ्यावर ठेवावीं ह्मणजे तीं कळीच्या चुन्याप्रमाणें पिचतात, नंतर उपयोगांत घ्यावीं.

कलखापरीचें शोधनः—कलखापरीचे पैशाएवढे तुकडे करून ते एका फडक्यांत बांधून घोड्याच्या अथवा गाईच्या मुतांत सात दिवस भिजत घालावे ह्मणजे कलखापरी शुद्ध होते. नंतर ती पाण्यानें स्वच्छ धुऊन उपयोगांत घ्यावी.

बाकीच्या औषधांची शुद्धि पहिल्या भागांत सांगितली आहे.

**प्रमाण:**—प्रौढास २-४ गुंजापर्यंत द्यावें. १-५ वर्षांचे मुलास ½-१ गुंज प्रमाणानें द्यावें.

**योजना:**—जीर्णज्वर, श्वास, कास, उचकी, कोष्ठगत वायु, यांस मध व पिंपळींत द्यावें. १ ज्वरास किराईत, कुटकी, हरीतकी यांत द्यावें. २ पित्तास दूध आणि खडीसाखर यांत, ३ धातुक्षयावर पिकलेल्या केंळ्यांत, ४ कृश झाल्यास त्रिड्यांत, ५ तिडकपरम्यास तांदुळाचें धुवण व साखर यांत अथवा त्रिफळा व मध यांत, ६ धातुवृद्धीस तूपसाखरेंत, ७ प्रदर रोगास गाईचे धारोष्ण दुधांत, ८ वायूस तुळशीचा रस मध आणि साखर यांत आणि पित्तकासास आल्याचा रस व खडीसाखर यांत द्यावें.

---

## यादी नंबर ३४.

### आळशीचा फांट.

(INFUSUM LINI)

**कृति:**—आळशी १६० ग्रेन्स, ज्येष्ठीमध ६० ग्रेन्स, अधणाचें पाणी १० औंस.

औषधें साधारण चेंचून पाण्यांत अर्धा तासपर्यंत झांकून ठेवावीं. नंतर गाळून उपयोगांत आणावीं.

**प्रमाण:**—प्रौढास २-४ औंसपर्यंत द्यावें.

---

## यादी नंबर ३५.

### गंधक रसायन.

**कृति:**—शुद्ध गंधक घेऊन त्यास गाईचें दूध, चातुर्जाताचा काढा, गुळवेलीचा रस, हरीतकीचा काढा, बेहेडयाचा

काढा, आंवळकाठीचा काढा, सुंठीचा काढा, माक्याचा रस, या प्रत्येकाची एकेक वेळां वेगवेगळी भावना द्यावी. शेवटीं आल्याच्या रसाची भावना देऊन एक मासा प्रमाणाच्या गोळ्या करून वाळवून ठेवाव्या आणि साखरेबरोबर गोळी द्यावी. ह्मणजे मंदाग्नि, कंडू, पामा, उपदंशादि विषदोष, पंडुरोग, अंडवृद्धि, जीर्णज्वर, सर्व प्रकारचे प्रमेह, वातामय शूळ, धातुक्षय, कोष्ठगतरोग, कुष्टें, क्षय, हे रोग दूर होऊन रक्तशुद्धि होते व धातूची वृद्धि होऊन बलप्राप्ति होते.

---

## यादी नंबर ३६.

### दशमूलादि काढा.

**कृतिः**—रानगांजाचें मूळ, (सालवण) रानभालमूळ, (पिठवण) रिंगणीमूळ, रानवांगी किंवा मोती रिंगणीमूळ, गोखरूमूळ, बेलमूळ, एरंडमूळ, (काळी टहाकळ) टेंटुमूळ, शिवणमूळ, पाडळमूळ, हीं सर्व औषधें १॥ तोळा प्रमाणानें. एखाद्या खात्रीचे दुकानांतून ताजीं अशीं पाहून घ्यावीं. त्या सर्वांच्या ७ पुड्या कराव्या. नंतर एक पुडी किंचित् ठेंचून तिचा अर्धा शेर पाण्यांत काढा करावा. काढा छटाक उरला ह्मणजे गाळून उपयोगांत आणावा.

**प्रमाणः**—प्रौढास बलाबल पाहून अर्ध छटाकपासून १ छटाकपर्यंत द्यावा. लहान मुलास १ वोंडलें भरून द्यावा, ( १ टी स्पूनपासून २ टी स्पून भरून द्यावा ).

**योजना आणि अनुपानः**—ह्यांत जवखार व सैंधव घालून प्याला असतां उरांत होत असलेला शूल, गुल्म, इ०

विकार नाहींसे होतात. हा पिंपळीचें चूर्ण घालून घेतला असतां कास, श्वास, वात, कफज्वर, सन्निपातज्वर हे दूर होतात आणि बाळंतरोगासंबंधीं दोष जातात. भाजलेला हिंग आणि पोखरमूळ यांचें चूर्ण मिळवून हा प्याला असतां गृध्रसीवायु दूर होतो. व एरंडेल घालून दिला असतां कंबर, कुक्षी व बस्ती या ठिकाणचा शूल नाहींसा होतो. शिवाय यानें भूक चांगली लागून अन्नपचनही चांगल्या प्रकारें होतें.

---

## यादी नंबर ३७.

### क्षारमयपेय.

एफरव्हेसिंग ड्राफ्ट् ऑफ सोडा किंवा सोडावाटर.

**कृतिः**—हें तयार करण्याची कृती अशी आहे कीं, ३० ग्रेन्स कार्बोनेट ऑफ सोडा, ३० तोळे पाणी राहील अशा एका कांचपात्रांत घालून त्यांत १४ तोळे थंड पाणी घालून तें चांगलें विरघळवावें. नंतर दुसऱ्या एका कांचपात्रांत २५ ग्रेन्स टारट्यारिक असिड घालून तें सुमारें ७ तोळे पाण्यांत विरघळवावें. मग हे दोन्ही द्रव एकत्र करून फेंस उतत आहे तोंच प्यावें, ह्मणजे ढेंकरा येऊन हुषारी वाटते. घशाशीं जळजळत असल्यास तें बरें होतें. उन्हाळ्यांत अतिशय तहान लागते व तलखी होत असते तीही शांत होते. उलटी बंद होते, शौच्यास व लघवीस साफ होतें, आणि अजीर्णाच्या पीडेचेंही शमन होतें.

बाजारांत जें दोन पैशांला बाटलींत सोडावाटर विकलें जातें, तें अगदीं निरुपयोगी ह्मटलें तरी चालेल, कारण कित्ये-

काचे दुकानीं तें पुष्कळ दिवसांचें शिल्लक असल्यानें त्यांतील क्यारबॉनिक आसिड ग्यास बहुतेक निघून गेलेला असतो. इतकेंच नाहीं, परंतु कारखानेवाले लोक उत्तम सोडाक्षार वापरण्याचे ऐवजीं खडू व चुना ह्यांचें मिश्रण वापरतात. ह्याखेरीज सोडावाटरच्या बाटल्या साफ करण्यासाठीं त्यांत शिशाच्या गोळ्या वगैरे घालतात, त्यांचा अंश बाटल्यांत राहिला असतां तो सोडावाटरच्या द्रवांत मिश्र होऊन पिण्यांत आल्यानें अपकार होण्याचा संभव असतो.

---

## यादी नंबर ३८.

### क्यार्बालिक लोशन.

**कृतिः**—क्यार्बालिक आसिड १ भाग, पाणी ८० भाग, अशीं एखाद्या बाटलींत मिश्र करून ठेवावीं.

**योजनाः**—दुर्गंधी नाहींशी करण्याकारितां ह्याचा उपयोग होतो. ह्यापासून सडण्याची क्रिया बंद पडत असते. जखमा, व्रण वगैरेंत दुर्गंधी उत्पन्न होऊं नये किंवा पू होऊं नये ह्मणून तीं धुण्याचे कामीं याचा उपयोग होत असतो. सांसर्गिक आणि स्पर्शसंचारी विषांची बाधा कमी करण्याचे कामीं ह्याचा चांगला उपयोग होतो. अशा प्रसंगीं हें औषध योजणें झाल्यास क्यार्बालिक असिडाचें प्रमाण दुपटीनें किंवा चौपटीनें वाढवावें लागतें.

# आरोग्यरक्षणासंबंधानें सूचना.

( पहिल्या भागावरून पुढें चालू ).

**दंतधावनकाष्ठाचे गुण:**—दंतधावनास रुईचें काष्ठ वीर्यदायक, वडाचें दीप्तिकर, बदरीचें मधुरध्वनिकर, खैराचें मुखाला सुगंध देणारें, उंबराचें वाक्सिद्धि करणारें, आम्राचें आरोग्यकारक, आणि आघाड्याचे काष्ठानें दंतधावन केलें असतां बुद्धि व पाठशक्ति वाढून ध्वनि उत्तम होतो.

**दंतधावनकाष्ठ घेऊं नये अशा स्थिती:**—गळा ताळ, ओष्ठ, जिव्हा, हिरड्या, दंत इत्यादिकांना व्याधि असतां, तोंड आलें असतां, तसेंच शोष, श्वास, खोकला, उचकी, उम्हासे, वांती, अजीर्ण, मूर्छा, मद, मस्तकशूल, कर्णशूल, नवज्वर, उरांतील व्याधी, हे उपद्रव असतां काष्ठानें दंत घासूं नयेत.

कित्येक लोक आपले दांत मजबूत आहेत असें दाखविविण्याकरितां कठिण पदार्थ दांतांनीं कडाकड फोडून दाखवितात. किंवा अतिशय ऊन पाणी अथवा बर्फ फार वेळ तोंडांत धरून दाखवितात, परंतु त्यापासून दांतांची आरोग्यता नाहींशी होते, ह्मणून असें कधीं करूं नये.

**जिव्हाशुद्धि:**—मुखमार्जन करतेवेळेस जिव्हा स्वच्छ केली पाहिजे. परंतु ती केवळ स्वच्छ केल्यानेंच स्वच्छ रहाते असें नाहीं. तर कोष्ठाची स्थिति बिघडली असतां जिभेवर बुरशी चढते. असें झाल्यावर ती स्वच्छ होण्यास औषधोपचार केले पाहिजेत.

जीभ घांसल्यानें ती स्वच्छ व हलकी होते, वर्णोच्चार स्पष्ट होतो, व पदार्थाचा स्वाद कळतो.

जे रात्रीं तोंड उघडें ठेवून निजतात, किंवा ज्यांस तंबाखू वारंवार खाण्याची किंवा ओढण्याची संवय असते, त्यांची जीभ वारंवार कोरडी पडून वर बुरशी चढते, तर अशा लोकांस मुखमार्जनाच्या वेळीं जिव्हाशुद्धि करणें फारच अवश्य आहे. कारण तसें जर न केलें तर तोंड किती बेचव होऊन जातें, हें सकाळीं उठल्याबरोबर कांहीं खाण्याचा पदार्थ तोंडांत टाकला तर लागलेंच कळेल. तर प्रातःकाळीं उठल्याबरोबर तोंड धुण्याच्या वेळीं जिभेवरील बुरशी साफ काढून टाकली असतां जिभेवरील त्वचा आरोग्यदशेंत राहून स्वादक्रिया तीव्र राहील यांत संशय नाहीं.

० कित्येक लोक घशांत बोटें घालून, तोंड लाल करून, डोळ्यांतून अश्रुधारा चालत तोंपर्यंत वमन करण्यास प्रयत्न करीत असतात, व त्याबरोबर थोडें आंबट कडू पाणी पडलें ह्मणजे संतुष्ट होऊन उठतात. ह्या सर्व खटाटोपींत कांहीं हांशील आहे असें दिसत नाहीं. कारण, जरी लोकांची समजूत अशी आहे कीं, थोडेंसें पित्त पडलें ह्मणजे प्रकृति दुरुस्त राहते, तरी वास्तविक पाहूं गेलें असतां जें तोंडांतून वमनावाटे पडतें, त्यांत पित्त फारच थोडें असतें, व अशी एक वेळ वमन करण्याची संवय पडून गेली, कीं ती एखाद्या व्यसनाप्रमाणें जडून राहते, व तीपासून नेहमींच्या पचनक्रियेस फार व्यत्यय येऊन अन्न पचविण्याची शक्ति बिघडून जाते.

ज्यांची प्रकृति फारच उत्तम, व अन्नपचनादि क्रिया सर्व प्रकारानें यथायोग्य चालल्या आहेत, व ज्यांस पानतंबाखू खाण्याची संवय मुळींच नसून सर्वकाल श्वासोच्छ्वासक्रिया

नाकाच्या द्वारें होऊन त्यांचें तोंड नेहमीं मिटलेलें असतें, ज्यांची जीभ नेहमीं स्वच्छ राहून तिजवर बुरशी मुळींच चढत नाहीं. अशा लोकांनीं फक्त पाण्यानें गुळणा करून टाकला तरी जिव्हाशुद्धि चांगली होते.

**जीभ घासण्याच्या पट्ट्या:**—जीभ घासण्याकरितां सोनें, रुपें, तांबें ह्या धातूंची किंवा हस्तिदंती, शिंगाची किंवा लांकडाची पट्टी घ्यावी, किंवा मऊशा पानानें जीभ घासावी.

**गंडूषविधीचे गुण:**—दांत व जिव्हा घासल्यानंतर थंड पाण्यानें वारंवार चूळ भरून टाकावी. तेणेंकरून तहान व मल हे नाश पावतात, तोंडाची आंतून शुद्धि होते व तोंडांतून रक्त स्रवत असल्यास तें बंद होतें. कोमट पाण्याच्या चुळी भरल्या असतां कफ, अरुचि, मल आणि दंतजाड्य ह्यांचा नाश होतो, व तोंड हलकें वाटतें.

**तोंड धुण्याच्या पाण्याचा गुण:**—थंड पाण्यानें तोंड धुतलें असतां रक्तपित्त, तोंडावरच्या पुळ्या, सूज, तीळिका, मुरूम यांचा नाश होतो. कोमट पाण्यानें तोंड धुतलें असतां कफ, वात आणि मुखशोथ यांचा नाश होतो.

सर्व अवयवांत मुख हें श्रेष्ठ गणिलें आहे, ह्मणून त्याची निगा जास्त राखिली पाहिजे. शिवाय, तोंडावरील त्वचा दुसऱ्या भागांवरील त्वचेपेक्षां अधिक नाजूक असून तिजमध्यें घर्मसंचय व तैलसंचय यांचें प्रमाणही जास्त असतें; तेव्हां त्याच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणें अति अगत्याचें आहे.

आपलें तोंड स्वच्छ दिसावें असें जरी सर्व लोकांस वाटतें, तरी ह्या कामांत आमच्या लोकांची हयगय फारच असते. साबणासारख्या स्वच्छता देणाऱ्या पदार्थास कित्येक

लोक अमंगळ असें मानितात. परंतु हा गैरसमजुतीचा प्रकार होय. तोंडावर पुटकळ्या उठून काळसर डाग पडूं लागले ह्मणजे त्याविषयीं वाईट वाटून घेणारे असे लोक आमच्यामध्यें फारच थोडे; तर यासंबंधानें इंग्रजी लोकांची रीति पहा. त्यांत मुलांचा चेहरा स्वच्छ व निर्मळ ठेवण्याविषयीं मुलांची आई फार झटत असते. त्यांत जर मुलांचे तोंडावर एखादा फोड आला किंवा देवी आल्या, तर तिचें मन लागलेंच अस्वस्थ होऊन तोंडांवर डाग राहूं नये, म्हणून ती हजारों उपचार योजीत असते. चेहरा निर्मळ राखणें आहे तर तो दिवसांतून एकदां किंवा दोनदां स्वच्छ व थंड पाण्यानें धुतला पाहिजे. नुसत्या पाण्यानेंच धुणें उपयोगीं नाहीं. कारण, त्यानें तोंडावरची तेलकटी साफ निघत नाहीं. ह्या-साठीं साबणाचा उपयोग केला पाहिजे. साबणानें तेलकटी जाते इतकेंच नाहीं, तर बाह्यत्वचेचा सुटलेला भूस (कोंडा) निघून अंतस्त्वचेंतील रुधिराभिसरणास जास्त उत्तेजन मिळतें, व त्यापासून त्वचेच्या संबंधाचे व्यापार जसे चालावे तसे चालूं लागतात. असा हा अत्युपयोगी पदार्थ साबण आहे. तो विकत घेतांना कोणत्या प्रकारचा घ्यावा हें समजणें अवश्य आहे. साबणाची वडी अतिशय कठीण किंवा नरम नसावी, व पाण्याबरोबर तिचा फेस सहज निघावा. साबू त्व-चेस लावल्यावर त्यापासून आग किंवा चुरचुराट होऊं नये आणि त्वचेला मृदुपणा येऊन ती गुळगुळीत र-हावी. थंडीच्या दिवसांत तर साधारण बाजारी साब-णाचा उपयोग करूं नये. कारण त्यापासून त्वचेच्या अंगीं कडकपणा येऊन ती फिकट होते व तिला भेगा पड--

तात. तर त्या दिवसांत ग्लिसराईन साबूचा उपयोग करावा हें बरें. सुवासिक साबण मुलांस व स्त्रियांस फार उत्तम, परंतु मोठ्या पुरुषांनीं त्याचा उपयोग केला असतां डोक्याचे व दाढीचे केंस फार राठ होतात. हजामतीच्या दिवशीं तर सुवासिक साबण तोंडास अगदीं लावूं नये. जो साबण मिळेल तो घेऊन लावण्यासारखी चुकी दुसरी कोठलीच नाहीं. तर साबण घेणें असल्यास पियर्ससारखे नामांकित साबण करणारे आहेत त्यांचा घ्यावा. इतर साबणांमध्यें कधीं कधीं क... विषारी पदार्थांची भेसळ केलेली असते. तेव्हां ते अं... लावल्यानें त्यापासून त्वग्रोग उत्पन्न होतात. हल्लीं लो... कॅरबॉलिक साबणाचा फार उपयोग करितात ही मोठी ... आहे. त्याचा उपयोग त्वग्रोगांसाठींच केला पाहिजे. ए... केला तर त्वचा राठ होते.

तोंड धुण्याच्या पाण्यांत थोडी 'टायलेट विनिगर' टाकली तर बरें. ती फार आरोग्यकारक आहे. अशा रीतीनें मुखमार्जन करून जे स्वच्छ रुमालानें आपलें मुख थोड्या जोरानें दाबून पुसतील, त्यांना इतर फायदे असोत, पण लागलीच त्यांच्या जिवास किती हुषारी वाटेल, हें नित्य अनुभवानें कळतें.

ज्यांच्या तोंडावर पुटकुळ्या किंवा मुरमें असतील त्यांनीं रात्रीस निजते वेळीं टंकणखार पाण्यांत घालून तो विरघळल्यावर तें पाणी किंवा दुधांत गंधकाची पूड टाकून तें तोंडास लावावें व सकाळीं वर सांगितल्याप्रमाणें मुखमार्जन करावें.

**श्मश्रु:**—पांच रात्री गेल्यावर हजामत करावी. केस उपटून कधीं काढूं नयेत, कातरून किंवा तासून काढावे. तेणें

ऽर दिसतो व पुष्टि, धन्यपणा, आयुष्यसुचिता वाढतात. केश नेहमीं खोबऱ्याचें तेल लावून न करावे व शिकेकाई लावून धुवावे, ह्मणजे न त्यांत उवा लिखा वगैरे कांहीं होत नाहीं. केश व पायाचे तळवे खेरीजकरून बहुधा शरीराच्या भागावर असतात, तथापि मस्तकावर त्यांची वृद्धि पूर्णपणें होते. स्त्रियांच्या मस्तकावरील केश कधीं कधीं शरीरा- ा बरोबरीनें लांब वाढतात. ज्या भागावर केश असतात, भागाचें ते उष्णता व थंडी यांपासून रक्षण करितात. तकाच्या कातडीवर मार बसला असतां, त्याचा केशामुळें च बचाव होतो. निरनिराळ्या मनुष्यांचे केशांचा रंग निराळा असतो.. तथापि काळ्या केशांच्या अंगीं सौंदर्य शेष आहे. भय, दुःख आदिकरून मनोविकारांनीं केशांचा ग पालटतो. कित्येक रोगांनीं शरीरप्रकृति क्षीण होऊन केश कमी होतात.

**नख:**—श्मश्रु करितांना नखेंही कापून काढावीं, नाहीं र त्यांत मळ सांचून बोटांना इजा होण्याचा किंवा तो मळ, ाण्याचे पदार्थाबरोबर पोटांत जाण्याचा संभव असतो. नखांच्या योगानें बोटांच्या अग्रांस सौंदर्य व बळकटी येते आणि दुखापतीपासून तीं त्यांचा बचाव करितात.

**स्नानविधि:**—हा ह्मटला ह्मणजे नेहमीं त्वचेवरच होतो. आतां स्नान करणें तें आचारनिमित्त आहे किंवा आरोग्यदायक आहे हें, त्वचा व तिचे धर्म यांचें वर्णन दि- ल्यानें चांगलें लक्षांत येणार आहे, ह्मणून प्रथम त्वचेसंबंधानें थोडेंसें सांगून नंतर स्नानक्रियेचा विचार करूं. त्वचेचे दोन

पुढदे आहेत, प्रकास अंतस्त्वच
ह्मणतात. बाह्यत्वचा कांचाच्या
ती नेहमीं बदलत असते. ती
होऊं लागतो. हा भूस कधीं क
सूक्ष्मदर्शक कांचेंतून पाहिलें त
व बारीक छिद्रें दृष्टीस पडतात. हाच त्वचा पायाच्या
च्या तळव्यांवर घर्षणामुळें जाड झालेली असते. हींत रक्त-वाहिन्या व मज्जातंतू नसल्या कारणानें तीस सुईनें टोंचलें तरी तिच्यामधून रक्त निघत नाहीं किंवा टोंचल्यासारखा भासही होत नाहीं. हिच्या खालीं अंतस्त्वचा किंवा जीस खरी त्वचा ह्मणतात ती असते. ही सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिली असतां, ती तंतूंनीं गुंफिलेली असून, त्यांत तैलपिंड व घर्मपिंडांचीं मुखें दृष्टीस पडतात. वर सांगितलेल्या बाह्य त्वचेवरील छिद्रें तीं हिचींच मुखें होत. ह्याखेरीज रोमांच मज्जातंतूंचीं अग्रें लहान लहान उंचवट्यांमध्यें बसविलेलीं असतात, व त्यांच्यासभोंवतीं रक्तवाहिन्या असतात. त्या इतक्या सूक्ष्म असतात कीं, एक इंच जागेमध्यें सुमारें तीन हजारांपर्यंत त्यांचा समावेश होतो. अशांची एकदम गर्दी दृष्टीस पडते. ह्या प्रत्येक अवयवापासून काय काय फेरफार होतात ते पहा. बाह्य त्वचेचा भूस होऊन ती नाहींशी होते आणि तिच्या ठिकाणीं नेहमीं नवीन त्वचा उत्पन्न होत असते. तैलरंध्रांतील तेलकट पदार्थापासून त्वचेला नरमपणा येतो व कॅरबॉनिक आसिड, युरिआ इत्यादि आपल्या शरीरांतील विषकारक पदार्थ घामांतून बाहेर पडून रक्त शुद्ध होतें व शरीरांतील उष्णतेचें मान सतत एकसारखें रहातें. हे वर सांगितलेलें त्वचेचे व्या-

REFBK-0000170

म. ग्रं. सं. ठाणें
विषय वैद्यक
सं. क्र. १३

REFBK-0000170

# वैद्यराज

अथवा

# रोगनिवारण.

भाग १ व २.


कै. विनायक रामचंद्र जोग

पास्ड मेडिकल प्रॅक्टिशनर, ग्रँटमेडिकल कॉलेज

यांनीं तयार केलेले



रा. रा. त्र्यंबक विनायक जोग

यांनीं छापून प्रसिद्ध केले.

आवृत्ति [illegible].

इ. स. १९०[illegible].



REFBK-0000170

बडोदें:—" पूर्णचंद्रोदय " छापखान्यांत छापून प्रसिद्ध के

ग्रंथकारानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.



कै. विनायक रामचंद्र जोग

कैलासवासी तीर्थरूप

## विनायक रामचंद्र जोग

पास्ड मेडिकल प्राक्टिशनर, ग्रांट मेडिकल

कॉलेज मुंबई,

यांनीं

**केलेले हे वैद्यराजाचे दोन्ही भाग**

पुन्हा छापून

त्यांच्या चरणीं सादर केले आहेत.

नम्र पुत्र

**त्र्यंबक विनायक जोग**